# अगापे

## पित्याच्या प्रेमळ चरित्राचे प्रकटीकरण




एड्रियन एबेन्स

# अगापे

*स्वर्गीय पित्याच्या प्रेमळ चारित्र्याचे प्रकटीकरण*

माझ्या सहकारी वडिलांना व भावांना समर्पित:
क्रेग जेकबसन, एडी पेरेझ, क्रेग जोन्स,
कॉलिन निकोल्सन आणि गॅविन डेव्हलिन.

माझी पत्नी लॉरेले, दहियान ब्राउन, टोनी
आणि ॲनापेस, गॅरी अहल्क्विस्ट आणि
फ्रँकक्लिन यांचे विशेष आभार.

अधिक माहितीसाठी संपर्क
fatheroflove.info
adrian@life-matters.org

मारानाथा मीडिया
डिसेम्बर 2017

प्रिय वाचक, या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रिय ख्रिस्तवासी विश्वास शंकर मोहिते याला समर्पित केले आहे. विश्वासच्या आई वडिलांना लग्नानंतर काही वर्ष बाळ होत नव्हते. आरोग्याच्या काही समस्यांमुळे त्यांना गर्भधारणा होणे अवघड आहे असे डॉक्टर म्हणाले. तरीहि, त्यांनी आणि सर्व नातेवाईकांनी देवाकडे त्यांच्यासाठी प्रार्थना चालूच ठेवल्या. प्रभूने त्यांची प्रार्थना ऐकली, भाऊ शंकर आणि आमचे सुनीताताई यांना ७ डिसेंबर २०११ रोजी, पुणे महाराष्ट्र येथे त्यांना विश्वास झाला. त्यांच्या कुटुंबा मध्ये सर्वजण त्याला चमत्काराचे बाळ असे बोलत. त्याच्या जन्मानंतर त्याच्या वडिलांना नोकरीच्या ठिकाणी पदोन्नती आणि बढती मिळून एक पुढारीपद मिळाले.





म्हणून, विश्वास त्यांच्यासाठी भाग्यवान आहे असा त्यांना विश्वास होता. काही वर्षांनी त्यांना आणखीन एक मुलगा झाला त्याचे नाव त्यांनी स्तवन असे ठेवले. विश्वास एका संयुक्तकुटुंबामध्ये जिथे त्याचे आई वडील, आज्जी, भावंडं, काका, काकू आणि त्यांची मुले एकत्र राहत होते. त्यांच्या घरातील सर्व लहान लेकरांमध्ये विश्वास खूप निराळा होता. खूप लहान वयामध्ये, त्याला देवावरचा विश्वास आणि देवाचे प्रेम समजले होते. चर्चला नियमित जाणे, प्रार्थनासभेला हजर राहणे आणि चर्चच्या सर्व कार्यक्रमात सहभागी राहणे हा त्याच्या जीवनाचा नित्यक्रम होता. देवाने या बाळाला संगीत आणि बोलण्याचे कौशल्य दिले होते. देवाचे प्रेम त्याच्या कुटुंबाला, शेजाऱ्यांना आणि अनोळखी लोकांना देखील सांगण्यास तो नेहमी उत्साही असायचा. देवाच्या गौरवासाठी तो धाडसाने न घाबरता नेहमी खरे बोलत होता. तो त्याच्या अभ्यासातही खूप चांगला होता.



त्याला नेहमी नवीन नातेसंबंध बनवायला आणि राखायला आवडत होते. नवीन नातं जोडायला त्याच्या समोर वय, संस्कृती, भाषा, दर्जा आणि स्त्री पुरुष हे कधीच आलं नाही. त्याचे प्रत्येकासोबत एक वेगळे आणि वयक्तिक नाते होते. ज्यांना तो ओळखत होता त्यांच्याशी तो खूप दयाळू होता. तो खुप साऱ्या कामात आपल्या कुटुंबाला

*स्वतःहुन मदत करत होता आणि आपल्या सर्व भावंडांची काळजी घेत होता. सर्व जण या बाळावर खूप प्रेम करत होते आणि त्यांच्या हृदयात त्याच्यासाठी एक विशेष जागा होती. दुर्दैवाने, ४ फेब्रुवारी २०२१ रोजी विश्वासचा अपघात झाला आणि त्याने अखेरचा स्वास सोडला.*



*प्रिय विश्वासच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबाला प्रचंड मोठा धक्का बसला. परंतु देवकृपेने, या परिस्थितीमुळे त्यांचा देवावरील विश्वास तुटला नाही. या घटनेच्या काही महिन्या आगोदरच सर्व कुटुंबीयांनी या पुस्तकामध्ये नमूद केलेल्या देवाच्या चरित्रा विषयी संदेशाचा अभ्यास केला होता. या संदेशाचा अभ्यासाने त्यांना समजण्यास मदत केली कि देव प्रीती आहे आणि त्याचे प्रेम हे कधीही न बदलणारे आहे. त्यांना समजले कि "प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाहीं व जो फिरण्यानें छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून तें उतरतें." याकोब१:१७. याचा अर्थ असा, कि आपल्या जीवनात घडणाऱ्या वाईट घटना देवाकडून नाहीत किंवा कोणत्याही हानीला तो कारणीभूत नाही.*

*या अध्यायानाने त्यांना समजण्यास मदत झाली कि सैतान आपल्या विरुद्ध किती सक्रिय कार्य करत आहे, तोच सर्व त्रासाचा, दुःखाचा आणि मरणाचा जनक आहे.पण विशेषकरून या घटनेनंतर त्यांना अस्तित्वात असलेला महान संघर्ष, जो देवांमध्ये आणि सैतानाच्या राज्यामध्ये चालू आहे याची जाणीव झाली. तरीही, ते खंबीरपणे विश्वास ठेवतात कि ते ख्रिस्तामधील विजयाच्या बाजूने आहेत आणि जेव्हा प्रभू येशू पुन्हा येईल तेव्हा ते त्यांच्या प्रिय मुलाला लवकरच पाहतील.विश्वास एक प्रभावी आयुष्य जगला आणि आता ख्रिस्तामध्ये झोपी गेलेला आहे. हे कुटुंब सांगते कि या बालकाने आम्हाला खूप अध्यात्मिक धडे शिकवले आहेत आणि तो प्रभू येशू येईपर्यंत आमच्या अंतःकरणात नेहमी जिवंत राहील. निश्चितच तो एका सुरक्षित हातात आहे आणि आपण लवकरच त्याला भेटू. तो पर्यंत सर्व कुटुंब, मित्र, मंडळींचे सभासद आणि सर्व शेजारी आम्ही सर्व त्याची आठवण करीत आहोत. देव त्याला आशीर्वाद देवो. आमेन.*

# अगापे

कॉपीराईट © 2018 एड्रियन इब्न्स

प्रथम प्रकाशित 2018

ISBN: 978-0-6482290-4-9

सर्व हक्क राखीव. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय खालील उल्लेख केलेल्या मार्गानी वापरणे प्रतिबंधीत आहे. डेटाबेस आणि पुनर्प्राप्ती प्रणालीद्वारे प्रसारित केलेल्या कोणत्याही स्वरूपाचे साधन (इलेक्ट्रॉनिक, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग) इत्यादी. याखेरीज लेख किंव्हा गंभीर पुनिावलोकन यांमध्ये अवतरणाचा वापर केला जाऊ शकतो..

MARANATHA
MEDIA

# सामग्री


प्रस्तावना ........ 7

1. पित्याचे प्रकटीकरण ........ 9
2. आपण कसे वाचतो? ........ 19
3. वधस्तंभावरील मृत्यू ........ 28
4. माझा प्रिय पुत्र ........ 37
5. तुमच्या शत्रूंवर प्रेम करा ........ 45
6. स्वर्गातून आलेली अग्नी ........ 52
7. आपले हृदय कठोर करू नका ........ 63
8. पाप्यांना दगड मारण्याची आज्ञा का? ........ 75
9. एक आरसा म्हणून कायदा ........ 87
10. आपणामध्ये देवाचे भय निर्माण करणे ........ 97
11. परमेश्वराचा राग ........ 106
12. तलवारीला तिच्या योग्य जागी ठेवणे ........ 116
13. काट्यांचा मुकुट ........ 131
14. मृत्यूची शक्ती ........ 142
15. माझ्या पित्याच्या आज्ञा ........ 153
16. दैवी आरशात श्रीमंत माणूस आणि लाजर ........ 167
17. वध करणारे देवदूत ........ 179
18. साधारण विधाने ........ 195
19. आपल्या पापांमुळे घायाळ झालेला ........ 205
20. वधस्तंभामुळे प्रकट झालेला सर्प ........ 219
21. सार्वकालिक करार आणि मृत्युची सेवा ........ 245
22. सर्वात नम्र मनुष्य मोशे ........ 263
23. एलीया आणि अंतिम सीमा ........ 283
24. आब्राहाम आणि विध्वंसकारी घृणास्पद गोष्टी ........ 298

# प्रस्तावना

हे एक चांगले संशोधन केलेले तथ्य आहे की मुले त्यांच्या पालकांच्या अनेक वैशिष्ट्यांचे अवलंब करतात. निरीक्षण आणि परस्परसंवादाच्या प्रक्रियेद्वारे वडिलांची आणि आईची वैशिष्ट्ये, चांगली किंवा वाईट, सहसा मुलाच्या जीवनात प्रतिबिंबित होतात. हा वारसा असण्याचा नियम आहे.

जग हे हिंसाचार आणि क्रूरतेने भरलेले आहे जरी त्यात सुरक्षाची अधिक गरज आहे. धमक्यांच्या दिशेने संतापाच्या भावना, मग ते वास्तविक असोत किंवा समजलेले, अनेकदा मानवी जीवनाचा नाश करण्यासाठी कारणीभूत ठरतात.

आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनात शांतता, आणि प्रेम अनुभवण्याची इच्छा असते. आणि मानवजात त्या इच्छेच्या अधिक जवळ कसे जाऊ शकते? तंत्रज्ञानातील आपल्या सर्व प्रगतीमुळे जग हे स्वार्थ आणि हिंसेकडे अधिक खोलवर जात आहे.

2000 वर्षांपूर्वी पृथ्वीवर आलेल्या येशू ख्रिस्ताचे जीवन आपल्यासाठी निःस्वार्थ, आणि अगापे प्रेमाचे एक आदर्श नमुना देते ज्याद्वारे लाखो लोकांना शांती मिळाली आहे. परंतु बऱ्याच लोकांसाठी जीवनाचा हा सुंदर नमुना शास्त्रातील नमूद केलेल्या देवाच्या आणि मनुष्याच्या पुरातनकाळापासून होत असलेल्या संवादामुळे दबवला व नष्ट केला जातो.

देवाचे वर्णन कधीकधी अत्यंत हिंसक आणि नाश करणारा म्हणून केले जाते, जो केवळ शत्रू सैनिकांचाच नव्हे तर त्यांच्या निष्पाप मुलांनाही मारण्याचा आदेश देतो. पवित्र शास्त्र भयकारकपणे व नियमितपणे व्यक्त करते की परमेश्वर रागावलेला आणि क्रोधाने भरलेला आहे. ह्यापलीकडे येशूचा वधस्तंभावरील मृत्यू हा अनेकांसाठी कलंकित आहे, त्यांना वाटते कि जे लोक देवाविरुद्ध पाप व त्याच्या नियमाचे उल्लंघन करतात त्यांच्यासाठी देव मृत्यूची मागणी करतो.

नास्तिकतेसह जगातील बहुतेक धर्मांमध्ये देवाबद्दलची हि ठळक मते आहेत, अलीकडच्या काळात फ्रेंच क्रांतीमध्ये हजारो लोकांच्या कत्तलीतून ह्या विचारांमध्ये महत्त्वाची वाढ  झाली.

काहींना पवित्र शास्त्रामधील देवाच्या वर्णनात आणि ख्रिस्ताच्या जीवनात असलेल्या फरकामुळे ख्रिस्ताच्या काही दाव्यांचा ताळमेळ घालणे आव्हानात्मक वाटते. तरीही एका मार्मिक क्षणात त्याच्या शिष्यापैकी एकाशी बोलताना येशू म्हणाला "ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे."

हे कसे शक्य होईल? हे खरे असू शकते का कि येशूच्या जीवनात प्रकट केल्याप्रमाणे देव खरोखरच दयाळू आणि कनवाळू आहे? देवाच्या नियमाच्या अगदी केंद्रस्थानी ही आज्ञा आहे जी सांगते की "तुम्ही खून करू नका." हे देवाच्या चरित्राचे प्रतिबिंब आहे का? कि देवासमोर सर्वात लहान असलेल्या मनुष्यासाठी लागू केलेला एक कायदा आहे? असा नमुना नेत्यांना त्यांच्या वर्तनाचे अनुकरण करण्यास आणि सत्तेत असताना असेच वागण्यास प्रभावित करतात का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मला सोळा वर्षांच्या कालावधी लागला आणि ती सर्व उत्तरे या पुस्तकात आढळतील. जेव्हा मी माझ्या पहिल्या मुलाच्या जन्माची आठवण काढत होतो तेव्हा हा प्रवास सुरू झाला. मला तो क्षण आठवला जेव्हा मी त्याला पहिल्यांदा माझ्या मिठीत घेतले आणि माझ्या मनात त्याच्यासाठी प्रेमाची खोल भावना जाणवली. माझ्या मुलावरील माझे प्रेम हे देवाच्या पुत्रावरील प्रेमाचे प्रतिबिंब आहे हे समजून, मला दैवी भावनांनी स्पर्श केला. माझ्या भावना आणि देवाचे प्रेम यांच्यात मला सुंदर समानता आढळली, आणि यामुळेच पृथ्वीवर जन्मलेल्या सर्व मुलांवर देव असेच प्रेम करतो.

हा प्रवास खूप लांबचा आणि कित्येकदा थकवणारा होता. कधीकधी, पवित्र शास्त्रामधील स्पष्ट विरोधभासांनी माझ्यासमोर आव्हाने उभी केली.

या शोधाचा निष्कर्ष मी तुमच्यासमोर मांडत आहे. याद्वारे मला इतर देशांमध्ये जाऊन अनेक संशोधकांशी भेटण्याची संधी मिळाली जे ह्याच विषयावर संशोधन करत आहेत आणि हि आपल्या सर्वांसाठी खूप आशीर्वादाची गोष्ट आहे.

मी तुम्हाला साक्ष देतो की देव खरोखर प्रेम आहे. तो हिंसेचा परमेश्वर नाही. लाखो लोकांच्या विश्वासाप्रमाणे तो आपल्या भटक्या मुलांना अनंतकाळाच्या अग्नीत टाकण्याची धमकी देत नाही.

मला माहित आहे की अनेकांना खात्री पटलेली नाही, परंतु मी तुम्हाला हा प्रवास करण्यासाठी आवाहन करतो आणि तुम्ही स्वत: पहा आणि हे सत्य शोधून काढा की देव प्रेम आहे.

# 1. पित्याचे प्रकटीकरण

"देव प्रेम आहे" हे वचन प्रेषित योहानाने येशू पृथ्वीवर असताना त्याच्याशी सखोल संबंध अनुभवल्यानंतर लिहिले होते. 1 योहान ४:१६ जेव्हा योहानाने येशूला उपदेश करताना, आंधळ्यांचे डोळे उघडताना आणि कनवाळू अंतःकरणाने चूक करणाऱ्यांना मार्ग दाखवताना पहिले तेव्हा योहानाने येशूचे खरे ध्येय समजून घेतले.

देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे. योहान १:१८ येशूच्या जीवनाद्वारे प्रकट झालेले देवाचे चरित्र हे पूर्वीचे लोक देवाला जसे समजत होते त्याच्या अगदी विरुद्ध होते. येशू आणि त्याचे शिष्य एका आंधळ्याजवळून जात असताना त्याच्या शिष्यांनी त्याला प्रश्न केला: "गुरूजी, कोणाच्या पापामुळे हा असा आंधळा जन्मास आला? ह्याच्या किंवा ह्याच्या आईबापांच्या?" योहान ९:२ त्यांच्या प्रश्नावरून असे दिसून येते की लोक देवाला एक क्रूर हुकूमशहा समजतात जो त्याची आज्ञा न पाळणाऱ्याना शिक्षा देतो. ख्रिस्तापूर्वी जगातील साम्राज्ये हिंसाचार आणि कठोर नेतृत्वावर अवलंबून होती, ह्याचे कारण हे कि लोकांनी देवाला क्षमा न करणारा आणि कठोर म्हणून पाहिले आणि हे सर्व त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब होते.

परंतु एक वेगळा संदेश घोषित करणारे काही साक्षीदार होते. नैसर्गिक सौंदर्य, सुगंध असलेली रंगीबेरंगी फुले, मधुर आवाजात गाणारे पक्षी आणि हिरवीगार झाडे हे सर्व एका अद्भुत निर्माणकर्त्याचे आणि काळजी घेणाऱ्या पित्याचे अस्तित्व दर्शवतात. आईवडिलांचे त्यांच्या मुलांसाठी असलेले उत्कंठ व समर्पित प्रेम आणि पती-पत्नीचे घनिष्ट नातेसंबंध देखील निर्माणकर्त्याच्या कोमल हृदयाविषयी बोलतात.

पंधराशे वर्षांपूर्वी मोशेने त्याच्या निर्मात्याला समजून घेण्याचा प्रयत्न करताना, देवाला त्याचे चरित्र प्रकट करण्याची विनंती केली.

तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने 'परमेश्वर' ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर.. निर्गम ३४:५-६

हे वचन आणि इतर अनेक पुरावे असूनही लोकांचा प्रचलित दृष्टिकोन असा होता की देव कठोर आहे आणि ज्यांनी त्याला अपमानित केले त्यांना तो क्रूरतेने शिक्षा

करेल.

हा दृष्टिकोन का प्रचलित झाला? कारण सैतानाने सुरुवातीपासूनच आपल्या मनात देवाच्या प्रेमाविषयी शंका निर्माण केली होती.

सर्प स्त्रीला म्हणाला, “तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल.” उत्पत्ती ३:४,५

सैतानाने आदाम आणि हव्वेला खात्री दिली की देवाला त्यांचे हित नाही पाहिजे. तुम्ही देवावर भरवसा ठेऊ शकत नाही हे सैतानाने त्यांना पटवून दिले. आदाम आणि हव्वेला सैतानाद्वारे सांगण्यात आले की ते फळ खाल्ल्याने मरणार नाहीत, ज्यामुळे देवाचा प्रेमळ इशारा समजण्यात त्यांचा गैरसमज झाला.

पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.” उत्पत्ती २:१७

जर झाडाचे फळ खाल्ल्याने आदाम आणि हव्वा मरणार नाहीत तर कशामुळे ते मरतील? ह्याचे एकच स्पष्टीकरण आहे की त्यांना हानी पोहोचवण्याची शक्ती फक्त देवाकडे असली पाहिजे. जेव्हा आदामाने बागेत देवाचा आवाज पुन्हा ऐकला तेव्हा अश्या चुकीच्या विश्वासाचे परिणाम दिसून आले.

तो म्हणाला, “मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.” उत्पत्ती ३:१०

आदाम देवाला का घाबरत होता? कारण त्याला मृत्यूची भीती वाटत होती, त्याला वाटले देव त्याची आज्ञा न पाळल्यामुळे त्यांना ठार मारेल. देव त्यांना मारून टाकेल या कल्पनेत असलेली ही मृत्यूची भीती होती ज्याद्वारे सैतानाने त्यांना पापाच्या गुलामगिरीत ठेवले होते.

जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे. इब्रिकरांस २:१५

सैतानाने आदाम आणि हव्वेला सांगितले की देव त्याची आज्ञा मोडल्याबद्दल तुम्हाला शिक्षा करेल आणि ठार मारेल आणखी त्याने सांगितले कि देव त्यांना त्या झाडाचे फळ खाण्याच्या परिणामांबद्दल खोटे बोलला. तरीही हे स्वतः सैतानाचे गुणधर्म होते. शास्त्री व परुश्यांशी बोलताना येशू त्यांच्या कृतीद्वारे या गुणधर्मांचे वर्णन करतो.

तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनाप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. योहान ८:४४

या फसवणुकीद्वारे सैतानाने संपूर्ण जगाला गुलाम बनवले आणि, मनुष्याला देवापासून दूर ठेवण्यासाठी त्याने आपल्यासमोर देवाच्या चारित्र्याचे चुकीचे चित्रण केले आहे. देवाचा पुत्र आपल्या पित्याचे खरे चरित्र प्रकट करण्यासाठी स्वर्गातून उतरला होता; गैरसमजाचे काळे आभाळ दूर करण्यासाठी आणि पिता खरोखर कसा आहे हे दाखवण्यासाठी तो आला होता. जेव्हा शिष्यांपैकी एकाने विनंती केली, "आम्हाला पिता दाखवा," तेव्हा येशूने उत्तर दिले:

मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर 'आम्हांला पिता दाखवा' असे तू कसे म्हणतोस? योहान १४:८-९.

त्याच्या पृथ्वीवरील कार्याचे वर्णन करताना येशू म्हणाला:

"परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास, [भग्नहृदयी जनांस बरे करण्यास] त्याने मला अभिषेक केला; त्याने मला पाठवले आहे, ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यांना पुन्हा दृष्टीचा लाभ

ह्यांची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांना सोडवून पाठवावे; लूक.४;१८

नाईन गावातील विधवेची आपण कल्पना करू जेव्हा येशूने दफनविधीमध्ये अडथळा आणून तिच्या मरण पावलेल्या मुलाला पुन्हा जिवंत केले. याईराची गोष्ट जेव्हा येशूने त्याच्या मुलीला पुन्हा जिवंत केले, ज्याप्रमाणे दुःखाची जागा आनंदाने घेतली हे पाहताना आपले हृदय उल्हासून जाते. येशू संपूर्ण गावातून प्रवास करायचा आणि त्या गावातील प्रत्येक आजारी बरे होऊन जायचे. त्याला डोंगरावरील 5000 लोकांचा फार कळवळा आला आणि म्हणून त्याने सर्वांना जेवणासाठी अन्न पुरविले आणखी त्याने लोकांना पित्याच्या प्रेमाबद्दल सांगितले.

मातांनी आपल्या मुलांना येशूकडे त्याच्या आशीर्वादासाठी आणले कारण त्याची उपस्थिती अंतःकरणाचे स्वागत करणारी होती. त्याच्या सर्व कृतीतून पित्याची महिमा प्रकट झाली. त्याने बोललेल्या प्रत्येक शब्दाने जगाला गुलाम बनवणाऱ्या अंधाराचा नाश केला, आणि ती जागा त्याच्या तेजस्वी प्रकाशाने घेतली. सकारात्मक विचार किंवा खुशामत न करता येशू प्रेमाने सत्य बोलला आणि त्याने धाडसाने खोटेपणा आणि अविश्वास उघड केला. तरीही चुकलेल्यांना मार्ग दाखवताना त्याच्या आवाजात त्या मनुष्यासाठी काळजी होती. तो फक्त इतरांसाठी जगला आणि प्रत्येक जीव त्याच्यासाठी अत्यंत मौल्यवान होता.

पृथ्वीवरील ख्रिस्ताचे जीवन आपल्याला देवाचे चरित्र प्रकट करते. ख्रिस्त म्हणाला की मी स्वतःहून काहीही करत नाही. ख्रिस्तामध्ये देव जगाचा स्वतःशी समेट करून घेत होता. 2 करिंथकरांस 5:19. पित्याचे संपूर्ण चरित्र त्याच्या पुत्रामध्ये प्रकट झाले. पृथ्वीवर येशूने मानवतेला पित्याची स्पष्ट प्रतिमा प्रकट केली.

कारण मी आपल्या मनचे बोललो नाही, तर मी काय सांगावे व काय बोलावे ह्यांविषयी ज्या पित्याने मला पाठवले त्यानेच मला आज्ञा दिली आहे. त्याची आज्ञा सार्वकालिक जीवन आहे हे मला ठाऊक आहे; म्हणून जे काही मी बोलतो ते पित्याने मला सांगितल्याप्रमाणे बोलतो." योहान 12:49-50

आपल्या पित्याला मनापासून प्रार्थना करताना, येशूने हे शब्द उच्चारले:

सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठवलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे. जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. तर आता हे माझ्या पित्या, जग होण्यापूर्वी जो माझा गौरव तुझ्याजवळ होता त्याच्या योगे तू आपणाजवळ माझा

गौरव कर. जे लोक तू मला जगातून दिलेस त्यांना मी तुझे नाव प्रकट केले; ते तुझे होते आणि तू ते मला दिलेस; आणि त्यांनी तुझे वचन पाळले आहे. योहान 17:3-6

येशू आपल्याला सांगतो की त्याने पृथ्वीवर पित्याचे गौरव केले आहे. पित्याचे गौरव हे त्याचे चारित्र्य आहे आणि हेच येशूने आपल्या पृथ्वीवरील कार्यात आपल्याला प्रकट केले आहे. तो पित्याला असेही सांगतो की त्याने पित्याचे नाव किंवा चरित्र्य त्याच्याबरोबर असलेल्या शिष्यांनादेखील प्रकट केले आहे.

म्हणूनच येशू फिलिप्पला एवढ्या आत्मविश्वासाने म्हणू शकला की जर तू मला पाहिले आहेस तर तू पित्याला पाहिले आहेस. पिता कसा होता हे जाणून घेण्यासाठी फिलिपला संपूर्ण मानवी इतिहासातील येशूच्या कार्याचा साक्षीदार होण्याची गरज नव्हती. अवघ्या तीन वर्षांत येशूने पिता कसा आहे हे आपल्याला प्रत्येक बाबतीत दाखवून दिले.

या प्रेमाचा सर्वोच्च साक्षात्कार वधस्तंभावर प्रकट झाला.

देवाने आपल्या एकुलत्या एक जन्मलेल्या पुत्राला जगात पाठवले आहे, ह्यासाठी की, त्याच्या द्वारे आपल्याला जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रकट झाली. प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुमच्याआमच्यावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वतःच्या पुत्राला पाठवले. प्रियजनहो, देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एकमेकांवर प्रीती केली पाहिजे. 1 योहान 4:9-11

जर येशू सैतानाच्या मोहाला बळी पडला असता तर तो कायमचा गमावला गेला असता आणि परिणामी संपूर्ण मानवजात नष्ट झाली असती. देवाने आपल्या पुत्राला केवळ 33 वर्षांसाठी जगात पाठवले नाही; तर त्याने त्याला आमच्यासाठी दिले. पित्याचे जगावर एवढे प्रेम होते की आपले सर्वस्व गमावण्याचा धोका असूनही मानवजातीला वाचवण्यासाठी आपल्या एकुलत्या एक पुत्राचा त्याग करण्यास तो तयार झाला.

ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपल्या सर्वांकरता समर्पण केले, तो त्याच्याबरोबर आपल्याला सर्वकाही कसे देणार नाही?

रोमकरांस 8:32

हा धोका येशूने आपल्या पित्याला बागेत केलेल्या प्रार्थनेतून प्रकट होतो. कदाचित तो ह्या परीक्षेत उत्तीर्ण होणार नाही याची त्याला काळजी वाटत होती, तरीही त्याने आपल्या पित्याच्या इच्छेवर विश्वास ठेवला होता.

मग तो थोडासा पुढे जाऊन पालथा पडला आणि त्याने अशी प्रार्थना केली : “हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.” मत्तय 26:39

त्या प्रेमाची व्यापकता आणि रुंदी आपण कशी समजू शकतो? कोणते शब्द देवाच्या प्रेमाचे आश्चर्य व्यक्त करू शकतात? आदाम त्याच्यासाठी सर्वात मौल्यवान असणारी गोष्ट सोडण्यास तयार नव्हता, परंतु पिता तयार होता. त्याने स्वतःच्या पुत्राला देखील ठेवले नाही.

येशूने त्याच्या क्लेशात आनंदित होणाऱ्या लोकांचे मारहाण, थट्टा आणि मस्करी शांतपणे सहन केली. त्याने विश्वासूपणे त्याचा वधस्तंभ वाहून नेण्याचा प्रयत्न केला जोपर्यंत ते वजन त्याच्यासाठी खूप जास्त झाले. येशूने वधस्तंभावर असताना योहानाला त्याच्या आईची काळजी घेण्यास सांगितले आणि जे त्याला मारत होते त्यांना क्षमा करण्यास त्याने आपल्या पित्याजवळ विनंती केली.

संपूर्ण विश्वाने असे आश्चर्यकारक प्रेम कधीच पाहिले नव्हते. पित्याचे चारित्र्य त्याच्या पुत्राकडून तेजस्वी प्रकाशाने उजळले. खरोखर पिता त्याच्या शत्रूंवर प्रेम करतो आणि जे त्याचा नाश करू पाहतात त्यांना क्षमा करतो. हे सर्व देवाच्या पुत्राच्या चरित्रातून प्रकट झाले.  मुत्युद्वारे, देवाच्या पुत्राने सैतानाला खुनी म्हणून उघड केले आणि सर्पाच्या कृतींचा पर्दाफाश केला. क्रुसावर खून करणारा आणि ज्याचा खून झाला तो पूर्णपणे उघड झाला. ज्या आत्म्याने काईनला त्याचा भाऊ हाबेल याला ठार मारण्यास प्रवृत्त केले तो वधस्तंभावर पूर्ण प्रकाशात प्रकट झाला आणि सैतान किती खोटारडा आणि खुनी आहे हे स्वर्गीय विश्वाला पहिल्यांदा पूर्णपणे दिसून आले. स्वर्गामध्ये त्याचा प्रभाव विजेसारखा पडला आणि स्वर्गात देवदूतांच्या अंतःकरणात त्याला स्थान मिळाले नाही.

या प्रवासाच्या सुरुवातीस आम्हाला पवित्र शास्त्रातील कथा वाचून व समजून घेण्यासाठी योग्य दृष्टीकोन ठेवण्याची गरज आहे. जुन्या करारात देवाची जी ओळख होती ज्याला पूर्वी लोक घाबरायचे आता ती ओळख क्रुसाच्या प्रकाशात सुंदर आणि आकर्षक बनली होती. दया, प्रेमळपणा आणि वडीलधारी प्रेम ह्यांचे पवित्रता, न्याय आणि सामर्थ्य यांसोबत मिश्रण केलेले दिसते. नवीन कराराच्या कथांचे परीक्षण केल्याने आम्हाला जुन्या करारातील न्यायाच्या कृतींमागील हेतू समजण्यास मदत होते. या धड्यांचे उद्दिष्ट हे दाखवून देणे आहे की पृथ्वीवरील येशूचे जीवन नेहेमीच सुसंगत होते, जे आपल्या पित्यांच्या चारित्र्याला प्रतिबिंबित करत होते.

## 2. आपण कसे वाचतो?

येशू सर्वात आश्चर्यकारक शिक्षक होता. येशूला अटक करण्यासाठी पाठवलेल्या मंदिरातील अधिकाऱ्यांना विचारण्यात आले की त्यांनी येशूला का धरून आणले नाही, ते यासाठी स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत तर उलट म्हणाले:

> "कोणीही मनुष्य त्याच्यासारखा कधी बोलला नाही." योहान 7:46

ही वस्तुस्थिती असतानाही नवीन करारात असे नोंदवले आहे की बहुतेक लोकांना त्याला समजून घेण्यास अडचण होती.

स्वतःचे मरण आणि पुनरुत्थानाबद्दल यहुद्यांशी बोलताना तो म्हणाला, "हे मंदिर मोडून टाका आणि तीन दिवसांत मी ते पुन्हा उभारीन." त्यांना वाटले की तो

भौतिक मंदिराबद्दल बोलत आहे, परंतु तो स्वतःच्या शारीरिक मंदिराबद्दल बोलत होता. येशूने निकोदेमसला सांगितले की त्याने पुन्हा जन्म घेतला पाहिजे; निकोदेमसला वाटले की येशू शारीरिक जन्माबद्दल बोलत आहे परंतु येशू आध्यात्मिक जन्माबद्दल बोलत होता. जेव्हा येशूने त्या शमरोनी स्त्रीला विहिरीजवळ जिवंत पाणी देण्याचे दर्शवले तेव्हा तिला वाटले की ते भौतिक पाणी असेल जेव्हा कि येशू आध्यात्मिक पाण्याबद्दल बोलत होता. पुन्हा, येशूने शिष्यांना परुशांच्या खमीराबद्दल चेतावणी दिली; त्यांना वाटले की तो भौतिक भाकरीबद्दल बोलत आहे. पण येशू त्यांना म्हणाला:

> मी भाकरीविषयी बोललो नाही हे तुम्ही का समजत नाही? परूशी व सदूकी ह्यांच्या खमिराविषयी सावध राहा." मत्तय 16:11

जेव्हा येशूने 5000 लोकांना खायला अन्न दिले तेव्हा तो त्यांना केलेल्या या चमत्काराचा अर्थ शिकवू लागला. येशूने त्यांना समजावून सांगितले की भाकर हे त्याच्या जीवनाचे प्रतीक आहे ज्यावर संपूर्ण जगाने मनन आणि विचार करणे आवश्यक आहे. येशूने त्यांना सांगितले:

> जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन. योहान 6:54

या शब्दांनी येशूला ऐकणारे लोक थक्क झाले. ते कुरकुर करत म्हणाले, "ह्याचे हे म्हणणे खूप कठीण आहे; असे कोण ऐकू शकेल?" त्याच्या सेवेत इच्छुक असलेल्यांपैकी पुष्कळ लोक त्याच्यापासून दूर गेले आणि कित्येकांनी त्याला अनुसरणे सोडून दिले.

> तो जगात होता व जग त्याच्या द्वारे झाले, तरी जगाने त्याला ओळखले नाही. जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. योहान 1:10-11

या सर्व गोष्टी यशयाच्या भविष्यवाणीची पूर्णता होती

> आम्ही ऐकलेल्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आहे? परमेश्वराचा भुज कोणास प्रकट झाला आहे? कारण तो त्याच्यापुढे रोपासारखा, रुक्ष भूमीतील अंकुरासारखा वाढला; त्याला रूप नव्हते, त्याला शोभा नव्हती, त्याच्याकडे पाहिले तर त्याच्यावर मन बसेल असे त्याच्या ठायी सौंदर्य नव्हते. तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. यशया 53:1-3

देवाच्या पुत्रासाठी मानवी हृदयाची नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणजे त्याचा आणि त्याच्या शिकवणींचा नकार करणे होती.

> स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत, कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते. 1 करिंथ 2:14

जेव्हा नैसर्गिक मनुष्य देवाचे वचन वाचतो तेव्हा त्याला ते समजत नाही. परंतु पवित्र शास्त्र आपल्याला सांगते:

> कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. यशया 55:8-9

देवाच्या आत्म्याने पुन्हा जन्म घेतल्याशिवाय आणि मार्गदर्शन मिळविण्यासाठी नम्रतेने पवित्र शास्त्रांकडे गेल्याशिवाय, आपण देवाच्या वचनाचा संदेश योग्यरित्या समजू शकणार नाही.

> जर कोणाला वाटत असेल की, आपल्याला एखादी गोष्ट कळते तर ज्याप्रमाणे कळले पाहिजे त्याप्रमाणे त्याला अद्याप कळत नाही.
>
> 1 करिंथ 8:2
>
> माझ्या प्रिय बंधूंनो, तुम्हांला हे कळते. तर प्रत्येक माणूस ऐकण्यास तत्पर, बोलण्यास धीमा, रागास मंद असावा; याकोब 1:19
>
> ऐकून घेण्यापूर्वी जो उत्तर देतो त्याचे ते करणे मूर्खपणाचे व लज्जास्पद ठरते. नीतिसूत्रे 18:13

एखादे प्रकरण ऐकून घेण्यापूर्वीच उत्तर देणे खूप सोपे आहे. खालील उदाहरणाचा विचार करा:

> आणखी त्याने त्यांना म्हटले, "मी तुम्हांला पिशवी, झोळी व पायतणे घेतल्याशिवाय पाठवले तेव्हा तुम्हांला काही उणे पडले का?" ते म्हणाले, "नाही." त्याने त्यांना म्हटले, "पण आता तर ज्याच्याजवळ पिशवी आहे त्याने ती घ्यावी; तसेच झोळीही घ्यावी आणि ज्याच्याजवळ तलवार नाही त्याने आपले वस्त्र विकून ती विकत घ्यावी. लूक 22:35-36

पण नंतर तो विचार बदलेल असे वाटते?

> तेव्हा येशू त्याला म्हणाला, "तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील. मत्तय 26:52

येशूने आपल्या शिष्यांना तलवार विकत घेण्यास सांगितले आणि नंतर जेव्हा पेत्राने ती वापरली तेव्हा त्याने त्याला दोष लावला असे का? पेत्राने चुकीच्या प्रसंगी तलवारीचा वापर केला का? तसे असल्यास, ते केव्हा वापरावे आणि केव्हा नाही हे येशूने त्याला सांगितले का? "तलवार उचलणाऱ्या सर्वांचा नाश तालवारीनेच होईल" हे शब्द अगदी सर्वांसाठीच आहेत. जर ते पुरेसे नसेल तर आम्ही यात आणखी एक परिमाण जोडू:

> तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या. इफिसकरांस पत्र 6:17
>
> कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे. इब्रीकरांस 4:12

> त्याच्या उजव्या हातात सात तारे होते; त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तलवार निघाली आणि त्याची मुद्रा ‘परमतेजाने’ प्रकाशणाऱ्या ‘सूर्यासारखी’ होती. प्रगटीकरण 1:16

पवित्र शास्त्र देवाच्या वचनाचा संदर्भ देण्यासाठी तलवार हा शब्द वापरते. ही समज कधी लागू करायची आणि शाब्दिक तलवार कधी समजायची हे कसे कळेल? अग्नीच्या उदाहरणाचा पुन्हा एकदा विचार करा:

> एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, “मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो.” तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. 2 राजे 1:10

> पुढे असे झाले की, त्याचा वर घेतले जाण्याचा समय जवळ आला तेव्हा त्याने यरुशलेमेस जाण्याच्या दृढनिश्चयाने तिकडे आपले तोंड वळवले. त्याने आपल्यापुढे निरोप्ये पाठवले; तेव्हा ते निघून त्याच्यासाठी तयारी करण्यास शोमरोन्यांच्या एका गावात गेले; पण त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही, कारण त्याचा रोख यरुशलेमेकडे जाण्याचा होता. हे पाहून त्याचे शिष्य याकोब व योहान म्हणाले, “प्रभूजी, ‘आकाशातून अग्नी पडून’ त्यांचा ‘नाश व्हावा’ म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी आपली इच्छा आहे काय?” त्याने वळून त्यांना धमकावले. मग ते दुसऱ्या गावास गेले. लूक 9:51-56

शिष्यांना दटावताना येशू एलीयालाही दटावत होता का? त्यांना स्वर्गातून आग बोलावण्याची योग्य वेळ माहीत नव्हती का? पुन्हा येशूचे शब्द अगदी सर्वांसाठीच आहेत. तो म्हणतो की तो मनुष्याचे जीवन नष्ट करण्यासाठी आला नाही तर त्यांना वाचवण्यासाठी आला आहे. हे वाक्य जेव्हा तो येथे पृथ्वीवर होता तेव्हाच लागू होते, कि नंतर तो मनुष्यांचे जीवन नष्ट करेल?

पवित्र शास्त्र वाचताना उद्‌भवणारे अनेक प्रश्नांपैकी हि काही प्रश्न आहेत. हा मुद्‌दा आपल्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न घेऊन येतो जो प्रश्न येशूने नियमशास्त्राच्या शिक्षकाला विचारला.

> त्याने त्याला म्हटले, “नियमशास्त्रात काय लिहिले आहे? तुझ्या वाचनात काय आले आहे?” लूक 10:26

येशूने त्या माणसाला फक्त तू काय वाचत आहेस असे विचारले नाही की तर तू ते कसे वाचतो असे विचारले. देवाचे वचन वाचण्यासाठी तुम्ही कोणती तत्त्वे वापरत आहात? या उताऱ्यांमधील उघड विरोधाभास सोडवण्यासाठी हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

19व्या शतकाच्या सुरुवातीला उत्तर अमेरिकेतील सर्वात मोठ्या क्रांतीचे नेतृत्व करणारा एक माणूस याच प्रश्नाशी झुंजत होता. विल्यम मिलरने त्याच्या पूर्वीच्या

जीवनात पवित्र शास्त्राचा त्याग केला होता आणि ते विरोधाभासांनी भरलेले आहे असा निष्कर्ष काढला होता. ब्रिटीश सैन्याविरुद्ध अमेरिकन पराभव बघितल्यानंतर, त्याला मनुष्यापेक्षा मोठ्या शक्तीची खात्री पटली आणि त्याने पवित्र शास्त्राचा पुनर्विचार केला. हे करणे त्याच्यासाठी एक नम्र गोष्ट होती, कारण त्याने पवित्र शास्त्रामधील स्पष्ट विरोधाभासांबद्दल अनेक ख्रिस्ती बांधवांना टोमणे मारले होते ज्याचे उत्तर ते देऊ शकत नव्हते. जेव्हा त्याने पवित्र शास्त्रामध्ये त्याची आवड पुन्हा निर्माण केली तेव्हा त्याला इतरांसमोर मांडलेल्या त्याच्या वादांना तोंड द्यावे लागले.

> त्याने देवधर्माचा त्याग केल्यानंतर, ख्रिस्ताच्या गुणवत्तेद्वारे आणि मध्यस्थीद्वारे गौरवशाली अनंतकाळच्या आशेचा आदर करणाऱ्या मित्राशी संभाषण करताना, त्याला असे विचारले गेले की असा तारणारा आहे हे त्याला कसे कळले. .त्याने उत्तर दिले, "हे पवित्र शास्त्रात प्रकट झाले आहे."-"पवित्र शास्त्र  खरे आहे हे तुम्हाला कसे कळते?" असा त्यांचा प्रतिसाद होता, मिस्टर मिलर यांना हे टोमणे पूर्णपणे जाणवले. सुरुवातीला तो गोंधळून गेला; परंतु, चिंतन करताना, त्याने विचार केला की जर बायबल हे देवाचे प्रकटीकरण आहे, तर ते स्वतःशी सुसंगत असले पाहिजे; त्याचे सर्व भाग सुसंगत असले पाहिजेत, आणि ते मनुष्याच्या सूचनेसाठी दिलेले असावेत. म्हणून, तो म्हणाला, "मला वेळ द्या, आणि मी माझ्या स्वतः च्या समाधानासाठी त्या सर्व स्पष्ट विरोधाभासांना समजण्याजोगे करीन किंवा मी अजूनही देववादी होईन." त्यानंतर त्याने पवित्र शास्त्राच्या प्रार्थनापूर्वक वाचनात स्वतःला झोकून दिले. त्याने सर्व पुस्तकी वर्णने बाजूला ठेवली, आणि वचनाचा संदर्भ आणि शब्दांच्या सुचीचे पुस्तक केवळ मदत म्हणून वापरले. त्याने पाहिले की त्याला पवित्र शास्त्र आणि त्यातील सर्व भिन्न व पक्षपाती अर्थांमध्ये फरक करणे आवश्यक आहे. लोकांच्या जुन्या समजुतींवर वचनाचा खरा प्रकाश स्पष्टपणे चमकू शकेल यासाठी सर्व गैरसमज दूर करणे आवश्यक आहे हे त्याला जाणवले. त्याने सर्व पूर्वकल्पित मते बाजूला ठेवण्याचा आणि पवित्र शास्त्राचा नैसर्गिक आणि स्पष्ट अर्थ साधेपणाने स्वीकारण्याचा संकल्प केला. सिल्वेस्टर ब्लिस, मेमोरीस ऑफ विल्यम मिलर (1853) p68.

त्याने नेमके हेच केले. दोन वर्षांच्या कालावधीत त्याने पवित्र शास्त्राचा संपूर्ण अभ्यास केला.

> "मी माझी सर्व पूर्वस्थिती बाजूला ठेवण्याचा, पवित्र शास्त्र व प्रत्येक वचनाची तुलना करण्याचा आणि त्याचा नियमित आणि पद्धतशीरपणे अभ्यास करण्याचा निर्धार केला. मी उत्पत्तीपासून सुरुवात केली आणि प्रत्येक वचन वाचले अनेक उताऱ्यांचा मी खूप अर्थाने अभ्यास केला जेणेकरून मी माझ्या लाजिरवाणेपणापासून मुक्त होईल जेव्हा जेव्हा मला काहीही अस्पष्ट दिसले, तेव्हा माझा सराव सर्व सामान्य असलेल्या परिच्छेदांशी तुलना करण्याचा होता; आणि, क्रुडेनच्या मदतीने, मी पवित्र शास्त्रातील सर्व ग्रंथांचे परीक्षण केले ज्यामध्ये कोणत्याही अस्पष्ट भागामध्ये असलेले प्रमुख शब्द मला आढळले. मग, प्रत्येक शब्दाचा योग्य असा अर्थ काढून, जर त्याबद्दलचा माझा दृष्टिकोन पवित्र शास्त्रामधील प्रत्येक सारख्या उताऱ्याशी सुसंगत असेल, तर त्याची अडचण थांबेल. अशाप्रकारे, मी पवित्र शास्त्राचा अभ्यास केला, माझ्या पहिल्या अभ्यासात मला सुमारे दोन वर्षे लागली, आणि मला पूर्ण समाधान मिळाले की पवित्र शास्त्र स्वतःचेच व्याख्यान करते.
>
> सिल्वेस्टर ब्लिस, मेमोरीस ऑफ विल्यम मिलर (1853) p69.

या काळात त्याने नियमांची एक प्रणाली विकसित केली ज्याद्वारे तो पूर्वी सामना केलेल्या सर्व विरोधाभासांना समजण्याजोगे करण्यास सक्षम होता. त्याने वापरलेल्या नियमांचा सारांश येथे आहे:

1. पवित्र शास्त्रामध्ये असलेल्या विषयावर प्रत्येक शब्दाचा योग्य संबंध असला पाहिजे.
2. सर्व पवित्र शास्त्र आवश्यक आहे, आणि ते परिश्रमपूर्वक आणि अभ्यासाने समजले जाऊ शकते.
3. जे लोक विश्वासाने देवाकडे मागतात त्यांच्यापासून पवित्र शास्त्रात प्रकट झालेली कोणतीही गोष्ट लपवता येत नाही.
4. वचनांची तत्वप्रणाली समजून घेण्यासाठी, आपल्याला ज्या विषयावर जाणून घ्यायचे आहे त्यावर आधारित सर्व शास्त्रवचने एकत्र आणा; मग प्रत्येक शब्दाचा योग्य अर्थ येऊ द्या; आणि जर आपण विरोधाभास न करता आपला सिद्धांत तयार करू शकत असू, तर आपण चुकू शकत नाही.
5. पवित्र शास्त्र स्वतःचे स्पष्टीकरण देणारे असणे आवश्यक आहे, कारण हा पवित्र शास्त्राचाच एक नियम आहे. मला एखादी गोष्ट समजावून सांगण्यासाठी मी शिक्षकावर अवलंबून राहिलो आणि शिक्षकाने त्या वचनाचा अंदाज लावला किंवा तो त्यांच्या समजुतींच्या आधारावर मला समजावत असेल, तर शिक्षकाचे अंदाज, इच्छा किंवा विश्वास हे माझे मार्गदर्शक बनतात, देवाचे वचन नाही.

6. जर एखादा शब्द चांगला अर्थ लावत असेल आणि निसर्गाच्या साध्या नियमांवर हिंसा करत नसेल तर तो शब्दशः समजून घ्यावा लागेल; नाही तर, लाक्षणिकरित्या समजून घ्यावा लागेल.
7. सर्वांत महत्त्वाचा नियम म्हणजे, तुमचा विश्वास असला पाहिजे. असा विश्वास असला पाहिजे ज्यासाठी बलिदान आवश्यक आहे, आणि प्रयत्न केल्यास, पृथ्वीवरील सर्वात प्रिय वस्तू, जग आणि त्याच्या सर्व इच्छा, चारित्र्य, राहणीमान, व्यवसाय, मित्र, घर, सुखसोयी आणि सौंसारिक सन्मान यांचा त्याग करणे आवश्यक आहे. यापैकी कोणत्याही गोष्टीने देवाच्या वचनातील कोणत्याही भागावर विश्वास ठेवण्यास अडथळा आणला तर ती गोष्ट आपला विश्वास व्यर्थ असल्याचे दर्शवेल. यापैकी एक देखील हेतू जर आपल्या अंतःकरणात दडलेला असेल तोपर्यंत आपण कधीही विश्वास ठेवू शकत नाही. आम्हाला विश्वास आहे की देव नेहमी त्याची वचने पाळतो आणि त्याच्या वचनाचे रक्षण करतो. ज्याप्रमाणे तो अगदी लहान प्राण्यांची देखील काळजी घेतो आणि आपल्याबद्दल सर्व तपशील जाणतो, त्याचप्रमाणे तो हे सुनिश्चित करेल की त्याचे वचन सत्य राहील आणि जे त्याच्यावर प्रामाणिकपणे विश्वास ठेवतात ते सत्यापासून दूर जाणार नाहीत.

व्याख्यानाच्या या नियमांनी संदेश विकसित करण्यासाठी बरीच साधने प्रदान केली ज्यामुळे संपूर्ण जगाने मोठी क्रांती पाहिली.

आम्ही काळजीपूर्वक लक्षात ठेवतो की एखादी शिकवण समजून घेण्यासाठी आणि त्या शिकवणीवर आपला निष्कर्ष काढण्यापूर्वी आपल्याला त्यावर आधारित सर्व पवित्र शास्त्रातील वचने जमा केली पाहिजे. प्रत्येक शब्दाला त्याचे योग्य स्थान आणि प्रभाव असणे आवश्यक आहे. ही अशी गोष्ट आहे जी बऱ्याच लोकांसाठी सोपी नसते कारण आपल्याला लवकर उत्तरे मिळवायची असतात, परंतु एखाद्या विषयावरील सर्व परिच्छेद शोधण्यासाठी मेहनत आणि शिस्त लागते. उदाहरणार्थ, योहान 3:16 मध्ये ग्रीक शब्द मोनोजीन चे भाषांतर एकुलता एक असे केले आहे. अनेक लोक या शब्दाचा अर्थ "विशेष" म्हणून समजतात, पण पवित्र शास्त्र याबद्दल काय म्हणते?

| | |
|---|---|
| तो आपल्या आईचा एकुलता एक मुलगा असून ती विधवा होती.. लूक 7:12 | एकच जन्मलेला मुलगा |
| कारण त्याला सुमारे बारा वर्षांची एकुलती एक मुलगी होती, लूक 8:42 | एकच जन्मलेला मुलगा |
| “गुरूजी, मी आपल्याला विनंती करतो, माझ्या मुलावर कृपादृष्टी करा; कारण हा माझा एकुलता एक आहे; लूक 9:38 | एकच जन्मलेला मुलगा |

| | |
|---|---|
| शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. योहान 1:14 | एकच जन्मलेला मूलगा |
| देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे. योहान 1:18 | एकच जन्मलेला मूलगा |
| देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. योहान 3:16 | एकच जन्मलेला मूलगा |
| जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही. योहान 3:18 | एकच जन्मलेला मूलगा |
| ‘अब्राहामाने आपली परीक्षा होत असता विश्वासाने इसहाकाचे अर्पण केले;’ ज्याने वचने स्वीकारली होती तो आपल्या ‘एकुलत्या एक पुत्राचे’ अर्पण करत होता; इब्रीकरांस 11:17 | त्याच्या खऱ्या पत्नीपासून एकच जन्मलेला मूलगा |
| देवाने आपल्या एकुलत्या एक जन्मलेल्या पुत्राला जगात पाठवले आहे, ह्यासाठी की, त्याच्या द्वारे आपल्याला जीवन प्राप्त व्हावे; ह्यावरून देवाची आपल्यावरील प्रीती प्रकट झाली. 1 योहान 4:9 | एकच जन्मलेला मूलगा |

नवीन करारात फक्त पाच लोकांचा उल्लेख मोनोजीन किंवा एकुलता एक जन्मलेला म्हणून केला आहे. पाच वाक्ये येशूला देवाचा पुत्र म्हणून संबोधतात. फक्त इसहाकाचा एक संदर्भ आहे आणि नंतर इतर संदर्भ एकुलता एक जन्मलेल्या मुलांना लागू होतात ज्यांना येशूने बरे केले. इतर मुलांच्या बाबतीत जेथे हा शब्द वापरला जातो त्याचा अर्थ एकुलता एक जन्मलेला मुलगा असा आहे. इसहाकाच्या संदर्भात आपल्याला माहित आहे की तो अब्राहामाचा एकुलता एक मुलगा नव्हता तर तो साराचा एकुलता एक मुलगा होता ज्याला अब्राहाम सोबत वचन मिळाले होते. जेव्हा आपण हे सर्व शब्द एकत्र ठेवतो तेव्हा आपण पाहतो की जेव्हा हा शब्द येशूला लागू होतो तेव्हा त्याचा अर्थ एकच असावा, पित्याचा एकुलता एक मुलगा.

यात वरील सहाव्या क्रमांकावर सूचीबद्ध केलेला नियम जोडला आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की आपण मजकुराचा शाब्दिक अर्थ घ्यावा जोपर्यंत तो निसर्गावर हिंसा करत नाही. येशू हा पित्याचा एकुलता एक पुत्र आहे हे समजण्यासाठी पवित्र शास्त्राची कोणतीही हिंसा होत नाही. त्यामुळे या प्रक्रियेद्वारे आपण भाष्यसंग्रह किंवा इतर कोणाकडून व्याख्या न शोधता मोनोजीन शब्दाचा अर्थ स्थापित करू शकतो. पवित्र शास्त्र, स्वतःचे स्पष्टीकरणकर्ता आहे.

जुन्या करारातील अनेक हिंसक कथांशी आपण येशूच्या जीवनाचा मेळ घालण्याचा प्रयत्न करत असताना आपल्याला हे नियम काळजीपूर्वक लागू करावे लागतील. पवित्र शास्त्राचा दावा खरा आहे हे सिद्ध करण्यासाठी मनापासून प्रयत्न करावे लागतील: येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. इब्रीकरास 13:8. म्हणून, जर तो बदलला नाही, तर पृथ्वीवरील त्याच्या सेवाकाळात तो त्याच्या पित्याचा परिपूर्ण प्रकटीकरण होता.

# 3. वधस्तंभावरील मृत्यू

पृथ्वीवरील देवाच्या पुत्राचे कार्य त्याच्या पित्याचे चरित्र प्रकट करणे हे होते. प्रेमळ आणि कोमळ तारणारा कसा मनुष्यांचा भार उचलतो, रोग बरा करतो, स्त्रिया, पुरुष आणि लेकरांच्या हृदयाला स्पर्श करतो याबद्दल वाचणे किती मौल्यवान आहे. सर्व मातांनी आपल्या मुलांना येशूकडे आणण्याची मनापासून इच्छा दर्शवली जेणेकरून तो त्यांना स्पर्श करेल आणि त्यांना आशीर्वाद देईल. जगाने असे निस्वार्थ, काळजी घेणारे प्रेम कधीच पाहिले नव्हते. प्रत्येक तासाबरोबर, स्वर्गीय पित्याचे चरित्र त्याच्या मूळ सौंदर्यात पुनर्स्थापित होत होते. बऱ्याच लोकांसाठी जेव्हा त्यांचे डोळे उघडले गेले तेव्हा त्यांनी पहिलेला पहिला चेहरा येशूचा होता, आणि ज्यांचे कान त्याने उघडले त्यांनी पहिला आवाज ऐकला तो देवाच्या पुत्राचा कृपा व सत्याने भरलेला मधुर आवाज होता.

येशूने आपल्यासाठी स्वतःचे जे चरित्र दाखवले ते सुमारे 1500 वर्षांपूर्वी मोशेला बोललेल्या शब्दांशी अगदी जुळणारे होते.

> तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने ‘परमेश्वर’ ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर. निर्गम 34:5-6

तरीसुद्धा, येशूचे जीवन दुःख आणि बलिदानाने चिन्हांकित होते. जेव्हा बारा वर्षांचा येशू मंदिरात उभा होता आणि कोकरूचे बलिदान होताना पाहत होता, तेव्हा त्याला कळले की हे त्याचे विधिलिखित आहे. जेव्हा योहान बाप्तिस्माने त्याला जगासमोर घोषित केले, तेव्हा ते ह्या शीर्षकासह होते: “हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! योहान 1:29. पापाची मजुरी दिलीच पाहिजे, पवित्र शास्त्राप्रमाणे न्याय दिलाच पाहिजे.

> देवाच्या कृपेने ख्रिस्त येशूने खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या द्वारे ते विनामूल्य नीतिमान ठरतात. त्याच्या रक्ताने विश्वासाच्या द्वारे प्रायश्चित्त होण्यास देवाने त्याला पुढे ठेवले. ह्यासाठी की, पूर्वी झालेल्या पापांची देवाच्या सहनशीलतेने उपेक्षा झाल्यामुळे त्याने आपले नीतिमत्त्व व्यक्त करावे; म्हणजे आपले नीतिमत्त्व सांप्रतकाळी असे व्यक्त करावे की, आपण नीतिमान असावे आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्याला नीतिमान ठरवणारे असावे. रोमकरांस 3:24-26

देवाला वधस्तंभाची गरज होती का? त्याच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला ही त्याची शिक्षा होती का? हे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. जर देवाचा राग त्याच्या स्वतः च्या पुत्राच्या मृत्यूने शांत झाला, ज्याचा देवाने स्वतः निर्णय घेतला होता, तर पित्याचे प्रेमळ चरित्र एका निष्पाप मुलाच्या मृत्यूने कलंकित होते. “पूर्ण झाले” हे येशूचे शब्द दाखवतात की देवाला पापाविरुद्धचा त्याचा राग शांत करण्यासाठी मृत्यूची आवश्यकता होती. हे त्याला मृत्यूचा लेखक आणि हिंसक प्रवृत्तीचा परमेश्वर बनवेल.

यशया संदेष्टा 700 वर्षांपूर्वी ख्रिस्ताच्या वधस्तंभाबद्दल बोलला होता आणि त्याने त्याबद्दलची आपली मानवी प्रतिक्रिया प्रकट केली होती.

> आम्ही ऐकलेल्या वार्तेवर कोणी विश्वास ठेवला आहे? परमेश्वराचा भुज कोणास प्रकट झाला आहे? कारण तो त्याच्यापुढे रोपासारखा, रुक्ष भूमीतील अंकुरासारखा वाढला; त्याला रूप नव्हते, त्याला शोभा नव्हती, त्याच्याकडे पाहिले तर त्याच्यावर मन बसेल असे त्याच्या ठायी सौंदर्य नव्हते. तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. यशया 53:1-5

जेव्हा येशू ख्रिस्त मानवतेला वाचवण्यासाठी पृथ्वीवर आला तेव्हा आपली नैसर्गिक प्रतिक्रिया त्याला नाकारण्याची होती. तो आपल्याला अनंतकाळचे जीवन देणगी म्हणून देण्यासाठी आला होता, परंतु हि देणगी न स्वीकारणे ही मानवांची नैसर्गिक प्रतिक्रिया होती.

> त्याच्या ठायी जीवन होते, व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते. तो प्रकाश अंधारात प्रकाशतो; तरी अंधाराने त्याला ग्रासले नाही. योहान 1:4-5

देवाचा पुत्र स्वतः आपल्या पापाची ओझे वाहत होता तरीही आपण प्रतिसाद म्हणून असा विश्वास ठेवला कि देवच त्याला जीवे मारत आहे. त्रस्त करणे आणि मारून टाकणे या शब्दांचा अर्थ एखाद्याला खूप पीडा आणि त्रस्त करून हिंसकपणे मारून टाकणे असा होतो. पण जसा मनुष्य विश्वास ठेवतो कि देवाने त्याच्या पुत्राला वधस्तंभावर हिंसकपणे मारले हि गोष्ट खरी नाही. तर मग देवाच्या पुत्राचा वधस्तंभावर मृत्यू कशामुळे झाला? हा नमुना सुरवातीपासूनच स्थापण्यात आला होता जेव्हा आदामाला फळ खाण्याबाबतीत प्रश्न विचारण्यात आले होते.

> तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, “तू कोठे आहेस?” तो म्हणाला, “मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.” देवाने म्हटले, “तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?” आदाम म्हणाला, “जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले.” उत्पत्ती 3:9-12

आदामाने कधीही दया किंवा क्षमा मागितली नाही. त्याच्या पापाने त्याची विचार धारणा इतकी आंधळी केली होती की त्याने कधी दया व क्षमा मागण्याचा विचारहि केला नाही. आपला अपराध स्वीकारण्याऐवजी आणि त्याबद्दल क्षमा मागण्याऐवजी, जिने त्याला मोहात पाडले त्या हव्वेला निर्माण केल्याबद्दल त्याने देवालाच दोषी ठरविले. देव स्वभावात कठोर आणि शिक्षा देणारा आहे अशी त्याची कल्पना होती आणि त्यामुळे या खोट्या विश्वासात देवाचे खरे चरित्र त्याच्यापासून लपलेले होते. काईनच्या कथेत आपण हेच तत्त्व कार्यारत असताना पाहू शकतो.

> तेव्हा काइन परमेश्वराला म्हणाला, “हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे. उत्पत्ती 4:13

काइनाने पश्चात्ताप करण्यास नकार दिला कारण त्याला विश्वास होता की देव त्याला क्षमा करणार नाही. ही मानवजातीवर पापाची शक्ती आहे; देव आपल्या पापांची क्षमा करू शकत नाही यावर विश्वास ठेवण्याचे हे पाप आहे. उधळ्या पुत्र सुद्धा पित्याकडे क्षमा मागत नाही तर स्वतःच्या कामातून त्याच्या कर्मांचा मोबदला देण्याचा प्रयत्न करतो.

> मी उठून आपल्या बापाकडे जाईन व त्याला म्हणेन, बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्याविरुद्ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घ्यायला मी योग्य नाही; आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणे मला ठेवा.’ लूक 15:18-19

मनुष्य केवळ ख्रिस्ताच्या आत्म्याच्या देणगीद्वारेच पश्चात्ताप करू शकतो, जो आपल्याला क्षमा मिळविण्यास आणि क्षमा प्राप्त करून घेण्यास सक्षम करतो.

> ज्या येशूला तुम्ही खांबावर टांगून मारले त्याला आपल्या पूर्वजांच्या देवाने उठवले. त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवाने त्याला आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्चपद दिले. प्रेषितांची कृत्ये 5:30-31

आदामाने जेव्हा पाप केले तेव्हा तो देवाचा वैरी झाला. त्याचे हृदय देवाशी युद्ध करत होते, कारण आपण वाचतो:

> कारण देहस्वभावाचे चिंतन हे मरण; पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांती आहे. कारण देहस्वभावाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे; ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि त्याला तसे होता येत नाही. रोमकरांस पत्र 8:6-7

देवाने आदामाला पश्चात्ताप करण्याची आणि क्षमा मागण्याची क्षमता देण्यासाठी, आपल्या पुत्राचा (येशू ख्रिस्ताचा) आत्मा आदामाच्या हृदयात पाठविला जेणेकरून आदाम “अब्बा पिता” असे देवाला हाक मारू शकेल. केवळ आदामातील येशूचा आत्माच त्याला हे बोलण्याची कृपा देऊ शकतो.

> तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने “अब्बा! बापा!” अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंतःकरणांत पाठवले आहे. गलतीकरांस पत्र 4:6

जेव्हा ख्रिस्त आदामाकडे आला, जो पूर्णपणे भटकलेला होता, तेव्हा त्याला कृपा देण्यासाठी येशूला आदामाचे वैर सहन करावे लागले. हे वैर ख्रिस्ताच्या हृदयाला छेदते आणि त्याला भयंकर दु:ख सहन करावे लागते.

> कारण तो म्हणाला, खरोखर हे माझे लोक आहेत, कधीही लबाडी करणार नाहीत अशी ही मुले आहेत; म्हणून तो त्यांचा त्राता झाला. त्यांच्या सर्व दु:खाने तो दु:खी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया 63:8-9

म्हणूनच या अर्थाने ख्रिस्त हा जगाच्या स्थापनेपासून वधण्यात आलेला कोकरा आहे. प्रगटीकरण 13:8. मनुष्यांना दया आणि क्षमा मागण्याची इच्छा देण्यासाठी, येशूला मानवी नकार आणि द्वेषाचा त्रास सहन करावाच लागेल. तो माणसांकडून तुच्छ गणला व नाकारला गेला आणि अत्यंत दुःखी मनुष्य म्हणून परिचित झाला. प्रत्येक वेळी जेव्हा लोक स्वतःच्या अंतःकरणात येशूच्या प्रेमळ आवाहनाचा प्रतिकार करतात तेव्हा ते येशूच्या अंतकरणात खोलवर जखमा देतात. मानवी अंतःकरणातील प्रत्येक वाईट कृत्यामुळे ख्रिस्ताला अपराधी आणि पीडित होऊन अपार दुःख सोसावे लागते. या दृष्टीकोनातून, ख्रिस्त पृथ्वीवर येण्याच्या सातशे वर्षांपूर्वी देखील, संदेष्टा यशयाच्या काळात तुच्छ लेखला आणि नाकारला गेला

होता. येशू ख्रिस्त मानवतेला त्यांच्या कठोर मार्गांपासून दूर जाण्यासाठी आणि प्रत्येक मानवाने पित्याबद्दल सत्य जाणून घ्यावे यासाठी आजही दुःख सहन करत आहे.

मानवतेने देवाच्या क्षमेवर विश्वास ठेवण्यास नकार दिल्याने, ख्रिस्ताने त्यांना वाचवण्यासाठी क्रुसखांबावर स्वतःच्या जिवाची किंमत दिली. आमची जागा घेण्यासाठी त्याला मनुष्य जसे मरतात त्याप्रमाणे मरावे लागले. हा मृत्यू असा आहे ज्यामध्ये पापी विश्वास ठेवतो की देव त्याला क्षमा करणार नाही. देव क्षमा करू शकत नाही असा विश्वास सैतानाला मृत्यूचे सामर्थ्य देते. म्हणून, केवळ मृत्यूद्वारेच ख्रिस्त सैतानाचा पराभव करू शकतो.

> ज्या अर्थी ‘मुले’ एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, इब्री 2:14

वधस्तंभावरील मृत्यू हि पापाची मागणी आहे - देवाची नाही. एकदा जर कोणी पापात पडले तर, ते दया आणि कृपेची सर्व भावना गमावून बसतात, ज्यामुळे मृत्यू हा एकमेव स्वाभाविक परिणाम बनतो. जेव्हा एखादी व्यक्ती देवाच्या परिपूर्ण नियमाकडे पाहते आणि मृत्यूसाठी देवाला दोष देते, तेव्हा तो दोष त्या व्यक्तीवर परत प्रतिबिंबित होतो आणि त्यांचा नाश करतो.

> कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; याकोब 1:23

> कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. मत्तय 7:2

जेव्हा आदामाने त्या झाडाचे फळ खाल्ले तेव्हा त्याने विश्वास ठेवण्याचे निवडले की देवाच्या मनात त्यांच्यासाठी सर्वोत्तम हित नाही. त्याने सर्पावर विश्वास ठेवणे निवडले की देव एक स्वार्थी लबाड आहे. हे विचार, परिपूर्ण नियमांद्वारे परावर्तित झाले, आणि आदामाला समजल्याप्रमाणे त्याचा न्याय करण्यात आला. देवाबद्दलच्या त्याच्या खोट्या दृष्टिकोनामुळे त्याचा हात वाळून गेला जो दया आणि कृपेसाठी देवाकडे पोहचू शकत होता. या ठिकाणावरून परतणे त्यांना अशक्य होते. त्यांचा मृत्यू अटळ होता कारण आदामाने हे स्वतः ठरवले होते.

क्रुसावरील मृत्युद्वारे ख्रिस्त आम्हाला पापाचे खरे स्वरूप समजून देण्यास आणि ही सर्व तत्त्वे जगासमोर प्रकट करण्यास आला. येशूने अनेक अपराधांनी भरलेल्या मनुष्याचे शब्द उद्गारले:

> आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, “एली,

> एली, लमा सबख्थनी," म्हणजे "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" मत्तय 27:46

देवाने आपल्या पुत्राचा त्याग केलाच नाही. ख्रिस्त, आपली पापे सहन करून, देवाने त्यागल्याच्या भावनेने मरण पावला, तो अश्या मनुष्याचे प्रतिनिधित्व करत आहे जो त्याच्या पापांनी भारावून गेला आहे, आणि त्याला क्षमा केली जाऊ शकत नाही असा त्याचा विश्वास आहे. ख्रिस्ताच्या या शब्दांत आपण त्याच्यावर असलेला पापाचा शाप पाहतो, काईनने व्यक्त केलेला शाप.

> पाहा, ह्या जमिनीवरून तू मला आज हाकून दिले आहे; मी तुझ्या दृष्टीपुढून लपलेला असेन, मी पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होणार; आणि ज्या कोणाला मी सापडेन तो मला ठार करील, असे होईल." उत्पत्ती 4:14

फरार शब्दाचा अर्थ स्तब्ध होणे आणि थरथरणे असा होऊ शकतो. ख्रिस्ताने दाखवून दिले की त्याने काईनचा शाप वाहून नेला. त्याने अनुभवले की देवाचा चेहरा त्याच्यापासून लपलेला आहे आणि तो आपल्या अपराधाच्या भावनेने हादरून गेला. कोणती गोष्ट आपल्यापासून पित्याचा चेहरा लपवते हे पवित्र शास्त्र आपल्याला प्रकट करते.

> कारण तुझ्यासाठी मी निंदा सोसली आहे; लज्जेने माझे मुख व्याप्त झाले आहे; स्तोत्रसंहिता 69:7

> तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांला दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही. यशया 59:2

पापांच्या ओझ्याखाली दबलेला ख्रिस्त म्हणतो:

> असंख्य अरिष्टांनी मला घेरले आहे; माझ्या दुष्कर्मांनी मला पछाडले आहे म्हणून मला तोंड वर करता येत नाही; ती माझ्या डोक्याच्या केसांपेक्षा अधिक आहेत; माझ्यात त्राण उरले नाही. स्तोत्रसंहिता 40:12

पित्याच्या संदर्भात आम्ही वाचतो:

> कारण त्याने पीडिताची दैन्यावस्था तुच्छ लेखली नाही व तिचा वीट मानला नाही. त्याने आपले मुख त्याच्या दृष्टिआड केले नाही; तर पीडिताने धावा केला तेव्हा त्याने तो ऐकला. स्तोत्रसंहिता 22:24

आपल्या पापांची लाज येशूच्या चेहऱ्यावर झाकली गेली त्यामुळे तो पित्याचा चेहरा पाहू शकला नाही. त्याला मृत्यूला सामोरे जावे लागले कारण प्रत्येक पापी मनुष्य महान संघर्ष्याच्या समाप्तीनंतर मृत्यूला सामोरे जाईल. ख्रिस्ताला त्याच्या आत्म्यात अग्नीचे निखारे जाणवले.

> अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले. मी आपल्या संकटात परमेश्वराचा धावा केला, माझ्या देवाला मी हाक मारली; त्याने आपल्या मंदिरातून माझी वाणी ऐकली, माझी हाक त्याच्या कानी गेली. तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली, पर्वताचे पाये डळमळले, त्यांना झोके बसले, कारण तो संतप्त झाला होता. त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघत होता, त्याच्या मुखातून ग्रासणारा अग्नी निघत होता, त्यामुळे निखारे धगधगत होते. स्तोत्रसंहिता 18:5-8

ख्रिस्ताने दुष्टांचा मृत्यू सहन केला. ख्रिस्तामधून अग्नी निघाली आणि त्या अग्नीने त्याला ग्रासून टाकले. आपल्या पापांमुळे ख्रिस्ताला जसे शेवटी दुष्टांना आणि सैतानाला दुःख सहन करावे लागेल तसेच दुःख सहन करावे लागले.

> खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. यहेज्केल 28:18

आपल्या ठिकाणी त्याची बदली म्हणून ख्रिस्ताचे पवित्र ठिकाण किंवा शारीरिक मंदिर आपल्या असंख्य पापाने अशुद्ध झाले होते. आमच्या अपराधांसाठी तो जखमी झाला आणि आमच्या पापांसाठी तो घायाळ झाला. सैतान ज्या भयानक मृत्यूला सामोरे जाईल ते ख्रिस्ताने वधस्तंभावर आधीच अनुभवले आहे. त्याच्या आत असलेल्या प्रखर अग्नीमुळे ख्रिस्ताच्या हृदयातून पाणी आणि रक्त एकदम बाहेर पडले. ख्रिस्त जिवंत नरकाच्या अग्नीत मरण पावला आणि दुष्टांचा मृत्यू असाच होईल. मला आश्चर्य वाटते की जसे पित्याने आपल्या पुत्राला कधीही सोडले नाही परंतु त्याच्याबरोबर वधस्तंभावर दुःख सहन केले, त्याचप्रमाणे आपला पिता आणि तारणहार देखील दुष्टांच्या सोबत असेल आणि नरकाच्या अग्नीमध्ये त्यांच्याबरोबर दुःख सहन करेल. पवित्र शास्त्र आम्हाला सांगते:

> त्यांच्या सर्व दु:खाने तो दु:खी झाला, यशया 63:9

मूल गमावल्यावर कोणताही बाप आनंद करू शकत नाही; हे अतिदु:खद आहे. त्याचप्रमाणे, आपला पिता आणि त्याचा पुत्र, दुष्टांसोबत त्यांच्या मृत्यूनंतर पुन्हा वधस्तंभाच्या वेदना सहन करतील. जेव्हा नीतिमान लोक त्यांच्या प्रियजनांना ज्वाळांमध्ये पाहतात, तेव्हा तारणहार त्यांना या अग्निपरीक्षेद्वारे पाठिंबा देईल आणि या घटनेसाठी त्यांना तयार होण्यास एक हजार वर्षे लागतील. ज्याप्रमाणे मरीया आणि शिष्य येशूला वधस्तंभावर पाहून दु:खाने रडले होते, त्याचप्रमाणे देवाच्या कृपेला नकार देणाऱ्या आपल्या प्रियजनांच्या चिरंतन नुकसानामुळे नीतिमानांचे हृदय दु:खी होईल. तेव्हाच आपल्याला सांगितले जाते की देव आपल्या डोळ्यातील प्रत्येक अश्रू पुसून टाकेल.

> 'तो' त्यांच्या डोळ्यांचे 'सर्व अश्रू पुसून टाकील;' ह्यापुढे मरण नाही; 'शोक, रडणे' व कष्ट हे नाहीत; कारण 'पहिल्या गोष्टी' होऊन गेल्या." प्रकटीकरण 21:4

हे प्रकटीकरण 20 मध्ये दुष्टांच्या मृत्यूनंतर घडते:

> तेव्हा समुद्राने आपल्यामधील मृत माणसांना बाहेर सोडले; मृत्यू व अधोलोक ह्यांनी आपल्यातील मृतांना बाहेर सोडले; आणि 'ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे' प्रत्येकाचा न्याय ठरवण्यात आला. तेव्हा मरण व अधोलोक हे अग्नीच्या सरोवरात टाकले गेले. अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. ज्या कोणाचे नाव 'जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही' तो अग्नीच्या सरोवरात टाकला गेला. प्रकटीकरण 20:13-15

2000 वर्षांपूर्वी ख्रिस्त त्याच्या दु:खाच्या थडग्यातून उठला म्हणून त्याच्यावर थुंकणाऱ्या, त्याचा तिरस्कार करणाऱ्या आणि त्याच्या प्रेमळ दयेला नकार देणाऱ्या त्याच्या अब्जावधी मुलांना गमावल्याच्या दु:खातूनही तो उठवला जाईल. आणि जसा ख्रिस्त पित्याच्या आशीर्वादाने उठविला गेला आहे तसेच कोणत्याही दु:खाच्या सावलीशिवाय नवीन पृथ्वीवर प्रवेश करण्यासाठी आम्ही देखील त्याच्याबरोबर उठवले जाऊ.

वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या दु:खाकडे परत येताना आम्हाला काहीतरी लक्षात घ्यायचे आहे. आपण पाहतो की जरी ख्रिस्त निराशेच्या गर्तेत होता जेव्हा त्याला पूर्णपणे एकटे वाटले, तरी विश्वासाने त्याने पित्याला त्याची हत्या करणाऱ्यांना क्षमा करण्यास सांगितले.

> तेव्हा येशू म्हणाला, "हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही." लूक 23:34

वधस्तंभाच्या मृत्यूने सैतानाच्या लबाडीचा पर्दाफाश होतो की देव आपल्याला क्षमा करू शकत नाही. आपण पाहतो की देवाने स्वेच्छेने मानवी न्यायाच्या समजुतीसाठी आपला पुत्र दिला. त्याने त्याला आशेशिवाय मरू दिले जेणेकरून जेव्हा आपण

त्याला उठलेले पाहू तेव्हा आपल्याला विश्वास वाटेल की आपल्याला क्षमा केली जाईल आणि नवीन जीवन मिळेल. देवाच्या पुत्राचा आत्मा आपल्या अंतःकरणात येतो आणि देवाची दया अनुभवण्यासाठी आपला आध्यात्मिकरित्या वाळलेला हात उचलतो.

देवाने मृत्यूची मागणी केली नाही हे जाणून घेणे किती आश्चर्यकारक आहे. मरणदंडाची अंमलबजावणी करणारा म्हणून तो पाप्यांसमोर उभा राहत नाही. जे देवाच्या दयेवर विश्वास ठेवण्यास नकार देतात त्यांचा अंतिम परिणाम पित्याने स्वइच्छेने आपल्या पुत्राला दाखवण्याची परवानगी दिली. त्याने आपल्या पुत्राला क्रोधाने मारले नाही; तर त्याने आपल्या पुत्राला मनुष्यांवरील दुःख सहन करण्याची परवानगी दिली जेणेकरून आपण त्याच्या बलिदानाद्वारे देवाचे प्रेम पाहू शकू.

ज्ञानाच्या झाडाचे फळ खाण्याबद्दल बागेत देवाने दिलेली आज्ञा आदामाला मारण्यासाठी नव्हती; तर देव स्वार्थी आणि क्षमा न करणारा आहे असा विश्वास ठेऊन मानव स्वतःवर जो न्याय ओढवेल त्याबद्दल एक इशारा होता. हे एक सुंदर सत्य आहे की केवळ ख्रिस्त ज्याला देवाच्या प्रेमाची लांबी, रुंदी, उंची आणि खोली समजली होती, त्याला माहित होते की देवाला दया आणि क्षमा मागणे शक्य आहे. मत्तय 11:27. म्हणून हे स्पष्ट आहे की जो मनुष्यांच्या अंतःकरणात पोहोचतो आणि त्यांना क्षमा केली जाऊ शकते यावर विश्वास ठेवण्याचे धैर्य देतो तो हाच येशू आहे.

क्रूसाचे प्रकटीकरण किती अद्भुत आहे. आपण इथून पुढे असा विचार ठेवू नये कि ख्रिस्ताला देवाने शिक्षा म्हणून मारून टाकले, तर देवाच्या चरित्र्याविषयीच्या गैरसमजामुळे त्याला लोकांकडून नाकारले गेले आणि तुच्छ मानले गेले. पापाची शिक्षा म्हणून देव मृत्यूची मागणी करत नाही; तर मृत्यू हा, देव क्षमा करत नाही यावर विश्वास ठेवण्याचा निश्चित परिणाम आहे.

## 4. माझा प्रिय पुत्र

दोघांनी बराच वेळ एकमेकांना आपल्या मिठीत धरलेले होते. भावनांची तीव्रता खूप जास्त होती, परंतु दोघांनाही माहित होते की आता वेळ आली आहे. अनंतकाळापासून पिता आणि पुत्र एकमेकांच्या अतिशय जवळच्या सहभागीतेत होते, आणि आता ती सहभागिता लवकरच तुटणार होती. देवाचा पुत्र त्याच्या सर्व लेकरांना वाचवण्यासाठी पृथ्वीवरील त्याच्या कार्यास सुरवात करणार होता. पिता आणि पुत्र दोघांनाही या कार्याची जोखीम आणि त्यांना मोजायला लागणारी किंमत हि माहित होती, परंतु मानवाप्रती असलेले त्यांचे प्रेम या कार्यासाठी त्यांना अजून प्रेरित करत होते.

एका क्षणासाठी, पिता आणि पुत्र भविष्यामध्ये पृथ्वीवरील त्यांचे कार्य उघडकीस येताना पाहतात. तो तिरस्कार, नकार, द्वेष, थुंकणे, लाथ मारणे, फटके मारणे आणि वधस्तंभावरील खिळे हे सर्व त्या काळातील एका भयंकर क्षणाच्या तुलनेत शून्य होतात जेव्हा स्वर्ग आणि पृथ्वीने स्तब्ध होऊन पिता आणि पुत्राला एकमेकांपासून वेगळे होताना पहिले. त्याच्या पित्याचा चेहरा लपविणाऱ्या पापाच्या भावनेने तो अतिशय दुःखद झाला, हजारो वर्षांचा अपराधीपणा, दुःख, बंडखोरी आणि निरुपयोगीपणा त्याच्यावर लादलेला आहे असे पुत्र पाहतो.

भविष्यातील या दृश्यांपासून वळून पिता आणि पुत्र एकमेकांना मिठी मारतात. एक पिता आपल्या पुत्राला अश्या कार्यासाठी कसा जाऊ देऊ शकतो? जगाच्या स्थापनेपूर्वी पित्याने हे कार्य अयशस्वी होण्याच्या शक्यतेशी आणि आपल्या पुत्राला पापाच्या सामर्थ्याने गमावण्याच्या जोखमीशी झुंज केली होती. देवाचा पुत्र मानवी स्वभाव स्वतःवर घेऊन त्याचा कट्टर वैरी सैतान ह्याला त्याच्यावर विजय मिळवण्याची संधी देणार होता. सुरुवात होण्यापूर्वी यशाची खात्री नव्हती. पित्याने स्वतःला अशा ठिकाणी ठेवले होते जेथे त्याने मनुष्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याच्या पुत्राला कायमचे गमावले असते. पुत्राला वारशाने मिळालेली पित्याची

महान करुणा आपल्याला स्पष्ट दिसते जेव्हा पुत्राने आपल्याला वाचवण्यासाठी पृथ्वीवर त्याला येऊ देण्याची विनंती पित्याजवळ केली. एक स्वर्गीय पिता आपल्या पुत्राला असे करू देईल काय? तो हा धोका त्याला स्वतःवर घेण्याची परवानगी देईल काय?

पित्याच्या आपल्यावरील प्रेमाची गंभीरता त्याच्या पुत्रावरील प्रेम आणि आपल्याला वाचवण्यासाठी घेतलेल्या जोखमीवरून मोजली जाते. जेव्हा पिता आपल्या पुत्राच्या बाप्तिस्माबद्दल बोलत होता तेव्हा पित्याच्या प्रेमाचे चित्र आपल्याला स्पष्ट दिसते.

> आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, “हा माझा ‘पुत्र’, मला ‘परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.” मत्तय 3:17

पित्याला त्याच्या पुत्रामध्ये आनंद होतो. पित्याच्या जीवनात त्याच्या पुत्राशिवाय दुसरा मोठा खजिना नाही. स्वर्गात स्वतःच्या जन्माबद्दल बोलताना देवपुत्राने हे वाक्य उद्गारले:

> पर्वत स्थापित झाले त्यापूर्वी, डोंगरांपूर्वी, मला निर्माण केले; त्या वेळेपर्यंत त्याने पृथ्वी, शेते व पृथ्वीचा धूलिसंचय ही निर्माण केली नव्हती. त्याने आकाशे स्थापली तेव्हा मी होते; जेव्हा त्याने जलाशयाची चक्राकार मर्यादा ठरवली; जेव्हा त्याने वरती अंतराळ दृढ केले, जेव्हा जलाशयाचे झरे जोराने वाहू लागले; जलांनी त्याची आज्ञा उल्लंघू नये म्हणून जेव्हा त्याने समुद्राला मर्यादा घालून दिली; जेव्हा त्याने पृथ्वीचे पाये रेखले; तेव्हा मी त्याच्याजवळ कुशल कारागीर होते; मी त्याला नित्य आनंददायी होते; त्याच्यासमोर मी सर्वदा हर्ष पावत असे; नीतिसूत्रे 8:25-30

आपण चित्रण करू शकतो कि पिता आपला कोमल हात त्याच्या पुत्राच्या खांद्यावर ठेवून विश्वाच्या निर्मितीमध्ये एकत्रित काम करत आहेत. देवाने आपल्या पुत्राद्वारे सर्व गोष्टी निर्माण केल्या आणि पुत्राला दिलेल्या शक्तीचा आणि बुद्धीचा वापर करताना पाहून पित्याला आनंद होत असायचा.

> देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले. हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या ‘उजवीकडे बसला.’ इब्रीकरास 1:1-3

पिता पुत्रावर प्रीती करतो आणि त्याने सर्वकाही त्याच्या हाती दिले आहे.
योहान 3:35

पिता आणि पुत्र यांच्यातील नाते इतके जवळचे होते की ख्रिस्त म्हणालाः

> माझ्या पित्याने माझ्या हाती सर्वकाही दिले आहे आणि पित्यावाचून पुत्राला कोणी ओळखत नाही, आणि पुत्रावाचून व ज्या कोणास त्याला प्रकट करण्याची पुत्राची इच्छा असेल, त्याच्यावाचून पित्याला कोणी ओळखत नाही. मत्तय 11:27

> जसा पिता मला ओळखतो व मी पित्याला ओळखतो, योहान 10:15

> कारण पिता पुत्रावर प्रीती करतो आणि स्वतः जे काही करतो ते सर्व त्याला दाखवतो. तुम्हांला आश्चर्य वाटावे म्हणून तो ह्यांहून मोठी कामे त्याला दाखवील. योहान 5:20

ज्याप्रमाणे यहूदा याकोबाच्या बेंजामिनवरील प्रेमाविषयी बोलला कि "ह्या मुलावर त्याचा जीव आहे" उत्पत्ती 44:30 ह्यावरून आपण समजू शकतो की स्वर्गीय पित्याचे जीवन ख्रिस्ताच्या जीवनाशी कश्याप्रकारे जुडलेले होते. कोणत्याही प्रेमळ पालकांना माहीत आहे की, आपल्या लेकरांचे, पालनपोषण आणि संरक्षण करण्यासाठी ते काहीदेखील करण्यास तयार असतात. पित्याचे पुत्रावर असेच प्रेम आहे. या संदर्भात आपण पवित्र शास्त्रातील सर्वात महत्वाच्या वचनावर विचार करू शकतोः

> देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. योहान 3:16

"एवढी" हा शब्द आपल्याशी अशा प्रेमाबद्दल बोलतो जे पूर्णपणे समजले जाऊ शकत नाही. ख्रिस्ताने आपल्याला वाचवण्यासाठी केलेली विनंती पित्याने ऐकली आणि कोणीही पूर्णपणे समजू शकत नाही अश्या सखोल अंधकाराचा अनुभव घेतला. प्रचंडbसंघर्षानंतर पित्याने आम्हा मानव जातीला वाचवण्याची पुत्राची विनंती मान्य केली. असे हे अविश्वसनीय आणि आश्चर्यकारक प्रेम -आपल्यासाठी अनंतकाळची ओळख म्हणून असेल.

जसे आम्ही पूर्वी बघितले कि, ख्रिस्ताचे दुःख हे पृथ्वीवरील त्याच्या कार्यापुरते मर्यादित नव्हते. पाप अस्तित्वात येताच तेथे एक तारणारा देखील होता. येशूच्या आत्म्यानेच एदेनमधील पवित्र जोडप्याला टिकवून ठेवले होते. जेव्हा त्यांनी सर्पात वास्तव्य करणाऱ्या सैतानाच्या सूचनेनुसार फळ खाल्ले तेव्हा ख्रिस्ताला आणि पित्याला त्यांनी नकार दिल्याने येशू दुःखित झाला. त्यांना सर्वस्व देऊन सुद्दा, त्यांच्या स्वार्थी कृतघ्नतेमुळे ख्रिस्तावर गंभीर दुःख ओढवले, ही वेदना ज्या पालकांची मुले त्यांना नाकारतात त्यांना परिचित आहेत. तरीही ख्रिस्ताने त्यांना सोडले नाही. त्यांना जीवन मिळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ख्रिस्ताच्या आत्म्याने त्यांच्याबरोबर राहणे, आणि ते त्याच्या पित्याच्या नियमांना आणि त्याच्या

चारित्र्याला पायाखाली तुडवत असताना देखील त्यांना जीवन देत राहणे हा होता.

प्रत्येक वेळी जेव्हा इस्राएली पाप करतात तेव्हा त्यांना अर्पण म्हणून कोकरू आणायचे होते.

> परमेश्वराने निषिद्ध ठरवलेले एखादे कृत्य चुकून केल्यामुळे पाप घडून सामान्य लोकांपैकी कोणी दोषी ठरला, आणि त्याने केलेले पाप त्याला कळून आले, तर त्याने त्या पापाबद्दल अर्पण करण्यासाठी एक दोषहीन बकरी आणावी. त्याने त्या पापबलीच्या डोक्यावर आपला हात ठेवावा आणि होमबलीचा वध करतात त्या ठिकाणी त्याचा वध करावा. आणि शांत्यर्पणाच्या यज्ञपशूच्या चरबीप्रमाणे ह्याचीही सर्व चरबी वेगळी काढून घ्यावी व ती परमेश्वराप्रीत्यर्थ सुवासिक हव्य म्हणून याजकाने तिचा वेदीवर होम करावा; याजकाने त्याच्यासाठी प्रायश्चित्त करावे म्हणजे त्याची क्षमा होईल. त्याने आपल्या अर्पणासाठी पापबली म्हणून कोकरू आणले तर ती दोषहीन मादी असावी. त्याने पापबलीच्या डोक्यावर आपला हात ठेवावा व जेथे होमबलीचा वध करतात तेथे पापार्पणासाठी त्याचा वध करावा. लेवीय 4:27-29,31-33

ही प्रक्रिया हे दुःखद सत्य प्रकट करते की प्रत्येक पापामुळे देवाच्या पुत्राला दुःख होते. पहिल्या पापापासून आजपर्यंत, ख्रिस्ताला नाकारण्याची वेदना आणि त्याची हरवलेली मुले पृथ्वीवर एकमेकांशी जे करतात त्याबद्दल तीव्र दुःख सहन करतात. अगदी पहिल्या पापापासून तर आजपर्यंत, ख्रिस्ताला त्याची हरवलेली मुले एकमेकांशी जसे वागतात त्याबद्दल दुःख सहन आणि नाकारले जाण्याची वेदना सहन करावी लागत आहे. प्रत्येक पापामुळे त्याला नव्याने वधस्तंभावर खिळले जाते आणि उघडपणे लाजिरवाणे केले जाते इब्रीकरास 6:6. हे दुःख आपल्या समजण्या पलीकडचे आहे; ख्रिस्ताचे हे दु:खसहन आणि त्याला भेटत असलेला नकार हा केवळ वधस्तंभावरील 48 तास किंवा पृथ्वीवरील त्याची 33 वर्षे नसून प्रत्यक्षात 6,000 वर्षांपासून तर आजपर्यंत चालू आहे. पित्याच्या हृदयावर परिणाम करणारे हे सर्व दुःख जर आपण समजू शकलो, तर आपल्याला दिसेल की पित्याचे दुःख हे पुत्राइतकेच मोठे आहे, कारण जेव्हा प्रत्येक पालक त्यांच्या मुलांना त्रास होताना पाहतात तेव्हा त्यांना देखील दुःख सहन करावे लागते.

> म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले. 2 करिंथ 5:19

जग येशूला कश्याप्रकारे वागणूक देत आहे हे पाहताना पित्याचे दुःख आपण खरोखर समजू शकतो का? पित्याचे हृदय दुःखाने कसे छेदले असेल जेव्हा त्याच्या पुत्राने त्याला विचारले:

> “हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.” मत्तय 26:39

ख्रिस्ताचे दुःखसहन  केवळ २,००० वर्षांसाठी होते असे नाही, तर तो आजदेखील, लैंगिक तस्करीमध्ये अडकलेल्या मुलांसाठी, बेघर आणि उपासमारीला बळी पडलेल्यांसाठी, घरगुती हिंसाचार आणि बलात्काराला बळी पडलेल्यांसाठी, अंमली पदार्थ आणि दारूच्या व्यसनात अडकलेल्यांसाठी आणि दररोज आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी दुःखसहन करत आहे. ख्रिस्तासोबत पित्यालाही हे सर्व जाणवते. हे दुःखसहन केवळ बळी पडलेल्यांपुरते मर्यादित नसून गुन्हेगारांनाही भोगावे लागते. ख्रिस्ताचा आत्मा गुन्हेगारांना त्यांच्या अपराधांची जाणीव करवून त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करतो. जो दोषीपणा जाणवतो तो त्यांना दोषी ठरवण्यासाठी नाही तर त्यांची अंतःकरणे कठोर होण्यापासून आणि त्यांचा आत्मा गमावण्यापासून वाचवण्यासाठी पाठवला जातो. जो दोषीपणा जाणवतो तो बचावासाठी पाठवला जातो, फक्त निंदा करण्यासाठी नाही. जेव्हा कोणी दारू, ड्रग्स किंवा इतर मार्गांचा वापर अपराधीपणापासून दूर होण्यासाठी करतात तेव्हा ते ख्रिस्ताला नाकारतात आणि त्याच्या आत्म्याला मंद करतात. हे कोट्यावधी आत्म्यांसोबत दररोज घडते कारण ते वधस्तंभावर दर्शविलेल्या निःस्वार्थ प्रेमापासून दूर जातात, जे प्रेम खूप तेजस्वी आहे.

या क्षणी आम्हाला परुश्यांप्रमाणे बोलण्याचे मोह होऊ शकते:

> “अरे, मंदिर मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या, तू देवाचा पुत्र असलास तर स्वतःचा बचाव कर आणि वधस्तंभावरून खाली उतर.” तसेच मुख्य याजकही, शास्त्री व वडील ह्यांच्याबरोबरीने थट्टा करत म्हणाले, “त्याने दुसऱ्यांना वाचवले; त्याला स्वतःला वाचवता येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आता वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. मत्तय 27:40-42

आम्ही मारिया मग्दालेनाच्या जीवनात ह्याचा खरा प्रतिसाद पाहतो. ख्रिस्ताला तिच्यासाठी वधस्तंभावर काय त्रास सहन करावा लागणार आहे हे तिने समजून घेतले आणि तिचा विश्वास होता की त्याच्या ह्या कृतींद्वारे तिला क्षमा मिळाली आहे. राजांसाठी बनवलेल्या अलाबास्त्र कुपीमधून आलेल्या समृद्ध सुगंधातून तिची कृतज्ञता वाहत होती.

तरीही प्रश्न विचारला पाहिजे: कि जर देव इतका सामर्थ्यवान आहे तर तो स्वतःला आणि त्याच्या पुत्राला इतके दुःख आणि वेदना का सहन करू देतो? दुसरे म्हणजे, तो स्वतः ह्यामध्ये उतरून हे सर्व दुःख का थांबवत नाही? हा आपल्या पुढच्या धड्याचा विषय आहे. आता जगाचे पाप हरण करणाऱ्या देवाच्या कोंकऱ्याकडे पाहा, आणि गेल्या सहा हजार वर्षांपासून हे सर्व दुःख सहन करण्यासाठी आपल्या स्वर्गीय पित्याचे प्रेम आणि त्याच्या सहनशीलतेबद्दल आश्चर्यचकित व्हा. खरंच, देवाने

जगावर एवढे जास्त प्रेम केले कि त्याने त्याचा एकुलता एक पुत्र आमच्यासाठी देऊन टाकला.

## 5. तुमच्या शत्रूंवर प्रेम करा

जेव्हा योहान बाप्तिस्माने येशूला लोकांपुढे मसीहा म्हणून सादर केले तेव्हा नूतनीकरणाच्या राष्ट्रीय महानतेच्या आशा पुन्हा जिवंत झाल्या. सेलुसिड साम्राज्याचे जोखंड फेकून देणाऱ्या जुडास मॅकाबीज सारख्या क्रांतीकारकांच्या विचारांनी यहुदी राष्ट्रवादाची शक्ती जागृत केली कारण ते रोमच्या सत्तेच्या अंतर्गत त्यांच्या दडपशाहीचा सामना करत होते. ह्या सर्वांसाठी नवीन असलेल्या शिक्षकाभोवती मोठा जनसमुदाय जमू लागला आणि जसे त्यांनी आजारी लोकांना बरे करण्याद्वारे त्या शिक्षकाच्या सामर्थ्याचे प्रदर्शन पाहिले, तसतसे त्यांची अपेक्षेची भावना वाढू लागली.

> नंतर येशू यहूदी लोकांच्या सभास्थानांत सुवार्तेची घोषणा करत व राज्याची सुवार्ता गाजवत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करत गालीलभर फिरला. आणि त्याची कीर्ती सूरिया देशभर पसरली; तेव्हा जे नाना प्रकारचे रोग आणि व्यथा ह्यांनी पिडलेले होते, जे भूतग्रस्त, फेफरेकरी व पक्षाघाती होते, अशा सर्व दुखणाइतांना त्याच्याकडे आणले, आणि त्याने त्यांना बरे केले. मग गालील, दकापलीस, यरुशलेम, यहूदीया व यार्देनेच्या पलीकडचा प्रदेश ह्यांतून लोकांचे थव्यांचे थवे त्याच्यामागे चालले. मत्तय 4:23-25

येशूने बारा शिष्यांची नियुक्ती केल्यानंतर, येशू त्यांच्याबरोबर समुद्रकिनारी गेला. गर्दी जमू लागली, काही ऐकायला तर काही बरे व्हायला जमू लागले. जसजसा लोकसमुदाय वाढत गेला तसतसे येशूने त्यांना परत डोंगरावर नेले जेथे तो त्यांच्याशी बोलू लागला. त्याच्या ओठातून बाहेर येत असलेले हे आशीर्वाद मानवतेने ऐकलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा अतिशय वेगळे होते. त्याने आपल्या प्रवचनाची सुरुवात अशा विधानांनी केली:

'जे सौम्य' ते धन्य, जे दयाळू ते धन्य, जे शांती करणारे ते धन्य. मत्तय 5:5,7,9. सत्याच्या कारणासाठी कुशलतेने तलवारी चालवणाऱ्या शूर पुरुषांची स्तुती करण्याऐवजी, ज्यांचा धार्मिकतेसाठी छळ केला जातो आणि ज्यांना निंदा व वाईट वागणूक सहन करावी लागते त्यांच्यावर त्याने आशीर्वादाचे शब्द घोषित केले. मत्तय 5:10,11. तो सैन्याचा अधिपती सारखा बोलला नाही तर त्याच्या पित्याच्या नम्रतेत, सौम्यतेत, आणि प्रेमात बोलला, त्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाने असेच जगावे अशी त्याची इच्छा होती.

ख्रिस्ताने बोललेले हे शब्द केवळ त्याने शिकवलेच नाहीत तर त्याच्या पृथ्वीवरील जीवनात तो त्याप्रमाणे जगला देखील. सर्व मनुष्यांसाठी त्याची करुणा, दया आणि सहनशीलता नेहमी प्रदर्शनात होती. त्याच्या सेवाकार्याच्या शेवटी, उपहास, मारहाण आणि मृत्यूदरम्यान त्याच्या सहनशीलतेने धमकी, किंवा सूड घेण्याचा कोणताही इशारा दर्शविला नाही. त्या दिवशी त्याने जे शिकवले त्यावरून तो कोण आहे आणि त्याच्या पित्याचा प्रतिरूप म्हणून त्याने देव कसा आहे हे प्रकट केले. हे समजून घेणे अत्यावश्यक आहे की येशू आपल्याला असे काही करण्यास सांगत नव्हता जे तो स्वतः करत नाही. दैवी असूनही, तो आपल्यासाठी जे नियम ठरवतो त्या नियमांचे तो पालनहि करतो.

येशूच्या शब्दांनी यहुदी अभिमान आणि महत्त्वाकांक्षेला खोलवर छेद दिला आणि ते शब्द सर्वत्र मानवी अभिमान आणि महत्त्वाकांक्षेला खोलवर छेद देतात. देवाचा चांगुलपणा, पापी मनुष्याला पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त करते आणि येशूच्या शब्दांमध्ये याचा अर्थ प्रकट होतो: "धन्य ते लोक जे आत्म्याने गरीब आणि त्यांच्या गर्व आणि वाईट मनोकामनेसाठी शोक करतात."

देवाचा पुत्र आणखी सखोल शब्द बोलत असताना आपल्यासमोर मानवी समस्या मांडतो:

> 'खून करू नकोस आणि जो कोणी खून करील तो न्यायसभेच्या दंडास पात्र होईल,' असे प्राचीन लोकांना सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, जो कोणी आपल्या भावावर [उगाच] रागावेल तो न्यायसभेच्या शिक्षेस पात्र होईल; जो कोणी आपल्या भावाला, 'अरे वेडगळा,' असे म्हणेल तो वरिष्ठ सभेच्या शिक्षेस पात्र होईल आणि जो कोणी त्याला 'अरे मूर्खा,' असे म्हणेल, तो नरकाग्नीच्या शिक्षेस पात्र होईल. मत्तय 5:21-22

मोशेला अनेक शतकांपूर्वी दिलेले शब्द येशू विस्तारीत करत आहे. तो नियमशास्त्राचा कोणताही भाग काढत नाही; त्याऐवजी, तो स्वतःच्या प्रकाशाने त्या नियमशास्त्राला अधिक लक्षणीय आणि तेजस्वी बनवत आहे.

> आपल्या मनात आपल्या भावाचा द्वेष बाळगू नकोस; आपल्या शेजाऱ्याची अवश्य कानउघाडणी कर, नाहीतर त्याच्यामुळे तुला पाप लागेल. सूड उगवू नकोस किंवा आपल्या भाऊबंदांपैकी कोणाचा दावा धरू नकोस, तर तू आपल्या शेजाऱ्यावर स्वतःसारखी प्रीती कर; मी परमेश्वर आहे.
>
> लेवीय 19:17-18

आपल्याशी वाईट वागणाऱ्याचा राग कोणाला आला नाही? ज्यांनी आम्हाला तुच्छ लेखले किंवा आम्हाला लाजिरवाणे केले अशा लोकांकडे परत जावेसे कोणाला वाटेल काय? कोणाविरुद्ध द्वेष बाळगणे पूर्णपणे टाळण्यास कोण सक्षम आहे काय? नंतर प्रेषित योहानाने येशूच्या शब्दांचा विस्तार करत हे शब्द लिहिले:

> जो कोणी आपल्या बंधूंचा द्वेष करतो तो नरहिंसक आहे; आणि कोणाही नरहिंसकाच्या ठायी सार्वकालिक जीवन राहत नाही, हे तुम्हांला माहीत आहे. 1 योहान 3:15

येशू बोलतो ते हे कोणत्या प्रकारचे राज्य आहे? एखाद्याबद्दल द्वेष बाळगणे म्हणजे आपण मृत्यूस पात्र असलेले खुनी आहोत काय? मत्तय 5:22 या शुभवर्तमानात "अग्नीचा नरक" किंवा नरक म्हणजे काय आहे ज्या संबंधात येशू बोलतो? काईनला विचारा कारण तो वेदनेने असे बोलला - “हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे. उत्पत्ती 4:13. वधस्तंभावर सर्व मानवी द्वेष, सूड आणि स्वार्थीपणाचा अपराध सहन करणाऱ्या येशूला या "अग्नीच्या नरकाबद्दल" विचारा.

तुमच्या जवळच्या व्यक्तीने तुम्हाला कधी खरोखर दुखावले आहे का? तुम्हाला त्यांच्याबद्दल राग आला आहे का? त्यांनी तुम्हाला किती दुखावले याबद्दल आणि त्यांना योग्य शिक्षा मिळावी अश्या इच्छेबद्दल विचार करण्याचे थांबवण्यासाठी तुम्ही संघर्ष केला आहे का? हे जिवंत नरक नाही काय? असे विचार आपल्या हृदयात येत नाहीत काय? एखाद्या व्यक्तीचा मृत्यू व्हावा अशी इच्छा मनात आल्यावर आपल्या हृदयाची प्रतिक्रिया कशी असते? येशूचा आत्मा, जो एखाद्या भावापेक्षा जास्त आपल्या जवळ राहतो त्याला, जेव्हा आपण इतरांचा मृत्यू व्हावा असे विचार करतो हे कळते तेव्हा कसे वाटत असेल? कदाचित आम्हाला माहित असेल की त्यांच्या मृत्यूची इच्छा ठेवणे चुकीचे आहे पण आम्ही त्यांना पुन्हा कधीही पाहू नये अशी आमची इच्छा असते. तरीही हे एकाच झाडाचे वेगळ्या रंगाचे फळ नाही काय? जेव्हा आपण अशा विचारांना आपल्यावर अंतकरणात राज्य करू देतो तेव्हा येशूला या नरक अग्नीचा कसा त्रास होत असेल?

ख्रिस्ताचे शब्द लोकांच्या एकमेकांशी संबंध ठेवण्याच्या नेहमीच्या मार्गांना थेट आव्हान देतात. शिवीगाळ आणि गैरवर्तनाचा सामना करताना अधिक नम्र आणि धीर धरण्याचा बुलावा आपण नैसर्गिकरित्या जेवढे देऊ शकतो त्यापेक्षा जास्त मागणी करतो आणि हाच येशूचा हेतु होता. तो म्हणतो:

> निरोग्यांना वैद्याची गरज नसते, तर रोग्यांना असते; मी नीतिमानांना नव्हे तर पाप्यांना पश्चात्तापासाठी बोलावण्यास आलो आहे." मार्क 2:17

मानवी अंतःकरणाला त्याच्या कृपेसाठी तयार करण्यासाठी येशू या शाही भाषणात अचूकतेने बोलतो. एका वाक्यात तो प्रत्येक माणसाचा स्वार्थ उघड करतो:

> 'व्यभिचार करू नकोस' म्हणून [पूर्वी त्यांनी] सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, जो कोणी एखाद्या स्त्रीकडे कामेच्छेने पाहतो त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे. मत्तय 5:27-28

स्वत:शी प्रामाणिक असलेला कोणताही माणूस हे जाणतो की हे शब्द थेट त्याच्या समस्येच्या मुळाशी बोलतात आणि त्याचा पूर्णपणे निषेध करतात. ख्रिस्त म्हणतो की समस्या स्वतःमध्येच आहे आणि एखाद्याचे हृदय बदलणे खूप आवश्यक आहे. देवाने मनुष्यामध्ये एक नवीन तत्त्व बिंबविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जे तत्त्व त्याच्याकडे नाही आणि असूहि शकत नाही. देव आम्हाला ख्रिस्ताचा विश्वास देतो कि, "तुमच्यामध्ये स्वर्गाचे राज्य" आहे जे एकदा मिळाले की "सर्व गोष्टी नवीन होतात." विश्वासाची व्यक्ती आपल्या जीवनातून आणि कृतीतून सरकार किंवा संस्कृतीची पर्वा न करता एक विशेष तत्त्व प्रतिबिंबित करतात जिथे आशीर्वाद त्यांच्या आतून सुरू होतात आणि इतरांपर्यंत पसरतात. जगाला असे वाटते की देव प्रथम बाहेरून कार्य करेल आणि मग आतून. मनुष्याला वाटते की देव प्रथम जगाची सुधारणा करेल, दुष्टांचा पाडाव करेल आणि त्याद्वारे योग्य राष्ट्राची स्थापना करेल. पण बाहेरून सुरुवात करून आतून काम करण्याचा प्रयत्न नेहमीच अयशस्वी ठरला आहे आणि नेहमीच अयशस्वीच ठरेल. पुन्हा येशू ज्या गोष्टीबद्दल बोलतो ते मनुष्यासाठी अशक्य आहे, परंतु ख्रिस्तामध्ये आणि त्याच्या कृपेने सर्व काही शक्य आहे.

जर असा कोणी असेल की ज्याला त्याच्या अंतःकरणात विश्वास असेल की त्याने कधीच काही चुकीचे केले नाही, तर येशूचे खालील शब्द त्या विश्वासाला निषेद करतात:

> 'डोळ्याबद्दल डोळा व दाताबद्दल दात' असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे; आणि जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नकोस.

> प्रेम व सर्वांगपूर्ण शील ‘आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर,’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाइटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगववतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवर पाऊस पाडतो. कारण जे तुमच्यावर प्रीती करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीती केली तर तुमचे प्रतिफळ काय? जकातदारही तसेच करतात ना? आणि तुम्ही आपल्या बंधुजनांना मात्र प्रणाम करत असलात तर त्यात विशेष काय करता? परराष्ट्रीयही तसेच करतात ना? ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे ‘तुम्ही पूर्ण व्हा.’ मत्तय 5:38-48

तुम्हाला कधी कोणी विनाकारण रागाने चापट मारली आहे का? येशू म्हणतो दुसरा गाल पुढे करा. येथे सूचीबद्ध केलेल्या आवश्यकता मानवांना आयुष्यभर सातत्याने पाळणे अशक्य आहे, तरीही येशू आपल्याला दाखवतो की हे त्याच्या राज्याचे आदर्श आहेत. आपल्या शत्रूंवर प्रेम करणे कसे शक्य आहे? जे तुम्हाला मारू इच्छितात त्यांच्यावर प्रेम करा? ज्यांना तुमचे नुकसान करायचे आहे त्यांच्यावर प्रेम करा आणि जे तुम्हाला सतत दुखावतात त्यांच्यावरही प्रेम करा? येशू आम्हाला त्यांच्यावर प्रेम करण्यास विचारतो? कोणत्या उद्देशाने?

“अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे.”

तुम्हाला हे समजले काय? जर तुम्ही अधिक, दयाळू, सौम्य आणि सहनशील असाल आणि तुम्ही तुमच्या शत्रूंवर प्रेम करत असाल तर तुम्ही तुमच्या स्वर्गीय पित्याचे पुत्र आहात हे उघड कराल. याचा अर्थ काय? याचा अर्थ पिता देखील असाच आहे! ज्याप्रमाणे देव चांगल्या आणि वाईट दोन्हीवर सूर्याचा प्रकाश पडतो, त्याचप्रमाणे आपण, त्याची मुले या नात्याने, आपल्या स्वर्गीय पित्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब प्रत्येकावर केले पाहिजे. हा आजपर्यंतचा सर्वात महान उपदेश आहे कारण हा उपदेश विश्वातील सर्वात अद्भुत अस्तित्वाबद्दल म्हणजे - आपल्या स्वर्गीय पित्याबद्दल बोलतो. आपला तारणहार जिवंत देवाचा पुत्र, आपला स्वर्गीय पिता कसा आहे हे आपल्यासमोर प्रकट करीत आहे. पित्याला पुत्राप्रमाणे संपूर्ण विश्वात इतर कोणीही ओळखत नाही आणि या उपदेशात पित्याचे चारित्र्य आपल्याला प्रकट झालेले दिसते.

या वास्तविकतेवर शिक्कामोर्तब करणारा मुद्दा मत्तयच्या पाचव्या अध्यायातील शेवटच्या शब्दांत आहे.

> ह्यास्तव जसा तुमचा स्वर्गीय पिता पूर्ण आहे तसे 'तुम्ही पूर्ण व्हा.' मत्तय 5:48

यावरून हे सिद्ध होते की येशूने या प्रवचनात जे काही बोलले आहे ते सर्व त्याच्या प्रेमाच्या स्वभावाचे प्रकटीकरण आहे. हे शब्द आपल्याशी संभाषण करतात की आपला पिता परिस्थितीशी कश्याप्रकारे सामना करतो. लूकचे पुस्तक परिपूर्णता या शब्दाचा सारांश देते जे मत्तय या प्रकारे वापरतो:

> जसा तुमचा पिता दयाळू आहे तसे तुम्हीही दयाळू व्हा. लूक 6:36

पूर्णता दयेत सापडते. मग हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे कि: जर देव त्याच्या शत्रूंवर प्रेम करतो आणि त्याचा नकार करणाऱ्यांसाठी तो स्वत:चा जीव देण्यास तयार आहे हे येशूने आपल्याला दाखवून दिले, तर मग पवित्र शास्त्रामध्ये असे का दिसते की देव त्याच्या शत्रूंचा तीव्र तिरस्कार करतो आणि त्याच्या क्रोधाने, दुष्टांचा नाश करण्यास तयार असतो फक्त त्यांना भयंकर वेदनांनी मरताना पाहण्यासाठी?

पुढे, आपण या प्रश्नाची उत्तरे शोधली पाहिजे, कारण ह्या जुन्या कराराच्या कथा आहेत ज्यात असे दिसते की देव त्याच्या शत्रूंवर एका विशिष्ट टप्प्यापर्यंत प्रेम करतो परंतु नंतर त्याचा सर्व राग एका अग्निरूपातून बाहेर काढतो ज्यामुळे त्यांचा पूर्णपणे नाश होतो. काही लोक म्हणतात की देवाला कमी लेखू नये आणि आपल्या मर्यादा ओलांडू नये, हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे नाहीतर आपल्याला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, अगदी वेदनादायक मार्गाने आपला जीव गमावावा लागेल. ह्या पुस्तकात आपण जुन्या करारातील कथांसह डोंगरावरील प्रवचनात येशूने वर्णन केल्याप्रमाणे देवाच्या परिपूर्ण चरित्राचा शोध घेतो. बऱ्याच लोकांना शुभवर्तमानातील येशू आणि जुन्या करारात वर्णन केलेला परमेश्वर यांच्यात मोठे अंतर दिसते, तरीही हे मनोरंजक आहे की मोशेला आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करण्याबद्दल आणि लेवीच्या पुस्तकात द्वेष सोडून देण्याबद्दल लिहिण्याची जबाबदारी देण्यात आली होती.

2000 वर्षांपूर्वी येशूचे बोलणे ऐकलेल्या लोकांमध्ये हाच गोंधळ किंवा गैरसमज होता. ज्यांनी येशूचे राज्य हे देवाच्या चारित्र्याचे प्रतिबिंब करत असल्याचे पाहिले त्यांच्यासाठी त्याच्या शब्दांनी नवजीवन आणि सकारात्मकता आणली. जे लोक सांसारिक महत्त्वाकांक्षेला चिकटून बसतात आणि विचार करतात की येशूने देवाचे राज्याचे खरे चरित्र दाखवले नाही मग ते लोक त्याला नापसंत करतात, आणि त्याला खोटे समजतात. येशूने वर्णन केलेला देव त्यांना कधीच माहीत नव्हता. म्हणून ते ज्या देवाची उपासना करतात त्या देवाचा पुत्र म्हणून ते येशूला पाहू शकले नाहीत. जर येशूने जे सांगितले ते खरे असेल तर एकतर त्यांनी खऱ्या देवाला कधीच ओळखले नव्हते किंवा त्यांच्या देवाने त्याचे मार्ग बदलले होते.

देव जेव्हा बोलतो तेव्हा त्याचे वचन खरे आहे का:

> कारण मी परमेश्वर आहे, मी बदलणारा नाही; म्हणून याकोबवंशजहो, तुम्ही नष्ट झाला नाहीत. मलाखी 3:6

शुभवर्तमानांचा देव मोशे, अब्राहम आणि नोहा यांच्या देवासारखाच आहे का? येशू ख्रिस्त काल, आज आणि अनंतकाळ सारखाच आहे का? इब्री 13:8. हेच प्रश्न उत्तरांची मागणी करतात. ह्या दरम्यान, आपण डोंगरावरील येशूने केलेल्या पित्याच्या प्रकटीकरणाचा उत्सव साजरा करूया आणि आपल्या मित्रांवर आणि शत्रूंवर प्रेम करण्यासाठी ख्रिस्ताकडून प्रेरित होऊया.

## 6. स्वर्गातून आलेली अग्नी

शिष्यांनी येशूबरोबर वेळ घालवला तेव्हा, ते त्याचे शब्द आण काय यपाहून आश्चर्यचकित झाले. त्याने डोंगरावरील प्रवचनात घोषित केलेल्या स्वर्गीय राज्याचा प्रकाश अजूनही त्यांच्या मनातील अंधकारात प्रवेश करू पाहत होता. तरीही पृथ्वीवरील महानतेच्या इच्छेने कलंकित असलेल्या शिष्यांनी त्यांचे विचार स्वर्गाच्या राज्यात ते व्यापू शकतील अशा पदांकडे वळवले. यामुळे स्वाभाविकपणे आणखी एक चर्चा झाली:

> नंतर आपल्यामध्ये मोठा कोण ह्याविषयी त्यांचा आपसांत वाद सुरू झाला.
> लूक 9:46

त्यांचे विचार स्वतःच्या महत्त्वाकडे का वळले? ते येशूमध्ये प्रकट झालेल्या देवाच्या सामर्थ्याबद्दल उत्साहित होते, परंतु त्यांनी अद्याप त्याचा वधस्तंभ स्वीकारला नव्हता. ते त्याला क्रूसाचा अर्थ विचारण्यास घाबरत होते कारण या प्रश्नामुळे त्यांच्या मनातील आशा निराश होऊ शकतात.

> देवाचे हे महान सामर्थ्य पाहून सर्व लोक थक्क झाले. येशूचे स्वत:च्या मरणाविषयीचे दुसरे भविष्य येशूने केलेल्या सर्व कृत्यांवरून सर्व लोक आश्चर्य करत असता तो आपल्या शिष्यांना म्हणाला, "तुम्ही ह्या गोष्टी नीट लक्षात ठेवा; कारण मनुष्याच्या पुत्राला लोकांच्या हाती धरून देण्यात येणार आहे." ही गोष्ट त्यांना समजली नाही; ती त्यांना समजू नये म्हणून त्यांच्यापासून ती गुप्त ठेवण्यात आली होती; आणि ह्या गोष्टीविषयी त्याला विचारायला ते भीत होते. लूक 9:43-45

येशूने त्यांचे विचार जाणले आणि एका लहान मुलाला घेऊन आपले हाथ त्याच्याभोवती गुंडाळले आणि त्यांना सांगितले:

> “जो कोणी ह्या बालकाचा माझ्या नावाने स्वीकार करतो तो माझा स्वीकार करतो, आणि जो कोणी माझा स्वीकार करतो तो ज्याने मला पाठवले त्याचा स्वीकार करतो; कारण तुम्हा सर्वांमध्ये जो कनिष्ठ आहे तोच श्रेष्ठ आहे.” लूक 9:48

निष्पाप मुलाला राष्ट्रीय महानतेची इच्छा नसते. पित्याच्या उबदार आणि कोमल स्पर्शाला प्रतिसाद दिला. एक साधारण, कायमस्वरूपी, पित्यावर विश्वास ठेवणारे प्रेम - ही त्याच्या राज्यात महानतेची व्याख्या होती. त्यांच्या जीवनातील महत्त्वाकांक्षा आणि निराशेमुळे शिष्यांचा निष्पापपणा हिरावून घेतला गेला होता, परंतु येशू त्यांना वर्षानुवर्षांच्या शहाणपणासह बालपणीचा निष्पापपणा परत देण्यासाठी आला होता.

येशूच्या संबंधात शिष्यांनी त्याच्यावर प्रेम केले. दररोज त्यांनी लोकांबद्दलची त्याची करुणा व प्रेम पाहिले आणि त्याने आपल्या पित्याबद्दल सांगितलेल्या अद्भुत गोष्टी ऐकल्या. श्रमाचा दीर्घ कालावधीनंतर एके दिवशी येशूने आपल्या शिष्यांना एका शोमरोनी गावात रात्री मुक्कामासाठी पाठवले.

> पुढे असे झाले की, त्याचा वर घेतले जाण्याचा समय जवळ आला तेव्हा त्याने यरुशलेमेस जाण्याच्या दृढनिश्चयाने तिकडे आपले तोंड वळवले. त्याने आपल्यापुढे निरोप्ये पाठवले; तेव्हा ते निघून त्याच्यासाठी तयारी करण्यास शोमरोन्यांच्या एका गावात गेले; पण त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही, कारण त्याचा रोख यरुशलेमेकडे जाण्याचा होता. लूक 9:51-53

शोमरोनी लोक त्यांच्या गुरुशी कसे वागतात आणि त्याचा पाहुणचार करत नाही हे पाहून शिष्य रागावले. त्यांच्या भावनांच्या उष्णतेमध्ये ते मानवी अंतःकरणात अस्तित्वात असलेल्या अंधाराची खोली प्रकट करतात:

> हे पाहून त्याचे शिष्य याकोब व योहान म्हणाले, “प्रभूजी, ‘आकाशातून अग्नी पडून’ त्यांचा ‘नाश व्हावा’ म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी आपली इच्छा आहे काय?” लूक 9:54

शोमरोनी लोकांना जाळून टाकण्याच्या त्यांच्या खुनी योजनेसाठी त्यांच्याकडे पवित्र शास्त्राचे समर्थन असल्याचे दिसून येईल. त्यांनी एलीयाच्या कथेचा उल्लेख केला ज्याने त्याला इजा करण्याचा निर्धार केलेल्या काहींवर स्वर्गातून अग्नी खाली पाडला होता. या कथेमुळे शिष्यांना या तापदायक शोमरोनी लोकांच्या मृत्यूची मागणी करणे पूर्णपणे योग्य वाटले. येशूने दिलेले उत्तर खूपच धक्कादायक ठरले असते.

> परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; 56कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले. लूक 9:55-56

हे शब्द येशूच्या कार्याचे आणि चरित्राचे प्रगटीकरण करतात. येशू हा विनाशकर्ता नाही तर तो तारणारा आहे. ह्याच वेळी असे दिसून येईल की ख्रिस्ताने केवळ शिष्यांनाच नव्हे तर एलीयाच्या कृतींनाही फटकारले आहे.

> ह्यावर राजाने पन्नासांच्या एका नायकाला पन्नास शिपाई देऊन एलीयाकडे पाठवले. एलीया होता तेथे जाऊन त्याने पाहिले तेव्हा तो पर्वतशिखरावर बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो त्याला म्हणाला, “हे देवाच्या माणसा, राजाज्ञा आहे की, ‘तू खाली उतरून ये.’” एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, “मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो.” तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. 2 राजे 1:9-10

या कथेच्या पृष्ठभागाच्या वाचनावरून असे दिसून येईल की जरी येशू पृथ्वीवर मनुष्यांचे जीव वाचवण्यासाठी आला होता, परंतु जुन्या करारातील देव त्याच्या संदेष्ट्याला पकडण्याचे धाडस दाखविण्यासाठी माणसांना जिवंत जाळण्यास तयार होता. येशूने केवळ शोमरोनी लोकांचा नाश करण्याच्या इच्छेबद्दल शिष्यांला दटावले होते की एलीयाच्या कृतींना देखील येशूने दटावले होते? येशूने त्याच्या कार्याबद्दल शिष्यांना दिलेले उत्तर हे सूचित करेल की दटावणी एलीयासाठी देखील होती. येशूने कसे काय शिष्यांना दटावले की त्याचे ध्येय लोकांना वाचवणे आहे आणि नंतर काही विशिष्ट घटनांमध्ये तो माणसांचा नाश करील असे स्पष्ट केले? जर असे असते तर, येशूने त्यांना सांगितले असते की आता या गोष्टींची वेळ आलेली नाही किंवा आपण त्यां लोकांसाठी अजून थोडा वेळ प्रार्थना केली पाहिजे. येशू थोड्या विलंबाने त्यांचा घात करण्याचा कोणताही संकेत देत नाही. तो फक्त लोकांचे जीवन वाचवण्याबद्दल बोलतो, त्यांचा नाश करण्याबद्दल नाही.

किंग जेम्स भाषांतरामधील येशूचे हे विधान बायबलच्या अनेक आधुनिक भाषांतरांसाठी खूपच लाजिरवाणे असल्याचे दिसते कारण येशूचे हे वाक्य तेथे नाहीत.

> त्याने वळून त्यांना धमकावले. मग ते दुसऱ्या गावास गेले. लूक 9:55-56 (मराठी BSI)

> परंतु येशूंनी वळून त्यांना धमकाविले. नंतर ते व त्यांचे शिष्य दुसऱ्या गावाकडे निघून गेले. लूक 9:55-56 (मराठी MRCV)

या विविध भाषांतरामध्ये वेगळेपण असल्याने देवाचे चरित्र समजून घेण्यासाठी प्रचंड परिणाम होतो. एक फार मोठा प्रश्न विचारला पाहिजे तो असा की, त्या माणसांवर स्वर्गातून आग कोणी आणली? एलीयाच्या कथेतील एका महत्त्वाच्या गोष्टीकडे आपण थोडेसे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे जे देवाने त्याला कर्मेल पर्वतावरील त्याच्या महान विजयानंतर दाखवले.

> त्याने त्याला म्हटले, "तू येथून बाहेर निघून जा; पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा." तेव्हा पाहा, परमेश्वर जवळून जात असताना त्याच्यासमोरून मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारत व खडक फोडत होता; पण त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला; पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता; त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली. 1 राजे 19:11-12

देव एलीयाला कोणता मुद्दा सांगायचा प्रयंत्न करत होता? हेच तत्व पवित्र शास्त्रात इतर कुठे व्यक्त केले आहे ते हे:

> तेव्हा त्याने मला उत्तर केले, "जरूब्बाबेलास परमेश्वराचे हे वचन आहे : बलाने नव्हे, पराक्रमाने नव्हे, तर माझ्या आत्म्याने कार्यसिद्धी होईल असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. जखऱ्या 4:6

देव एलीयाला सांगत होता की तो मनुष्यांना त्याच्या राज्याची आज्ञा पाळण्यास भाग पाडण्यासाठी बळाचा वापर करत नाही, तर तो त्याचा शांत, मंद वाणीचा उपयोग करतो जी मनुष्यांच्या अंतःकरणात त्यांना सत्याकडे वळवण्यासाठी कार्य करते. एलीयाला सांगणे कि तो अग्नीत नाही आणि नंतर एलीयाला पकडण्यासाठी आलेल्या 102 लोकांना अग्नीने जाळून टाकणे हि देवाची विरोधाभासी कार्ये आहेत. हे 102 लोक होते कारण अग्नी 50 पुरुषांचे दोन संच आणि त्यांच्या अधिपतीवर दोनदा उतरून आली. हे खरे आहे की देवाने वेदीवर यज्ञ भस्म करण्यासाठी अग्नी पाठवला होता परंतु ही अग्नी मनुष्याचे जीवन नष्ट करण्यासाठी नाही तर त्यांना वाचवण्यासाठी पाठविली गेली होती. जेव्हा एलीयाने या माणसांवर स्वर्गातून अग्नी बोलावली तेव्हा देवाने त्याला आधीच दर्शविले होते की देव लोकांना बळजबरी करण्यास किंवा त्याचे पालन करण्यास भाग पाडण्यासाठी अग्नीचा उपयोग करत नाही. 50 माणसांच्या तिसऱ्या गटाचा आज्ञाधारकपणा ही देवाला पाहिजे असलेला आज्ञाधारकपणा नव्हता.

> मग राजाने तिसऱ्यांदा पन्नासांच्या एका नायकाला पन्नास शिपाई देऊन पाठवले. ह्या तिसऱ्या पन्नासांच्या नायकाने जाऊन एलीयापुढे गुडघे टेकले व विनवणी करून म्हटले, "हे देवाच्या माणसा, माझा प्राण व ह्या आपल्या पन्नास दासांचे प्राण आपल्या दृष्टीला मोलवान वाटोत. 2 राजे 1:13

या मनुष्यांनी एलीयाच्या देवासमोर गुडघे टेकले कारण ते त्याच्यावर प्रेम करत होते आणि त्यांना त्याची उपासना करायची होती म्हणून काय? नक्कीच नाही! आपण मरणार आहोत या भीतीने ते आपल्या जीवाची भीक मागत होते. जर या प्रकारची उपासना देवाला मान्य असती तर येशूने काही परुशी आणि काही रोमन लोकांवर अग्नी बोलावली असती आणि प्रत्येकाणे त्वरित त्याची उपासना केली असती - त्याच्यावरील प्रेमामुळे नव्हे तर मरणाच्या भीतीमुळे. म्हणून त्या अग्नीत देव नव्हता जो मनुष्यांना भस्म करत होता. मग तिथे जे घडले त्याचा हिशेब कसा घ्यायचा?

> ह्यावर राजाने पन्नासांच्या एका नायकाला पन्नास शिपाई देऊन एलीयाकडे पाठवले. एलीया होता तेथे जाऊन त्याने पाहिले तेव्हा तो पर्वतशिखरावर बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो त्याला म्हणाला, "हे देवाच्या माणसा, राजाज्ञा आहे की, 'तू खाली उतरून ये.'" एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, "मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो." तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. 2 राजे 1:9-10

नायक आणि त्याची माणसे इस्राएलच्या राजाच्या अधिपत्याखाली होती ज्याने एक्रोनचा देव बेलजेबूब याच्याकडे मदतीसाठी पाठवले होते. एक्रोनचा देव सैतानाने प्रेरित केलेला खोटा देव होता. या देवाची मदत मागताना, राजा सैतानाच्या अधिकारक्षेत्रात स्वतःला समर्पित करत होता.

> आज्ञापालनाकरता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहात. ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्त्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहात, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? रोमकरांस पत्र 6:16

राजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या माणसांनी स्वतःला सैतानाच्या अधिकाराखाली ठेवले होते, तरीही त्यांच्या नायकाने एलीयाला देवाचा माणूस म्हणून ओळखले. कर्मेल पर्वतावर काय घडले हे पाहिल्यावर सर्व इस्राएलांना आठवले कि देव एलीयाच्या पाठीशी आहे. जर त्या नायकांना विश्वास होता की एलिया हा देवाचा माणूस आहे, तर एलीयाने स्वतःचे प्रमाण देण्यासाठी चिन्ह का शोधले? आम्हाला धड्यात थोड्या वेळाने उत्तर आढळते:

> परमेश्वराचा देवदूत एलीयाला म्हणाला, "खाली उतरून त्याच्याबरोबर जा; भिऊ नकोस." तेव्हा एलीया उठून खाली उतरून त्याच्याबरोबर राजाकडे गेला. 2 राजे 1:15

एलीयाला घाबरू नको असे सांगण्यात आले. मग एलीया का घाबरला होता? कर्मेल

पर्वताच्या घटनांनंतर ही समस्या समोर आली.

> एलीया त्यांना म्हणाला, “बआलाच्या संदेष्ट्यांना पकडा; त्यांच्यातल्या एकालाही निसटून जाऊ देऊ नका.” तेव्हा त्यांनी त्यांना पकडले; एलीयाने त्यांना खाली किशोन ओहळानजीक आणून वधले. 1 राजे 18:40

एलीयाने बालच्या संदेष्ट्यांना मारण्यापूर्वी तो राजा आणि त्याच्या सर्व माणसांसमोर निर्भयपणे उभा होता. याआधी, पाऊस पडणार नाही हे सांगण्यासाठी बेधडकपणे राजासमोर गेल्यामुळे एलीयाचे तीन वर्षांहून अधिक काळ पाठलाग करण्यात आले होते. या सर्व अनुभवांमध्ये एलीया घाबरला असल्याचा उल्लेख दिसला नाही. एलीयाने बालाच्या सर्व संदेष्ट्यांना तलवारीने मारल्यानंतरच तो घाबरला.

> तेव्हा ईजबेलीने जासूद पाठवून एलीयाला बजावले की, “संदेष्ट्यांच्या जिवाच्या गतीसारखी तुझ्या जिवाची गती उद्या ह्याच वेळी केली नाही तर देव माझे तसेच व त्याहूनही अधिक करोत.” हे ऐकून एलीया जीव घेऊन पळाला; तो यहूदातील बैर-शेबा येथे आला व तेथे त्याने आपल्या चाकराला ठेवले. 1 राजे 19:2-3

असे दिसून येईल की सुवर्ण नियमाशी संबंधित एक उलट तत्त्व आहे आणि ते असे होते. "तुम्ही इतरांसोबत ज्या चुकीच्या गोष्टी करता त्या तुमच्याशी केल्या जातील अशी भीती तुम्हाला वाटेल." हा नक्कीच काईनचा अनुभव होता.

> तेव्हा काइन परमेश्वराला म्हणाला, “हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे. पाहा, ह्या जमिनीवरून तू मला आज हाकून दिले आहे; मी तुझ्या दृष्टीपुढून लपलेला असेन, मी पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होणार; आणि ज्या कोणाला मी सापडेन तो मला ठार करील, असे होईल.” उत्पत्ती 4:13-14

एलीया दुष्ट ईझबेलेच्या हातून निसटल्यानंतर त्याने काहीतरी विचित्र सांगितले.

> तो स्वतः रानात एक दिवसाची मजल चालून जाऊन एका रतामाच्या झुडपाखाली जाऊन बसला; आपला प्राण जाईल तर बरे असे वाटून तो म्हणाला, “हे परमेश्वरा, आता पुरे झाले, माझा अंत कर; मी आपल्या वाडवडिलांहून काही चांगला नाही.” 1 राजे 19:4

एलीया आपल्या जीव वाचवण्यासाठी पळून जातो पण नंतर देवाला त्याचे प्राण घेण्यास सांगतो. तो ईझेबेलेला स्वतःची हत्या का करू देत नाही? मग तो पुढे शोकपूर्ण शब्द जोडतो “कारण मी माझ्या वडिलांपेक्षा श्रेष्ठ नाही.” त्याला या वाक्याद्वारे काय बोलायचे होते? थोड्या वेळाने त्याने देवासमोर कबुली दिल्यानंतर त्याचा हेतू स्पष्ट होतो.

> तो तेथे जाऊन एका गुहेत राहिला; तेव्हा पाहा, परमेश्वराचे वचन त्याला प्राप्त झाले. तो त्याला म्हणाला, "एलीया, तू येथे काय करीत आहेस?" तो म्हणाला, "सेनाधीश देव परमेश्वर ह्याच्याविषयी मी फार ईर्ष्यायुक्त झालो आहे; कारण इस्राएल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडले, तुझ्या वेद्या मोडून टाकल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधले; मीच काय तो एकटा उरलो आहे; आणि आता ते माझाही जीव घेऊ पाहत आहेत." 1 राजे 19:9-10

इस्त्रायलच्या अपयशावर आणि तलवारीने संदेष्ट्यांच्या हत्येबद्दल एलीयाने आपली निराशा देवासमोर मांडली. एलीयाला आशा होती की संपूर्ण राष्ट्र त्याच्या बाजूने एकत्र येईल आणि त्याला राज्य सुधारण्यात मदत करेल. जेव्हा ईझबेलने त्याला धमकावले तेव्हा त्याला आशा होती की सर्वजण तिच्या उद्देशाला पराभूत करण्यासाठी त्याच्याबरोबर उभे राहतील पण तो एकटाच राहिला. त्याला असे वाटले की सर्वकाही व्यर्थ आहे. तसेच बालच्या संदेष्ट्यांच्या हत्येमागील त्याची प्रेरणाही उघड झाली आहे. त्यांनी देवाच्या संदेष्ट्यांना तलवारीने मारले होते. मोशेच्या नियमशास्त्रात मूर्तिपूजेची शिक्षा दगडाने मारून मृत्यू होती, तलवारीने त्यांना ठार मारणे नाही. दगडमार करण्याच्या शिक्षेबद्दल आपण दुसऱ्या अध्यायात चर्चा करू, परंतु मुद्दा असा आहे की एलीयाने मूर्तिपूजेशी निगडित पवित्र शास्त्रात वर्णन केलेल्या आज्ञेचे पालन केले नाही. यावरून हे दिसून येते की एलीयाला खऱ्या देवाचा सन्मान करण्याची इच्छा असली तरी तो चुकीच्या मार्गाने गेला. हे आपल्याला शिष्यांच्या मानसिकतेशी जोडते. त्यांनी त्यांच्या शिक्षकावर प्रेम केले आणि त्यांचा सन्मान केला, परंतु जेव्हा त्यांच्या इच्छेनुसार गोष्टी घडल्या नाहीत यासाठी त्यांच्या मनात सूडभावना प्रकट झाली आणि तेव्हा सैतानाने त्यांच्यातले प्रेम नष्ट केले. त्यामुळे शिष्य त्यांच्या आत्म्यात एलीयाच्या कथेशी जुडलेले होते कारण ते एकाच आत्म्याचे प्रतिबिंबित करत होते. आम्हाला याची आठवण करून दिली जाते कि:

> एलीया आपल्यासारख्या स्वभावाचा माणूस होता; याकोब 5:17

एलीयाला माहीत होते की बआलचे संदेष्टे मृत्यूस पात्र आहेत, पण या प्रकरणाला सामोरे जाण्याच्या त्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे तो देवाच्या आदेशात नसलेल्या मार्गाने गेला. हे त्याच्या अकस्मात मृत्यूच्या भीतीने सिद्ध होते जे त्याने यापूर्वी कधीच अनुभवले नव्हते. ही भीती एलीयाच्या मनात होती जेव्हा सर्व सैनिक त्याच्या जवळ आले होते. एलीयाने तलवारीने मारले असल्याने तो तलवारीने मरेल अशी भीती त्याला वाटत होती. जरी नायकाला एलीया हा देवाचा माणूस होता यात शंका नव्हती, पण एलीया स्वत: त्याच्या मृत्यूच्या भीतीशी आणि तो अजूनही त्याच्या वडिलांपेक्षा चांगला नाही या विचारांशी लढत होता. सैतानाने एलीयाच्या शंकेचा फायदा घेऊन, त्याला असे म्हणण्यास प्रवृत्त केले:

> एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, "मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो." तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. 2 राजे 1:10

हे सैतानाने उच्चारलेल्या या शब्दांसारखेच आहे:

> तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, "तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर." मत्तय 4:3

एखाद्या व्यक्तीला देव त्याच्यासोबत आहे याची खात्री देण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करणे हा त्याच्या विश्वासाचा अभाव आहे. आपण विश्वासाने भरवसा ठेवला पाहिजे की आपण देवाची मुले आहोत जे देवाने आपल्याला आधीच सांगितले आहे. या दैवी शक्तीच्या प्रदर्शनाचा 50 पुरुषांना कसा फायदा झाला? एलीयाबद्दल त्यांनी आधीच कबूल केलेल्या गोष्टीं कि तो देवाचा माणूस आहे यात त्यांना कशी मदत झाली? ज्याला याबद्दल अनिश्चितता होती तो स्वतः एलिया होता. या अनिश्चिततेमुळे एलीया हे विसरला कि देव अग्नीत नाही आणि या माणसांवर अग्नी पाडण्याच्या विचारांद्वारे तो सैतानासमोर पराभूत झाला. सैतान स्वर्गातून आग आणून लोकांना जाळून टाकू शकतो याचा पुरावा आपल्याकडे आहे का?

> परमेश्वर सैतानाला म्हणाला, "पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस." मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला. तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, "दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे." ईयोब 1:12,16

काही प्रश्न अजूनही शिल्लक आहेत. जर सैतानाने एलीयाला त्याच्या आत्म-शंकेद्वारे फसवले असेल तर पुढील अध्यायात एलीयाचे स्वर्गरोहण होणे कसे शक्य आहे? त्याच्या जीवनाच्या समाप्तीच्या वेळी एवढी मोठी चूक केल्याने त्याला स्वर्ग आणि अनंतकाळचे जीवन थेट मार्गाने बक्षीस मिळावे असा विचार करणे मूर्खपणाचे वाटते. जेव्हा आपण बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा विचार करतो तेव्हा त्याला त्याच्या मृत्यूपूर्वी खरोखर शंका होती की येशू तारणारा होता कि नाही.

> योहान बंदिशाळेत असताना त्याने ख्रिस्ताच्या कृत्यांविषयी ऐकून आपल्या शिष्यांना पाठवून त्याला विचारले, "जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?" मत्तय 11:2-3

येशू योहानाने पाठवलेल्या शिष्यांना या शब्दांसह प्रतिसाद देतो:

> येशूने त्यांना उत्तर दिले, "जे तुम्ही ऐकता व पाहता ते योहानाला जाऊन सांगा; 'आंधळे पाहतात,' पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठवले जातात व 'गरिबांना सुवार्ता सांगण्यात येते'; जो

> कोणी माझ्यासंबंधाने अडखळत नाही तो धन्य होय.” मत्तय 11:4-6

योहानाने कसा प्रतिसाद दिला हे पवित्र शास्त्र आपल्याला सांगत नाही. परंतु येशूने योहानाबद्दल ज्या पद्धतीने बोलले त्यावरून हे स्पष्ट दिसते की योहानाने आपल्या शंकांवर मात केली आणि आपले मरण पत्करण्याची तयारी केली. येशू म्हणाला:

> आणि हे पत्करण्याची तुमची इच्छा असेल तर जो एलीया येणार तो हाच आहे. मत्तय 11:14

आम्हाला असेही सांगितले जाते:

> तो (योहान बाप्तिस्मा) एलीयाच्या आत्म्याने व सामर्थ्याने त्याच्यापुढे चालेल.” लूक 1:17

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने देवासाठी एक पराक्रमी कार्य केले आणि नंतर विश्वासाचे मोठे संकट त्याच्यावर आले ज्यावर त्याने मात केली, परिणामी तो मृत्यूसाठी तयार झाला. हे एलिया सारखेच आहे ज्याने देवासाठी महान कार्य केले आणि नंतर त्याच्या सेवाकार्याच्या शेवटी विश्वासाचे मोठे संकट अनुभवले. एलीयाने त्याच्या आत्म-शंकेवर मात केली ज्यामुळे शंभर माणसांचा अग्निमय मृत्यू झाला आणि त्याचे स्वर्गरोहण केले गेले. आपल्या सर्वांसाठी हा एक मौल्यवान धडा आहे, की न्यायी लोक विश्वासाने जगतील आणि त्यांनी केलेल्या कृत्यांच्या गुणवत्तेवर नाही. एवढ्या मोठ्या अपयशानंतर एलियाचे स्वर्गरोहण आपल्या सर्वांना खूप आशा देते की आपण किती कमकुवत आणि असहाय्य आहोत हे पाहिल्यानंतर देखील आपले स्वर्गरोहण केले जाऊ शकते. आपण आनंद करूया की तारण केवळ ख्रिस्ताच्या गुणवत्तेमध्ये आहे, स्वतःचा बचाव करताना देवाच्या नावाने इतरांचा नाश करू शकणाऱ्या संदेष्ट्यांच्या कार्यात नाही.

दुसरा प्रश्न ज्याचा विचार केला पाहिजे तो म्हणजे देवाने त्यांच्या माणसांना सैतानाच्या अग्नीने नष्ट का होऊ दिले? ही माणसे इस्राएलच्या राजाचे सेवक होते ज्याने स्वतःला एक्रोनचा देव बाल-जेबूब याच्या स्वाधीन केले होते, आणि या माणसांना विनाशकापासून संरक्षण नव्हते. सैतानाला या माणसांपर्यंत प्रवेश मिळू शकत होता, परंतु देवाने हे केले आहे असे अशा प्रकारे त्यांना मारण्याच्या प्रयत्नात तो होता. ही जवळजवळ परिपूर्ण फसवणूक होती; कि कृती करा आणि जगाला सांगा की देवाने ते केले. एलीयाच्या भीतीचा सैतानाने गैरफायदा घेऊन त्याला आवश्यक असलेली संधी घेतली. ही योजना खूप यशस्वी झाली कारण बहुतेक लोकांचा असा विश्वास आहे की देवाने त्या लोकांना जाळून टाकले, परंतु कृतज्ञतापूर्वक येशू आपल्याला सांगतो की हा त्याचा आत्मा नाही. तो रक्षणकर्ता आहे आणि संहारक नाही.

हे जाणून घेणे किती आश्चर्यकारक आहे की तुमचा मौल्यवान तारणकर्ता ज्याने त्या लहान मुलाला आपल्या कुशीत घेतले आणि आम्हाला त्याच्या राज्याची महानता प्रकट केली, तो एक तारणहार आहे ज्याच्यामध्ये आपण निश्चिंत राहू शकतो. तो आपले कोणत्याही प्रकारे नुकसान करणार नाही, कारण येशू उत्तम मेंढपाळ आहे, कसाई नाही; तो त्याच्या मेंढरांना शांत पाण्याच्या बाजूला नेतो आणि त्यांना मृत्यूपर्यंत छळत नाही. तरीसुद्धा, आपला स्वर्गातील पिता खरोखरच कोणीतरी आहे ज्याच्याबद्दल आपण भय बाळगले पाहिजे हे निश्चित होण्याआधी आपल्याला अग्नीच्या विषयावर अधिक विचार करणे आवश्यक आहे.

## 7. आपले हृदय कठोर करू नका

तिसऱ्या अध्यायात आम्ही वधस्तंभावरील मृत्यू आणि त्यावरून दाखवलेल्या अद्भुत प्रेमाचा विचार केला. चौथ्या अध्यायात आपण पिता आणि पुत्राच्या नात्यातील प्रेमळपणा पाहिला. ही दोन सत्ये आपल्याला देवाचे चारित्र्य आणि त्याचे राज्य समजून घेण्यासाठी भक्कम आधार देतात. लूकचा नववा अध्याय आपल्याला एक उत्कृष्ट कथा प्रदान करतो जे दर्शविते की जेव्हा आपण वधस्तंभाचा प्रतिकार करतो तेव्हा काय होते. हे असे दाखवते की देव शिक्षा म्हणून पापी लोकांना जिवंत जाळतो आणि हे त्याच्या स्वभावाला शोभते.

| | | |
|---|---|---|
| लूक 9:18-20<br>मत्तय 16:13-17<br>मार्क 8:27-29 | पिता-पुत्राचे नाते उघड झाले. | पेत्र कबूल करतो की येशू हाच ख्रिस्त आहे. मत्तय नोंदवतो की पेत्राने सांगितले की तो ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहे. येशू पेत्राला सांगतो की हे ज्ञान पित्याकडून आध्यात्मिक प्रकटीकरण आहे आणि देवाने त्याला दाखवल्याशिवाय कोणीही हे स्वतः शिकू शकत नाही. |

| | | |
|---|---|---|
| लूक 9:21-22<br>मत्तय 16:21-23<br>मार्क 8:31-33 | वधस्तंभाचा पहिला इशारा. | येशू देवाच्या आज्ञाधारक पुत्राबद्दल मानवी द्वेष आणि त्याला कसे मारले जाईल याबद्दल प्रथम इशारा देतो. यावर पेत्र प्रतिक्रिया देतो आणि असे होणार नाही असे ठामपणे सांगतो! पेत्राने त्याच्या महानतेच्या महत्त्वाकांक्षेला वधस्तंभावर खिळण्याची परवानगी देण्यास नकार दिला. हा क्रूसाचा नकार आहे. येशू सैतानाच्या आत्म्याला दटावतो ज्याने पेत्राच्या ह्या वाक्याला प्रेरित केले. |
| | पहिली कठोरता | येणाऱ्या वधस्तंभाच्या मृत्यूला पेत्र किंवा शिष्यांनी कसा प्रतिसाद दिल्याची आणि ते याबद्दल कशी तयारी करतील याची कोणतीही नोंद नाही. यामुळे ख्रिस्त आणि त्याच्या वधस्तंभाच्या दु:खांबद्दल शिष्यांची अंतःकरणे कठोर होऊ लागतात. |
| लूक 9:23-27<br>मत्तय 16:24-28<br>मार्क 8:34-38 | आत्मत्यागाचा क्रूस घेण्याचे आवाहन | येशू शिष्यांना चेतावणी देतो की जर त्यांना त्याचे अनुसरण करायचे असेल तर त्यांनी सांसारिक महत्वाकांक्षा खाली ठेवल्या पाहिजेत. तो ज्या मार्गाने चालत आहे त्या मार्गात सांसारिक सन्मान नाही तर फक्त आत्मत्याग आणि इतरांची सेवा आहेto.<br><br>lbt to |
| लूक 9:28-36<br>मत्तय 17:1-8<br>मार्क 9:1-6 | पिता त्यांना त्यांच्या पुत्राचे ऐकण्याची आज्ञा देतो. | दयाळूपणे पिता आपल्या पुत्राचे वैभव प्रकट करतो आणि तो काय म्हणतो ते ऐकण्यासाठी त्यांना आग्रह करतो. क्रूसाच्या आधीच्या नकाराचा अर्थ असा आहे की शिष्यांना परिपूर्ण प्रेम नाही आणि म्हणून त्यांना स्वर्गातील आवाजाची भीती वाटते. भीतीत यातना आहे. "भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही." 1 योहान 4:18. |
| लूक 9:37-42asaआत्Atqq<br>मत्तय 17:14-21<br>मार्क 9:14-29 | अविश्वास प्रकट होतो | क्रूस स्वीकारण्यास नकार अविश्वासाने प्रकट होऊ लागतो. शिष्य भूत काढू शकत नाहीत कारण त्यांचे अंतःकरण अजूनही त्यांच्या महानतेच्या इच्छेने प्रभावित आहे. येशू त्यांच्या विश्वासाची कमतरता एक चेतावणी म्हणून नामांकित करतो. |

| | | |
|---|---|---|
| लूक 9:44-45<br>मत्तय 17:22-23<br>मार्क 9:31-32 | क्रुसाची दुसरी चेतावणी. हृदय आणखèuzeses wर होते. | प्रेमात येशू त्यांना त्यांची महत्वाकांक्षा सोडण्यास मदत करण्यासाठी पुन्हा वधस्तंभाबद्दल सांगतो परंतु त्यांनी पुन्हा पश्चात्तापाची हाक नाकारली आणि तो काय म्हणत आहे याबद्दल ते दुःखात प्रवेश करतात. त्यामुळे त्यांची अंतःकरणे आणखी कठोर होतात. |

| | | |
|---|---|---|
| लूक 9:46-48<br>मत्तय 18:1<br>मार्क 9:33-38 | स्वार्थी महत्त्वा कांक्षा वाढते. | शिष्य सैतानासाठी द्वार उघडतात जो त्यांना त्यांच्यापैकी कोण श्रेष्ठ आहे यावर चर्चा करण्यास प्रवृत्त करतो. येशू त्यांच्यामध्ये एका लहान मुलाला ठेवून प्रतिसाद देतो की जोपर्यंत ते या लहान मुलासारखे होत नाहीत तोपर्यंत ते स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करू शकत नाहीत. |
| लूक 9:49-50<br>मार्क 9:38-39 | वर्चस्वाचा आत्मा दिसून येतो. | शिष्य सर्वात मोठे पद शोधत असल्याने ते स्थान इतर कोणी घेऊ नये अशी त्यांची इच्छा होती आणि म्हणून त्यांनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध शक्तीचा वापर केला. |
| लूक 9:51-54 | हत्याराचा आत्मा प्रकट होतो आणि पवित्र शास्त्राद्वारे न्याय्य ठरतो. | आत्म-नकाराचा वधस्तंभ नाकारताना, शिष्यांच्या हृदयावर अभिमानाच्या भावनेने कब्जा केला होता ज्यामुळे ते नियंत्रणात गेले आणि खून झाला. त्यांच्या अंतःकरणाच्या कठोरतेमुळे त्यांना देवाच्या नावाने लोकांना मारण्यात काहीच अयोग्य दिसले नाही. |

राष्ट्राच्या पुढा-यांच्या क्रूर हातांनी त्याच्या मृत्यूबद्दल येशूने दिलेले इशारे स्वीकारण्याची शिष्यांची इच्छा नव्हती. त्यांनी आपल्या राष्ट्रीय महानतेच्या सर्व महत्त्वाकांक्षा त्याच्यावर लादल्या होत्या; त्यांनी ख्रिस्ताला तो जसा होता तसा नाही तर त्यांच्या स्वतःच्या कल्पनांप्रमाणे पाहिले. त्यांची आकांक्षा ख्रिस्ताला बरनब्बास बनण्याची होती मग वधस्तंभाच्या सत्याने त्यांच्या स्वप्नांना वधस्तंभावर खिळले आणि त्यांचे विचार मातीत मिळविले. लोकांनी वधस्तंभाला नाकारले आणि पित्याच्या प्रतिनिधी म्हणून जवळजवळ प्रत्येकजण येशूच्या संदेशाला आणि कार्याला, नाकारतो आणि तुच्छ मानतो हे पाहून ख्रिस्त प्रत्येक दिवशी अनुभवत असलेल्या जबरदस्त नातेसंबंधातील दुःख समजून घेण्यास मदत होते. त्याऐवजी, लोकांनी या दुःखाकडे दुर्लक्ष करणे निवडले ज्यामुळे त्यांचे अंतःकरण आणखी

कठोर झाले.

---

[1] बरनब्बास ख्रिस्ताच्या वेळी एक राजकीय नेता होता ज्याने इस्राायलवरील रोमन नियंत्रण उलथून टाकण्याची वकिली केली होती. हे ध्येय साध्य करण्यासाठी त्याने हिंसेचा वापर केला आणि आपण एक रक्षणकर्ता असल्याचा दावा केला. "बरनब्बास" त्याच्या नावाचा अर्थ "पित्याचा पुत्र" असा आहे आणि तो पित्याचा खरा पुत्र येशूसारखा नव्हता तर तो खोटा ख्रिस्त होता.

जेव्हा येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी, स्वर्गीय पित्याने जगाला घोषित केले की त्याच्या पुत्राविषयी त्याचे प्रेम आहे तेव्हा देव आणि त्याच्या पुत्राचा, प्रेमळपणा आणि संवेदनशीलता खरोखर समजून घेण्यासाठी एक द्वार उघडले गेले. हीच संवेदनशीलता त्यांना आत्मत्यागाच्या माध्यमातून या भयंकर वेदना सहन करण्यास प्रवृत्त करत होती. दररोज त्यांची अंतःकरणे मानवी स्वार्थ, अभिमानामुळे छेदली जात असत. देवाचे स्वातंत्र्य-प्रेमळ चारित्र्य लोकांना वर्षानुवर्षे त्याचा तिरस्कार करण्याची आणि त्याला नाकारण्याची परवानगी देते आणि तो कधीही बदला घेत नाही. तो त्यांची अंतःकरणे कठोर होऊ देतो आणि त्यांना हे करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत असताना दुःखाने त्यांना स्वतःचा नाश करताना पाहतो. शिष्यांना या प्रेमाची चमक समजून घेण्यास आमंत्रित केले गेले होते, परंतु त्यांना क्रूस नव्हता पाहिजे आणि, जसे की इस्रायली लोकांनी मोशेला त्याच्या चेहऱ्याचे तेज झाकण्यास सांगितले होते, त्याचप्रमाणे शिष्यांनी त्यांच्या अंतःकरणावर पडदा टाकला होता जेणेकरून सत्याने त्यांच्याजवळ येऊन त्यांच्या हृदयाला पुन्हा माणसांसारखे करू नये.

जेव्हा काइन आणि हाबेलने कोकऱ्याचा मृत्यू पाहिला तेव्हा काईनने दुःखाचा अर्थ अस्पष्ट करण्यासाठी स्वतःच्या हृदयावर पडदा टाकला आणि अशा प्रकारे कोकरू त्याचे हृदय कठोर करण्यासाठी एक उत्प्रेरक बनला ज्याने त्याला आपल्या भावाचा खून करण्यास तयार केले. हाबेलने कोकरू पाहिला तेव्हा तो थरथर कापला आणि त्याने त्याच्या परिणामांचा विचार केला. त्याने आपल्यासाठी मारण्यात आलेल्या देवाच्या कोकऱ्याचा विचार केला आणि तो दुःखी हृदयाने रडला. त्याच बलिदानाच्या कोकऱ्याने दोन पुरुषांमध्ये पूर्णपणे विरुद्ध परिणाम दिले.

असा हा वधस्तंभाचा प्रकाश आहे. प्रकाश इतका तेजस्वी आहे की आपण एकतर खडकावर पडून तुटून जाऊ किंवा त्याचा प्रतिकार करून खडकासारखे कठोर बनले जाऊ आणि परिणामी जेव्हा आपल्याला शेवटी देवाच्या प्रेमाच्या सत्याचा सामना करावा लागतो तेव्हा आपल्या स्वतःच्या अपराधानेच नाशवंत होऊ.'

पवित्र शास्त्रामधील वचने योग्यरित्या समजून घेण्यासाठी ही तत्त्वे महत्त्वपूर्ण आहेत. जोपर्यंत आपण पित्याचे त्याच्या पुत्रावरील कोमल प्रेम स्वीकारत नाही तोपर्यंत देवाच्या निर्णयांचा अर्थ लावण्यासाठी आपली अंतःकरणे खरोखर तयार होऊ शकत नाहीत. एक प्रेमळ बाप आपल्या मुलांना जिवंत जाळत नाही, ते मृत्यूच्या वेदनांनी ओरडत असताना वितळलेले गंधक त्यांच्यावर ओतत नाही. देव असे करू शकतो यावर विश्वास ठेवणे म्हणजे पिता आणि त्याचा पुत्र यांच्यातील नाते आणि त्यांच्याकडून या विश्वावर होणारी कृपा समजून न घेणे होय. वधस्तंभ समजून न घेतल्याने माणसे तिरस्कार, आणि नाकारल्या गेलेल्या वेदनांना विसरतात; तरीही येशू त्याला नाकारणाऱ्यांचा त्याग करत नाही. पापी लोक त्याच्याकडे वळतील या आशेने तो स्वतःचे अंतःकरण शेवटपर्यंत उघडे ठेवतो. जर

अगदी शेवटी त्यांनी त्याला नाकारले आणि त्याच्यापासून पूर्णपणे दूर गेले तर त्या प्रत्येकासाठी त्याला खूप वेदना होतात.  ही एक वेदना आहे जी आपण पापी म्हणून दुःख, क्रोध आणि तिरस्काराने घेतो. आम्ही कधीही कोणाला आमच्याशी असे वारंवार करू देणार नाही. नकारासाठी त्याचे अंतःकरण उघडे सोडणे हा पित्याचा खरा वधस्तंभ त्याच्या पुत्रामध्ये प्रकट होतो.

वधस्तंभाचे सामर्थ्य आणि रहस्य देवाच्या निर्णयांसंबंधी इतर सर्व रहस्ये स्पष्ट करतात. पवित्र शास्त्रात जिथे जिथे आपण मनुष्यांवर न्यायनिवाडा पाहतो तिथे आपण त्यांचा वधस्तंभाच्या अर्थ लावला पाहिजे कारण हीच जागा आहे जिथे दया आणि न्याय एकमेकांना बिलगून घेतात. पवित्र शास्त्र आम्हाला सांगते:

> आपल्याबद्दल ख्रिस्त शाप झाला आणि त्याने आपल्याला नियमशास्त्राच्या शापापासून खंडणी भरून सोडवले; "जो कोणी झाडावर टांगलेला आहे तो शापित आहे" असा शास्त्रलेख आहे; गलतीकरांस 3:13

> खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले. यशया 53:5

येशूने सर्व वेतन दिले आहे आणि पापाचा शाप देखील सहन केला आहे. ज्यांनी शेवटी तारण नाकारले आणि मरणे पसंत केले असल्याचं मृत्यूने तो मरण पावला. जर येशूचा मृत्यू वेळेच्या शेवटी होणाऱ्या मृत्यूपेक्षा वेगळा असला तर त्याने पापाची मजुरी दिली नाही. मग प्रश्न असा आहे की, येशूने नरकाची अग्नी सहन केली होती का? जर दुष्टांचा अंतिम मृत्यू झाला व  ते नरकाच्या ज्वालामध्ये गेले आणि येशूने त्यांची किंमत दिली नाही, तर त्याने पापाचा दंड भरलाच नाही. मग येशूला वधस्तंभावर अग्नीचा अनुभव आला का? पौल पहा कश्याप्रकारे जे पात्र नाहीत त्यांचे चांगले करणे आणि आत्म्याला लागणारे अग्नीचे निखारे यांचा संबंध जोडतो.

> उलटपक्षी, "तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील." रोमकरांस 12:20

जेव्हा इस्राएल लोकांनी सिनाई पर्वतावर देवाचे तेज पाहिले तेव्हा ते त्यांना भस्म करणाऱ्या अग्नीसारखे दिसले.

> पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते. निर्गम 24:17

जेव्हा स्वार्थी व्यक्तीवर देवाचे निस्वार्थ प्रेम प्रकट होते, तेव्हा त्यांच्या अंतःकरणात अपराधीपणाची भावना इतकी जळते की त्यामुळे त्याला शारीरिक वेदना होतात. वधस्तंभावरील येशूचा अनुभव अनेक स्तोत्रांमध्ये विदित केलेला आहे.

> माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास? माझा दुःखाचा आक्रोश ऐकून माझा बचाव करण्यास तू जवळ नाहीस. स्तोत्रसंहिता 22:1

> मौन धरून मी गप्प राहिलो, बरेदेखील काही बोललो नाही, तरी माझ्या दु:खाने उचल खाल्ली. माझे हृदय आतल्या आत संतप्त झाले; मला ध्यास लागला असता माझ्यामध्ये अग्नी भडकला, तेव्हा मी आपल्या जिभेने बोललो; स्तोत्रसंहिता 39:2-3

> मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले. मी आपल्या संकटात परमेश्वराचा धावा केला, माझ्या देवाला मी हाक मारली; त्याने आपल्या मंदिरातून माझी वाणी ऐकली, माझी हाक त्याच्या कानी गेली. तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली, पर्वताचे पाये डळमळले, त्यांना झोके बसले, कारण तो संतप्त झाला होता. त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघत होता, त्याच्या मुखातून ग्रासणारा अग्नी निघत होता, त्यामुळे निखारे धगधगत होते. स्तोत्रसंहिता 18:4-8

पापाचे वेतन हे मरण आहे. मृत्यू अपराधीपणाच्या भावनेमुळे होते जे पापीं लोकांना जाणवते कि ते किती वाईट आहेत. जेव्हा देवाचे चारित्र्य अशी तुलना करून प्रकट केले जाते तेव्हाच वाईटचा पर्दाफाश होतो. जेव्हा देवाचे चरित्र प्रकट होते तेव्हा ते दुष्टांना भस्म करणाऱ्या अग्नीसारखे वाटते. याचे कारण असे की, जेव्हा पापी लोक देवाची पवित्रता, निःस्वार्थीपणा आणि कृपेला त्यांच्या स्वार्थी आणि दुष्ट स्वभावाच्या तुलनेत पाहतात, तेव्हा त्यांच्या अंतःकरणातील अपराधीपणा त्यांना ज्वलंत अग्नीप्रमाणे भासतो. ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याच्या वेळी दुष्टांचा ख्रिस्ताच्या आगमनाच्या तेजाने नाश होईल.

> मग तो अनीतिमान पुरुष प्रकट होईल, त्याला प्रभू येशू 'आपल्या मुखातील श्वासाने मारून टाकील', आणि तो येताच आपल्या दर्शनाने त्याला नष्ट करील. 2 थेस्सलनीकाकरांस 2:8

ख्रिस्त हा पित्याच्या गौरवाचे तेज आहे, इब्री 1:3 आणि पित्याचे वैभव हे त्याचे चरित्र आहे. निर्गम 33:18; 34:6,7. ख्रिस्ताच्या चारित्र्याचे प्रेम आणि सौंदर्य त्याच्या येण्याच्या वेळी पूर्णपणे प्रकट होईल आणि हे प्रकटीकरण एक अग्नी असेल जो नीतिमानांसाठी आनंद आणि दुष्टांसाठी मृत्यू असेल.

> तोही 'देवाच्या क्रोधाच्या प्याल्यात निरा घातलेला' त्याचा क्रोधरूपी द्राक्षारस पिईल, आणि पवित्र देवदूतांसमक्ष व कोकऱ्यासमक्ष त्याला 'अग्नी व गंधक' ह्यांपासून पीडा होईल. प्रगटीकरण 14:10

"गंधक" हा शब्द "थिओन" आहे, जो "थीओस" वरून आला आहे, ज्याचा अर्थ देव आणि दैवी धूप देखील आहे. याचा अर्थ फ्लॅशिंग असाही होतो. जेव्हा आपण स्वर्गात वर्णन केलेल्या पवित्र ठिकाणात धूप पाहतो तेव्हा आपल्याला अग्नीचा संबंध लक्षात येतो.

> मग आणखी एक देवदूत येऊन 'वेदीपुढे उभा राहिला' त्याच्याजवळ सोन्याचे धुपाटणे होते; आणि राजासनासमोरच्या सोन्याच्या वेदीवर सर्व पवित्र जनांच्या 'प्रार्थनांसह धूप' ठेवण्याकरता त्याच्याजवळ पुष्कळ 'धूप' दिला होता. देवदूताच्या हातातून 'धूपाचा' धूर पवित्र जनांच्या 'प्रार्थनांसह' देवासमोर वर चढला. तेव्हा देवदूताने 'धुपाटणे' घेऊन त्यात 'वेदीवरचा अग्नी भरून' पृथ्वीवर टाकला आणि 'मेघांचा गडगडाट व गर्जना' झाल्या, 'विजा' चमकल्या व भूमिकंप झाला. प्रगटीकरण 8:3-5

धूप ही अग्नीसारखी देवाची दैवी उपस्थिती दर्शवते. गंधकाचा अर्थ हि असाच आहे. यशयामध्ये आपण हे पुन्हा पाहतो:

> पाहा, परमेश्वराचे नाम दुरून येत आहे, त्याचा क्रोध भडकला आहे, धुराचा लोट चढत आहे; त्याचे ओठ क्रोधाने स्फुरत आहेत, त्याची जिव्हा भस्म करणाऱ्या अग्नीसारखी आहे; त्याचा श्वास दुथडी भरून वाहणाऱ्या व गळ्यापर्यंत पोहचणाऱ्या प्रवाहासारखा आहे, तो राष्ट्रांना नाशरूप चाळणीने चाळतो; भ्रांतिमूलक लगाम लोकांच्या जाभाडात आला आहे. तेव्हा परमेश्वर आपला प्रतापी शब्द कानी पाडील, आणि आपल्या क्रोधाचे फुरफुरणे, भस्म करणाऱ्या अग्नीची ज्वाला, मेघांचा गडगडाट आणि पर्जन्य व गारा ह्यांची वृष्टी ह्यांनी आपले भुजबल दाखवील. कारण पूर्वीच तोफेत (दहनस्थान) तयार केले आहे; ते राजासाठी सिद्ध केले आहे; ते खोल व रुंद केले आहे; त्याच्या चितेसाठी विस्तव व भरपूर लाकडे आहेत; गंधकाच्या धारेसारखा परमेश्वराचा फुंकर ती पेटवतो. यशया 30:27-28,30,33

> ह्यामुळे परमेश्वर, सेनाधीश देव म्हणतो, "तुम्ही असे बोलता म्हणून पाहा, मी आपले शब्द तुझ्या मुखात अग्नी असे आणि हे लोक सरपण असे करीन आणि तो त्यांना खाऊन टाकील. यिर्मया 5:14

> ..कारण प्रेम मृत्यूसारखे प्रबळ आहे; प्रेमसंशय अधोलोकासारखा निष्ठुर आहे; त्याची ज्वाला अग्निज्वालेसारखी, किंबहुना परमेशाने प्रदीप्त केलेला तो अग्नीच आहे. गीतरत्न 8:6

देवाचे प्रेम अग्नी आहे आणि धार्मिक लोकांसाठी ते प्रेम हृदयात जळणे सुंदर गोष्ट आहे. पेन्टेकॉस्टच्या दिवशी शिष्यांनी हेच अनुभवले.

> तेव्हा अकस्मात मोठ्या वाऱ्याचा सुसाट्यासारखा आकाशातून नाद झाला व ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले. आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकेक अशा बसल्या. प्रेषितांची कृत्ये 2:2-3

पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्टपणे सांगते की असे लोक असतील जे देवाच्या चरित्राच्या या अग्नीत जगू शकतील; अनीतिमान जे देवाच्या प्रेमाच्या या अग्नीत कायमचे जळतील, कारण देव भस्म करणारा अग्नी आहे. इब्री लोकांस 12:29. दुष्ट लोक त्यांच्या पापांच्या अपराधाने चिरडले जात असताना, जे ख्रिस्ताच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवतात त्यांची हृदये प्रेम आणि कृतज्ञतेने जळत असतात.

> सीयोनेतील पातकी घाबरले आहेत. अधर्म्यांना कापरे भरले आहे. “भस्म करणाऱ्या अग्नीसमीप आमच्यातला कोण राहील? सर्वकाळ पेटत राहणाऱ्या अग्नीसमीप आमच्यातला कोण टिकेल?” जो धर्माने चालतो, सरळ भाषण करतो, जुलूम करून होणारा लाभ अव्हेरतो, लाच घेण्यापासून आपला हात आवरतो, घातपाताच्या मनसुब्याला आपले कान बंद करतो, दुष्कर्माला आपले डोळे मिटतो. यशया 33:14-15

आणि काळाच्या शेवटी पाप्याला त्याची मजुरी मिळेल, आणि हि मजुरी कोण देतो?

> कारण पापाचे वेतन मरण आहे, रोमकरांस 6:23

पाप मजुरी देते. हे अपराधीपणाचे लादलेले वजन आहे आणि हे माहित असण्याची जाणीव आहे की पापी त्यांच्या सर्व जीवनात ख्रिस्ताच्या विनंतीला नकार देत होता, तो दररोज ख्रिस्ताला त्याच्या कठोर शब्दांनी आणि इतरांबद्दलच्या वाईट वृत्तीने दुःख देत होता. जेव्हा पाप्याला हे कळते की त्याने आपल्या जीवनाद्वारे ख्रिस्ताला किती छळले आहे, तेव्हा त्याची स्वतःची न्यायाची भावना मृत्यूची मागणी करेल. काईन प्रमाणे पापी लोक ओरडतील, "माझा अपराध क्षमा करण्यापेक्षा मोठा आहे."

हा संपूर्ण अनुभव ख्रिस्ताने वधस्तंभावर नेला होता. त्याने नरकाची अग्नी सहन केली होती. त्याला आपल्यासाठी पापी केले गेले आणि त्याने वधस्तंभावर जे अनुभवले तेच दुष्ट लोक शेवटी अनुभवतील.

> त्यांनी ‘पृथ्वीच्या विस्तारावर’ फिरून पवित्र जनांची छावणी व ‘प्रिय’ नगर वेढले; ‘तेव्हा [देवापासून] स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने’ त्यांना ‘खाऊन टाकले.’ त्यांना ठकवणाऱ्या सैतानाला ‘अग्नीच्या’ व ‘गंधकाच्या’ सरोवरात टाकण्यात आले; त्यात ते श्वापद व खोटा संदेष्टा आहे; तेथे त्यांना रात्रंदिवस युगानुयुग पीडा भोगावी लागेल. प्रगटीकरण 20:9-10

सैतान कसा मरेल हे पवित्र शास्त्र आम्हाला पुन्हा सांगते:

> खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. यहेज्केल 28:18

हा मजकूर हे कसे घडते याला स्पष्ट क्रम देतो:

1. सैतानाने त्याच्या पापांच्या पुष्कळतेने स्वतःला अशुद्ध केले आणि ती पापे इतरांना पासून हि करविली.
2. पुढील शब्द "म्हणून" आपल्याला परिणाम देतो.
3. मी तुझ्यामधून एक अग्नी आणीन - अपराधाची अग्नी. देव हे कसे पुढे आणतो? नियमशास्त्रात लिहिल्याप्रमाणे त्याच्या प्रेमाच्या चारित्र्याचा प्रकटीकरणाद्वारे.
4. "आणि ती तुला खाऊन टाकील". ही सैतानाच्या आतून येणारी अग्नी आहे जी त्याच्या अपराधातून जन्माला आली आणि जी त्याला खाऊन टाकेल.
5. आणि मग सैतानाला खाऊन टाकल्यानंतर त्याला जमिनीवर राख करून टाकले जाते

सैतान आपल्या सर्व वाईट गोष्टी आणि देवाच्या उपस्थितीत त्याने केलेले सर्व वाईट कार्ये टाळू शकत नाही. देवाची प्रेमळ शुद्धता आणि पवित्रता इतकी नि:स्वार्थी आहे की ती पूर्ण आणि पूर्णपणे आत्म-निंदा आणते जी जळत्या अग्नीप्रमाणे हृदयातून बाहेर येते. ही प्रक्रिया सैतानाला खाऊन टाकते. त्याला खाऊन टाकल्यानंतर आणि तो मेल्यानंतर शुद्धीकरणाच्या अग्नीद्वारे त्याला जमिनीवर राख केले जाते.

दुष्टांचा नाश 2 रा एस्ड्रासच्या ऐतिहासिक पुस्तकात खालील प्रकारे वर्णन केला आहे:

> आणि हा माझा पुत्र राष्ट्रांच्या दुष्ट अविष्कारांना फटकारेल, जे त्यांच्या दुष्ट जीवनासाठी वादळात पडले आहेत. आणि त्यांचे वाईट विचार त्यांच्यासमोर ठेवतील आणि त्यांना ज्या यातना होऊ लागतील त्या ज्वालासारख्या आहेत; आणि माझ्यासारख्या नियमानुसार तो त्यांना कष्ट न करता त्यांचा नाश करील. 2 एज्रा 13:37-38

दुष्टांना अशा यातना देणारा कायदा हा खरोखरच एक अग्निमय कायदा आहे तरीही तो प्रेमाने दिला गेला. आपला तारणारा जगाचा निषेध करण्यासाठी आला नाही तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून आला आहे. कायदा हा प्रेमाचा नियम आहे परंतु दुष्टांना त्याचा निषेध वाटतो कारण तो देवाच्या चरित्राचे प्रतिबिंब आहे.

> तो म्हणाला, "परमेश्वर सीनायहून आला, सेईरावरून आमच्यावर1 उदय पावला; पारान पर्वतावरून तो प्रकटला, लक्षावधी पवित्रांच्या मधून तो आला, त्याच्या उजव्या हातापासून अग्निज्वाला निघाली. तो आपल्या लोकांवर2 प्रीती करतो; त्याचे सर्व पवित्र जन तुझ्या हाती आहेत; ते तुझ्या पायाशी बसले आहेत; त्यांनी तुझी वचने ग्रहण केली आहेत. अनुवाद 33:2-3

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की दुष्टांची राख होईल या वस्तुस्थितीबद्दल काय?

> तुम्ही दुष्टांना तुडवाल; कारण मी हे करीन त्या दिवशी ते तुमच्या पायांच्या तळव्यांखाली राखेप्रमाणे होतील, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. मलाखी 4:3

जेव्हा पापाने दुष्टांना अपराधीपणाने पूर्ण शिक्षा दिली, आणि जेव्हा त्यांना देवाच्या चारित्र्याची शुद्धता दिसेल, तेव्हा त्यांचे मृतदेह पृथ्वीवर पडतील. तेव्हाच दुष्टांच्या शरीराची राख होईल.

> त्या दिवसामुळे आकाश जळून लयास जाईल आणि सृष्टितत्त्वे तप्त होऊन वितळतील. 2 पेत्र 3:12

दुष्टांच्या अंतिम मृत्यूचे वर्णन करणारे अनेक जण आजारी कुत्र्याला मारून टाकण्यासारखे वर्णन करतात ज्या कुत्र्यामुळे इतरांचे जीवन धोक्यात येते; म्हणून, अश्या आजारी प्राण्याला मारलेच पाहिजे. या सादृश्याचा मुद्दा असा आहे की कुत्र्याचा मालक त्याच्याजवळ मंद जळणारी आग लावतो जी कुत्रा जिवंत असताना अनेक दिवस त्याचा छळ करेल, ज्यामुळे मरण्यापूर्वी तो किंचाळतो आणि वेदनेने ओरडतो. ही कल्पना कठोर हृदयातून येते. आपला स्वर्गातील पिता असे कधीच करणार नाही. एकदा तुम्हाला देवाचे प्रेम कळले की, त्याच्या कोट्यवधी मुलांचा होणारा छळ आणि वैयक्तिक कत्तलीचा आरोप त्याच्यावर करणे शक्य नाही. ही कल्पना जवळजवळ सर्वत्र स्वीकारली जाते आणि ख्रिस्ती समाजामध्ये शिकवली जाते याचे कारण म्हणजे वधस्तंभाची वास्तविकता हृदयात प्रवेश करण्यास नकार देणे होय. देवाच्या संवेदनशील आणि कोमल स्वभावाच्या सत्यासाठी अंतःकरण कठोर होते आणि शिष्यांप्रमाणेच देवाने अग्नी पाठवण्याची आणि शारीरिकरित्या लोकांना जिवंत जाळण्याची कल्पना प्रवेश करते.

आपण शिष्यांकडून धडा शिकू या आणि पित्याची आज्ञा लक्षात घेऊया जेव्हा त्याच्या पुत्राचे रूपांतर होत होते - "त्याचे ऐका!" आपण त्याच्या विनवणीचा आवाज

ऐकूया कारण तो आपल्यामध्ये एका लहान मुलाला बसवतो आणि त्या मुलाला आपल्या छातीशी धरून आम्हाला सांगतो "तुमचा पालट होऊन तुम्ही बालकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही" जेव्हा इस्राएली लोकांना सुवार्था कळाली तेव्हा त्यांनी मोशेला त्याच्या चेहऱ्यावर पडदा टाकण्याची विनवणी केली त्याप्रमाणे आपण आपली अंतःकरणे कठोर करू नयेत.

> त्यामुळे त्या पिढीवर संतापून मी म्हणालो, 'हे सतत भ्रमिष्ट अंतःकरणाचे लोक आहेत, ह्यांनी माझे मार्ग जाणले नाहीत.''' म्हणून मी रागाने शपथ वाहून म्हणालो, 'हे माझ्या विसाव्यात निश्चित येणार नाहीत.' शेवटपर्यंत विश्वासाची आवश्यकता बंधुजनहो, जिवंत देवाला सोडून देण्याइतके अविश्वासाचे दुष्ट मन तुमच्यातील कोणाचेही असू नये म्हणून जपा. जोपर्यंत "आज" म्हटलेला वेळ आहे तोपर्यंत तुम्ही एकमेकांना प्रतिदिवशी बोध करा; हेतू हा की, पापाच्या फसवणुकीने तुमच्यातील कोणी 'कठीण होऊ' नये. कारण जर आपण आपला आरंभीचा भरवसा शेवटपर्यंत दृढ धरला तरच आपण ख्रिस्ताचे भागीदार झालो आहोत. शास्त्रात असे म्हटले आहे, "आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर इस्राएल लोकांनी चीड आणली होती तशी तुम्ही आपली मने कठीण करू नका.
> इब्रीलोकांस 3:10-15

जर आपण वधस्तंभाचा निस्वार्थपणा स्वीकारण्यास नकार दिला तर तुमचे हृदय कठोर होण्याचा धोका आहे. यामुळे तुम्ही दया न करता बायबल वाचू शकता आणि इतिहासात लाखो लोकांच्या वेदना आणि मृत्यूसाठी देवाला दोष देऊ शकता. आज जर तुम्ही त्याचा आवाज ऐकाल तर तुमचे हृदय कठोर करू नका.

## 8. पाप्यांना दगड मारण्याची आज्ञा का?

आत्म-नकार करणा-या वधस्तंभाविषयी शिष्यांनी केलेल्या प्रतिकारामुळे त्यांचा अनादर करणाऱ्या शोमरोनी लोकांना मारण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली. हाच प्रतिकार, यहुदी नेत्यांच्या हृदयात राहिल्याने त्यांना येशूला मारण्याची इच्छा निर्माण झाली. यहुद्यांनी ख्रिस्ताला त्याच्या बोलण्यात आणि कृतीत पकडण्यासाठी भरपूर प्रयन्त केले जेणेकरून ते त्याला खोटे ठरवतील आणि त्याला ठार मारतील. येशूसाठी ठेवलेल्या अनेक डावपेचांपैकी एकाचे वर्णन योहानाच्या शुभवर्तमानात केले आहे:

> नंतर पहाटेस तो पुन्हा मंदिरात आला तेव्हा सर्व लोक त्याच्याकडे आले आणि तो बसून त्यांना शिकवू लागला. त्या वेळी व्यभिचार करत असताना धरलेल्या एका स्त्रीला शास्त्री व परूशी ह्यांनी त्याच्याकडे आणले व तिला मध्ये उभे करून ते त्याला म्हणाले, “गुरूजी, ही स्त्री व्यभिचार करत असताना धरण्यात आली. मोशेने नियमशास्त्रात आम्हांला अशी आज्ञा दिली आहे की, अशांना दगडमार करावा; तर आपण हिच्याविषयी काय म्हणता?” योहान 8:2-5

परुषी आणि शास्त्र्यांना हा उत्तम असा डावपेच वाटला. जर येशूने त्या स्त्रीला मृत्यूपासून वाचवण्याचा प्रयत्न केला तर ते मोशेच्या नियमाचे उल्लंघन केल्याचा आरोप त्याच्यावर करू शकतात. जर त्याने तिला मृत्यूदंड दिला तर ते रोमन गव्हर्नरसमोर त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप लावू शकतात. येशूने आधीच सांगितले होते की तो संदेष्ट्यांचा नियम नष्ट करण्यासाठी आणि कायद्याचा एकही भाग बदलायला आलेला नाही. मोशेने नियमशास्त्रात लिहिले कि:

> जो दुसऱ्याच्या बायकोशी व्यभिचार करतो, म्हणजे आपल्या शेजाऱ्याच्या बायकोशी व्यभिचार करतो त्या जाराला व त्या जारिणीला अवश्य जिवे मारावे. लेवीय 20:10

> तर त्या दोघांनाही त्या गावाच्या वेशीकडे आणून मरेपर्यंत दगडमार करावा म तिने गावात असून आरडाओरड केली नाही म्हणून तिला आणि त्याने आपल्या शेजाऱ्याची स्त्री भ्रष्ट केली म्हणून त्याला; ह्या प्रकारे तू आपल्यामधून ह्या दुष्टाईचे निर्मूलन करावे. अनुवाद 22:24

ही महिला व्यभिचारात अडकली होती. कायद्यानुसार ती दगडाने ठेचून ठार मारण्यास पात्र होती. त्या स्त्रीला आता कायदा देणाऱ्याच्या पायाजवळ फेकण्यात आले होते की त्याने तिची शिक्षा द्यावी. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की देवाचा पुत्रानेच सीनाय पर्वतावर मोशेला कायदा दिला होता.

> तर मग नियमशास्त्र कशासाठी? ज्या संतानाला वचन दिले ते येईपर्यंत नियमशास्त्र हे उल्लंघनांमुळे लावून देण्यात आले; ते मध्यस्थाच्या हस्ते देवदूतांच्या द्वारे नेमून देण्यात आले. गलतीकरांस पत्र 3:19

> कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. 1 तीमथ्य 2:5

येशू, देवाचा शब्द म्हणून, "तू व्यभिचार करू नकोस" हे वचन बोलणारा होता. आता जी स्त्री त्याच्या पायाजवळ होती, तिच्यावर आरोप लावणारे वाट पाहत होते कि येशू तिचा कसा न्याय करतो. त्यांच्याकडे उघडपणे दुर्लक्ष करून, येशू खाली वाकून लिहू लागला. मग तो त्यांना म्हणाला:

> "तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा." योहान 8:7

हे विधान अतिशय मनोरंजक आहे आणि परुष्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीला पूर्णपणे आव्हान देते. ह्या गोष्टीचा त्यांनी विचारच केला नसेल. तरीही येशू फक्त मोशेला दिलेले तेच तत्त्व व्यक्त करत होता ज्यात एका मनुष्याने देवाची निंदा केली होती.

> जो कोणी परमेश्वराच्या नावाची निंदा करील त्याला अवश्य जिवे मारावे; सर्व मंडळीने त्याला अवश्य दगडमार करावा; तो परदेशीय असो किंवा स्वदेशीय असो, त्याने परमेश्वराच्या नावाची निंदा केली तर त्याला जिवे मारावे. जर कोणी एखाद्याला ठार मारले तर त्याला अवश्य जिवे मारावे. लेवीय 24:16-17

> "इस्राएलाच्या सर्व मंडळीस सांग की, तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे. लेवीय 19:2

इथे काय चालले आहे? देवाची निंदा करणाऱ्याला दगडमार करून जिवे मारावे, पण जो दुसऱ्या माणसाला मारेल त्याला अवश्य जिवे मारावे. एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला दगड मारून मारले तर तो दुसऱ्या माणसाचा खून करत नाही का? मग तो देखील मृत्युदंडाच्या शिक्षेला पात्र ठरणार नाही का? हे सर्व येशू जे बोलत होता त्या विचाराशी जोडले जाऊ शकते की केवळ पवित्र आणि पाप नसलेल्या व्यक्तीकडेच दुसऱ्याला मृत्यूदंड देण्याचे प्रमाण आहे. येशू हा एकमेव व्यक्ती आहे जो पापरहित आहे आणि म्हणून त्याने काय केले?

जेव्हा येशूने मंदिराच्या मजल्यावरील मातीत लिहिले तेव्हा तो नियमशास्त्रात जे लिहिले होते त्याचा खरा आध्यात्मिक नमुना देत होता. जर एखाद्या पुरुषाला आपल्या पत्नीवर व्यभिचाराचा संशय आला, तर तो तिला मत्सराच्या कायद्याचे पालन करण्यासाठी याजकाकडे आणू शकतो.

> मग याजकाने त्या स्त्रीला पुढे नेऊन परमेश्वरासमोर उभे करावे; आणि याजकाने मातीच्या पात्रात पवित्र जल घ्यावे आणि निवासमंडपाच्या जमिनीवरची थोडीशी धूळ घेऊन त्यात टाकावी; मग याजकाने त्या स्त्रीला परमेश्वरासमोर उभे करून तिच्या डोक्याचे केस सोडावेत आणि परप्रेमशंकेचे स्मरण करून देणारे अन्नार्पण तिच्या हातांवर ठेवावे आणि शापजनक कटू जल याजकाने आपल्या हाती घ्यावे; तेव्हा याजकाने त्या स्त्रीला शपथ घालून म्हणावे, कोणा पुरुषाने तुझ्याशी कुकर्म केलेले नसले आणि तू आपल्या पतीला सोडून दुसऱ्याकडे जाऊन भ्रष्ट झालेली नसलीस, तर तू ह्या शापजनक कटू जलाच्या परिणामापासून मुक्त राहा; पण तू आपल्या पतीला सोडून दुसऱ्याकडे जाऊन भ्रष्ट झालेली असलीस आणि तुझ्या पतीऐवजी परपुरुषाने तुझ्याशी संबंध केलेला असेल तर (याजकाने शापजनक शपथ घ्यायला लावावी आणि म्हणावे) ‘परमेश्वर तुझी मांडी सडवील व तुझे पोट फुगवील तेव्हा परमेश्वर तुला लोकांच्या शापाला व तिरस्काराला पात्र करो; म्हणजे तुझे पोट फुगवण्यासाठी व तुझी मांडी सडवण्यासाठी हे शापजनक जल तुझ्या आतड्यांत शिरेल.’ ह्यावर त्या स्त्रीने ‘आमेन, आमेन’ असे म्हणावे. मग याजकाने हे शापशब्द पुस्तकात लिहून ते त्या कटू जलात धुवावेत; गणना 5:16-23

या महिलेला व्यभिचार करताना पकडलेल्या या पुरुषांनी तिला फूस लावून तिचा गैरफायदा घेतला होता. येशूने जमिनीच्या धूळात लिहिल्याप्रमाणे, पवित्र आत्म्याने (पाण्याचे प्रतीक) त्या पुरुषांना खात्री दिली ज्यामुळे त्यांचे पोट फुगले आणि त्यांच्या मांड्या पापाच्या खात्रीमुळे सडल्या. त्यांना ख्रिस्ताचा हेवा वाटत होता आणि हि गोष्ट त्यांना आतून खात होती. स्तोत्रकर्त्याने म्हटल्याप्रमाणे:

> मी गप्प राहिलो होतो, तेव्हा सतत कण्हण्यामुळे माझी हाडे जीर्ण झाली; स्तोत्रसंहिता 32:3

त्यांच्या पापांची कबुली देण्याऐवजी आणि क्षमा पावण्याऐवजी, ही माणसे शांतपणे त्यांचे अपराध घेऊन निघून गेली ज्यामुळे त्यांची हाडे जीर्ण झाली.

> नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, “बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरवला नाही काय?” ती म्हणाली, “प्रभूजी, कोणी नाही.” तेव्हा येशू तिला म्हणाला, “मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस. योहान 8:10-11

> पण ती स्त्री भ्रष्ट झालेली नसून शुद्ध असली तर ती मुक्त होईल व गर्भधारणेस पात्र होईल. गणना 5:28

येशूने या स्त्रीला तिच्या पापाची क्षमा केली; त्याने वधस्तंभावर प्यायलेल्या कडू पाण्याने तिच्या पापाचे लिखाण पुसून टाकले आणि त्यामुळे ती यापुढे अपवित्र झाली नाही. ती मुक्त होऊ शकली आणि खरे बीज तिच्यात रुजले; आणि तिने तिच्या हृदयात येशूचा आत्मा प्रकट केला.

जेव्हा येशूने परुश्यांना सांगितले, “तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा.” तेव्हा त्याने तिच्यावर मृत्यूची शिक्षा सुनावली. त्याने तिच्यावरील आरोप खोडून काढण्याचा प्रयत्न केला नाही. त्याने आरोप केला आणि त्या महिलेला आपण मरणार आहोत याची खात्री वाटली असेल. जमिनीवर लिहून येशूने परुश्यांना आठवण करून दिली की ते निष्पाप नाहीत आणि ते निघून गेले. जेव्हा त्या महिलेचे सर्व आरोपी निघून गेले तेव्हा कायदा देणाऱ्याने तिला विचारले की तुझ्यावर आरोप लावणारे कुठे आहेत. तिने सूचित केले की ते निघून गेले आहेत आणि म्हणून तिचा खटला पूर्णपणे कायदा देणाऱ्याच्या हातात होता. तो म्हणाला, “मीही तुला दोषी ठरवत नाही,” जा आणि यापुढे पाप करू नकोस. कायदा देणाऱ्याने आम्हाला दाखवले की तो नेहमी दया दाखवण्यासाठी कायद्याचा कसा वापर करतो. जर त्याने त्या स्त्रीची निर्दोषपणे मुक्तता केली असती तर तिला दयेची गरज भासली नसती, म्हणून त्याने दया करण्यासाठी शिक्षा सुनावली. कायद्याचा संपूर्ण उद्देश हाच आहे. आम्हाला विश्वासाने नीतिमान ठरता यावे म्हणून कायद्याचा हेतू आम्हाला ख्रिस्ताकडे आणण्याचा आहे. गलतीकरांस पत्र 3:24.

या स्त्रीला दगडाने ठेचून ठार मारले जावे ही देवाची इच्छा आहे असा यहुदी नेत्यांचा खरोखर विश्वास होता हे विचार करणे किती दुःखद आहे. आणि आम्ही या समस्येच्या वास्तविकतेवर प्रकाश टाकू इच्छित नाही. जर रोमन साम्राज्य नियंत्रणात नसते आणि हे लोक त्यांच्या इच्छेनुसार कायदा लागू करण्यास मोकळे असते तर त्यांनी दगड उचलून या महिलेची हत्याच केली असती. हे प्रत्यक्षात स्टीफनच्या बाबतीत केले गेले.

> तेव्हा ते मोठ्याने ओरडून व कान बंद करून एकजुटीने त्याच्या अंगावर धावून गेले. मग ते त्याला शहराबाहेर घालवून दगडमार करू लागले; आणि साक्षीदारांनी आपली वस्त्रे शौल नावाच्या एका तरुणाच्या पायांजवळ ठेवली. ते दगडमार करत असता स्तेफन प्रभूचा धावा करत म्हणाला, "हे प्रभू येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार कर." प्रेषितांची कृत्ये 7:57-59

या लोकांचा अश्या देवावर विश्वास होता ज्याने पाप्यांना दगडमार करून त्यांना शिक्षा करण्याचा निर्धार केला आहे. ह्या गरीब तरुणीच्या डोक्याला मोठ्या दगडाने मारून ती भीतीने जमिनीवर पडलेली असल्याची कल्पना आपण करू शकतो का? जेव्हा हे संपेल तेव्हा जमिनीवर एक भगदाड पडलेले आणि रक्ताने माखलेले प्रेत हे सर्वांसाठी चेतावणी म्हणून ठेवलेले असते की देवाला क्षुल्लक केले जाऊ नये; जर तुम्ही पाप केले तर तुम्ही तुमच्या जीवनाने त्याचे मोल द्याल. असे चरित्र असलेला देवाबद्दल आपल्या मनात प्रेमाची भावना निर्माण होऊ शकते का? पापी लोकांना निरर्थक किड्यांप्रमाणे मारून टाकणाऱ्या अशा देवाच्या  सान्निध्यात राहण्याची आपली इच्छा होईल काय?

मग मोशेचा नियम लोकांना दगडमार करून ठार मारण्याची आज्ञा का देतो? कायदा देवाचे चरित्र प्रतिबिंबित करतो. जर देवाने या कायद्याची आज्ञा दिली असेल तर याचा अर्थ असा होत नाही का की तो आवश्यक असेल तेव्हा तो तेथे वापरला पाहिजे? येशूने व्यक्त केलेले एक अतिशय महत्त्वाचे तत्त्व आहे ज्याचा आपण येथे विचार केला पाहिजे.

> तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. मत्तय  7:1-2

आपल्या स्वर्गातील पित्याने अशी व्यवस्था स्थापन केली आहे जी लोकांना त्यांच्या स्वतःच्या निर्णयानुसार न्याय देईल. दगडफेक मुळात कोठून आली याचे परीक्षण करूया. बायबलमध्ये दगडफेकीचा हा पहिला उल्लेख आहे.

> मोशे म्हणाला, "असे करणे उचित नाही, कारण आम्ही जो यज्ञ आमचा देव परमेश्वर ह्याला करणार आहोत त्याची मिसरी लोकांना किळस येईल. मिसरी लोकांच्या दृष्टीने किळसवाणा यज्ञ आम्ही त्यांच्या डोळ्यांदेखत

केल्यास ते आम्हांला दगडमार करायचे नाहीत काय? निर्गम 8:26

दगडफेक ही मिसरी लोकांची प्रथा होती. अशाप्रकारेच मिसरी लोक त्यांच्या देवतांच्या विरुद्ध अपराधाला न्याय द्यायचे. इस्रायलला यज्ञ करण्यासाठी वाळवंटात जाण्याची इच्छा असण्याचे एक कारण म्हणजे ते ज्या प्राण्यांचा बळी देतील त्यांची मिसरी लोक देवता म्हणून पूजा करत होते. हे फार संभव आहे की फारोला हे चांगले ठाऊक होते की इस्राएल लोक जर देशात यज्ञ करतील तर ते मिसरी लोकांना दगडमार करण्यासाठी भडकवतील. हे स्पष्ट आहे की इस्राएल लोकांनी ही प्रथा स्वीकारली कारण त्यांना मोशेलाही असेच करायचे होते.

> मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, "ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत." निर्गम 17:4

जेव्हा कालेब आणि यहोशवाने लोकांना विनंती केली की ते वर जाऊन कनानचा देश घेऊ शकतात, तेव्हा लोकांकडून त्यांना दगडमार करण्याचा प्रतिसाद होता.

> परमेश्वर आमच्यावर प्रसन्न असला तर तो त्या दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशात आम्हांला नेईल आणि तो देश आम्हांला देईल. तुम्ही परमेश्वराविरुद्ध बंड मात्र करू नका; आणि त्या देशाच्या लोकांची भीती बाळगू नका, कारण ते आमचे भक्ष्य होतील; त्यांचा आधार तुटला आहे, पण आमच्याबरोबर परमेश्वर आहे; त्यांची भीती बाळगू नका." पण सर्व मंडळी म्हणू लागली की, "ह्यांना दगडमार करा." तेव्हा दर्शनमंडपात परमेश्वराचे तेज सर्व इस्राएल लोकांच्या दृष्टीस पडले. गणना 14:8-10

जर देवाने हस्तक्षेप केला नसता तर त्यांनी ते केलेच असते. मग देव दगडमार करण्याच्या या मिसरी प्रथेला इस्त्रायलच्या कायद्यात परवानगी का देईल?

> कारण त्यांनी माझे निर्णय पाळले नाहीत; माझे नियम टाकून दिले, माझे शब्बाथ भ्रष्ट केले, व त्यांचे डोळे त्यांच्या वडिलांच्या मूर्तींकडे लागले. तेव्हा जे चांगले नाहीत असे नियम मी त्यांना दिले, ज्यांनी ते जगायचे नाहीत असे निर्णय त्यांना दिले. यहेज्केल 20:24-25

दगडमार करण्याबाबतचे हे कायदे आणि निवाडे चांगले नव्हते आणि अपराध्यांना शिक्षा देण्यासाठी कायद्यात आणखी दंड जोडण्यात आला होता. दगडाने ठेचून मारले जाणे ही नक्कीच चांगली गोष्ट नाही! या शिक्षा त्यांच्या स्वत:च्या नियमांनुसार होते आणि त्यांच्या स्वतःच्या विचारसरणीचे आणि त्यांनी मिसर लोकांकडून शिकलेल्या मार्गांचे प्रतिबिंबित होते. येशूने स्पष्ट केल्याप्रमाणे:

तुम्ही एक कठोर गृहस्थ आहात, म्हणून मला तुमची भीती वाटली. जिथे तुम्ही ठेवले नाही, तिथे घेता आणि जे पेरलेले नाही, ते कापून नेता.' "यावर त्याचा धनी म्हणाला, 'अरे दुष्ट दासा! मी आता तुझ्या शब्दाप्रमाणेच तुझा न्याय करतो, तुला माहीत होते की मी कठोर स्वभावाचा आहे, जे माझे नाही ते बळकावितो आणि मी स्वतः पेरले नाही ते कापून नेतो, लूक 19:21-22

इस्राएल लोकांचा असा विश्वास होता की देव एक कठोर व्यक्ती आहे. जेव्हा त्यांनी त्याचे वैभव पाहिले तेव्हा ते त्यांच्यासाठी भस्म करणाऱ्या अग्नीसारखे होते.

पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते. निर्गम 24:17

लक्षात ठेवा की स्वतः इस्राएल लोकांनी अपराधाचा सामना करण्यासाठी दगडमार करण्याची प्रथा स्वीकारली होती. निर्गम 17:4 मध्ये जेव्हा इस्रायलने मोशेला दगड मारण्याचा निर्धार केला तेव्हा त्यांनी दया न करता न्यायाचा आत्मा प्रकट केला. पवित्र शास्त्र म्हणते कि:

कारण ज्याने दया केली नाही त्याचा न्याय दयेवाचून होईल; दया न्यायावर विजय मिळवते. याकोब 2:13

इस्राएल लोकांनी त्यांच्या न्यायनिवाड्यात कोणतीही दया दाखवली नसल्यामुळे, ही न्यायप्रक्रिया त्यांच्याकडे परत प्रतिबिंबित झाली. देवाने त्यांना वाळवंटात मारायचे आहे असे मानणे त्यांनी निवडले आणि त्यांना मोशेला दगडमार करून ठार मारायचे होते. इस्राएल लोकांनी हे बी पेरल्यामुळे त्यांनी स्वतःच कापणी केली म्हणून देवाची थट्टा केली जात नाही. देवाबद्दलच्या त्यांच्या स्वतःच्या समजुतीनुसार इस्रायली लोकांनी स्वतःच्या तोंडून वाळवंटात स्वतःला मृत्युदंडाची शिक्षा दिली.

इस्रायली लोकांनी वारंवार त्यांची भीती व्यक्त केली की देव त्यांना वाळवंटात मारेल:

ते मोशेला म्हणाले, "मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून? निर्गम 14:11

इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, "आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे." निर्गम 16:3

> सर्व इस्राएल लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले; सर्व मंडळी त्यांना म्हणाली, "आम्ही मिसर देशात मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानात मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा निःपात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हांला ह्या देशात का नेत आहे? आमच्या बायकामुलांची लूट होईल! आम्ही मिसर देशात परत जावे हेच बरे नव्हे काय?" गणना 14:2-3

म्हणून त्यांच्या स्वतःच्या निर्णयानुसार त्यांना न्याय मिळाला:

> परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला, "ही दुष्ट मंडळी कोठवर माझ्याविरुद्ध कुरकुर करीत राहणार? हे जे इस्राएल लोक माझ्याविरुद्ध कुरकुर करीत आहेत त्यांची कुरकुर माझ्या कानावर आली आहे; म्हणून तू त्यांना सांग, परमेश्वर म्हणतो : 'माझी शपथ, तुमचे म्हणणे माझ्या कानी आले आहे त्याप्रमाणेच मी तुमचे खरोखर करीन; तुमची प्रेते ह्या रानात पडतील, आणि तुमच्यापैकी ज्यांची गणना झाली त्यांच्या पूर्ण संख्येतील वीस वर्षे व त्यांहून अधिक वयाच्या ज्या लोकांनी माझ्याविरुद्ध कुरकुर केली आहे त्यांपैकी कोणीही... गणना 14:26-29

ख्रिस्ताच्या काळात आपण पाहतो की परुशी लोक त्यांच्या पूर्वजांना मिसरी लोकांकडून मिळालेल्या न्यायव्यवस्थेने भटकले गेले होते. हे इस्राएल लोक ज्या सततच्या भीतीखाली जगत होते आणि त्यातून निर्माण झालेल्या गुलामगिरीला प्रकट करते.

> योहानाचा बाप्तिस्मा स्वर्गापासून होता किंवा मनुष्यांपासून होता?" तेव्हा ते आपसांत विचार करून म्हणाले, "स्वर्गापासून असे म्हणावे तर हा म्हणेल की, 'तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही?' आणि मनुष्यांपासून असे म्हणावे तर सर्व लोक आपल्याला धोंडमार करतील, कारण योहान संदेष्टा होता अशी त्यांची खात्री आहे." तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "तो कोणापासून होता हे आम्हांला ठाऊक नाही." लूक 20:4-7

इस्राएल लोकांनी मिसर सोडले असले तरी त्यांच्या मनातील मिसराने त्यांना सोडले नव्हते हे उघड आहे. परुशी निंदा, क्रोध आणि सूड या जगात जगत होते, त्यांच्याकडे फारो, गुलाम मालकाचे सर्व गुणधर्म होते. हा आत्मा त्यांना देवाचे चरित्र कसे समजले याचे फळ होते. थोडक्यात, त्यांनी ज्या देवाची उपासना केली तो फारो सारखाच होता. इस्राएल राष्ट्राची स्थापना झाली तेव्हा देवाने त्यांचे विचार नियमशास्त्रात ठेवण्याची परवानगी दिली. पण हे कसे शक्य आहे की देव त्याच्या नियमांना माणसांच्या दुष्ट विचारांनी कलंकित होऊ देईल? कारण कायद्याचा उद्देश पापाची खात्री पटवून देणे हा आहे जेणेकरून तो दया दाखवू शकेल.

शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली. रोमकरांस पत्र 5:20

आपला स्वर्गातील पिता त्याच्या कायद्यात कोणत्याही प्रकारची शिक्षा जोडण्याची परवानगी देऊ शकतो कारण जे काही मृत्यू विहित केले जाईल ते केवळ ज्यांनी ते मागितले त्यांना दया दाखविण्याच्या उद्देशाने होते. देवाच्या चरित्राबद्दल पवित्र शास्त्र काय म्हणते ते आम्हाला आठवते:

परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, निर्गम 34:6

परमेश्वराचे उपकारस्मरण करा, कारण तो चांगला आहे; आणि त्याची दया सनातन आहे. स्तोत्रसंहिता 107:1

देव नेहमी दयाळू असतो आणि त्याची दया दाखवण्याची नेहमीच इच्छा असते. जेव्हा पुरुष त्यावर विश्वास ठेवण्यास नकार देतात आणि निषेधाची इच्छा करतात तेव्हाच दया थांबते. हे ते पुरुष आहेत जे दया थांबवण्यास भाग पाडतात आणि ते त्यापासून स्वतःला लपवतात कारण त्यांना वाटते कि देव त्यांच्यासारखा आहे. त्यांना विश्वास ठेवायचा असतो की देव लोकांच्या विरोधी होतो आणि जेव्हा ते लोक त्याला संतुष्ट करत नाहीत तेव्हा तो त्यांचा नाश करतो. जर हे खरे असेल तर देवाची दया सदैव टिकते असे म्हणता येणार नाही. आपण लक्षात ठेवतो की जो मनुष्य दयाशिवाय न्याय करतो त्याच्यावर दया होत नाही कारण हे त्याने स्वतः ठरवले आहे. यामुळे देवाची निंदा करणाऱ्याला दया न दाखवता दगडाने ठेचून मारण्यात आले.

तो इस्राएल स्त्रीचा मुलगा परमेश्वराच्या नावाची निंदा करून शिव्याशाप देऊ लागला तेव्हा त्याला मोशेकडे आणले. त्याच्या आईचे नाव शलोमीथ असे असून ती दान वंशातील दिब्री ह्याची मुलगी होती. त्याच्यासंबंधाने परमेश्वर काय सांगतो ते कळावे म्हणून त्यांनी त्याला अटकेत ठेवले. मग परमेश्वराने मोशेला सांगितले, "तुम्ही त्या शिव्याशाप देणाऱ्याला छावणीबाहेर घेऊन जा आणि जितक्यांनी ती निंदा ऐकली तितक्यांनी आपले हात त्याच्या डोक्यावर ठेवावेत; नंतर सर्व मंडळीने त्याला दगडमार करावा. लेवीय 24:11-14

मिसरी दैवतांची निंदा केल्याबद्दल जी शिक्षा होती तीच शिक्षा इस्त्रायलने त्यांच्या सहवासातून राहून व शिकून स्वतः ठरवलेली होती, आणि हाच दंड देवानेत्यांच्यावर लागू केला. आपल्या पित्याची इच्छा होती की या मनुष्याला खात्री असावी की आपण दुःखी आहोत आणि तो खरोखर मृत्यूस पात्र आहोत, परंतु केवळ त्याला दया देण्याच्या उद्देशाने. नियमशास्त्र देणाऱ्याच्या स्वतःच्या शब्दांमुळे हे खरे आहे हे आपल्याला माहीत आहे:

ह्यास्तव मी तुम्हांला सांगतो की, प्रत्येक पाप व दुर्भाषण ह्यांची माणसांना क्षमा होईल, परंतु पवित्र आत्म्याविरुद्ध जे दुर्भाषण आहे त्याची क्षमा होणार नाही. मत्तय 12:31

येशूने सांगितले की प्रत्येक पापाची क्षमा केली जाऊ शकते परंतु पवित्र आत्म्याविरुद्ध निंदा केल्याबाबद्दल क्षमा होणार नाही. पवित्र आत्मा आपल्या विवेकबुद्धीवर कार्य करतो आणि आपल्याला पश्चात्ताप करण्याची आणि दया मागण्याची विनंती करतो. पश्चात्ताप करण्यास सांगणारा हा आवाज ऐकण्यास नकार देणारा माणूस दयेची मागणी करणार नाही आणि म्हणूनच, त्याच्या स्वतः च्या लोकांनी योजलेल्या शिक्षेनुसार त्याचा न्याय केला जाईल. जर फक्त गणना 24 मधील मनुष्याने दया मागितली असती तर ती त्याला दिली गेली असती. त्याने पवित्र आत्म्याची निंदा केली ज्याने त्याला पश्चात्ताप करण्याची विनंती केली कारण आपला पिता कोणाचाही नाश व्हावा असे इच्छित नाही. दुर्दैवाने त्याने तो आवाज ऐकणे बंद केला आणि म्हणून देव त्याला क्षमा करणार नाही या त्याच्या विश्वासाप्रमाणे तो मरण पावला.

आपल्यापैकी किती जण दगड उचलतील आणि आपल्या मुलांना त्यांच्या पश्चात्ताप न केलेल्या पापांसाठी मारून टाकतील आणि स्वेच्छेने त्यांना जमिनीवर रक्तभंबाळ करून पाडतील? विचार इतका भयानक आहे की शब्दात मांडता येत नाही. तरीही लाखो लोकांचा असा विश्वास आहे की आपल्या स्वर्गीय पित्याने इस्राएल लोकांकडून हेच अपेक्षित होते. या देवाचा तिरस्कार करून किती लोक त्यांच्या कबरीत गेले आहेत ज्यांना लोकांवर दगडमार करून ठार मारण्याची त्यांची इच्छा होती? आज बरेच ख्रिस्ती लोक देवाचे आभार मानत आहेत की नवीन करारात गोष्टी बदलल्या आहेत, परंतु हे कोणत्याही प्रकारे पूर्णपणे बदलत नाही की कारण ते अजूनही विश्वास ठेवतात की जुन्या करारात देव असाच होता. पुन्हा एकदा आम्हाला आठवण करून दिली जाते की येशू म्हणाला होता की तो कायद्याचा कोणताही भाग काढून घेण्यासाठी आला नाही. कायदा अजूनही कायम आहे, परंतु आपण शिकलो आहोत की, आपला पित्याला कधीही कोणत्याही व्यक्तीला जिवे मारण्याची इच्छा नसते. त्याच्या मनात प्रत्येकासाठी फक्त दया असते.

मी प्रार्थना करतो की तुम्ही तुमचे हृदय आमच्या स्वर्गीय पित्यासमोर उघडाल. तो तुझ्यावर खूप प्रेम करतो. त्याने कधीही तुम्हाला दुखावण्याची किंवा तुमच्या पापांसाठी तुम्हाला मरण पत्करावेसे वाटेल असे केले नाही. आपली पापे आपला नाश करत आहेत आणि आपण कधीही दया मागू शकतो हे आपण पाहावे अशी त्याची इच्छा आहे. जेव्हा तुम्हाला माहित असेल की देव तुमच्यावर रागावलेला नाही आणि तो खरोखर तुमच्यावर प्रेम करतो तेव्हा तुम्ही त्याच्याकडे धावून तुमच्या सर्व पापांची कबुली देऊ शकता आणि हे जाणून घ्या की तो त्या सर्वांची क्षमा करेल. जसे येशूने व्यभिचारात पकडलेल्या स्त्रीला सांगितले होते - "मी तुला दोषी ठरवत नाही, जा आणि यापुढे पाप करू नको."

दुःखाची गोष्ट म्हणजे जे सत्य नाकारतात की देव खरोखरच त्यांच्यावर प्रेम करतो

आणि नेहमी दया दाखवण्यास तयार असतो, त्यांच्यावर दया होणार नाही; कारण ते अशा देवावर विश्वास ठेवतात जो पापी लोकांवर दया दाखवत नाही आणि म्हणून ते क्षमा पावण्याची आशा सोडून देतात. काईनप्रमाणे ते बोलतात -
“हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे."

> कारण त्यांनी ज्ञानाचा तिटकारा केला, आणि परमेश्वराचे भय मान्य केले नाही; त्यांनी माझ्या बोधाचा अव्हेर केला, त्यांनी माझा वाग्दंड तुच्छ लेखला; म्हणून ते आपल्या वर्तनाचे फळ भोगतील, आपल्या मसलतीचे भरपूर फळ भोगतील; कारण भोळ्यांचे भलतीकडे वळणे त्यांच्या नाशास कारण होईल; मूर्खांची भरभराट त्यांचा नाश करते; नीतिसूत्रे 1:29-32

देवाचे वचन ऐका आणि ते काय म्हणते यावर विश्वास ठेवा:

> परमेश्वराने दुरून येऊन मला दर्शन दिले; तो म्हणाला, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे. यिर्मया 31:3

> परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुद्धिवाद करू; तुमची पातके लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील; ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. यशया 1:18

> ..मग याजकाने हे शापशब्द पुस्तकात लिहून ते त्या कटू जलात धुवावेत; गणना 5:23

## 9. एक आरसा म्हणून कायदा

शुभवर्तमानातील  येशूच्या कथा पाहताना आपण पित्याला पाहत असतो, कारण येशू फिलिप्पाला म्हणाला, "जर तू मला पाहिले आहेस तर तू पित्याला पाहिले आहेस." योहान 14:9 शुभवर्तमानामध्ये एक महत्त्वाची कथा आहे जी आपल्या पित्याच्या चारित्र्याच्या एका पैलूवर प्रकाश टाकते ज्याचा लोकांना सहसा पूर्णपणे गैरसमज  होतो. येशूने त्याची जवळजवळ संपूर्ण सेवा यहुदी राष्ट्राच्या प्रदेशात घालवली. या प्रसंगी तारणाऱ्याने फोनिशियाच्या मूर्तिपूजक प्रदेशात प्रवास करणे निवडले.

यहुद्यांच्या मनात खोलवर बसलेल्या अभिमानाने शिष्यांच्या हृदयावर कब्जा केला आणि वंशवाद आणि आध्यात्मिक कट्टरतेच्या राष्ट्रीय पापात त्यांच्या सहभागाबद्दल त्यांचे डोळे आंधळे केले. इस्राएलला परराष्ट्रीयांसाठी प्रकाश म्हणून बोलावण्यात आले होते; तथापि, त्यांनी त्यांच्या वंचित शेजाऱ्यांचा तिरस्कार करून हा विशेष अधिकार अंधारात बदलला.

या प्रदेशात राहणाऱ्या एका स्त्रीने, तिच्या समाजातील अनेकांसह, लोकांना बरे करणाऱ्या या यहुदी शिक्षकाबद्दल ऐकले होते. तिची मुलगी "भूताने त्रस्त" झाली होती आणि तिने आपल्या मुलीला मदत करण्यासाठी तिच्या देवतांना व्यर्थपणे शोधले होते परंतु काही उपयोग झाला नाही. हा यहुदी शिक्षक तिला मदत करू शकेल का असा प्रश्न तिला पडला. हा यहुदी तिच्यासाठी काय करू शकतो याबद्दल शंका असताना देखील तिने येशूकडे तिची बाजू मांडण्याचा निर्धार केला.

या गरीब आईचे मनःपूर्वक रडणे तारणाऱ्याच्या कानापर्यंत पोहोचले.

> "अहो प्रभूजी, दाविदाचे पुत्र, माझ्यावर दया करा. माझी मुलगी भुताने फारच जर्जर केली आहे." मत्तय 15:22

देवाचा आत्मत्यागी पुत्र या नात्याने त्याचे हृदय करुणेने भरलेले होते. तो विशेषत: तिला मदत करण्यासाठी या प्रदेशात आला होता, तरीही येशू पुढे काय करतो त्यावरून देवाच्या चारित्र्याबद्दल काहीतरी खूप महत्त्वाचे प्रगट होते.

> तरी त्याने तिला एका शब्दानेही उत्तर दिले नाही, मत्तय 15:23

असे करण्यामागचे त्याचे कारण पुढच्याच वाक्यात लगेच स्पष्ट होते.

> तेव्हा त्याच्या शिष्यांनी जवळ येऊन त्याला विनंती केली, "तिला पाठवून द्या; कारण ती आमच्यामागून ओरडत येत आहे." मत्तय 15:23

जर येशूने तिची विनंती ताबडतोब मान्य केली असती तर शिष्यांची कठोरता प्रकट झाली नसती. म्हणून ते कसे प्रतिसाद देतात हे पाहण्यासाठी तारणारा गप्प राहिला. त्यांनी येशूचे शांत राहणे त्यांच्या वांशिक पूर्वग्रहाची पुष्टी म्हणून घेतले. त्याच वेळी, त्याच्या शांत राहण्याने या विदेशी स्त्रीच्या या यहुदी शिक्षकाबद्दल असलेल्या शंकांची चाचणी घेतली गेली. आपण पाहतो की येशूच्या कृती त्याच्या सभोवतालच्या लोकांच्या हृदयात काय आहे हे प्रकट करण्यासाठी आरशाप्रमाणे काम करतात.

यातील इतर उदाहरणांमध्ये येशू जेव्हा अम्माऊसला त्या दोघांसोबत चालत गेला तेव्हा त्याने पुढे जाण्याचा रोख दाखवला; लूक 24:28. आणि येशू समुद्रावरून चालत त्यांच्याकडे आला. त्यांच्याजवळून पुढे जाण्याचा त्याचा बेत होता; मार्क 6:48.

आपण शिकलो त्याप्रमाणे, देवाच्या पुत्राला जगाने नाकारले असताना शिष्यांनी त्यांचा वैयक्तिक क्रूस वाहून नेण्याच्या आवाहनाचा प्रतिकार केला. याच कारणाने येशू त्यांना सांगण्याचा प्रयत्न करत असलेल्या अनेक गोष्टींबद्दल त्यांना आंधळे केले. आणि नियमशास्त्राचे ऐकणारे म्हणून, त्यांनी येशूला या प्रकारे ओळखले:

> वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता. कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; तो स्वत:ला पाहून तेथून निघून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरून जातो. याकोब 1:22-24

शिष्यांनी नवीन राज्यासाठी ख्रिस्ताच्या आवाहनाला प्रतिसाद दिला होता, परंतु त्यांची अंतःकरणे आत्म-त्यागाच्या तत्त्वांना आणि त्यांच्या प्रिय मसीहाला त्यांच्या राष्ट्राने नकार देण्याच्या तत्त्वांना पूर्णपणे अधीन झालेले नव्हते. यामुळे ते येशूच्या मुखातून आलेले नियमशास्त्र ऐकणारे बनले. जेव्हा येशू त्या परराष्ट्रीय स्त्रीसाठी गप्प राहिला तेव्हा त्यांनी त्याच्या ह्या कार्यामध्ये स्वतःचा नैसर्गिक चेहरा पाहिला. ते त्यांच्या स्वतःच्या मनोवृत्ती आणि इच्छा त्याच्यासमोर प्रकट करत होते ज्याचा

परिणाम म्हणून त्यांनी या गरीब स्त्रीसमोर येशूला तिला पाठवण्यास सांगितले. त्यांचे असे बोलणे ऐकून त्या बाईला किती त्रास झाला असेल. येशू काय म्हणणार हे ऐकण्यासाठी ती वळली तेव्हा तिच्या मुलीबद्दलचा तिच्या आतील मनस्ताप किती जास्त वाढला असावा.

> त्याने उत्तर दिले, "इस्राएलाच्या घराण्यातील हरवलेल्या मेंढरांखेरीज इतर कोणाकडे मला पाठवलेले नाही." मत्तय 15:24

या उत्तराने प्रत्येकजण खरोखरच ऐकत आहे की नाही हे पाहण्याची चाचणी घेतली गेली. तारणकर्त्याची ओळख बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने या शब्दांसह केली होती:

> "हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! योहान 1:29

येशू केवळ भौतिक यहुद्यांचाच नव्हे तर संपूर्ण जगाचा तारणारा होता. हे सत्य विहिरीजवळ असलेल्या शोमरोनी स्त्रीला आणि शहरातून बाहेर पडलेल्यांना समजले होते:

> आणि ते त्या स्त्रीला म्हणाले, "आता तुझ्या बोलण्यावरूनच आम्ही विश्वास धरतो असे नाही, कारण आम्ही स्वतः ऐकले आहे व हा खचीत ख्रिस्त, जगाचा तारणारा आहे हे आम्हांला कळले आहे." योहान 4:42

येशू जगाचा तारणारा होता परंतु त्याचे राज्य नक्कीच जगिक नव्हते:

> येशूने उत्तर दिले, "माझे राज्य ह्या जगाचे नाही, माझे राज्य ह्या जगाचे असते तर मी यहूद्यांच्या स्वाधीन केला जाऊ नये म्हणून माझ्या सेवकांनी लढाई केली असती; परंतु आता माझे राज्य येथले नाही." योहान 18:36

इस्रायल हा शब्द त्या सर्वांचा संदर्भ आहे जे तारणाची भेट स्वीकारतील. प्रेषित पौलाने नंतर वर्णन केल्याप्रमाणे:

> कारण जो बाह्यात्कारी यहूदी तो यहूदी नव्हे आणि देहाची बाह्यात्कारी सुंता ती सुंता नव्हे; परंतु जो अंतरी यहूदी तो यहूदी होय; आणि लेखाप्रमाणे व्हायची ती सुंता नव्हे तर आध्यात्मिकदृष्ट्या जी अंतःकरणाची व्हायची ती सुंता होय; अशाची प्रशंसा माणसाकडून नव्हे, तर देवाकडून होते. रोमकरांस पत्र 2:28-29

तारणारा त्यांच्याशी हृदयाच्या आध्यात्मिक राज्याबद्दल बोलत होता. येशूकडे येताना, ही स्त्री आत्म्याच्या हाकेला प्रतिसाद देत होती. तिने उघड केले की ती खरोखरच इस्रायलच्या घराण्यातील आहे. देहाचा इस्राएल नव्हे तर आत्म्याचा इस्राएल. इस्त्रायल हे नाव याकोबाला देवदूताशी कुस्ती करताना प्रकट झालेल्या विश्वासासाठी देण्यात आले होते. आता ही महिला प्रात्यक्षिक करणार होती की ती एक खरोखर इस्राएली होती.

> तेव्हा ती येऊन त्याच्या पाया पडून म्हणाली, "प्रभूजी, मला साहाय्य करा." मत्तय 15:25

स्त्रीचा विश्वास फळाला येत नाही. ती अजून विश्वासात टिकून आहे. तारणहार तिला मदत करण्यास उत्सुक आहे पण तिची परीक्षा अजून संपलेली नाही.

> त्याने उत्तर दिले, "मुलांची भाकर घेऊन ती घरच्या कुत्र्यांना घालणे हे ठीक नाही!" मत्तय 15:26

इथे पण या शब्दाचा अर्थ असा नाही की तो तिच्या आवाहनाला विरोध करत होता. ग्रीक शब्द "दे" चा अर्थ आणि विचारांच्या निरंतरतेच्या स्वरूपात देखील असू शकतो. येशू आता तिला खरोखरच इस्राएली आहे का हे ठरवायला सांगत होता. त्याचे विधान शिष्यांच्या वांशिक पूर्वग्रहाची तसेच या यहुदी शिक्षकांबद्दल तिच्या स्वतःच्या शंकांची चाचणी घेण्यासाठी तयार केले आहे. ती स्त्री म्हणाली असेल, "प्रभु, मी तुमच्या मुलांपैकी एक आहे आणि मला विश्वास आहे की तुम्ही मला मदत कराल." तिने दिलेले हे सर्वोतम् उत्तर असते. तरीही तिचे उत्तर आश्चर्यकारक आहे की ती स्वत:ला कुत्रा म्हणवते आणि तरीही ती विश्वासावर टिकून आहे.

> तिने म्हटले, "खरेच, प्रभूजी; तरी घरची कुत्रीही आपल्या धन्यांच्या मेजावरून पडलेला चुरा खातात." मत्तय 15:27

जरी तिला वाटले की येशू तिला कुत्रा म्हणत आहे, तरीही तिने विश्वास ठेवला की येशू तिला मदत करेल आणि तिला एक खरीखुरी इस्रायली बनवेल. या महिलेचे तिच्या मुलीवर असलेले प्रेम आणि आत्म्याला दिलेला तिचा प्रतिसाद यामुळे तिला विश्वासामध्ये विजय मिळाला.

> तेव्हा येशूने तिला उत्तर दिले, "बाई, तुझा विश्वास मोठा, तुझी इच्छा सफळ होवो." आणि त्याच घटकेस तिची मुलगी बरी झाली. मत्तय 15:28

या उत्तराने शिष्यांना खडसावले. ते त्यांच्या नैसर्गिक अंतःकरणाने येशूचे शब्द ऐकत होते आणि त्यांच्या जातीय विचार त्याच्यावर प्रक्षेपित करत होते. जेव्हा येशूने त्या स्त्रीच्या विनंतीला उत्तर दिले तेव्हा त्यांना धक्का बसला आणि येशूबद्दलची त्यांची समज उद्ध्वस्त झाली. या टप्प्यावर त्यांनी एकतर येशूच्या

कृतींना एक रहस्य मानले पाहिजे किंवा त्यांच्या जातीय द्वेषावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले पाहिजे.

पवित्र शास्त्रात येशूला “देवाचे ज्ञान” असे शीर्षक आहे. 1 करिंथकर 1:24. त्याच्या पित्याकडून आलेले हे शहाणपण त्याला मानवतेशी संवाद साधण्याची आणि त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते थेट संघर्षाशिवाय प्रकट करण्यास अनुमती देते, ज्यामुळे केवळ प्रतिकार निर्माण होईल."तुम्हाला जातीय द्वेषाची समस्या आहे आणि तुम्हाला त्यावर मात करण्याची गरज आहे" असे येशूने त्यांना का सांगितले नाही? यातून काहीही साध्य झाले नसते. त्याऐवजी, येशू अशा प्रकारे बोलतो ज्यामुळे त्याचे शब्द आरशासारखे कार्य करतात आणि हृदयात काय आहे ते प्रकट करतात.

एकदा तुम्ही हे तत्त्व समजून घेतल्यावर, तुम्ही पवित्र शास्त्र नियम पाळणाऱ्या व्यक्तीच्या रूपात वाचू शकता, केवळ स्वतःच्या नैसर्गिक प्रवृत्तींचे निरीक्षण करणाऱ्या व्यक्तीच्या रूपात नाही. येशूने शिष्यांना दिलेली परीक्षा बायबलच्या प्रत्येक वाचकाला लागू होते, कारण पवित्र शास्त्र वाचकाच्या हृदयात काय आहे ते प्रकट करते. शिष्यांनी त्यांच्या स्वतःच्या जातीय द्वेषाद्वारे येशूच्या कृतींचा अर्थ लावला आणि बरेच लोक देवाच्या खऱ्या चारित्र्याऐवजी त्यांच्या नैसर्गिक मानवी समजुतीनुसार पवित्र शास्त्र वाचतात. खालील वचन असे वाटते की देव त्याच्या लोकांबद्दल विसरत आहे आणि त्यांच्याकडे पाठ फिरवत आहे.

> पूर्वेकडील वाऱ्याप्रमाणे मी त्यांना शत्रूपुढे विखरीन; त्यांच्या संकटसमयी मी त्यांच्याकडे पाठ करीन, तोंड करणार नाही.” यिर्मया 18:17

लोकांकडे आमची पाठ फिरवणे हा शब्द आम्ही त्यांचा नकार दर्शवण्यासाठी वापरतो. या मजकुरात देव कसा पाठ फिरवतो याच्या संदर्भाकडे लक्ष द्या:

> असे होईल की, माझे तेज जवळून चालले असता मी तुला खडकाच्या भेगेत ठेवीन; मी निघून जाईपर्यंत आपल्या हाताने तुला झाकीन; मग मी आपला हात काढून घेईन आणि तुला पाठमोरा दिसेन; पण माझे मुख दिसायचे नाही.” निर्गम 33:22-23

या संदर्भात देव मोशेला त्याच्या चारित्र्याच्या संपूर्ण वैभवापासून वाचवण्यासाठी त्याची पाठ दाखवतो. देवाचे त्याच्या मुलांवरील प्रेम इतके महान, इतके निःस्वार्थ आणि काळजी घेणारे आहे की जेव्हा एखादा पापी हे प्रेम पूर्णपणे पाहतो तेव्हा ते त्वरित आत्म-निंदा आणि अपराधीपणाची भावना आणते.

> तरीपण माझे लोक मला विसरले आहेत, ते व्यर्थतेपुढे धूप जाळतात; त्यांनी त्यांच्या मार्गांत, त्यांच्या प्राचीन मार्गांत त्यांना ठोकर खायला लावले; भर घालून तयार न केलेल्या आडवाटांनी त्यांना जाण्यास लावले. यिर्मया 18:15

इस्रायल परमेश्वराला विसरून इतर मार्गांवर वळले होते. त्यांचा संपूर्ण नाश होऊ नये म्हणून परमेश्वराने आपले वैभव लपवले आणि पाठ फिरवली. त्याच्या मुलांनी जे पेरले ते कापताना पाहून त्याचे दुःख त्यांना दिसू नये म्हणून त्याने पाठ फिरवली.

> मी मारणाऱ्यांपुढे आपली पाठ केली.. यशया 50:6

इस्रायलच्या कृतींमुळे आपल्या तारणकर्त्याला त्रास होत होता. त्यांच्या मूर्तीपूजेने त्याला खूप त्रास झाला. त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला, पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया 63:9 यामुळे त्याने त्यांच्या मृत्यूकडे पाठ फिरविली. हा वाक्प्रचार समजला जाऊ शकतो की परमेश्वर त्याच्या लोकांच्या पापांमुळे जखमी झाला आहे आणि त्याने त्याच्या चारित्र्याच्या संपूर्ण वैभवापासून संरक्षण करावे म्हणून त्यांच्याकडे पाठ फिरविली जेणेकरून ते त्यांच्या स्वतःच्या अपराधाच्या भावनेने पूर्णपणे चिरडले जाणार नाहीत. नैसर्गिक हृदय हे वचन असेच वाचेल कि देव फक्त त्याच्या लोकांना नाकारतो कारण मानवाची नैसर्गिकरित्या अशीच प्रतिक्रिया असते आणि जेव्हा आपण पवित्र शास्त्र नैसर्गिकरित्या वाचतो तेव्हा आपल्याला असेच समजते. बरे झाले कि देवाचे विचार हे आपले विचार नाहीत. यशया 55:8-9.

देवाचे वचन आत्म्याला कसे प्रतिबिंबित करते याचे आणखी एक उदाहरण पाहू या. गणना 13 मध्ये आपण खालील वचन वाचतो:

> परमेश्वर मोशेला म्हणाला, “मी इस्राएल लोकांना कनान देश देत आहे, तो हेरण्यासाठी माणसे पाठव; त्यांच्या वाडवडिलांच्या प्रत्येक वंशातला एकेक पुरुष पाठव; प्रत्येक जण त्यांच्यातला सरदार असावा. गणना 13:1-2

तरीही आपण अनुवाद 1:22 मध्ये वाचतो कि:

> पाहा, तुझा देव परमेश्वर ह्याने तो देश तुझ्यापुढे ठेवला आहे; तुझ्या पूर्वजांचा देव परमेश्वर ह्याने तुला आज्ञा केल्याप्रमाणे त्यावर चढाई करून तो हस्तगत कर; भिऊ नकोस व कचरू नकोस.’ तेव्हा तुम्ही सगळे माझ्याकडे येऊन म्हणालात, ‘आम्ही माणसे पुढे पाठवतो म्हणजे ती त्या देशाची माहिती मिळवून कोणत्या मार्गाने आम्हांला जावे लागेल व कोणकोणती नगरे लागतील ह्याची आम्हांला खबर आणतील.’ ही गोष्ट मला पसंत पडली म्हणून प्रत्येक वंशामागे एक अशी तुमच्यातली बारा माणसे मी निवडून काढली; अनुवाद 1:21-23

गणना 13 मधला उतारा काय घडले याचा संपूर्ण संदर्भ देत नाही. हे फक्त देशाची पडताळणी करण्याची देवाची आज्ञा सादर करते. पवित्र शास्त्रात असे सादर केलेले दोन परिच्छेद वाचकांसाठी एक छोटीशी परीक्षा देतात. जर वाचकाच्या मनात पवित्र शास्त्राला खोटे ठरवण्याची इच्छा असेल, तर आपण हे दोन वचन शेजारी ठेऊन पवित्र शास्त्राचा विरोधाभास सिद्ध करण्यासाठी वापरू शकतो. वाचकामध्ये असलेले विरोधाभास पवित्रशास्त्रामध्ये प्रतिबिंबित केले जातात. कायद्याचे पालन करणाऱ्याला त्वरीत कळेल की वर जाण्याची आणि जमीन ताब्यात घेण्याच्या आदेशाचा अर्थ असा आहे की जमीन जाऊन पडताळण्याची गरज नाही आणि पडताळणी करण्याच्या विनंतीमुळे त्यांच्या विश्वासाची कमतरता दिसून आली. देव त्यांच्या इच्छेनुसार आज्ञा देऊन त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देतो. बहुसंख्य जासूदांच्या भीतीदायक अहवालावरून त्यांच्या अंतःकरणातील अविश्वास दिसून येतो, ज्यामुळे त्यांना देशाची पडताळणी करण्यास सांगावे लागले. पवित्र शास्त्र अशा प्रकारे लिहिलेले आहे की विरोधाभासात जगणाऱ्या व्यक्तीला पवित्र शास्त्र वाचून आणि त्यांच्या स्वतःच्या विश्वासांशी जुळणारे विरोधाभास ओळखून त्यांच्या दाव्यांचे समर्थन शोधू देते. नियम पाळणारा विश्वास ठेवतो आणि उघड संघर्ष सोडवण्याचा आणि पवित्र शास्त्राशी सुसंगत करण्याचा प्रयत्न करतो.

दावीद इस्त्रायलाची जनगणना करणाऱ्या कथेचा विचार करूया.

> परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. 2 शमुवेल 24:1

आता याची 1 इतिहास 21:1 शी तुलना करूया.

> नंतर सैतानाने इस्राएलाविरुद्ध उठून इस्राएलाची गणती करायला दाविदाला प्रवृत्त केले. 1 इतिहास 21:1

पुन्हा एकदा, पृष्ठभागावर, एक विरोधाभास दिसून येतो. हे असेच आहे जेव्हा येशूला जगाचा तारणहार म्हणून सादर केले गेले आणि नंतर स्त्रीला म्हटले जाते कि, “मला इस्राएलच्या घराण्यातल्या हरवलेल्या मेंढरांसाठी पाठवले आहे." जेव्हा आपण हे परिच्छेद वाचतो तेव्हा आपली परीक्षा होते. पुढील अध्यायामध्ये आपण प्रभूच्या क्रोधाबद्दल अधिक तपशीलवार पाहू. आत्तासाठी, आम्ही येशू ख्रिस्ताच्या जीवनाच्या प्रकाशात हिब्रू शब्दाच्या वाचण्यावर लक्ष केंद्रित करूया. इस्रायलच्या या जनगणनामुळे 70,000 पुरुषांचा मृत्यू झाला.

> मग परमेश्वराने इस्राएलात सकाळपासून नेमलेल्या मुदतीपर्यंत मरी पाठवली; आणि दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या लोकांपैकी सत्तर हजार लोक मेले. 2 शमुवेल 24:15

काही भाषांतरे सुचवतात की देव इस्रायलवर इतका रागावला होता की त्याने हजारो लोकांचा नाश करण्यासाठी एक कारण निर्माण केले:

> परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. 2 शमुवेल 24:1

जेव्हा आपण वाचतो की देवाचा राग इस्रायलवर भडकला तेव्हा तुमच्या मनात कोणते चित्र निर्माण होते? लाल चेहरा असलेला कोणीतरी रागाच्या भरात मोठा स्फोट घडवायला तयार असेल अशी आपण कल्पना करतो काय? भाषांतरकार त्यांच्या नैसर्गिक समजानुसार हिब्रू शब्द वाचत होते, हे शक्य आहे काय? हिब्रू शब्दांमधील अर्थाच्या भिन्नतेबद्दल आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे वाचक किंवा अनुवादक वेगवेगळे निर्धारण करतील. काही शब्दांसह वाचलेल्या गोष्टींचा अर्थ लक्षणीयपणे बदलतात. जर तुम्ही 2 शमुवेल 24:1 मध्ये कोप आणि पुनरुपी शब्द पाहिला तर ह्याचे भाषांतर दु:ख असे केले जाऊ शकते. हलवले या शब्दाचा अर्थ भुरळ पाडणे असा आहे, म्हणून आपण खालीलप्रमाणे वचन वाचू शकतो.

> परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. 2 शमुवेल 24:1

हे 1 इतिहास 21:1 च्या सुसंगत आहे जे म्हणते की सैतान दाविदाच्या विरोधात उभा राहिला. दाविदाला का फसवले गेले? कारण इस्राएलाने देवाच्या आत्म्याला दु:ख दिले होते. पवित्र शास्त्रामध्ये देवाच्या क्रोधाचे वर्णन दुष्ट देवदूतांना अधिक नियंत्रण ठेवण्याची परवानगी देते असे केले आहे.

> त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. स्तोत्रसंहिता 78:49

देवाच्या क्रोधाची व्याख्या शेवटी त्याच्या लोकांना त्याला दूर ढकलण्याची परवानगी देते, ज्यामुळे सैतान उभा राहतो आणि परिस्थितीवर नियंत्रण ठेवतो. आपला मौल्यवान पिता आपल्या लेकरांवर प्रेम करतो आणि आपला तारणारा आपला मेंढपाळ आहे जो आपल्या मेंढरांची काळजी घेतो. जेव्हा त्याचे लोक त्याच्या अहवानांकडे दुर्लक्ष करत राहतात आणि त्यांना नाकारतात तेव्हा शेवटी देवाने त्यांना त्यांच्या स्वतःच्या इच्छा ठेवण्याची परवानगी दिली पाहिजे. इस्रायलला दाविदाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय महानता हवी होती. प्रभूच्या आत्म्याने त्यांना या गोष्टींचा शोध न घेण्याची विनंती केली, परंतु ज्या आत्म्याला राजा हवा होता तोच आत्मा आता साम्राज्याचा विस्तार करू इच्छित होता. त्यामुळे देवाने सैतानाला दावीदाची जनसंख्या मोजण्याबाबत फसवणूक करण्याची परवानगी दिली. बहुतेक पवित्र शास्त्र भाषांतकारानी 2 शमुवेल 24:1 मधील हिब्रू शब्द aph चा क्रोध म्हणून

अर्थ लावणे निवडले. तर निर्गम 34:6 मध्ये "दीर्घ" या शब्दाला जोडलेला तोच शब्द खालीलप्रमाणे भाषांतरित केला आहे:

> परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, [H639 aph] मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, निर्गम 34:6

परमेश्वराने aph या हिब्रू शब्दाला आपल्या आत्म्यात एक आरसा म्हणून काम करण्याची परवानगी दिली आहे. आपण ते राग किंवा दुःख म्हणून वाचू शकतो. कारण हिब्रू शब्दाचा अर्थ नाकपुडी किंवा नाकातून जलद श्वास घेणे असा होतो. जलद श्वासोच्छ्वास हे क्रोध किंवा अत्यंत दुःखामुळे असू शकते. जेव्हा येशूने शिष्यांना सांगितले की त्याला पुढाऱ्यांच्या हातून पुष्कळ दुःख सहन करावे लागेल, तेव्हा शिष्यांना ते ऐकायचे नव्हते. म्हणून आपल्याला अनेक ठिकाणी असे दिसते की लोक देवाला दुःखी आणि तुटलेल्या मनाच्या पित्याच्या रूपात पाहण्यापेक्षा जे त्याच्याविरुद्ध पाप करतात त्यांच्यावर रागावणार देव म्हणून त्याला बघतात. जर त्यांनी स्वतःला सत्य पाहण्याची परवानगी दिली तर यामुळे आपल्या पित्याला दुखावणे थांबवण्याची तीव्र खात्री त्यांना मिळेल. देवाला रागाच्या रूपात पाहिल्याने अनेकांना त्यांच्या पापाचे समर्थन करता येते. ज्याप्रमाणे येशूच्या शिष्यांनी त्यांच्या शांत राहण्याच्या प्रकियेला जातीय व्देष असा अर्थ लावला, त्याचप्रमाणे अनेक पवित्र शास्त्राचे अनुवादकांनी, आणि वाचकांनी, देवाच्या चरित्रावरील अन्यायाबद्दल त्यांच्या स्वतःच्या भावना वाचल्या.

विचारात घेण्यासाठी एक अंतिम उदाहरणः

> शौलाने परमेश्वराचा अपराध केला, परमेश्वराचा शब्द मानला नाही आणि परमेश्वराला प्रश्न करण्याऐवजी भूतविद्याप्रवीण स्त्रीचा त्याने सल्ला घेतला, ह्या सर्वांमुळे तो मेला; परमेश्वराने त्याला मारले आणि इशायाचा पुत्र दावीद ह्याला राज्य बहाल केले. 1 इतिहास10:13-14

देव लोकांना मारतो हे दाखवण्यासाठी जर कोणी पुरावा शोधत असेल तर हे अगदी साधे प्रकरण आहे. देवाने शौलाला मारले असे ह्यात म्हटले आहे. हे वचन एक आरसा आहे. नियमशास्त्र अनुसरून वाचणाऱ्याला या वचनामध्ये स्वतःचा नैसर्गिक चेहरा दिसेल. शौलावर देवाने खूप कृपा केली होती परंतु शौलने त्याच्याविरुद्ध बंड केले. अशा परिस्थितीत कोणत्याही मनुष्याच्या मनात नैसर्गिरित्या सूडाची भावना निर्माण होऊन ती भावना शौलला ठार मारण्यास पात्र ठरु शकेल. दुसरीकडे, मनुष्याच्या नैसर्गिक स्वभावात अधिकाराप्रती बंडखोर भावना असू शकतात आणि देवाने शौलला मारून टाकले हे वाक्य वाचून देवाचे अधिकार कठोर आणि गैरवाजवी आहेत हे सिद्ध करण्यासाठी पुरावे मिळतात. जे लोक येशूच्या चारित्र्याला समोर ठेऊन पवित्र शास्त्र वाचतात, ते "परमेश्वराने

त्याला मारले" या वचनाचे स्पष्टीकरण देण्यासाठी अधिक उत्तरे शोधतील. आणि उत्तर ह्याच अध्यायात 3-4 वचनामध्ये आढळते.

> शौलाशीही लढाई फार निकराची झाली; तिरंदाजांनी त्याला गाठले व त्याच्यामुळे तो फार हैराण झाला. तेव्हा शौल आपल्या शस्त्रवाहकाला म्हणाला, "आपली तलवार उपसून मला भोसक; तसे न केल्यास हे असुंती लोक येऊन माझी विटंबना करतील." पण त्याचा शस्त्रवाहक तसे करीना, तो फार घाबरला होता; तेव्हा शौल आपली तलवार काढून तिच्यावर पडला. 1 इतिहास 10:3-4

शौलने आत्महत्या केली. शौल देवापासून दूर गेला होता आणि याचा अर्थ असा होतो की परमेश्वर त्याचे रक्षण करू शकला नाही जसे तो करू इच्छित होता. शौल युद्धात असुरक्षित होता आणि अशा घटना घडल्या की शौलने स्वतःचे जीवन संपवले. हे ह्या वचनांना एक मोठा संदर्भ पुरवतात.

पवित्र शास्त्राच्या वाचकांसाठी येथे एक महत्त्वाचा धडा आहे. जर आपला असा विश्वास असेल की पृथ्वीवरील येशूचे कार्य आम्हाला पित्याचे चरित्र दाखवणे होते आणि आम्ही समजतो की ख्रिस्ताला रोज त्रास सहन करावा लागतो कारण लोक त्याला दररोज नाकारतात, तर ह्या स्त्रीप्रमाणे, जेव्हा वाटतहि नसेल कि तो दयाळू आहे तेव्हा विश्वास ठेवू की तो खरोखर दयाळू आहे. आपल्या अंतःकरणात काय आहे हे दर्शवण्यासाठी कायदा एका आरशाप्रमाणे कार्य करतो जेणेकरून आपण ख्रिस्त आणि आपल्या स्वर्गीय पित्याबाबतीत स्वतःच्या इच्छा व प्रवृत्ती प्रगट करण्यापासून पश्चात्ताप करू.

> …तुझा विश्वास मोठा आहे. तुझ्या इच्छेप्रमाणे तुला प्राप्त होवो. मत्तय 15:28

## 10. आपणामध्ये देवाचे भय निर्माण करणे

> मग यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला व येशू वर यरुशलेमेस गेला. आणि मंदिरात गुरे, मेंढरे, कबुतरे विकणारे आणि सराफ हे बसलेले त्याला आढळले. तेव्हा त्याने दोऱ्यांचा एक कोरडा करून मेंढरे व गुरे ह्या सर्वांना मंदिरातून घालवून दिले. सराफांचा खुर्दाही ओतून टाकला व चौरंग पालथे केले. आणि तो कबुतरे विकणाऱ्यांना म्हणाला, "ही येथून काढून घ्या; माझ्या पित्याच्या घराची बाजारपेठ करू नका." तेव्हा 'तुझ्या मंदिराविषयीचा आवेश मला ग्रासून टाकील,' असा शास्त्रलेख असल्याचे त्याच्या शिष्यांना आठवले. मत्तय 2:13-17

> नंतर तो मंदिरात गेला व त्यात जे विक्री करत [व विकत घेत] होते त्यांना तो बाहेर घालवू लागला; आणि त्यांना म्हणाला, "'माझे घर प्रार्थनेचे घर होईल,' असा शास्त्रलेख आहे; परंतू त्याची तुम्ही 'लुटारूंची गुहा' केली आहे." लूक 19:45-46

वल्हांडण सणाची रचना पापी लोकांना हे शिकवण्यासाठी करण्यात आली होती की, देव त्याचा पुत्र जगाच्या तारणासाठी देऊन त्यांच्यावर किती प्रीती करतो. ह्या देवाच्या रचनेला इस्राएलच्या नेत्यांनी लोकांच्या खर्चावर स्वतःला समृद्ध करण्याच्या संधीमध्ये बदलले होते. प्रत्येक कुटुंबासाठी बलिदान आवश्यक होते आणि कोकरू खरेदी करण्यासाठी मंदिराच्या शेकेलसाठी स्थानिक चलनाची देवाणघेवाण करावी लागत असे. पैशाच्या या देवाणघेवाणीने बलिदान होणाऱ्या जनावरांच्या खरेदीसाठी जास्त किंमत देण्याचे साधन उपलब्ध झाले. गरीब आणि असुरक्षित लोकांना आवश्यक असलेले बलिदान मिळवणे खूप कठीण वाटले ज्यामुळे देवाची विपुल कृपा शिकवणाऱ्या पुरुषांकडून फसवणूक झाल्याची भावना त्यांच्यात निर्माण झाली.

जेव्हा येशूने मंदिराच्या दृश्याचे निरीक्षण केले तेव्हा त्याचे हृदय दुःखी झाले. जर ही प्रथा विरोधाशिवाय चालू राहिली असती तर, यामुळे लाखो लोक ख्रिस्ताला न ओळखता आणि तारण न मिळवता नष्ट झाले असते. कारण, सुवार्तेचे सत्य ह्या धार्मिक नेत्यांनी स्वतःच्या स्वार्थी लोभात वळवले होते. येथे आपल्याला देवाच्या चारित्र्याच्या एका पैलूची ओळख करून दिली जात आहे ज्याचा सहजपणे गैरसमज होतो. देवाने ही वाईट कृत्ये करणाऱ्या पुरुषांवर तितकेच प्रेम केले जितके त्याने याजकांकडून फसवणूक झालेल्यांवर केले.या याजकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि त्यांना वाचवण्यासाठी त्यांच्या पापी कृत्यांचा सामना करणे आवश्यक होते. पापमुक्तीसाठी जे सूत्र आहे ते खालीलप्रमाणे आहे:

> शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपूल झाली. रोमकरांस पत्र 5:20

मंदिरामधील त्यांचा राग आणि कडक व्यवहार हे राष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या याजकाच्या हृदयाच्या स्थितीचे प्रतिबिंब होते. जर त्यांनी या कृत्यांपासून पश्चात्ताप केला नाही तर ते मरतील.

जगाच्या तारण कर्त्याकडे मनुष्यांचा आत्मा वाचण्याची शक्ती आहे. ज्याप्रमाणे स्वर्गीय पित्याला प्रत्येक मनुष्याच्या डोक्यावरील केसांची संख्या माहीत असते, त्यांच्याप्रमाणे येशूला प्रत्येक मनुष्याचे विचार अगदी जवळून माहीत असतात. दैवत्व मानवतेतून झळकत असताना, ख्रिस्त त्याच्या सभोवताली असलेल्या सर्वांचे आंतरिक रहस्ये वाचतो. हा न्यायाचा क्षण होता; येशूच्या उपस्थितीत असलेल्यां सर्वांना याची जाणीव झाली की तारणारा त्यांच्या आत्म्यामधील सर्व गोष्टी वाचू शकतो. दुष्टांसाठी हा सर्वात भयानक अनुभव होता. दोरीचा चाबूक उचलण्याची कृती लोकांवर प्रहार करून त्यांना शारीरिक इजा पोहोचवण्यासाठी नव्हती, तर त्यांचा पापीपणा त्यांच्यासमोर ठसवण्यासाठी हि कृती होती. कोणीही मारला गेला नाही, व जखमी झाले नाही, परंतु त्यांनी ज्या वस्तूंचा व्यापार केला त्या वस्तू त्यांचा नाश करत असल्याची चेतावणी म्हणून नष्ट करण्यात आल्या.

तारणारा त्यांना त्यांची पापे दाखवत होता, त्यांचा नाश करण्यासाठी नव्हे तर त्यांना वाचवण्यासाठी. ह्या लोकांनी त्यांच्या समोर असलेला धोका पाहावा व पश्चात्ताप करावा आणि त्यांचे तारण व्हावे अशी त्याची इच्छा होती. जेव्हा देवाच्या आत्म्याने त्यांच्या अंतःकरणाचा शोध घेतला तेव्हा हे त्यांना त्यांच्या पापापासून वळण्यास आणि त्यांच्या दुष्ट कृत्यांबद्दल क्षमा मागण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी होते. त्याऐवजी, लोकांनी त्यांच्या पापांचा त्याग करण्याऐवजी त्याच्या उपस्थितीतून पळ काढला. त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिल्यामुळे त्यांना मंदिरातून काढण्यात आले. जर त्यांनी पश्चात्ताप केला असता तर त्यांना कृपा आणि मनःशांती मिळाली असती ज्यामुळे त्यांना त्याच्या उपस्थितीत राहता आले असते. पुष्कळजण ख्रिस्तापासून पळून जात असताना, इतरजण त्याच्याजवळ थांबले आणि त्यांनी त्याची शिकवण ऐकली.

> तो मंदिरात दररोज शिक्षण देत असे; पण मुख्य याजक, शास्त्री व लोकांचे पुढारी त्याचा घात करण्यास पाहत असत. लूक 19:47

जर येशू लोकांच्याप्रती रागाने आणि आक्रमकतेने भरलेला असता तर कोणीही त्याच्याजवळ थांबले नसते; सर्व पळून गेले असते. ज्यांनी नम्रपणे पश्चात्ताप केला, त्यांना तेथून जाण्याची काही गरज नव्हती कारण त्यांना येशूच्या उपस्थितीत निंदा वाटली नाही.

> म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच. [ते देहाप्रमाणे नाही तर आत्म्याप्रमाणे चालतात.] रोमकरांस पत्र 8:1

दुःखाची गोष्ट म्हणजे याजक आणि राज्यकर्त्यांनी देवाच्या आत्म्याला त्यांचे अंतःकरण शुद्ध करण्यासाठी परवानगी देण्यास नकार दिला. भौतिक मंदिर राष्ट्राच्या हृदयाचे प्रतिनिधित्व करते. पश्चात्तापाच्या अश्रूंनी मंदिर शुद्ध केले जाऊ शकले असते, परंतु त्याऐवजी घाबरलेल्या दुष्टांनी त्याच्या उपस्थितीतून पळून जाऊन ते मंदिर शुद्ध केले गेले. त्यांना वाचवण्यासाठी देवाचा आत्मा त्यांच्या जवळ येत होता, परंतु देवाचा आत्मा जितका जवळ आला तितके ते अधिक घाबरले.

> मी न्याय करायला तुमच्याकडे येईन; आणि जादूगार, व्यभिचारी, खोटे साक्षी ह्यांच्याविरुद्ध आणि मजुरांची मजुरी अडकवून ठेवणारे, विधवा व अनाथ ह्यांच्यावर जुलूम करणारे, आणि मला न भिता परक्याला न्याय मिळू न देणारे ह्यांच्याविरुद्ध साक्ष देण्याची मी त्वरा करीन. मलाखी 3:5

हे वचन वाचताना आपले स्वाभाविक विचार असे असतात कि देव आपल्या क्रोधाने दुष्टांचा नाश करणार आहे. पुन्हा पहा देवाचे वचन आरशासारखे कार्य करते. वचन म्हणते, "मी न्याय करायला तुमच्याकडे येईन" स्वर्गीय पित्याला आपल्या जवळ येऊन आपल्या पापांबद्दल संभाषण करायचे असते. इतक्या निःस्वार्थ आणि प्रेमळ देवाच्या सान्निध्यात येण्यासाठी पश्चात्ताप करण्याशिवाय किंवा प्रकाशापासून दूर पळून जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. देवाच्या सान्निध्यात निष्क्रिय राहणे अशक्य आहे. जे लोक त्यांच्या पापांना चिकटून आहेत ते असे दर्शवतात की त्यांना मृत्यू आवडतो आणि ते जीवनापासून पळ काढत आहेत.

मंदिराचे शुद्धीकरण स्वर्गात घडलेल्या एका दृश्यांचे प्रतिबिंबि करते ते म्हणजे जेव्हा लूसिफर आणि त्याच्या देवदूतांनी देवाविरुद्ध बंड केले. देवाच्या आत्म्याने त्यांना त्यांच्या चुकीच्या मार्गाबद्दल दोषी ठरवले, परंतु दुर्दैवाने त्यांनी क्षमा स्वीकारण्यास नकार दिला. ही घटना पवित्र शास्त्रात कोणत्या दोन प्रकारे व्यक्त केली आहे ते पहा:

> आणि ज्या देवदूतांनी आपले अधिकारपद न राखता आपले वसतिस्थान सोडले, त्यांना त्याने निरंतरच्या बंधनात, निबिड काळोखामध्ये महान दिवसाच्या न्यायाकरता राखून ठेवले. यहूदा 1:6

> कारण ज्या देवदूतांनी पाप केले त्यांची देवाने गय केली नाही; तर त्यांना नरकात टाकले आणि न्यायनिवाड्याकरता अंधकारमय खाड्यात राखून ठेवले; 2 पेत्र 2:4

तुम्ही हे वचन कसे वाचता? यहूदाच्या पुस्तकामध्ये आपल्याला सांगितले जाते की देवदूतांनी त्यांचे घर स्वर्गात सोडले. 2 पेत्र 2:4 मध्ये आपल्याला सांगितले जाते की देवाने पाप केलेल्या देवदूतांची गय केली नाही तर त्यांना नरकात आणि अंधारात टाकले.

जेव्हा देवाचा पुत्र आपल्या पित्याचे प्रतिनिधित्व करत न्यायनिवाड्यात त्यांच्या जवळ आला तेव्हा ते त्याच्या उपस्थितीत राहणे सहन करू शकले नाहीत. ख्रिस्त, जो मुख्य देवदूत मीखाएल आहे, त्याने या देवदूतांशी संभाषण केले आणि त्याने त्यांना प्रकाशाकडे वळण्यासाठी, पश्चात्ताप करण्यासाठी आणि पित्याकडे परत येण्याची विनंती केली.

> मग स्वर्गात युद्ध सुरू झाले; 'मीखाएल' व त्याचे दूत अजगराबरोबर 'युद्ध करण्यास' निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले; तरी त्यांचे काही चालले नाही, आणि स्वर्गात त्यांचे ठिकाणही उरले नाही. प्रकटी 12:7-8

स्वर्गातील युद्ध, देवाच्या मंदिरात त्याचा प्रभाव पसरवण्याचा प्रयत्न करणाऱ्या लुसिफरवर केंद्रित होते.

> तुझा व्यापार मोठा असल्यामुळे तुझ्या हृदयात अपकारबुद्धी शिरून तू पातक केलेस; म्हणून मी तुला भ्रष्ट समजून परमेश्वराच्या पर्वतावरून लोटून दिले. हे पाखर घालणाऱ्या करूबा! त्या अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांमधून काढून मी तुझा नाश केला आहे. यहेज्केल 28:16

पुन्हा एकदा पवित्र शास्त्र आपल्याशी आरश्याप्रमाणे बोलते. हे आपल्या अंतःकरणात काय आहे ते प्रकट करते. जेव्हा वचन असे म्हणते, "हे पाखर घालणाऱ्या करूबा! मी तुझा नाश केला आहे" तेव्हा हे कसे घडेल याचा न्याय करण्याचे आव्हान आम्हाला दिले जाते. जर लूसिफरने देवाच्या साम्राज्याविरुद्ध युद्ध करण्यास स्वतःला वचनबद्ध करण्यापूर्वी त्याचे चुकीचे कृत्य कबूल केले असते, तर तो वाचला असता. देवाच्या पुत्राने त्याच्या आत्म्याचे मंदिर शुद्ध करण्याच्या प्रयत्नाने हा मुद्दा चर्चेत आला, आणि जेव्हा ख्रिस्त त्याला त्याच्या चुकीबद्दल जाणीव करून देण्यासाठी त्याच्याकडे पोहोचला तेव्हा त्याने येशूला नकार दिला, त्याचे हृदय कठोर केले आणि तो पूर्णपणे पापात गेला. ख्रिस्ताच्या कृतींनी लूसिफरला प्रकाश नाकारण्यासाठी आणि स्वतःचा नाश करण्यासाठी जागा दिली. या प्रक्रियेत पवित्र शास्त्र सूचित करते की देवाने ही प्रक्रिया सुरू केली ज्यामुळे ल्युसिफरचा नाश होईल. हे त्यासारखेच आहे जेव्हा पवित्र शास्त्र म्हणते की देवाने फारोचे हृदय कठोर केले आहे. पश्चात्ताप करण्यासाठी देव फारोकडे पोहोचला पण

राजाने स्वतःचे हृदय कठोर करणे निवडले. सूर्याच्या प्रतिक्रियेमुळे चिकणमाती घट्ट होते का, की चिकणमातीतील घटक सूर्यप्रकाशावर प्रतिक्रिया देतात, ज्यामुळे ती कडक होते?

सैतान आणि त्याचे देवदूत स्वर्गातून बाहेर फेकले गेले नाहीत. देवाच्या आत्म्याला प्रतिसाद देण्यास नकार दिल्याने आणि त्याच्या उपस्थितीतून सुटण्याची इच्छा बाळगल्यामुळे सैतानाला बाहेर टाकण्यात आले. हिच प्रक्रिया मंदिरात घडली जेव्हा येशूने ते शुद्ध केले. त्याने लोकांना त्यांची चूक दाखवली, त्याने त्यांना त्यांच्या पापांबद्दल दोषी ठरवले, आणि जेव्हा आत्मा त्यांच्या जवळ आला आणि त्याने त्यांना पश्चात्ताप करण्याचे आवाहन केले, तेव्हा त्यांनी त्याला नकार दिला. या नकाराने त्यांच्यापैकी अनेकांना देवदूतांप्रमाणे अंधाराच्या साखळीत ठेवण्यात आले. जेव्हा देवाचा आत्मा मनुष्याच्या अंतकरणात पोहोचण्याचा थेट प्रयत्न करतो आणि देवाच्या आत्म्याला ठामपणे नकार दिला जातो, तेव्हा अंधार लगेच आत येतो आणि मनुष्याच्या अंतःकरणाला गुलाम बनवतो. त्या दिवशी ख्रिस्तापासून पळून गेलेले काही लोक अजूनही पश्चात्ताप करण्यास सक्षम होते, परंतु इतरांसाठी तो दिवस त्यांच्या नाशाची सुरुवात होती; आणि असे म्हटले जाऊ शकते की, ख्रिस्ताने त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नातून त्यांचा नाश केला.

या ज्ञानाने आपण पवित्र शास्त्रातील अनेक परिच्छेद वाचू शकतो. आणि जेव्हा लोक देवाच्या उपस्थितीत भयभीत झाले होते, ह्याचा अर्थ काय आहे, हे चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो.

> ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. निर्गम 23:27-28

किंग जेम्सने ज्या हिब्रू शब्दाचा नाश म्हणून अनुवाद केला आहे त्याचे अनेक खालील प्रकार आहेत:

> H2000 – हमाम: गोंगाटाने हालचाल करणे, गोंधळ घालणे, आवाज करणे, अस्वस्थ करणे, तोडणे, उपभोगणे, चिरडणे, नष्ट करणे, त्रास देणे.

यापैकी अनेक राष्ट्रांमध्ये देव जी भीती निर्माण करेल ती येशूने दुसऱ्यांदा मंदिराची शुद्धी करताना केली तशीच असेल. इस्राएलच्या आजूबाजूच्या या राष्ट्रांपैकी अनेकांनी त्यांच्या अधर्माचा प्याला भरला होता आणि ते अंतिम निर्णयाच्या टप्प्यावर होते. देवाने त्यांच्यात टाकलेली भीती ही त्यांच्या पापांची खात्री होती. देवाचा आत्मा न्यायाने त्यांच्या जवळ आला. दुर्दैवाने त्यांनी नकार दिला आणि यामुळे ते अस्वस्थ झाले, चिडले आणि गोंधळले. यहूद्यांनी येशूची दया स्विकारण्यास नकार दिल्याने त्यांना अखेरीस रोमने नष्ट केले. या आजूबाजूच्या राष्ट्रांनी त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप करण्यास नकार दिल्याने त्यांना इस्राएलच्या तलवारीचा सामना करावा लागला.  आम्ही भविष्यातील अध्यायात इस्त्राएलाच्या तलवारीचे परीक्षण करू परंतु आत्तापर्यंत आपण पाहतो की, या राष्ट्रांवर आलेला परमेश्वराचे भय हा देवाचा आत्मा होता. ज्याने त्यांना त्यांच्या

पापाबद्दल दोषी ठरवले आणि त्यांना वाचवण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांना पश्चात्ताप करण्यास प्रवृत्त केले.

त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याने त्यांची अंतःकरणे कठोर झाली आणि त्यामुळे त्यांनी जीवनापेक्षा मृत्यूचा पर्याय निवडला. त्यांच्या पापांबद्दल अपराधीपणाची भावना त्यांच्या आत्म्यात शिंगांसारखी होती. या राष्ट्रांनी ज्ञानाच्या सल्ल्यांवर लाथ मारली आणि देवाच्या उपस्थितीपासून, नाश करणाऱ्या सैतानाच्या हातामध्ये पळून गेले आणि त्यांचा नाश झाला.

> आणि रात्रीच्या शेवटच्या प्रहरी परमेश्वराने अग्नीच्या व मेघाच्या स्तंभातून मिसरी सेनेकडे पाहून त्यांची त्रेधा उडवली. त्याने त्यांच्या रथांची चाके काढून ते चालवणे कठीण केले; तेव्हा मिसरी लोक म्हणू लागले, "आपण इस्राएलांपासून पळून जाऊ, कारण परमेश्वर त्यांच्या बाजूने मिसऱ्यांशी लढत आहे." निर्गम 14:24-25

तांबड्या समुद्रात, परमेश्वराने मिसरी लोकांची त्रेधा उडविली. निर्गम 23:27 मध्ये देव राष्ट्रांवर दहशद घालेल असा उल्लेख केलेला तो हाच शब्द आहे.

मिसरी लोक देवाला इस्राएली लोकांइतकेच प्रिय होते. इस्राएल लोकांवर हल्ला करू नये म्हणून जेव्हा परमेश्वराने अग्नीचा स्तंभ उभारला तेव्हा मिसरी लोकांनी हे त्यांना घरी जाण्याचा देवाकडून आलेला इशारा म्हणून समजायला हवे होते. यामुळे ते घाबरले, पण त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिला. जेव्हा त्यांनी इस्राएल लोकांचा पाठलाग केला तेव्हा परमेश्वराने त्यांच्या रथाची चाके काढून टाकण्यासाठी आणि त्यांना पुढे जाण्यापासून रोखण्यासाठी देवदूतांना पाठवले. जेव्हा पाणी एकत्र आले, तेव्हा ते बुडाले हे सरळ आहे कि,त्यांच्या हट्टी नकाराने ते खोल पाण्यात बुडाले. त्यांना ठार मारण्यासाठी देवाने त्यांना पाण्यात आणले असा कोणताही पुरावा नाही. ही कारवाई करण्यापासून रोखण्यासाठी त्यांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले.

> आपण कादेश-बर्ण्या सोडून जेरेद नाल्यापलीकडे गेलो, त्याला अडतीस वर्षे लागली; ह्या अवधीत परमेश्वराने शपथ वाहिल्याप्रमाणे त्या सबंध पिढीतल्या योद्ध्यांचा छावणीत नाश झाला. त्यांचा नायनाट होईपर्यंत छावणीतून त्यांचा संहार करावा म्हणून परमेश्वराचा हात त्यांच्यावर उगारलेला होता. अनुवाद 2:14-15

इस्राएली लोकांना वर जाण्यासाठी आणि कनान देश घेण्यास आमंत्रित केले गेले होते, परंतु त्यांना त्या जागेतील राक्षसांची भिती वाटली आणि त्यांनी देवावर विश्वास ठेवण्यास नकार दिला. जेव्हा देवाने त्यांना सांगितले की,ते अविश्वासामुळे वचन दिलेल्या देशात जाऊ शकत नाहीत आणि वाळवंटातच मरतील, तेव्हा त्यांनी पुन्हा बंड केले आणि जाऊन लढण्याचा निर्धार केला. त्यांच्या शत्रूंचा मार खाल्ल्यानंतर त्यांनी सर्व गोष्टींसाठी मोशेला दोष दिला आणि त्याला ठार मारायचे ठरवले. इत्राएली लोक सतत कुरकुर करायचे की, देवाला त्यांना वाळवंटात मारायचे आहे आणि त्यांनी जसा न्याय केला तसेच त्यांच्यासोबत झाले. देवाने या गोष्टी घडू दिल्या या आशेने की ते त्यांची चूक समजतील, पश्चात्ताप करतील आणि क्षमा

मागतील. 40 वर्षांपर्यंत प्रभूने स्वतःचा आत्मा त्यांना नम्र करण्यासाठी आणि त्यांच्या पापाबद्दल पश्चात्ताप करण्याची विनंती करण्यासाठी पाठवला. जर त्यांनी पश्चात्ताप केला असता, तर ते वाळवंटात मरण पावले असते तरीही काही फरक पडला नसता; कारण त्यांना अनंतकाळचे जीवन मिळाले असते.

> कोणीतरी ‘त्यात यायचे होते,’ ते राहिले आहेत; आणि ज्यांना पूर्वी सुवार्ता सांगण्यात आली होती ते अवज्ञेमुळे ‘त्यात आले’ नाहीत; इब्री 4:6

किती दुःखाची गोष्ट आहे की, त्या सर्व इस्राएल लोकांनी ख्रिस्तामध्ये असलेल्या विसाव्यात प्रवेश करण्यास नकार दिला ज्यामुळे त्यांना क्षमा मिळाली असती. त्याऐवजी त्यांनी आत्म्याच्या विनवणीविरूद्ध स्वतःला कठोर केले, ज्यामुळे ते वाळवंटात मरण पावले आणि त्यांनी अनंतकाळचे जीवन गमावले. मग परमेश्वराने त्यांचा नाश केला काय? सूर्य चिकणमाती घट्ट करतो तितके त्याने प्रयन्त केले. देवाच्या सततच्या विनवणीने आणि त्यांच्या सततच्या नकारामुळे त्यांची अंतःकरणे कठोर झाली आणि त्यांचा नाश झाला.

जेव्हा तारणारा आपल्याकडे पापाच्या खोल खात्रीने येतो तेव्हा घाबरू नये आणि आपली हृदय कठोर करू नये. विश्वास ठेवा की, तुमचा पिता मुक्तपणे क्षमा करतो आणि आपले अपराध साफ करतो आपल्याला क्षमा, शांती व स्वातंत्र्याचा आनंद देतो. आपल्या आत्म्याच्या मंदिरात स्वर्गातील शांतीचा आनंद घ्या आणि आनंद करा की, तो त्याच्या गौरवासाठी आणि त्याच्या गौरवाने ते शुद्ध करण्यास तयार आहे.

या शेवटच्या दिवसांत एक संदेश जगाला जात आहे, ज्यात आपल्याला असे सांगण्यात येते कि "देवाची भीती बाळगा व त्याचा गौरव करा” प्रकटीकरण 14:7. जेव्हा आपण देवाच्या आत्म्याला आपल्या पापांबद्दल दोषी ठरवू देतो आणि त्याच्या आवाहनांचा प्रतिकार करत नाही, तेव्हा आपल्याला आशीर्वाद मिळेल आणि आपल्याला शहाणपण समजण्यास सुरवात होईल, कारण आपण वाचतो किः

> परमेश्वराचे भय ज्ञानाचा आरंभ होय; आणि परमपवित्राला ओळखणे हीच सुज्ञता होय. नीतिसूत्रे 9:10

## 11. परमेश्वराचा राग

ख्रिस्ताला वधस्तंभावर टांगण्याआधी एक आठवड्या अगोदर तो एका गाढवावर बसून यरुशलेहमध्ये मोठ्या लोकसमुदायाने वेढलेला होता.

> तेव्हा लोकसमुदायातील बहुतेकांनी आपली वस्त्रे वाटेवर पसरली; काही झाडांच्या डाहळ्या तोडत होते व त्या वाटेवर पसरत होते. आणि पुढे चालणारे व मागे चालणारे लोक गजर करत राहिले की, 'दाविदाच्या पुत्राला होसान्ना!' 'परमेश्वराच्या नावाने येणारा तो धन्यवादित!' 'ऊर्ध्वलोकी होसान्ना!'. मत्तय 21:8-9

शिष्यांना असे दिसून आले की त्यांच्या दीर्घकाळच्या आकांक्षा पूर्ण होत आहेत; शेवटी त्यांच्या गुरुला समुदायाने ओळखले. हळूहळू मोठा होणाऱ्या ह्या स्तुतीच्या मध्यभागी आम्ही वाचतो:

> मग तो शहराजवळ आल्यावर त्याच्याकडे पाहून त्याकरता रडत रडत म्हणाला, "जर तू, निदान आज शांतीच्या गोष्टी जाणून घेतल्या असत्या तर किती बरे झाले असते! परंतु आता त्या तुझ्या दृष्टीपासून गुप्त ठेवण्यात आल्या आहेत. लूक 19:41-42

जेव्हा येशूने शहराकडे पाहिले आणि या राष्ट्राने आपल्या पित्याविरुद्ध बंड करून जे काही केले आणि त्या दिवसापासून चाळीस वर्षांहून कमी काळात त्यांचे काय होईल याचा विचार केला तेव्हा तो रडू लागला. हे डोळ्यांतले हळुवार अश्रू नव्हते; ती एका तीव्र, अदम्य दु:खाची मुक्तता होती जी मोठ्या वेदनेने उफाळून येते. स्वर्गीय पित्याच्या चरित्राचे वर्णन करण्यासाठी वापरलेला एक शब्द म्हणजे सहनशीलता.

> परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर; निर्गम 34:6

या शब्दाचे खालीलप्रमाणे अर्थ आहेत:

> नाक किंवा नाकपुडी योग्यरित्या; म्हणून चेहरा, आणि कधीकधी एक व्यक्ती; तसेच (उत्कटतेने वेगवान श्वासोच्छवासामुळे) राग:- + आधी, चेहरा, चेहरा, + सहनशीलता, कपाळ, + [दीर्घ-] दुःख, नाक, नाकपुडी, थुंकी, योग्य, क्रोध.

> हन्नेला तो दुप्पट वाटा देई; कारण तिच्यावर त्याची प्रीती असे; परंतु परमेश्वराने तिची कूस बंद केली होती. 1 शमुवेल 1:5

हन्नावर प्रेम असल्यामुळे हन्नाला रागावलेला भाग दिला गेला असे म्हणण्यात काही अर्थ नाही. गेसेनियस हिब्रू-चाल्डी लेक्सिकॉनने ते व्यक्त केले आहे:

> कदाचित मनात दु:ख घेऊन; कारण राग दर्शविणारे शब्द कधी कधी दु:खाला लागू होतात.

येशूचे ज्वलंत अश्रू त्याच्या मुलांवर असलेल्या त्याच्या महान प्रेमाचा परिणाम होता. यात रागाचा समावेश होता का? होय; त्याच्या प्रिय मुलाना पापाने काय केले याचा राग आणि ते अश्रूंच्या तीव्र दु:खात व्यक्त केले जाते.

> कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. यशया 55:8-9

जेव्हा आपण पवित्र शास्त्रामध्ये प्रभूच्या क्रोधाबद्दल वाचतो तेव्हा ते आपल्याला योग्यरित्या समजले आहे याची खात्री आपल्याला असते का? येशू ज्या प्रकारे राग व्यक्त करतो ते पाहण्यासाठी आपण पुन्हा एकदा त्याच्या जीवनाकडे पाहुयात.

> [अहो शास्त्र्यांनो व परूश्यांनो, ढोंग्यानो! तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही विधवांची घरे खाऊन टाकता व ढोंगाने लांबलांब प्रार्थना करता; ह्यामुळे तुम्हांला अधिक शिक्षा होईल.] अहो शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो, ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही एक मतानुयायी मिळवण्यासाठी समुद्र व भूमी पालथी घालता आणि तो मिळाला म्हणजे तुम्ही त्याला आपणांहून दुप्पट असा नरकपुत्र करता. अहो आंधळ्या वाटाड्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! तुम्ही म्हणता, ‘कोणी मंदिराची शपथ घेतली तर त्यात काही नाही, परंतु कोणी मंदिराच्या सोन्याची शपथ

> घेतली तर मात्र तो बांधला जातो.' अहो मूर्खांनो आणि आंधळ्यांनो, ह्यांतून मोठे कोणते? ते सोने किंवा ज्याच्या योगाने ते सोने पवित्र झाले ते मंदिर?. मत्तय 23:14-17

या वचनांमध्ये येशू नक्कीच रागावलेला दिसतो. येशूने घोषित केलेल्या संकटांची अनेक वचने चालूच राहतात आणि नंतर आपण काहीतरी महत्त्वाचे वाचतो:

> यरुशलेमे, यरुशलेमे, संदेष्ट्यांचा घात करणारे व तुझ्याकडे पाठवलेल्यांना धोंडमार करणारे! जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली एकवटते, तसे तुझ्या मुलांबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती! मत्तय 23:37

येशूचे या गरीब आणि भटकलेल्या यहुदी नेत्यांवर प्रेम होते. त्याला ह्या सर्वांना स्वतःच्या संरक्षणाखाली एकत्र करायचे होते. कोंबडीचे पिल्लू गोळा करणाऱ्या एका कोंबडीच्या कोमल भाषेत तो असे बोलतो. हे तारणाऱ्याच्या प्रेमाचे एक हृदयस्पर्शी चित्र आहे. त्याचा राग हा त्याच्या खोल मनःपूर्वक दुःखाची अभिव्यक्ती आहे जी त्याने काही काळापूर्वीच रडताना प्रकट केली होती. मत्तय 23 च्या वचनात आपण देवाचा क्रोध प्रकट झालेला बघतो.

स्वर्गातून अग्नी बोलावण्याची जर कोणती वेळ होती तर ती वेळ हीच होती. कारण या याजकांमुळे संपूर्ण यहुदी राष्ट्राचे नुकसान होत होते. ते लोकांच्या मार्गात उभे राहत होते आणि पवित्र शास्त्राच्या शुद्ध शिकवणीला भ्रष्ट करत होते. त्यांना थांबवण्याची ही जागा नक्कीच असेल जेणेकरून सत्य जनतेपर्यंत पोहोचू शकेल. येशू तलवार उचलत नाही किंवा स्वर्गातून अग्नीही खाली बोलावत नाही परंतु तो हे पुढील शब्द बोलतो:

> पाहा, 'तुमचे घर तुमच्यासाठी ओसाड सोडले आहे.' मत्तय 23:38

येथे देवाच्या क्रोधाची समाप्ती आहे. देवाचा पुत्र बोलतो की राष्ट्राचे संरक्षण काढून टाकले गेले आहे. यानंतर सैतान यहुदी नेत्यांवर पूर्ण नियंत्रण ठेवण्यास सक्षम आहे ज्यामुळे ते लवकरच येशूला ठार मारण्याच्या योजनांमध्ये यशस्वी होतात. आम्ही काळजीपूर्वक लक्षात ठेवतो की जेव्हा येशूने घोषित केले की इस्रायलचे घर उजाड झाले आहे तेव्हा त्याने त्याच्या स्वतःच्या मृत्यूसाठी मार्ग तयार केला, त्याला विरोध करणाऱ्यांच्या मृत्यूसाठी नव्हे. जेव्हा देवाच्या आत्म्याने याजक आणि राज्यकर्त्यांपासून स्वतःला दूर केले तेव्हा त्यांना येशूला ठार मारण्यापासून थांबवण्यासाठी कोणीही नव्हते. सैतानाला ताबा घेण्याची संधी मिळाली, आणि चाळीस वर्षांच्या आत तो त्या शहराचा पूर्णपणे नाश करू शकला जिथे रोमन लोकांनी लाखो यहुद्यांना ठार मारले होते.

येथे देवाच्या क्रोधाची व्याख्या दुसऱ्या प्रकारे व्यक्त केली आहे:

त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. स्तोत्रसंहिता 78:49

नाश करणारा कोण आहे?

त्यांच्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, तेव्हा तुम्ही कुरकुर करू नका. 1 करिंथ 10:10

ग्रीकमध्ये नाश करणारा देवदूत या शब्दाचा अर्थ विषारी साप असा होतो.

अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे; इब्री भाषेतील त्यांचे नाव अबद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतील त्याचे नाव अपल्लूओन आहे. प्रकटी 9:11

नाश करणारा सैतान आहे. जेव्हा लोक ख्रिस्ताला नाकारण्यात टिकून राहतात आणि हे स्पष्ट करतात की त्यांना त्याच्याशी काहीही संबंध नाही, तेव्हा दुःखाच्या वेळी ख्रिस्त त्याच्या हरवलेल्या मुलांसाठी शोक करतो आणि त्यांना त्यांच्या निवडीचा मालक मिळू देतो. जेव्हा असे घडते तेव्हा प्रत्येक व्यक्तीभोवती ठेवलेले संरक्षणाचे कुंपण तोडले जाते.

सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले की, "ईयोब देवाचे भय काय फुकट बाळगतो? तो, त्याचे घर व त्याचे सर्वस्व ह्याभोवती तू कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हाताला यश दिले आहेस ना? व देशात त्याचे धन वृद्धी पावत आहे ना? ईयोब 1:9-10

परमेश्वराचा दूत त्याचे भय धरणाऱ्यांसभोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करतो. स्तोत्रसंहिता 34:7

जो खड्डा खणतो तोच त्यात पडतो; जो कुंपण तोडतो त्याला सर्प डसतो. उपदेशक 10:8

अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्यामुळे संरक्षणाचे कुंपण मोडले जात आहे?

तर आता चल, त्यांच्यासमक्ष हे पाटीवर लिही, टिपून ठेव म्हणजे ते पुढील पिढ्यांसाठी युगानुयुग राहील. कारण हे बंडखोर लोक आहेत, ही लबाड मुले आहेत; ज्यांना परमेश्वराचे नियमशास्त्र ऐकायला नको अशी ही मुले आहेत. ते द्रष्ट्यांना म्हणतात, "दृष्टान्त पाहून नका"; संदेष्ट्यांना म्हणतात, "आम्हांला यथार्थ गोष्टींचा संदेश सांगू नका, आम्हांला गोडगोड गोष्टी सांगा, कपटवचने सांगा; मार्गातून निघा, वाटेवरून दूर व्हा, आमच्यासमोरून इस्राएलाच्या पवित्र प्रभूस दूर करा." ह्यामुळे इस्राएलाचा पवित्र प्रभू म्हणतो, "तुम्ही ह्या वचनाचा धिक्कार करून बलात्कार व

कुटिलाचार ह्यांवर भिस्त ठेवता व अवलंबून राहता; म्हणून एकाएकी कोसळून पडणाऱ्या उंच भिंतीच्या सुटलेल्या भागाप्रमाणे ह्या अधर्माचे तुम्हांला अकस्मात फळ मिळेल; कुंभाराच्या मडक्याचा सपाट्यासरसा चुराडा होतो आणि पडलेल्या तुकड्यांत आगटीतून विस्तव घेण्यास किंवा हौदातून पाणी घेण्यास खापरीही सापडत नाही, तसा तो त्याचा चुराडा करील." यशया 30:8-14

तिच्यात संदेष्ट्यांनी एकोपा केला आहे; भक्ष्य फाडून खाणाऱ्या, गर्जणाऱ्या सिंहाप्रमाणे ते लोकांचे प्राण ग्रासून टाकतात; ते धन व पैका हरण करतात; ते तिच्या विधवांची संख्या वाढवतात. तिचे याजक माझ्या नियमशास्त्राचे उल्लंघन करून माझ्या पवित्र वस्तू भ्रष्ट करतात. पवित्र व अपवित्र ह्यांचा ते काही भेद ठेवत नाहीत; शुद्ध व अशुद्ध ह्यांचा फरक ते शिकवत नाहीत; ते माझ्या शब्बाथांविषयी डोळेझाक करतात; त्यांच्यामध्ये माझा अपमान होतो. तिच्यातले सरदार भक्ष्य फाडून खाणाऱ्या लांडग्यांसारखे आहेत; ते अन्यायाने कमाई करण्यासाठी रक्तपात करतात, मानवी प्राण्यांचा विनाश करतात. तिचे संदेष्टे कच्चा चुना त्यांच्याकरता वापरतात; मिथ्या दृष्टान्त पाहून ते त्यांना खोटे शकुन सांगतात व परमेश्वर बोलला नसताही प्रभू परमेश्वर म्हणतो, असे ते बोलतात. देशातील लोक बलात्कार व चोरी करतात. ते दुर्बल व दरिद्री ह्यांना चिरडून टाकतात आणि परदेशीयांवर अन्याय व जुलूम करतात. मी भूमीचा नाश करू नये म्हणून तिच्यातला कोणी तट बांधील, कोणी माझ्यासमोर देशासाठी तटाच्या खिंडीत उभा राहील की काय ह्याची मी वाट पाहिली, पण मला कोणी आढळला नाही. ह्यामुळे त्यांच्यावर मी आपल्या क्रोधाचा वर्षाव करीन; मी आपल्या कोपाग्नीने त्यांना भस्म करीन, त्यांच्या आचाराचे प्रतिफळ त्यांच्याच शिरी आणीन असे प्रभू परमेश्वर म्हणतो." यहेज्केल 22:25-31

हे मुख्य मुद्दे आहेत जे महत्वाची भूमिका बजावतात:

1. वैयक्तिक फायद्यासाठी लोकांचा गैरफायदा घेणे
2. कायद्याचे उल्लंघन करणे, बंड करणे
3. पवित्र गोष्टींना अपवित्र करणे, पवित्र आणि सामान्य यांचे मिश्रण करणे
4. शब्बाथांपासून स्वतःचे डोळे लपविणे
5. धार्मिक पुढारी देखील लोकांचा अप्रामाणिकपणे फायदा घेतल्यामुळे
6. भविष्यवक्ते आणि पुढारी खोटे बोलण्यामुळे

7. गरीब आणि गरजूं लोकांवर अत्याचार केल्यामुळे

जेव्हा देवाची मुले देवाच्या आज्ञा मोडतात आणि पश्चात्ताप करण्यास नकार देतात आणि दुष्ट गोष्टी करत राहतात, तेव्हा शेवटी देवाला अशा स्थितीत ठेवले जाते जेथे तो त्यांचे संरक्षण करू शकत नाही. यामुळे त्याला भयंकर दुःख होते. तो आपल्या मुलांचा त्याग करू इच्छित नाही, परंतु सैतान देवासमोर त्यांच्यावर आरोप ठेवतो आणि त्यांना ठेवण्याची मागणी करतो. या दुःखालाच परमेश्वराचा राग म्हणतात. हे अतिशय दुःखामुळे नाकातून जलद रितीने श्वास घेण्यासारखे आहे. यहेज्केल 22:25-31 मध्ये वर्णन केलेल्या यादीमध्ये मत्तय 23 मध्ये येशूने नमूद केल्या सारख्याच तक्रारी आहेत. यहेज्केलच्या काळात कुंपण काढून टाकण्यात आले आणि इस्रायलला बाबेलने कैद केले. ख्रिस्ताच्या दिवसांत कुंपण काढून टाकण्यात आले आणि रोमन लोकांनी येऊन यरुशलेहमचा नाश केला.

## सात प्रमुख मुद्दे ज्यांनी उल्लंघन निर्माण केले

| यहेज्केल **22:25-31** | मत्तय **23** |
|---|---|
| 1.वैयक्तिक फायद्यासाठी लोकांचा गैरफायदा घेणे. | मत्तय 23:25 अहो शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो, ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! तुम्ही ताटवाटी बाहेरून साफ करता, पण ती आतून जुलूम व असंयम ह्यांनी भरलेली आहेत. |
| 2.कायद्याचे उल्लंघन करणे | मत्तय 23:23 अहो शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो, ढोंग्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण पुदिना, बडीशेप व जिरे ह्यांचा दशांश तुम्ही देता, आणि नियमशास्त्रातील मुख्य गोष्टी म्हणजे न्याय, दया व विश्वास ह्या तुम्ही सोडल्या आहेत; ह्या करायच्या होत्या, तरी त्या सोडायला पाहिजेत असे नाही. |
| 3. पवित्र गोष्टींना अपवित्र करणे. पवित्र आणि सामान्य एकत्रित करणे. | मत्तय 23:16-20 अहो आंधळ्या वाटाड्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! तुम्ही म्हणता, ‘कोणी मंदिराची शपथ घेतली तर त्यात काही नाही, परंतु कोणी मंदिराच्या सोन्याची शपथ घेतली तर मात्र तो बांधला जातो.’ अहो मूर्खांनो आणि आंधळ्यांनो, ह्यांतून मोठे कोणते? ते सोने किंवा ज्याच्या योगाने ते सोने पवित्र झाले ते मंदिर तुम्ही म्हणता, ‘कोणी वेदीची शपथ घेतली तर त्यात काही नाही, परंतु कोणी तिच्यावरील अर्पणाची शपथ घेतली तर तो बांधला जातो.’ अहो मूर्खांनो व आंधळ्यांनो, ह्यांतून मोठे कोणते? अर्पण किंवा अर्पण पवित्र करणारी ती वेदी? म्हणून जो कोणी वेदीची शपथ घेतो तो तिची व तिच्यावर जे काही आहे त्याची शपथ घेतो; |
| 4.शब्बाथपासून ते त्यांचे डोळे लपवतात. | मत्तय 23:4 जड व वाहण्यास अवघड अशी ओझी बांधून ते लोकांच्या खांद्यांवर देतात, परंतु ती काढण्यास ते स्वत: बोटही लावायचे नाहीत. |

| | |
|---|---|
| 5.पुढाऱ्यांचा देखील ह्यात सहभाग आहे. | मत्तय 23:16 अहो आंधळ्या वाटाड्यांनो, तुमची केवढी दुर्दशा होणार! तुम्ही म्हणता, 'कोणी मंदिराची शपथ घेतली तर त्यात काही नाही, परंतु कोणी मंदिराच्या सोन्याची शपथ घेतली तर मात्र तो बांधला जातो.' |

| | |
|---|---|
| 6.भविष्यवाद करणारे पुढारी देखील खोटे बोलतात | मत्तय 23:28 तसे तुम्हीही बाहेरून लोकांना नीतिमान दिसता, परंतु आत ढोंगाने व अनीतीने भरलेले आहात. |
| 7.गरीब आणि गरजू लोकांवर अत्याचार करणे. | मत्तय 23:14 अहो शास्त्र्यांनो व परूश्यांनो, ढोंग्यानो! तुमची केवढी दुर्दशा होणार! कारण तुम्ही विधवांची घरे खाऊन टाकता व ढोंगाने लांबलांब प्रार्थना करता; ह्यामुळे तुम्हांला अधिक शिक्षा होईल. |
| | |

चला काही उदाहरणे विचारात घेऊया जिथे लोकांनी हे संरक्षणाचे कुंपणे मोडली.

> नाखोनाच्या खळ्याजवळ ते आले तेव्हा बैलाने ठोकर खाल्ली म्हणून उज्जाने देवाचा कोश हात लांब करून धरला. तेव्हा परमेश्वराचा कोप उज्जावर भडकला; त्याच्या ह्या चुकीमुळे परमेश्वराने त्याला ताडन केले व तो तेथल्या तेथे देवाच्या कोशाजवळ गतप्राण झाला. परमेश्वराने उज्जाला तडाका दिला म्हणून दावीद फार खिन्न झाला. त्याने त्या ठिकाणाचे नाव पेरेस-उज्जा (उज्जा-हनन) ठेवले; ते नाव आजवर चालत आहे.
>
> 2 शमुवेल 6:6-8

उज्जाविरुद्ध परमेश्वराचा भडकलेला राग हे शब्द आपल्याला देवाच्या चारित्र्याचा न्याय करण्यास आमंत्रित करतात. आपण आगोदर बघितल्याप्रमाणे, क्रोध आणि राग या शब्दांचे भाषांतर दुःख आणि अतिशय त्रास असे केले जाऊ शकते. त्याला माहित असताना योग्य नसलेली गोष्ट उज्जाने केली. त्याने स्वतःला अशा स्थितीत ठेवले होते जिथे त्याला संरक्षण मिळू शकत नव्हते. परमेश्वराचा आत्मा उज्जासाठी दुःखी झाला. प्रभु त्याला सोडू इच्छित नव्हता, परंतु उज्जाच्या उल्लंघनाने त्याला अशा ठिकाणी ठेवले जेथे परमेश्वराला त्याच्या संरक्षणामध्ये उल्लंघन होऊ द्यावे लागले. वचन सांगते कि परमेश्वराने उज्जाला तडाका दिला. म्हणजे परमेश्वराला उज्जाकडून माघार घ्यावी लागली होती, परंतु उज्जाने बंडखोरीचा मार्ग निवडला होता आणि परमेश्वराला त्याच्या निवडीचा आदर करावा लागला. उज्जाला स्वतःच्या हाताने मारणारा परमेश्वर नव्हता. उज्जाच्या बंडखोरीमुळे त्याच्या संरक्षणाचा भंग झाला.

उज्जाच्या अंतःकरणातील असंतोषाचे एक संभाव्य संकेत आधीच्या काही वचनात आढळतात.

त्यांनी देवाचा कोश एका नव्या गाडीत ठेवून टेकडीवरील अबीनादाबाच्या घरातून बाहेर काढला, अबीनादाबाचे पुत्र उज्जा व अह्यो हे दोघे ती नवी गाडी हाकत होते. त्यांनी देवाच्या कोशासहित ती गाडी टेकडीवरील अबीनादाबाच्या घरातून बाहेर काढली; अह्यो हा कोशापुढे चालत होता. 2 शमुवेल 6:3-4

अबिनादाबच्या दोन मुलांपैकी उज्जा हा प्रथम वचनात सूचीबद्ध केलेला आहे परंतु त्याच्या मोठ्या भावाच्या ऐवजी लहान भाऊ कोशापुढे चालत होता. उज्जा नात्यांमधील असलेल्या शत्रुत्वाच्या ईर्षेने भरला होता का? त्याच्या मनात आपल्या भावाबद्दल द्वेष होता का? कुंपण तुटण्यास कारणीभूत असलेली दुय्यम समस्या म्हणजे कराराचा कोश बैलांसह गाडीवर ठेवणे. मोशेने सूचित केले होते की तो कराराचा कोश याजकांनी वाहून नेला पाहिजे.

> परमेश्वराच्या कराराचा कोश वाहण्यासाठी परमेश्वरासमोर उभे राहून त्याची सेवा करायला व त्याच्या नावाने आशीर्वाद द्यायला त्या वेळेस परमेश्वराने लेवी वंशाला वेगळे केले अनुवाद 10:8

> त्यांनी लोकांना अशी आज्ञा केली की, "तुमचा देव परमेश्वर ह्याच्या कराराचा कोश लेवीय याजक वाहून नेत असताना तुम्ही पाहाल तेव्हा तळ हालवून त्याच्या पाठोपाठ जा; यहोशवा 3:3

हे दुय्यम उल्लंघन उज्जाशिवाय इतर कोणाकडूनही होणे शक्य नव्हते म्हणून उज्जाच्या हृदयात असे काहीतरी असण्याची शक्यता आहे ज्यामुळे संरक्षण काढून टाकले गेले.

मग तुम्ही कसे वाचता? तुम्ही परमेश्वराचे चरित्र रागाच्या रूपात वाचता कि ज्यामुळे त्याने उझ्झाला जमिनीवर ताडले, की तुम्ही दुःखात असलेल्या कोमळ पित्याला पाहता जो शेवटी बंडखोरीचा मार्ग स्वीकारण्यासाठी उज्जाला परवानगी देतो. आपण हे कसे वाचावे हे आपल्यापैकी प्रत्येकाने निवडले पाहिजे. आपल्या स्वर्गातील पित्याने अर्थाच्या रूपांना आपल्या आत्म्यात एक आरसा प्रदान करण्याची परवानगी दिली आहे जेणेकरून आपण वचनात कोणते चरित्र पाहतो हे आपण स्वतः ठरवू शकतो. वचनात आपण स्वतःचेच चरित्र पहातो का? चुक करणाऱ्यांना मृत्युदंड देणारी रागवलेली व्यक्ती आपण पाहतो, की उज्जाला त्याने स्वतः निवडलेल्या मालकाच्या म्हणजेच नाश करणारा सैतान ह्याच्या ताब्यात देण्याचा निर्णय घेण्यास भाग पडलेला दुःखी पित्याला आपण पाहतो?

> मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करीन. लेवीय 26:25

पवित्र शास्त्रात अनेक ठिकाणी आपण वाचतो की प्रभूचा क्रोध भडकला आणि लोकांवर तलवार, दुष्काळ आणि रोगराई कोसळली. आपण नुकतेच वाचलेले वचन आपल्याला सांगते की, लोक शत्रूच्या हाती दिले जातात. भडकणारा राग म्हणजे आपल्या पित्याला सहन न होणारे दुःखदायक त्रास आणि जेव्हा त्याची लेकरे त्याच्याविरुद्ध बंड करत राहतात त्यामुळे त्यांच्या संरक्षणासाठी तयार केलेल्या आज्ञांचे उल्लंघन होते.

आज आपण आपल्या पित्याचा आवाज लक्षपूर्वक ऐकू का?

> तुम्ही आपल्यासाठी मूर्ती करू नयेत; त्याचप्रमाणे कोरीव मूर्ती अथवा स्तंभ उभारू नयेत अथवा आकृती कोरलेला पाषाण पुजण्यासाठी आपल्या देशात स्थापन करू नये, कारण मी परमेश्वर तुमचा देव आहे. तुम्ही माझे शब्बाथ पाळावेत आणि माझ्या पवित्रस्थानाविषयी पूज्यबुद्धी बाळगावी; मी परमेश्वर आहे. तुम्ही माझ्या विधींप्रमाणे चालाल आणि माझ्या आज्ञा पाळून त्याप्रमाणे वागाल, 4तर नेमलेल्या काळात तुमच्याकरता मी पाऊस पाडीन, जमीन आपला उपज देईल व मळ्यातील झाडे आपापली फळे देतील. धान्याची मळणी तुम्ही द्राक्षाच्या हंगामापर्यंत करीत राहाल आणि द्राक्षांची तोडणी तुम्ही पेरणीच्या दिवसापर्यंत करीत राहाल; तुम्ही पोटभर अन्न खाल व आपल्या देशात सुरक्षित राहाल. मी तुमच्या देशाला शांतता देईन व तुम्ही झोपलेले असाल तेव्हा तुम्हांला कोणाची भीती राहणार नाही; मी देशातून हिंस्र पशू नाहीसे करीन, आणि तुमच्या देशावर तलवार चालणार नाही. लेवीय 26:1-6

जर आपण आनंदाने स्वतःला देवाच्या आज्ञांचे पालन करण्यास समर्पित करू आणि आपला परमेश्वर पिता आपल्याला आशीर्वाद देऊ इच्छितो यावर विश्वास ठेवण्याचे निवडू तर आपण स्वर्गीय देवदूतांच्या संरक्षणाचा आनंद घेऊ शकतो.

> जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो, तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील. परमेश्वराला मी “माझा आश्रय, माझा दुर्ग” असे म्हणतो; “तोच माझा देव, त्याच्यावर मी भाव ठेवतो.” कारण तो पारध्याच्या पाशापासून घातक मरीपासून तुझा बचाव करील. तो तुझ्यावर पाखर घालील, त्याच्या पंखांखाली तुला आश्रय मिळेल; त्याचे सत्य तुला ढाल व कवच आहे. स्तोत्रसंहिता 91:1-4

आपल्या आज्ञाभंगामुळे आपण आपला स्वर्गीय पिता आणि प्रभु येशूला दुःख आणि वेदना देऊ नये. त्याला आपले संरक्षण करण्याची आणि आपली काळजी घेण्याची इच्छा आहे. जर आपण बंड केले आणि शत्रूचा आत्मा निवडला, तर शेवटी त्या शत्रूला आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याची परवानगी दिली जाते. एखाद्याला ज्याच्यासोबत राहायचे नाही अशा व्यक्तीकडून सतत संरक्षण मिळत राहणे योग्य नाही.

यरुशलेहमचा नाश हा जगाच्या अंताची पूर्वछाया आहे. यहुदि राष्ट्राने जसे दोन हजार वर्षांपूर्वी देवाच्या पुत्राला नाकारले होते, त्याचप्रमाणे आज देवाच्या पुत्राला तिरस्कारित केले जाते आणि लोकांकडून नाकारले जाते. शब्बाथचा प्रभू त्याच्या उपासनेचा दिवस नाकारल्यामुळे तुच्छ मानला जातो. अनैतिकता आणि लोभ इतका वाढला आहे की शेवटी ख्रिस्त दुःखाने रडत जगाला म्हणेल, "तुमचे घर तुमच्यासाठी उजाड झाले आहे." मग पृथ्वीचा नाश करण्यासाठी जे पडलेले देवदूत आहेत ते पूर्णपणे सोडले जातील. आपण आपल्या तारणाऱ्याला धरून राहूयात आणि देवाच्या आज्ञा पाळणाऱ्या आणि येशूवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा भाग होण्यासाठी त्याच्या कृपेवर विश्वास ठेवूयात.

## 12. तलवारीला तिच्या योग्य जागी ठेवणे

जैतुनाच्या डोंगरावरील रात्रीच्या शांततेत, आपला प्रिय तारणारा त्याच्या पित्यासमोर विनवणी करीत होता.

> मग तो थोडासा पुढे जाऊन पालथा पडला आणि त्याने अशी प्रार्थना केली : “हे माझ्या बापा, होईल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो; तथापि माझ्या इच्छेप्रमाणे नको तर तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.” मत्तय 26:39

मानवी अपराधाचे संपूर्ण भार मनुष्याच्या पुत्रावर लादण्यात आले होते. त्याचा संघर्ष इतका महान होता की त्याच्या घामाचे थेंब रक्तासारखे पडत होते. देवाच्या कोकऱ्याने स्वतःवर घेतलेल्या पापाच्या अंधाराचा सामना पित्याच्या शुद्ध आणि सर्वव्यापी गौरवाने केला. आपल्या पित्याला त्याने स्वतःवर घेतलेली पापे किती घृणास्पद आहेत हे जाणून तो पानासारखा हलला. संदेष्ट्याच्या शब्दात असे म्हटले होते:

> “अगे तलवारी, माझ्या मेंढपाळावर व जो पुरुष माझा सोबती त्याच्यावर ऊठ; मेंढपाळावर प्रहार कर म्हणजे मेंढरे विखरतील; माझ्या लहानग्यांवर मी माझ्या हाताची छाया करीन.” जखऱ्या 13:7

या क्षणी तलवार ही आत्म्याची तलवार होती. ख्रिस्ताने मनुष्याला वाचवण्यासाठी ही तलवार हातात घेतल्याने त्याने त्याच्या जीवनीय शक्तींचा नाश केला. जेव्हा मनुष्य रक्ताचा घाम गाळतो तेव्हा तो मृत्यूच्या टप्प्यावर असतो. केवळ स्वर्गीय पित्याच्या बळकट हाताने त्याला बागेतून बाहेर येण्यास आणि यहुदी नेत्यांच्या हातांनी उचललेल्या रोमन तलवारीचा सामना करण्यास सक्षम केले.

जेव्हा मंदिराचे सैनिक यहूदासोबत येशूला पकडण्यासाठी आले, तेव्हा पेत्र, यहूदा मकाबी व त्याच्या सर्व पूर्वजांच्या आत्म्याने उठला ज्यांनी त्यांच्या मौल्यवान वस्तूंच्या बचावासाठी तलवार उचलली होती. येशूने पेत्राला सांगितले होते की तो मनुष्यांचे जीवन नष्ट करण्यासाठी आला नाही तर त्यांना वाचवण्यासाठी आला होता, तरीही पेत्राला मृत येशू म्हणजे त्याच्या सर्व आशा संपल्यासारख्या वाटल्या. दुःखाची गोष्ट म्हणजे, त्याने उचललेली तलवार ख्रिस्ताच्या रक्षणापेक्षा त्याच्या स्वतःच्या इच्छांसाठी होती.

> शिमोन पेत्राजवळ तलवार होती, ती त्याने उपसून प्रमुख याजकाच्या दासावर चालवली आणि त्याचा उजवा कान कापून टाकला; त्या दासाचे नाव मल्ख होते. योहान 18:10

जेव्हा येशूने मल्खला बरे केले, तेव्हा त्याने स्वतःचे आणि सत्याचे रक्षण करण्यासाठी शारीरिक तलवार वापरण्यापासून स्वतःला दूर केले. मग तो म्हणाला:

> तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील. तुला असे वाटते काय की, मला माझ्या पित्याजवळ मागता येत नाही, आणि आताच्या आता तो मला देवदूतांच्या बारा सैन्यांपेक्षा अधिक पाठवून देणार नाही? पण असे झाले तर ह्याप्रमाणे घडले पाहिजे, हे म्हणणारे शास्त्रलेख कसे पूर्ण व्हावेत?” मत्तय 26:52-54

येशूच्या शब्दांना आध्यात्मिक आणि भौतिक असे दोन्ही अर्थ आहेत. जेव्हा एखादा मनुष्य देवाचे वचन अंगीकारतो, तेव्हा ते वचन त्याचे जुने जीवन मरून टाकतो जेणेकरून त्याला ख्रिस्त येशूमध्ये जीवनाच्या नवीनतेमध्ये उठवले जावे. त्याच वेळी याचा अर्थ असा आहे की जे भौतिक तलवार उचलतात ते त्याच तलवारीने मरतील. येशूने आपल्यासाठी एक महत्त्वपूर्ण धडा दिला आहे की आपण प्रार्थनेवर आणि आपल्या पित्याच्या देवदूतांच्या काळजीवर विश्वास ठेवला पाहिजे आणि आपल्याला वाचवण्यासाठी उचलेल्या तलवारीवर नाही. तारणाऱ्याचे हे उदाहरण आपल्यासाठी एक स्पष्ट संदेश असू द्या. येशूने कधीही कोणालाही मारले नाही, किंवा जखमी केले नाही. येशूने आपल्यासाठी एक आदर्श ठेवला आहे ज्याचे अनुसरण आपण केले पाहिजे.

> कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे. त्याने पाप ‘केले नाही, आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही.’ त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही; दुःख भोगत असता त्याने धमकावले नाही; तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वतःला सोपवून दिले. 1 पेत्र 2:21-23

[2] जुडास मॅकॅबियस हा एक यहुदी धर्मगुरू आणि याजक मॅटाथियासचा मुलगा होता. त्याने सेलुसिड साम्राज्याविरुद्ध मॅकैबियन बंडाचे नेतृत्व केले होते. (167–160 BCE).

येशूच्या जीवनाचा विचार करून, एक मोठा प्रश्न ज्याचा आपण सामना केला पाहिजे तो म्हणजे: इस्त्रायल त्यांच्या शत्रूंना तलवारीने मारतात अशा हिंसक जुन्या कराराच्या कथांचे स्पष्टीकरण कसे द्यावे? इस्राएल राष्ट्राने इजिप्त सोडल्यावर परमेश्वराने त्यांना सांगितले होते की तो त्यांच्या सभोवतालच्या राष्ट्रांशी कसा व्यवहार करेल.

> ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. मी त्यांना एका वर्षातच घालवून देईन असे नाही; तसे केले तर देश उजाड होईल आणि वनपशू फार होऊन तुला उपद्रव देतील. तुझी संख्या वाढून तू देशाचा ताबा घेशील तोपर्यंत मी हळूहळू तुझ्यापुढून त्यांना घालवून देईन. निर्गम 23:27-30

जर इस्राएल लोक देवाशी विश्वासू राहिले असते तर येशूने मंदिराची ज्याप्रमाणे स्वच्छता केली तशीच कनानची भूमी शुद्ध झाली असती. देवाच्या आत्म्याने या राष्ट्रांना त्यांच्या पापाबद्दल दोषी ठरवले असते, नंतर त्यांच्या अस्वस्थतेत, ते एकतर पळून गेले असते किंवा त्यांनी कबूल केले असते, पश्चात्ताप केला असता आणि इस्राएलमध्ये सामील झाले असते आणि इस्राएलच्या देवाचे अनुसरण करण्यास शिकले असते. आम्ही हा मुद्दा लक्षात ठेऊ की वचनात म्हटले आहे की राष्ट्रांना हाकलून लावले जाईल, मारले जाणार नाही.

जर देवाला पाहिजे असते कि त्याच्या लोकांनी त्यांच्या शत्रूंना पूर्णपणे नष्ट करावे तर त्याने जेव्हा मोशेने त्या मिसरी शिपायाला मारले तेव्हा त्याने जे काही केले होते त्याहून अधिक करण्यास प्रोत्साहित केले असते. त्याऐवजी त्याने मोशेला मेंढरांची काळजी घेण्यासाठी चाळीस वर्षे वाळवंटात पाठवले. फारोचा नातू म्हणून मोशेने बलाढ्य सेनापतीचे सर्व प्रशिक्षण आधीच घेतले होते. देवाने या अत्यंत कुशल सेनापतीला मेंढरांची काळजी घेण्यासाठी वाळवंटात का जाऊ दिले? त्याने लोकांची काळजी कशी घ्यावी हे त्याला मोशेला शिकवायचे होते. इस्रायलने युद्ध करून कनानचा देश घ्यावा असा देवाचा हेतू नव्हता.

इजिप्तमधून इस्रायलची सुटका करताना त्यांनी परमेश्वराशी परिचित व्हावे आणि त्याच्यावर विश्वास ठेवायला शिकावे असा त्याचा हेतू होता. मिसर देशात राहत असताना इस्त्रायली लोक अत्याचाराच्या आत्म्याने वेढलेले होते. ईब्री मुलांना नदीत फेकून देण्यात आले होते आणि इजिप्तमध्ये त्यांच्यावर होणारे कठोर जुलूम आणि अत्याचाराच्या अनुभवामुळे अनेक इस्रायली लोकांना देव हा देखील जुलमी आहे असे वाटू लागले, जो कधीही त्यांच्याविरुद्ध उठून त्यांचा नाश करू शकतो. त्यांच्यात असेलेली ही भीती सुरुवातीपासून व्यक्त झालेली दिसते:

> ते मोशेला म्हणाले, “मिसरात काय कबरा नव्हत्या म्हणून तू आम्हांला येथे रानात मरायला आणले? आम्हांला तू मिसरातून बाहेर आणले ते काय म्हणून? निर्गम 14:11

ही भीती आम्हाला एदेन बागेत परत घेऊन जाते जेव्हा सैतानाने आदाम आणि हव्वेला खात्री दिली की देवाने सांगितले त्याप्रमाणे ते नक्कीच मरतील आणि परमेश्वरच त्यांना मारायला येईल.

> तो म्हणाला, “मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.” उत्पत्ती 3:10

मोशेविरुद्ध कुरकुर करताना इस्त्राएलाने त्यांना जाणवत असलेली देवाबद्दलची भीती लपवून ठेवली. तरीही मोशेने स्वतःच्या सामर्थ्याने लोकांना बाहेर काढले नव्हते हे स्पष्टपणे दिसून आले. सैतान त्यांना असा विचार करण्यास प्रवृत्त करत होता की देव त्यांना वाळवंटातच मारणार आहे. हा दुर्विचार केवळ देवाच्या चारित्र्याबद्दलच्या चुकीच्या समजुतीमुळेच शक्य झाला. पाहता पाहता ही भीती इस्रायली लोकांमध्ये वाढतच चालली आहे.

> इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, “आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे.” निर्गम 16:3

इस्त्रायली लोक म्हणाले की त्यांना देवाची भीती वाटते आणि त्यांच्या सध्याच्या परिस्थितीतल दुःखसहनाऐवजी ते इजिप्तमध्येच मरण पावले असते अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी स्पष्टपणे देवावर विश्वास ठेवला नाही आणि सैतानाने त्यांची अंतःकरणे देवाच्या खऱ्या चरित्रापासून अलूप्त ठेवलेली होती.

निर्गमच्या पुढच्याच अध्यायात इस्राएल लोक त्यांच्या देवाविषयीच्या असलेल्या विकृत कल्पना आणखी प्रकट करतात:

> पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, “आम्हांला, आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस?” मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, “ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार झाले आहेत.” निर्गम 17:3-4

ते मोशेविरुद्ध तक्रार आणि कुरकुर करत राहतात आणि म्हणूनच देव त्यांना मारून टाकणारा आहे असा त्यांनी विचार केला. हिंसक देवाबद्दलचा त्यांचा मूर्तिपूजक दृष्टिकोन आत मोशेला मारण्याच्या धमक्यांमध्ये बदलू लागतो. हिंसक

देवाची ही खोटी कल्पना पाहून ते त्यांच्या कल्पनांप्रमाणे होऊ लागतात आणि देवाने त्यांना मिसर देशातून वाचवण्यासाठी ज्या सेवकाचा वापर केला त्याच्याविरुद्‌ध हे लोक हिंसक कृत्ये रचतात.

सतत कुरकुर करणे, तक्रार करणे आणि देवावरील अविश्वास ह्या गोष्टी परमेश्वराला अशा स्थितीत आणतात जेथे तो त्यांचे संरक्षण करण्यास असक्षम आहे. ते सैतानाला त्यांचा स्वामी म्हणून निवडत आहेत आणि सैतान त्यांचा नाश करण्यासाठी प्रवेशाची मागणी करत आहे. पाण्याबद्‌दलच्या तक्रारी आणि अमालेक्यांच्या हल्ल्याचा संबंध आपण खालीलप्रमाणे पाहतो:

> मोशेने त्या ठिकाणाचे नाव मस्सा आणि मरीबा असे ठेवले, कारण इस्राएल लोकांनी तेथे कलह केला आणि "परमेश्वर आमच्यामध्ये आहे किंवा नाही" असे म्हणून परमेश्वराची परीक्षा पाहिली. अमालेकाबरोबर युद्‌ध मग अमालेक येऊन रफीदीम येथे इस्राएल लोकांशी लढू लागला. निर्गम 17:7-8

इस्त्रायली लोकांच्या सततच्या कुरकुरिने सैतानासाठी द्‌वार उघडले गेले ज्यामुळे अमालेकि लोक त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी भडकले. इस्राएली लोकांनी परमेश्वरावर विश्वास ठेवला असता तर हे घडले नसते. अमालेकी लोक त्यांना स्पर्श देखील करण्यास घाबरले असते. याउलट इस्राएलने देवाविरुद्‌ध केलेल्या पापाबद्‌दल पश्चात्ताप केल्याचा कोणताही पुरावा नाही. जुलमी परमेश्वराचा हेतू त्यांना ठार मारण्याचा आहे असा देवाबद्‌दल चुकीचा दृष्टिकोन त्यांचा होता. पाणी मिळाल्यावर त्यांनी आभारप्रदर्शन केले याचा कोणताही पुरावा नाही. पाण्याची याचना केल्याबद्‌दल मोशेची त्यांनी माफी मागितली किंवा त्याचे आभार मानले असे कोणतेही विधान आम्हाला सापडत नाही. इस्राएली लोकांनी मोशेला ठार मारण्याची धमकी दिली होती. यामुळे मोशेला किती दुःख झाले असेल याची आपण कल्पना करू शकतो का? तो त्याच्या वनातील शांत प्रदेशात राहून त्याच्या कुटुंबाची आणि त्याच्या कळपांची काळजी घेऊ शकला असता. मोशेसाठी ही खरी परीक्षा ठरली असती. मग विचारांच्या या संघर्ष्यात त्याला अमालेकी लोक हल्ले करत आहेत आणि दुर्बलांना उचलून नेत आहेत असा संदेश मिळतो. पुढे काय होते ते महत्वाचा भाग आहे. दबाव आणि निराशाजनक परिस्थितीत घेतलेला हा निर्णय आहे.

> तेव्हा मोशेने यहोशवाला सांगितले, "आपल्यांतले काही पुरुष निवडून काढ आणि जाऊन अमालेकाशी युद्‌ध कर; उद्‌या मी देवाची काठी हाती घेऊन टेकडीच्या माथ्यावर उभा राहीन." निर्गम 17:9

"आणि परमेश्वराने मोशेला आज्ञा केली" असे लिहिलेले नाही. मोशेने अभयारण्यात जाऊन प्रभूशी विनवणी केली असेही लिहिलेले नाही. त्यात फक्त असे म्हटले आहे की मोशेने यहोशवाला जाऊन लढायला सांगितले. मोशे यहोशवाकडे चालत जात असल्याचे दृश्य मी चित्रित करत असताना सर्व काही मंद गतीने होते आणि माझे विचार त्या काळाकडे वळले जेव्हा मोशेच्या वंशातील एका माणसाने आपल्या

कुटुंबाचा अपमान करणाऱ्यांवर तलवार उगारली होती.

> तिसऱ्या दिवशी असे झाले की, ते बेजार असता याकोबाचे दोन मुलगे, म्हणजे दीनेचे भाऊ शिमोन व लेवी ह्यांनी आपापली तलवार हाती घेऊन त्या नगरावर अचानक छापा घातला आणि तेथील सर्व पुरुषांची कत्तल केली. हमोर व त्याचा मुलगा शखेम ह्यांचाही तलवारीने वध करून ते दीनेस शखेमाच्या घरातून काढून घेऊन गेले. मग याकोबाच्या मुलांनी त्या वध केलेल्यांवरून जाऊन ते नगर लुटले, कारण त्यांनी त्यांची बहीण दीना हिला भ्रष्ट केले होते. त्यांची शेरडेमेंढरे, गाईबैल, गाढवे आणि त्या नगरातले व शेतातले होते नव्हते ते सारे त्यांनी घेतले. त्यांचे अवघे धन, त्यांची सर्व मुलेबाळे व स्त्रिया आणि त्यांच्या घरात जे काही सापडले ते सगळे हस्तगत करून त्यांनी लुटले. उत्पत्ती 34:25-29

याकोब प्रामाणिकपणे असे म्हणू शकतो की त्याचे वंशज कनानी आणि परिज्जी लोकांना वाईट व चुकीचे वाटतील. याकोबच्या मुलांनी तलवार उचलली होती आणि अशा प्रकारे तलवार पिढ्यानपिढ्या त्यांच्या मागे जाईल. लेवीच्या मुलांनी आपल्या बहिणीविषयी सूड घेण्यासाठी शकेमांना मारले याबद्दलचे परिणाम आपण पाहतो काय? आपल्या वडिलांनी आपल्या बहिणीचे रक्षण करण्यासाठी जे काही केले त्याबद्दल लेवीच्या मुलांना अभिमान वाटेल काय? सैतान त्यांना असे सुचवणार नाही का की लेवी स्वतःचे रक्षण करणाच्या या कृतीत योग्य आहेत? तुमचे वडील खूनी होते आणि पिढ्यानपिढ्या याची लाज तुम्हाला वाहावी लागेल हे सांगण्यापेक्षा हि कथा सांगणे सोपे जाईल काय? हा सगळा इतिहास आता यहोशवाकडे मोशेच्या मागे चालत आहे.

वाळवंटातील चाळीस वर्षाच्या प्रवासाने मोशेला त्याच्या स्वतःच्या निर्णयांद्वारे इस्राएली लोकांचे संरक्षण करण्याच्या मोहातून मुक्त केले होते काय? अमालेकने छावणीतील काही दुर्बलांना आधीच मारले आहे हे मोशेला कळले असते काय? त्याच्या मृत्यूच्या अगदी काही क्षणाआधी मोशेने हे आठवले:

> तुम्ही मिसर देशातून बाहेर निघालात तेव्हा वाटेने अमालेक तुमच्याशी कसा वागला ह्याची आठवण ठेवा; वाटेत तुला गाठून तू थकला भागलेला असताना त्याने देवाला न भिता दमून मागे पडलेल्या तुझ्या सगळ्या लोकांवर हल्ला चढवून त्यांना ठार मारले. म्हणून तुझा देव परमेश्वर जो देश तुला वतन म्हणून देत आहे त्यात चोहोकडल्या सर्व शत्रूंपासून तुझा देव परमेश्वर ह्याने तुला विश्राम दिल्यावर अमालेकाची आठवण पृथ्वीतलावरून बुजवून टाक; विसरू नकोस. अनुवाद 25:17-19

इस्त्रायलला जगाच्या नजरेत वाईट आणि कलंकित बनवावे म्हणून सैतानाने हे सर्व डाव रचले होते हे लक्षात येते कि नाही? त्याने इस्राएलला पुन्हा एकदा तलवार हाती घेण्यास प्रवृत्त केले आणि अशा प्रकारे देवाचे चरित्र कालांतराने चुकीचे चित्रित केले गेले कि नाही? त्यांची ही कृती इस्त्राएलाने ज्या देवाची कल्पना केली होती त्याचे प्रकटीकरण नव्हते काय? गरज असताना हा त्यांचा काल्पनिक देव त्यांना पाणीही

पुरवू शकला नाही, तर अमालेक्यांच्या हातून ते मरतील याची काळजी तो का करेल?

कोराह, दाथान आणि अबीराम आणि 250 राजपुत्रांच्या कथेत आपण पाहतो की त्यांना वाळवंटात मारण्याची इच्छा असलेल्या देवाबद्दलची ही भीती त्यांना मोशे आणि अहरोन ह्यांच्या व्यतिरिक्त दुसरे नेतृत्व शोधण्यास प्रवृत्त करते. मग, जेव्हा ते कनानच्या सीमेवर आले, तेव्हा दहा जासूदांनी त्या देशाची वाईट बातमी दिली कारण त्यांना विश्वास बसत नव्हता की देव त्यांच्यावर खरचं प्रेम करतो आणि त्यांच्यासाठी जे चांगले तेच पाहत असतो. त्यांना त्यांच्या मनातील गैरसमजांपासून शुद्ध करण्यासाठी देवाचे हे शुद्ध हेतू आहेत यावर विश्वास न ठेवता, त्यांनी देवाच्या सर्व संरक्षणाकडे आणि त्याच्या काळजीकडे दुर्लक्ष केले आणि कोणत्याही नकारात्मक गोष्टीवर लक्ष केंद्रित केले. सैतान त्यांना या गोष्टींमुळे सहज मोहात पाडू शकतो कारण त्यांचा अश्या  देवावर विश्वास होता जो त्यांना कधीही त्याच्या मनात येईल त्याप्रमाणे मारू शकतो.

> सर्व इस्राएल लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले; सर्व मंडळी त्यांना म्हणाली, “आम्ही मिसर देशात मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानात मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा निःपात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हांला ह्या देशात का नेत आहे? आमच्या बायकामुलांची लूट होईल! आम्ही मिसर देशात परत जावे हेच बरे नव्हे काय?” गणना 14:2-3

> आणि ह्या सर्व लोकांनी माझा महिमा आणि मिसर देशात व रानात मी केलेली चिन्हे पाहूनही दहादा माझी परीक्षा पाहिली आणि माझे सांगणे ऐकले नाही; म्हणून जो देश मी त्यांच्या पूर्वजांना शपथपूर्वक देऊ केला आहे तो खरोखर त्यांच्या दृष्टीस पडायचा नाही; ज्यांनी मला तुच्छ लेखले त्यांतले कोणीही तो देश पाहणार नाहीत. गणना 14:22-23

जेव्हा इस्त्राएलाला सांगण्यात आले की ते त्यांच्या पापामुळे जमीन ताब्यात घेऊ शकत नाहीत, तेव्हा त्यांनी पुन्हा बंड केले आणि वर जाऊन लढण्याचा निर्धार केला, परंतु देवाने त्यांना लढण्याची आज्ञा दिली नव्हती. मग चाळीस वर्षे उलटून गेल्यावर आणि एक संपूर्ण पिढी मृत्यू पावल्यानंतर ते पुन्हा सीमेवर आले. वडिलांची पापे त्यांच्या मुलांच्या तोंडात अजूनही होती:

> ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की, "तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले? येथे तर अन्न नाही व पाणीही नाही, आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत." गणना 21:5

सैतान हा सुरवातीपासून मोशेवर काम करत होता आणि त्याला या दुष्ट लोकांचा त्याग करण्यास प्रोत्साहित करत होता. देवाने या मुद्द्यावर मोशेची परीक्षा घेतली होती आणि कृतज्ञतापूर्वक मोशेने ख्रिस्ताच्या आत्म्याला प्रतिसाद दिला होता आणि त्याने देवाला कृपापूर्वक विनंती करून लोकांना क्षमा करण्यास सांगितले होते आणि देवाने ते स्वइच्छेने केलेही. तरी, आता इस्राएल पूर्वीपेक्षा वाईट असल्याचे पाहून मोशेला मोहात टाकण्यात आले.

> मोशे व अहरोन ह्यांनी मंडळीला खडकासमोर जमा केले, आणि त्यांना मोशे म्हणाला, "अहो, बंडखोरांनो, ऐका; तुमच्यासाठी आम्ही ह्या खडकातून पाणी काढायचे काय?" मग मोशेने हात उचलून त्या खडकावर दोनदा काठी मारली, तेव्हा त्यातून विपुल पाणी वाहू लागले, आणि ती मंडळी व त्यांची जनावरे पाणी प्याली. गणना 20:10-11

मोशेने या मोहाला बळी पडल्यामुळे सैतानाला इस्राएल लोकांच्या मनात अधिक प्रवेश मिळाला. मोशेने त्यांच्यासाठी प्रार्थना केली होती आणि तो अनेक मार्गांनी त्यांच्या आणि सैतानामध्ये उभा राहिला होता. तरीही या कृतीमुळे सैतानाला फायदा झाला. या अपयशामुळे अहरोनाचा जीव घेण्यास सैतानाला आनंद झाला.

> "अहरोन आता आपल्या पूर्वजांना जाऊन मिळेल; जो देश मी इस्राएल लोकांना दिला आहे त्यात त्याचा प्रवेश होणार नाही; कारण तुम्ही मरीबाच्या पाण्याजवळ माझ्या आज्ञेचे उल्लंघन करून बंड केले. गणना 20:24

इस्त्रायली लोकांच्या मनात अधिक प्रवेश करून, सैतानाने त्यांना देवाला नवस घालण्यास प्रवृत्त केले तो असा देव ज्याची त्यांनी कल्पना केली होती असा देव ज्या देवाला लोकांना मारायला आवडते. त्यांच्या पापांमुळे दुसऱ्या टोळीनि त्यांच्यावर हल्ला केला होता आणि आता त्यांच्या हताश झालेल्या अवस्थेत त्यांनी देवाला नवस केला:

> अथारीमच्या वाटेने इस्राएल लोक येत आहेत असे नेगेब प्रदेशात राहणाऱ्या अरादाच्या कनानी राजाने ऐकले, तेव्हा त्याने इस्राएलांशी युद्ध करून कित्येकांना कैद केले. तेव्हा इस्राएलाने परमेश्वराला असा नवस केला की, "जर तू खरोखर ह्या लोकांना माझ्या हाती देशील तर मी त्यांच्या नगरांचा समूळ नाश करीन." इस्राएलाचे हे म्हणणे ऐकून परमेश्वराने कनानी लोकांना त्याच्या हाती दिले आणि त्याने त्यांचा व त्यांच्या नगरांचा समूळ नाश केला; म्हणून त्या ठिकाणाचे नाव हर्मा (म्हणजे विनाश) असे पडले. गणना 21:1-3

देवाने इस्राएली लोकांना त्यांच्या शत्रूंचा वध करण्यास सांगितले नाही; देवाबद्दलच्या त्यांच्या चुकीच्या दृष्टिकोनामुळे त्यांना असा विश्वास वाटू लागला की देव त्यांना अशे हिंसक नवस करू देतो. यामुळे देवाला शांती मिळेल आणि तो त्यांची मदत करेल. असे लिहिलेले आहे कि देवाने त्यांचे म्हणणे ऐकले. पण देवाने त्यांचे म्हणणे का ऐकले? त्यांच्या शत्रूंना ठार मारण्याची देवाची इच्छा आहे या कल्पनेला अधिक प्रोत्साहन मिळणार नाही काय? याचे उत्तर आपल्याला मोहरांचा दृष्टान्त सापडते:

> मग आणखी एक येऊन म्हणाला, ‘महाराज, ही पाहा आपली मोहर. ही मी रुमालात बांधून ठेवली होती. कारण आपण करडे असल्यामुळे मला आपली भीती वाटली; जे आपण ठेवले नाही ते उचलून घेता व जे आपण पेरले नाही त्याची कापणी करता.’ तो त्याला म्हणाला, ‘अरे दुष्ट दासा, मी तुझ्याच तोंडाने तुझा न्याय करतो. मी करडा माणूस आहे, जे मी ठेवले नाही ते उचलून घेतो व जे मी पेरले नाही त्याची कापणी करतो, हे तुला ठाऊक होते काय? मग तू माझा पैसा पेढीवर का ठेवला नाहीस? ठेवला असतास तर मी येऊन तो व्याजासह वसूल केला असता.’ लूक 19:20-23

आळशी सेवकाने परमेश्वर एक क्रूर व्यक्ती असल्याची कल्पना केली. या त्याच्या विश्वासानुसार त्याला न्याय मिळाला. म्हणून पवित्र शास्त्र म्हणते:

> स्वतंत्रतेच्या नियमाने तुमचा न्याय ठरणार आहे, हे लक्षात घेऊन बोला व वागा. कारण ज्याने दया केली नाही त्याचा न्याय दयेवाचून होईल; दया न्यायावर विजय मिळवते. याकोब 2:12-13

देवाने त्याच्याबद्दल चुकीचा दृष्टिकोन ठेवणाऱ्या माणसांना त्याच्या स्वतःच्या कल्पनांनुसार न्याय ठरण्याची परवानगी दिली. आणि देव हे कसे करतो?

> फसू नका; देवाचा उपहास व्हायचा नाही; कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल. गलतीकरांस पत्र 6:7

> हजारो जणांवर1 दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.” निर्गम 34:7

ज्यावेळी इस्त्राएलाने कनानी राजाचा वध करण्याची शपथ देवाला दिली त्या वेळी त्यांच्यावर सैतानाच्या आत्म्याचे राज्य होते. त्यांनी देवाविरुद्ध कुरकुर केली आणि तक्रार केली आणि प्रत्येक संधीचा फायदा घेऊन त्याच्याविरुद्ध बंड केले. देवाने त्यांना सावध केले आणि त्यांच्या आज्ञांचे पालन करण्यास प्रोत्साहित केले

आता, अहो इस्राएल लोकहो, जे विधी व नियम मी तुम्हांला शिकवत आहे ते पाळावेत म्हणून तुम्ही ते ऐकून घ्या म्हणजे तुम्ही जिवंत राहाल आणि तुमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर तुम्हांला जो देश देत आहे त्यात प्रवेश करून तो वतन करून घ्याल. अनुवाद 4:1

जी आज्ञा मी आज तुम्हांला देत आहे ती सर्व काळजीपूर्वक पाळा, म्हणजे तुम्ही जगाल, बहुगुणित व्हाल आणि तुमच्या पूर्वजांना परमेश्वराने शपथ पूर्वक देऊ केलेल्या देशात प्रवेश करून तो वतन करून घ्याल. अनुवाद 8:1

तरीही इस्त्राएलाने देवाची आज्ञा पाळण्यास नकार दिला आणि सैतानाने निर्दयतेने स्वतःला त्यांच्या न्यायाच्या इच्छांवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम केले. देवाने त्यांना जे हवे होते ते दिले, जरी ही त्याची योजना नव्हती. त्याने इतर राष्ट्रांना ज्याचे भय होते तेच दिले; म्हणजे यापुढे ते सुरक्षित नव्हते. कनानी लोकांची नाश करण्यासाठी सैतानाने इस्राएलचा वापर केला. असे केल्याने जो खरंच लोकांचा खून करतो आणि कत्तल करतो तो लाखो लोकांना देवाच्या चारित्र्याबद्दलच्या चुकीच्या समजुतीद्वारे मृत्यूकडे घेऊन जाऊ शकतो.

इस्त्रायलच्या शत्रूंसमोर शस्त्रा न घेता सामोरे जाण्याची जी देवाच्या योजना होती त्याची झलक आपल्याला या वचनामध्ये आढळते:

मग तुम्ही यार्देन उतरून यरीहोजवळ आला, तेव्हा यरीहोचे मालक, अमोरी, आणि परिज्जी व कनानी व हित्ती व गिर्गाशी, हिव्वी व यबूसी, ह्यांनी तुमच्याशी लढाई केली, परंतु मी ते तुमच्या हाती दिले; मी तुमच्यापुढे गांधीलमाशा पाठवल्या, आणि त्यांनी त्यांना तुमच्यासमोरून घालवले; अमोऱ्याचे दोन राजे यांना घालवले; तुझ्या तलवारीने व धनुष्यानेही हे झाले नाही. यहोशवा 24:11-12

आणि तो म्हणाला, “अहो सर्व यहूद्यांनो, यरुशलेमनिवासी जनहो, आणि हे राजा यहोशाफाटा, तुम्ही सगळे ऐका; परमेश्वर तुम्हांला सांगत आहे की, ‘हा मोठा समुदाय पाहून घाबरू नका; कचरू नका; कारण युद्ध तुमचे नव्हे, देवाचे आहे. उद्या त्यांच्याशी सामना करण्यास जा; पाहा, ते सीसघाट चढून येत आहेत, यरुएल रानापुढे जेथे खोरे संपते तेथे तुम्ही त्यांना गाठाल. ह्या लढाईत तुम्हांला लढावे लागणार नाही; हे यहूदा, हे यरुशलेमे, तुम्ही स्थिर उभे राहा आणि परमेश्वर तुमचे कसे तारण करील ते पाहा.’ घाबरू नका, कचरू नका; उद्या त्यांच्यावर चाल करून जा, कारण परमेश्वर तुमच्याबरोबर आहे.” मग यहोशाफाटाने भूमीकडे तोंड करून मस्तक लववले, त्याप्रमाणेच सर्व यहूदी व यरुशलेमनिवासी ह्यांनी परमेश्वराचे भजन करून त्याच्यापुढे दंडवत घातले. आणि कहाथी व कोरही ह्यांच्यातले काही लेवी उभे राहून इस्राएलाचा देव परमेश्वर ह्याचे स्तवन उच्च स्वराने करू लागले. ते अगदी पहाटेस उठून तकोवाच्या अरण्यात जाण्यास निघाले; ते जाऊ लागले तेव्हा यहोशाफाट उभा राहून म्हणाला, “अहो यहूद्यांनो, अहो यरुशलेमनिवासी जनहो, ऐका; तुमचा देव परमेश्वर ह्याच्यावर

> विश्वास ठेवा म्हणजे तुम्ही खंबीर व्हाल; त्याच्या संदेष्ट्यांवर विश्वास ठेवा म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल." सैन्याबरोबर बाहेर जाताना 'परमेश्वराचा धन्यवाद करा, कारण त्याची दया सनातन आहे,' हे स्तोत्र पावित्र्याने मंडित होऊन गावे म्हणून त्याने प्रजेचा सल्ला घेऊन कित्येकांना त्या कामी नेमले. ते हे स्तोत्र गाऊन स्तवन करू लागले, तेव्हा अम्मोनी, मवाबी व सेईर पहाडातले लोक जे यहूदावर चाल करून येत होते त्यांना गाठण्यास परमेश्वराने दबा धरणारे बसवले व त्यांनी त्यांचा मोड केला. अम्मोनी व मवाबी सेईर पहाडातल्या लोकांची अगदी कत्तल करून त्यांचा विध्वंस करावा म्हणून त्यांच्यावर उठले; सेइरनिवाशांचा निःपात केल्यावर ते एकमेकांचा वध करू लागले. 2 इतिहास 20:15-23

इस्रायलला युद्धाद्वारे कनानचा देश घेण्यास सक्षम केले गेले, परंतु देवाचा मूळ हेतू तसा नव्हता. देव त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न करत आहे याची इस्राएल लोकांना सतत भीती वाटत असल्याने आणि त्यांना त्याच्या प्रेमळ काळजीबद्दल शंका असल्याने, सैतानाने त्यांना कनानी आणि इतर राष्ट्रांचा वध करण्याची देवाला नवस करण्यास प्रवृत्त केले. इस्रायलला युद्धात विजय मिळत होते, परंतु सैतान देवाच्या चारित्र्याविरुद्ध युद्ध जिंकत होता. इस्राएली लोक त्यांच्या विजयामुळे पराभूत झाले आणि देवाबद्दलच्या खोट्या दृष्टिकोनाचे गुलाम झाले.

या शेवटच्या दिवसांत आपल्याला देवाचे चरित्र जसे आहे तसे पाहण्याची संधी दिली जाते. येशू ख्रिस्ताचा चेहरा आपल्या समोर ठेऊन आपण स्वर्गीय पित्याच्या खऱ्या इच्छा उघड करू शकतो. येशूने तलवारीने किती लोकांना मारले काय? त्याने किती लोकांना अग्नीत जाळले? त्याने किती लेकरांचा भाल्याने वध केला? एकाचाही नाही! देव माणसांच्या जीवनाचा नाश करण्यासाठी आला अशी कल्पना ठेवणाऱ्या सर्वांसाठी येशूचे शब्द लक्षात ठेवा:

> परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, "तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे." मग ते दुसऱ्या गावाला गेले. लूक 9:55-56

येशू जी तलवार वापरतो ती त्याच्या तोंडातून निघणारी तलवार आहे. त्याची तलवार म्हणजे त्याचा शब्द.

त्याच्या उजव्या हातात सात तारे होते; त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तलवार निघाली आणि त्याची मुद्रा 'परमतेजाने' प्रकाशणाऱ्या 'सूर्यासारखी' होती. प्रकटीकरण 1:16.

कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे. इब्री 4:12

त्याने त्यांना म्हटले, "पण आता तर ज्याच्याजवळ पिशवी आहे त्याने ती घ्यावी; तसेच झोळीही घ्यावी आणि ज्याच्याजवळ तलवार नाही त्याने आपले वस्त्र विकून ती विकत घ्यावी. लूक 22:36

तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या. इफिसकरांस 6:17

ख्रिस्ताचे अनुयायी त्याच्या उदाहरणाचे अनुसरण करतील. ख्रिस्ताने कधीही भौतिक तलवार वापरली नाही. मग या वचनाचे स्पष्टीकरण आपण कसे करायचे?

ते म्हणाले, "प्रभूजी पाहा, येथे दोन तलवारी आहेत." तो त्यांना म्हणाला, "पुरे." लूक 22:38

येशूने या दोन वचनांच्या आधी शिष्यांना सांगितले होते, "ज्याच्याकडे तलवार नाही, त्याने आपले वस्त्र विकून ती विकत घ्यावि." जेव्हा शिष्यांनी दोन भौतिक तलवारी तयार केल्या तेव्हा त्यांनी त्या मिळविण्यासाठी त्यांची वस्त्रे विकली नव्हती. येशूचे विधान प्रत्येकासाठी होते. प्रत्येक शिष्याने तलवार विकत घेण्यासाठी आपले कपडे विकायचे होते. मग उरलेल्या शिष्यांचे काय आणि कपडे विकण्याच्या आज्ञेचे काय? येशूने शिष्यांना कोणते कपडे विकायला सांगितले होते?

यहोशवा मलीन वस्त्रे परिधान करून त्या दिव्यदूतापुढे उभा होता. त्याच्यासमोर जे उभे होते त्यांना तो उत्तरादाखल म्हणाला, "त्याच्यावरची मलीन वस्त्रे काढा." तो त्याला म्हणाला, "पाहा, मी तुझा अधर्म तुझ्यापासून दूर केला आहे, मी तुला उंची पोशाख घालत आहे." जखऱ्या 3:3-4

येशूने पिलातला सांगितले की त्याचे राज्य या जगाचे नाही.

येशूने उत्तर दिले, "माझे राज्य ह्या जगाचे नाही, माझे राज्य ह्या जगाचे असते तर मी यहूद्यांच्या स्वाधीन केला जाऊ नये म्हणून माझ्या सेवकांनी लढाई केली असती; परंतु आता माझे राज्य येथले नाही." योहान 18:36

येशूने पिलाताला सांगितले की त्याचे सेवक जगाच्या पद्धतीने लढणार नाहीत. सत्याच्या वचनाचे योग्य रीतीने विभाजन करण्यासाठी शिष्यांना त्यांचे अंतःकरण

शुद्ध करणे आवश्यक होते. २ तीमथ्य २:१५. आम्ही हे देखील लक्षात घेतो की जेव्हा शिष्यांनी येशूला दोन तलवारी दाखविल्या तेव्हा तो म्हणाला “पुरे झाले”. जर त्याला असे वाटले की दोन तलवारी पुरेशा आहेत तर त्याने "त्या पुरेशा आहेत" असे म्हटले असते कारण त्यांच्याकडे एकापेक्षा जास्त तलवारी होत्या. जर काही कारणास्तव येशू म्हणत होता की दोन तलवारी पुरेशा आहेत तर प्रश्न उठतो कि कशासाठी पुरेशा आहेत? दोन तलवारी त्यांच्याकडे नेहमी होत्या म्हणून त्यांना नेहमी एकत्र प्रवास करावा लागेल काय? रोमन सरकार किंवा मंदिराच्या रक्षकांपासून बचाव करण्यासाठी या तलवारी पुरेशा होत्या काय? ह्या बेअर्थी कल्पना आहेत. जेव्हा येशूने एकवचनात "ते पुरेसे आहे" असे म्हटले तेव्हा त्याचा अर्थ असा होता की अशा प्रकारचे बोलणे पुरेसे आहे. दोन तलवारी दाखविण्यावरून असे दिसून आले की शांतीची सुवार्ता सांगण्यासाठी देवाच्या वचनाची खरी तलवार मिळावी म्हणून त्यांना विकण्यासाठी आवश्यक असलेले वस्त्र (म्हणजेच पापी स्वभाव) प्रकट झाले. येशूने आपल्या शिष्यांना विरोध करणाऱ्यांना लोकांना असे उत्तर देण्यास सांगितले:

> ‘डोळ्याबद्दल डोळा व दाताबद्दल दात’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे; आणि जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नकोस. ‘आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर व आपल्या वैऱ्याचा द्वेष कर,’ असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा. अशासाठी की, तुम्ही आपल्या स्वर्गातील पित्याचे पुत्र व्हावे; कारण तो वाइटांवर व चांगल्यांवर आपला सूर्य उगवतो आणि नीतिमानांवर व अनीतिमानांवर पाऊस पाडतो. मत्तय 5:38-45

आपण जेव्हा इस्राएल कनानचा तलवारीने पराभव करेल तेव्हा सैतानाला जिंकलेले पाहू कि , आपल्या प्रेमळ पित्याला पाहू जो त्याच्या लोकांना त्यांच्या इच्छेनुसार करू देतो आणि होणाऱ्या परिणामांना सामोरे जाऊ देतो. तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा; माझे कुटुंब आणि मी तर दयाळू देवाची सेवा करू, जो पापांकडे दुर्लक्ष करणार नाही परंतु चांगल्या आणि वाईट लोकांना त्यांचा न्याय करण्याची वेळ येईपर्यंत एकत्र वाढू देईल.

स्वतःचे रक्षण करण्यासाठी हातात तलवार किंवा बंदूक घेऊन या गोष्टी पूर्ण करणे कसे शक्य आहे? तलवातिला पुन्हा तिच्या जागी ठेवण्याची वेळ आली नाही काय? तिला गंजू द्या, आणि आपल्या पित्यावर विश्वास ठेवा की त्याने आपली काळजी घेण्यासाठी त्याचे देवदूत पाठवलेले आहेत. इस्रायलने कनानचा विजय तलवारीने आणि मृत्यूने पार पाडला कारण त्यांच्यापैकी बहुतेकांनी देवाबद्दल असेलेल्या त्यांच्या भीतीमुळे विश्वास ठेवला नाही. त्यांच्या सर्व कुरकुर, तक्रार आणि भीतीचा अर्थ असा होता की देव त्यांना वाळवंटातच मारू इच्छित होता, याचा अर्थ असा होतो की यहूदी लोक परराष्ट्रीयांसाठी प्रकाश होण्याऐवजी, सभोवतालच्या राष्ट्रांना त्यांच्या पापाची शिक्षा इस्राएलच्या पापामुळे झाली. नियमशास्त्रात म्हटल्याप्रमाणे:

> त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो; निर्गम 20:5

अनेक इस्राएली लोकांनी देवाचा द्वेष केला कारण तो त्यांना वाळवंटात मारून टाकेल अशी भीती त्यांना वाटत होती. त्यांच्या पूर्वजांची पापे त्यांच्यावर लादलेली होतीच आणि त्यामुळे इस्रायलचा इतिहास रक्ताने भिजलेला आहे. इस्त्रायलाने तलवारीच्या बळावर जे विजय मिळवले त्यांमुळे आपल्याला येशूमध्ये प्रकट झालेल्या देवाच्या चारित्र्याबद्दलची समज विस्कळीत होऊ देऊ नये. कुरकुर आणि तक्रार करणाऱ्या दासांच्या गटाला देव कसा आहे हे ठरवू देऊ नये. तर आपण देवाच्या सर्व आज्ञाचे पालन करू ज्यात असे म्हटले आहे की, “खून करू नकोस.”

## 13. काट्यांचा मुकुट

ख्रिस्ताची परीक्षा आणि मृत्यू आपल्याला दाखवतात की मानवी स्वभाव किती भयानक असू शकतो. ज्या लोकांनी ख्रिस्ताला अपमानित केले, नाकारले आणि मारून टाकले त्यांनी आपला मानवी आत्मा व स्वभाव दाखवला ज्या स्वभावाने ख्रिस्ताला सुरुवातीपासून नाकारले आहे. येशूला बांधलेल्या दोऱ्या, त्याला मारलेल्या काठ्या, ज्या वधस्तंभावर त्याला खिळले गेले त्या वधस्तंभाचे लाकूड आणि खिळे या सर्व गोष्टी येशुनेच निर्माण केल्या होत्या. आम्ही वाचतो कि:

> सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. योहान 1:3

त्याच्या डोक्यावर ठेवलेला काट्यांचा मुकुट अत्यंत महत्त्वाचा होता आणि त्यात खोल आध्यात्मिक सत्य होते. जेव्हा आदाम पापात पडला तेव्हा शापाचे प्रकटीकरण म्हणून काटेरी काटे प्रदर्शनात आले होते.

> आदामाला तो म्हणाला, “तू आपल्या स्त्रीचे ऐकलेस आणि ज्या झाडाचे फळ खाऊ नकोस म्हणून मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस; म्हणून तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील; ती तुला काटे व कुसळे देईल; तू शेतातले पीक खाशील; उत्पत्ती 3:17-18

श्राप जमिनीवर का आला? मनुष्य आणि पृथ्वीचा काय संबंध होता?

> मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. उत्पत्ती 2:7

> मग देव बोलला, "आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशू, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांवर ते सत्ता चालवतील." उत्पत्ती 1:26

देवाने पृथ्वीपासून मानवाची निर्मिती केली आणि त्याने मानवाला पृथ्वीवर प्रभुत्व दिले. या वस्तुस्थितीवरून असे दिसून येते की मनुष्य आणि पृथ्वी यांच्यात घनिष्ठ संबंध आहे. माणसाने केलेल्या गोष्टींचा थेट परिणाम पृथ्वीवर होतो. आदामावर पडलेला शाप लगेचच त्यातून निर्माण झालेल्या काटेरी झुडपांमध्ये प्रतिबिंबित झाला. मनुष्याला इशारा म्हणून जमिनीला शाप देण्यात आला होता, नैसर्गिक आपत्ती हे मानवी समाजातील वाढत असलेला दुष्टपणा आहे आणि हि एक धोक्याची चेतावणी म्हणून लोकांना समजावे यासाठी जमिनीला शाप देण्यात आला होता.

> तुम्ही लढायांविषयी ऐकाल व लढायांच्या आवया ऐकाल; घाबरून जाऊ नये म्हणून सांभाळा; कारण 'असे होणे अवश्य आहे;' परंतु तेवढ्यात शेवट होत नाही. कारण 'राष्ट्रावर राष्ट्र व राज्यावर राज्य उठेल' आणि जागोजागी दुष्काळ, मऱ्या व भूमिकंप होतील; मत्तय 24:6-7

लोकांमधील युद्ध आणि संघर्ष हे निसर्गातील आघाताशी जुडलेले आहे. समाजातील संघर्ष आणि विकृती जसजशी वाढत जाते तसतशी निसर्गातील संकटेही वाढतात; अशाप्रकारे निसर्ग हा मनुष्याच्या विद्रोहाच्या पातळीचा बदल दर्शवणारी गोष्ट आहे. जेव्हा निसर्गातील वारा, जो मनुष्याला सांत्वन देण्यासाठी बनविण्यात आला, तो चक्रीवादळांमध्ये बदलतो; किंवा जीवन देण्यासाठी रचलेल्या पावसाचे रूपांतर जलविनाशामध्ये होते, तेव्हा निसर्गाच्या आपत्तींमधून मनुष्याच्या अंतःकरणात प्रकट झालेल्या विद्रोहाचा पुरावा आपण पाहतो.

मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील कार्यकारण संबंधाचा अर्थ असा आहे की मानवजातीचे विद्रोह जसजसे वाढत जाईल तसतसे वारा, अग्नी आणि पूर यांचे विद्रोह वाढेल. जसे लोक मोठ्या आवेशाने देवाच्या आज्ञा मोडतात, त्याचप्रमाणे पृथ्वी निसर्गाचे नियम मोडेल आणि त्यांच्या स्वतःच्या बंडखोरीचे प्रतिबिंब माणसांना परत देईल. ज्याप्रमाणे माणसांमध्ये बंडखोरीचा आत्मा ख्रिस्ताच्या विरुद्ध उठतो आणि ज्याच्यावर त्याचे प्रभुत्व आहे त्याला तो मारण्याचा प्रयत्न करतो, त्याचप्रमाणे निसर्ग मानवजातीविरुद्ध बंड करून त्याला मारण्याचा प्रयत्न करेल. जसे लोक पृथ्वीवर फिरून इतरांना त्यांच्या जिभेने आणि त्यांच्या तलवारीने खाऊन टाकतात, त्याचप्रमाणे जंगलातील पशू पृथ्वीवर फिरतील आणि त्यांना खाऊन टाकतील. माणूस जसा पेरतो तसा तो कापतो. दुसऱ्या बाजुस, पृथ्वी देवासोबत शांततेत असलेल्या मनुष्यांशी युद्ध करणार नाही आणि त्याच्याविरुद्ध

बंड करणार नाही.

> पाहा, ईश्वर ज्याचे शासन करतो तो पुरुष धन्य! म्हणून सर्वसमर्थाचे शासन तुच्छ मानू नकोस; कारण दुखापत तो करतो आणि पट्टीही तोच बांधतो; घाय तो करतो आणि त्याचाच हात तो बरा करतो. तो तुला सहा संकटांतून सोडवील; सातांनी तुला काही अपाय होणार नाही. दुष्काळात मृत्यूपासून, युद्धात तलवारीच्या धारेपासून तो तुझा बचाव करील. जिव्हाप्रहार होऊ लागला म्हणजे तू लपवला जाशील; विनाश प्राप्त झाला असता तू त्याला डगमगणार नाहीस. विनाश व दुष्काळ ह्यांना तू हसशील; पशूंचे भय तुला वाटणार नाही. मैदानातल्या पाषाणाशीही तुझा स्नेह होईल; वनपशू तुझ्याशी सलोखा करतील. तुझा डेरा शांतिसमाधानाचा आहे अशी तुला प्रतीती येईल; तू आपल्या घरादाराकडे पाहशील तेव्हा तुला काही उणे नाही असे दिसून येईल. ईयोब 5:17-24

ख्रिस्त वधस्तंभावर टांगलेला असताना, सूर्याने प्रकाश देण्यास नकार दिला, भूमिकांप झाला आणि आकाशातून विजा पडल्या. निसर्ग त्याच्या लेखक, व देवाचा पुत्र याच्याशी सहानुभूती दाखवत होता. त्याच वेळी, तो जगाची पापे आणि काट्यांचा मुकुट घेऊन जात असताना, निसर्ग त्याला मारण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

> तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली, पर्वताचे पाये डगमगले, त्यांना झोके बसले, कारण तो संतप्त झाला होता. त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघत होता, त्याच्या मुखातून ग्रासणारा अग्नी निघत होता, त्यामुळे निखारे धगधगत होते. परमेश्वराने आकाशात गर्जना केली, परात्पराची वाणी झाली, गारा व धगधगीत इंगळ बाहेर पडले. त्याने आपले बाण सोडून त्यांची दाणादाण केली; त्याने विजा पाडून त्यांची त्रेधा उडवली. तेव्हा हे परमेश्वरा, तुझ्या धमकीने, तुझ्या नाकपुड्यांतील श्वासाच्या सोसाट्याने जलाशयाचे तळ दिसू लागले, पृथ्वीचे पाये उघडे पडले. स्तोत्रसंहिता 18:7-8,13-15.

वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या मृत्यूच्या वेळी निसर्गाचे विद्रोह आपल्याला निसर्ग हा मनुष्याच्या बंडखोरीला कसे प्रतिबिंबित करतो याचे संकेत देतात. येशूच्या निर्दोषीपणामुळे निसर्गाला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली; तरीही, आपला पाप वाहणारा या नात्याने, निसर्ग म्हणजे काट्यांचा मुकुट त्याला टोचत होता. स्वर्गातून चमकलेली वीज स्वर्गाचीच नाराजी दर्शवत होती. मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील या संबंधात आपण पुर का झाला याची कारणे शोधू शकतो. जलप्रलयापूर्वी जगलेल्या लोकांबद्दल पवित्र शास्त्र असे म्हणते:

> नंतर भूतलावर मनुष्यांची वाढ होऊ लागली आणि त्यांना कन्या झाल्या; तेव्हा मानवकन्या सुंदर आहेत असे देवपुत्रांनी पाहिले; आणि त्यांच्यातल्या ज्या त्यांना आवडल्या त्या त्यांनी बायका केल्या. तेव्हा परमेश्वर म्हणाला, "मनुष्य भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची त्याच्या ठायी सर्वकाळ सत्ता राहणार नाही; तो देहधारी आहे; तथापि मी त्याला एकशे वीस वर्षांचा काळ देईन." त्या काळी भूतलावर महाकाय होते; पुढे देवपुत्र मानवकन्यांपाशी गेले तेव्हा त्यांना पुत्र झाले. ते प्राचीन काळचे महावीर असून नामांकित पुरुष होऊन गेले. पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले; म्हणून मानव पृथ्वीवर उत्पन्न केल्याचा परमेश्वराला अनुताप झाला आणि त्याच्या चित्ताला खेद झाला. उत्पत्ती 6:1-6

पवित्र शाश्त्र म्हणते की मनुष्याच्या विचारांची कल्पना सतत वाईट होती. वासनेने भरलेले आणि सत्तेच्या अहंकारामुळे पुरुषांनी कल्पना करता येणार नाही अश्या सर्व प्रकारच्या घृणास्पद गोष्टी केल्या. मानवाच्या अनियंत्रित दुष्टपणाचा पृथ्वीवर अधिकाधिक प्रभाव पडत होता. देवाच्या नियमाविरुद्ध माणसांचे बंड थेट निसर्गाच्या आघातास कारणीभूत होत होते.

देवाने दयाळूपणे नोहाद्वारे जगाला इशारा दिला की पृथ्वीवर पूर येत आहे. माणसाने जसा नैतिकदृष्ट्या स्वतःचा नाश केला, तसाच हा विनाश पृथ्वीवर प्रकट होईल.

> त्या काळी देवाच्या दृष्टीने पृथ्वी भ्रष्ट झाली होती; ती जाचजुलमांनी भरली होती. देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती भ्रष्ट होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक बिघडवली होती. मग देव नोहाला म्हणाला, "सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे, कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे. पाहा, मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन. उत्पत्ती 6:11-13

जेव्हा देवाने पृथ्वीवर पाहिले तेव्हा त्याने बघितले की मनुष्यांनी स्वतःला पूर्णपणे भ्रष्ट केले आहे. उत्पत्ति 6:11 मधील भ्रष्ट या शब्दासाठी समान हिब्रू शब्द उत्पत्ति 6:13 मध्ये नाश म्हणून वापरला आहे. आपण हे वचन कसे वाचतो ह्याचे आव्हान आपल्यासमोर पुन्हा एकदा ठेवले आहे. आता, कोणीही असा निष्कर्ष काढू शकतो की देवाने पृथ्वीवरील आठ लोकांव्यतिरिक्त इतर सर्व लोकांचा त्यांच्या दुष्टपणामुळे नाश करण्याचे ठरवले आणि वाईटाचा अंत केला. याउलट तुम्ही पाहू शकता की देवाला माहीत होते की माणसांचा भ्रष्टाचार शेवटी पृथ्वीवर परावर्तित होईल आणि हा भ्रष्टाचार जगाचा नाश करेल. जसजसे लोकांनी देवाच्या नियमाविरुद्ध बंड केले, तसतसे पृथ्वी स्वतःच्या सीमा ओलांडू लागेल आणि माणसांविरूद्ध बंड करू लागेल.

पवित्र शास्त्र म्हणते की देवाने पाहिले की पृथ्वी हिंसाचाराने भरलेली आहे. बहुतेक ख्रिस्ती लोकांचा असा विश्वास आहे की देव स्वतः हिंसक होऊन मनुष्यांच्या बंडखोरीला प्रतिसाद देईल आणि विनाशक पुराद्वारे त्या सर्वांना मारून टाकेल. त्यांच्या बंडखोरीला नियंत्रित करण्यासाठी देव मनुष्यांसारखा हिंसक होईल यावर विश्वास ठेवणे किती चुकीचे आहे. देवाच्या पुत्रामध्ये किती हिंसा आहे, जो त्याच्या पित्याचे हुबेहूब प्रतिबिंब आहे?

> त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते. यशया 53:9

हिंसा कुठून येते?

> तुझा व्यापार मोठा असल्यामुळे तुझ्या हृदयात अपकारबुद्धी शिरून तू पातक केलेस; म्हणून मी तुला भ्रष्ट समजून परमेश्वराच्या पर्वतावरून लोटून दिले. हे पाखर घालणाऱ्या करूबा! त्या अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांमधून काढून मी तुझा नाश केला आहे. यहेज्केल 28:16

पवित्र शास्त्र म्हणते की वाईटामुळे दुष्टांचा वध होईल. स्तोत्र 34:21. निसर्गाचे नियम देवाला लोकांशी हिंसक वागण्यास भाग पाडत नाहीत. याउलट हे नियम सुरुवातीला कसे स्थापित केले गेले याचे संकेत शास्त्रवचने देतात.

> आकाशात चढून कोण उतरला आहे? वायू आपल्या ओंजळीत कोणी धरून ठेवला आहे? जलाशय वस्त्रात कोणी बांधून ठेवला आहे? पृथ्वीच्या सर्व सीमा कोणी स्थापल्या आहेत? त्याचे नाव काय? त्याच्या पुत्राचे नाव काय? तुला ठाऊक असल्यास सांग. नीतिसूत्रे 30:4

> मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कोठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग. तिचे मोजमाप कोणी ठरवले बरे? तिला मापनसूत्र कोणी लावले? हे तुला ठाऊक आहे काय? तिच्या स्तंभाचा पाया कशावर घातला? तिची कोनशिला कोणी बसवली? त्या समयी प्रभातनक्षत्रांनी मिळून गायन केले. व सर्व देवकुमारांनी जयजयकार केला. समुद्र उफाळून गर्भाशयातून पडावा असा बाहेर पडला, तेव्हा त्याला कवाडे लावून तो कोणी अडवला? त्या समयी मी त्याला मेघवस्त्राचे पांघरूण घातले, दाट अभ्रांचे त्याला बाळंते केले; मी त्याची मर्यादा फोडून काढली आणि त्याला अडसर व दरवाजे लावले; आणि मी म्हणालो, ‘तू येथवरच ये; ह्यापलीकडे तू येता कामा नये; येथे तुझ्या उन्मत्त लहरी थांबल्या पाहिजेत.’ ईयोब 38:4-11

> तू हिमाच्या भांडारात जाऊन शिरला आहेस काय? तू गारांची भांडारे पाहिली आहेत काय? ती मी संकटसमयासाठी, लढाई व युद्ध ह्यांच्या प्रसंगासाठी राखून ठेवली आहेत. प्रकाशाची वाटणी कशी झाली आहे? पूर्वेचा वारा

> पृथ्वीवर कसा पसरतो? पर्जन्याचा लोट खाली यावा म्हणून पाट कोण फोडतो? गर्जणाऱ्या विद्युल्लतेला मार्ग कोणी करून दिला? अशासाठी की निर्जन प्रदेशात, मनुष्यहीन अरण्यात पाऊस पडावा, उजाड व वैराण प्रदेश तृप्त करावा, कोवळी हिरवळ उगवेशी करावी. ईयोब 38:22-27

> परमेश्वराचा ध्वनी जलांमधून चढत आहे; प्रतापशाली देव गर्जना करीत आहे; परमेश्वर जलाशयांवर आहे. परमेश्वराचा ध्वनी प्रबल आहे; परमेश्वराचा ध्वनी प्रतापमय आहे. परमेश्वराचा ध्वनी देवदारू मोडतो; परमेश्वर लबानोनाच्या देवदारूंचा चक्काचूर करतो. तो त्यांना वासराप्रमाणे उसळायला लावतो; लबानोन व शिर्योन ह्यांना रानबैलाच्या वत्साप्रमाणे उसळायला लावतो. परमेश्वराचा ध्वनी अग्निज्वाला भेदतो. परमेश्वराचा ध्वनी वने कंपायमान करतो; परमेश्वर कादेशचे वन कंपित करतो. परमेश्वराचा ध्वनी हरिणींना गर्भ गाळण्यास लावतो आणि वनवृक्ष पर्णहीन करतो; त्याच्या मंदिरात सर्वत्र "महिमा! महिमा!" असा ध्वनी दुमदुमतो. परमेश्वर जलप्रलयावर आरूढ होतो; परमेश्वर राजासनावर सर्वकाळ बसलेला आहे. परमेश्वर आपल्या लोकांना सामर्थ्य देईल; परमेश्वर आपल्या लोकांना शांतीचे वरदान देईल. स्तोत्रसंहिता 29:3-11

निसर्गाच्या घटकांवर असलेला परमेश्वराचा आवाज हा निसर्गातील निश्चित केलेल्या नियमांबद्दल बोलतो. लोकांना आशीर्वाद देण्यासाठी आणि त्यांचे समर्थन करण्यासाठी, देवाची आज्ञाधारकता दर्शविणारे जे कायदे होते तेच त्यांचा नाश करण्यासाठी एक शस्त्र बनले होते. ज्याप्रमाणे माणसे द्राक्षाचा शुद्ध रस घेतात आणि त्याला भ्रष्ट करून दारू तयार करून मृत्यू आणि विनाश घडवतात, त्याचप्रमाणे दूषित मनाने माणसे पृथ्वीला प्रदूषित करतात आणि निसर्गाला स्वतःवर विनाशाचे शस्त्र बनवून घेतात. मूर्तिपूजा, निंदा, खून, चोरी, लोभ, आणि देवाचे नियम व दहा आज्ञा यांच्या विरोधात बोलल्या गेलेल्या सर्व पापांमुळे पृथ्वीवर श्राप येईल.

मोशेद्वारे इस्राएली लोकांना देखील ताकीद देण्यात आली होती की पृथ्वी त्यांच्या विकृत वागणुकीवर प्रतिक्रिया देईल.

> तुम्ही ज्या मिसर देशात राहत होता तेथील चालीरीतींना अनुसरून चालू नका; तसेच ज्या कनान देशात मी तुम्हांला घेऊन जात आहे, तेथील चालीरीतींना अनुसरून चालू नका व तेथील विधींप्रमाणे चालू नका. लेवीय18:3

परमेश्वराने इस्रायलला व्यभिचार, समलैंगिकता, आणि इतर विकृत वासनांमध्ये गुंतू नका असा इशारा दिला. जर त्यांनी ही कृत्ये केली तर जमीन नक्कीच प्रतिक्रिया देईल.

> असल्या प्रकारचे कोणतेही कृत्य करून अशुद्ध होऊ नका; कारण जी राष्ट्रे मी तुमच्यासमोरून घालवणार आहे, ती असल्याच सर्व कृत्यांनी अशुद्ध झाली आहेत. त्यांचा देशही भ्रष्ट झाला आहे, म्हणून त्यांच्या दुष्टतेमुळे मी त्यांचा समाचार घेत आहे व तो देश आपल्या रहिवाशांचा त्याग करीत आहे. लेवीय 18:24-25

पुरुषांच्या चुकीचे लैंगिक संबंध ठेवण्याच्या इच्छेचा पृथ्वीवर प्रभाव आहे. या घृणास्पद कृत्यांमुळे पृथ्वी दीर्घकाळापर्यंत अतिशय दुःखदरित्या आजारी पडते आणि या गोष्टी करणाऱ्या पृथ्वीवरील लोकांवर ती अग्निमय उलट्या करते.

> पृथ्वी शोकाकुल व कृश झाली आहे; जग झुरून कृश झाले आहे; पृथ्वीवरील प्रतिष्ठित जन जर्जर झाले आहेत. पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे. ह्यास्तव पृथ्वी शापाने ग्रासली आहे, तिचे रहिवासी पापाचे फळ भोगत आहेत; पृथ्वीचे रहिवासी जळून भस्म झाले आहेत, मानव थोडेच उरले आहेत. यशया 24:4-6

हि वचने स्पष्टपणे नाशाचा मार्ग दर्शवतात आणि देवाच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे पृथ्वी कशी अशुद्ध होते आणि काय प्रतिक्रिया देते हे दर्शवतात. यशया संदेष्टा लिहितो की माणसांच्या पापांमुळे पृथ्वी शापाने ग्रासली आहे आणि त्या श्रापामुळे पृथ्वीचे रहिवासी जळून भस्म झाले आहेत. पूर्वी जलप्रलयाने झालेला पृथ्वीचा नाश आणि भविष्यातील अग्नीद्वारे होणारा पृथ्वीचा नाश यांचा संबंध पुढील प्रकारे मनुष्यांच्या वासनेशी जोडला गेला आहे.

> प्रथम हे ध्यानात ठेवा की, स्वत:च्याच वासनांप्रमाणे चालणारे थट्टेखोर लोक शेवटल्या दिवसांत थट्टा करत येऊन म्हणतील, "त्याच्या येण्याचे वचन आता कोठे आहे? कारण वाडवडील निजले तेव्हापासून सर्वकाही उत्पत्तीच्या प्रारंभापासून होते तसेच चालू आहे." कारण ते हे बुद्धिपुरस्सर विसरतात की, पूर्वी देवाच्या शब्दाने आकाश आणि पाण्यातून पाण्याच्या योगे घडलेली अशी पृथ्वी ही झाली; त्याच्या योगे तेव्हाच्या जगाचा पाण्याने बुडून नाश झाला; पण आताचे आकाश व पृथ्वी ही त्याच शब्दाने अग्नीसाठी राखलेली आहेत; म्हणजे न्यायनिवाड्याचा व भक्तिहीन लोकांच्या नाशाचा दिवस येईपर्यंत राखून ठेवलेली आहेत. 2 पेत्र 3:3-7

हा महापूर माणसांच्या चुकीच्या वासना आणि वाईट कल्पनांमुळे आला होता. जेव्हा पृथ्वी अग्नीने खाऊन टाकली जाईल तेव्हा हीच प्रक्रिया होईल. सदोमच्या दिवसांत जसे मनुष्ये एकमेकांच्या वासनेत जळत होती, त्याचप्रमाणे शहर आगीत जाळले गेले ज्यामुळे थोडेच लोक शिल्लक राहिले. खरे तर त्या शहरातून केवळ तीनच लोक बचावले होते.

सदोमचा नाश हा आपल्यासाठी काळाच्या शेवटी काय होईल याची एक चेतावणी आहे.

> त्याप्रमाणेच सदोम व गमोरा आणि त्यांच्या सभोवतालची नगरे ह्यांनी त्यांच्यासारखे जारकर्म करून अन्यकोटीतील अंगांशी संग केला; ती नगरे सार्वकालिक अग्निदंडाची शिक्षा पावलेली अशी एकीकडे उदाहरणादाखल पुढे ठेवली आहेत. यहूदा 1:7

सदोम आणि गमोरा स्वतःला व्यभिचार आणि अनैतिकतेच्या स्वाधीन करत होते. पौल सदोमातील लोकांच्या दुष्टतेचे वर्णन करतो कारण त्या शहरातील पुरुषांना लोटच्या घरी आलेल्या पाहुण्यांचे लैंगिक शोषण करायचे होते.

> तसेच पुरुषांनीही स्त्रियांचा नैसर्गिक उपभोग सोडून परस्परे कामसंतप्त होऊन पुरुषांनी पुरुषांबरोबर अनुचित कर्म केले आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचे योग्य प्रतिफळ आपल्या ठायी भोगले. रोमकरांस पत्र 1:27

सदोमातील माणसांच्या वासनेने देवाच्या कायद्याचे संपूर्ण उल्लंघन केले होते, ज्यामुळे पृथ्वी आणि निसर्गाने त्यातील रहिवाशांना हिंसक पद्धतीने प्रतिक्रिया दिली ज्यामुळे काही लोकच शिल्लक राहिले. सदोम शहरासाठी विनवणी करण्यासाठी परमेश्वराने अब्राहमच्या हृदयाला प्रवृत्त केले जेणेकरून तो कसा तरी शहर आणि रहिवासी दोघांनाही त्यांच्या वासनांच्या हिंसक परिणामांपासून वाचवू शकेल. निसर्गाच्या शक्तींना रोखण्यासाठी ख्रिस्ताने त्यांच्या वासनांचे वजन स्वतःवर उचलले आणि सदोमच्या लोकांना पश्चात्ताप करण्यासाठी वेळ दिली. जलप्रलयाच्या वेळीही असेच झाले होते. जलप्रलयापूर्वी, प्रभूने निसर्गाच्या शक्तींना जोपर्यंत शक्य होईल तोपर्यंत रोखून ठेवले आणि त्या लोकांना वाचवण्यासाठी व पश्चात्ताप करण्यासाठी वेळ दिला.

मानवाच्या पापीपणामुळे सर्व सृष्टीला त्रास सहन करावा लागला, ज्यामुळे आपल्याला क्रूस आणि काटेरी मुकुटाची पुन्हा एकदा आठवण करून दिली जाते.

> …ख्रिस्त हा देवाचे सामर्थ्य व देवाचे ज्ञान आहे. 1 करींथ 1:24

या सामर्थ्याद्वारेच ख्रिस्त जगाचे समर्थन करतो.

> हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.' इब्री 1:3

> कारण आकाशात व पृथ्वीवर असलेले, दृश्य व अदृश्य असलेले, राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जे काही आहे ते सर्व त्याच्यामध्ये निर्माण झाले; सर्वकाही त्याच्या द्वारे व त्याच्यासाठी निर्माण झाले आहे; कलस्सै 1:16

येशूने त्याच्या शक्तीने सर्व गोष्टींचे समर्थन केले असल्याने, मनुष्यातील बंडखोरीचा आत्मा जो या निर्माण केलेल्या जगावर प्रभाव टाकतो तो त्याच्यासाठी सतत काटेरी मुकुटासारखा आहे, तो त्याला दररोज छेदतो कारण मनुष्याच्या दुष्ट स्वभावाचा प्रभाव रोखण्यासाठी येशू स्वतःच्या सामर्थ्याने सर्व काही करतो. पृथ्वी भ्रष्ट आणि नष्ट करणे. या संदर्भात आपल्याला हे आढळून येते की, मनुष्यांसाठी ख्रिस्ताचे दुःखसहन हेच संघर्षाचे चार वारे रोखून धरत आहे.

> ह्यानंतर मी चार देवदूत 'पृथ्वीच्या चार कोनांवर' उभे राहिलेले पाहिले, ते पृथ्वीवरून व समुद्रावरून वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीचे 'चार वारे' अडवून धरत होते. प्रकटीकरण 7:1

देवदूत हे वारे धरू शकतात याचे एकमेव कारण म्हणजे ख्रिस्त मनुष्याच्या दुष्टतेची संपूर्ण ओझे स्वतःवर घेतो, अशा प्रकारे निसर्ग आणि पृथ्वीवरील विद्रोहाचा प्रभाव कमी होतो. जेव्हा एखादा समाज ख्रिस्ताच्या आत्म्याविरुद्ध पूर्णपणे विद्रोह करतो तेव्हा निसर्गात हिंसक आपत्ती होण्यापासून रोखण्यासाठी आणि मनुष्याच्या बंडखोर आत्म्याचे ओझे वाहण्यासाठी कोणीही मध्यस्ती नसते.

आपल्याला माहित आहे की हे जग दुष्टतेने पूर्णपणे दूषित आहे. इंटरनेट अश्लीलतेने भरले आहे आणि लोक सर्वत्र अनैतिकता आणि हिंसाचाराने भरलेले चित्रपट पाहत आहेत. बातम्यांमधील गुन्हेगारी, युद्ध आणि हिंसा असे सूचित करते की मानवी अस्थिरता हे निसर्गावर परिणाम करते, ज्यावर आपण नियंत्रण ठेवायला हवे होते.

सध्या जगाने अश्या रहिवाशांवर हिंसक प्रहार केले पाहिजेत. परंतु तसे न होण्याचे कारण म्हणजे देवाच्या कोकऱ्याने अजूनही काट्यांचा मुकुट परिधान केला आहे; तो अजूनही तुच्छ आणि नाकारला जातो; तो अजूनही कठोर शब्दांनी आणि माणसांच्या दुष्ट कल्पनांनी दुखावलेला आहे. तरीही तो हे सर्व शक्य तितके सहन करतो जेणेकरून आपल्याला या गोष्टी समजून घेण्यासाठी आणि पश्चात्ताप करण्यासाठी अधिक वेळ मिळावा.

पुढच्या वेळी जेव्हा आपण जंगलात, शांत नदी किंवा तलावाजवळ फिरतो तेव्हा जी शांतता आपण अनुभवतो ती निश्चितपणे जाणून घ्या की आपला प्रिय तारणारा मनुष्याच्या बंडखोरीचे वजन स्वतःवर घेत असल्यामुळे आहे. ह्या वजनाला उचलताना तो बंडखोरीच्या परिणामाला भूकंप, चक्रीवादळ, पूर आणि आपत्तींजनक स्फोट होण्यापासून शक्य तितके रोखून ठेवतो. या नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत याचा अर्थ माणसातील दुष्टता वाढत आहे. जेव्हा ख्रिस्त जवळजवळ पूर्णपणे नाकारला जातो तेव्हा मोठी संकटे येतील आणि निसर्ग मनुष्याचे प्रतिबिंब दर्शवेल.

ह्याच कारणामुळे पवित्र शास्त्र म्हणते:

> तेव्हा परमेश्वराने सदोम व गमोरा ह्यांच्यावर गंधक व अग्नी ह्यांचा वर्षाव आकाशातून केला; उत्पत्ती 19:24

निसर्गाच्या घटकांना टिकवून ठेवणारी शक्ती ख्रिस्तापासून येते कारण तो सर्व सृष्टीचा सांभाळ करतो. संपूर्ण निसर्ग आपल्या स्वर्गातील पित्याने स्थापित केलेल्या कायद्यांचे पालन करते. मनुष्यांनी त्यांच्या निर्मात्याशी सहवास करत असताना त्यांच्या अंतःकरणात जी शांती असायला हवी होती ती गोष्ट प्रतिबिंबित करण्यासाठी हे कायदे तयार करण्यात आले होते. आपली पृथ्वी अतुलनीय फळांनी, बियांनी आणि हिरवीगार जंगलांनी भरली असती आणि जीवनाचे हे रंग सर्वत्र पवित्रतेच्या सौंदर्याने प्रकट झाले असते. जेव्हा लोक देवाविरुद्ध बंड करतात तेव्हा हेच कायदे त्यांचा नाश आणि मृत्यूला कारणीभूत ठरतात आणि पाठीमागे कार्य करणारी शक्ती म्हणजे स्वर्गीय पित्याने दिलेल्या नियमांचे पालन करणारी येशूची शक्ती. हे मजकूर सर्पात रुपांतरित झालेल्या त्या काठीचे प्रतीकवाद अर्थ स्पष्ट करते, परंतु आपण त्याचा अभ्यास दुसऱ्या अध्यायात करूयात.

पृथ्वीवर झालेला महापूर आणि सदोम व गमोरावर स्वर्गातून पडलेली अग्नी ही मनुष्याच्या दुष्टतेसाठी शिक्षा म्हणून परमेश्वराची हिंसक कृत्ये नव्हती. मनुष्याना पश्चात्ताप करण्याची आणि ह्या धोक्यापासून वाचण्याची संधी देण्यासाठी ख्रिस्ताने शक्य तितक्या वेळेसाठी नाश त्यांच्यापासून लांब धरून ठेवले होते. हे कायदे लोकांना आशीर्वाद देण्यासाठी बनवले गेले होते, परंतु जेव्हा लोकांकडून हे नियम मोडले जातात तेव्हा ख्रिस्ताला त्याचे वाईट परिणाम हाताळावे लागतात. 2000 वर्षांपूर्वी जेव्हा ख्रिस्त मरण पावला त्याच क्षणी आपल्याला पृथ्वीवरील झालेले परिणाम लगेच लक्षात येतात:

> शताधिपती व त्याच्याबरोबर येशूवर पहारा करणारे, हा भूमिकंप व घडलेल्या गोष्टी पाहून, अत्यंत भयभीत झाले व “खरोखर हा देवाचा पुत्र होता,” असे म्हणाले. मत्तय 27:54

जेव्हा प्रकटीकरण 13 चा दुसरा श्वापद सर्व माणसांना पहिल्या श्वापदाची उपासना करण्यास प्रवृत्त करेल आणि सर्वांना त्यांच्या कपाळावर किंवा त्यांच्या तळहातावर एक चिन्ह काढण्यास प्रवृत्त करेल, तेव्हा ख्रिस्त पुन्हा एकदा लोकांनी त्याच्या आज्ञा नाकारल्यामुळे वधस्तंभावर खिळला जाईल. चार वारे पृथ्वीवर सोडले जातील, आणि मनुष्याचा बंडखोर आत्मा पृथ्वीच्या हृदयात जळत्या निखाऱ्यांसारखा होईल, आणि पृथ्वी हिंसाचाराच्या आत्म्याने स्वतःचा आणि तिच्यात राहण्याऱ्या लोकांचा नाश करेल. केवळ तेच लोक ह्या भयंकर गोष्टींपासून बचावले जातील जे परात्पराचे गुप्त स्थान कोठे आहे हे शिकले आहेत, आणि  जे विश्वासाने देवाच्या आज्ञांचे पालन करून सर्वशक्तिमान देवाच्या सावलीत राहतात. एक हजार त्यांच्या बाजूला पडतील आणि दहा हजार त्यांच्या उजव्या बाजूला पडतील पण मृत्यू त्यांच्या निवासस्थानाजवळ येणार नाही (स्तोत्र 91:7) कारण ते देवाबरोबर शांततेत आहेत आणि म्हणूनच, ते पृथ्वीवर देखील शांततेत असतील.

येशू वादळाने वेढलेल्या जहाजामध्ये शांतपणे झोपू शकला कारण पृथ्वी त्याच्याशी युद्ध करत नव्हती. बऱ्याच शतकांपासून असे अनेक वेळा घडले आहे जेव्हा वारा आणि लाटा त्याच्या शिष्यांना पळवून लावण्यासाठी तयार होत्या, परंतु तो उठतो आणि त्या घटकांना म्हणतो, “शांत व्हा.” मी तुम्हाला आवाहन करतो कि तुम्ही सदोम शहरातून देवदूतांसह पळून जाऊन ह्या सुरक्षिततेच्या कोशात प्रवेश करा. कारण आता पश्चात्ताप करण्याची आणि येशूच्या आत्म्याला स्वीकारण्याची वेळ आली आहे जेणेकरून आपण देवाविरूद्ध बंडखोरी करू नये, आणि पृथ्वीदेखील आपल्याविरूद्ध बंड करणार नाही.

एवढी वर्षे काट्यांचा मुकुट परिधान केल्याबद्दल, आणि कलहाचे वारे जे वारे माणसांच्या आत्म्याला बंडखोरी आणि दुष्टतेमध्ये ढवळून काढतात आणि शेवटी पृथ्वीवर त्यांची कापणी करतात त्या वाऱ्यांना रोखून धरल्याबद्दल प्रभु येशूचे आभार. आपण आमच्या दुष्ट मार्गांपासून वळू या, आपला सार्वकालिक करार मोडण्यापासून थांबूयात आणि परमेश्वराच्या आज्ञा, नियम आणि निर्णय पाळण्यास शिकूयात जेणेकरून पृथ्वीवर पुन्हा एकदा शांतीचे राज्य प्रस्थापित होईल.

## 14. मृत्यूची शक्ती

> येशूने आंब घेतल्यानंतर, "पूर्ण झाले आहे," असे म्हटले; आणि मस्तक लववून आपला आत्मा समर्पण केला. योहान 19:30 (NKJV)
>
> तेव्हा येशू उच्च स्वराने ओरडून म्हणाला, "हे बापा, मी माझा आत्मा तुझ्या हाती सोपवून देतो!" असे बोलून त्याने प्राण सोडला. लूक 23:46 (NKJV)
>
> परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला. रोमकरांस पत्र 5:8

जेव्हा येशूने आपले डोके लववून प्राण सोडले, तेव्हा संपूर्ण विश्वाने आणि ज्यांनी त्याच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या घटना पाहिल्या होत्या त्या मनुष्यांनी, मानवजातीवरील पित्याच्या प्रेमाचे सर्वात शक्तिशाली प्रदर्शन पाहिले. सर्व थट्टा, थुंकणे, मारणे सहन करून देखील येशूने कधीही ह्याचा बदला घेतला नाही. तो म्हणाला, ""हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही." येशू अति दुःखाने गतप्राण होत असताना, त्याने त्याच्या पृथ्वीवरील आई मरियाबद्दल विचार केला आणि योहानाला तिची काळजी घेण्यास सांगितले. त्याने पश्चात्ताप करणाऱ्या चोराला क्षमा केली आणि त्याला अनंतकाळचे जीवन देण्याचे वचन दिले. ह्या सर्व घटना पाहिल्यानंतर एका रोमन सैनिकाने कबूल केले कि:

> "खरोखर हा माणूस देवाचा पुत्र होता." मार्क 15:39

किती सहनशील, आणि आश्चर्यकारक हे प्रेम! आपल्या तारणाऱ्याने सैतानाद्वारे प्रेरित मानवी द्वेषाचे सर्वात क्रूर, अन्यायकारक, आणि हिंसक प्रकटीकरण सहनशीलतेने सहन केले. सैतानाने यहूदी पुढारी, याजक आणि लोकांच्या मनात द्वेष निर्माण केला होता. त्यांच्या कृतीतून आपण सैतानाचे चरित्र पाहू शकतो. हिंसक, द्वेषाने भरलेला, कपटी, निर्दयी आणि क्रूर, सैतान ह्या लोकांमध्ये पूर्णपणे

प्रकट झाला होता. वधस्तंभाच्या कथेमध्ये आपण ख्रिस्तामध्ये देवाचे आणि मनुष्यांमधील सैतानाचे पूर्णपणे प्रकट झालेले चरित्र पाहतो. मनुष्याच्या तारणासाठी स्वतःचा जिवाचा त्याग करून, येशूने जो सुरवातीपासून त्याचा द्वेष करत  होता त्याचा म्हणजे सैतानाचा पराभव केला. सैतानाबद्दल बोलताना, येशू यहुदी पुढाऱ्यांना म्हणाला:

> तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे.
>
> योहान 8:44

रात्रीच्या वेळी ख्रिस्ताचे पकडले जाणे, आणि ख्रिस्ताचा निषेध करण्यासाठी खोटे बोलणाऱ्या साक्षीदारांकडून कार्य करत असलेला सैतानाचा भ्रमक, व खोटे बोलणारा आत्मा आपण पाहतो. येशूची थट्टा आणि मारहाण करताना आपण सैतानाची क्रूरता आणि निर्दयीपणा पाहतो. येशूला वधस्तंभावर खिळताना आपल्याला त्याच्या हिंसाचाराची मोठी पातळी दिसते. परंतु मृत्यूद्वारे ख्रिस्ताने सैतानाचा पराभव केला. पवित्र शाश्त्राप्रमाणे:

> ज्या अर्थी ‘मुले’ एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, इब्री 2:14

पवित्र शास्त्र शिकवते की सैतानाकडे मृत्यूची शक्ती आहे. यामुळे देवाचे चरित्र समजण्यात एक गंभीर प्रश्न निर्माण होतो. सैतानाकडे मृत्यूची शक्ती कशी असू शकते जेव्हा कि आदाम आणि हव्वेला हे शब्द बोलणारा देवच असेल:

> पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.” उत्पत्ती 2:17

जेव्हा आदाम आणि हव्वेने बऱ्या व वाईट ज्ञानच्या झाडाचे फळ खाल्ले तेव्हा देवाने त्यांना ठार मारण्याची धमकी दिली होती का? पाप्याला काय मारते हे पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्ट करते.

> पापाचे वेतन मरण आहे, रोमकरांस पत्र 6:23
>
> दुष्टाचे मरण दुष्टाईतच होणार; नीतिमानाचे द्वेष्टे दंड पावतात. स्तोत्रसंहिता 34:21

परंतु जो मला अंतरतो तो आपल्या जिवाची हानी करून घेतो; जे माझा द्वेष करतात त्या सर्वांना मरण प्रिय आहे.” नीतिसूत्रे 8:36

मृत्यू हा पापाचा परिणाम आहे. स्वर्गातील आपल्या प्रेमळ पित्याविरुद्ध स्वार्थी, हिंसक आणि द्वेषपूर्ण रीतीने वागण्याचा हा अपराध आहे जो एका पाप्याला मारतो. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की ख्रिस्ताला फक्त जीवन नाही, तर तोच जीवन आहे.

> येशूने त्याला म्हटले, “मार्ग, सत्य व जीवन मीच आहे: योहान 14:6

> येशूने तिला म्हटले, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; योहान 11:25

> जे प्रारंभापासून होते, जे आम्ही ऐकले आहे, जे आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, जे आम्ही न्याहाळले व आपल्या हातांनी चाचपले, त्या जीवनाच्या शब्दाविषयी आम्ही सांगतो; ते जीवन प्रकट झाले, ते आम्ही पाहिले आहे, व त्याची आम्ही साक्ष देतो; ते सार्वकालिक जीवन पित्याजवळ होते व आम्हांला प्रकट झाले, ते तुम्हांला कळवतो; 1 योहान1:1-2

आपल्याला येशूच्या शब्दांकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. त्याला केवळ जीवन नाही, तर तोच जीवन आहे. जर येशू जीवन असेल तर त्याचा मृत्यूशी काहीही संबंध असू शकत नाही. जर येशू जीवन असेल तर त्याच्यापासून मृत्यू येणे शक्य नाही. येशू हे कसे व्यक्त करतो ते आपण काळजीपूर्वक पाहूयात:

> चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे. योहान 10:10

मारणारा चोर आहे, पण जीवन देणारा ख्रिस्त आहे. जर ख्रिस्ताने त्याच्या पित्याच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांना मरण दिले असते तर ख्रिस्ताकडे जीवन आणि मृत्यू दोन्हीचे सामर्थ्य असते. याचा अर्थ असा होतो की जीवन आणि मृत्यू त्याच्याकडूनच आहे. पण हा एक पूर्ण विरोधाभास आहे आणि म्हणूनच पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की सैतानाकडे मृत्यूचे सामर्थ आहे. जर ख्रिस्ताने लोकांचा नाश करण्यासाठी त्याच्या सामर्थ्याचा वापर केला तर सैतानाला मृत्यूची शक्ती असू शकत नाही. याचा अर्थ असा होईल की ख्रिस्ताला मृत्यूची शक्ती असेल. पण पवित्र शास्त्र स्पष्टपणे सांगते की सैतानाकडे मृत्यूची शक्ती आहे आणि मृत्यूचा थेट अंधाराशी संबंध आहे:

> मग जेथून परत येणे नाही अशा अंधाराच्या, मृत्यूच्या प्रदेशात मी जाईन; ईयोब 10:21

> काही जण क्लेशाने व बेड्यांनी जखडले होते, ते अंधकारात व मृत्युच्छायेत बसले होते, स्तोत्रसंहिता 107:10

याउलट, ख्रिस्तासाठी वाचा कि:

> त्याच्या ठायी जीवन होते, व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते. योहान 1:4

आम्हाला सांगितले जाते की ख्रिस्तामध्ये जीवन होते. त्याच्यामध्ये जीवन आणि मृत्यू होते असे सांगत नाही. ख्रिस्ताचे जीवन हे माणसांचा प्रकाश आहे. म्हणून प्रकाश आणि जीवन एकत्र बांधलेले आहेत, आणि अंधार आणि मृत्यू एकत्र बांधलेले आहेत. येशू जो संदेश जगाला घोषित करण्यासाठी आला होता तो असा कि:

> जो संदेश आम्ही त्याच्यापासून ऐकला आहे तो तुम्हांला विदित करतो; तो संदेश हा की, देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही. 1 योहान 1:5

परमेश्वरामध्ये अंधार नाही याचा अर्थ त्याच्यामध्ये मृत्यू नाही, आणि यामुळे आपण तार्किकदृष्ट्या असा निष्कर्ष काढू शकतो की देव मृत्यूचा लेखक नाही; त्याच्याकडे मृत्यूचे सामर्थ्यही नाही. तो फक्त एवढेच करू शकतो की पुरुषांनी स्वतःचा नाश करण्याचे निवडल्यास त्यांना तो स्वातंत्र्य देऊ शकतो. पवित्र शास्त्र मृत्यूला शत्रू म्हणतो, याचा अर्थ मृत्यू शत्रूकडून आला आहे.

> जो शेवटला शत्रू नाहीसा केला जाईल तो मृत्यू होय. 1 करिंथ 15:26

मृत्यू हा शत्रू आहे आणि म्हणूनच ख्रिस्ताने आधीच मृत्यूला रद्द केले आहे.

> त्याने आमच्या कृत्यांप्रमाणे नव्हे तर स्वत:च्या संकल्पाप्रमाणे व कृपेप्रमाणे आम्हांला तारले व पवित्र पाचारणाने पाचारले आहे; ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती; ती आता आपला तारणारा ख्रिस्त येशू ह्याच्या प्रकट होण्याने दृश्यमान झाली आहे. त्याने मरण नाहीसे केले, आणि सुवार्तेच्या द्वारे जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहेत. 2 तीमथ्य 1:9-10

ख्रिस्तामध्ये मृत्यू नाही म्हणून येशूने मार्थाला सांगितले:

> येशूने तिला म्हटले, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; योहान 11:26

जी व्यक्ती येशूवर विश्वास ठेवते ती व्यक्ती कधीही मरणार नाही हे कसे शक्य आहे? लोक तर सतत मरतात. येशूने मृत्यूचा संदर्भ कसा दिला ते आपण पुन्हा पाहूया:

> हे बोलल्यावर तो त्यांना म्हणाला, “आपला मित्र लाजर झोपला आहे; पण मी त्याला झोपेतून उठवायला जातो.” योहान 11:11

> “वाट सोडा, कारण मुलगी मेली नाही; ती झोपेत आहे.” तेव्हा ते त्याला हसू लागले. मत्तय 9:24

या व्याख्येनुसार संपूर्ण इतिहासात एकच व्यक्ती मरण पावली आहे.

> देवाच्या कृपेने प्रत्येकाकरता मरणाचा अनुभव घ्यावा म्हणून ज्याला ‘देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले होते,’ तो येशू मरण सोसल्यामुळे ‘गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केलेला’ असा आपण पाहतो. इब्री 2:9

जर थडग्यातील प्रत्येकजण आधीच मरण पावला असेल तर, 1000 वर्षांच्या शेवटी दुष्टाचा चेहरा जो अंतिम मृत्यू अनुभवत नाही तोपर्यंत येशूने प्रत्येकासाठी मरण्याचा अर्थ नेमका काय असेल?

प्रत्यक्षात मरण पावलेला एकमेव व्यक्ती म्हणजे येशू आहे. बाकीचे जे जगले ते थडग्यात झोपलेले आहेत. प्रत्येकजण एकतर अनंतकाळच्या जीवनासाठी पुनरुत्थित होणार आहे किंवा विश्वाच्या इतिहासात जो दुसऱ्यांदा मृत्यू येणार आहे त्या दुसऱ्या मृत्यूमध्ये सहभागी होणार आहेत. संपूर्ण जगाची पापे वाहून नेत असताना जेव्हा येशूने “तुझ्या हाती मी माझा आत्मा सोपवतो” असे बोलले तेव्हा त्याने मृत्यूच्या सामर्थ्याचा नाश केला. प्रत्येकासाठी असलेला मृत्यू त्याने पूर्णपणे नाहीसा केला. त्यामुळे पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की मृत्यू आधीच नाहीसा झाला आहे. काळाच्या शेवटी लोक मरतील याचे एकमेव कारण म्हणजे ते ख्रिस्तामध्ये अस्तित्वात असलेले जीवन स्वीकारण्यास नकार देतील. आपण मृत्यू रद्द करू शकत नाही आणि नंतरच्या काळात मृत्यूला कारणीभूत ठरू शकत नाही. हे पूर्णपणे अशक्य आहे.

ज्या वेळी दुष्टांचा अंत होतो त्या वेळी पवित्र शास्त्र म्हणते:

> तेव्हा मरण व अधोलोक हे अग्नीच्या सरोवरात टाकले गेले. अग्नीचे सरोवर हे दुसरे मरण होय. प्रकटी 20:14

बऱ्याचदा असे व्यक्त केले जाते की अग्नीच्या सरोवरासारखे नरक आहे, परंतु पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की नरकाला मृत्यूबरोबरच अग्नीच्या सरोवरात टाकले गेले आहे. अग्नीचे सरोवर म्हणजे काय? येशूने वधस्तंभावर भोगलेला अनुभव म्हणजेच हा अग्नीचे सरोवर आहे. आमचा देव भस्म करणारा अग्नी आहे. इब्री लोकांस 12:29. त्याच्या चारित्र्याची शुद्धता आणि त्याच्या प्रेमाची निःस्वार्थता जेव्हा पाप्याला प्रगट होते तेव्हा त्यांना स्वतःच्या स्वार्थाबद्दल त्याला भयंकर अपराधीपणा जाणवतो. प्रकाश अंधारात झळकतो आणि दुष्टांनी दया स्वीकारण्यास नकार दिल्याने, काईना प्रमाणे ते सर्व म्हणतात कि "माझा अपराध क्षमा करण्यापेक्षा मोठा आहे" आणि ते त्यांच्या स्वतःच्या अपराधाने चिरडले जातात. अशा रीतीने दुष्टांचा वध होतो आणि पापाचे वेतन मृत्यू आहे. स्तोत्र 34:21, रोम 6:23.

जर देव आणि त्याचा पुत्र लोकांना मृत्यू देतात तर त्यांच्या आत्म्यात मृत्यू आहे. जर हे खरे असेल तर मृत्यू कधीही नष्ट होऊ शकत नाही आणि तो शत्रू मानला जाऊ शकत नाही. पुन्हा आपल्याला हे जाणण्याची गरज आहे की ख्रिस्ताला केवळ जीवन नाही, तर तोच अनंतकाळचे जीवन आहे. आपण अनंतकाळचे जीवन असून त्याच वेळी आपल्या चरित्रात मृत्यू असणे योग्य असू शकत नाही, आणि हे शक्य देखील नाही!

> झऱ्याच्या एकाच छिद्रातून गोड पाणी व कडू पाणी निघते काय? याकोब 3:11

या प्रश्नावर आपण आणखी एक महत्त्वाचा मुद्दा विचारात घेउयात.

> परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. 2 करिंथ 3:18

जसेजसे आपण प्रभूचे वैभव किंवा चारित्र्य पाहतो तसतसे आपण त्याच्या प्रतिमेत बदलले जाऊ. देव आणि त्याचा पुत्र हे जीवन असल्याने, त्यांना पाहून आणि त्यांना जाणून घेतल्याने आपल्याला जीवन मिळेल.

> सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठवलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे. योहान 17:3

जुना करार वाचताना देव लोकांना मारतो असा आपला विश्वास असेल, आणि आपण हे देवाच्या चारित्र्याचा भाग म्हणून पाहू लागलो तर त्याचा आपल्या स्वतःच्या चारित्र्यावर प्रभाव पडेल. आता ह्या गोष्टीचा दुसऱ्या दृष्टीकोनातून विचार करा. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते कि:

> ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. कलस्सै 1:27

> मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वतःला माझ्याकरता दिले. गलतीकरांस पत्र 2:20

जर आपला विश्वास असेल की ख्रिस्त लोकांना मारतो आणि त्याचा आत्मा तुमच्यामध्ये असेल, तर आपल्यात खून करणार्याचा आत्मा असेल. परंतु ख्रिस्त हा अनंतकाळचे जीवन असल्यामुळे, आपल्यामध्ये एकाच वेळी ख्रिस्त आणि खून करणार्याचा आत्मा दोन्ही असू शकत नाही.

पुरुषांच्या मृत्यूचे हे एक कारण आहे; कि ते लोकांना मारणाऱ्या देवाची उपासना करतात. जर आपला असा विश्वास असेल की देवाने पुष्कळ लोकांना मारले आहे आणि भविष्यात तो आणखी कोट्यवधी लोकांना मारेल, तर  मृत्यू हे विश्वावर राज्य करत आहे, जीवन नाही व देवाचे खरे चरित्र नाही. जर आपण अशा देवाची उपासना करत असू आणि दिवसेंदिवस आपण असा क्रूर देव पाहत असू तर अशा प्रकारची उपासना आपल्याला मारून टाकेल. पण असे का? कारण त्याला पाहत राहिल्याने आपण त्याच्या प्रतिमेत समरूप होऊन जातो.  2 करिंथ 3:18.

मृत्यूचा नाश करण्याचा देवाचा एकमेव मार्ग म्हणजे देवाच्या पुत्राप्रती त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते लोकांना प्रकट करणे. जेव्हा येशू पृथ्वीवर आला तेव्हा सर्व माणसांमध्ये ख्रिस्ताबद्दल असलेला नैसर्गिक द्वेष प्रकट झाला. वधस्तंभावर आपण पाहतो की सैतान किती सहजपणे माणसांच्या हृदयाला हिंसक आणि खूनी बनवू शकतो. वधस्तंभावरील मृत्यूद्वारे ख्रिस्ताने सैतानाचे चरित्र प्रकट केले आणि मानवजात खरोखर किती दुष्ट आहे हे जगाला पाहण्याची संधी दिली. जेव्हा आपण वधस्तंभाकडे पाहतो तेव्हा आपल्याला आपल्या मानवतेचा सामना करावा लागतो आणि ख्रिस्ताच्या आत्म्याद्वारे आपल्याला त्याचा निःस्वार्थ, प्रेमळ, सौम्य आत्मा प्राप्त करण्याची क्षमता दिली जाते.

> मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे ‘तुमच्या जिवांना विसावा मिळेल.’
>
> मत्तय 11:29

येशू अतिशय नम्र आहे. येशू त्याच्या शत्रूंवर प्रेम करतो. जे त्याचा द्वेष करतात त्यांच्यासाठी येशू प्रार्थना करतो आणि जे त्याचा छळ करतात त्यांना क्षमा करण्यास तो त्याच्या पित्याला विनंती करतो. हा जीवन देणारा आत्मा आहे. हेच सार्वकालिक जीवन आहे.

पण देव लोकांना मारतो असे पवित्र शास्त्रामधील वचनाचे काय? आपण ख्रिस्ताच्या जीवनाचा दृष्टीकोन समोर ठेऊन जुन्या करारातील वचने लक्षात घेऊया. ख्रिस्ताच्या जीवनाला बाजूला करून जर आपण पवित्र शास्त्राचे वाचन केले तर खरोखर मृत्यू येईल. कारण, जर आपण लोकांना मारणाऱ्या देवाची उपासना करत असू तर आपण मृत्यूच्या देवाची उपासना करत आहोत आणि हे जाणून आपण नक्कीच मरू. सिनाई पर्वतावर चढू नये हि जी चिन्हात्मक आज्ञा इस्रायली लोकांना दिली होती त्यात आपल्याला ह्याचे स्पष्टीकरण आढळते.

> तू लोकांसाठी सभोवताली मर्यादा आख आणि त्यांना सांग, सांभाळा, पर्वतावर चढू नका, त्याच्या कडेला शिवू नका; जो कोणी पर्वताला स्पर्श करील त्याला अवश्य जिवे मारावे. त्याला कोणी हात लावू नये, लावला तर त्याला दगडमार करावा किंवा बाणांनी विंधावे; मग तो जनावर असो किंवा

> माणूस असो, त्याला जिवंत ठेवू नये. शिंगाचा दीर्घनाद होईल तेव्हा लोकांनी पर्वतावर चढावे.” निर्गम 19:12-13

केवळ एका मध्यस्थाद्वारे ते देवाशी बोलू शकत होते. मोशेने आपला मध्यस्थ म्हणून ख्रिस्ताचे प्रतिनिधित्व केले. मोशे न मरता पर्वतावर चढू शकला कारण त्याला देवाच्या स्वभावाची समज होती. डोंगरावरून खाली येताच त्याचा चेहरा देवाच्या गौरवाच्या किंवा चारित्र्याच्या प्रकाशाने उजळला. जर आपण मध्यस्थ म्हणून ख्रिस्ताचे जीवन न घेता जुना करार वाचला तर आपण देवाबद्दलच्या चुकीच्या कल्पनांनी भारावून जाऊ आणि शेवटी आपल्याला “मारले जाईल”

> ‘आता पाहा, मी, मीच तो आहे, माझ्याशिवाय कोणी देव नाही; प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे. मी घायाळ करतो आणि मीच बरे करतो; माझ्या हातून सोडवणारा कोणी नाही. अनुवाद 32:39

ख्रिस्ताच्या जीवनाकडे न पाहता आपण हे असे वाचू शकतो:

> मी घायाळ करतो आणि मीच बरे करतो.

पृथ्वीवर असताना येशूने कोणालाही कधी मारले नाही हे जाणून आम्हाला या वचनांचा अर्थ काय हे समजून घेण्यासाठी शोध करण्यास प्रोत्साहन दिले जाते. प्रथम आपण हे लक्षात घेतो की मारणे आणि जिवंत करणे हे एकत्र कसे केले जाते:

> प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे

प्राणहरण हा शब्द थेट प्राणदान या शब्दाशी जोडलेला आहे. त्यामुळे जीवे मारण्याची कारवाई जीवनदान दिल्यामुळे केली जाते. पुढील संकेत वचनांच्या पुढील भागात समाविष्ट आहे:

> प्राणहरण व प्राणदान
> करणारा मीच आहे. मी
> घायाळ करतो आणि
> मीच बरे करतो

हिब्रूमध्ये लिहिण्याचा हा एक सामान्य प्रकार आहे. त्याला समांतरता म्हणतात. पहिला भाग आणि दुसरा भाग समान कल्पना व्यक्त करत आहेत परंतु अर्थाचे स्पष्ट चित्र देण्यासाठी त्यांना वेगवेगळ्या प्रकारे लिहिले जाते. जखमा आणि बरे करण्याचे तत्त्व थेट सुवार्तेच्या कार्याशी जोडलेले आहे. पुन्हा जन्म घ्यायचा असेल तर आपल्याला आपल्या जुन्या जीवनात मरावे लागेल. बरे होण्यासाठी आपण आपल्या पापांना प्रकट करणाऱ्या कायद्याने जखमी केले पाहिजे. जुन्या जीवनात मृत्यूशिवाय जीवनाच्या नवीनतेमध्ये पुनरुत्थान होऊ शकत नाही. पौल आपल्याला अनुवाद 32:39 चा अर्थ दाखवतो जेव्हा तो म्हणतो:

> त्यानेच आम्हांला नव्या कराराचे सेवक होण्यासाठी समर्थ केले; तो करार लेखी नव्हे, तर आध्यात्मिक आहे; कारण लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जिवंत करतो. 2 करिंथ 3:6

देव नियमशास्त्राद्वारे जुन्या माणसाला मारतो परंतु आत्म्याद्वारे नवीन माणसाला जिवंत करतो. म्हणून अनुवाद 32:39 मधील मोशेचे हे विधान आपल्याला वाचवण्यासाठी देवाच्या आत्म्याच्या सुवार्तेचा संदर्भ आहे जेणेकरून कोणीही आपल्याला त्याच्या हातातून हिरावून घेऊ शकत नाही.

हिब्रू शब्दांचा हा क्रम कोठे येतो याची इतर उदाहरणे आपण पवित्र शास्त्रामध्ये शोधली तर आपल्याला आणखी एक जागा सापडते जी "प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे" या वाक्याची व्याख्या करते.

> परमेश्वर प्राण हरण करतो आणि प्राणदानही करतो 1 शमुवेल 2:6

वचनाचा पहिल्या भागाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी वेगळ्या प्रकारे पुनरावृत्ती केली जाते. परंतु किंग जेम्स बायबलमधील कोलन सूचित करते की पुढील गोष्टी जे नुकतेच सांगितले गेले ते स्पष्ट करते.

परमेश्वर प्राण हरण करतो आणि प्राणदानही करतो; तो खाली अधोलोकी नेतो आणि तो वरही आणतो.

म्हणून हे वाक्य ख्रिस्ताच्या पुनरुस्तानाच्या शक्तीचे संदर्भ आहे जो पुनरुत्थान आणि जीवन आहे आणि मृत्यूचा लेखक नाही. हे वचन हन्नाने केलेली आनंदाची प्रार्थना आहे. ती पुढे सांगते:

> परमेश्वर निर्धन करतो व धनवानही करतो; तो अवनत करतो व उन्नतही करतो. तो कंगालांना धुळीतून उठवतो, दरिद्र्यांना उकिरड्यावरून उचलून उभे करतो, म्हणजे मग ते सरदारांच्या शेजारी बसतात, आणि वैभवी सिंहासन त्यांना प्राप्त होते; कारण पृथ्वीचे आधारस्तंभ परमेश्वराच्या हातचे आहेत, त्यांवर त्याने दुनिया ठेवली आहे. 1 शमुवेल 2:7-8

प्रत्येक वेळी पहिल्या क्रियेचा संदर्भ त्यानंतर झालेल्या दुसऱ्या कृतीत दिला जातो. मुले जन्माला घालणाऱ्या दुसऱ्या बायकोकडून टोमणे मारली जात असताना, मूल होऊ न शकल्याने हन्नाला दुखावले जात होते. या अनुभवाने तिच्या जुन्या स्वभावाचा मृत्यू झाला, परंतु तिने परमेश्वरावर विश्वास ठेवला आणि वचन दिलेले मूल आले म्हणून ती पुन्हा जिवंत झाली. ती आत्म्याने गरीब होती, पण आता ती श्रीमंत झाली होती. ईयोब देखील याबद्दल बोलतो..

> मनुष्य मृत झाल्यावर पुन्हा जिवंत होईल काय? माझी सुटका होईपर्यंत कष्टमय सेवेचे सगळे दिवस मी वाट पाहत राहीन. ईयोब 14:14

ईयोब, अनुवाद 32:39 मध्ये सापडलेल्या समान दोन हिब्रू शब्दांचा वापर करून पुनरुत्थानाबद्दल बोलत आहे. जेव्हा नामान इस्रायलच्या राजाकडे बरे होण्यासाठी विचारपूस करतो तेव्हा राजाने अनुवाद 32:39 मधील ही अभिव्यक्ती वापरली

> हे पत्र वाचून इस्राएलाच्या राजाने आपली वस्त्रे फाडली; तो म्हणाला, "ह्या मनुष्याने कोड बरे करण्यासाठी माझ्याकडे हा माणूस पाठवला आहे; मरण व जीवन देणारा मी देव आहे काय? विचार करा; पाहा, हा माझ्याशी भांडण करण्याचे काहीतरी निमित्त पाहत आहे." 2 राजे 5:7

नामानला त्याच्या कुष्ठरोगामुळे मृत्यूदंडाची शिक्षा झाली होती. इस्राएलचा राजा उद्गारला, " मरण व जीवन देणारा मी देव आहे काय?!"

म्हणून जेव्हा आपण येशूच्या जीवनाच्या दृष्टीकोनातून जुना करार वाचण्याची तत्त्वे लागू करतो आणि विलियम मिलरचे वाक्प्रचार कोठे आढळते हे पाहण्याचे नियम लागू करतो, तेव्हा पवित्र शास्त्र आपल्याला त्याचा अर्थ काय आहे ते प्रकट करेल. जेव्हा मोशेने "प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे" असे लिहिले तेव्हा ख्रिस्त मोशेला सांगत होता की तो पुनरुत्थान आणि जीवन आहे! त्याच सुवार्तेचे प्रकटीकरण नवीन करारात आढळते. जेव्हा आपण हे सत्य जाणतो, तेव्हा आपल्या स्वर्गातील पित्याच्या हातून कोणीही आपल्याला हिरावून घेऊ शकत नाही. मग आपण हे वचन येशूच्या जीवनाच्या दृष्टीकोनातून वाचतो कि, "मी काही लोकांना मारतो आणि काहींना जिवंत ठेवतो" अशा प्रकारे वाचतो?

> पाहा, जीवन व सुख, आणि मरण व दुःख हे आज मी तुझ्यापुढे ठेवले आहेत; अनुवाद 30:15

येशूच सार्वकालिक जीवन आहे हे जाणून घेणे किती आश्चर्यकारक आहे. तो जीवन देणारा आणि जिवंत करणारा आहे आणि आपल्याला माहित असल्याप्रमाणे पित्याची अचूक प्रतिमा आहे. पित्यामध्ये अंधार किंवा मृत्यू नाही. ख्रिस्ताने पृथ्वीवर असताना आपल्याला हे प्रकट केले कारण त्याने कधीही कोणालाही मारले नाही आणि त्याच्या पित्याच्या सर्व आज्ञा पाळल्या. मग आपण कोणाची उपासना करतो?

जर त्या देवाची सेवा करतो ज्याच्यामध्ये मृत्यूचा आत्मा असेल तर तो सुवार्तेमध्ये प्रकट केल्याप्रमाणे येशू ख्रिस्ताचा देव नाही. सैतानामध्ये मृत्यू आणि वाईटपणा आहे आणि ख्रिस्तामध्ये जीवन आणि प्रकाश आहे. आज तुम्ही कोणाची सेवा कराल ते निवडा.

> ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे. योहान 14:9

मग आपण कोणाची उपासना करतो? हे पूर्णपणे आपल्यावर अवलंबून आहे.

## 15. माझ्या पित्याच्या आज्ञा

स्तोत्रांचे पुस्तक ख्रिस्ताला त्याच्या पित्याच्या आज्ञांबद्दलच्या असलेल्या प्रेमाबद्दल सांगते. तारणारा पृथ्वीवर येण्यापूर्वी तो म्हणाला:

> ह्यावरून मी म्हणालो, "पाहा, मी आलो आहे; ग्रंथपटात माझ्याविषयी लिहून ठेवले आहे की, हे माझ्या देवा, तुझ्या इच्छेप्रमाणे करण्यात मला आनंद आहे; तुझे शास्त्र माझ्या अंतर्यामी आहे." स्तोत्रसंहिता 40:7-8

देवाचा पुत्र आपल्याला त्याच्या पित्याच्या नियमाचे दैवी प्रदर्शन देतो. त्याचे आज्ञांबद्दल असलेले प्रेम आणि पृथ्वीवर असताना त्याचे दैनंदिन जगण्याचे उदाहरण आपल्याला कायदा कसा दिसतो हे दाखवतात. याशिवाय, येशूचे जीवन हे केवळ त्याच्या पित्याच्या नियमाचे प्रदर्शन नाही, तर हे तेच जीवन आहे जे त्याची सेवा करणाऱ्या सर्वांच्या हृदयात वास करते.

> सुज्ञाचा बोध जीवनाचा झरा आहे, तो मृत्युपाश चुकवतो. नीतिसूत्रे 13:14

येशू हा देवाचे ज्ञान आहे (1 करिंथकर 1:24) आणि त्याच्या बुद्धीची सुरुवात म्हणजे त्याच्या पित्याच्या आज्ञांबद्दलचा आदर आणि प्रेमापासून होते.

> परमेश्वराचे भय ज्ञानाचा आरंभ होय; आणि परमपवित्राला ओळखणे हीच सुज्ञता होय. नीतिसूत्रे 9:10

> आता सर्वकाही तुम्ही ऐकले; सर्वांचे सार हे की देवाचे भय धर व त्याच्या आज्ञा पाळ; मनुष्यकर्तव्य काय ते एवढेच आहे. उपदेशक 12:13

- जर कुठल्या मार्गाने आपण देवाचे भय बाळगू शकतो किंवा त्याचा आदर करू शकतो आणि त्याच्या आज्ञा पाळू शकतो तो म्हणजे केवळ देवाच्या पुत्राचा आत्म्याद्वारे. पित्याच्या आज्ञा पाळणाऱ्या सर्वांचा तो झरा आहे. ज्यांचा ख्रिस्तावर विश्वास आहे ते सर्व आत्म्याद्वारे त्याची आज्ञा पाळतात. ख्रिस्ताचा आत्मा असल्याशिवाय देवाचा नियम पाळणे शक्य नाही.

> आता तर नियमशास्त्राव्यतिरिक्त असे जे देवाचे नीतिमत्त्व ते प्रकट झाले आहे; त्याला नियमशास्त्राची व संदेष्ट्यांची साक्ष आहे; हे देवाचे नीतिमत्त्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वांसाठी आहे; त्यात भेदभाव नाही. रोमकरांस पत्र 3:21-22

पौल आपल्याला सांगतो की देवाची नीतिमत्ता येशू ख्रिस्तामध्ये प्रकट झाली आहे आणि ती आपल्याला मुक्तपणे दिली गेलेली आहे ह्यासाठी आपल्याला देवाला प्रसन्न करण्याची गरज नाही. सर्व काही आपल्याला विश्वासाने दिले जाते.

> तरी मनुष्य नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीही ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला; ह्यासाठी की, आम्ही ख्रिस्तावरील विश्वासाने नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे; कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी 'मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही.' गलतीकरांस 2:16

जेव्हा आपण स्वीकार करतो की येशू खरोखरच देवाचा पुत्र आहे आणि त्याच्या नावावर विश्वास ठेवतो, तेव्हा आपल्याला त्याच्या पित्यावरील असलेला विश्वास आणि त्याच्या सर्व नियमांचे पालन करणारा आत्मा मिळतो. ख्रिस्तामध्ये आपल्याला हि किती छान भेट मिळते! आत्म्याच्या देणगीद्वारे कायद्याचे पालन करणे आपल्याला मुक्तपणे उपलब्ध आहे.

> आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही. गलतीकरांस 5:22-23

ख्रिस्ताच्या आत्म्याच्या प्रेरणेने आपण स्तोत्रांमध्ये वाचतो की देवाचा पुत्र देवाच्या नियमाविषयी कसा बोलतो.

> जो पुरुष दुर्जनांच्या मसलतीने चालत नाही; पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही; आणि निंदकांच्या बैठकीत बसत नाही, तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो, त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो, तो धन्य. जे झाड पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेले असते, जे आपल्या हंगामात फळ देते, ज्याची पाने कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे; आणि जे काही तो हाती घेतो ते सिद्धीस जाते. स्तोत्रसंहिता 1:1-3

ख्रिस्ताच्या आत्म्याद्वारे निखळ हा जिवंत पाण्याचा एक शक्तिशाली झरा आहे. ज्या खडकावर प्रहार झाला त्या खडकातून बाहेर पडलेल्या पाण्यातून व्यक्त होणारे हे प्रतीक आहे.

> पाहा, होरेब डोंगरावरील एका खडकावर मी तुझ्यापुढे उभा राहीन; आणि तू त्या खडकावर काठी आपट म्हणजे त्यातून पाणी निघेल आणि लोक ते पितील." इस्राएलाच्या वडिलांच्या देखत मोशेने तसे केले. निर्गम 17:6

होरेब पर्वत हे सिनाई पर्वतासासारखेच ठिकाण आहे. त्यामुळे ज्या ठिकाणाहून पाणी वाहत होते त्याच ठिकाणी नियमशास्त्र देण्यात आले. म्हणून ख्रिस्तामध्ये नियमशास्त्र हे मृतपत्र नसून जिवंत वास्तव आहे. जेव्हा आपण ख्रिस्ताला स्वीकारतो तेव्हा त्याच्या आत्म्याच्या देणगीमध्ये आपल्याला खालील भावना प्राप्त होतात.

> अहाहा, तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय आहे! दिवसभर मी त्याचे मनन करतो. स्तोत्रसंहिता 119:97

हे वचन पवित्र शास्त्रामधील सर्वात मोठ्या अध्यायातील आहे, हा एक अध्याय आहे जो कायदा किती अद्भुत आहे याबद्दल सांगते. साधारण सत्य हे आहे की देवाचा नियम हे त्याच्या चरित्राचा उतारा आहे. देवाचा पुत्र नियमशास्त्रावर प्रेम करतो कारण तो त्याच्या पित्यावर प्रेम करतो. नियमशास्त्र आणि देवाचे चरित्र यांचे वर्णन अगदी सारखेच आहे.

| देवाचे चरित्र | | देवाचे नियम | |
|---|---|---|---|
| 1.अध्यात्मिक | योहान 4:24 | 1.अध्यात्मिक | रोमकरांस 7:14 |
| 2.प्रेम | 1 योहान 4:8 | 2.प्रेम | मत्तय 22:37-40 |
| 3.सत्य | योहान 14:6 | 3.सत्य | स्तोत्रसंहिता 119:142 |
| 4.धार्मिक | 1 करिंथ.1:30 | 4.धार्मिक | स्तोत्र 119:144,172 |
| 5.पवित्र | यशया 6:3 | 5.पवित्र | रोमकरांस 7:12 |
| 6.परिपूर्ण | मत्तय 5:48 | 6.परिपूर्ण | Psalms 19:7 |
| 7.चांगले | लूक 18:19 | 7.चांगले | रोमकरांस 7:12 |
| 8.बरोबर | अनुवाद 32:4 | 8.बरोबर | रोमकरांस 7:12 |
| 9.शुद्ध | 1 योहान 3:3 | 9.शुद्ध | स्तोत्रसंहिता 19:8 |
| 10.न बदलणारे | याकोब 1:17 | 10.न बदलणारे | मत्तय 5:18 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11.सदैव उभा राहणारे | स्तोत्रसंहिता 90:2 | 11.सदैव उभा राहणारे | स्तोत्रसंहिता 111:7,8 |
| 12.मार्ग | योहान 14:6 | 12.मार्ग | मलाखी 2:7-9 |
| 13.महान | स्तोत्रसंहिता 48:1 | 13.महान | होशेय 8:12 |
| 14.शुद्ध करणारे | मत्तय 8:3 | 14.शुद्ध करणारे | यहेज्केल 22:26 |

जेव्हा आपण नियमाचे परीक्षण करतो तेव्हा आपल्याला कळते की ते सर्व देवासोबत आणि एकमेकांसोबतचे आपले नातेसंबंध जपण्यासाठी आहेत.

| देवाचे चरित्र | |
|---|---|
| 1. मी तुला बंधनातून बाहेर काढले. माझ्याशिवाय तुझा कोणीही दुसरा देव नसेल. | उद्धारकर्ता, तारणारा, एकच देव, कौटूंबिक |
| 2. तुम्ही कोणतीही कोरीव मूर्ती बनवू नका. | तुमचा लाकडाशी किंवा खोट्या कल्पनेशी संबंध असू शकत नाही. |
| 3. तुम्ही देवाचे नाव व्यर्थ घेणार नाही | अखंड, पारदर्शकता, नातेसंबंध |
| 4. शब्बाथाची आठवण ठेवा कारण सहा दिवसात परमेश्वराने आकाश व पृथ्वी निर्माण केली. | निर्माता, जीवनाचा स्रोत, नातेसंबंध |
| 5. वडिलांचा आणि आईचा सन्मान करा | कौटूंबिक नातेसंबंध |
| 6. तुम्ही खून करू नये | जीवन अनमोल आहे, नाती सदैवासाठी आहेत, मी जीवनाचा उगम आहे |
| 7. तू व्यभिचार करू नकोस | योग्य असलेले घनिष्ट संबंध कायमचे असतात |
| 8. तुम्ही चोरी करू नका | आध्यात्मिक/कौटुम्बीक, भौतिक गोष्टीकडे लक्ष लावू नये. |
| 9. तुम्ही खोटे बोलू नका | अखंडता, पारदर्शकता, नातेसंबंध |
| 10. तुम्ही लोभ करू नका | निर्माता, जीवनाचा स्रोत, नातेसंबंध |

1. पहिली आज्ञा आपल्याला सांगते की देवाने इस्रायलला इजिप्तच्या गुलामगिरीतून बाहेर काढले, जे आपल्याला सांगते की हा एक देव उद्धारकर्ता आणि तारणारा आहे. जेव्हा तो म्हणतो आपल्याला त्याच्याशिवाय दुसरा देव नसावा तेव्हा तो आपल्याला सांगतो की त्याला आपल्याशी घनिष्ठ मैत्री हवी आहे.
2. दुसरी आज्ञा आपल्याला सांगते की देवाला आपल्यासोबत अतिशय घनिष्ट नातेसंबंध हवे आहेत. मूर्तीची पूजा ही मनापासून केलेली पूजा नाही. दोन्हीपैकी एकही आध्यात्मिक उपासना नाही. मूर्तिपूजा ही वस्तुनिष्ठता आहे; हे अशा वस्तूशी जोडलेले आहे ज्यामध्ये जीवन नाही आणि/किंवा कल्पना व सत्य नाही.
3. तिसरी आज्ञा आपल्याला सांगते की देव त्याच्या नातेसंबंधांमध्ये पारदर्शक आहे. जर आपण त्याच्याशी नातेसंबंध जोडले, तर आपण नातेसंबंधात ढोंग करू नये, नाहीतर अशा प्रकारे ते निरुपयोगी किंवा व्यर्थ ठरेल अशी त्याची इच्छा नाही.
4. चौथी आज्ञा खूप विशेष आहे कारण ती आपल्याला सांगते की देव जीवनाचा झरा आहे, त्याने सर्व काही निर्माण केले आहे. या आज्ञेचा त्याच्याबद्दलच्या आपल्या आकलनावर खूप मोठा प्रभाव पडतो आणि त्याच्याबद्दलच्या आपल्या पद्धतीवरदेखील खूप प्रभाव पडतो. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की शब्बाथाच्या आज्ञामध्ये सर्वात जास्त शब्द वापरले आहेत.
5. पाचवी आज्ञा देखील विशेष आहे कारण ती आपल्याला सांगते की देवाचे जीवन पृथ्वीवरील वाहिन्यांमधून कसे वाहते. जर आपण आपल्या पालकांचा सन्मान केला तर ही आज्ञा आपल्याला दीर्घायुष्याचे वचन देते. हे विशेषतः सूचित करते की आपले पालक आपल्याला देवाबद्दल काहीतरी विशेष प्रकट करतात आणि त्यांचा सन्मान करताना आपण त्याचा सन्मान करतो.
6. सहावी आज्ञा आपल्याला सांगते की देव आपल्या जीवनाला मौल्यवान समजतो. हे आपल्याला हे देखील सांगते की देवाची इच्छा आहे की आपले नातेसंबंध सदैव टिकून राहावेत.
7. सातवी आज्ञा आपल्याला सांगते की काही नातेसंबंध धोकादायक आहेत आणि देवाच्या संदर्भात बघितले तर पहिल्या आज्ञेचे हे प्रतिबिंब आहे. हे एक बजावणी आहे की देव हा आपल्या जीवनाचा स्रोत आहे.
8. आठवी आज्ञा आपल्याला सांगते की देव आपल्या गरजा पुरवील, तो आपली काळजी घेईल. हे आज्ञा आपल्याला हे देखील सांगते की देव भौतिक गोष्टींवर केंद्रित नाही तर नातेसंबंधांवर केंद्रित आहे.
9. नववी आज्ञा तिसऱ्या आज्ञांचे प्रतिबिंब आहे कि देवाला नातेसंबंधांमध्ये पारदर्शकता आणि अखंडता हवी आहे. खोटा साक्षीदार एक किंवा दोन्ही पक्षांची ओळख नष्ट करतो आणि संवाद नष्ट करतो.
10. देवाच्या संदर्भात दहावी आज्ञा आपल्याला आठवण करून देते की तो

जीवनाचा झरा आहे. जेव्हा आपण यावर विश्वास ठेवतो तेव्हा आपल्याला कशाचीही गरज नसते. हे आपल्याला पुन्हा देवाच्या आध्यात्मिक व कौटुंबिक अंतःकरणाबद्दल सांगते. 5-9 ज्या आज्ञा आहेत त्या सर्व पाहिले आणि प्रदर्शित केले जाऊ शकतात, परंतु ही जी आज्ञा आहे ती हृदयाची समस्या आहे. ती अदृश्य आहे. त्यामुळे देवाच्या राज्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी ही आज्ञा महत्त्वपूर्ण आहे.

तर सारांशात दहा आज्ञा आपल्याला सांगतात की देव:

1. तो जीवनाचा झरा आहे
2. तो आपला निर्माता आहे
3. तो आपला उद्धारकर्ता आहे
4. त्याला आपल्यासोबत खरे व घनिस्ट नातेसंबंध हवे आहेत
5. तो एक पिता म्हणून आपली काळजी करतो आणि आपल्या सर्व गरजा पुरवतो.

योहान त्याच्या पहिल्या पत्रात आपल्याला सांगतो की देव प्रेम आहे, आणि त्याच्या चरित्राचे प्रतिबिंब म्हणून नियमशास्त्र देखील प्रेम आहे:

> "मी त्याला ओळखतो" असे म्हणून त्याच्या आज्ञा जो पाळत नाही तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही. जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीती खरोखर पूर्णत्व पावली आहे. ह्यावरून आपल्याला कळून येते की, आपण त्याच्या ठायी आहोत. 1 योहान 2:4-5

येशूने ते ह्या प्रकारे व्यक्त केले:

> जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली तशी मीही तुमच्यावर प्रीती केली आहे; तुम्ही माझ्या प्रीतीत राहा. जसा मी आपल्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रीतीत राहतो तसे तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर माझ्या प्रीतीत राहाल. माझा आनंद तुमच्यामध्ये असावा व तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. जशी मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करावी अशी माझी आज्ञा आहे. योहान 15:9-12

येशू:

- त्याच्या पित्याव्यतिरिक्त त्याला इतर कोणतेही देव नाहीत कारण येशू त्याच्या पित्यावर प्रेम करतो
- तो आपल्या पित्यावर प्रेम करतो म्हणून खोट्या देवांची पूजा करत नाही किंवा कोरीव मूर्तीहि बनवत नाही
- त्याचे नाव किंवा चरित्र व्यर्थ घेत नाही कारण तो पित्याचे चरित्र पूर्णपणे प्रतिबिंबित करतो
- त्याच्या पित्यासोबत शब्बाथच्या सहवासात आनंद होतो
- त्याच्या पित्याचा तो सन्मान करतो
- तो खून करत नाही कारण तो पुनरुत्थान आणि जीवन आहे

- तो व्यभिचार करत नाही कारण तो त्याच्यासाठी कुठलेही अवैध संबंध शोधत नाही
- तो चोरीहि करत नाही कारण तो त्याच्या पित्याने त्याला दिलेल्या वारशावर विश्वास ठेवतो
- तो खोटे बोलत नाही कारण खोटे बोलल्याने नातेसंबंधांची अखंडता नष्ट होते
- लोभ धरत नाही कारण तो त्याच्या पित्याच्या तरतुदीत राहतो.

या दहा आज्ञांपैकी नऊ संदर्भात बहुतेक लोकांना कोणताही प्रश्न नसेल. अनेकांची समस्या सहाव्या आज्ञेची आहे जी म्हणते तुम्ही खून करू नका. अश्या कथांबद्दल आम्ही काय करावे ज्यात आपण वाचतो कि यहोशवा परमेश्वराच्या सेनापतीला भेटतो?

> यहोशवाने यरीहोजवळ असताना समोर पाहिले तो कोणी पुरुष आपल्या हाती उपसलेली तलवार घेऊन पुढे उभा आहे असे त्याच्या नजरेस पडले. यहोशवाने जवळ जाऊन विचारले, “तू आमच्या पक्षाचा की आमच्या वैऱ्यांच्या पक्षाचा?” तो म्हणाला, “नाही; मी येथे परमेश्वराचा सेनापती ह्या नात्याने आलो आहे.” तेव्हा यहोशवाने त्याला दंडवत घालून म्हटले, “स्वामींची आपल्या दासाला काय आज्ञा आहे?” यहोशवा 5:13-14

यहोशवाने कनानच्या रहिवाशांना ठार मारले तेव्हा असे दिसते की देवाच्या पुत्राने या कृतींचे समर्थन केले आणि त्याचे नेतृत्व केले. अश्शूरी सैन्याची कत्तल यांसारख्या कथांचा उपयोग देवाचा पुत्र त्याच्या निवडलेल्या लोकांचे रक्षण करण्यासाठी हत्या करतो हे दाखवण्यासाठी केला जातो.

> त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते! 2 राजे 19:35

अश्शूरी सैन्याची कथा आपण दुसऱ्या अध्यायात बघू. आपल्यासमोर वस्तुस्थिती अशी आहे की जेव्हा येशू पृथ्वीवर आला आणि आपल्यामध्ये राहिला तेव्हा त्याने कोणालाही मारले नाही. पृथ्वीवरील येशू ख्रिस्ताचे जीवन हे पित्याचे पूर्ण प्रकटीकरण आहे या विचाराने आपण ह्या अध्यायांची सुरुवात केली. ज्याप्रमाणे येशूने फिलिपला सांगितले:

> येशूने त्याला म्हटले : “फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर ‘आम्हांला पिता दाखवा’ असे तू कसे म्हणतोस? योहान 14:9

येशूने फिलिपला सांगितले की तो त्याच्या पित्याचे संपूर्ण चरित्र शिष्यांना प्रकट करत आहे. त्याच्या एका प्रार्थनेत येशू म्हणाला::

> जे लोक तू मला जगातून दिलेस त्यांना मी तुझे नाव प्रकट केले; ते तुझे होते आणि तू ते मला दिलेस; आणि त्यांनी तुझे वचन पाळले आहे. योहान 17:6

पवित्र शास्त्रात देवाचे नाव म्हणजे देवाचे चरित्र्य आहे आणि येशू सूचित करतो की त्याने पित्याचे हे चरित्र शिष्यांना प्रकट केले आहे.

> जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. योहान 17:4

येशू हा पित्याच्या गौरवाची स्पष्ट प्रतिमा आहे (इब्री 1:3) आणि हे वैभव किंवा चरित्र त्याने पृथ्वीवर प्रकट केले आहे. याचा अर्थ असा की पृथ्वीवरील येशूचे जीवन हे दहा आज्ञांचे संपूर्ण व्यक्तीकरण आहे जे देवाच्या चरित्राचे प्रतिबिंब आहे. येशूने पृथ्वीवर असताना कोणालाही मारले नाही आणि हे त्याच्या विधानात समाविष्ट आहे की त्याने त्याच्या पित्याच्या आज्ञा पाळल्या आहेत. देव खून करत नाही याची ही स्पष्ट पुष्टी आहे. हे त्याच्या नियमात लिहिलेले आहे आणि पृथ्वीवर असताना त्याच्या पुत्राने ते करूनही दाखवले आहे.

या सत्याच्या अनेक अर्थांपैकी एक अर्थ म्हणजे आपल्याला आपल्या शत्रूंवर खरोखर प्रेम करणे आवश्यक आहे. जर देव काही लोकांना इतके दुष्ट समजत असेल की त्याने त्यांना मारलेच पाहिजे, तर ते आपल्याला लोकांचा न्याय देण्यासाठी आणि कोण मरण्यास पात्र आहे हे आपल्याला ठरवण्याठी कारण देते. यामुळे आपल्या शत्रूंवर प्रेम करण्याची गरज नाहीशी होते. त्याऐवजी आपण त्यांचा फक्त दुष्ट लोक म्हणून न्याय करू शकतो ज्यां लोकांचा देव नाश करेल किंवा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्याच्या "सेवकांनी" नाश करण्यासाठी देवाचे कामकरी म्हणून कार्य करावे. म्हणून, देव लोकांना मारतो यावर विश्वास ठेवल्याने पुरुषांना त्यांच्या शत्रूंवर प्रेम करणे टाळता येते. येशू देवाच्या नियमाचे स्पष्टीकरण देत असताना आपल्याला देवावर प्रेम करण्यास आणि सर्व माणसांवर प्रेम करण्यास सांगतो.

> मग पाहा, कोणीएक शास्त्री उभा राहिला आणि त्याची परीक्षा पाहण्याकरता म्हणाला, “गुरूजी, काय केल्याने मला सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल?” त्याने त्याला म्हटले, “नियमशास्त्रात काय लिहिले आहे? तुझ्या वाचनात काय आले आहे?” त्याने उत्तर दिले, “तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने व संपूर्ण बुद्धीने ‘प्रीती कर;’ आणि ‘जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.’” त्याने त्याला म्हटले, “ठीक उत्तर दिलेस; हेच कर म्हणजे जगशील.” परंतु स्वतःस नीतिमान ठरवून घ्यावे अशी इच्छा धरून तो येशूला म्हणाला, “पण माझा शेजारी कोण?” लूक 10:25-29

जेव्हा ह्या वकिलाला त्याच्या सर्व शेजाऱ्यांवर प्रेम करण्याची खात्री पटवून दिली गेली ज्याचा तो सध्या तिरस्कार करतो, तेव्हा त्याने तेच केले जे बहुतेक लोक करतात ते म्हणजे लोक मुख्य शब्दांचा अर्थ पुन्हा परिभाषित करण्याचा प्रयत्न करतात. त्याला जो शब्द स्पष्ट करायचा होता तो शब्द "शेजारी" होता. ह्याच प्रकारे, सहाव्या आज्ञेची खात्री टाळण्यासाठी बरेच लोक खून या शब्दाची पुन्हा व्याख्या देण्याचा प्रयत्न करतात. जरी येशूने त्याच्या पृथ्वीवरील जीवनाद्वारे शब्दाचा अर्थ आपल्यासाठी परिभाषित केला असला तरीही, ह्या नियमशास्त्राचे हेतू बदलण्याचे प्रयत्न अजूनही चालू आहेत. खालील मुद्दे सामान्य समज प्रतिबिंबित करतात:

> "हत्या" आणि "खून" यासाठी दोन भिन्न हिब्रू शब्द (रत्साख, मट) आणि दोन ग्रीक शब्द (फोनुओ, अपोक्टेइनो) वापरले आहेत. एक म्हणजे "जिवे मारणे" आणि दुसरा म्हणजे "हत्या करणे". नंतरचा शब्द दहा आज्ञांद्वारे निषिद्ध आहे, पूर्वीचा नाही. किंबहुना, रत्साखची व्याख्या "हत्या" या मराठी शब्दापेक्षा विस्तृत आहे. रत्साख देखील निष्काळजीपणामुळे किंवा दुर्लक्षामुळे होणाऱ्या मृत्यूंचा संदर्भ करते परंतु युद्धकाळात झालेल्या हत्येचे वर्णन करताना ते कधीही वापरले जात नाही. म्हणूनच बहुतेक आधुनिक अनुवादकांनी सहावी आज्ञा "तुम्ही हत्या करू नका" ऐवजी "तुम्ही खून करू नका" असे भाषांतरित केले आहे. तथापि, कोणते भाषांतर अभ्यासले जाते यावर अवलंबून एक फार मोठी समस्या उद्भवू शकते. सदैव लोकप्रिय किंग जेम्स भाषांतर या वाचनाला "तू खून करू नकोस" असे लिहिते, म्हणून वचनाचा संपूर्णपणे चुकीचा अर्थ लावला जातो. जर "तू खून करू नकोस" ह्याचा अर्थ फक्त एवढाच असेल - कोणालाही मारणे नाही - तर इस्राएल राष्ट्राने केलेले सर्व देव-समर्थित रक्तपात हे देवाच्या स्वतःच्याच आज्ञेचे उल्लंघन आहे (अनुवाद 20). परंतु देव त्याच्या स्वतःच्या आज्ञा मोडत नाही, म्हणून, स्पष्टपणे, वचन दुसऱ्या मानवी जीवनावर पूर्ण अधिकाराची मागणी करत नाही. https://www.gotquestions.org/you-shall-not-murder.html

पवित्र शास्त्राचे बारकाईने परीक्षण केल्यास हा युक्तिवाद खोटा असल्याचे दिसून येते. सर्वप्रथम, अगदी स्पष्टीकरणात लेखकाने कबूल केले आहे की किंग जेम्स आवृत्तीमध्ये "खून" या शब्दाचे भाषांतर केलेल्या अनुवादकांचा अर्थ केवळ खूनच नाही तर अपघाती मृत्यू देखील आहे ज्याला आपण मनुष्यवध म्हणतो. ही हत्या नाही.

> तथापि कोणी वैरभावाने नव्हे पण अचानक एखाद्याला ढकलले किंवा टपून न बसता त्याच्यावर एखादे शस्त्र फेकले, किंवा ज्याकडून मृत्यू [H7523 Ratsach] घडेल असा धोंडा हातात घेऊन नकळत कोणावर फेकला, आणि त्यामुळे तो मेला, आणि तो त्याचा शत्रू नसला अथवा त्याने त्याची हानी करू पाहिली नसली, तर मंडळीने मारणाऱ्याचा आणि रक्तपाताबद्दल सूड घेणाऱ्याचा न्याय ह्या नियमानुसार करावा. मग मनुष्यवध करणाऱ्या त्या

> मनुष्याला, रक्तपाताबद्दल सूड घेणाऱ्याच्या हातून सोडवून ज्या शरणपुरात तो पळून गेला होता तेथे त्याला मंडळीने पुन्हा पोचते करावे; आणि पवित्र तेलाने अभिषेक केलेला मुख्य याजक मरेपर्यंत त्या मनुष्याने तेथेच राहावे. गणना 35:22-25

> ह्यासाठी की, एखाद्याने चुकून म्हणजे पूर्वी काही वैर नसताना आपल्या शेजाऱ्याला ठार [Ratsach H7523] मारले तर त्याने ह्यांतल्या एका नगरात पळून जाऊन आपला जीव वाचवावा. अनुवाद 4:42

दुसरे म्हणजे, देवाने आज्ञा दिली आहे की जे लोक "खून" [ratsach] करतात त्यांना त्याच गोष्टीचा सामना करावा लागतो.

> कोणी एखाद्या मनुष्याचा खून [ratsach H7523] केला तर साक्षीदारांच्या साक्षीवरून त्या खून करणाऱ्याला जिवे मारावे; पण एकाच साक्षीदाराच्या साक्षीवरून कोणाला जिवे मारू नये. गणना 35:30

देव कशा प्रकारे अशी आज्ञा देईल ज्याची दहा आज्ञाद्वारे मनाई आहे? थोडक्यात, देव पवित्र शास्त्रात मृत्यूची शिक्षा सुरक्षित ठेवण्यासाठी आणि दया दाखवण्यासाठी आज्ञा देतो, लोकांना मारण्यासाठी आज्ञा देत नाही. आम्ही 9 व्या अध्यायात मध्ये हा मुद्दा संबोधित केला - आरसा म्हणून देवाचा कायदा.

तिसरे म्हणजे, पवित्र शास्त्रातील मुथ [H4191] हा शब्द खून आणि हत्या यांचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. शौलला बेकायदेशीरपणे दाविदाचा खून करायचा होता:

> शौलाने आपला पुत्र योनाथान व आपले सर्व सेवक ह्यांना सांगून ठेवले की दाविदाला मारून [muth H4191] टाकावे; पण शौलाचा पुत्र योनाथान ह्याचे दाविदावर फारच मन बसले होते. म्हणून योनाथानाने दाविदाला सागितले की, “माझा बाप शौल तुला मारून [muth H4191] टाकायला पाहत आहे; तर तू सकाळपर्यंत सावध होऊन एखाद्या गुप्त स्थळी लपून राहा. 1 शमुवेल 19:1-2

शौलाने याजकांच्या बेकायदेशीर हत्येचा आदेश दिला:

> तेव्हा जवळ प्यादे उभे होते त्यांना राजा म्हणाला, “चला, परमेश्वराच्या याजकांचा वध करा; कारण त्यांनी दाविदाशी हातमिळवणी केली आहे; तो पळून गेला हे त्यांना ठाऊक असूनही त्यांनी माझ्या कानावर घातले नाही;” पण परमेश्वराच्या याजकांवर राजाचे सेवक आपला हात टाकीनात. तेव्हा राजा दवेगास म्हणाला, “चल, तू जाऊन त्या याजकांवर तुटून पड.” तेव्हा

अदोमी दवेग याजकांवर तुटून पडला. त्या दिवशी सणाचे एफोद धारण करणाऱ्या पंचाऐंशी पुरुषांचा त्याने वध [muth H4191] केला. 1 शमुवेल 22:17-18

इसबोशेथची हत्या:

ते घरात शिरले तेव्हा तो आपल्या शय्यागृहात पलंगावर निजला होता; तेथे त्यांनी त्याच्यावर प्रहार करून त्याचा वध केला व त्याचे शिर कापून घेऊन ते रातोरात अराबाच्या वाटेने गेले. 2 शमुवेल 4:7

अबशालोमने त्याचा सावत्र भाऊ अम्नोनच्या विरुद्ध बेकायदेशीर हत्येचा आदेश दिला:

अबशालोमाने आपल्या सर्व सेवकांना अशी ताकीद देऊन ठेवली होती की, "सावध राहा, अम्नोन द्राक्षारस पिऊन रंगात आला म्हणजे मी तुम्हांला इशारा केल्याबरोबर तुम्ही अम्नोनावर प्रहार करून त्याला ठार करा, काही भिऊ नका; मी तुम्हांला हुकूम करतो आहे ना? हिंमत धरा, शौर्य दाखवा." 2 शमुवेल 13:28

अथल्याने योआश सोडून सर्व राजपुत्रांची हत्या केली:

तरी योराम राजाची कन्या व अहज्याची बहीण यहोशेबा हिने अहज्याचा पुत्र योवाश ह्याला त्या वधायच्या राजपुत्रांतून चोरून नेले आणि त्याला व त्याच्या दाईला बिछाने ठेवण्याच्या कोठडीत लपवून ठेवले; त्याला अथल्येच्या दृष्टिआड केल्यामुळे त्याचा वध झाला नाही. 2 राजे 11:2 (MARVIBSI)

IRV भाषांतराकडे लक्ष द्या:

पण यहोशेबा, ही राजा योरामाची मुलगी आणि अहज्याची बहीण. योवाश हा राजाच्या अनेक मुलांपैकी एक. इतर मुलांची हत्या होत असताना यहोशेबाने योवाशाला बाजूला घेतले आणि आपल्या झोपायच्या खोलीत लपवून ठेवले. तिने योवाश आणि त्याची दाई यांना लपवले. यहोशेबा आणि ती दाई यांनी योवाशाला अथल्याच्या तावडीतून सोडवले म्हणून तो मारला गेला नाही. 2 राजे 11:2 (IRVMAR)

मथ हा शब्द वापरून आणखी एक हत्या आणि त्याचे MARVIBSI मध्ये भाषांतर:

रमाल्याचा मुलगा पेकह हा त्याचा सरदार होता. त्याने अर्गोब व अरये आणि गिलादी लोकांतले पन्नास माणसे आपल्यासोबत घेतली, आणि त्याच्याविरुध्द कट करून त्यास शोमरोन मध्ये राजाच्या घरांतल्या महालात मारून ठार [muth H4191] केले आणि त्याच्या जागी पेकह राज्य करू लागला. 2 राजे 15:25 (IRVMAR)

> त्याचा सरदार रमाल्याचा पुत्र पेकह ह्याने त्याच्याशी फितुरी करून शोमरोनाच्या राजवाड्याच्या मनोऱ्यात त्याला व त्याच्याबरोबर अर्गोब व अरये ह्यांना वधले; पेकहाबरोबर पन्नास गिलादी लोक होते; त्यांना वधून [muth H4191] त्याच्या जागी तो राजा झाला. 2 राजे 15:25 (MARVIBSI)

जर मुठ चा उपयोग फक्त न्यायिकरित्या एखाद्याला मारण्यासाठी केला जात असेल तर दुष्टांना धार्मिकतेने एखाद्या व्यक्तीची हत्या करणे शक्य आहे काय?

> दुर्जन नीतिमानावर टपलेला असतो, व त्याला जिवे [muth H4191] मारण्यास तो पाहत असतो. स्तोत्रसंहिता 37:32

> कारण त्या मनुष्याने दया करण्याची आठवण ठेवली नाही, तर दीन, दरिद्री व दुःखी माणसांचा वध [muth H4191] करण्यासाठी तो त्यांच्या पाठीस लागला. शाप देण्याची त्याला आवड असे म्हणून तो शाप त्यालाच लागो; आशीर्वाद देण्याची त्याला आवड नसे म्हणून तो आशीर्वादाला मुको. स्तोत्रसंहिता 109:16-17

त्यामुळे muth हा शब्द खरोखरच खून आणि हत्या या अर्थासाठी वापरला जाऊ शकतो आणि ratsach हा शब्द अपघाती मृत्यूसाठी वापरला जाऊ शकतो. यावरून muth हा केवळ धार्मिक हत्येसाठी आणि जाणून करणाऱ्या खुनासाठी ratsach आहे हा दावा खोटा ठरतो.

शेवटी, खून आणि धार्मिक हत्या या दोन्हीची व्याख्या कशी केली जाते याची पर्वा न करता लोक प्राणघातक बळ वापरतात. बळाचा वापर हा देवाच्या राज्याचा भाग आहे काय? येशूने डोंगरावरील प्रवचनात आणि त्याच्या जीवनातील सर्व कृतींद्वारे स्पष्टपणे प्रदर्शित केले की तो प्राणघातक बळाचा वापरत नाही.

> मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; मत्तय 5:39

“मी जेव्हा ह्या दुष्टाला ठार मारले तेव्हा मी जुन्या करारातील तुझ्या उदाहरणाचे अनुकरण केले” असे परमेश्वराला म्हणणाऱ्याला एका व्यक्तीला काय उत्तर दिले जाऊ शकते. अशा व्यक्तीला असे म्हटले जाईल की, “तुम्ही चुकीचे उदाहरण पाळले, पवित्र शास्त्राचा तो भाग तुम्हाला अनुसरण्यासाठी नाही.” आपण हे पाहू शकतो का की यामुळे गोष्टी खूप कठीण होतात? हीच वेळ आहे मुथ ह्या वादाला मागे टाकून सत्यावर विश्वास ठेवण्याची की तू खून करू नकोस म्हणजे कोणाचा जीव घेऊ नकोस.

येशूचे पृथ्वीवरील जीवन आपल्यासाठी "खून करू नकोस" या आज्ञेचे योग्य अर्थ प्रकट करते. येशूने कधीही कोणालाही मारले नाही. दहा आज्ञा हा प्रेमाचा नियम आहे

आणि प्रेम स्वतःचा बचाव करण्यासाठी शक्ती वापरत नाही. पाप्यांना कशी शिक्षा दिली जाते हे आज्ञाच आपल्याला सांगते.

> …कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो; निर्गम 20:5

दुष्ट खरोखर मरतील; त्यांना त्यांच्या स्वतःच्या कृत्याची शिक्षा होईल. जसे आपण पूर्वी बघितले की हे लोक सैतानाला त्यांच्या जीवनात प्रवेश करण्याची परवानगी देऊन तो त्यांचा नाश करेल किंवा पृथ्वी स्वतः त्यांच्या बंडखोरीविरुद्ध प्रतिबिंबि करून त्यांचा नाश करेल.

आपला स्वर्गीय पिता येशूसारखाच आहे हे जाणून घेणे किती आश्चर्यकारक आहे! येशूने आपल्याला दहा आज्ञांची संपूर्ण व्याख्या दाखवून दिली आहे ज्यामध्ये "तु खून करू नकोस" या आज्ञेचे पालन करण्याचा अर्थ काय हे समजण्यात किती आनंद आहे. येशूने कधीही कोणालाही मारले नाही आणि म्हणून त्याने आपल्याला शिकविल्याप्रमाणे आपल्या शत्रूंवर खरोखर प्रेम करायला शिकण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

## 16. दैवी आरशात श्रीमंत मनुष्य आणि लाजर

श्रीमंत मनुष्य आणि लाजरचा दाखला बहुसंख्य ख्रिस्ती लोकांसाठी सकारात्मक पुरावा आहे की देव पाप्यांना नरकात यातना देईल आणि जाळून टाकील. हे स्पष्टपणे दिसते कारण येशू स्वतः हा दाखला सांगत आहे.

> पुढे असे झाले की, तो दरिद्री माणूस मेला आणि देवदूतांनी त्याला अब्राहामाच्या उराशी नेऊन ठेवले; श्रीमंतही मेला व त्याची उत्तरक्रिया करण्यात आली. तो अधोलोकात यातना भोगत असताना त्याने आपली दृष्टी वर करून अब्राहाम व त्याच्या उराशी बसलेला लाजर ह्यांना दुरून पाहिले. तेव्हा त्याने हाक मारून म्हटले, 'हे बापा अब्राहामा, माझ्यावर दया करून लाजराला पाठव, ह्यासाठी की त्याने आपल्या बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी; कारण ह्या जाळात मी क्लेश भोगत आहे.' अब्राहाम म्हणाला, 'मुला, तू आपल्या आयुष्यात आपले सुख भरून पावलास, तसा लाजर आपले दुःख भरून पावला, ह्याची आठवण कर; आता ह्याला येथे समाधान मिळत आहे व तू क्लेश भोगत आहेस. लूक 16:22-25

जेव्हा हा दाखला पवित्र शास्त्रातील इतर पुस्तकांबरोबर जोडला जातो तेव्हा निष्कर्ष पूर्णपणे अटळ दिसतो की देव लोकांना त्यांच्या पापी असण्याच्या पातळीच्या आधारावर योग्यरित्या नरकात जाळून त्यांना यातना देईल.

> जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा व शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्याला भ्या. मत्तय 10:28

> तुझा हात किंवा तुझा पाय तुला अडखळवत असेल तर तो तोडून फेकून दे; दोन हात किंवा दोन पाय असून सार्वकालिक अग्नीत पडावे ह्यापेक्षा लुळे किंवा लंगडे होऊन जीवनात जावे हे तुला बरे आहे. मत्तय 18:8

मग डावीकडच्यांनाही तो म्हणेल, ‘अहो शापग्रस्तहो, माझ्यापुढून निघा आणि सैतान व त्याचे दूत ह्यांच्यासाठी जो सार्वकालिक अग्नी सिद्ध केला आहे त्यात जा. मत्तय 25:41

तोही ‘देवाच्या क्रोधाच्या प्याल्यात निरा घातलेला’ त्याचा क्रोधरूपी द्राक्षारस पिईल, आणि पवित्र देवदूतांसमक्ष व कोकऱ्यासमक्ष त्याला ‘अग्नी व गंधक’ ह्यांपासून पीडा होईल. त्यांच्या पीडेचा ‘धूर युगानुयुग वर येतो;’ आणि जे श्वापदाला व त्याच्या मूर्तीला नमन करतात त्यांना, आणि जो कोणी त्याच्या नावाची खूण धारण करून घेतो त्याला ‘रात्रंदिवस’ विश्रांती मिळत नाही.” प्रकटी 14:10-11

देवाचे वचन ऐकणारा या वचनांना वाचेल आणि स्वाभाविकपणे असा अंदाज लावेल की देव पाप्यांना सार्वकालिक अग्नीत अवर्णनीय यातना देईल. ज्या व्यक्तीने शुभवर्तमानांचा बारकाईने अभ्यास केला आहे आणि येशूच्या जीवनाचा विचार केला आहे त्याला अनेक प्रश्न पडतील जे त्याला या वचनांचे स्पष्टीकरण पवित्र शास्त्रामध्ये खोलवर शोधण्यास प्रवृत्त करतील.

ज्यांच्या अंतःकरणात कोणाबद्दलतरी राग आहे किंवा कोणाचेही नुकसान करण्याची इच्छा आहे त्यांना वरील काही वचनांमध्ये समाधान मिळेल, कारण त्यांना वाटते की देव त्याच्या शत्रूंचा सूड घेतो. जे स्वत:चा कठोरपणे न्याय करतात आणि ज्यांना वाटते कि आपल्या पापासाठी आपण मरणास पात्र आहोत त्यांनाही या वचनांमध्ये समाधान मिळेल. तरीही आपण यापेक्षा अधिक खोलवर गेले पाहिजे. परिपूर्ण क्षमा आणि देवाचे प्रेम स्वीकारण्याऐवजी, देव कठोर आणि अत्याचारी आहे या त्यांच्या विश्वासाचे समर्थन करण्यासाठी हे लोक या वचनांचा वापर करतात. ते यज्ञ म्हणून स्वतःचा देह अर्पण करतात तरीहि त्यांच्यात निखळ प्रेमाचा अभाव आहे.

लोक सहसा हे वचन असे वाचतात कि देव सूड घेतो आणि त्याच्या शत्रूंना शिक्षा करतो याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मनुष्याची इतरांवर दोष लावण्याची प्रवृत्ती. ही प्रथा आदामापासून सुरू झाली आदामाने फळ खाल्ल्याबद्दल त्याने हव्वेला दोष लावला. एखाद्या संकटाच्या वेळी शांतता निर्माण करण्यासाठी दुसऱ्यावर दोष लावणे हे चुकीचे कृत्य आहे, जसे महायाजक कैफाने ख्रिस्ताला केले.

प्रजेसाठी एका मनुष्याने मरावे आणि सबंध राष्ट्राचा नाश होऊ नये हे तुम्हांला हितावह आहे, हेही तुम्ही लक्षात आणत नाही.” योहान 11:50

इस्रायलच्या धर्मगुरूंवर संकट आले. त्यांची पापे उघड होत होती आणि त्यांना लोकांचे लक्ष ख्रिस्ताच्या “बेकायदेशीर” प्रथांकडे वळवायचे होते; म्हणून त्यांनी येशू मोशेने सांगितलेल्या गोष्टींविरुद्ध युद्ध करत आहे असे दाखवले आणि अशा प्रकारे मरणास पात्र पापी म्हणून त्यांनी येशूला सादर केले. मत्सराने भरलेल्या पुरुश्यांनी ख्रिस्ताला खोटे प्रायश्चित्त म्हणून पाहिले आणि पिलातचा वापर करून त्याला बळीचा बकरा बनवले. त्यांनी आत्मसमर्पण करण्याऐवजी त्यांना त्रास देणारा जिवंत साक्षीदार बाहेर काढून त्यांच्या अस्वस्थ विवेकाला शांत करण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ताला देवाकडून शिक्षा झालेला आणि पीडित असे चित्रित करून त्यांनी या भावना देवावर प्रक्षेपित केल्या आणि ख्रिस्ताबद्दलचा त्यांचा राग आणि द्वेषाचे त्यांनी ह्याप्रकारे समर्थन केले.

जेव्हा ख्रिस्ती लोक रागाने घोषित करतात की देव पापी लोकांचा नाश करेल, तेव्हा त्यांचे वागणे कैफाच्या खोट्या प्रायश्चितासारखे असू शकते. इतरांना स्वतःपेक्षा कमी लेखून त्याला मृत्यूमुखी पडल्याले पाहून आत्मसंतुष्टीतून आत्म-धार्मिकता प्राप्त होते.

ख्रिस्ताच्या बाबतीत, यहुदी नेत्यांसाठी हे प्रायश्चित्त एका नीतिमान माणसाकडे निर्देशित केले गेले. हे काईन आणि हाबेलच्या बाबतीत सारखेच होते. हाबेलने काईनच्या विचारांना त्रास दिला आणि हाबेलाने केलेल्या अर्पणामुळे काईन स्वतःला पापी समजू लागला. वैयक्तिक प्रायश्चित्त शोधण्यासाठी काईनने आपल्या भावाचा बळी दिला आणि त्याला ठार मारले. ख्रिस्ताच्या बाबतीत, यहुदी नेत्यांनी त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला त्रास देणाऱ्याचा आवाज बंद केला, तसेच ज्या दोन चोरांना ते स्वतःहून कमी पात्र समजत होते त्यांना देखील त्यांनी ठार मारले.

लुटारू, चोर आणि सर्व अनैतिक लोक स्वर्गात न जाता नरकाच्या यातनांमध्ये जाळले जातील हे जाणून अनेक ख्रिस्ती बांधवांना समाधान मिळू शकते. ते ह्या दूषित युक्तिवादाचा उपयोग दुसऱ्या नीतिमान विश्वासणाऱ्याच्या विवेकाला शांत करण्यासाठी देखील करू शकतात. प्रायश्चित्त ही संकल्पना ख्रिस्ताने स्पष्टपणे लोकांचे अपराध स्वतःवर घेणे आणि जे लोक शिक्षेला पात्र आहेत त्यांना आपण दुष्ट समजणे यांच्यामध्ये गोंधळलेला आहे. हि खोटी सुवार्ता पापांच्या ओझ्याने दबलेल्या सद्सद्विवेकबुद्धीला फक्त तात्पुरत्या रीतीने शांत करू शकते.

आपल्या कथेकडे परत जाताना, आपण पहिला मुद्दा नमूद केला पाहिजे की पवित्र शास्त्राचे संपूर्ण वाचन आपल्याला दर्शवते की लोक जेव्हा मरतात तेव्हा ते जागरूक नसतात.

आपल्याला मरायचे आहे हे जिवंतांना निदान कळत असते; पण मेलेल्यांना तर काहीच कळत नाही; त्यांना आणखी काही फलप्राप्ती होणार नसते; त्यांचे स्मरण कोणाला राहत नाही. उपदेशक 9:5

मेलेले म्हणजे निःशब्दस्थानी उतरलेले कोणीही परमेशाचे स्तवन करीत नाहीत; स्तोत्रसंहिता 115:17

समुद्राचे पाणी आटून जाते, नदी आटून कोरडी होते; तसा मनुष्य पडला म्हणजे तो पुन्हा उठत नाही; आकाशाचा विलय होईतोवर तो जागृत होणार नाही; आणि त्याला झोपेतून कोणी जागे करणार नाही. ईयोब 14:11-12

तरी रात्री चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल; त्या दिवशी आकाश मोठा नाद करत नाहीसे होईल, सृष्टितत्त्वे तप्त होऊन लयास जातील, आणि पृथ्वी व तिच्यावरील गोष्टी उघडकीस येतील. 2 पेत्र 3:10

पाहा, भट्टीसारखा तप्त दिवस येत आहे; सर्व गर्विष्ठ व सर्व दुराचारी धसकट बनतील; तो येणारा दिवस त्यांना जाळून टाकील, त्यांचे मूळ, फांदी वगैरे काहीच राहू देणार नाही, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. पण तुम्ही जे माझ्या नावाचे भय धरणारे त्या तुमच्यावर न्याय्यत्वाचा सूर्य उदय पावेल, त्याच्या पंखांच्या ठायी आरोग्य असेल; तुम्ही गोठ्यातल्या वत्सांप्रमाणे बाहेर पडून बागडाल. तुम्ही दुष्टांना तुडवाल; कारण मी हे करीन त्या दिवशी ते तुमच्या पायांच्या तळव्यांखाली राखेप्रमाणे होतील, असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. मलाखी 4:1-3

कारण तुम्ही जसे माझ्या पवित्र पर्वतावर प्यालात तशी सर्व राष्ट्रे सतत पीत राहतील; ती पिऊन बरळतील आणि होती की नव्हती अशी होतील. ओबद्या 1:16

बंधुजनहो, कुलाधिपती दावीद ह्याच्याविषयी मी तुमच्याबरोबर प्रशस्तपणे बोलतो. तो मरण पावला, पुरला गेला व त्याची कबर आजपर्यंत आपल्यामध्ये आहे. कारण दावीद स्वर्गास चढून गेला नाही; पण तो स्वतः म्हणतो, ‘परमेश्वराने माझ्या प्रभूला सांगितले की, मी तुझ्या शत्रूंचे तुझ्या पायांसाठी आसन करीपर्यंत तू माझ्या उजवीकडे बसून राहा.’ प्रेषितांची कृत्ये 2:29,34-35

‘तो’ त्यांच्या डोळ्यांचे ‘सर्व अश्रू पुसून टाकील;’ ह्यापुढे मरण नाही; ‘शोक, रडणे’ व कष्ट हे नाहीत; कारण ‘पहिल्या गोष्टी’ होऊन गेल्या.” प्रकटी 21:4

पवित्र शास्त्र शिकवते की मनुष्य मेल्यावर स्वर्गात किंवा नरकात जात नाहीत. 2 पेत्र 3:10 आपल्याला ख्रिस्ताच्या पुन्हा येण्याच्या वेळेस, स्वर्ग नाहीसे होत नाही तोपर्यंत ते कबरेत राहतील. मग येशूला पवित्र शास्त्राच्या इतर गोष्टींशी विरोधाभास करणारा दाखला शिकवणे कसे शक्य आहे? येशूने सांगितलेला हा दाखला यहुदी समाजात मानली जाणारी एक गोष्ट होती, कारण ते अनेक शतकांपूर्वी ग्रीक लोकांच्या प्रभावाखाली होते.

> ॲलन एफ. जॉन्सन आणि रॉबर्ट ई. वेबर स्पष्ट करतात की "एखाद्या कथेत मृत्यूनंतरच्या जीवनाचे तपशील प्रकट न करता, जीवनानंतरच्या सामान्यतः विचारांना वेगळे वळण देणारे म्हणून पाहणे अधिक चांगले आहे." एडवर्ड विल्यम फज, द फायर द्यात कंझुम पान.149.

> "कथेत सुप्रसिद्ध लोककथांचे स्पष्ट प्रतिध्वनी आहेत, ज्याला येशू नवीन आणि धक्कादायक वळण देत आहे." एनटी राइट, जीजस ॲंड द व्हिक्टरी ऑफ गॉड पान. 255.

हे समजून घेण्यासाठी एक गंभीर तत्त्व आहे. येशू लोकांना महत्त्वाचे सत्य शिकवण्यासाठी त्या लोकांचा ज्या कथांवर विश्वास होता त्या सामान्य कथा येशू वापरतो.

> गेल्डेनह्युईसने निष्कर्ष काढला की येशूने “ही बोधकथा मृत्यूनंतरच्या जीवनाबद्दलची आपली उत्सुकता पूर्ण करण्यासाठी नव्हे तर कबरेच्या या बाजूला असलेल्या जीवनाच्या प्रचंड गांभीर्यावर स्पष्टपणे जोर देण्यासाठी सांगितली.” एडवर्ड विल्यम फज, द फायर द्यात कंझुम पान. 149.

आपण अध्याय 9 मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, ख्रिस्त मनुष्याला त्याचे स्वतःचे विचार प्रतिबिंबित करण्यासाठी आरशाचा वापर करतो. तो ह्याचा उपयोग मनुष्यांशी त्यांना समजेल अशा प्रकारे बोलण्यासाठी आणि त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते तपासण्यासाठी करतो. जी व्यक्ती देवाच्या वचनाशी आज्ञाधारक आहे आणि आत्म्याद्वारे चालते ती येशूच्या शब्दांचा आध्यात्मिक अर्थ ओळखेल तर देहिक असलेल्या व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या कल्पनां दिसून येतील. येशूने निकोदेमसला म्हटल्याप्रमाणे:

> निकदेम त्याला म्हणाला, “ह्या गोष्टी कशा होऊ शकतील?” येशूने त्याला उत्तर दिले, “तुम्ही इस्राएलाचे गुरू असूनही तुम्हांला ह्या गोष्टी समजत नाहीत काय? मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो की, जे आम्हांला ठाऊक आहे ते आम्ही सांगतो, आणि आम्ही पाहिले आहे त्याविषयी साक्ष देतो; पण तुम्ही आमची साक्ष मानत नाही. मी पृथ्वीवरील गोष्टी तुम्हांला सांगितल्या असता तुम्ही विश्वास धरत नाही तर स्वर्गातल्या गोष्टी तुम्हांला सांगितल्यास विश्वास कसा धराल? योहान 3:9-12

योहानाच्या पुस्तकात येशू वापरत असलेला आरसा जोपर्यंत एखादी व्यक्ती आपली विचारसरणी चुकीची आहे किंवा येशूपासून दूर जात नाही तोपर्यंत समजून घेणे अधिकाधिक कठीण होत जाते.

| वचन | वचनांचे अर्थ |
|---|---|
| योहान 2:19-21 येशूने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही हे मंदिर मोडून टाका आणि मी तीन दिवसांत ते उभारीन." ह्यावरून यहूदी म्हणाले, "हे मंदिर बांधण्यास सेहेचाळीस वर्षे लागली आणि तुम्ही हे तीन दिवसांत उभारणार काय?" तो तर आपल्या शरीररूपी मंदिराविषयी बोलला होता. | येशू त्याचे जिवंत शरीर म्हणजे जिवंत मंदिराबद्दल बोलतो, परंतु त्यांना शहरातील भौतिक मंदिर वाटते.. |
| योहान 3:3-4 येशू त्याला म्हणाला, "मी तुम्हांला खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही." निकदेम त्याला म्हणाला, "म्हातारा झालेला मनुष्य कसा जन्म घेऊ शकेल? त्याला मातेच्या उदरात दुसऱ्यांदा जाणे व जन्म घेणे शक्य होईल काय?" | येशू आध्यात्मिक जन्माबद्दल बोलतो आणि निकोदेमसला वाटते की त्याचा अर्थ शारीरिक जन्म आहे. |
| योहान 4:13-15 येशूने तिला उत्तर दिले, "जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, परंतु मी देईन ते पाणी जो कोणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही; जे पाणी मी त्याला देईन ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा होईल." ती स्त्री त्याला म्हणाली, "महाराज, मला तहान लागू नये व पाणी काढायला मला येथवर येणे भाग पडू नये म्हणून ते पाणी मला द्या." | येशू आध्यात्मिक पाण्याबद्दल बोलतो आणि त्या स्त्रीला वाटते की तो भौतिक पाण्याबद्दल बोलत आहे. |
| योहान 5:17-18 येशूने त्यांना उत्तर दिले, "माझा पिता आजपर्यंत काम करत आहे आणि मीही काम करत आहे." ह्यामुळे तर यहूदी त्याला जिवे मारण्याची अधिकच खटपट करू लागले; कारण तो शब्बाथ मोडत असे इतकेच नाही, तर देवाला आपला पिता म्हणून स्वतःला देवासमान करत असे. | येशू अध्यात्मिक कामाबद्दल बोलतो आणि यहूद्यांना वाटते की त्याचा अर्थ शारीरिक काम आहे. ते जाणूनबुजून चुकीच्या समजुतीला चिकटून राहतात ज्यामुळे ते त्याला नाकारू शकतात व येशूला ठार मारू शकतात. |

| | |
|---|---|
| योहान 6:51-52,60,66 स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे; ह्या भाकरीतून जो कोणी खाईल तो सर्वकाळ जगेल; जी भाकर मी देईन ती माझा देह असून ती जगाच्या जीवनासाठी आहे." तेव्हा यहूदी आपसांमध्ये वितंडवाद करू लागले व म्हणाले, "हा आपला देह आम्हांला खायला कसा देऊ शकतो?" त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळ जण हे ऐकून म्हणाले, "हे वचन कठीण आहे, हे कोण ऐकून घेऊ शकतो?" ह्यावरून त्याच्या शिष्यांपैकी पुष्कळ जण परत गेले आणि ते पुन्हा कधी त्याच्याबरोबर चालले नाहीत. | येशू अध्यात्मिक भाकर व द्राक्षरसाबद्दल बोलत होता परंतु बरेच लोक त्यांच्या स्वतःच्या समजुतीनुसार वळाले आणि त्यांनी येशूला नाकारले. |

योहानाच्या पुस्तकातील ही प्रक्रिया येशूच्या सेवाकार्यात आरशाचा वाढता वापर प्रकट करते. योहानाच्या सहाव्या अध्यायात येशूची शब्दावली त्याचे मांस खाणे आणि त्याचे रक्त पिणे यावर जोर देते. येशूने योहान ६:३५ मध्ये वापरलेली चिन्हे स्पष्टपणे सांगितली होती. आध्यात्मिक अन्नाची भूक भागवण्यासाठी तो लोकांना त्याच्याकडे येण्याचे आणि त्याच्या वचनांचे अन्न खाण्यासाठी आवाहन करत होता; लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा जेणेकरून त्यांचे आध्यात्मिक सांत्वन आणि दैवी आपुलकीबद्दल त्यांची तहान भागवली जाईल असा त्याचा हेतू होता. तो जे म्हणतो ते ऐकण्यास लोकांचा जो नकार होता त्यामुळे त्यांनी येशूला पूर्णपणे नाकारले. ह्या प्रक्रियेद्वारे त्यांच्या अपरिवर्तित अंतःकरणात काय आहे ते पूर्णपणे प्रकट झाले. हे असे दर्शविते कि ते जाणूनबुजून येशूचा चुकीचा अर्थ लावतात आणि त्याला नाकारण्याचे समर्थन करतात व खरा तारणारा म्हणून त्याच्या ओळखीचे सर्व पुरावे त्यांच्या डोळयाआड होऊ देतात.

येशू श्रीमंत मनुष्य आणि लाजरच्या कथेत वापरत असलेल्या आरशाच्या बाबतीत, भौतिक किंवा आध्यात्मिक पातळीपेक्षा तो अधिक खोलवर जातो. लोकांना काही महत्त्वाची शिकवण देण्यासाठी येशू त्या लोकांचा ज्या कल्पनांवर विश्वास होता त्याच कल्पना वापरतो. यहुदी लोक येशूकडे त्याच्या अधिकाराचे चिन्ह दाखवण्याची मागणी करू लागले. ते येशूविरुद्ध स्वतःचे अंतःकरण कठोर करत होते. परिस्थितीच्या तीव्रतेमुळे येशूला जीवन आणि मृत्यूची वास्तविकता त्यांना समजावून सांगणे आवश्यक होते. त्यांना समजत असलेली गोष्ट घेऊन तो त्यांच्याशी बोलला. ज्याद्वारे त्यांच्या स्वतःच्या विचारांचे प्रतिबिंब त्यांना दर्शविले गेले. त्यांच्या हृदयाच्या कठोरतेमुळे ह्याची गरज होतीच.

ज्यांना आपण गुन्हेगार समजतो त्यांना यातना भोगायला लावल्या पाहिजेत या विश्वासाने आज जे लोक ही कथा वाचतात ते इतरांबद्दलच्या त्यांच्या मनात असलेल्या द्वेषाचे समर्थन सहजपणे करतात. काहीजण प्रश्न करतील कि - येशू असे का करेल? ज्या गोष्टींचा चुकीचा अर्थ लावता येईल अशा गोष्टी येशू का बोलेल?

शुभवर्तमानाचे पहिले कार्य लोकांना पापासाठी दोषी ठरवणे आहे. पापाची ही खात्री अनेकदा आपल्या अंतःकरणात दडलेली गोष्ट प्रकट करते. लूक 8:17, मार्क 4:22, लूक 12:2. नियमशास्त्राचा जो दैवी आरसा आहे त्याचा हाच उद्देश आहे, कारण आपल्या सर्वांमध्ये असे पाप आहे ज्याबद्दल आपण बेशुद्ध आहोत, ज्याला आपण स्वीकारत नाही, किंवा त्याचे संपूर्ण महत्त्व समजत नाही. मनुष्यांच्या मनात त्याचे पाप प्रकट करण्यासाठी देवाच्या बुद्धीच्या पूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते.

> तो येऊन पापाविषयी, नीतिमत्त्वाविषयी व न्याय-निवाड्याविषयी जगाची खातरी करील : योहान 16:8

> “जे आत्म्याने ‘दीन’ ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. ‘जे शोक करीत आहेत’ ते धन्य, कारण ‘त्यांचे सांत्वन करण्यात मत्तय 5:3-4

> आपल्याला ठाऊक आहे की, प्रत्येक तोंड बंद व्हावे व अवघे जग देवासमोर शिक्षेस पात्र ठरावे, म्हणून नियमशास्त्र जे काही सांगते ते शास्त्राधीन असलेल्या लोकांना सांगते. रोमकरांस 3:19

आम्हाला कनानमधील परराष्ट्रीय स्त्रीची कथा आठवते जिने येशूला तिच्या मुलीला बरे करण्यास विनंती केली. येशूचे सुरुवातीला शांत राहणे त्याच्या शिष्यांना अन्यजातीय लोकांबद्दलची त्यांची चुकीची वृत्ती बाहेर आणण्यासाठी आरशासारखे काम करते. दैवी आरसा आपले विचार आणि हेतू प्रतिबिंबित करतो. देवाचे वचन म्हणून ख्रिस्त आपल्याशी अशा प्रकारे बोलतो ज्यामुळे आपली विचारसरणी आणि इच्छा ओळखल्या जाऊ शकतात.

> कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे. इब्री 4:12

जेव्हा लोक येशूच्या काही विधानांचा वापर करून हे सिद्ध करतात की देव लोकांना छळतो आणि त्यांना जिवंत जाळतो, तेव्हा ते लोक प्रत्यक्षात त्याच्याबद्दल काय विचार करतात हे प्रकट करत असतात. जेव्हा ख्रिस्त हिंसक नाही आणि लोकांना

मारतहि नाही हे दाखवण्यासाठी इतर विधाने त्यांच्यासमोर सादर केली जातात आणि येशूदेखील आपण पित्यासारखे प्रेमळ असल्याचा दावा करतो, तेव्हा आपल्याला अशा स्थितीत ठेवले जाते जिथे आपल्याला निवड करावी लागते.

जेव्हा त्या अन्यजातीय व परराष्ट्रीय स्त्रीने येशूला असे म्हणताना ऐकले, "लेकरांचे अन्न घेऊन कुत्र्यांना देणे योग्य नाही," तेव्हा तिला योग्य निवड करावी लागली. त्याचा नाकार करण्यासाठी तो जे बोलला ते ती स्त्री घेईल काय? किंवा तो तिला मदत करेल असा विश्वास ठेवून त्याच्या चारित्र्याबद्दल जे ती शिकली ते ती घेईल? हे सुवार्तेचे दैवी कार्य आहे जिथे आपल्या पित्याच्या चारित्र्याबद्दल आपल्याला निर्णयाच्या टप्प्यावर आणले जाते.

अगदी जुन्या व पारंपारिक समजुतींमध्येही पवित्र शास्त्राच्या अभ्यासाचे फळ आणि ख्रिस्तासोबत चालणे प्रामाणिक आणि नम्र विद्यार्थ्यांना संज्ञानात्मक स्पष्टता देते. जेव्हा मी अग्नीत जळणाऱ्या श्रीमंत माणसाची कथा वाचली आणि येशूला नरकात शरीर आणि आत्मा दोन्हीचा नाश करणाऱ्या देवाबद्दल बोलताना वाचले तेव्हा मी येशूच्या ह्या विधानांना इतर विधानांसह सामंजस्य करण्याचा निर्णय घेतला, जसे की तुमच्या शत्रूंवर प्रेम करा आणि तुम्ही खून करू नका. आपण पूर्वी दुष्ट लोकांच्या मृत्यूच्या पैलूंवर लक्ष दिले आहे, परंतु आता आपण देवाच्या संबंधात अग्नीबद्दल बोलणारे परिच्छेद एकत्र करूया.

> तेव्हा परमेश्वराच्या दूताने एका झुडपातून अग्निज्वालेत त्याला दर्शन दिले; त्याने दृष्टी लावली तर झुडूप अग्नीने जळत असून ते भस्म झाले नाही असे त्याला दिसले. निर्गम 3:2
>
> पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते. निर्गम 24:17
>
> पाहा, परमेश्वराचे नाम दुरून येत आहे, त्याचा क्रोध भडकला आहे, धुराचा लोट चढत आहे; त्याचे ओठ क्रोधाने स्फुरत आहेत, त्याची जिव्हा भस्म करणाऱ्या अग्नीसारखी आहे; यशया 30:27
>
> सीयोनेतील पातकी घाबरले आहेत. अधर्म्यांना कापरे भरले आहे. "भस्म करणाऱ्या अग्नीसमीप आमच्यातला कोण राहील? सर्वकाळ पेटत राहणाऱ्या अग्नीसमीप आमच्यातला कोण टिकेल?" जो धर्माने चालतो, सरळ भाषण करतो, जुलूम करून होणारा लाभ अव्हेरतो, लाच घेण्यापासून आपला हात आवरतो, घातपाताच्या मनसुब्याला आपले कान बंद करतो, दुष्कर्माला आपले डोळे मिटतो, यशया 33:14-15

कारण आपला 'देव भस्म करणारा अग्नी आहे.' इब्री 12:29

तेव्हा अकस्मात मोठ्या वाऱ्याचा सुसाट्यासारखा आकाशातून नाद झाला व ज्या घरात ते बसले होते ते सर्व त्याने भरले. आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकेक अशा बसल्या. तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले. प्रेषितांची कृत्ये 2:2-4

उलटपक्षी, "तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील." रोमकरांस 12:20

पेन्टेकोस्टच्या दिवशी सर्व प्रेषित देवाच्या आत्म्याच्या अग्नीत घेरलेले होते. ती अग्नी तेजस्वी होती परंतु मोशेच्या काळातील जळत्या झुडूपप्रमाणे ते भस्मसात झाले नाहीत. यशया ३३:१४ मध्ये विचारण्यात आलेला प्रश्न असा आहे कि: भस्म करणाऱ्या अग्नीसमीप आमच्यातला कोण राहील? तो नीतिमान आहे जो देवाच्या प्रेमाच्या ज्वालामध्ये सर्वकाळ जळेल. जेव्हा देवाचे प्रेम पूर्णतः त्यांना प्रगट होईल आणि जेव्हा सर्व दुष्ट लोक देवाने त्यांच्यासाठी नेमके काय केले आहे आणि त्यांना वाचवण्यासाठी देवाने केलेले ते सर्व प्रयत्न पाहतील, तेव्हा त्यांनी त्याला नकार दिल्याचा अपराधीपणा आणि लाज त्यांच्यासाठी अग्नीच्या निखाऱ्यांसारखी असेल. त्यांची दुष्टता त्यांना चिरडते - देवाचा हात नाही. देवाची अग्नी हि फक्त निःस्वार्थ प्रेम आहे आणि जेव्हा ते प्रेम प्रकट होते तेव्हा ते त्वरित आत्म-निंदा आणि तीव्र वेदना आणते. देवाला नरकात शरीर आणि आत्म्याचा नाश करण्याचे सामर्थ्य आहे याचे कारण फक्त तो इतका प्रेमळ, दयाळू आणि काळजी घेणारा आहे म्हणून काय?

जे शरीराचा घात करतात पण आत्म्याचा घात करण्यास समर्थ नाहीत त्यांना भिऊ नका, तर आत्मा व शरीर ह्या दोहोंचा नरकात नाश करण्यास जो समर्थ आहे त्याला भ्या. दोन चिमण्या दमडीला विकतात की नाही? तथापि तुमच्या पित्याच्या आज्ञेवाचून त्यांतून एकही भूमीवर पडणार नाही. तुमच्या डोक्यावरील सर्व केसदेखील मोजलेले आहेत. म्हणून भिऊ नका; पुष्कळ चिमण्यांपेक्षा तुमचे मोल अधिक आहे. मत्तय 10:28-31

वचन 29-31 च्या संदर्भात वचन 28 जोडलेला दिसत नाही. प्रथम येशू आपल्याला देवाचे भय बाळगण्यास सांगतो जो नरकात शरीर आणि आत्माचा नाश करण्यास सक्षम आहे आणि नंतर तो आपल्याला पित्याच्या प्रेमळ स्वभावाबद्दल सांगतो आणि म्हणतो घाबरू नका. जर देव नरकात लोकांचा छळ करत असेल, सार्वकालिक

अग्नीद्वारे त्यांची त्वचा वितळू पर्यंत त्यांना छळत असेल, तर तो वचन 31 मध्ये “भिऊ नको” असे विरोधी वाक्य तो कसे म्हणू शकतो?

येशू 28 व्या वचनाचा वापर करून मनुष्याचे विचार आरशासमोर मांडतो. तो देवाबद्दलचे आपले नैसर्गिक विचार आपल्यासमोरच प्रतिबिंबित करतो. पापी व्यक्तीला त्यांचे चारित्र्य आणि देवाचे चरित्र यांच्यातील प्रचंड फरक आणि त्यांच्या स्वतःच्या स्वार्थामुळे ख्रिस्ताला किती मोठा त्रास झाला आहे हे लक्षात आल्यावर भीती वाटली पाहिजे.

> मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजवते. याकोब 1:15

> दुष्टाचे मरण दुष्टाईतच होणार; नीतिमानाचे द्वेष्टे दंड पावतात. स्तोत्रसंहिता 34:21

पापामुळे मृत्यू होतो - देवमुळे नाही. आपला स्वर्गीय पिता किती मनापासून त्या चिमणीची काळजी घेतो आणि आपल्या डोक्याच्या केसांची संख्या मोजतो, तो आपल्याबद्दल किती प्रेमळपणे विचार करतो, ह्या विचारांमुळेच आपला पूर्णपणे नाश होईल. ह्या प्रेमाची पूर्ण जाणीव एका पाप्याला भयंकर अपराधीपणाचे कारण बनवेल आणि तो पूर्णपणे भारावून जाईल. केवळ अशा प्रकारे मत्तय 10:28 आणि मत्तय 10:29-31 एकमेकांच्या शेजारी योग्य अर्थ लावतात.

काहीजण असे सुचवतात की देव त्याचे चरित्र प्रकट करतो आणि त्याला माहित आहे की यामुळे दुष्टांचा मृत्यू होऊ शकतो, ह्यामुळे त्यांच्या मृत्यूसाठी तो जबाबदार आहे. ही तुलना चुकीची आहे कारण जर रुग्णाच्या विनंतीवरून डॉक्टरांनि जीवन देणारी यंत्रणा बंद केल्यावर त्या अशक्त आजारी रुग्णाचा मृत्यू होतो आणि त्याचा दोष त्या डॉक्टरांनवर लावला जातो. मानवतेला देवासोबत मुक्त सहवास मिळण्यासाठी, विशेषतः अनंतकाळात, देवाने तो खरोखर कोण आहे हे प्रकट केले पाहिजे. आम्हाला हे देखील लक्षात आहे की काळाच्या शेवटी दुष्ट लोक नवीन यरुशलेम शहराला वेढतात आणि ते घेऊ इच्छितात, याचा अर्थ ते शहराजवळ येत असताना त्यांच्या अंतःकरणात खून, मत्सर आणि चोरी असेल.

> त्यांनी [सैतान आणि दुष्ट] ‘पृथ्वीच्या विस्तारावर’ फिरून पवित्र जनांची छावणी व ‘प्रिय’ नगर वेढले; ‘तेव्हा [देवापासून] स्वर्गातून अग्नी उतरला [पेंटेकॉस्टच्या दिवसाप्रमाणे निस्वार्थ प्रेमाची अग्नी] आणि त्याने’ त्यांना ‘खाऊन टाकले.’ [स्वार्थाचा चिरडणारा अपराधीपणा] प्रकटी 20:9

जेव्हा मनुष्याचा स्वार्थ अशा निःस्वार्थ प्रेमाच्या जवळ येतो, तेव्हा आत्मनिषेद करणारा अपराधीपणामुळे दुष्टांचा मृत्यू निश्चित होतो.

जेव्हा आपण पवित्र शास्त्र वाचतो तेव्हा दैवी आरसा आपल्यासमोर असतो. आपण कसे विचार करतो हे आपल्याला प्रतिबिंबित केले जाते आणि नंतर आपल्याला सार्वकालिक निवड करावी लागते.

> शुद्धांशी तू शुद्ध भावनेने वागतोस, कुटिलांशी तू कुटिलतेने वागतोस,
> स्तोत्रसंहिता 18:26

जेव्हा देवदूताने अब्राहामाला आवाज देऊन त्याचा मुलगा इसहाकचा बळी अर्पण करण्यापासून रोखले, तेव्हा अब्राहामासमोर एक पर्याय होता ज्याद्वारे तो त्याच्या अंतःकरणातील देवाचे चरित्र बदलू शकेल. आपल्या मुलाला मारण्याची आज्ञा ही अब्राहामाच्या स्वतःच्या विचारांचे प्रतिबिंब होते आणि आपल्या मुलाचा मृत्यू झालाच पाहिजे हे त्याला अगदी निश्चित दिसत होते. आपल्या सर्वांना त्या निर्णयापर्यंत येणे गरजेचे आहे. जेणेकरून आपण हे शब्द ऐकू कि “तू मुलावर आपला हात चालवू नकोस, त्याला काही करू नकोस" आणि त्या वेळी आपल्याला जाणीव होईल कि देव मृत्यूचा लेखक नाही. “होम व पापाबद्दल अर्पण ही तू मागत नाहीस” स्तोत्रसंहिता 40:6.

मग नेमकं ही गोष्ट सांगण्यामागे येशूचा उद्देश काय होता? हे आपल्याला त्यांच्या दाखल्याच्या समारोपाच्या वाक्यात आढळते.

> तेव्हा त्याने त्याला म्हटले, ‘ते मोशेचे व संदेष्ट्यांचे ऐकत नसतील तर
> मेलेल्यांमधूनही कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाही. लूक 16:31

कबरेच्या या बाजूला आपण जे निर्णय घेतो त्याचे महत्त्व ख्रिस्ताने त्यांच्यावर ठसवले आणि ते निर्णय घेताना आपल्याला मोशे आणि संदेष्ट्यांच्या लिखाणांना काळजीपूर्वक वाचणे व ऐकणे आवश्यक आहे.

## 17. वध करणारे देवदूत

पृथ्वीवरील येशूच्या जीवनात देवाच्या देवदूतांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गेब्रियल देवदूताने मरीयेला तारणाऱ्याला जन्म देण्याचा तिचा विशेषाधिकार जाहीर केला. देवदूतांनी त्याच्या जन्माच्या वेळी स्वागत करताना गायन केले. एका गंभीर वातावरणात त्याच्या वधस्तंभावर जाण्याआधी एक देवदूत येऊन येशूला त्याच्या कार्यासाठी बळ देण्यास आला. लूक 22:43. येशूला कबरेतून बाहेर बोलावण्यासाठी पित्याने एक देवदूत पाठवला आणि त्यां देवदूतांनी त्याच्या निराश शिष्यांना घोषित केले की तो मेलेल्यांतून उठला आहे. देवदूत येशूच्या सेवाकार्यासाठी महत्त्वपूर्ण होते आणि त्यांचे सर्व कार्य ख्रिस्ताच्या चारित्र्यावर आधारित होते कारण आपण वाचतो:

> नथनेल त्याला म्हणाला, "गुरूजी, आपण देवाचे पुत्र आहात, आपण इस्राएलाचे राजे आहात." येशू त्याला म्हणाला, "मी तुला अंजिराच्या झाडाखाली पाहिले असे तुला सांगितले म्हणून तू विश्वास धरतोस काय? ह्याच्यापेक्षा मोठ्या गोष्टी पाहशील." आणखी तो त्याला म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, आकाश उघडलेले आणि देवदूतांना चढताना व मनुष्याच्या पुत्रावर उतरताना तुम्ही पाहाल." योहान 1:49-51

देवदूतांचे सर्व कार्य ख्रिस्ताच्या चारित्र्यावर आणि कार्यावर चालते कारण ते जे काही करतात ते मनुष्याच्या पुत्रावर आधारित आहे. पवित्र शास्त्र म्हणते:

> ज्यांना वारशाने तारण मिळणार आहे त्यांच्या सेवेसाठी पाठवलेले ते सर्व परिचारक आत्मे नाहीत काय? इब्री 1:14

देवाच्या देवदूतांना आपला पिता आणि प्रभु येशूची सेवा करायला आवडते. त्यांना आमचे संरक्षण आणि आपल्याला प्रोत्साहन देऊन देखील सेवा करणे आवडते.

> परमेश्वराचा दूत त्याचे भय धरणाऱ्यांसभोवती छावणी देतो आणि त्यांचे संरक्षण करतो. स्तोत्रसंहिता 34:7

ते देवाच्या आत्म्याने भरलेले आहेत आणि पिता आणि त्याच्या पुत्राचे गुणगान गातात.

> तेव्हा मी पाहिले तो राजासन, प्राणी व वडील ह्यांच्याभोवती अनेक देवदूतांची वाणी ऐकू आली; आणि त्यांची संख्या 'अयुतांची अयुते व सहस्रांची सहस्रे होती.' ते मोठ्याने म्हणत होते : "वधलेला कोकरा सामर्थ्य, धन, ज्ञान, बल, सन्मान गौरव व धन्यवाद हे घेण्यास योग्य आहे!" प्रकटी 5:11-12

देवदूतांना सुवार्तेबद्दल आणि तारणाच्या योजनेत खूप रस आहे.

> त्यांना असे प्रकट करण्यात आले होते की, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला सुवार्ता सांगणाऱ्यांनी त्या गोष्टी तुम्हांला आता सांगितल्या आहेत. त्या गोष्टी कळवण्याची सेवा ते स्वत:साठी नव्हे, तर तुमच्यासाठी करत होते; त्या गोष्टी न्याहाळून पाहण्याची उत्कंठा देवदूतांना आहे. 1 पेत्र 1:12

त्यांना पृथ्वीवर शांती आणण्यात आनंद होतो आणि त्यांच्या मनात आपल्यासाठी चांगल्या इच्छा आहेत.

> इतक्यात स्वर्गातील सैन्याचा समुदाय त्या देवदूताजवळ अकस्मात प्रकट झाला आणि देवदूत देवाची स्तुती करत म्हणाले, "ऊर्ध्वलोकी देवाला गौरव, आणि पृथ्वीवर ज्यांच्यावर त्याचा प्रसाद झाला आहे त्या मनुष्यांत शांती." लूक 2:13-14

ते सामर्थ्यामध्ये खूप उत्कृष्ट आहेत आणि देवाला पूर्णपणे आज्ञाधारक देखील आहेत व ते त्याच्या सर्व आज्ञा पाळतात.

> अहो परमेश्वराच्या दूतांनो, जे तुम्ही बलसंपन्न आहात, आणि त्याचा शब्द ऐकून त्याप्रमाणे चालता ते तुम्ही त्याचा धन्यवाद करा. स्तोत्रसंहिता 103:20

आपला पिता त्याच्या पवित्र देवदूतांना सैतान आणि त्याच्या नाश करणाऱ्या देवदूतांपासून आपले रक्षण करण्याची आज्ञा देतो कारण आपण प्रभूच्या क्रोधाबद्दल अकराव्या अध्यायात पाहिले आहे. पवित्र देवदूत ख्रिस्ताच्या आत्म्याने

भरलेले असल्याने ते पित्याच्या आज्ञा पाळतात. जरी पवित्र देवदूत लोकांना मारत नसले तरी ते वाईट शक्तींना रोखण्यासाठी आणि निर्जीव वस्तूंना हलवण्यासाठी व नष्ट करण्यासाठी त्यांची शक्ती वापरतात. पवित्र शास्त्राचे काही परिच्छेद आहेत जे काही विशेष गोष्टी सूचित करतात आणि आपण या अध्यायात ह्याच विषयावर अध्ययन करू. जर आपण पवित्र शास्त्रात देवदूत आणि मारणे हे शब्द शोधल्यास आपल्याला पवित्र शास्त्रामधील चार कथा आढळतात.

1. गणना 22. बलाम आणि गाढवी. ज्या गाढवीने देवदूत पाहिले त्या गाढवीला बलामाने मारले.
2. 2 शमुवेल 24. दावीद इस्त्रायलाची जनगणना करतो आणि त्यामुळे देवाच्या देवदूताने 70,000 लोकांना मारले.
3. 2 राजे 19:35 आणि यशया 37:36. 185,000 माणसांचे अश्शूरी सैन्य प्रभूच्या देवदूताने मारले.
4. प्रेषितांची कृत्ये 12:24. प्रभूच्या देवदूताने हेरोदला त्याच्या पापासाठी मारले.

पहिल्या कथेत देवदूताने कोणाला मारले नाही तर बलामनेच गाढवाला मारले जे देवदूताच्या भीतीने थांबले. आणि देवदूत तलवार घेऊन बलामसमोर उभा होता.

> परमेश्वराचा दूत उपसलेली तलवार हाती घेऊन वाटेत उभा असल्याचे त्या गाढवीने पाहिले, तेव्हा ती वाट सोडून शेतात शिरली; तिला पुन्हा वाटेवर आणण्यासाठी बलामाने तिला मारले. गणना 22:23

हातात तलवार घेऊन देवदूताची धमकी देणारी मुद्रा असे सूचित करते का की तो बलामला हानी पोहोचवण्यास तयार होता आणि हा विचार आमच्या यादीतील इतर कथांमुळे अधिक दृढ झालेला दिसतो

पुढच्या कथेत, दाविदाने इस्त्राएलाला राष्ट्रांमध्ये स्थान देण्यासाठी अभिमानाच्या कृतीत त्याच्या सैन्याची संख्या मोजण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा परिणाम म्हणजे 70,000 इस्राएली लोकांचा मृत्यू झाला.

> परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. 2 शमुवेल 24:1

> मग परमेश्वराने इस्राएलात सकाळपासून नेमलेल्या मुदतीपर्यंत मरी पाठवली; आणि दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या लोकांपैकी सत्तर हजार लोक मेले. पण देवदूताने यरुशलेमेचा नाश करण्यासाठी त्यावर आपला हात उगारला तेव्हा परमेश्वराला त्या अरिष्टाविषयी वाईट वाटले, व त्याने लोकांचा नाश करणाऱ्या देवदूतास म्हटले, “आता पुरे कर, आपला हात आटोप.” त्या वेळी परमेश्वराचा दूत अरवना यबूसी ह्याच्या खळ्यानजीक होता. 2 शमुवेल 24:15-16

पहिल्यांदा वाचताना हि कथा अगदी भीतीदायक असल्याचे वाटते. गर्वाने, राजा लोकांची जनसंख्या करतो आणि नंतर देव 70,000 लोकांना मारण्यासाठी एक देवदूत पाठवतो आणि नंतर त्याने केलेल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप करतो आणि जास्त लोकांना मारण्याबद्दल तो पश्चात्ताप करतो. आणखी विचित्र गोष्ट म्हणजे 2 शमुवेल 24:1 प्रत्यक्षात असे म्हणताना दिसते की देवाने स्वतः दाविदाला इस्राएलाची जनसंख्या करण्यास प्रवृत्त केले आणि असे सुचवले की पुढे जे घडले त्यासाठी देव स्वतः जबाबदार आहे. "देव प्रेम आहे" असे मानणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला हा प्रश्न विचारला पाहिजे की "ही कथा नेमकी आहे कश्याबद्दल?" तुम्हाला आठवत असेल की नवव्या अध्यायात आम्ही पहिले कि नियमशास्त्र आपल्या आत्म्यामध्ये आरसा म्हणून कसा कार्य करतो आणि देवदूत जे लोकांना मारतात ह्यांच्या कथा आपण येशूच्या चरित्राच्या प्रकाशात वाचू कि आपल्या स्वतःच्या मानवी स्वभावात हे पाहण्यासाठी देवाच्या चरित्राबद्दल एक परिपूर्ण परीक्षा घेतात.

पुढील कथेत अश्शूरी सैन्याच्या नाशामध्ये अधिक लोकांच्या मृत्यूचा समावेश असला तरी, ह्या वस्तुस्तिथीसोबत जगणे सोपे आहे कारण या राष्ट्राला देवाच्या लोकांना मारायचे होते आणि ते अश्शूरी लोक पृथ्वीवरील अतिशय क्रूर लोक होते. अश्शूरी लोकांनी जिवंत माणसांची कातडी काढून त्यांना टोकदार वधस्तंभावर ठार केले. देवाच्या अनुयायांविरुद्ध अशी हिंसा, प्राणघातक शक्ती वापरून प्रभूच्या देवदूतांबद्दलचे प्रश्न आपल्याला दडपून टाकू शकतात.

> त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते! 2 राजे 19:35

या वचनांचे साधारण वाचन असे सूचित करते की प्रभूच्या देवदूतांनी 185,000 अश्शूरी सैनिकांना ठार केले. हे पूर्णपणे योग्य दिसते की जेव्हा एखादा धोका देवाच्या लोकांना ठार मारण्याचा प्रयत्न करीत असेल तेव्हा या सैनिकांना त्यांच्या खुनी योजनांसाठी ठार मारले पाहिजे. आणि आपल्या यादीतील शेवटची कथा हेरोदशी संबंधित आहे. त्याने केलेल्या सर्व कृत्यांचा विचार केल्यावर तो मृत्यूदंडासाठी सर्वात योग्य उमेदवार असल्याचे दिसते.

> नंतर नेमलेल्या दिवशी हेरोद राजवस्त्रे घालून आसनावर बसला आणि जमलेल्या लोकांपुढे भाषण करू लागला. तेव्हा लोक गजर करून बोलले, "ही देववाणी आहे, मनुष्यवाणी नव्हे." त्याने देवाचा गौरव केला नाही, म्हणून तत्क्षणी प्रभूच्या दूताने त्याच्यावर प्रहार केला आणि तो किडे पडून मेला. प्रेषितांची कृत्ये 12:21-23

हेरोदाने योहानाचा भाऊ याकोब ह्याला ठार मारले आणि नंतर पेत्राला मारण्याची योजना आखली. हे तर स्पष्ट आहे की हेरोदला मारणारा जो देवदूत होता तो एक चांगला देवदूत होता. हे देखील स्पष्ट आहे की हे परमेश्वराकडून घेतलेला बदला व सर्वशक्तिमानाकडून झालेली शिक्षा होती. बदला म्हणजे केलेल्या कृत्यांची परतफेड किंवा भरपाई. या ठिकाणी आपला शोध थांबवणे आणि असा निष्कर्ष काढणे अत्यंत बरोबर वाटेल की देव खरोखरच दुष्ट लोकांना ठार मारण्यासाठी त्याच्या चांगल्या देवदूतांना पाठवतो. पहिल्या कथेत गुंतागुंत असली तरी अश्शूरी सैन्य आणि हेरोद यांच्याबद्दलच्या इतर दोन कथा अचूक दिसतात आणि या विचारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे बहुतेक लोकांनि ह्याबद्दल विचारही केला नसेल.

या पुस्तकात आम्ही असा विचार मांडला आहे की ख्रिस्ताच्या जीवनाच्या दृष्टीकोनातून आपण पवित्र शास्त्राच्या इतर सर्व वचनांकडे बघावे. जर एखाद्या व्यक्तीने असा निर्णय घेतला नाही तर कदाचित तो येथेच त्यांचा शोध थांबविल आणि देवाचे नीतिमान देवदूत लोकांना मारतात असा निष्कर्ष काढील.

ह्या पुस्तकातील दुसऱ्या अध्यायात आम्ही विल्यम मिलरच्या नियमांचा उल्लेख केला आहे ज्यात आम्हाला वचनाचा निष्कर्ष काढण्यासाठी पवित्र शास्त्रात त्या मुद्याबद्दल जे काही सांगितले आहे ते सर्व जमा करणे आवश्यक आहे. जेव्हा शास्त्रामध्ये विरोधाभास आढळतो तेव्हा तो आपल्याला त्या विषयाबद्दल अधिक सखोल अभ्यास करण्यास प्रोत्साहित करतो. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की पृथ्वीवरील येशूच्या सेवेच्या दरम्यान देवदूतांनी कधीही लोकांना मारल्याचा कोणताही पुरावा नाही. मग हे आपण पाहिलेल्या वध करणाऱ्या देवदूतांच्या कथांशी कसे जुळते? दाविदाने पूर्ण इस्त्राएलाची जी जनगणना केली त्या कथेपासून आपण सुरुवात करूयात. खालील वचन आपण कसे समजायचे? देवाने दाविदाला इस्त्राएलाची जनगणना करण्याची प्रेरणा कशी दिली?

> परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. 2 शमुवेल 24:1

दुसऱ्या ठिकाणी त्याच कथेची तुलना केल्यास, आम्ही खालीलप्रमाणे वाचतो:

> नंतर सैतानाने इस्राएलाविरुद्ध उठून इस्राएलाची गणती करायला दाविदाला प्रवृत्त केले. 1 इतिहास 21:1

जर आपण फक्त 2 शमुवेल 24:1 वाचले आणि हे वचन स्पष्टपणे समजण्याची मागणी केली तर आपण असे म्हणू की त्या 70,000 इस्त्राएली लोकांना मारण्यासाठी देवाने स्वतः दाविदाला असे करण्यास प्रवृत्त केले. ह्याद्वारे एक प्रश्न उद्भवतो कि जो देव स्वतः प्रीती असल्याचा दावा करतो त्याच्या बाबतीत ह्या कल्पना कश्या जुळतील?

या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याला 1 इतिहास 21:1 मधील वचन सापडते ज्यातून हे दिसून येते की दाविदाला इस्त्राएलाची जनगणना करण्यास प्रवृत्त करण्याची परवानगी सैतानाला देण्यात आली होती. ह्यानंतर आपल्याला ह्या दोन्ही वचनांचा ताळमेळ साधावा लागेल. मग ह्या इस्राएली लोकांचा नाश करण्यासाठी देव आणि सैतानाने एकत्र काम केले असा निष्कर्ष आपण काढतो काय? पुन्हा एकदा आम्हाला हे वचन स्पष्टपणे समजण्यासाठी अधिक खोलवर जाण्याची गरज आहे. देव हा एक प्रेमळ पिता, व दयाळू न्यायाधीश आहे कि तो एक निर्दयी हुकूमशाह आहे यावर त्यांचा खरोखर विश्वास आहे की नाही हे पाहण्यासाठी ही प्रक्रिया मनुष्याच्या हृदयाची परीक्षा घेते. ज्यांना परमेश्वराच्या डोळ्यात कृपा दिसते ते योग्य हिशेब जुळवून घेईपर्यंत अभ्यास करत राहतील, व इतर लोक फक्त हा विरोधाभास मानतील आणि म्हणतील की या गोष्टी करत असतानाही देव प्रेमळ आहे.

पूर्वी इस्त्राएलाच्या इतिहासात इतर राष्ट्रांप्रमाणे राजा असावा अशी विनंती करण्यात आली होती. आणि इस्त्राएलला इतर राष्ट्रांसारखे व्हायचे होते.

> ते त्याला म्हणाले, “पाहा, आता तुम्ही वृद्ध झाला आहात आणि तुमच्या मार्गाने तुमचे पुत्र चालत नाहीत; तर आता इतर सर्व राष्ट्रांप्रमाणे आमचा न्यायनिवाडा करायला आमच्यावर एक राजा नेमा.” 1 शमुवेल 8:5

त्यांची ही विनंती राष्ट्रीय महानतेची इच्छा प्रतिबिंबित करते. तरीही ही विनंती म्हणजे प्रत्यक्षात देवाचा केलेला नकार होता.

> तेव्हा परमेश्वर शमुवेलाला म्हणाला, “लोक जे तुला सांगत आहेत ते सगळे ऐक; कारण त्यात ते तुझा धिक्कार करत नाहीत, तर मी त्यांचा राजा नसावे म्हणून ते माझाच धिक्कार करत आहेत. 1 शमुवेल 8:7

राजसत्तेचे संपूर्ण तत्व म्हणजे देवाच्या नेतृत्वाचा नकार करणे होय. शौलने इस्त्राएलचा राजा म्हणून चांगली सुरुवात केली असताना, त्याच्या चारित्र्यातील कमकुवतपणा लवकरच उघड झाला आणि त्याने इस्राएलच्या राज्याच्या महत्त्वाकांक्षेला फार पुढे नेले नाही. दुसरीकडे, दाविदाने इस्त्राएलाच्या सर्व शत्रूंवर विजय मिळवला आणि त्याच्या नेतृत्वाखाली राष्ट्राची भरभराट झाली आणि खूप वाढ झाली. सैतानाने दाविदाला देशाच्या सध्याच्या समृद्धीची भूतकाळाशी तुलना करून त्याची खुशामत करण्यास प्रवृत्त केले. परमेश्वराने त्याच्या सेनापती यवाबाद्वारे दाविदाला आवाहनाचा संदेश पाठवला, परंतु सैतान दाविदाला इस्त्राएलाची जनगणना करण्यासाठी प्रवृत्त करण्यास यशस्वी झाला.

> यवाब राजाला म्हणाला, “आपले लोक कितीही असोत, आपला देव परमेश्वर त्यांना शतगुणित करो आणि माझे स्वामीराजे आपल्या डोळ्यांनी ते पाहोत; पण माझ्या स्वामीराजांना ही हौस का वाटावी?” 2 शमुवेल 24:3

परमेश्वराने हे घडू दिले आणि दाविदावरील सैतानाच्या मोहांना रोखले नाही. आणि ह्या अपयशामुळे इस्त्राएलामध्ये रोगराई पसरली.

> मग परमेश्वराने इस्राएलात सकाळपासून नेमलेल्या मुदतीपर्यंत मरी पाठवली;[H5414] आणि दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या लोकांपैकी सत्तर हजार लोक मेले. 2 शमुवेल 24:15

पाठवले ह्या हिब्रू शब्दाचा अर्थ नाथन असा आहे ज्याचा अर्थ अनेकदा सोडून देणे असा देखील होतो. देवाच्या कराराशी संबंधित असलेल्या रोगराईच्या संदर्भात खालील वचने काळजीपूर्वक पहा.

> मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन [H5414] करीन. लेवीय 26:25

येथे (नाथनचे) भाषांतर (स्वाधीन) करणे केले गेले. वचनाचा शेवटचा भाग काळजीपूर्वक लक्षात घ्या. (तेव्हा) हा शब्द एक पुरविलेला शब्द आहे ज्यामुळे आपण सहजपणे असे वाचू शकतो कि:

> मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन [H5414] करीन.

याचा अर्थ असा होतो की जेव्हा रोगराई येते तेव्हा ते शत्रूच्या स्वाधीन केलेले असतात.

> जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो, तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील. परमेश्वराला मी "माझा आश्रय, माझा दुर्ग" असे म्हणतो; "तोच माझा देव, त्याच्यावर मी भाव ठेवतो." कारण तो पारध्याच्या पाशापासून घातक मरीपासून तुझा बचाव करील. स्तोत्रसंहिता 91:1-3

सैतानानेच ह्या लोकांचा नाश केला. पर्याय असा आहे की देवानेच सैतानाला दाविद आणि इस्राएलला मोहात पाडण्याची आणि त्यांना पापाकडे नेण्याची परवानगी दिली आणि मग देव स्वतःच मागे फिरून 70,000 लोकांचा नाश करतो. ही स्थिती सुसंगत नाही. दाविद देवाच्या इच्छेनुसार काम करत नसल्यामुळे सैतान उभा राहिला आणि दाविदाला मोहात पाडू शकला. जेव्हा दाविद या मोहाला बळी पडला तेव्हा सैतानाला इस्राएलमध्ये अधिक प्रवेश मिळाला आणि त्याने परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांच्यामध्ये रोगराई आणली. तरीसुद्धा, हे देवदूतांनी इस्राएली लोकांना मारलेल्या भागाचे स्पष्टीकरण नाही.

> पण देवदूताने यरुशलेमेचा नाश करण्यासाठी त्यावर आपला हात उगारला तेव्हा परमेश्वराला त्या अरिष्टाविषयी वाईट वाटले, व त्याने लोकांचा नाश करणाऱ्या देवदूतास म्हटले, "आता पुरे कर, आपला हात आटोप." त्या वेळी परमेश्वराचा दूत अरवना यबूसी ह्याच्या खळ्यानजीक होता. लोकांचा नाश करणारा देवदूत दाविदाच्या दृष्टीस पडला तेव्हा त्याने परमेश्वराला म्हटले, "पाहा, मी पाप केले, मी दुर्मार्गानेही चाललो, पण ह्या मेंढरांनी काय केले? तुझा हात माझ्यावर व माझ्या पितृकुळावर पडावा." 2 शमुवेल 24:16-17

सैतानानेच इस्राएलावर रोगराई आणली पण परमेश्वराच्या देवदूताने यरुशलेमेवर उगारलेली ही तलवार काय आहे? देवाचा पुत्र वापरतो ती तलवार कोणती?

> त्याच्या उजव्या हातात सात तारे होते; त्याच्या तोंडातून तीक्ष्ण दुधारी तलवार निघाली आणि त्याची मुद्रा 'परमतेजाने' प्रकाशणाऱ्या 'सूर्यासारखी' होती. मी त्याला पाहिले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो. मग त्याने आपला उजवा हात माझ्यावर ठेवून मला म्हटले, "भिऊ नकोस; जो पहिला व शेवटला, आणि जो जिवंत तो मी आहे; प्रकटी 1:16-17

जेव्हा प्रेषित योहानाने देवाच्या पुत्राचा चेहरा आणि त्याच्या तोंडातून बाहेर आलेली तलवार पाहिली तेव्हा त्याची प्रतिक्रिया आपण पाहतो. ती तलवार नेमकी काय होती?

> कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे. इब्री 4:12

त्या 70,000 लोकांसाठी ज्यांनी नाशकर्त्याच्या क्रोधाचा सामना केला, देवाचा आत्मा त्यांच्याकडे पापाची जाणीव घेऊन आला जेणेकरून त्यांनी पश्चात्ताप करावा. या सखोल जाणिवेचे कार्य निकडीचे आहे कारण जर त्यांनी आत्म्याच्या ह्या कार्याकडे लक्ष देण्यास नकार दिला तर ते पूर्णपणे निराधार होतील आणि विनाशक सैतानाला सामोरे जातील. येशूद्वारे मंदिर स्वच्छ करण्याच्या वेळी त्या लोकांप्रमाणेच ते त्याच्या उपस्थितीतून धावतात. 70,000 लोकांच्या बाबतीत ते येशूच्या उपस्थितीपासून थेट सैतानाच्या ताब्यात गेले, ज्याने त्यांना रोगराईने मारले. ते त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप करू शकले असते आणि देवाला त्यांना क्षमा करण्यास विनंती करू शकले असते परंतु ते त्याच्या उपस्थितीपासून पळून गेले आणि त्याचा परिणाम मृत्यू झाला.

ही प्रक्रिया जसे देवाने कनानी लोकांबद्दल सांगितले होते त्याप्रमाणेच आहे.

> ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. निर्गम 23:27-28

दहशद पाठवणे म्हणजे पापाची जाणीव करवणे ज्यामुळे दुष्टांच्या मनात दहशत निर्माण होते. गांधीलमाशा हे अपराधी विवेकाने छळलेल्या अपराधीपणाच्या टोचण्या आहेत. हे काटे त्यांना देवाच्या उपस्थितीतून बाहेर काढतात आणि शत्रूच्या हातात देतात. पण जर त्यांनी पश्चात्ताप केला असता आणि लहान मुलांसारखे झाले असते तर ते वाचले असते. कोणीही मंदिर सोडले नाही आणि तरीदेखील सर्वांना हि तलवार जाणवली.

म्हणून आपण इस्त्राएलच्या जनगणना करण्याच्या ह्या कथेत पाहतो की सैतानाच्या हाती पडलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याच्या शेवटच्या प्रयत्नात, देवाचा आत्मा त्यांच्याकडे आला आणि त्यांचे तारण व्हावे म्हणून त्यांची अंतःकरणे पापापासून शुद्ध करू इच्छित होता. जेव्हा त्यांनी नकार दिला तेव्हा येशूने "तुमचे घर तुमच्यासाठी ओसाड सोडले आहे" असे दुःखी शब्द उच्चारले. हिब्रूमध्ये तलवार या शब्दाचा अर्थ दुष्काळ असा होतो आणि जेव्हा लोकांच्या आत्म्याने ख्रिस्ताचा पूर्णपणे प्रतिकार केला तेव्हा त्याला त्यांना सैतानाच्या हाती सोडण्यास भाग पाडले कारण त्यांनी ख्रिस्ताचा प्रवेश नाकारला.

ह्याही गोष्टीचा विचार करा कि सैतानाने ह्या लोकांच्या अंतःकरणावर ताबा ठेवला होता. ख्रिस्त त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी एक शेवटची संधी शोधत होता. सैतानाने आपली शिकार न गमावण्याचा निर्धार केला होता आणि जेव्हा मानवी हृदयाने ख्रिस्ताच्या प्रवेशास नकार दिला तेव्हा सैतानाने ह्या आत्म्यांना त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप करण्याचा व धोक्यापासून वाचण्याऐवजी त्यांचा जीव घेऊन त्यांना मारून टाकले. आपल्याकडे ह्या मुद्द्यावर अचूक तपशील माहित नाहीत परंतु हि तत्त्वे पाळणे कठीण नाही.

"तुम्ही वचनासंबंधी ग्रंथांचे आध्यात्मिक अर्थ लावत आहात," असा आरोप केला जातो. पवित्र शास्त्र तलवार हा शब्द वापरते आणि आपण त्याचा अर्थ शब्दशः घेतला पाहिजे. सर्वप्रथम, रोगराईने लोकांचा जीव घेतला. ते देवदूताच्या शारीरिक तलवारीने मरण पावले नाहीत. दुसरे म्हणजे आपण जे काही जमा करू शकतो ते सर्व एकत्र आणणे आणि नंतर आपला निष्कर्ष काढणे आवश्यक आहे. या मुद्द्यावर विल्यम मिलरचा 11 वा नियम काळजीपूर्वक लक्षात घ्या.

एखादा शब्द लाक्षणिक अर्थाने वापरला जातो हे कसे ओळखावे. जर ते योग्य अर्थाने उभे असेल, आणि निसर्गाच्या साध्या नियमांवर हिंसा करत नसेल, तर ते शब्दशः समजले

पाहिजे, नाही तर ते लाक्षणिक अर्थाने समजले पाहिजे.

रोगराईने लोकांचा नाश होत असताना, देवदूताच्या हातात असलेल्या तलवारीचा आणखी एक उद्देश असावा. पवित्र शास्त्र आपल्याला ख्रिस्त वापरत असलेल्या तलवारीबद्दल अनेक ठिकाणी सांगते आणि ती तलवार देवाचे वचन आहे. देवदूताने लोकांना तलवारीने मारले आणि तरीही ते रोगराईने मरण पावले याचे वर्णन आम्ही केले आहे. परमेश्वराच्या दूताने त्यांना कसे मारले? तलवार हे लोकांना जाणीव करून देणारे देवाचे वचन होते. त्यांनी या तलवारीने स्वतःला मरण्यास नकार दिला आणि म्हणून देवाच्या आत्म्याने त्यांना सोडले आणि विनाशकाने त्यांचा प्राण घेतला. मग 185,000 अश्शूर सैनिकांचे काय?

> त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते! 2 राजे 19:35

काळजीपूर्वक लक्षात घ्या की वचन म्हणते की परमेश्वराच्या दूताने त्यांना मारले आणि सकाळी ते मृतावस्थेत आढळले. ते असे म्हणत नाही की परमेश्वराच्या दूताने त्यांच्यावर शक्तीच्या शस्त्राने प्रहार केला ज्यामुळे ते त्वरित मरण पावले. जर आपण नवीन कराराकडे परतलो तर आपल्याला काहीतरी मनोरंजक लक्षात येईल.

> तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला; कारण प्रभूचा दूत स्वर्गातून उतरला, त्याने येऊन धोंड एकीकडे लोटली आणि तिच्यावर तो बसला. त्याचे रूप विजेसारखे होते व त्याचे वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते. त्याच्या भयाने पहारेकरी थरथर कापले व मृतप्राय झाले. मत्तय 28:2-4

देवदूताच्या नुसत्या दर्शनाने ते पुरुष हादरले आणि ते मेलेल्या माणसासारखे झाले. ही घटना दानीएल आणि योहान यांसारख्या नीतिमान माणसांसोबत देखील घडली.

> मी दानिएलाने एकट्याने तो दृष्टान्त पाहिला; माझ्याबरोबर असलेल्या मनुष्यांनी तो दृष्टान्त पाहिला नाही; तरी त्यांना मोठा कंप सुटला आणि कोठेतरी लपावे म्हणून ते पळून गेले. मग मी एकटाच राहिलो व हा मोठा दृष्टान्त पाहिला; माझ्यात काही त्राण उरले नाही. मी निस्तेज होऊन मृतप्राय झालो; मला काहीच शक्ती राहिली नाही. दानीएल10:7-8

> मी त्याला पाहिले तेव्हा मी मेल्यासारखा त्याच्या पायांजवळ पडलो. मग त्याने आपला उजवा हात माझ्यावर ठेवून मला म्हटले, “भिऊ नकोस; जो पहिला व शेवटला, आणि जो जिवंत तो मी आहे; प्रकटी 1:17

योहानाच्या बाबतीत, त्याने दृष्टान्तात पाहिलेला तो येशूच होता. देवदूतांचा शुद्ध

आणि पवित्र स्वभाव येशू आणि पित्याप्रमाणेच मनुष्यांच्या पापी स्वभावाचा पर्दाफाश करतो. दहाव्या अध्यायात आपण देवाच्या सानिध्यात आल्यावर काय होते ते पाहिले:

> मी न्याय करायला तुमच्याकडे येईन; आणि जादूगार, व्यभिचारी, खोटे साक्षी ह्यांच्याविरुद्ध आणि मजुरांची मजुरी अडकवून ठेवणारे, विधवा व अनाथ ह्यांच्यावर जुलूम करणारे, आणि मला न भिता परक्याला न्याय मिळू न देणारे ह्यांच्याविरुद्ध साक्ष देण्याची मी त्वरा करीन. मलाखी 3:5

हे वचन वाचताना आपले स्वाभाविक विचार समोर येतात म्हणजे देव आपल्या क्रोधाने दुष्टांचा नाश करणार आहे असा विचार करणे. पुन्हा देवाचे वचन एक दैवी आरशासारखे कार्य करते. वचन म्हणते, "मी न्याय करायला तुमच्याकडे येईन." आपल्या पित्याला आपल्या जवळ येऊन आणि आपल्या पापांबद्दल आपल्याशी संभाषण करायचे आहे. इतक्या निःस्वार्थ आणि प्रेमळ पित्याच्या सानिध्यात येण्यासाठी पश्चात्ताप करण्याशिवाय किंवा प्रकाशापासून दूर पळून जाण्याशिवाय पर्याय उरत नाही. परमेश्वराच्या सानिध्यात निष्क्रीय होणे शक्य नाही. जे त्यांच्या पापांना धरून आहेत ते पापाला त्यांचे जीवन समजण्यासाठी धावतात, परंतु ते ह्याद्वारे दाखवतात की त्यांना मृत्यू आवडतो आणि ते जीवनापासून पळ काढत आहेत.

पवित्र देवदूतांचा स्वभाव इतका शुद्ध आहे की त्यांच्या उपस्थितीचा केवळ प्रकटीकरण पुरुषांच्या अंतःकरणात दहशत निर्माण करेल आणि तो मनुष्य त्यांना साष्टांग दंडवत करेल. आपण दानीएल अध्याय 10 मधील कथा वाचत असताना आपण पाहतो की दानीएलला पवित्र देवदूताची उपस्थिती सहन करण्यासाठी बळकट केले जाते.

> तरी त्याच्या शब्दांचा ध्वनी माझ्या कानी पडला; मी त्याच्या शब्दांचा ध्वनी ऐकला तेव्हा मी भूमीवर पालथा पडलो व मला गाढ झोप लागली. तेव्हा पाहा, एका हाताने मला स्पर्श केला, त्याच्या योगाने मी गुडघे व तळहात जमिनीवर टेकून थरथरत राहिलो. तो मला म्हणाला, "हे दानिएला, परमप्रिय पुरुषा, मी तुला सांगतो ते शब्द समजून घे; नीट उभा राहा; कारण मला आता तुझ्याकडे पाठवले आहे;" तो माझ्याबरोबर असे बोलला तेव्हा मी थरथर कापत उभा राहिलो. तो मला म्हणाला, "दानिएला, भिऊ नकोस; कारण ज्या दिवशी तू समज घेण्याचा, व आपल्या देवापुढे नम्र होण्याचा निश्चय केलास त्याच दिवशी तुझे शब्द ऐकण्यात आले; त्या तुझ्या शब्दांवरून मी आलो आहे. ह्याप्रमाणे तो हे शब्द माझ्याबरोबर बोलल्यावर मी जमिनीकडे आपले तोंड करून गप्प राहिलो. तेव्हा पाहा, मानवपुत्रासारख्या एकाने माझ्या ओठांना स्पर्श केला; तेव्हा मी आपले तोंड उघडून, जो माझ्यासमोर उभा होता त्याला म्हटले, "हे माझ्या स्वामी, ह्या दृष्टांताने क्लेश पावून मी व्याकूळ झालो आहे व माझ्यात काही त्राण राहिले

> नाही. स्वामी महाराज, मी तर आपला सेवक, माझ्या स्वामीबरोबर बोलण्याचे सामर्थ्य मला कोठून? मला तर मुळी त्राण राहिले नाही; माझ्यात दम राहिला नाही." तेव्हा मनुष्याप्रमाणे दिसणाऱ्या एकाने मला स्पर्श करून माझ्यात त्राण आणले. तो म्हणाला, "परमप्रिय मानवा, भिऊ नकोस; तुला शांती असो, हिंमत धर, नेट धर." तो माझ्याबरोबर बोलला तेव्हा मला शक्ती आली व मी म्हणालो, "माझ्या स्वामी, तू आता बोलावे, कारण तू माझ्यात हिंमत आणली आहेस." दानीएल 10:9-12,15-19

देवदूताने दानीएलाला दोनदा खात्री दिली होती की त्याच्यावर खूप प्रेम केलेले आहे आणि त्याला घाबरण्याची गरज नाही. दानीएलाच्या जीवनात कोणतेही पाप नोंदवलेले नाही आणि तरीही ही एक नीतिमान देवदूताच्या उपस्थितीबद्दल चांगल्या माणसाची अशी प्रतिक्रिया आहे. देवदूताने त्याला कोणतीही हानी होऊ नये अशी इच्छा दाखवली आणि त्याला देवाच्या प्रेमाची खात्री दिली आणि तरीही दानीएल थरथर कापला आणि भीतीने उपडा पडला आणि हे सर्व काही आठवड्यांच्या प्रार्थना आणि उपवासानंतर घडले. असा अनुभव जर सत्पुरुषाला आला तर दुष्टांचे काय होईल? जर दानीएलाने बळकट न होता देवदूताशी दीर्घकाळ संपर्क साधला असता आणि देवदूताचा हेतू केवळ त्याच्यावर प्रेम करण्याचा असता तरीही तो मरण पावला असता.

असा प्रश्न विचारला पाहिजे की दानिएलामध्ये भयंकर भीती कशामुळे होती ज्यामुळे त्याची शक्ती कमी झाली? परमेश्वरचा जो देवदूत ह्याच्या शुद्धतेच्या उपस्थितीच्या संपर्कात येणार हा त्याचा पापी स्वभाव होता. देवाचे शुद्ध निःस्वार्थ प्रेमळ चरित्र पापी मानवांना भस्म करणारी अग्नी आहे.

> पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते. निर्गम 24:17

देवदूताला पाहून अश्शूरी सैनिक घाबरून मेले का? होय हे शक्य आहे. देवदूताच्या उपस्थितीने सैनिक स्थिर झाले होते काय आणि त्यांना भीतीने लोटांगण घालत सोडले होते काय आणि मग सैतानाने त्यांच्या दुर्बलतेबद्दल क्रोधाने त्यांचे प्राण घेतले काय? असे आम्हाला सांगितलेले नाही. आम्हाला फक्त असे सांगितले आहे की सैनिकांनी देवदूताचा सामना केला आणि सकाळी ते मरण पावले. जर तुम्ही ही कथा येशूच्या जीवनाच्या दृष्टीकोनातून वाचली तर तुम्हाला कळेल की देवदूताला त्यांना मारण्याची इच्छा नव्हती. जेव्हा येशूने मंदिराची स्वच्छता केली तेव्हा लोक घाबरून पळून गेले पण कोणीही पश्चात्ताप करून देवाला त्यांच्या दुष्टपणाबद्दल क्षमा करण्याची विनंती करू शकले नाही. देवदूताच्या उपस्थितीत, सैनिकांना त्यांच्या दुष्टपणाची जाणीव होण्यासाठी थोडा वेळ मिळाला. देवदूताने त्यांना त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप करण्यास आणि त्यांचा जीव वाचवण्यास प्रोत्साहित करण्यासाठी त्यांच्या अपराधांचा सामना केला असेल परंतु त्यांनी नकार दिला

आणि अशा प्रकारे त्यांना सैतानाच्या इच्छेवर सोडण्यात आले. आम्ही निश्चितपणे सांगू शकत नाही परंतु आम्हाला माहित आहे की देवाचे देवदूत येशूच्या चरित्राने भरलेले आहेत आणि येशूने कधीही कोणालाही मारले नाही.

आपल्याला माहीत आहे की येशूच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी दुष्टांचा ख्रिस्ताच्या आगमनाच्या तेजाने नाश होईल. याचा अर्थ ख्रिस्ताच्या चारित्र्याचे प्रकटीकरण जे पाप्याला भयंकर यातना देते. यातना येते कारण पापी पश्चात्ताप करण्यास नकार देतो. भीतीमुळे त्यांची अंतःकरणे त्यांना अयशस्वी करतात. या प्रक्रियेचे वर्णन 2 एज्राच्या पुस्तकात नोंदवले गेले आहे.

> मी फक्त पाहिले कि त्याने त्याच्या तोंडातून अग्नीचा स्फोट झाला, आणि त्याच्या ओठातून एक ज्वलंत स्वास सोडला आणि त्याच्या जिभेतुन ठिणग्या आणि वादळ बाहेर टाकले. आणि सर्व एकत्र मिसळले गेले अग्नीचा स्फोट, ज्वलंत स्वास, आणि प्रचंड वादळ आणि लढाईसाठी तयार असलेल्या लोकसमुदायावर हिंसाचाराने तुटून पडला आणि प्रत्येकाला जाळून टाकले जेणेकरून अचानक असंख्य लोकसमुदायावर काहीही जाणवले नाही, फक्त धूळ, आणि धुराचा वास; जेव्हा मी हे पाहिले तेव्हा मला भीती वाटली. 2 एज्रा 13:10-11

> मला या स्वप्नाचा अर्थ सांगा. 2 एज्रा 13:15

> आणि एक असंख्य लोकसमुदाय जमले जाईल जसे तू  त्यांना पाहिलेस, येण्यास तयार आहे आणि युद्ध करून त्यांचा पराभव करण्यास तयार आहे. पण तो सियोन पर्वताच्या शिखरावर उभा राहील. आणि सायन येईल, आणि सर्व लोकांना दाखवले जाईल, तयार आणि बांधले जाईल. जसे तू हात नसताना कोरलेली टेकडी पाहिलीस. आणि हा माझा पुत्र त्या राष्ट्रांच्या दुष्ट अविष्कारांना फटकारेल, जे त्यांच्या दुष्ट जीवनासाठी वादळात पडले आहेत. आणि त्यांचे वाईट विचार त्याच्यासमोर ठेवतील आणि त्यांना ज्या यातना होऊ लागतील त्या ज्वालासारख्या आहेत; आणि माझ्यासारख्या नियमानुसार तो त्यांना कष्ट न करता त्यांचा नाश करील. 2 एज्रा 13:34-38

परमेश्वराच्या देवदूतानदवारे अश्शूरी लोकांचे गतप्राण होणे आपल्याला असे सूचित करते की ते देवाचे वचन आहे जे ह्या लोकांना त्यांच्या अपराधांसाठी दोषी ठरवते. ते त्यांच्यावर मोठ्या वादळासारखे पडले आणि त्यांनी पश्चात्ताप करण्यास नकार दिल्याने त्यांना वेदना झाल्या.

> माणसे कडक उन्हाने करपून गेली; तेव्हा त्या पीडांवर ज्याला अधिकार आहे त्या देवाच्या नावाची निंदा त्यांनी केली आणि देवाचा गौरव करण्यासाठी त्यांनी पश्चात्ताप केला नाही. पाचव्याने आपली वाटी श्वापदाच्या आसनावर ओतली, तेव्हा त्याचे राज्य ‘अंधकारमय झाले,’ आणि लोकांनी वेदनांमुळे

आपल्या जिभा चावल्या; आणि आपल्या वेदनांमुळे व आपल्या फोडांमुळे त्यांनी 'स्वर्गाच्या' देवाची निंदा केली, आणि आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप केला नाही. प्रकटी 16:9-11

देवाच्या चरित्राचा उतारा म्हणजे "नियमशास्त्राद्वारे" त्यांचा नाश झाला. ही तीच अग्नी नाही का ज्या अग्नीने अहरोनाचे दोन मुलगे नादाब आणि अबीहू यांना पवित्रस्थानात भस्म केले? परमेश्वराच्या अग्नीने त्यांना भस्म केले तरीदेखील त्यांना त्यांच्या कपड्यांमध्ये वाहून नेले.

तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले. ह्या बाबतीत मोशे अहरोनाला म्हणाला, "परमेश्वराने सांगितले ते हे : जे माझ्याजवळ येतील त्यांना मी पवित्र असल्याचे दिसून येईल आणि सर्व लोकांसमक्ष माझा गौरव होईल." तेव्हा अहरोन चूप राहिला. मग अहरोनाचा चुलता उज्जीयेल ह्याचे मुलगे मीशाएल व एलसाफान ह्यांना मोशेने बोलावून सांगितले की, "तुम्ही इकडे येऊन तुमच्या बांधवांना पवित्रस्थानासमोरून उचलून छावणीबाहेर घेऊन जा." मोशेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी येऊन त्यांच्या अंगरख्यांसहित त्यांना उचलून छावणीबाहेर नेले. लेवीय 10:2-5

मारणे म्हणजे पापाची जाणीव करविणे हे आहे, आपल्याला माहीत असलेले आणखी एक मार्ग म्हणजे हा शब्द खालीलप्रमाणे वापरला आहे:

नंतर शौलाच्या झग्याचा काठ कापून घेतल्याबद्दल दाविदाचे मन त्याला खाऊ [H5221] लागले. 1 शमुवेल 24:5

प्रजेची मोजदाद केल्यावर दाविदाचे मन त्याला खाऊ [H5221] लागले. दावीद परमेश्वराला म्हणाला, "हे जे मी केले त्यात मी मोठे पाप केले आहे; तर हे परमेश्वरा, आपल्या सेवकाला दोषमुक्त कर, कारण मी मोठा मूर्खपणा केला आहे." 2 शमुवेल 24:10

हा सारखाच शब्द आहे जो 2 राजे 19:35 मध्ये आहे.

त्या रात्री असे झाले की परमेश्वराच्या देवदूताने जाऊन अश्शूरी गोटातले एक लक्ष पंचाऐंशी हजार लोक मारले; [H5221] पहाटेस लोक उठून पाहतात तर सर्व प्रेतेच प्रेते! 2 राजे 19:35

आपल्या यादीतील शेवटची कथा हेरोदच्या मृत्यूची आहे.

> त्याने देवाचा गौरव केला नाही, म्हणून तत्क्षणी प्रभूच्या दूताने त्याच्यावर प्रहार केला आणि तो किडे पडून मेला. प्रेषितांची कृत्ये 12:23

आपल्या मागील उदाहरणांवरून ही कथेचे स्पष्टीकरण करणे सोपे आहे. हेरोदने कायद्याचे उल्लंघन केले आणि सार्वकालिक करार मोडला. देवाच्या वचनाने त्याला पश्चात्ताप करण्यासाठी त्याच्या पापी वर्तनाबद्दल गंभीरपणे दोषी ठरवले. या श्रद्धेमुळे त्याला मनाची वेदना झाली पण त्याने पश्चात्ताप नाकारला. या नकारामुळे सैतानाला त्याला रोगाने मारण्याची संधी मिळाली. हेरोद शत्रूच्या ताब्यात देण्यात आला कारण त्याने करार मोडला.

> मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करीन. लेवीय 26:25

ख्रिस्ताने हेरोदवर त्याच्या वचनाची तलवार आणली. हेरोदने पश्चात्ताप करण्यास नकार दिला आणि म्हणून त्याला "शत्रूच्या हाती सोपवण्यात आले" ज्याने त्याच्यावर रोगराई आणली. पेत्राच्या तुलनेत हेरोदने अनुभवलेल्या ह्या तडाख्यामध्ये काय फरक होता? पेंटेकॉस्टच्या सामर्थ्याने चालत असलेल्या पेत्राला स्पष्ट विवेक होता, परंतु हेरोदला नाही. येशूच्या नावाचा प्रचार केल्याबद्दल पेत्राला तुरुंगात ठेवण्यात आले होते आणि तो फाशीची वाट पाहत होता. जेव्हा देवदूताने पेत्राला जागे केले तेव्हा देवदूताच्या उपस्थितीने तो घाबरला नाही. परंतु हेरोदने काहीतरी वेगळे अनुभवले व त्याच्यासाठी तर मोठी मेघगर्जना झाली.

> हे बापा, तू आपल्या नावाचा गौरव कर." तेव्हा अशी आकाशवाणी झाली की, "मी ते गौरवले आहे आणि पुन्हाही गौरवीन." तेव्हा जे लोक उभे राहून ऐकत होते ते म्हणाले, "मेघगर्जना झाली." दुसरे म्हणाले, "त्याच्याबरोबर देवदूत बोलला." योहान 12:28-29

देवदूताचा एक छोटासा ध्वनी हेरोदासाठी मेघगर्जनासारखा होता आणि त्यामुळे तो खूप घाबरला. देवदूतांची पुरुषांना मारण्याची प्रवृत्ती नसते; त्यांना माहीत आहे की पुरुषांमधील दुष्टता त्यांच्या शुद्धतेने प्रकट झाली आहे, आणि हीच शुद्धता कोणतेही श्रम न करता मनुष्याला मारण्यासाठी पुरेशी आहे. परंतु देवदूत सतत त्यांच्या पूर्ण उपस्थितीमध्ये मानवांचे संरक्षण करण्यासाठी मानवांमध्ये फिरतात. ते आपल्यावर किती कृपाळू आहेत!

आपण पहिले की देवदूतांनी लोकांना मारले आणि त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला असे तेव्हाच झाले जेव्हा देवाचे वचन लोकांना त्यांचा पापासाठी दोषी ठरवते. स्वतःच्या पापीपणाची जाणीव मनाला त्रास देते. रोगराईची उपस्थिती दर्शवते की देवाचा आत्मा काढून टाकला गेला आहे आणि पश्चात्ताप करण्यास नकार देणाऱ्यांचे संरक्षण करणे देव थांबवतो म्हणून विनाशकाने त्याचे कार्य केले आहे. हे तर पाप

आहे जे पापाची शिक्षा देते. देवाचे देवदूत येशूच्या आत्म्याने भरलेले आहेत. ते पित्याच्या आज्ञा पाळतात आणि ते भौतिक तलवार चालवत नाहीत. ते देवाच्या वचनात पराक्रमी आहेत आणि येशूच्या धार्मिकतेने भरलेले आहेत. त्यांची पवित्रता, प्रेम आणि पावित्र्य हे पापी लोकांच्या दुष्टतेसाठी एक भय आहे आणि त्यांची पवित्रता अनीतिमानांच्या अंतःकरणात दहशत पसरवते. त्यांची पवित्रता ही त्यांची प्रमुख शक्ती आहे, तरीही त्यांच्याकडे दुष्टाच्या शक्तींना रोखण्याची शक्ती देखील आहे.

म्हणून नीतिमान देवदूतांकडे प्रचंड शक्ती आहे. जेव्हा त्यांना शस्त्र सोडण्याची आणि त्यांच्या संरक्षणाच्या कार्यातून मागे हटण्याची आज्ञा दिली जाते, तेव्हा ते सैतानाच्या कोपाची संपूर्ण शक्ती सोडून देतात. त्यांना हे करण्याची इच्छा नसते, तरी जेव्हा त्यांना आज्ञा होईल तेव्हाच ते असे करतील. हे तेव्हाच घडू शकते जेव्हा एखादी व्यक्ती देवाच्या इशाऱ्याकडे लक्ष देण्यास नकार देते आणि त्याच्या आज्ञांचे उल्लंघन करत राहते. अनेक वर्षांच्या दुःखानंतर अखेरीस देवाचा आत्मा मागे हटतो आणि पाप्याला त्यांनी निवडलेला स्वामी मिळण्याची परवानगी देतो.

त्यांचे संरक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्याने आपण किती धन्य आहोत. कधीकधी ते लोकांना त्यांच्या वाईट कृत्यांपासून रोखण्यासाठी त्यांची उपस्थिती प्रकट करतात, परंतु जे पुरुष त्यांच्या पापाचे अनुसरण राहण्याचा दृढनिश्चय करतात तेव्हा पश्चात्ताप न केल्यामुळे ते घाबरून मरतात. अशीच मानवी हृदयाची दुष्टता आहे. आम्हाला देवाच्या देवदूतांपासून घाबरण्यासारखे काहीही नाही, ते आमचे संरक्षक आहेत आमला मारनारे नाहीत, ते नेहमी मनुष्याच्या पुत्राकडे न्याहाळत असतात ज्याने कधीही कोणालाही मारले नाही.

# 18. साधारण विधाने

देव विचारपूर्वक लोकांना मारतो असे पवित्र शास्त्रामधील आणखी उदाहरणे संबोधित करण्याआधी, आपण अगोदर पाहिलेल्या काही तत्त्वांची पुनरावृत्ती करणे आणि त्यांना लागू करणे आवश्यक आहे.

देव खरोखरच प्रेमळ, सौम्य आणि दयाळू आहे या सत्याचा नाश करण्यासाठी पवित्र शास्त्रामधील वेग वेगळे भाग घेऊन ते एकत्र करणे व एक खटला बनविणे अत्यंत सोपे आहे. मला अनेकदा असे म्हटले गेले आहे की, "तुम्ही म्हणता की देव लोकांना मारत नाही, परंतु पवित्र शास्त्र आपल्याला स्पष्टपणे सांगते की तो मारतो. " मी हे सिद्ध करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक वचनांची यादी करेन. जेव्हा आपण ह्या वचनांची यादी करू तेव्हा ते अनेक लोकांसाठी आकर्षक मुद्दा दिसेल.

> तेव्हा परमेश्वर म्हणाला, “मी उत्पन्न केलेल्या मानवाला भूतलावरून नष्ट करीन; मानव, पशू, रांगणारे प्राणी, आकाशातील पक्षी हे सारे नाहीसे करीन; कारण त्यांना उत्पन्न केल्याचा मला अनुताप झाला आहे.” उत्पत्ती 6:7
>
> तेव्हा परमेश्वराने सदोम व गमोरा ह्यांच्यावर गंधक व अग्नी ह्यांचा वर्षाव आकाशातून केला; उत्पत्ती 19:24
>
> पण यहूदाचा पहिला मुलगा एर हा परमेश्वराच्या दृष्टीने दुष्ट होता म्हणून परमेश्वराने त्याला मारून टाकले. उत्पत्ती 38:7
>
> हे त्याचे कृत्य परमेश्वरास दुष्ट वाटल्यावरून त्याने त्यालाही मारून टाकले. उत्पत्ती 38:10

आणि फारो आम्हांला जाऊ देईना; तेव्हा परमेश्वराने मिसर देशातील मनुष्य व पशू ह्यांचे सर्व प्रथमनर मारून टाकले; म्हणून उदरातून निघालेल्या सर्व प्रथमनरांचा मी परमेश्वराला बली अर्पण करतो; पण माझ्या मुलांतील ज्येष्ठ मुलाला मोबदला देऊन सोडवून घेतो.’ निर्गम 13:15

परमेश्वर मोशेला म्हणाला, “आपला हात समुद्रावर उगार म्हणजे पाणी पूर्वीसारखे जमून मिसऱ्यांवर, त्यांच्या रथांवर व स्वारांवर येईल.” मोशेने समुद्रावर आपला हात उगारला तेव्हा दिवस उजाडल्यावर समुद्र परतून त्याचा लोट पूर्वीसारखा वाहू लागला; त्यापुढे मिसरी लोक पळू लागले. पण परमेश्वराने त्यांना समुद्रामध्ये उलथून पाडले. पाणी पूर्वीच्या जागेवर परत आले आणि रथ, घोडे आणि फारोची सर्व सेना जी त्यांच्या पाठीस लागून समुद्रामध्ये गेली होती ती सर्व त्यात गडप झाली; त्यांतला एकही वाचला नाही. निर्गम 14:26-28

मग परमेश्वराने मोशेला म्हटले, “मी ह्या लोकांना पाहिले आहे. हे ताठ मानेचे लोक आहेत. तर आता मला आड येऊ नकोस; मी आपला कोप त्यांच्यावर भडकवून त्यांना भस्म करतो; आणि तुझेच एक मोठे राष्ट्र करतो.” निर्गम 32:9-10

तो त्यांना म्हणाला, “इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो की, ‘तुम्ही प्रत्येकाने आपल्या कंबरेस तलवार लटकवावी आणि छावणीच्या ह्या प्रवेशद्वारापासून त्या प्रवेशद्वारापर्यंत चहूकडे फिरून आपले बंधू, सोबती व शेजारी ह्यांचा वध करावा.’” मोशेच्या सांगण्याप्रमाणे लेवी वंशाच्या लोकांनी केले आणि त्या दिवशी सुमारे तीन हजार लोक पडले. निर्गम 32:27-28

अहरोनाचे मुलगे नादाब व अबीहू ह्यांनी आपापली धुपाटणी घेऊन त्यांत अग्नी घातला व त्यांवर धूप घालून तो अनधिकृत अग्नी परमेश्वरासमोर नेला. असा अग्नी नेण्याची परमेश्वराची आज्ञा नव्हती. तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले. लेवीय 10:1-2

मग लोक संकटात सापडल्यासारखे कुरकुर करू लागले; ते परमेश्वराच्या कानी पडले. ते ऐकून परमेश्वराचा कोप भडकला आणि त्याच्या अग्नीने त्यांच्यामध्ये पेट घेऊन छावणीच्या हद्दीवरचे काही भाग भस्म केले. गणना 11:1

आणि परमेश्वर मोशेला म्हणाला, "लोकांच्या सर्व प्रमुखांना पकडून परमेश्वराकरता त्यांना भरदिवसा फाशी दे म्हणजे परमेश्वराचा इस्राएलांवर भडकलेला राग जाईल." गणना 25:4

परमेश्वराने मोशेला आज्ञा केल्याप्रमाणे त्यांनी मिद्यानाशी लढून एकूणएक पुरुषाची कत्तल केली. गणना 31:7

आणि तुझा देव परमेश्वर त्यांना तुझ्या हवाली करील व तू त्यांचा पराभव करशील, तेव्हा त्यांचा समूळ नाश कर; त्यांच्याशी करारमदार करू नकोस व त्यांच्यावर दया करू नकोस. अनुवाद 7:2

'आता पाहा, मी, मीच तो आहे, माझ्याशिवाय कोणी देव नाही; प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे. मी घायाळ करतो आणि मीच बरे करतो; माझ्या हातून सोडवणारा कोणी नाही. अनुवाद 32:39

परमेश्वराने इस्राएलापुढे त्यांची गाळण उडवली. त्यांनी गिबोनात त्यांची मोठी कत्तल करून बेथ-होरोनाच्या चढावाच्या वाटेने त्यांचा पाठलाग केला आणि अजेका व मक्केदा येथपर्यंत ते त्यांना मारत गेले. ते इस्राएलापुढून बेथ-होरोनाच्या उतरणीवरून पळून जात असताना परमेश्वराने अजेकापर्यंत आकाशातून त्यांच्यावर केलेल्या मोठाल्या गारांच्या वर्षावामुळे ते ठार झाले; इस्राएल लोकांनी तलवारीने मारले त्यांपेक्षा जास्त लोक गारांनी मेले. यहोशवा 10:10-11

सेनाधीश परमेश्वर म्हणतो, 'इस्राएल मिसरातून येत असता अमालेक मार्गात त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी टपून बसून त्यांच्याशी कसा वागला ह्याचे मला स्मरण आहे. तर आता जाऊन अमालेकास मार दे; त्यांच्या सर्वस्वाचा विध्वंस कर, त्यांची गय करू नकोस; पुरुष, स्त्रिया, अर्भके, तान्ही बाळे, बैल, मेंढरे, उंट आणि गाढवे ह्या सर्वांचा संहार कर."' 1 शमुवेल15:2-3

आम्ही यासारखे आणखी काही मजकूर सूचीबद्ध करू शकतो. जुन्या करारात अशा अनेक कथा आहेत ज्या अगदी स्पष्टपणे वाचले जाऊ शकतात परंतु नवीन करारात वर्णन केलेल्या मानवतेच्या सामूहिक कत्तलीच्या तुलनेत ह्या सर्व एकत्रित कथा काहीच नाहीत.

ती हजार वर्षे संपल्यावर सैतानाला कैदेतून बंधमुक्त करण्यात येईल; आणि तो 'पृथ्वीच्या चार कोपऱ्यांतील गोग' व 'मागोग' ह्या राष्ट्रांना ठकवण्यास व त्यांना लढण्यासाठी एकत्र करण्यास बाहेर येईल; त्यांची संख्या समुद्राच्या वाळूइतकी आहे. त्यांनी 'पृथ्वीच्या विस्तारावर' फिरून पवित्र जनांची छावणी व 'प्रिय' नगर वेढले; 'तेव्हा [देवापासून] स्वर्गातून अग्नी उतरला आणि त्याने' त्यांना 'खाऊन टाकले.' त्यांना ठकवणाऱ्या सैतानाला

> ‘अग्नीच्या’ व ‘गंधकाच्या’ सरोवरात टाकण्यात आले; त्यात ते श्वापद व खोटा संदेष्टा आहे; तेथे त्यांना रात्रंदिवस युगानुयुग पीडा भोगावी लागेल. प्रकटीकरण 20:7-10

त्यात म्हटले आहे की दुष्ट समुद्राच्या वाळूसारखे असतील? समुद्राच्या किनाऱ्यावरील वाळूचे कण किती असतील? आम्ही कदाचित 100 अब्ज लोकांचा एक आकडा प्रस्तावित करू शकतो जे सार्वकालिक अग्नीत आणि सर्वात वाईट प्रकारच्या वेदनांमध्ये रडत आहेत. ह्यामुळे जुन्या कराराचे कथा तुलनेत बालवाडीच्या दंतकथांसारख्या वाटतात.

अनेक ख्रिस्ती लोक विजयीपणे या परिच्छेदांचा पुरावा म्हणून अर्थ लावतात की त्यांचा देव अब्जावधी लोकांना वेदनादायक शिक्षेच्या अधीन करतो, व त्याच्याविरुद्ध बंड केल्याबद्दल त्यांना जिवंत जाळतो.

ज्या मजकुरात देव लहान बाळांना मारण्याची आज्ञा देतो ते सामान्यतः दुर्लक्षित केले जातात किंवा टाळले जातात, जे देवाच्या कृत्यांचे समर्थन करतात, ते सहसा देवासारखी कठोर वृत्ती दर्शवतात.

ज्याला ते विजयाचा पुरावा मानतात तोच त्यांचा सर्वात मोठा पराभव ठरतो.

अशा भयंकर माणसाच्या सान्निध्यात चिरंतन जगण्याची आणि गुडघे टेकून उपासना करण्याची तर्कशुद्ध कल्पना कोण करू शकेल, आणि खरोखरच स्वतःला हे पटवून देण्याचा प्रयत्न करत असेल की एके दिवशी तुमचीही हत्या होईल याची तुम्हाला कधीही भीती वाटू नये?

जर या कथांचे बरोबर वाचन केले तर देव स्वत:हून ज्वालांची पत्रके थेट दुष्टांवर पाठवतो, तर सर्व नीतिमान लोक फक्त सियोनच्या भिंतींमधून एखाद्या चित्रपटाप्रमाणे नाश पाहत असतील जेथून त्यांना शापितांचे ओरडणे आणि रडणे ऐकू येईल, आणि वास्तविकपणे सत्य नाकारणाऱ्या आपल्या सर्व प्रियजनांना (थोडक्यात किंवा कायमचे) कोणतीही दया न करता जेव्हा जिवंत जाळले जाते तेव्हा धार्मिकांना खरोखर आनंद होतो काय?

तुम्ही ज्या देवाची उपासना करता तो तुमच्या कुटूंबातील सदस्यांनाच मारत नाही तर प्रथम त्यांचा छळ करतो आणि अत्यंत अकल्पनीय भयपटात त्यांचा हळूहळू नाश करतो ह्यात काही धार्मिक समाधान आहे काय?

मला असे वाटते की काही जण असे म्हणतील की देव त्यांच्या डोळ्यातील प्रत्येक अश्रू पुसून टाकेल आणि त्यांच्या आठवणीतून पूर्वीच्या गोष्टी काढून टाकेल.

> ‘तो’ त्यांच्या डोळ्यांचे ‘सर्व अश्रू पुसून टाकील;’ ह्यापुढे मरण नाही; ‘शोक, रडणे’ व कष्ट हे नाहीत; कारण ‘पहिल्या गोष्टी’ होऊन गेल्या.” प्रकटीकरण 21:4

शाश्वत आनंद ही इच्छा करण्यासारखी गोष्ट आहे, की ती अकल्पनीय क्रूर आणि दुष्ट पुरावा नष्ट करणाऱ्या पात्राची कृती आहे?

लग्नात प्रेमाचा आनंद अनुभवलेल्या, किंवा बाळाला आपल्या कुशीत घेतलेल्या, किंवा पालकांच्या प्रेमळ मिठीत बसलेल्या, किंवा ज्यांनी आपल्या मौल्यवान घोडा, कुत्रा किंवा मांजर यांसारख्या प्राण्यांची काळजी घेतली आहे अशा कोणत्याही तर्कशुद्ध व्यक्तीसाठी या चित्राबद्दल काहीतरी अस्वस्थ करणारे आहे.

या रीतीने या वाचनाचा वापर अनेकदा या प्रतिपादनासह केला जातो की आपण पवित्र शास्त्र जसे वाचतो तसे समजले पाहिजे किंवा आपण ते शब्दशः वाचले पाहिजे आणि देव दुष्टांचा नाश करील याचा पुरावा म्हणून ही स्पष्ट विधाने स्वीकारली पाहिजेत.

हे अगदी खरे आहे की आपण पवित्र शास्त्र जसे वाचतो तसे घेतले पाहिजे आणि पवित्र शास्त्र जसे वाचतो तसे घेणे म्हणजे सर्व पवित्र शास्त्र घेणे आणि केवळ पवित्र शास्त्राचे काही भाग घेऊ नये जे आपल्या इच्छित असलेल्या युक्तिवादाला अनुकूल असेल.

ह्या पुस्तकातील दुसऱ्या अध्यायात शिकल्याप्रमाणे आपण एका मुद्द्यावरील सर्व वचने घेऊन ते एकत्र ठेवले पाहिजेत. देव थेट लोकांना मारतो या निष्कर्षावर जे लोक येतात ते सर्व पवित्र शास्त्र वाचत नाहीत, तर त्यांच्या भूमिकेशी सहमत असलेले पवित्र शास्त्राचे भाग वाचतात. जर सुरुवातीला आपण संपूर्ण पवित्र शास्त्र वाचले तर आपल्याला बऱ्याच ठिकाणी असे वाटेल कि काही गोष्टी एकत्र बसत नाहीत. खालील गोष्टींचा विचार करा:

| सौम्य, नम्र आणि प्रेमळ | सूड घेणारा, द्वेषाने भरलेला व विनाशकारी |
|---|---|
| मत्तय 26:52 तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील. | अनुवाद 32:40-41 मी आपला बाहू आकाशाकडे उभारून म्हणतो, माझ्या सनातन जीविताची शपथ, मी आपली चमकणारी तलवार पाजळली, मी न्याय हाती घेतला, तर मी आपल्या विरोधकांचा सूड घेईन, माझ्या वैऱ्यांचे उसने फेडीन. |

| | |
|---|---|
| लूक 9:56 कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे." मग ते दुसऱ्या गावाला गेले.<br><br>यशया 11:9 माझ्या सगळ्या पवित्र डोंगरावर ती उपद्रव देणार नाहीत व नासधूस करणार नाहीत; कारण सागर जसा जलपूर्ण आहे तशी परमेश्वराच्या ज्ञानाने पृथ्वी परिपूर्ण होईल. | उत्पत्ती 6:7 तेव्हा परमेश्वर म्हणाला, "मी उत्पन्न केलेल्या मानवाला भूतलावरून नष्ट करीन; मानव, पशू, रांगणारे प्राणी, आकाशातील पक्षी हे सारे नाहीसे करीन; कारण त्यांना उत्पन्न केल्याचा मला अनुताप झाला आहे." |
| मत्तय 5:44 मी तर तुम्हांला सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा, [जे तुम्हांला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा] आणि जे तुमचा छळ करतात [व तुमच्या पाठीस लागतात] त्यांच्यासाठी प्रार्थना करा. | स्तोत्रसंहिता 18:40 तू माझ्या वैऱ्यांना पाठ दाखवायला लावले, मी आपल्या द्वेष्ट्यांचा अगदी संहार केला.<br><br>स्तोत्रसंहिता 143:12 तू आपल्या दयेने माझ्या वैऱ्यांचा नायनाट कर; माझ्या जिवाला गांजणाऱ्या सर्वांचा नाश कर; कारण मी तुझा दास आहे. |
| निर्गम 20:13 खून करू नकोस.<br><br>2 करिंथ 3:18 परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत;2 आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. | उत्पत्ती 38:7 पण यहूदाचा पहिला मुलगा एर हा परमेश्वराच्या दृष्टीने दुष्ट होता म्हणून परमेश्वराने त्याला मारून टाकले.<br><br>उपदेशक 3:3 वधण्याचा समय व बरे करण्याचा समय; मोडून टाकण्याचा समय व बांधून काढण्याचा समय असतो; |
| 1 योहान 4:8 जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीती आहे. | मलाखी 1:2-3 परमेश्वर म्हणतो, "मी तुमच्यावर प्रीती केली. पण तुम्ही विचारता, तू कोणत्या बाबतीत आमच्यावर प्रीती केलीस?" परमेश्वर म्हणतो, "एसाव याकोबाचा भाऊ नव्हता काय? तरी मी याकोबावर प्रीती केली; एसावाचा द्वेष केला, त्याचे पर्वत उजाड केले व त्याचे वतन रानातल्या कोल्ह्यांना दिले." |

| | |
|---|---|
| स्तोत्रसंहिता 100:5 कारण परमेश्वर चांगला आहे; त्याची दया सनातन आहे आणि त्याची सत्यता पिढ्यानपिढ्या टिकते.<br><br>1 इतिहास 16:34 परमेश्वराचे उपकारस्मरण करा, कारण तो चांगला आहे; त्याची दया सनातन आहे. | यशया 9:17 ह्यामुळे प्रभू त्यांच्या तरुणांवर प्रसन्न होत नाही; त्यांचे अनाथ व विधवा ह्यांचा त्याला कळवळा येत नाही; कारण ते सर्व अधर्मी व कुकर्मी आहेत; प्रत्येक मुख मूर्खपणाच्या गोष्टी बोलते. इतके झाले तरी त्याचा क्रोध शमला नाही, त्याचा हात अजून उगारलेला आहे. |
| यशया 27:4 माझ्या ठायी राग कसला तो नाहीच; माझ्यापुढे युद्धात काटे व काटेरी झुडपे असती तर ती मी पायाखाली तुडवून सर्व जाळून टाकली असती; | ईयोब 20:23 असे होईल की त्याच्या पोटाची भर करण्यास देव त्याच्यावर आपला क्रोधाग्नी पाखडील; आणि तो अन्न खात असता त्याच्या क्रोधवृष्टीचा प्रवेश त्याच्या पोटात होईल. |

जर आपण पवित्र शास्त्राचे काळजीपूर्वक वाचन केले तर स्पष्ट विरोधाभास लवकरच दिसू लागतील.

उघड विरोधाभासाच्या ह्या टप्प्यावर आपण एकतर पवित्र शास्त्राच्या काही भागांकडे दुर्लक्ष करणे निवडले पाहिजे जे आपल्याला आधीच समजत असलेल्या गोष्टींशी सहमत नाही किंवा आपण नम्रपणे देवासमोर गुडघे टेकले पाहिजे आणि आपण पवित्र शास्त्र कसे वाचायचे हे आपल्याला शिकवण्यास त्याच्याजवळ विनंती केली पाहिजे आणि ह्या उघड विरोधाभासांचा योग्य सुसंवाद लावण्यास आपल्याला मदत करावी.

प्रश्न असा आहे की देवाने अशा प्रकारे पवित्र शास्त्र का लिहिले? जे लिखित आहे त्यापेक्षा सोप्या पद्धतीने का लिहिले गेले नाही? अपरिवर्तित मनुष्याला स्वाभाविकपणाचा अभिमान असतो. त्याला त्याची जाणीव नसली तरीही तो स्वाभाविकपणे देवाचा वैरी असतो.

> कारण देहस्वभावाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे; ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि त्याला तसे होता येत नाही. रोमकरांस 8:7

ह्या नैसर्गिक शत्रुत्वामुळे आपल्याला पवित्र शास्त्र अशा प्रकारे वाचण्यास प्रवृत्त होईल ज्यातून असे वाटेल कि देव कठोर आणि अत्याचारी आहे. असा मनुष्य देवावर प्रेम करण्याचा आणि त्याचा सन्मान करण्याचा दावा करू शकतो, परंतु आपली ही नैसर्गिक शत्रुता या उघड विरोधाभासांवर मात करण्यास तयार नाही; त्याऐवजी आपण सर्व वचने वाचण्याचे निवडू जे देवाला नाश करणारा म्हणून प्रकट करतात

आणि नंतर आपण गरज असेल तेव्हा नम्र आवाजात म्हणू की पवित्र शास्त्र जे सांगते ते आपण स्वीकारले पाहिजे.

तरीसुद्धा, असा मनुष्य पवित्र शास्त्रामध्ये जे काही सांगितले आहे ते सर्व स्वीकारत नाही. हा माणूस त्याला जे स्वीकारायचे आहे ते स्वीकारतो आणि त्या भागांकडे दुर्लक्ष करतो जे देवाला वेगळ्या पद्धतीने सादर करतात. अशा प्रकारे आपण सत्य शोधतो की:

> तो अधिक 'कृपा करतो;' म्हणून शास्त्र म्हणते, "देव गर्विष्ठांना विरोध करतो, आणि लीनांवर कृपा करतो." याकोब 1:23

हे कसे कार्य करते?

> कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; याकोब 1:23

> कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. मत्तय 7:2

> तेव्हा हे मानवा, दोष लावणारा तू कोणीही असलास तरी स्वतः तुला सबब नाही; कारण ज्यात तू दुसऱ्याला दोष लावतोस त्यात तू स्वतःला दोषी ठरवतोस; कारण दोषी ठरवणारा तूही त्याच गोष्टी करतोस. रोमकरांस 2:1

जेव्हा मनुष्य पवित्र शास्त्र वाचतो आणि पूर्णपणे प्रेमळ देवाबद्दल बोलणाऱ्या परिच्छेदांकडे दुर्लक्ष करतो आणि देवाने थेट लोकांना मारल्याबद्दल स्पष्टपणे सांगणाऱ्या वचनांला धरून राहण्याचे निवडतो तेव्हा तो स्वतःचे चरित्र प्रकट करतो. असा मनुष्य, सैतानाप्रमाणेच, त्याचे स्वतःचे गुणधर्म देवावर ठेवतो आणि देवाशी आपले वैर प्रकट करतो.

> असे तू केलेस तरी मी उगा राहिलो; मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन. मी तुझी कृत्ये तुझ्यापुढे मांडीन. स्तोत्रसंहिता 50:21

देवाने पवित्र शास्त्राला मनुष्याचे चरित्र प्रकट करण्याच्या मार्गाने लिहिण्याची प्रेरणा दिली आहे. माणसाचा निंदनीय स्वभाव नेहमीच देवाला आपल्या प्रतिमेत बनवू पाहत असतो. तो त्याचा स्वभाव आणि निर्णय देवावर प्रक्षेपित करतो आणि म्हणून पवित्र शास्त्राची रचना अत्यंत काळजीपूर्वक केली गेली आहे जेणेकरून मनुष्यांच्या आत्म्यामध्ये एक दैवी आरसा तयार होईल.

जेव्हा एक अपरिवर्तित मनुष्य पवित्र शास्त्र वाचतो, तेव्हा तो देवाच्या कृतींमध्ये स्वतःचा चेहरा पाहतो. ज्या माणसाने आपल्या पापांची कबुली दिली आहे आणि त्याला माहित आहे की त्याच्यामध्ये काहीही चांगले नाही त्याऐवजी तो येशूच्या मौल्यवान व्यक्तिमत्त्वाकडे पाहतो आणि जेव्हा तो पवित्र शास्त्र वाचतो तेव्हा त्याला देवाचे एक वेगळे चित्र दिसते. पृथ्वीवरील मनुष्यांसमोर प्रकट झालेले ख्रिस्ताचे चरित्र पवित्र शास्त्राच्या आरशातील प्रतिबिंब बदलते आणि सापाचे बंधने त्याच्या डोळ्यांतून पडतात आणि आपण खरोखर इतके मौल्यवान काय पाहत आहोत हे त्याच्या हृदयाला आनंदित करते.
नैसर्गिक मनुष्य पवित्र शास्त्राचे तेच भाग वाचतो जे त्याच्या विचारांशी सहमत असतात आणि बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो किंवा तो समजून येणारे विरोधाभास लक्षात घेतो आणि पवित्र शास्त्र पूर्णपणे नाकारतो.

आत्मिक मनुष्य सर्व पवित्र शास्त्र वाचतो आणि उघड विरोधाभासांनी नम्र होतो. त्यानंतर तो देवाचे वचन पूर्णपणे समजून घेण्याच्या असमर्थतेची कबुली देतो आणि पवित्र शास्त्र समजून घेण्यासाठी मदतीची याचना करतो. जेव्हा तो शिकवण्यायोग्य होईल तेव्हा पवित्र शास्त्र देवाच्या चरित्राचे सौंदर्य प्रकट करण्यास सुरवात करेल. देवाच्या इच्छेप्रमाणे वचनांचे तुकडे एकत्र करण्यासाठी नम्रतेने खूप प्रार्थना करावी लागते. हा माझा आणि इतरांचा अनुभव नक्कीच आहे. काही परिच्छेद वाचताना मी प्रभूशी विनवणी केली कारण काही वचने माझ्या मनात सुसंगत होत नव्हती. मी गुडघे टेकून माझ्या पित्याला मला मदत करण्यास मागितले आणि मला सत्य दाखवण्यास सांगितले. मनापासून केलेल्या प्रार्थनेनंतर जेव्हा सत्य प्रकट होते तेव्हा खूप आनंद होतो.

आपण पुढील कथांचा विचार करत असताना निष्कर्ष काढण्यासाठी फक्त एक किंवा दोन वचन घेणार नाही तर आपण सर्व वचने एका मुद्द्यावर एकत्र केले पाहिजेत आणि ते एकत्र आणले पाहिजेत जेणेकरून ते सर्व सुसंगत होतील.

आपण दैवी आरशाची तत्त्वे देखील लक्षात ठेवूयात. अध्याय 9 मध्ये आपण त्या स्त्रीच्या कथेद्वारे शिकलो जिने येशूला आपल्या मुलीला बरे करण्यास सांगितले, येशू काळजीपूर्वक अशी भाषा वापरतो ज्यामुळे त्याच्या श्रोत्यांना त्यांचे स्वतःचे निर्णय त्याच्यावर लादता येतील.

येशूने स्त्रीची विनंती मान्य केल्यावर शिष्यांना त्यांचा परराष्ट्रीय व जातीय भेदभाव अधिक स्पष्टपणे पाहण्यास मदत करण्यासाठी दैवी आरशाचा वापर केला गेला. श्रीमंत मनुष्य आणि लाजर यांच्या कथेत आपण शिकलो की येशू प्रचलित लोककथा आणि त्याच्या श्रोत्यांचा विश्वास असलेल्या विचारांचा उपयोग महत्त्वाची सत्ये शिकवण्यासाठी केले. या कल्पना त्याच्या कल्पना नाहीत, परंतु त्याने ह्याचा उपयोग त्याला पाहिजे असलेल्या गोष्टी शिकवण्यासाठी आणि आपल्याला समजण्यासाठी देखील केला. पवित्र शास्त्र वाचताना हे समजून घेणे आवश्यक आहे.

येशू त्याच्या स्वत: च्या नसलेल्या भाषा आणि अभिव्यक्ती वापरू शकतो आणि जर एखादी व्यक्ती संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करत नसेल तर वाचकाच्या चुकीच्या कल्पनांची पुष्टी करण्यासाठी हे उतारे वापरले जाऊ शकतात. पुन्हा एकदा येथे तोच कार्य करणारा दैवी आरसा आहे.

आपण पुढे जाण्यापूर्वी काही प्रमुख तत्त्वे पुन्हा पाहुयात.

1. एखाद्या विषयावरील सर्व परिच्छेद घ्या फक्त तुम्हाला काय पाहिजे ते निवडू नका.
2. शहाणपण विचारत पवित्र शास्त्राकडे नम्रपणे या.
3. पृथ्वीवरील येशूच्या जीवनाला मध्यस्ती ठेऊन पवित्र शास्त्र वाचा.
4. आरशाची तत्त्वे नेहमी लक्षात ठेवा. वचनांचे सत्य व्यक्त करण्यासाठी पवित्र शास्त्र पुरुषांच्या कल्पना व्यक्त करू शकते. पवित्र शास्त्राबद्दल असे देखील म्हटले जाऊ शकते की ते देह आणि आत्म्याने वाचले जाऊ शकते. ते कसे वाचले जाते हे तर वाचक ठरवेल

## 19. आपल्या पापांमुळे घायाळ झालेला

हे एक अकल्पनीय भीतीदायक दृश्य असेल. ज्यावेळी माणसे आणि प्राणी स्वतःच्या जीवासाठी पळत होते.

> नोहाच्या वयाच्या सहाशेव्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या सतराव्या दिवशी महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि आकाशाची दारे उघडली. चाळीस दिवस व चाळीस रात्री पृथ्वीवर पावसाने झोड उठवली. उत्पत्ती 7:11-12

जगभरात झालेल्या महापुराची हि घटना अनेकांना त्रास देणारी आहे. देव खरोखरच लाखो लोकांना बुडवेल काय कारण त्याची दया संपली आहे आणि त्याचा न्यायाचा हात ह्यापुढे आवरला जाऊ शकत नाही? प्रेमळ देव असे करील काय? अनेकांसाठी हे एक गोंधळात टाकणारे रहस्य आहे.

देवाच्या न्यायनिवाड्याचा प्रश्न हाताळताना आपण वधस्तंभाचा मृत्यू नेहमी आपल्यासमोर ठेवला पाहिजे कारण वधस्तंभ देवाचा न्याय कसा कार्य करतो हे स्पष्ट करतो. वधस्तंभाचा मृत्यू पवित्र शास्त्रामधील सर्व न्यायनिवाडा समजून घेण्याची गुरुकिल्ली आहे. येशूने माणसांची पापे वाहून नेली, आणि पापाच्या अपराधाच्या वजनाने त्याचे जीवन चिरडून टाकले ज्यामुळे त्याला मारण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या इच्छांना मदत झाली. हे पाप होते ज्याने ख्रिस्ताला मारले आणि हे पाप आहे जे सर्व माणसांना मारते. समस्या अशी आहे की पुष्कळ लोकांना असे वाटते की देवाचा क्रोधाने ख्रिस्ताच्या मृत्यूची मागणी केली. हे यशयाच्या पुस्तकामध्ये भाकीत केलेले आहे.

> तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले.
> यशया 53:3-4

जर आपण ख्रिस्ताला देवाने वधस्तंभावर मारले आहे असे मानले तर पवित्र शास्त्रामधील सर्व कथा ज्या पापी लोकांविरुद्ध न्याय प्रकट करतात त्या देवाने त्यांना मारल्यासारखे दिसतील. आपण महापुराच्या कथेचा नीट विचार करूया.

एक माणूस विनम्रपणे किराणा दुकानात जातो आणि मालकाला कळवतो की त्याच्या व्यवसायासाठी एक खरा धोका आहे. "तुमच्या व्यवसायावर आणि तुमच्या कुटुंबावर निश्चित विनाश येणार आहे," तो म्हणतो. "तुम्ही आमच्या संरक्षणाखाली आलात नाहीत तर याशिवाय कोणतीही गोष्ट तुमचा हा विनाश थांबवू शकत नाही," तो पुढे म्हणतो. "जे आम्हाला स्वातंत्र्याचे एकमेव खरे रक्षक म्हणून मान्यता देतात त्यांच्यासाठी आम्ही सुरक्षितता प्रदान करतो" तो माणूस त्याला कळवतो की तो दुकानाच्या मालकाला विशिष्ट विनाशापासून वाचवण्यासाठी दयेच्या कार्यासाठी आला आहे. या माणसाच्या मदतीकडे वळल्याने आणि त्याला आधार देऊन, ह्या दुकान मालकाला येणाऱ्या विनाशापासून वाचवले जाऊ शकते जे, आणि हा विनाश संरक्षण स्वीकारण्यास नकार देणाऱ्या सर्व दुकानमालकांवर पडेल. तो माणूस हळूवारपणे दुकान मालकाच्या खांद्यावर हात ठेवतो आणि "दया" या अश्या त्याच्या अहवानाबद्दल काळजीपूर्वक विचार करण्याची विनंती करतो. "तुमची किंवा तुमच्या कुटुंबाची कोणतीही हानी होऊ नये अशी आमची इच्छा आहे. आम्हाला याबद्दल खूप वाईट वाटेल. " म्हणून तो माणूस त्याला संरक्षणाच्या दयाळू अटी स्वीकारण्याचा आग्रह करतो.

जर एखाद्या व्यक्तीने स्वतःपासून नसलेल्या धोक्यापासून संरक्षण दिले तर ते संरक्षण एक चाल किंवा, गुन्हा मानले जाईल. या व्यक्तीने ज्या गटाचे प्रतिनिधित्व केले होते त्याच गटाकडून जर विनाशाची धमकी दिली गेली असेल, तर हा गुन्हा असेल ज्याला खून करण्याची एक चाल म्हणतात. धमकावून किंवा धमक्या देऊन एखाद्या व्यक्तीच्या इच्छेमध्ये काही प्रकारचे दबाव आणण्याची ही सक्तीची प्रथा आहे.

दयेचा खरा संदेश देणाऱ्या व्यक्तीला नाशाची धमकी देणाऱ्याचे प्रतिनिधीत्व करणे, आणि संदेश ऐकणाऱ्यांवर दबाव आणणे व दया स्वीकारण्यास नकार देणाऱ्यांचा नाश करणे शक्य आहे काय?

पवित्र शास्त्रामधील महापुराची कहाणी खरोखरच जगभरातील धमक्या किंवा जबरदस्तीचा अनुभव आहे काय? पवित्र शास्त्राचा देव अशा लोकांना संरक्षण देतो काय जे त्याच्या इच्छेनुसार वागतात आणि त्याच्या इच्छेला नकार देणाऱ्या सर्वांना तो ठार मारतो काय?

> मग देव नोहाला म्हणाला, "सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे, कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे. पाहा, मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन. तू आपल्यासाठी गोफेर लाकडाचे तारू कर; त्या तारवात कोठड्या कर आणि त्याला आतून व बाहेरून डांबर लाव. उत्पत्ती 6:13-14

पवित्र शास्त्र म्हणते की पृथ्वी हिंसाचाराने भरलेली होती. ते स्वतः हिंसक आहेत या न्यायाने लोकांचा हिंसकपणे नाश करणे योग्य आहे का? याकडे एक प्रकारे केलेला ढोंग म्हणून पाहिले जाणार नाही काय?

हिब्रूमध्ये नष्ट हा शब्द आपण पाहिल्यास याचा अर्थ असा होतो:

> H7843: एक आदिम मूळ; क्षय करणे, म्हणजेच (कारणभावाने) नासाडी करणे (शब्दशः किंवा लाक्षणिक अर्थाने): - पिठात, टाकणे, भ्रष्ट (-एर, गोष्ट), नष्ट करणे (-एर, -उक्शन), गमावणे, मारणे, नाश, गळती, बिघडवणे, एक्स utterly, waste (-r).

हाच शब्द तेराव्या वचनाच्या अगदी आधीच्या वचनामध्ये वापरला आहे:

> त्या काळी देवाच्या दृष्टीने पृथ्वी भ्रष्ट [H7843] झाली होती; ती जाचजुलमांनी भरली होती. देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती भ्रष्ट [H7843] होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक बिघडवली [H7843] होती. उत्पत्ती 6:11-12

जर आपण येथे मराठी शब्द नष्ट वापरला, जो अनुवादकांनी उत्पत्ती 6:13 मध्ये समान हिब्रू शब्दासाठी वापरला आहे, तर आपण हे वचन खालीलप्रमाणे वाचतो:

> त्या काळी देवाच्या दृष्टीने पृथ्वी नष्ट झाली होती; ती जाचजुलमांनी भरली होती. देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती नष्ट होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक नष्ट केली होती. उत्पत्ती 6:11-12

पृथ्वीचा नाश झाला असे मानण्याचे कारण म्हणजे मनुष्याने आपली विचार करण्याची पद्धत भ्रष्ट केली किंवा नष्ट केली; तो हिंसाचाराने भरलेला होता. यावेळी जग सैतानाचे मन पूर्णपणे प्रकट करत होते. पवित्र शास्त्र आपल्याला ह्या हिंसाचाराबद्दलचे वचन सांगते:

> तुझा व्यापार मोठा असल्यामुळे तुझ्या हृदयात अपकारबुद्धी शिरून तू पातक केलेस; यहेज्केल 28:16

हे ख्रिस्ताच्या पूर्णपणे विरुद्ध आहे, ज्याच्याबद्दल पवित्र शास्त्र म्हणते, कि तो कोणतीही हिंसा करत नाही:

> त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते. यशया 53:9

राजाच्या पुत्राविषयी बोलताना, स्तोत्रकर्त्याने हे घोषित केले:

> जुलूम व जबरदस्ती ह्यांपासून त्यांचे जीव तो मुक्त करील; आणि त्याच्या दृष्टीने त्यांचे रक्त अमोल ठरेल; स्तोत्रसंहिता 72:14

म्हणून देवाचा पुत्र हिंसा करत नाही आणि ज्यांची तो सुटका करतो त्यांना तो हिंसाचारात गुंतण्यापासून आणि हिंसक वागणूक होण्यापासून वाचवतो. सैतान हिंसाचाराने भरलेला आहे आणि त्याने जगाला या आत्म्याने भरले आहे. सैतानाला हिंसाचाराची भावना निर्माण करणारा मुख्य मुद्दा कोणता आहे?

> आणि पुन्हा, देव जेव्हा त्याच्या पुत्राला जगामध्ये आणतो, तो म्हणतो, "देवाचे सर्व देवदूत त्यास नमन करोत." देवदूताविषयी देव असे म्हणतो, इब्रिलोकांस 1:6

> पुढे सैतानाने त्याला एका अतिशय उंच डोंगरावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये व त्यांचे वैभव दाखवले, आणि त्याला म्हटले, "तू पाया पडून मला नमन करशील तर मी हे सर्वकाही तुला देईन." मत्तय 4:8-9

सैतानाला ख्रिस्ताचा हेवा वाटत होता. त्याला ख्रिस्ताप्रमाणेच उपासना हवी होती, परंतु सैतान हा एक निर्मित जीव होता आणि ख्रिस्त हा देवाचा दैवी पुत्र होता. ह्यांच्यातील फरक असीम होता, तरीही सैतानाने ख्रिस्ताचे स्थान धारण करण्याची इच्छा बाळगली. ह्यांद्वारेच त्याच्या हृदयात ख्रिस्ताविरुद्ध हिंसाचाराचे बीज पेरले. सैतानाचा द्वेष ख्रिस्ताप्रती इतका वाढला की त्याने सुरुवातीपासूनच देवाच्या पुत्राला मारण्याची योजना आखली. ख्रिस्ताच्या वधस्तंभावरील मृत्यूमुळे या जगाच्या निर्मितीपूर्वी सैतानाचे खरे हेतू संपूर्ण विश्वाला प्रकट झाले.

> तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. योहान 8:44

सैतानाच्या खुनी रचनेमुळे त्याच्या हिंसाचाराला चालना मिळाली. जेव्हा आदाम आणि हव्वा पापात पडले तेव्हा ते स्वभावाने सैतानासारखे झाले. ख्रिस्ताचा आत्मा जो त्यांच्यामध्ये होता तो दातात पीसणाऱ्या दाण्यासारखा छेदला आणि चिरडला गेला. मनुष्यामध्ये असलेला ख्रिस्ताचा आत्मा त्यांना जीवन देतो. तो प्रकाश आहे जो जगात येणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रकाश देतो, योहान 1:9. जर ख्रिस्ताने आदामला पूर्णपणे सोडले तर तो मरेल. आदामामधील ख्रिस्ताचा आत्मा चिरडला गेला होता तरीही ख्रिस्ताने स्वतः माघार घेतली नाही, जरी यामुळे त्याला वेदना होत राहिल्या. ख्रिस्ताच्या म्हणजेच त्या खडकच्या सततच्या दुःखातून, आदामला जिवंत ठेवण्यासाठी आध्यात्मिक पाणी बाहेर आले. म्हणूनच पौल म्हणतो:

> आम्ही प्रभू येशूचा वध सर्वदा शरीरात वागवतो, अशा हेतूने की, येशूचे जीवनही आमच्या शरीरांत प्रकट व्हावे. 2 करिंथ 4:10

> ते जर पतित झाले तर त्यांना पश्चात्ताप होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे; कारण ते देवाच्या पुत्राला स्वतःपुरते नव्याने वधस्तंभावर खिळतात व त्याचा उघड अपमान करतात. इब्रीलोकांस 6:6

आदाम आणि हव्वा यांना देवाच्या प्रतिमेत बनवले गेले. सैतानाला या प्रतिमेचा तिरस्कार होता आणि ह्या प्रतिमेला त्याला नष्ट करायचे होते. प्रत्येक मनुष्यामधील हिंसाचाराची कृती ही ख्रिस्ताच्या आत्म्याशी युद्धात असलेल्या सैतानाच्या आत्म्याचे प्रकटीकरण आहे. हा विचार सुरुवातीला समजणे कठीण आहे परंतु पवित्र शास्त्रात स्पष्टपणे प्रकट केले आहे. एकदा हे समजल्यानंतर, पवित्र शास्त्रामध्ये वर्णन केलेली हिंसा आणि युद्ध का घडत आहे हे समजून घेण्याची पद्धत पूर्णपणे बदलते. सैतान माणसांना एकमेकांविरुद्ध हिंसाचार करण्यास प्रवृत्त करण्याच्या क्षमतेद्वारे सैतान ख्रिस्ताला मारू पाहत आहे हे आपल्याला समजेपर्यंत माणसांनी स्वतःच्या जातीचा खून करण्याची कल्पना आपल्यासाठी पूर्णपणे वेडेपणाची आहे.

> तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, ‘मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.’ मत्तय 25:40

हा मुद्दा समजून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. सर्व हिंसा देवाच्या पुत्राबद्दल मत्सर आणि द्वेषाने उत्तेजित झालेल्या आत्म्याने प्रेरित आहे. म्हणून आत्म-हिंसा आणि आत्महत्येसह सर्व हिंसा ख्रिस्ताप्रती या द्वेषाचा भाग आहे, जरी मूळ कारण व्यक्तीला पूर्णपणे माहित नसले तरीही. आपल्या शेजाऱ्यांबद्दल द्वेषाची भावना आणि आपल्या शत्रूंबद्दल आणि स्वतःबद्दल हिंसाचाराची कृत्ये ख्रिस्ताप्रती सैतानाच्या द्वेषामुळे उत्तेजित होतात. हे सर्व हिंसाचार आणि द्वेषाचे मूळ आहे.

उत्पत्तिच्या सहाव्या अध्यायात वर्णन केलेली सर्व हिंसा ही स्त्री आणि पुरुषांद्वारे

ख्रिस्ताविषयी सैतानाच्या द्वेषाचे प्रकटीकरण आहे. ख्रिस्त हा जीवनाचा एकमेव स्त्रोत असल्याने अशा सर्व द्वेषाचा अंतिम परिणाम केवळ आत्म-नाश असू शकतो. माणसातील हिंसाचाराची ही भावना बागेमधील कोकराच्या पहिल्या मृत्यूमध्ये प्रकट झाली. ह्या बलिदानामुळे आदामाचा हिंसक स्वभाव दिसून आला आणि देव त्याच्यामध्ये वसलेल्या ह्या हिंसेच्या बीजाचे प्रतिबिंब करत होता. हाबेलला मारल्यावर काईनमध्ये हिंसाचाराचे हे बीज लवकरच फुटले.

मनुष्याने जीवन जगणे सुरू ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ख्रिस्ताने मानवजातीला त्याच्या जीवनाची शक्ती पुरवणे चालू ठेवणे हे होते. म्हणूनच ख्रिस्त हा जगाच्या स्थापनेपासून बलिदान झालेला कोकरा आहे. प्रकटीकरण 13:8. ख्रिस्ताला सुरुवातीपासूनच आपल्या पापांनी घायाळ केले आहे; पापाच्या सुरुवातीपासूनच आपल्या अपराधांमुळे त्याला जखमा झाल्या आहेत. मनुष्याला जगण्यासाठी, या सैतानी प्रेरित द्वेषाला न जुमानता ख्रिस्ताला प्रत्येक व्यक्तीला वाहून नेणे आवश्यक होते.

> त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया 63:9

हे विचार खरे पाहता ख्रिस्ताचा वधस्तंभ, हिंसेचे प्रकटीकरण आणि म्हणून देवाचे चरित्र समजून घेण्याचा मार्ग पूर्णपणे बदलतात. प्रत्येक वेळी जेव्हा एखाद्या व्यक्तीला मारहाण केली जाते, बलात्कार केला जातो किंवा खून केला जातो तेव्हा हा सैतान ख्रिस्ताला मारण्याचा आणि जखमी करण्याचा प्रयत्न करत असल्याचा पुरावा असतो. आत्महत्येची प्रत्येक कृती ज्यामुळे रोग आणि स्वतःचा किंवा इतरांचा मृत्यू होतो, हे देखील ख्रिस्ताकडून शक्य तितके दुःख काढण्याच्या सैतानाच्या कट्टर हेतूंचे प्रकटीकरण आहे. हा एक द्वेष आहे जो अतिशय क्रूर आहे.

वधस्तंभाची खरी व्याप्ती पापाच्या प्रवेशापासून ते आजपर्यंत विश्वात पसरलेली आहे. प्रत्येक जीव जो देवाबरोबर वधस्तंभाच्या उद्देशाने कार्य करतो तो स्वतःमध्ये अस्तित्वात असलेल्या जीवनाशी युद्ध करतो कारण जीवन ख्रिस्ताकडून येते. हे मानवांच्या आत्म-विनाशकारी स्वभावाचे रहस्य आहे. हे सैतानाचे ख्रिस्ताविरुद्धचे युद्ध आहे. आता खालील वचनामधील दैवी आरशाचा आपण काळजीपूर्वक विचार करूया.

> वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो. कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. रोमकरांस 1:18-19

ग्रीक भाषेतील क्रोध या शब्दाचा अर्थ फक्त इच्छा आहे आणि ज्या मूळ शब्दापासून तो आला आहे ज्याचा अर्थ नंतर पोहोचणे असा होतो. ह्यांचे तीव्र भावना तसेच क्रोध व राग असे भाषांतर केले जाऊ शकते. विरुद्ध या शब्दाचा अर्थ वर किंवा एखाद्यावर आणि आपल्या दिशेने असा असू शकतो. हे विचार लक्षात घेऊन आपण आणखी एक मुद्दा विचारात घेऊयात आणि पुढील वचनांचे भाषांतर करूयात. येशू म्हणाला मी सत्य आहे. योहान 14:6. म्हणून सत्याचे दडपण हे ख्रिस्ताचे दडपण आहे.

> वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो. कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. रोमकरांस1:18-19

दररोज देव आपल्या पुत्राचा आत्मा पाठवतो जेणेकरून तो आपल्या अंतःकरणात राहू शकेल. काही लोक तो आवाज ऐकतात, तर काही विरोध करण्याच्या प्रयत्नात ज्यांच्यामध्ये तो आत्मा राहतो त्यांना शोधतात आणि त्यांचा छळ करतात. ह्या पृथ्वीवर जिवंत असलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये ख्रिस्ताचा तिरस्कार केला जात आहे आणि पुरुषांकडून त्याला नाकारले जात आहे. आज तो दु:खाचा माणूस आहे आणि दु:खामुळे परिचित आहे. दररोज ख्रिस्त स्वतःला नाकारतो, त्याचा वधस्तंभ उचलतो आणि आपल्याला त्याचे जीवन देतो. यामध्ये परमेश्वराची आपल्याप्रती असलेली इच्छा दिसते. उत्कट इच्छेने तो दररोज आपल्यापर्यंत पोहोचतो आणि तरीही बहुतेक जग सद्सद्विवेकबुद्धीचा आवाज दाबून टाकतात आणि त्याचा विश्वास बुडवून टाकतात.

माणसांची दुष्टता त्यांच्या स्वतःच्या क्रोधाचा आत्मा देवावर प्रक्षेपित करते. त्याच्या प्रेमासाठी पुरुषांचा संतप्त प्रतिकार देवावर परत आक्रमक म्हणून प्रतिबिंबित केला जातो. मानवी गुणधर्म त्याच्यावर ठेवलेले आहेत आणि अशा प्रकारे ख्रिस्ताला देवाने मारलेला आणि पीडित म्हणून पाहिले जाते, परंतु ख्रिस्त आपल्या अपराधांमुळे जखमी झाला होता आणि देवाच्या क्रोधाने नाही. आणि देव त्याच्या लोकांना काय म्हणतो, जे त्याचे अनुसरण करण्याचा दावा करतात?

> पण इस्राएलाविषयी तो म्हणतो, “आज्ञा मोडणाऱ्या व उलटून बोलणाऱ्या लोकांकडे मी सारा दिवस आपले हात पसरले आहेत.” रोमकरांस 10:21

वधस्तंभाच्या प्रकाशातच आपण केवळ महापूरच नव्हे तर सदोम आणि गमोरावर आलेली अग्नी, येरुशलेमचा नाश आणि जगाच्या अंताची भीषणता समजून घेऊ शकतो. सैतानाचा ख्रिस्ताप्रति असलेला द्वेष शेवटी प्रत्येकाला मारण्याच्या त्याच्या इच्छेतून प्रकट होतो कारण प्रत्येक व्यक्तीमध्ये ख्रिस्ताने आपले जीवन दिले आहे. तो स्वेच्छेने प्रत्येक माणसामध्ये आपला जीव ओततो जेणेकरून त्यांना जगण्याची त्याची शक्ती मिळेल. ख्रिस्त जेथे पापाचे पालनपोषण केले जाते तेथे राहू शकत नाही परंतु त्याच्या आत्म्याचे चिरडणे जाणे जसे तो भौतिक वधस्तंभावर मरण

पावला तेव्हा त्याच्या कुशीतून वाहत असलेल्या पाण्याप्रमाणेच आपल्या आत्म्याला जगण्याची शक्ती देते.

> सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो. 1 पेत्र 5:8

तेराव्या धड्यामध्ये आपण मनुष्याच्या आत्म्याचा पृथ्वीवर होणाऱ्या प्रभावाबद्दल बोललो. जेव्हा लोक ख्रिस्ताला दबवतात आणि एकमेकांशी हिंसक वर्तन करून सैतानाचा ख्रिस्ताप्रति असलेला द्वेष व्यक्त करतात तेव्हा पृथ्वी निसर्गाच्या नियमांद्वारे मनुष्याला असेच हिंसक पद्धतीने प्रतिबिंबित करू लागते. जसे लोक त्यांच्या आत्म्यांमध्ये ख्रिस्ताचा आवाज बुडवून टाकतात, तसेच निसर्ग माणसांचे आत्मे बुडवून टाकण्यासाठी प्रतिसाद देईल. प्रभुने जगाच्या दुष्टतेचे सर्वेक्षण केले तेव्हा त्याने काही मर्यादा स्थापित केली.

> तेव्हा परमेश्वर म्हणाला, “मनुष्य भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची त्याच्या ठायी सर्वकाळ सत्ता राहणार नाही; तो देहधारी आहे; तथापि मी त्याला एकशे वीस वर्षांचा काळ देईन.” उत्पत्ती 6:3

देवाचा आत्मा त्यांना वाचवण्यासाठी मनुष्यासोबत किती वेळ प्रयत्न करेल याची मर्यादा होती. ख्रिस्ताचा आत्मा रात्रंदिवस त्याच्या मार्ग भटकलेल्या मुलांची विनवणी करीत होता. त्याने लोकांना आवाहन केले आणि दिवसेंदिवस त्यांच्यापर्यंत ते पोहोचवले. तरीही देवाच्या आत्म्याच्या या प्रयत्नांना पुरुषांनी कशी प्रतिक्रिया दिली हे आम्हाला आठवते.

> वास्तविक जी माणसे अनीतीने (स्वइच्छेने) सत्य (ख्रिस्ताला) दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध (इच्छा) स्वर्गातून प्रकट होतो.  रोमकरांस 1:18

महापुरा आधीचे लोक विवेकाचा आवाज बुडवत होते. दररोज त्यांनी त्या सौम्य, आकर्षक आवाजाला नकार दिला आणि ते त्यांच्या दुष्ट मार्गात पुढे जात राहिले. ख्रिस्ताच्या आत्म्याचे हे दडपण त्याला बुडविण्याच्या प्रयत्नात त्याला दाबून ठेवण्यासारखे होते. जसजसा लोकांचा आत्मा दिवसेंदिवस अस्वस्थ होत होता, तसतसे ख्रिस्त अनेकदा भारावून जात असे.

> तरी त्यांनी बंड केले व त्याच्या पवित्र आत्म्यास खिन्न केले; तेव्हा तो उलटला व त्यांचा शत्रू बनला, तो स्वत: त्यांच्याशी लढला. यशया 63:10

जसजसे लोक विनाशाच्या जवळ आले तसतसे ख्रिस्ताची विनंती अधिक निकडीची झाली आणि त्याचा आवाज त्यांच्यासाठी शत्रूचा आवाज बनला. त्यांच्याविरुद्धच्या देवाच्या साक्षीला तिरस्काराने वागवले गेले.

> माझा जीव अगदी घाबरा झाला आहे; हे परमेश्वरा, हे कोठवर चालणार? हे परमेश्वरा, माझ्याकडे वळ, माझा जीव वाचव, तू आपल्या वात्सल्यानुसार मला तार; कारण मृतावस्थेत तुझे स्मरण कोणाला राहत नाही; अधोलोकात तुझे उपकारस्मरण कोण करणार? मी कण्हून कण्हून थकलो आहे, रोज रात्री मी आपले अंथरूण आसवांत पोहवतो; मी आपला पलंग अश्रूंनी विरघळवतो. शोकाने माझी दृष्टी मंद झाली आहे; माझ्या सर्व शत्रूंमुळे माझे नेत्र क्षीण झाले आहेत. अहो दुष्कर्म्यांनो, तुम्ही सर्व माझ्यापुढून निघून जा, कारण परमेश्वराने माझे रडणे ऐकले आहे. स्तोत्रसंहिता 6:3-8

ख्रिस्ताचे दुःख लपून राहू शकले नाही. जर पुरुषांनी ख्रिस्ताचा वधस्तंभ स्वीकारण्यास नकार दिला तर निर्जीव खडक त्यांच्या निर्मात्याच्या दुःखाची साक्ष देण्यासाठी ओरडतील. ख्रिस्त हा या जगाचा निर्माता आहे म्हणून भौतिक जग त्याच्या दुःखाला प्रतिसाद देते.

> कारण आपल्याला ठाऊक आहे की सबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगत आहे. रोमकरांस 8:22

अनेक स्तोत्रवचने ख्रिस्ताचा अनुभव या साध्या कारणासाठी प्रकट करतात की ज्यांनी स्तोत्रांसह सर्व पवित्र शास्त्रे लिहिली त्यांच्या हृदयात ख्रिस्ताचा आत्मा होता.

> ज्या संदेष्ट्यांनी तुमच्यावर होणाऱ्या कृपेविषयी पूर्वी सांगितले, त्यांनी त्या तारणाविषयी बारकाईने शोध केला; त्यांच्यामध्ये जो ख्रिस्ताचा आत्मा होता त्याने ख्रिस्ताची दुःखे व त्यानंतरच्या गौरवयुक्त गोष्टी पूर्वीच सांगितल्या; त्यांत त्याने कोणता अथवा कसा काळ सुचवला ह्याविषयी ते शोध करत होते. 1 पेत्र 1:10-11

स्तोत्र 18 मध्ये आपल्यासाठी महापुराच्या संदर्भात वधस्तंभावरील ख्रिस्ताचे दुःख प्रकट केले आहे.

> मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले. स्तोत्रसंहिता 18:4-5

स्तोत्रसंहिता 18 मधील काही वर्णने जलप्रलयाच्या भाषेत बोलतात तर इतर सदोम आणि गमोराहच्या घटना आणि दुष्टांचा शेवटचा अंत सूचित करणारी भस्म करणाऱ्या अग्नीविषयी बोलतात. जसे ख्रिस्ताने दुष्टतेपासून दूर जाण्यासाठी माणसांसोबत प्रयत्न केल्यामुळे तो त्यांच्या अधार्मिक वर्तनाच्या पुरामुळे भारावून गेला:

> म्हणून मानव पृथ्वीवर उत्पन्न केल्याचा परमेश्वराला अनुताप झाला आणि त्याच्या चित्ताला खेद झाला. उत्पत्ती 6:6

महापुरा अगोदरचे लोक ख्रिस्ताला लाजिरवाणे बनवत होते. त्याच्या आत्म्याला त्यांच्या दुष्टतेने छळले आणि दुःखवले जात होते आणि शेवटी तो या महापुरा अगोदर वधस्तंभावर ओरडला - मला तहान लागली आहे! देवाच्या आत्म्याने मनुष्याची विनवणी करणे बंद केले. शेकडो वर्षे नकार मिळाल्यानंतर, पित्याने त्यांचा निर्णय स्वीकारला.

> ज्या मार्गाने दुर्जन गेले त्याच प्राचीन मार्गाने तू जाणार काय? ते अकाली उच्छेद पावले, त्यांच्या पायाखालच्या भूमीचे विरघळून पाणी झाले; ते देवाला म्हणाले, 'तू आमच्यापासून दूर हो; सर्वसमर्थ आमचे1 काय करणार?' तरी त्याने त्यांची घरे उत्तम पदार्थांनी भरली होती; दुष्टांची मसलत माझ्यापासून दूर असो. ईयोब 22:15-18

पित्याला माणसांनी नाकारले. तरीही ख्रिस्ताने माणसांसोबत राहून त्यांच्यासोबत घेतलेल्या निर्णयांमध्ये दुःख सहन केले पाहिजे अन्यथा ते ताबडतोब मरण पावले असते आणि त्यासाठी देवाला दोष दिला गेला असता. म्हणून जेव्हा गडगडाटी आणि विजांचा लखलखाट महापूर अगोदरच्या लोकांवर होऊ लागला तेव्हा ख्रिस्त त्यांच्याबरोबर होता. त्याने त्यांच्याबरोबर दुःख सहन केले आणि त्यांना शेवटपर्यंत नेले. तो इमॅन्युएल आहे - देव आपल्याबरोबर आहे. महापूर हे वधस्तंभाचे प्रकटीकरण आहे तरीही आपण त्याला देवाद्वारे मारलेला आणि पीडित असे मानतो.

निर्जीव निसर्गाला महापुराच्या घटनांद्वारे सुवार्ता सांगण्यापासून रोखता आले नाही. या वचनांमधील महापूर आणि वधस्तंभाची कथा यांच्यातील संबंध लक्षात घ्या:

### 1. बोलावणे/रडणे.

> मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले. मी आपल्या संकटात परमेश्वराचा धावा केला, माझ्या देवाला मी हाक मारली; त्याने आपल्या मंदिरातून माझी वाणी ऐकली, माझी हाक त्याच्या कानी गेली. स्तोत्रसंहिता 18:4-6

> आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, "एली, एली, लमा सबख्थनी," म्हणजे "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" मत्तय 27:46

### 2. पृथ्वी हादरते.

तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली, पर्वताचे पाये डळमळले, त्यांना झोके बसले, कारण तो संतप्त झाला होता. स्तोत्रसंहिता 18:7

तेव्हा पाहा, पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला, भूमी कापली, खडक फुटले; मत्तय 27:51

## 3. अंधकार.

आकाश लववून तो खाली उतरला; त्याच्या पायांखाली निबिड अंधकार होता. स्तोत्रसंहिता 18:9

त्याने आपणाला काळोखाने आच्छादून घेतले, त्याने आपणाला आकाशातील मेघमय अंधाराचा, दाट ढगांचा मंडप केला. स्तोत्रसंहिता 18:11

मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला. मत्तय 27:45

## 4. जलमार्ग आणि पाया उघड झाला.

तेव्हा हे परमेश्वरा, तुझ्या धमकीने, तुझ्या नाकपुड्यांतील श्वासाच्या सोसाट्याने जलाशयाचे तळ दिसू लागले, पृथ्वीचे पाये उघडे पडले. स्तोत्रसंहिता 18:15

नोहाच्या वयाच्या सहाशेव्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या सतराव्या दिवशी महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि आकाशाची दारे उघडली. उत्पत्ती 7:11

## 5. चेहरा लपवला गेला आणि सोडून दिल्याची भावना आली.

केवळ क्षणभर मी तुला सोडले, तरी मोठ्या करुणेने मी तुला जवळ करीन. रागाच्या आवेशात मी आपले तोंड तुझ्यापासून क्षणभर लपवले; पण मी तुझ्यावर दया करीन, तुझ्यावर मी सर्वकाळ प्रसन्न राहीन असे तुझा उद्धारकर्ता परमेश्वर म्हणतो. नोहाच्या जलप्रलयाप्रमाणे हे मी लेखतो; नोहाचा जलप्रलय भूमीवर पुनरपि येणार नाही अशी मी शपथ वाहिली होती त्याप्रमाणे तुझ्यावर कोप करणार नाही, तुला दटावणार नाही अशी शपथ मी वाहिली आहे. यशया 54:7-9

मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला. आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, “एली, एली, लमा सबख्थनी,” म्हणजे “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?” मत्तय 27:45-46

## 6. तारण.

> त्याने वरून हात लांब करून मला धरले, आणि मोठ्या जलाशयातून मला बाहेर काढले. स्तोत्रसंहिता18:16

> मग देवाने नोहा व तारवात त्याच्याबरोबर असलेले वनपशू आणि ग्रामपशू ह्या सर्वांची आठवण केली; देवाने पृथ्वीवर वारा वाहवला तेव्हा पाणी ओसरू लागले; जलाशयाचे झरे व आकाशाची दारे बंद झाली, आणि आकाशातून पावसाची झोड थांबली, पृथ्वीवरचे पाणी एकसारखे हटत गेले; दीडशे दिवस संपल्यावर पाणी ओसरत गेले. उत्पत्ती 8:1-3

निसर्गाने त्याच्या निर्मात्याला काय घडले याची साक्ष दिली. ख्रिस्त हा प्रकाश आहे जो जगात येणा-या प्रत्येक माणसाला प्रकाश देतो, त्याचे दुःख जलप्रलयामध्ये मृत्युमुखी पडलेल्या सर्वांच्या जीवनात प्रकट झाले.

> परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले. तो समुद्राची जले राशीसारखी एकवट करतो; महासागराचे निधी साठवतो. स्तोत्रसंहिता 33:6-7

ख्रिस्ताच्या सामर्थ्यानेच स्वर्ग निर्माण झाला. त्याचा आवाज सर्व सृष्टीसोबत बोलतो. ख्रिस्ताच्या वचनाद्वारे पाणी एकत्र केले गेले आणि पृथ्वीवरील भांडारांमध्ये ठेवले गेले. जेव्हा महापुरा अगोदरच्या लोकांनी ख्रिस्ताला शेवटचे आणि पूर्णपणे नाकारले, तेव्हा त्याचा आवाज शांत झाला आणि नैसर्गिक घटकांना गोंधळणाऱ्या तत्त्वांच्या स्वाधीन केल्यामुळे त्यांच्या भांडारात पाणी ठेवणारी शक्ती मोकळी झाली व ताबा सोडला गेला.

सैतान पाणी सोडण्यास कारणीभूत नव्हता, तर ख्रिस्ताचा विरोध करण्यासाठी लोकांना भडकवून दिल्यामुळे ख्रिस्ताने दुःखाने त्यांचा निर्णय स्वीकारला; याचा परिणाम असा झाला की सृष्टीने यापुढे आपल्या मालकाचा कोमल आवाज ऐकला नाही जो त्यांना सतत हाक मारत होता - "शांती असा." मग पाण्याने सैतान आणि दुष्ट लोकांची अशांतता प्रतिबिंबित केली. ख्रिस्ताच्या वधस्तंभाची प्रचंडता जलप्रलयाच्या पाण्यात प्रकट झाल्यामुळे सैतानाला देखील स्वतः लढाऊ घटकांना सहन करायला लावले होते. पृथ्वीच्या खोलीतून येणारे पाणी हे ख्रिस्ताच्या तुटलेल्या हृदयाचे प्रकटीकरण होते. आकाशातून कोसळणारे पाणी हे त्याच्या अश्रूंची साक्ष होती (स्तोत्र 119:136 ) जे त्याने आदामाच्या मृत मुलांसाठी पाडले होते. महापुरा अगोदरच्या लोकांनी ख्रिस्ताचे दुःख मान्य करण्यास नकार दिला, परंतु निसर्गाने त्याच्या लेखकाच्या दुःखाची साक्ष दिली आणि त्याचे दुःख आणि मृत्यू प्रतिबिंबित केले. सैतानाने हा विनाश घडवून आणला होता आणि ख्रिस्त आणि त्याच्या आत्म्याला नाकारण्यासाठी महापुरा अगोदरच्या लोकांवर दबाव

आणला होता. जेव्हा तो नकार पूर्ण झाला, तेव्हा निसर्गाने त्या नकाराची साक्ष दिली आणि त्याच वेळी गोंधळाच्या भावनेची छाप प्रतिबिंबित झाली.

आपल्याला माहित आहे की ख्रिस्त आपल्याबरोबर असल्याशिवाय कोणीही जगू शकत नाही, म्हणून ख्रिस्ताला प्रलयामध्ये मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या भीतीला आणि दुःखाला सामोरे जावे लागले. त्यांच्या सर्व दुःखात तो दुःखी झाला. त्याने त्यांचे दुःख वाहून नेले आणि त्यांच्या संपूर्ण आयुष्यभर त्यांना सहन केले. त्याच्या प्रत्येक भटकलेल्या मुलांचा मृत्यू पाहत असताना त्याला खूप दुःख झाले. दहशतीतून बाहेर पडलेल्या प्रत्येक आत्म्यामध्ये, ख्रिस्ताला त्यांची वेदना जाणवली आणि त्यांना वाचवण्याची त्याची इच्छा होती पण तो तसे करू शकला नाही. ज्याप्रमाणे तो वधस्तंभावर असताना निराशेने मरण पावला होता, त्याचप्रमाणे जेव्हा ते मरण पावले तेव्हा त्यांची पूर्ण निराशा आणि हताशपणा त्याला जाणवला.

ख्रिस्ताच्या या वधस्तंभाला अस्पष्ट करण्यासाठी आज ख्रिस्ती लोक म्हणतात की देवाने त्याच्या क्रोधात दुष्टांना शिक्षा केली. त्या प्रलयाच्या हिंसाचाराचे सर्व पाप्यांना मारणारा म्हणून देवाला दोष दिला जातो. हे नक्कीच खरे आहे की देवाच्या सामर्थ्याचा उपयोग पृथ्वीचे तुकडे करण्यासाठी आणि पूर आणण्यासाठी केला गेला होता ज्याप्रमाणे देवाची शक्ती येशूला वधस्तंभावर खिळलेल्या रोमन सैनिकांमध्ये होती. देवाने आपल्या पुत्राला वधस्तंभावर खिळले काय? त्याच्या हिंसेने त्याला ठार मारले काय? नाही, हजार वेळा नाही! ख्रिस्ताच्या टाचेवर प्रहार करणाऱ्या सर्पाच्या हातात ती देवाची शक्ती होती.

70 एडी मधील यरुशलेमच्या नाशाचा विचार करा जेव्हा स्त्रियांनी स्वतःची मुले खाल्ली आणि अनेकांना वधस्तंभावर खिळले गेले तेव्हा आणखी वधस्तंभ उभारण्यासाठी जागा शिल्लक नव्हती. अशाच घटनांचे वर्णन विलापाच्या पुस्तकात केले आहे.

> क्षुधेने मारलेल्यांपेक्षा तलवारीने मारलेले पुरवले; कारण शेताचा उपज नसल्यामुळे ते व्याकूळ होऊन क्षय पावतात. कोमलहृदयी स्त्रियांच्या हातांनी आपली अर्भके शिजवली; ती माझ्या लोकांच्या कन्येच्या विनाशसमयी त्यांचे खाद्य झाली. परमेश्वराने आपला क्रोध पूर्ण प्रकट केला आहे; त्याने आपल्या संतप्त क्रोधाचा वर्षाव केला आहे त्याने सीयोनेत अग्नी पेटवला आहे, त्या अग्नीने तिचे पाये भस्म केले आहेत. विरोधी व शत्रू यरुशलेमेच्या वेशीत शिरतील, ह्या गोष्टीवर पृथ्वीवरचे राजे, जगातले सर्व रहिवासी ह्यांनी विश्वास ठेवला नाही. तिच्या संदेष्ट्यांच्या पातकांमुळे व तिच्या याजकांच्या दुष्कर्मांमुळे हे झाले; त्यांनी तिच्या वस्तीत नीतिमानांचा रक्तपात केला आहे. विलापगीत 4:9-13

वचन 11 मध्ये प्रभूच्या क्रोधाचा उल्लेख आहे आणि त्याच्या क्रोधाबद्दल बोलणे चालू आहे, ज्याचा अर्थ या पुस्तकाच्या 11 व्या अध्यायातून आपल्याला माहित आहे की क्रोध म्हणजे त्याच्या दुखाबद्दल बोलणे असू शकते. वचन 12 यरुशलेममध्ये प्रवेश करणाऱ्या शत्रूच्या वास्तविकतेच्या धक्क्याबद्दल सांगते. 13 वे वचन "तिच्या वस्तीत" मारल्याबद्दल बोलतो. मारला गेलेला फक्त कोण आहे?

> कारण आपल्याला देवाजवळ नेण्यासाठी ख्रिस्तानेही पापांबद्दल, म्हणजे नीतिमान पुरुषाने अनीतिमान लोकांकरता, एकदा मरण सोसले. तो देहरूपात जिवे मारला गेला आणि आत्म्यात2 जिवंत केला गेला; 1 पेत्र 3:18

यरुशलेम नगर शांततेचे शहर होते आणि ख्रिस्त तिचा आध्यात्मिक नेता होता. संपूर्ण आणि तीव्र दुःखामुळे पित्याने आपला चेहरा संदेष्टे आणि याजकांच्या पापांनी लपविला होता. यामुळे सैतानाला शहरात प्रवेश करण्याची परवानगी मिळाली आणि तिच्यामध्ये न्यायी ख्रिस्ताचा वध झाला. यिर्मया आणि दानिएलच्या दिवसांत जेव्हा देवाच्या लोकांना नेण्यात आले आणि त्यांचा नाश केला गेला तेव्हा त्याच पद्धतीने ख्रिस्ताचे रक्त सांडले गेले. देवाच्या लोकांच्या प्रत्येक नाशात हेच घडले; ख्रिस्त त्यांच्याबरोबर दुःख सहन करतो आणि वधस्तंभ वाहून नेतो.

वधस्तंभाच्या दुर्बिणीतून आपण महाप्रलय पाहू शकतो काय? सदोमामध्ये ख्रिस्ताचे दुःखसहन आपण पाहू शकतो काय? मिसर देशामध्ये जन्मलेल्या प्रथम जन्मलेल्या लोकांच्या मृत्यूमुळे आणि यरुशलेमच्या नाशामुळे आपण ख्रिस्ताला दुःखात पाहू शकतो काय? प्रत्येक व्यक्तीच्या हिंसक विनाशात आपण कालवारी डोंगर पाहू शकतो काय? केवळ ख्रिस्ताच्या वधस्तंभामुळे आपण पवित्र शास्त्रामधील निर्णय देवाच्या अद्भुत प्रेमाचे प्रकटीकरण म्हणून पाहू शकतो. जेव्हा आपण ख्रिस्ताविषयी सैतानाच्या द्वेषाचे प्रकटीकरण म्हणून पुरुष आणि निसर्गाद्वारे प्रकट झालेल्या हिंसेचा स्रोत समजू, तेव्हा आपण खांबावरील सर्पाच्या रहस्यमय चिन्हाची प्रशंसा करू शकतो. वधस्तंभाच्या संदर्भात सर्प ओळखला जातो, तेव्हा देवाच्या चारित्र्यासंदर्भात सर्पाचा डंख खऱ्या अर्थाने बरा होऊ शकतो.

## 20. वधस्तंभामुळे प्रकट झालेला सर्प

सैतान दुःख, रोग आणि मृत्यूचा लेखक आहे. आम्ही हे सत्य जाणले आहे की ख्रिस्त प्रत्येक माणसाला जीवन देतो आणि तो ह्या पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जवळ आहे. हिंसेची प्रत्येक कृती जी पुरुष स्वत: किंवा इतरांप्रती प्रकट करतात, त्यामुळे ख्रिस्ताला भयंकर त्रास होतो. देव हा आक्रमक आहे हे मानवतेला पटवून देऊन सैतानाने ख्रिस्ताविरुद्ध आपली हिंसा कुशलतेने लपवून ठेवली आहे आणि त्याने पवित्र शास्त्रामधील न्यायाच्या सर्व वर्णनांचे श्रेय देवावर लोटले आहेत.

निकोदेमसच्या मुलाखतीदरम्यान, येशूने सांगितलेल्या सर्वात गहन सत्यांपैकी त्याला एक समजावून सांगितले. हे वधस्तंभाचे प्रकटीकरण आहे जे चित्तथरारक आहे आणि तरीही ते जवळजवळ सर्वांपासून लपलेले सत्य आहे.

> जसा मोशेने अरण्यात सर्प उंच केला होता तसे मनुष्याच्या पुत्रालाही उंच केले पाहिजे; योहान 3:14

येशू ज्या कथेचा उल्लेख करत होता ती कथा गणना 21 मध्ये आढळते. इस्राएली लोक देव आणि मोशेविरुद्ध कुरकुर करत होते आणि तक्रार करत होते. तक्रारीच्या भावनेमुळे संरक्षणाच्या कुंपणामध्ये खंड पडला.

> जो खड्डा खणतो तोच त्यात पडतो; जो कुंपण तोडतो त्याला सर्प डसतो. उपदेशक 10:8

कुंपण तुटल्यामुळे देवाने वाळवंटातील ज्या धोक्यांपासून त्यांचे संरक्षण केले होते ते प्रकट होऊ लागले. लवकरच विषारी सापांनी लोकांना चावायला सुरुवात केली आणि अग्नीसर्पाच्या विषारी व प्राणघातक प्रभावामुळे, त्यांनी मोशेला मदतीसाठी हाक मारली.

> ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की, “तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले? येथे तर अन्न नाही व पाणीही नाही, आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत.” तेव्हा परमेश्वराने लोकांमध्ये आग्ये साप पाठवले; त्यांच्या दंशाने इस्राएलातील बरेच लोक मेले. हे पाहून लोक मोशेकडे येऊन म्हणाले, “परमेश्वराविरुद्ध व तुझ्याविरुद्ध बोलण्याचे पाप आम्ही केले आहे; तेव्हा हे साप आमच्यामधून काढून टाकण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना कर.” तेव्हा मोशेने लोकांसाठी प्रार्थना केली. परमेश्वर मोशेला म्हणाला, “आग्या सापाची एक प्रतिमा करून झेंड्याच्या खांबावर टांग म्हणजे सर्पदंश झालेल्या कोणा माणसाने त्याच्याकडे पाहिले तर तो जगेल.” मग मोशेने पितळेचा एक साप बनवून टांगला, तेव्हा सर्पदंश झालेल्या कोणी त्या पितळेच्या सापाकडे पाहिले म्हणजे तो जगे. गणना 21:5-9

जेव्हा आपण ही कथा वाचता तेव्हा कृपया दैवी आरसा लक्षात ठेवा जेव्हा वचन असे म्हणते:

> 6तेव्हा परमेश्वराने लोकांमध्ये आग्ये साप पाठवले; त्यांच्या दंशाने इस्राएलातील बरेच लोक मेले. गणना 21:6

पाठवले ह्या शब्दाचा हिब्रू अर्थ मोकळे करणे किंवा सोडून देणे किंवा देऊन टाकणे असा देखील होतो. जेव्हा लोकांनी देवावर आरोप केले तेव्हा त्यांना सापांपासून वाचवण्यासाठी देवाला मागे ढकलण्यात आले. या सर्व वेळेस त्याने त्यांचे रक्षण केले होते परंतु लोक देवाच्या विरोधात गेले म्हणून त्याला त्यांचे रक्षण करण्यापासून रोखले गेले. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की ते सर्प कसे आले.

> त्यांच्यापैकी कित्येकांनी प्रभूची परीक्षा पाहिली आणि ते सापांच्या योगे नाश पावले; तेव्हा आपण प्रभूची परीक्षा पाहू नये. त्यांच्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, तेव्हा तुम्ही कुरकुर करू नका. 1 करिंथ 10:9-10

हिब्रू शब्द संहारकर्ता या शब्दाचा अर्थ 10 वचनांमधील नाश करणारा किंवा विषारी सर्प असा आहे. पौल 9 व्या वचनामधील सर्प हा शब्द 10 व्या वचनातील विनाशक या शब्दाशी जोडत आहे. म्हणजे सैतान हा नाश करणारा आहे.

> अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे; इब्री भाषेतील त्यांचे नाव अबद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतील त्याचे नाव अपल्लूओन आहे. प्रकटी 9:11

जेव्हा लोकांनी त्यांच्या बंडखोरीद्वारे संरक्षणाच्या कुंपणामध्ये भंग केला, तेव्हा सैतान आत येण्यास सक्षम झाला आणि त्याने ताबडतोब लोकांना मारण्यास सुरुवात केली. पवित्र शास्त्राच्या भाषांतरकारांनी सापांच्या सुटकेचे वर्णन करण्यासाठी पाठवले हा शब्द वापरला होता हे सत्य जेव्हा लोक वाचतात तेव्हा त्यांना परिपूर्ण दैवी आरसा प्रदान केला जातो. देवाने लोकांना मारण्यासाठी सर्प पाठवण्याची कल्पना लोक त्याच्याबद्दल काय विचार करतात याचे प्रतिबिंब आहे. ज्यांनी येशूच्या जीवनाकडे पित्याचे चित्र म्हणून पाहिले आहे ते ह्या धक्कादायक परिस्थितीचे स्पष्टीकरण देण्यासाठी लगेच उत्तर शोधतील. लोकांना त्यांच्या तक्रारींबद्दल मारण्यासाठी देव भयंकर सर्प पाठवेल काय? हे येशूच्या चरित्रापेक्षा खूप वेगळे आहे. पवित्र शास्त्रामधील माझ्या शोधाने मला 1 करिंथ 10:9,10 पर्यंत नेले जे या कथेबद्दल बोलते आणि ते विनाशकाद्वारे मारले गेल्याचे संकेत देते. प्रकटीकरण 9:11 आपल्याला सांगते की विनाशक अथांग खड्ड्यातील देवदूत आहे. मग आमच्या लक्षात येते की पाठवले ह्या शब्दाचे अनेक अर्थ असू शकतात आणि म्हणून जेव्हा आम्ही तपासणी करण्यास इच्छुक असतो तेव्हा वचनाचा योग्य सुसंवाद साधला जातो.

कथेतील सर्वात गोंधळात टाकणारा प्रश्न हा आहे की देव मोशेला अग्निमय सर्प बनवून खांबावर ठेवण्यास का सांगेल आणि लोकांना बरे होण्यासाठी ते पाहण्यास का सांगेल? हे खूप विचित्र वाटते. पवित्र शास्त्रामधील सर्प हे सैतानाचे प्रतीक आहे.

> मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल1 व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट ‘साप’ खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. प्रकटी 12:9

> तरी जसे ‘सापाने कपट करून’ हव्वेला ‘ठकवले’ तसे तुमची मने कशाने तरी बिघडून ती ख्रिस्ताविषयीचे सरळपण व शुद्धता ह्यांपासून भ्रष्ट होतील असे मला भय आहे. 2 करिंथ 11:3

खांबावर उंचवलेल्या सापाकडे पाहिल्याने दंश झालेल्या व्यक्तीला बरे होणे कसे शक्य आहे? देव त्यांना कोणता संदेश शिकवू इच्छित होता? हे आपल्याला पुन्हा त्या संभाषणाकडे घेऊन येते जेव्हा येशू निकदेमसशी बोलत होता. ख्रिस्ताने स्वतःची तुलना सर्पाशी केली काय?

> जसा मोशेने अरण्यात सर्प उंच केला होता तसे मनुष्याच्या पुत्रालाही उंच केले पाहिजे; योहान 3:14

येशूने सर्पाला उंचवण्याची तुलना स्वतःला वधस्तंभावर उंचावण्याशी केली आहे. बहुतेक ख्रिस्ती लोक त्यांच्यासाठी वधस्तंभावर मरण पावलेल्या येशूकडे पाहून बरे होण्याची प्रक्रिया समजतात.

जेव्हा पापाच्या शापाखाली असलेला पापी व्यक्ती ख्रिस्ताकडे पाहतो आणि त्याला दिसते की ख्रिस्ताने त्याच्यासाठी स्वतःवर शाप घेतला आहे, तेव्हा हि गोष्ट कृतज्ञतेची खोल भावना निर्माण करते ज्यामुळे आपले हृदय आणि चारित्र्य बदलते. सर्पाच्या दंशामुळे आपल्यावर जे रोग आणि मृत्यू आले अश्या सैतानाच्या मोहांपासून व पापाच्या श्रापापासून आपण बरे होतो.

खांबावर उंचावलेला सर्प बरे होण्याचे प्रतीक म्हणून का वापरला जातो? कोकऱ्याची प्रतिमा बनवून खांबावर उभी करण्यात अधिक बरोबर वाटत नाही काय? ख्रिस्ताला सैतानाच्या चिन्हाने कसे ओळखता येईल?

> ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या-आमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे. 2 करिंथ 5:21

येशूच्या वधस्तंभावर खिळल्याने सैतानाचे संपूर्ण चरित्र प्रकट झाले. ख्रिस्ताचा वधस्तंभ पश्चात्ताप न करणाऱ्या पापी लोकांचे काय होईल आणि आत्म-विनाशाचे अंतिम परिणाम हे दोन्ही प्रकट करतो, व त्याच वेळी हिंसक खुनी म्हणून सैतानाचे खरे चरित्र उघड करतो. सैतानाने आपल्या दुष्ट आत्म्याचे प्रदर्शन करण्यासाठी ख्रिस्ताचा छळ करणाऱ्या व ठार मारणाऱ्या लोकांवर आपले नियंत्रण वापरले, जे ख्रिस्ताच्या सामर्थ्याने सक्षम होते. देवाने आपल्या पुत्राला अशा हिंसक यातना आणि मृत्यूच्या स्वाधीन करण्याची परवानगी देणे हे मानवी विचारक्षमतेच्या पलीकडे असलेले अगापे प्रेम प्रकट करते. वधस्तंभ सैतानाचे खरे चारित्र्य आणि पापाचा दुःखद परिणाम प्रकाशात आणतो.

वधस्तंभावर येशू मोठ्याने ओरडला "माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" पापी माणसाची हीच अवस्था असते जेव्हा त्याला त्याच्या पापाचे वजन जाणवते. मनाच्या ह्या दुःखात असताना, पापी स्वतःला त्यांच्या पापाबद्दल गंभीरपणे दोषी समजतो, आणि त्यांच्या आत्म्यात न्यायाची एक भयंकर भावना त्याला जाणवते. पाप्याला असे वाटते की देव त्यांच्यावर अग्नी फुंकत आहे, तरीही ही परिस्थिती निर्माण करणाऱ्या शुद्ध निःस्वार्थ प्रेमाच्या सान्निध्यात आत्म-निंदा आणि अपराधीपणा बाहेर येतो.

ही वधस्तंभाची जटिलता आहे. हे सैतानाचे हिंसक चरित्र आणि पापी जीवनाचा नैसर्गिक परिणाम प्रकट करते परंतु असे वाटते की जणू देव, भयंकर क्रोधाने, पापी माणसाला यातना देत आहे. देवाचा प्रेमळ चेहरा अपराधीपणाच्या अंधारात लपलेला आहे आणि जे काही जाणवते ते पापाच्या जबरदस्त लज्जेची भयंकर भयानकता जाणवते. काइनच्या जीवनात आपल्याला वधस्तंभाचे दोन स्वरूप दिसते. वायक्लिफ भाषांतरातील दोन पैलू व्यक्त करतो.

> तेव्हा काइन परमेश्वराला म्हणाला, “हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे. पाहा, ह्या जमिनीवरून तू मला आज हाकून दिले आहे; मी तुझ्या दृष्टीपुढून लपलेला असेन, मी पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होणार; उत्पत्ती 4:13-14 (वायक्लिफचे भाषांतर).

काइनला स्वतःचीच निंदा वाटते जी त्याच्या पापाचा नैसर्गिक परिणाम आहे. त्याला असे वाटते की त्याचे पाप इतके मोठे आहे की त्याची क्षमा होऊ शकत नाही. तरीही एकाच वेळी, या परिणामांसाठी ही जबाबदारी परत देवाकडे हलवण्याचा एक अर्थ आहे. या न्यायाच्या दोन बाजू आहेत आणि म्हणून वधस्तंभाचे दोन पैलू आहेत.

1. क्षमेची आशा न ठेवता अपराधीपणा आणि आत्म-निंदा.
2. देवावर दोष प्रक्षेपित करणे आणि त्याला न्यायासाठी आक्रमक बनवणे.

हे अश्या संदर्भात आहे की जेव्हा आपण पवित्र शास्त्रामध्ये हिंसाचाराची कृत्ये पाहतो, तेव्हा ते खरोखर सैतानाचे चरित्र प्रकट करत आहे परंतु अशी भावना आहे कि देव पाप्यांवर तीव्र क्रोध ओतत आहे. पापी लोकांच्या दृष्टीकोनातून, न्यायनिवाडा नेहमी देव अत्याचारी असल्यासारखे भासतो.

> पर्वताच्या माथ्यावर परमेश्वराचे तेज भस्म करणाऱ्या अग्नीसारखे इस्राएल लोकांना दिसत होते. निर्गम 24:17

मागील अध्यायात दर्शविल्याप्रमाणे, सैतानाची हिंसा व्यक्त करण्यासाठी, ख्रिस्ताने स्वतःला नाकारले पाहिजे आणि त्याच्या मुलांचे दुःख पाहताना तो दुःखाचा वधस्तंभ वाहिला पाहिजे. हे दुःखसहन सैतानाचे चरित्र प्रकट करते. समस्या अशी आहे की मानवांना असे वाटते की देवच त्यांचा नाश करत आहे कारण त्यांचा दोषी विवेक त्यांना दोषी ठरवतो की ते मरणास पात्र आहेत.

> जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत, हा देवाचा निर्णय त्यांना ठाऊक असूनही ते स्वतः त्याच गोष्टी करत असतात; इतकेच केवळ नव्हे तर त्या करणाऱ्यांना संमतीही देतात. रोमकरांस पत्र 1:32

तरीही जेव्हा आपण ख्रिस्ताला योग्य वधस्तंभाच्या संदर्भात उंचावलेले पाहतो, तेव्हा आपण सर्प प्रगट झालेला पाहतो आणि लक्षात येते की तो नाश करणारा देव नाही तर सैतान आहे. हे मानवी हृदयाला बरे करते कारण पित्याला नाकारल्यामुळे आपण दोषी होतो. ह्या चिन्हाचा खूप गहन अर्थ आहे आणि खरोखर ते जाणून घेण्यासाठी वेळ लागतो, परंतु सत्य हेच आहे की जेव्हा आपण पवित्र शास्त्राच्या हिंसक निर्णयांमध्ये सर्प पाहता तेव्हा आपण देवाच्या प्रतिकारातून बरे होऊ शकतो. आपण खरोखर त्याच्याशी समेट करू शकतो आणि आपली भीती घालवू शकतो.

> प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते;

भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही. 1 योहान 4:18

ही तत्त्वे लक्षात घेऊन आम्ही आता दहा पीडांच्या वेळी सर्प बनलेल्या काठीचा वापर ह्याबद्दल विचार करण्यास तयार आहोत.

तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, "तुझ्या हातात ते काय आहे?" तो म्हणाला, "काठी आहे." त्याने म्हटले, "ती जमिनीवर टाक." ती त्याने टाकताच तिचा साप झाला; त्याला पाहून मोशे पळाला, 4परमेश्वराने मोशेला सांगितले, "आपला हात पुढे करून त्याचे शेपूट धर - त्याने हात पुढे करून ते धरले, तेव्हा त्या सापाची त्याच्या हातात काठी झाली; "ह्यावरून ते विश्वास धरतील की त्यांच्या पूर्वजांचा देव, अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव व याकोबाचा देव परमेश्वर ह्याचे तुला दर्शन झाले आहे." निर्गम 4:2-5

आकडी किंवा काठी शक्तीचे प्रतीक आहे. राजाच्या भाषेत याला राजदंड म्हणतात. देवाचा पुत्र ख्रिस्त ह्याकडे राजदंड आहे.

पुत्राविषयी तर तो असे म्हणतो, "हे देवा, तुझे राजासन युगानुयुगाचे आहे; आणि तुझा राजदंड सरळतेचा राजदंड आहे. इब्री 1:8

ख्रिस्ताला हे राजदंड असेही संबोधले जाते.

मी त्याला पाहीन, पण तो आता दिसत नाही; त्याला न्याहाळीन, पण तो जवळ नाही; याकोबातून एक तारा उदय पावेल, आणि इस्राएलातून एक राजदंड निघेल, तो मवाबाचा कपाळमोक्ष करील, सर्व बंडखोरांना चीत करील. गणना 24:17

ख्रिस्त हा देवाचे सामर्थ्य आहे (1 करिंथ 1:24) आणि देवाच्या उजवीकडे आहे (इब्री 1:3). त्याला देवाचा उजवा हात किंवा ज्याला आपण "त्याचा उजवा हात" असे संबोधतो.

हे परमेश्वरा, तुझा उजवा हात बळाने प्रतापी झाला आहे; हे परमेश्वरा, तुझा उजवा हात शत्रूला चिरडून टाकतो. निर्गम 15:6

देव मोशेला सांगतो की तो देवाचे प्रतिनिधित्व करेल आणि अहरोन त्याचा प्रवक्ता असेल. निर्गम 4:16. जेव्हा मोशेने काठी सोडली आणि ती जमिनीवर पडली, तेव्हा ख्रिस्तामध्ये असलेली शक्ती सर्पासारखी झाली. ख्रिस्त हा देवाचे सामर्थ आहे. जेव्हा देव सैतानाला म्हणाला, "पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो" (ईयोब 1:12) त्यावेळी देव आपली काठी जमिनीवर टाकत होता. काठी हा ख्रिस्त आहे ज्याची सृष्टीवरील शक्ती सैतानाच्या उद्देशासाठी सैतानाद्वारे वापरली जाते, आणि सैतानानेच रोमन सैनिकांना ख्रिस्ताला कालवारीच्या टेकडीवर वधस्तंभ घेऊन

जाण्यास भाग पाडले.

रोमन सैनिकांची मने सैतानाने नियंत्रित केली होती, तरीही ते ज्या श्वासाने जगले ते जीवन जगामध्ये येणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रकाश देते. मनुष्याच्या आत्म्यात ख्रिस्ताच्या शक्तीचा वापर सैतानाने त्याला वधस्तंभावर खिळण्यासाठी केला. क्षणभर थांबून आपण ह्याबद्दल विचार करुया. हातोड्याने उंच धरलेल्या आणि तारणकर्त्याच्या त्या मौल्यवान हातांमध्ये एक अणकुचीदार खिळा ठोकत असलेल्या रोमन सैनिकाचे हे चित्र मिसर देशातील पीडा आणि पृथ्वीवर प्रकट झालेल्या विनाशाची सर्व शक्ती आहे. हि जमिनीवर पडलेली काठी आहे:

> मग तो काहीसा पुढे जाऊन भूमीवर पडला व त्याने अशी प्रार्थना केली की, 'शक्य असेल तर ही घटका माझ्यावरून टळून जावो.' मार्क 14:35

जेथे पुरुष विध्वंसक शक्तीच्या अधीन येतात, तेथे काठी जमिनीवर पडून साप बनते.

> त्यांनी त्याला त्याच्याकडे आणले, तेव्हा त्या आत्म्याने येशूला पाहताच मुलाला पिळून टाकले आणि तो जमिनीवर पडून तोंडाला फेस आणून लोळू लागला. मार्क 9:20

म्हणून आपण पाहू शकतो की आपण जिथे जिथे पुरुषांचे दुःख पाहतो तिथे:

> त्यांच्या सर्व दु:खाने तो दु:खी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया 63:9

सत्य हे आहे की जर देव त्याचे सामर्थ वापरण्यास सक्षम होता तर तो सैतानाचे अनुसरण करणाऱ्या लोकांचे जीवन संपवू शकतो जेणेकरून ख्रिस्तामध्ये असलेल्या देवाच्या सामर्थ्याचा सैतान विनाशकारी गोष्टी करण्यासाठी वापर करू नये. तरीही प्रत्येक माणसाला निवडडीचे स्वातंत्र्य देण्यासाठी, ख्रिस्ताने मनुष्य जेव्हा देव आणि त्याच्या आज्ञांविरुद्ध बंड करण्याचे ठरवतो तेव्हा सैतानाला त्याची शक्ती वापरण्याची परवानगी दिली पाहिजे. सैतान ही शक्ती कशी वापरतो? देवाच्या नियंत्रणाखाली नसलेले सर्व लोक सैतानाच्या नियंत्रणाखाली आहेत. त्याच्या नियंत्रणाखाली असताना तो माणसांना एकमेकांचा नाश करण्यास प्रवृत्त करतो. जेव्हा मनुष्यांची मने सैतानाच्या नियंत्रणाखाली येतात तेव्हा त्यांना ख्रिस्ताने दिलेली जीवनाची शक्ती सैतानाच्या उद्देशांसाठी वापरली जाते. म्हणून देवाची शक्ती जेव्हा त्याच्या हातातून काढून टाकली जाते तेव्हा त्याचे सर्पात रूपांतर होते.

जेव्हा आपण इतिहासातील महान युद्धांबद्दल वाचतो, जेथे लाखो माणसे अत्यंत हिंसक रीतीने मरण पावली आहेत, तेव्हा ख्रिस्ताने मानवांना दिलेली जीवनाची शक्ती सैतान त्याच्या विनाशाचे कार्य करण्यासाठी वापरतो. या सर्व विध्वंसात देव

सर्पाची हिंसक तत्त्वे प्रकट करण्यासाठी त्याच्या पुत्रावर आपले प्रेम दाखवतो. ज्यावेळी येशू रोमच्या दिवसांत मनुष्यांना श्वास पुरवत होता त्यावेळी आपण ख्रिस्ताची अवस्था समजू शकतो का? येशूने दिलेल्या श्वासाने भरलेल्या तरुणांच्या फौजा एकमेकांशी लढायला तयार आहेत. ख्रिस्ताच्या जीवनाने भरलेल्या दोन सैन्यांना सैतानाने तलवारी, भाले, सुऱ्या आणि बाणांनी एकमेकांशी भिडण्यासाठी चालविले आहे. प्रत्येक तरुण आपला शेवटचा श्वास घेत असताना, व ते त्यांच्या अंतःकरणातील रक्ताच्या लालसेने मरत असताना ख्रिस्ताला खूप दुःख होत असेल. जेव्हा माणसे स्वतःला देवाच्या हातातून काढून घेण्याचे निवडतात तेव्हा ख्रिस्ताचे सामर्थ्य सर्पात बदलते. परंतु सैतानाचे हिंसक राज्य प्रगट होण्यासाठी, ख्रिस्ताने स्वतःला नाकारले पाहिजे आणि अशा दुष्ट आणि क्रूर गोष्टींसाठी त्याचा जीवन श्वास वापरला जात असल्याचे पाहून स्वतःला दुःखाने छेदून जाण्याची परवानगी दिली पाहिजे हे महत्वाचे होते. हिंसाचाराच्या प्रत्येक कृतीत ख्रिस्ताला जखम दिली जाते कारण त्याने स्वतःला नाकारले पाहिजे, वधस्तंभ उचलला पाहिजे आणि पुरुषांना स्वतःसाठी हवे असलेले भाग्य निवडण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

या मुद्द्याचे काळजीपूर्वक निरीक्षण करा, खांबावरील सर्पाची शुद्ध करण्याची शक्ती पाहण्यासाठी हे समजून घेणे महत्वाचे आहे. सैतानाला त्याच्या सामर्थ्याचा वापर करण्याची परवानगी देऊन ख्रिस्ताचा आत्म-नकार सैतानाचे खरे चरित्र उघड करतो. जेव्हा ख्रिस्ताने त्याची शक्ती सैतानाला त्याचा खून करण्यासाठी वापरण्याची परवानगी दिली तेव्हा सर्पाची खरी हिंसा प्रकट झाली. खरा वधस्तंभ पुरुषांसाठी एक दरवाजा उघडतो हे बघण्यासाठी की सर्व हिंसाचाराचा स्त्रोत सैतानामध्ये सापडतो. देवाचे त्याच्या शत्रूंवर खरोखर प्रेम आहे हे पाहण्याची शक्यता माणसाला उघडते. ख्रिस्तामध्ये देव जगाचा स्वतःशी समेट करत होता आणि त्याचे प्रेमळ व निःस्वार्थ चरित्र दाखवत होता. तरीही सर्पाचा शेवटी नाश होण्यासाठी ख्रिस्ताची शक्ती काठीमध्ये बदलण्यास आवश्यक होती.

> परमेश्वराने मोशेला सांगितले, "आपला हात पुढे करून त्याचे शेपूट धर - त्याने हात पुढे करून ते धरले, तेव्हा त्या सापाची त्याच्या हातात काठी झाली; निर्गम 4:4

शेपूट काय दर्शवते?

> वडील व सन्मान्य पुरुष हा शीर अस‌त्य शिक्षण देणारा संदेष्टा हा शेपूट. यशया 9:15

सर्पाच्या शेपटीत खोटे आहे ज्याद्वारे त्याने देवाच्या चारित्र्याबद्दल संपूर्ण जगाला फसवले आहे. सैतानाने जगाला हे पटवून दिले आहे की देवाने त्याच्या पुत्राला हिंसक क्रोधाने मारले.

> खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले. यशया 53:4

सर्पाची शक्ती मोडून काढण्यासाठी सैतानाने देवाच्या चारित्र्याबद्दल जे खोटे सांगितले आहे ते उघड करणे आवश्यक आहे. जेव्हा येशूने "पूर्ण झाले" असे शब्द बोलले तेव्हा प्रश्न असा आहे की त्याने काय पूर्ण केले?

> जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. योहान 17:4

जेव्हा येशू म्हणाला की मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे तो म्हणत आहे की मी पृथ्वीवर तुझे खरे चरित्र प्रकट केले आहे. निर्गम 33:18; निर्गम 34:5-7. जेव्हा येशू म्हणाला, "पूर्ण झाले," तेव्हा त्याने सापाला शेपटीने पकडले: आणि, सैतान पित्याच्या चरित्राविषयी हिंसक म्हणून जे खोटे बोलत होता ते त्याने उघड केले आणि दाखवून दिले की तो सैतान आहे जो खरा विनाशक आणि खुनी आहे.

या सत्याच्या प्रकाशातच प्रेषितांच्या जीवनात इतक्या कमी कालावधीत सुवार्तेचा जगभरात प्रचार करण्याची शक्ती होती.

> जर तुम्ही विश्वासात स्थिरावलेले व अढळ राहता, आणि जी सुवार्ता तुम्ही ऐकली, आकाशाखालच्या सर्व सृष्टीत जिची घोषणा झाली व जिचा मी पौल सेवक झालो आहे, तिच्या आशेपासून तुम्ही ढळला नाहीत तर हे होईल. कलस्सै 1:23

आव्हान हे आहे की नैसर्गिक माणसाला वधस्तंभाचे दृश्य देव आपल्यावरचा राग पूर्ण करण्यासाठी त्याच्या पुत्राला शिक्षा करत असल्यासारखे दिसते. यामुळे सैतानाला अधिक खोटे सांगण्यासाठी आणि विशेषत: पापी माणसाच्या नजरेत वधस्तंभाची खरी शक्ती अस्पष्ट करण्यासाठी सोपे झाले आहे. यामुळे सर्पाला वधस्तंभातून खाली येण्याची आणि पुन्हा एकदा अंधारात लपण्याची व माणसांना भुलवण्याची परवानगी दिली आहे, ज्याद्वारे तो त्यांना खात्री देतो की देव हिंसक व शिक्षा करणारा आहे.

मिसरी लोकांना योसेफाद्वारे खऱ्या देवाबद्दल शिकण्याची भरपूर संधी होती. इजिप्त आणि त्यांच्या सभोवतालच्या सर्व देशांवर आलेल्या दुष्काळाची तयारी करण्यासाठी इजिप्शियन लोकांना आशीर्वाद देण्यासाठी देवाने योसेफला बुद्धी दिली होती.

> मग योसेफाने सांगितल्याप्रमाणे दुष्काळाची सात वर्षे सुरू झाली, तेव्हा देशोदेशी दुष्काळ पडला, तथापि मिसर देशात सर्वत्र अन्न होते. उत्पत्ती 41:54

स्वप्नात फारोला सात वर्षांच्या दुष्काळाचा इशारा देण्यात आला होता. देवाच्या दुरदर्शीपणाने योसेफला असे स्थान दिले जेथे तो येणाऱ्या दुष्काळाच्या संकटांसाठी लोकांना तयार करण्यास मदत करू शकला. उत्पत्ति 41:25-36. या सर्व देशांवर इतका भीषण दुष्काळ का पडत होता?

> तुम्ही आपल्यासाठी मूर्ती करू नयेत; त्याचप्रमाणे कोरीव मूर्ती अथवा स्तंभ उभारू नयेत अथवा आकृती कोरलेला पाषाण पुजण्यासाठी आपल्या देशात स्थापन करू नये, कारण मी परमेश्वर तुमचा देव आहे. तुम्ही माझे शब्बाथ पाळावेत आणि माझ्या पवित्रस्थानाविषयी पूज्यबुद्धी बाळगावी; मी परमेश्वर आहे. तुम्ही माझ्या विधींप्रमाणे चालाल आणि माझ्या आज्ञा पाळून त्याप्रमाणे वागाल, तर नेमलेल्या काळात तुमच्याकरता मी पाऊस पाडीन, जमीन आपला उपज देईल व मळ्यातील झाडे आपापली फळे देतील. लेवीय 26:1-4

आपल्याला 13 व्या अध्यायातून आठवते की देवाने मानवाला आशीर्वाद देण्यासाठी निसर्गात नियम तयार केले आहेत.

> मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील कार्यकारण संबंध म्हणजे मानवजातीचे विद्रोह जसजसे वाढत जाईल तसतसे वारा, अग्नि आणि पूर यांचे विद्रोह वाढेल. जसे लोक मोठ्या आवेशाने देवाच्या आज्ञा मोडतात तसे पृथ्वी निसर्गाचे नियम मोडेल आणि त्यांच्या स्वतःच्या बंडखोरीचे प्रतिबिंब माणसांना परत देईल. अगापे 13 वा अध्याय.

मिसरी लोक त्यांच्या सभोवतालच्या राष्ट्रांसह अनेक मूर्तींची पूजा करत होते. त्यांनी शब्बाथ पाळला नाही किंवा परमेश्वराच्या मंदिराचा आदर केला नाही. जेव्हा मोशे फारोकडे आला आणि त्याने परमेश्वराच्या वतीने विनंती केली तेव्हा फारोने गर्विष्ठपणे प्रश्न केला की परमेश्वर कोण आहे आणि तो म्हणाला, "मी त्याला ओळखत नाही." आता फारो योसेफबद्दल बेफिकीर नव्हता. योसेफाच्या द्वारे मिसर देशाला श्रीमंत बनवले गेले होते. तर हे देवला ओळखण्यास नकार होता.

> देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचा गौरव केला नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले; आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशू व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमांच्या रूपांशी त्यांनी अदलाबदल केली. रोमकरांस 1:21-23

ते नियम आणि न्याय पाळत नव्हते कारण निम्रोदच्या काळापासून अनेक विकसनशील राष्ट्रांनी स्वर्गातील देवाचा अवमान केला होता आणि बंड करण्याचा आणि त्यांच्या इच्छेनुसार वागण्याचा निर्णय घेतला होता. इजिप्त आणि कनान देश हामाचा देश म्हणून ओळखला जात असे.

> नंतर इस्राएल मिसर देशात आला; याकोब हामाच्या देशात उपरा म्हणून राहिला. स्तोत्रसंहिता 105:23

हामने त्याच्या वंशजांना त्याचा पिता नोहा याच्याशी केलेल्या दुष्कर्मामुळे भयंकर वारसा दिला.

> तेव्हा कनानाचा बाप हाम ह्याने आपल्या बापाची नग्नावस्था पाहून आपले दोघे भाऊ बाहेर होते त्यांना हे कळवले. तेव्हा शेम व याफेथ ह्यांनी वस्त्र घेऊन आपल्या खांद्यांवर ठेवले व पाठमोरे होऊन आपल्या बापाची नग्नता झाकली; त्यांची तोंडे पाठमोरी होती म्हणून त्यांना आपल्या बापाची नग्नता दिसली नाही. द्राक्षारसाच्या गुंगीतून सावध झाल्यावर आपल्या धाकट्या मुलाने काय केले ते नोहाला समजले. तो म्हणाला, “कनान शापित होईल, तो आपल्या बांधवांच्या दासांचा दास होईल.” उत्पत्ती 9:22-25

जेव्हा नोहाला जाग आली तेव्हा त्याच्या मुलाने त्याच्याशी काहीतरी केले आहे हे त्याला माहीत होते हे तथ्य असे सूचित करते की हामाने त्याच्या वडिलांकडे पाहण्यापेक्षा बरेच काही केले. इस्राएल इजिप्तमधून बाहेर आल्यावर त्याने त्यांना कनानी आणि मिसरी लोकांच्या प्रथा पाळू नका असे सांगितले.

> तुम्ही ज्या मिसर देशात राहत होता तेथील चालीरीतींना अनुसरून चालू नका; तसेच ज्या कनान देशात मी तुम्हांला घेऊन जात आहे, तेथील चालीरीतींना अनुसरून चालू नका व तेथील विधींप्रमाणे चालू नका. लेवीय 18:3

परमेश्वराने इस्राएल राष्ट्रांना कोणत्या गोष्टी न करण्याची आज्ञा दिली होती?

1. जवळच्या नातलगाशी लैंगिक संबंध. निर्गम 18:6-18

2. स्त्रीच्या मासिक पाळीच्या वेळी लैंगिक संबंध. लेवीय 18:19
3. व्यभिचार. लेवीय18:20
4. आपल्या मुलांना मूर्तीला अर्पण करणे. लेवीय 18:21
5. समलैंगिकता. लेवीय 18:22
6. एक व्यक्ती आणि प्राणी यांच्यातील लैंगिक संभोग. लेवीय 18:24

ही सर्व पापे हामाच्या मुलांचा वारसा आहेत. देवाच्या नियमांचे हे उल्लंघन निसर्गावर विपरीत परिणाम करते कारण ते निसर्गाच्या विरुद्ध आहे.

> ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की, त्यांच्या देहांची त्यांच्यात्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मित वस्तूंची भक्ती व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन. ह्या कारणांमुळे देवाने त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केले; त्यांच्यातल्या स्त्रियांनी शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केले. रोमकरांस 1:24-26

ही पापे, अशुद्ध अन्न खाणे व रक्त पिणे आणि लेवी च्या पुस्तकामध्ये आढळणारे बरेच काही, पृथ्वीला अशुद्ध करतात ज्यामुळे ती सुस्त होते.

> पृथ्वी शोकाकुल व कृश झाली आहे; जग झुरून कृश झाले आहे; पृथ्वीवरील प्रतिष्ठित जन जर्जर झाले आहेत. पृथ्वी आपल्या रहिवाशांकडून भ्रष्ट झाली आहे, कारण त्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, विधींचे अतिक्रमण केले आहे आणि सनातन करार मोडला आहे. ह्यास्तव पृथ्वी शापाने ग्रासली आहे, तिचे रहिवासी पापाचे फळ भोगत आहेत; पृथ्वीचे रहिवासी जळून भस्म झाले आहेत, मानव थोडेच उरले आहेत. यशया 24:4-6

कनान आणि मिसर देश देवाच्या आज्ञांचे उल्लंघन करत होते. सात वर्षांचा दुष्काळ हा या देशांसाठी एक इशारा होता की ते करत असलेल्या घृणास्पद कृत्यांमुळे भविष्यात निसर्गाचे मोठे नुकसान होईल. मिसर देशाच्या लोकांना त्यांच्या घृणास्पद कृत्यांबद्दल पश्चात्ताप करता यावा आणि निसर्गाच्या विनाशकारी प्रतिक्रियांपासून वाचता यावे यासाठी प्रभुने दयाळूपणे योसेफला ह्या लोकांना खऱ्या देवाची ओळख करून देण्यासाठी मिसर देशात विकण्याची परवानगी दिली. लैंगिक घृणास्पद गोष्टींबाबत हा इशारा नियमशास्त्रात देण्यात आला आहे.

> त्यांचा देशही भ्रष्ट झाला आहे, म्हणून त्यांच्या दुष्टतेमुळे मी त्यांचा समाचार घेत आहे व तो देश आपल्या रहिवाशांचा त्याग करीत आहे. लेवीय 18:25

मिसर आणि कनान मधील घृणास्पद कृत्ये तेथील रहिवाशांना भूमीतून बाहेर काढण्यासाठी तयार करत होते. देवाविरुद्ध माणसांचे बंड हे निसर्गाद्वारे माणसाला परावर्तित केले जाईल. निसर्गाच्या हिंसक प्रतिक्रिया घडवून आणण्यासाठी सैतान या राष्ट्रांच्या पापांमध्ये दबाव आणत होता आणि नंतर देवावर आरोप लावत होता की त्याचा क्रोधामुळे त्यांचा नाश होत आहे, खरं पाहिले तर परमेश्वराने मिसर आणि इतर मूर्तिपूजक राष्ट्रांना वाचवायचा प्रयत्न करत होता. त्यांच्यापैकी कोणाचाही नाश होऊ नये अशी त्याची ईच्छा होती परंतु त्यांनी परमेश्वराचा सल्ला ऐकण्यास नकार दिला.

पिडांबद्दल विचार करताना आपण एका अतिशय महत्त्वाच्या वचनाचा विचार केला पाहिजे.

> कारण मी परमेश्वर तुझा देव आहे; मी इस्राएलाचा पवित्र प्रभू तुझा त्राता आहे; मी तुझ्यासाठी मिसर खंडादाखल दिला आहे, तुझ्याबद्दल कूश व सबा दिले आहेत. यशया 43:3

पवित्र शास्त्र वधस्तंभाच्या भाषेत पीडांबद्दल बोलते. इस्रायलाच्या मुक्तीसाठी खंडणी देण्यात आली होती. पीडांमध्ये अनेक प्रतीकात्मक स्तर आहेत आणि आपण या अध्यायात त्या सर्वांना संबोधित करू शकत नाही. आमचे लक्ष मिसर देशावर आलेल्या पीडांद्वारे वधस्तंभाचे प्रकटीकरण असेल.

> मग मोशे व अहरोन ह्यांनी फारोजवळ जाऊन परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले; अहरोनाने आपली काठी फारो व त्याचे सेवक ह्यांच्यापुढे टाकली तेव्हा तिचा साप झाला. निर्गम 7:10

काठीचे सर्पांमधे रूपांतर करण्याचा चमत्कार फारोसमोर पुनरावृत्ती होतो. हे मिसर देशाला एक धडा देते की सर्पाची शक्ती मोकळी केली जाणार आहे.

> त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. स्तोत्रसंहिता 78:49

पिडांच्या घटनांचे वर्णन करताना स्तोत्रांचे पुस्तक दुष्ट देवदूतांच्या शक्तीच्या या मुक्ततेबद्दल बोलते.

> त्याने त्यांच्या नद्यांच्या पाण्याचे रक्त केले, म्हणून त्यांचे वाहते पाणी त्यांच्याने पिववेना. त्याने त्यांच्यावर माश्यांचे थवेच्या थवे पाठवले; त्या माश्यांनी त्यांना ग्रासून टाकले; त्याने बेडूक पाठवले, त्या बेडकांनी त्यांचे सर्वकाही नासून टाकले. त्याने त्यांच्या शेतातल्या उत्पन्नावर सुरवंट व त्यांच्या श्रमफलावर टोळ पडू दिले. त्याने गारांनी त्याच्या द्राक्षवेलांचा व बर्फाने त्यांच्या उंबराच्या झाडांचा नाश केला. त्याने त्यांची गुरेढोरे गारांच्या,

व जनावरे विजांच्या हवाली केली. त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. त्याने आपल्या कोपासाठी मार्ग सिद्ध केला; त्याने त्यांचा जीव मृत्यूपासून वाचवला नाही, तर त्यांचा प्राण मरीच्या हवाली केला. त्याने मिसर देशातले प्रथमजन्मलेले सर्व, हामाच्या डेऱ्यातले त्यांच्या पौरुषाचे प्रथमफल ह्यांना मारले; स्तोत्रसंहिता 78:44-51

दुष्ट देवदूत किंवा विनाशाच्या देवदूतांच्या सुटकेच्या संदर्भात बहुतेक पीडांचा उल्लेख केला आहे. देवाने त्यांना रोगराईच्या स्वाधीन केले कारण त्यांनी देवाला व त्याच्या आज्ञा मान्य करण्यास नकार दिला होता. महामारी या शब्दाचा उल्लेख देवाच्या सार्वकालिक कराराचे उल्लंघन सूचित करतो.

मी तुमच्यावर तलवार आणीन, ती करार मोडल्याचा बदला घेईल; तुम्ही आपापल्या नगरात जमा व्हाल, तेव्हा मी तुमच्यावर मरी पाठवीन; मी तुम्हांला तुमच्या शत्रूच्या स्वाधीन करीन. लेवीय 26:25

दुष्ट देवदूतांचा सहभाग नेमका कसा होता किंवा त्यांनी रहिवाशांवर संकटे आणण्यासाठी निसर्गाच्या नियमांचा वापर कसा केला हे स्पष्ट नाही. तरीही हे दोन घटक आहेत - निसर्गाचे नियम आणि दुष्ट देवदूतांच्या विध्वंसक कार्याने मिसर देशावर विनाश आणला. तरीही विनाशाच्या या प्रक्रियेद्वारे देव त्यांना त्यांच्या पापाबद्दल पश्चात्ताप करण्यास आणि तारण मिळावे म्हणून त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रकट झालेली सर्व शक्ती ख्रिस्ताकडून येत आहे कारण तो देवाची शक्ती आणि ज्ञान आहे. तरीही या विनाशाच्या कृत्ये घडू देण्यासाठी ख्रिस्ताने त्याच्या दुःखाचा वधस्तंभ वाहून नेला पाहिजे.

ख्रिस्ताचे सामर्थ्य मिसरी लोकांच्या आत्म्यात होते. कोणत्याही व्यक्तीच्या हत्येमध्ये ख्रिस्ताच्या छळाचा समावेश होतो. एक मिसरी आई आपल्या मृत मुलासाठी शोक करत आहे, आणि खूप दुःखाने रडत आहे हे आपण चित्रित करू शकतो काय? येथे ख्रिस्त देखील तिच्या दुःखात पीडित आहे, येथे वधस्तंभ उचलला गेला आहे आणि ख्रिस्ताला पुन्हा नव्याने वधस्तंभावर खिळले आहे. जेव्हा देव सैतानाला त्याच्या पुत्राची शक्ती घेण्यास परवानगी देतो, तेव्हा तो सैतानाला त्याच्या स्वतःच्या डोळ्याला स्पर्श करू देतो.

त्याने आपल्या कोपासाठी [H639 नाक, चेहरा] मार्ग सिद्ध केला; त्याने त्यांचा जीव मृत्यूपासून वाचवला नाही, तर त्यांचा प्राण मरीच्या [H1698 - नष्ट करणे] हवाली केला. स्तोत्रसंहिता 78:50

हे वचन मिसर देशामधील पीडांचे वर्णन करतो. ते असे म्हणते की देवाने त्याच्या चेहऱ्याकडे जाण्याचा मार्ग तयार केला. त्याचा प्रिय पुत्र त्याच्या जीवनाचा आनंद आहे. मिसरी लोकांना विनाशकाच्या हातून मरण्याची परवानगी देताना, त्याने आपल्या पुत्राच्या यातना आणि दुःखांना परवानगी दिली; आणि म्हणून पिता या अंधारात एकटा उभा राहिला आणि मिसर देशातील पीडांसाठी आणि त्याच्या पुत्राने सहन केलेल्या सर्व गोष्टींसाठी रडला.

पीडा ह्या उगाचच नाहीत परंतु मिसरी लोकांनी ज्या देवतांची सेवा केली त्याकडे निर्देशित केले आहे. मिसरी लोकांना, सर्व मूर्तिपूजक उपासकांप्रमाणे, त्यांच्या देवतांना शांत करावे लागत असे व त्यांना नाराज करू नये अन्यथा त्यांना शिक्षा होईल. दैवी आरशाद्वारे मिसरी लोकांकडे पीडा प्रतिबिंबित होतात. त्यांच्या मूर्तिपूजक व घृणास्पद कृत्ये, लहान मुलांची हत्या, गुलामगिरीची क्रूरता, आणि लैंगिक विकृती यातून त्यांची अपराधी भावना आता या आरशात त्यांच्याकडे परत येत होती. नाईल नदीची हापी देवता या देवतेखाली पूजा केली जात असे.

80 वर्षांपूर्वीच्या हिब्रू पोरांना नदीत फेकण्याची आज्ञा कदाचित त्यांच्या कृतींचे प्रतिबिंब दाखवत होती. त्याच वेळी ख्रिस्ताने चालवलेले निसर्गाचे नियम शेवटी त्यांच्या घृणास्पद भाराखाली कोसळत होते. देवाच्या पुत्राने मिसर देशाच्या भविष्याचा विचार केल्यामुळे तो दुःखाने दबला गेला आणि नाईल नदी आपल्याला गेथसेमानेच्या बागेत जेव्हा त्याचा घाम रक्तात बदलला आणि त्याचे शरीर दबू लागले तेव्हा त्याला काय अनुभव येईल याचे प्रतीक देते. हे पापाचे वजन होते जे ख्रिस्तामध्ये विनाश करत होते आणि मिसरी लोकांच्या अपवित्र कृतीमुळे नाईल आणि त्यातील सर्व काही नष्ट होत होते.

काठीचा वापर महत्त्वाचा आहे.

> तेव्हा मोशे व अहरोन ह्यांनी परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले; त्याने काठी उचलून फारोच्या व त्याच्या सेवकांच्या समक्ष पाण्यावर मारली तेव्हा नदीतल्या सर्व पाण्याचे रक्त बनले. निर्गम 7:20

शास्त्रात इतरत्र काठीचा मारण्यासाठी वापर शोधणे महत्त्वाचे आहे.

> याउलट तो दीनांचा न्याय चांगुलपणाने करील व पृथ्वीवरील दिनांचा यथार्थ निर्णय करील. तो आपल्या मुख दंडाने पृथ्वीला तडाखा देईल. आणि फुंकराने दुष्टांना ठार करील. यशया 11:4

काठी हे देवाचे वचन आणि त्याच्या तोंडातील श्वासाचे प्रतीक आहे. जेव्हा ख्रिस्त वधस्तंभावर टांगला गेला तेव्हा तो तुटलेल्या नियमशास्त्राच्या समोर पापाचा अपराध असा होता ज्यामुळे त्याचा आत्मा अग्नीप्रमाणे जळत होता. मारण्याचे हे तत्व शास्त्रात इतरत्र देखील आढळते.

> हे लष्कराच्या स्वामिनी,1 तू आपले लष्कर आता जमा कर, त्याने आम्हांला वेढा घातला आहे; ते इस्राएलाच्या नियंत्याच्या गालावर सोटे मारीत आहेत. मिखा 5:1

> सेनाधीश परमेश्वर म्हणतो, “अगे तलवारी, माझ्या मेंढपाळावर व जो पुरुष माझा सोबती त्याच्यावर ऊठ; मेंढपाळावर प्रहार कर म्हणजे मेंढरे विखरतील; माझ्या लहानग्यांवर मी माझ्या हाताची छाया करीन.” जखऱ्या 13:7

> पाहा, होरेब डोंगरावरील एका खडकावर मी तुझ्यापुढे उभा राहीन; आणि तू त्या खडकावर काठी आपट म्हणजे त्यातून पाणी निघेल आणि लोक ते पितील.” इस्राएलाच्या वडिलांच्या देखत मोशेने तसे केले. निर्गम 17:6

ख्रिस्त हा सर्व निसर्गाचा अधिपती आहे. मिसरी लोकांच्या दुष्टपणाने पृथ्वी दूषित केली होती आणि ख्रिस्ताला काटेरी मुकुट घालावे लागले होते. इजिप्शियन लोक ख्रिस्ताचे काय करत होते हे पाण्यावर मारल्याने दिसून येते. ख्रिस्त हा जिवंत पाण्याचा झरा आहे आणि ते त्याला मारत होते आणि त्याला खूप त्रास देत होते. देव मिसरी लोकांना त्यांच्या स्थितीमुळे होणारी हानी प्रकट करत आहे. पडलेल्या माणसाला त्याची पापी स्थिती परत प्रतिबिंबित करणे हे नियमशास्त्राचे कार्य आहे. तरीही संपूर्ण जग याला फक्त देवाने मिसर देशाचा पाणीपुरवठा नष्ट केला असे मानतात. ते ख्रिस्ताला देवाने मारलेला आणि पीडित असे मानतात. जेव्हा ख्रिस्ताला भाला भोसकला गेला तेव्हा त्याच्या कुशीतून रक्त आणि पाणी बाहेर आले आणि हेच आपण नाईल नदीत पाहतो.

दुसरी पीडा ही देवी हेक्वेटची प्रतिबिंब होती.

> हेकेट (इजिप्शियन उक्त, देखील हक्तयत "हेटीत"), कधीकधी हेकेट असे शब्दलेखन केले जाते, ही प्रजननक्षमतेची इजिप्शियन देवी आहे, ज्याला हॅथोरने ओळखले जाते, जिचे बेडूकच्या रूपात प्रतिनिधित्व केले जाते. [१] इजिप्शियन लोकांसाठी बेडूक हे प्रजननक्षमतेचे प्राचीन प्रतीक होते, जे नाईल नदीच्या वार्षिक पुराशी संबंधित होते. हेकेट ही मूळतः खनुमची स्त्री समकक्ष होती, किंवा खनुमची पत्नी जिच्याद्वारे ती हर-उरची आई बनली.[2] असे प्रस्तावित केले गेले आहे की तिचे नाव हेकेटच्या नावाचे मूळ आहे, जादूटोण्याची ग्रीक देवी. विकिपीडिया.

मिसर देशाची प्रजनन क्षमता मिसरी लोकांनी त्यांच्याच घृणास्पद कृत्यांमुळे नष्ट केली होती. पृथ्वी त्याच्या पापांचे प्रतिबिंब करत होती आणि बेडूक बाहेर पडण्याचे हे प्रतिबिंब होते. देव त्यांच्या चुकीच्या उपासनेला पुन्हा आरशात प्रतिबिंबित होऊ देत होता. देवांबद्दलची भीती आता त्यांची प्रत्यक्षात भेट घेत होती. या उगाचच घडलेल्या घटना नाहीत तर निसर्गाने प्रतिबिंबित केलेले मनुष्याचे अंतःकरण होते म्हणून येशू आम्हाला सांगतो कि:

> कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. मत्तय 7:2

त्याच वेळी बेडकाचे चिन्ह फसवणुकीच्या तत्त्वाचे वर्णन करते. आम्ही वर नमूद केले आहे की हेक्वेट जादूटोण्याशी जोडलेले होते. सैतान त्याच्या याजकांद्वारे निसर्गातील या प्रकटीकरणांची बनावट करत होता. बेडूक हे चमत्कार काम करणाऱ्या वाईट आत्म्यांशी जोडलेले आहेत.

> नंतर ‘बेडकासारखे’ असलेले तीन अशुद्ध आत्मे अजगराच्या तोंडातून, श्वापदाच्या तोंडातून व खोट्या संदेष्ट्याच्या तोंडातून निघताना मी पाहिले. ते चिन्हे दाखवणारे भुतांचे आत्मे आहेत; ते सर्वसमर्थ देवाच्या त्या मोठ्या दिवसाच्या लढाईसाठी संपूर्ण जगातील राजांना एकत्र करण्यास त्यांच्याकडे बाहेर जातात. प्रकटीकरण 16:13-14

> ते मोठी चिन्हे करते; माणसांसमक्ष आकाशातून पृथ्वीवर अग्नी पडावा असेदेखील करते. जी चिन्हे त्या श्वापदासमक्ष करण्याचे त्याच्याकडे सोपवले होते, त्यावरून ते पृथ्वीवर राहणाऱ्यांना ठकवते; म्हणजे तलवारीचा घाव लागला असताही, जिवंत राहिलेल्या श्वापदासाठी मूर्ती करण्यास पृथ्वीवर राहणाऱ्यांना ते सांगते. प्रकटीकरण 13:13-14

सापांच्या चमत्कारात फसवणूक करण्याची खोटी भावना आणि याजकांनी बनावट केलेल्या पहिल्या दोन पीडांमुळे मिसरी लोकांमध्ये पश्चात्तापाची भावना रोखली गेली, ज्यामुळे शेवटी त्यांच्या जीवनावर नाशाने शिक्कामोर्तब केले. त्याचप्रकारे एक खोटे बोलणारा आत्मा त्याच्यावर खोटे आरोप लावण्यासाठी आणि त्याद्वारे वधस्तंभावरील त्याचा नाश सुरक्षित करण्यासाठी ख्रिस्ताच्या चाचणीत उपस्थित होता.

तिसरी पीडा पृथ्वीच्या धुळीशी संबंधित होती. मातीशी जोडलेले असे दोन देव होते; होरस, जो काळ्या मातीचा स्वामी होता आणि सेट, जो लाल वाळवंटाचा स्वामी होता. काळी सुपीक माती पिके घेण्यासाठी वापरली जात असे. पृथ्वीवरून येणाऱ्या उवा ही एक चेतावणी होती की माती कुजत आहे आणि कपड्यांसारखी जुनी होत

आहे.

> वर आकाशाकडे आपले डोळे लावा, खाली पृथ्वीकडे लक्ष द्या; कारण आकाश धुराप्रमाणे विरून जाईल, पृथ्वी वस्त्राप्रमाणे जीर्ण होईल, तिचे रहिवासी चिलटांप्रमाणे मरतील; तरी माझे तारण सर्वकाळ टिकेल, माझा न्याय भंग पावणार नाही. यशया 51:6

हिब्रूमध्ये चिलटं म्हणजे उवा. हे पृथ्वीच्या जुन्या होण्याचा साक्षात्कार आहे. माणसांच्या घृणास्पद कृत्यांचा शाप ख्रिस्ताच्या हृदयावर भारलेला आहे. स्तोत्रात म्हटल्याप्रमाणे:

> ज्याच्या हिशेबी परमेश्वर अनीतीचा दोष लावत नाही व ज्याच्या मनात कपट नाही, तो मनुष्य धन्य! मी गप्प राहिलो होतो, तेव्हा सतत कण्हण्यामुळे माझी हाडे जीर्ण झाली; कारण रात्रंदिवस तुझ्या हाताचा भार माझ्यावर होता; उन्हाळ्याच्या तापाने सुकावा तसा माझ्यातला जीवनरस सुकून गेला आहे. स्तोत्रसंहिता 32:2-4

मिसरी लोकांना त्यांचे स्वातंत्र्य देऊन देवाचा पुत्र शांत राहिला, परंतु पृथ्वीला अशुद्धतेपासून वाचवण्याच्या प्रयत्नात त्याने वाहून घेतलेल्या भारामुळे त्याला आक्रोश झाला.

> कारण आपल्याला ठाऊक आहे की सबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगत आहे. रोमकरांस 8:22

हे आक्रोश आणि वेदना गेंदसेमेनी बागेत पापाच्या भाराखाली असलेल्या ख्रिस्ताच्या दु:खांना प्रतिबिंबित करते. दैहिक मनुष्यासाठी ही पीडा त्यांच्यावर होणारा क्रोधासारखा होता, परंतु जे आध्यात्मिकरित्या जागरूक आहेत त्यांच्यासाठी, ख्रिस्ताने सहन केलेल्या परीक्षांचे प्रतिध्वनी आपण पृथ्वीची घसरण आणि मानवी भ्रष्टाचारामुळे होणारे त्याचे दुःखसहन पाहतो.

दुसऱ्या भाषांतरात अनुवादित केल्याप्रमाणे चौथी पीडा विविध प्रकारच्या माश्या, कीटक आणि जंतूंबद्दलचा होता. या पीडामुळे जमीन पूर्णपणे नष्ट झाली.

> त्याप्रमाणे परमेश्वराने केले; फारोच्या वाड्यात, त्याच्या सेवकांच्या घरांत आणि सगळ्या मिसर देशात गोमाश्यांचे थव्यांचे थवे आले; गोमाश्यांच्या ह्या थव्यांनी देशाची खराबी झाली. निर्गम 8:24

भ्रष्ट ह्या हिब्रू शब्दाचा वापर शेवटच्या पीडामध्ये उल्लेख केलेल्या विनाशकासाठी वापरला जातो ज्याने मिसर देशामधील जन्मलेल्या पहिल्या व्यक्तीला मारले. महा जलप्रलयापूर्वीच्या जगाचे वर्णन करण्यासाठी देखील हाच शब्द वापरला जातो.

> देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती भ्रष्ट होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक बिघडवली होती. उत्पत्ती 6:12

ही चौथी पीडा मिसरी लोकांकडून झालेल्या अशुद्धतेचे प्रकटीकरण होते. फारोने स्वर्गातील खरा देव नाकारला होता आणि घृणास्पद कृत्ये केली होती, आणि म्हणून त्याने आणि त्याच्या पूर्वजांनी पेरलेली बीजे आता प्रकट होत आहेतः :

> मूढ आपल्या मनात म्हणतो, "देव नाही," लोक दुष्ट व अमंगळ कर्मे करतात, सत्कर्म करणारा कोणी नाही. स्तोत्रसंहिता 14:1

> समंजस कोणी नाही, देवाचा शोध झटून करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत, ते सारे निरुपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा असा कोणी नाही, एकही नाही." "त्यांचा घसा म्हणजे उघडे थडगे; त्यांनी आपल्या जिभांनी कपट केले आहे; त्यांच्या ओठांच्या आत जोगी सर्पाचे विष आहे." रोमकरांस 3:11-13

परमेश्वराने हे चार वादळाचे वारे रोखून धरले होते आणि पृथ्वीला "शांत राहा" असे म्हणण्याचा प्रयत्न केला होता, परंतु शेवटी पृथ्वी रहिवाशांनावर प्रतिबिंब दर्शवेल.

पाचवी पीडा गुरेढोरे, घोडे, उंट आणि गाढवांवर आली. मिसरी लोकांना विनाशकापासून संरक्षण नव्हते. फारोने पश्चात्ताप केला असता तर निसर्गाच्या माध्यमातून देवदूतांचा नाश करण्याचे काम रोखता आले असते, पण तसे झाले नाही. परमेश्वराला पशुधन नष्ट करणाऱ्याच्या हाती द्यावे लागले. मिसरी लोकांनी परमेश्वराकडे येण्यास आणि तारण प्राप्त करण्यास नकार दिला, म्हणून सैतानाने मिसर देशावर अधिकाधिक नियंत्रण ठेवले.

सैतानाला केव्हा परवानगी देण्यात आली होती हे आपल्याला माहीत आहे, त्याने ईयोबवर फोड आणले आणि सहाव्या पीडामध्ये सैतानाने मिसरी लोकांबरोबर हेच केले. आपल्या लाडक्या मुलांना फोड मुळे वेदना होत असताना पाहून ख्रिस्ताला किती त्रास झाला असेल आणि सैतानाला या गोष्टी करू दिल्याने त्याला किती दुःख झाला असेल. पीडांचा प्राण्यांवर प्रभाव होण्यापासून ते माणसांच्या शरीरावर फोड निर्माण करू शकला हे असे सूचित करते की सैतानाने ईयोबप्रमाणेच परिस्थितीवर अधिक नियंत्रण मिळवले होते.

> परमेश्वराने सैतानाला विचारले, “माझा सेवक ईयोब ह्याच्याकडे तुझे लक्ष गेले होते काय? भूतलावर त्याच्या तोडीचा सात्त्विक, सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापापासून दूर राहणारा असा दुसरा कोणी नाही; त्याचा विनाकारण नाश करण्यास तू मला चिथवलेस, तरी तो आपल्या सत्त्वाला दृढ धरून राहिला आहे.” सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले, “त्वचेसाठी त्वचा! मनुष्य आपल्या प्राणासाठी आपले सर्वस्व देईल. तू आपला हात पुढे करून त्याच्या हाडामांसास लावून तर पाहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील.” परमेश्वर सैतानाला म्हणाला, “पाहा, तो तुझ्या हाती आहे, त्याची प्राणहानी मात्र करू नकोस.” मग सैतान परमेश्वरासमोरून गेला; आणि त्याने ईयोबाला मोठमोठ्या गळवांनी नखशिखान्त अतिशय पिडले. ईयोब 2:3-7

ख्रिस्ताच्या वधस्तंभावर खिळे ठोकण्यात आल्याने इजिप्शियन लोकांमध्ये प्रकट झालेली फोडे कदाचित त्याच्या दुःखांशी बोलू शकतात. हा मनुष्याच्या देहाचा त्रास होता.

मिसरी लोकांचे दुःख हे त्याचे दुःख होते आणि त्यांच्या वेदनांचा त्याच्यावर खूप परिणाम झाला आणि तरीही त्याने सैतानाला हे सामर्थ्य प्रकट करू दिले कारण या लोकांनी वळण्याचे आणि तारण करण्याचे आवाहन ऐकण्यास नकार दिला. येशूने परुश्यांना म्हटल्याप्रमाणे, "जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली एकवटते, तसे तुझ्या मुलांबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती!"

आधी मासे मेले, मग बेडूक, मग गुरेढोरे आणि आता त्यांच्याच माणसांवर फोड आली होती. मोशेने मिसरी लोकांना प्रत्येक पीडाबद्दल चेतावणी दिली जेणेकरून ते विनाशकापासून दूर जाण्यासाठी उपाययोजना करू शकतील. ते या चावणाऱ्या सर्पापासून वळू शकत होते आणि वर उचललेल्या काठीवरील सर्पाकडे पाहू शकत होते. पीडांच्या या त्रासातून ख्रिस्ताला वर उचलण्यात आले तेव्हा, - नाश करणारा सर्प उघड झाला. सैतान स्वतःला देवाच्या सामर्थ्यामध्ये लपवण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्याला खोटे सांगण्यासाठी बेडूक पाठवतो की या गोष्टी थेट देवच करतो.

देवाच्या पुत्राला पृथ्वीवर अशा विध्वंसक आणि हिंसक मार्गांनी स्वतःच्या सामर्थ्याचा वापर होताना पाहून खूप त्रास होत होता. निसर्गातील त्याचे स्वतःचे नियम, जे प्रभूवर प्रेम करतात आणि त्याच्या आज्ञा पाळतात त्यांना आशीर्वाद देण्यासाठी निर्माण केलेले होते, ते आता सामूहिक विनाशाची शस्त्रे बनले आहेत. सैतान आणि त्याचे देवदूत विनाशाची पातळी वाढवण्यासाठी गुंतले होते कारण सैतानाला माहित होते की तो मनुष्यांना असे वाटू देऊ शकतो की देव हे सर्व विनाशकारी कार्य करत आहे.

> मोशेने आपली काठी आकाशाकडे उगारली तेव्हा परमेश्वराने मेघगर्जना व 00गारांची वृष्टी केली, आणि अग्नीचा लोळ जमिनीकडे येऊ लागला; ह्या प्रकारे परमेश्वराने मिसर देशावर गारांचा वर्षाव केला. निर्गम 9:23

जेव्हा मोशेने काठी स्वर्गाकडे उचलली, तेव्हा ते वधस्तंभावर उचललेल्या देवाच्या पुत्राचे प्रतीक होते. ख्रिस्ताची शक्ती, सैतानाला त्याच्या इच्छेनुसार वापरण्यासाठी देण्यात आली. देवाने त्याच्या संरक्षणात अडथळा आणला आणि मृत्यू आणि नाशात आनंदित असलेल्या दुष्ट देवदूतांनी हे गारांचे दगड जमिनीवर फेकले. स्तोत्र काय म्हणते ते लक्षात ठेवा:

> त्याने गारांनी त्याच्या द्राक्षवेलांचा व बर्फाने त्यांच्या उंबराच्या झाडांचा नाश केला. त्याने त्यांची गुरेढोरे गारांच्या, व जनावरे विजांच्या हवाली केली. त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. स्तोत्रसंहिता 78:47-49

स्तोत्र 18 मध्ये देखील गारांचा उल्लेख आहे जो वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या दुःखाबद्दल बोलत आहे.

> त्याच्यापुढील तेजाने घनमेघांमधून गारा व धगधगीत इंगळ बाहेर पडले. स्तोत्रसंहिता 18:12

लक्षात घ्या की त्याने त्यांची गुरे गारांच्या “स्वाधीन” केली ह्या हिब्रू शब्दाचा अर्थ सोडणे किंवा सोडून टाकणे असा होतो. सैतानाला दिलेली देवाची शक्ती आपण पाहतो आणि आपण या मुद्द्यावर जोर देतो की हे केवळ ख्रिस्ताच्या यातना आणि वेदनांद्वारे केले जाऊ शकते. प्रत्येक वेळी जेव्हा देव सैतानाला त्याच्या सामर्थ्याने नष्ट करण्याची परवानगी देतो, तेव्हा त्याचा पुत्र वधस्तंभावर वर उचलला जातो, परंतु त्याच वेळी खऱ्या सुवार्तेच्या दैवी आरशात पाहणाऱ्यांसाठी सैतान विनाशक म्हणून प्रकट होतो. गारांच्या बाबतीत आम्ही हे तपशील पाहतो कि:

> त्या समयी जवस व सातू ह्यांचा नाश झाला; कारण सातू निसवले होते आणि जवसाला बोंडे आली होती. निर्गम 9:31

पहिल्या फळांच्या अर्पणासाठी जवस व सातूचा वापर केला जात असे. गारांमुळे मारल्या गेलेल्या लोकांमध्ये, प्रथम फळे देखील नष्ट झाली. पवित्र शास्त्र म्हणते:

> पण प्रत्येक आपापल्या क्रमाप्रमाणे, प्रथमफळ ख्रिस्त; मग जे ख्रिस्ताचे ते त्याच्या आगमनकाळी. 1 करिंथ 15:23

जवस व सातूचा नाश करणाऱ्या गारा ख्रिस्ताला मारलेल्या, पहिल्या फळांचे प्रतीक आहेत. ("आम्ही त्याला मारले असे मानतो" यशया 53:4) पुढील पीडामध्ये टोळांचा समावेश होता आणि आम्हाला प्रकटीकरणात टोळ पीडांच्या उत्पत्तीबद्दल सांगण्यात आले आहे.

> त्याने अथांग डोह उघडला, 'तेव्हा' त्यातून मोठ्या 'भट्टीच्या धुरासारखा धूर बाहेर येऊन वर चढला;' आणि त्या डोहातल्या धुराने 'सूर्य' व अंतराळ हे 'अंधकारमय' झाले. त्या धुरातून 'टोळ निघून पृथ्वीवर' उतरले; त्यांना पृथ्वीवरील विंचवांसारखी शक्ती देण्यात आली. प्रकटीकरण 9:2-3

हे सैतानाच्या फसवणुकीद्वारे नष्ट करण्याच्या शक्तीचा संदर्भ देते आणि हेच या पिडांमध्ये घडले. सैतान तारणाला चिकटून राहून आशेची कोणतीही हिरवी कोंब काढून टाकेल. सैतान ख्रिस्तावर अशा विचारांनी दबाव आणत होता की त्याचे सर्व कार्य व्यर्थ आहे आणि कोणीही त्याचे कौतुक करणार नाही. त्याचा पिता त्याला सोडून देईल अशी भयंकर प्रलोभनाही त्याने ख्रिस्ताला दिली.

> कुत्र्यांनी मला वेढले आहे; दुर्जनांच्या टोळीने मला घेरले आहे; त्यांनी माझे हातपाय विंधले आहेत. मला आपली सर्व हाडे मोजता येतात; ते माझ्याकडे टक लावून पाहतात. ते माझी वस्त्रे आपसांत वाटून घेतात आणि माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकतात. स्तोत्रसंहिता 22:16-18

> आणि जवळून जाणारेयेणारे 'डोकी डोलवत' त्याची अशी निंदा करत होते की, "अरे, मंदिर मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या, तू देवाचा पुत्र असलास तर स्वतःचा बचाव कर आणि वधस्तंभावरून खाली उतर." तसेच मुख्य याजकही, शास्त्री व वडील ह्यांच्याबरोबरीने थट्टा करत म्हणाले, "त्याने दुसऱ्यांना वाचवले; त्याला स्वतःला वाचवता येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आता वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. 'तो देवावर भरवसा ठेवतो; तो त्याला हवा असेल तर त्याने त्याला' आता 'सोडवावे'; कारण मी देवाचा पुत्र आहे, असे तो म्हणत असे." जे लुटारू त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळलेले होते त्यांनीही त्याची तशीच निंदा केली. मत्तय 27:39-44

अंधाराची नववी पीडा मिसरी लोकांवर त्यांचा सूर्य देव "रा" ह्याचा क्रोध प्रतिबिंबित करते, परंतु सत्याचा शोध घेणाऱ्यांना ते थेट वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या भयानकतेशी बोलते कारण तो पूर्णपणे भुतांनी वेढलेला होता. या टप्प्यावर सैतानाला माहीत होते की तो मिसर देशाचा नाश करू शकतो; ह्याच पराक्रमी भूमीने भूतकाळात इस्रायलकडून खूप काही शिकले होते आणि ज्याला देवाने भरपूर आशीर्वाद दिला होता. मिसर देश नाशात आहे हे जाणून दुष्ट आता धूर्तपणे हसतो. या नाशात, आपण वधस्तंभावर ख्रिस्ताचे दु:ख पाहतो आणि त्याच्या मिसरी

मुलांना सैतानाने नष्ट केल्यामुळे त्याचे दुःख पाहतो. हा अंधकार सरळ वधस्तंभाच्या घटनांशी बोलतो.

> मी दररोज मंदिरात तुमच्याबरोबर असे तरी तुम्ही माझ्यावर हात टाकला नाही; पण ही तुमची घटका आणि अंधाराची सत्ता आहे.” लूक 22:53

> मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला. मत्तय 27:45

नवव्या तासाचा नवव्या पिडेशी काही संबंध आहे काय? कोणत्याही परिस्थितीत हा क्षण ख्रिस्तासाठी आणि मिसरी लोकांसाठी सर्वात अंधकारमय होता. आपले काय होणार या विचाराने ते दोघेही घाबरले होते. अंधार देखील पित्याच्या उपस्थितीचे संपूर्ण अस्पष्टतेचे प्रतीक आहे.

> जो संदेश आम्ही त्याच्यापासून ऐकला आहे तो तुम्हांला विदित करतो; तो संदेश हा की, देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी मुळीच अंधार नाही. 1 योहान 1:5

अंधार दर्शवतो की सैतानाने मिसर देशावर पूर्ण ताबा मिळवला आहे. जे काही उरले आहे ते प्रथम जन्मलेल्याचा मृत्यू आहे जी अंतिम पीडा आहे आणि हे विनाशकाचे अंतिम कार्य आहे. त्यांच्या मृत्यूमध्ये ख्रिस्ताचा स्वतःचा मृत्यू प्रकट होतो. त्यांच्या जागी ख्रिस्त स्वेच्छेने मरण पावला असता! पण त्यांनी विनाशक निवडला आणि आता त्यांना त्याचा सामना केला पाहिजे. तरीही, दयाळूपणे, विश्वासात असलेल्या सर्वांसाठी ज्यांनी कोकऱ्याचे रक्त त्यांच्या दाराच्या चौकटीवर ठेवले, सैतानाला त्या घरात प्रवेश करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

> कारण परमेश्वर मिसऱ्यांचा वध करण्यासाठी देशातून फिरणार आहे; ज्या ज्या घराच्या कपाळपट्टीवर व दोन्ही बाह्यांवर रक्त लावलेले परमेश्वर पाहील ते ते दार तो ओलांडून जाईल आणि नाश करणाऱ्याला तुमचा नाश करण्यासाठी तुमच्या घरात शिरू देणार नाही. निर्गम 12:23

पुन्हा आपण स्वतःला आठवण करून देतो कि - विनाशक कोण आहे?

> अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे; इब्री भाषेतील त्यांचे नाव अबद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतील त्याचे नाव अपल्लूओन आहे. प्रकटीकरण 9:11.

> त्यांच्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, तेव्हा तुम्ही कुरकुर करू नका. 1 करिंथ10:10

देवाला त्याचे संरक्षण काढून घेण्यास भाग पाडून, दुष्ट देवदूतांनी त्यांच्या कामात कसलाही अडथळा आणला नाही, आणि मिसर देशामधील सर्व प्रथम जन्मलेले ख्रिस्ताच्या मृत्यूचे प्रतिबिंब म्हणून मरण पावतात. मिसर देशाच्या दहा पीडांच्या दरम्यान, ख्रिस्ताचा वधस्तंभ ठळकपणे प्रदर्शित करण्यात आला, हे असे दर्शविते की देवाची शक्ती, मिसरी दुष्टतेला प्रतिसाद म्हणून नैसर्गिक नियमांद्वारे विनाश आणण्यासाठी वापरली गेली, ज्यामुळे सैतान आणि त्याचे देवदूत प्रवेश करू शकतात आणि विनाश घडवू शकतात. हा नाश केवळ ख्रिस्ताच्या छळ आणि दुःखामुळेच पूर्ण झाला, ज्याला काळाच्या सुरुवातीपासूनच मारले जात होते, आणि ज्याने विनाशकाद्वारे मानवतेवर होणारे प्रत्येक विनाश सहन केले. मानवतेतील देवाच्या चरित्राला त्याच्या द्वेषाने भरून, मनुष्यांना मारण्यात सैतानाला आनंद होतो.

ख्रिस्त आणि पित्याला झालेल्या दुःखामुळे आणि मिसर देशाच्या विध्वंसामुळे सैतानाने खूप आनंद केला. देवाचा उजवा हात कुष्ठरोगी झाला आणि त्याचा राजदंड सर्पात बदलला.जर आपण या पीडांबद्दल बेडकाच्या म्हणजेच सैतानाच्या खोटेपणाचा भूतकाळ पाहिला तर आपण देव आणि त्याच्या पुत्राच्या दुःखाचे साक्षीदार आहोत. ख्रिस्ताचा वधस्तंभ सर्पाला तो खरोखर काय आहे हे प्रकट करतो - ते म्हणजे तो सुरुवातीपासूनच एक खुनी आणि लबाड आहे. योहान ८:४४. वधस्तंभ आपल्याला सैतानाची दुष्टता आणि आपल्या देवाची सहनशीलता प्रकट करतो.

विनाश ह्यामुळे होतो

देवाचे सामर्थ
↘
निसर्गाचे नियम
↘
मिसर देशाची दुष्टता
↘
ज्यामुळे सुरक्षेचे हेज तुटले जाते
↘
सैतान आत येतो

फारोला इस्त्रायलला जाऊ देण्यास भाग पाडण्यासाठी देवाने पीडा पाठविल्या ही आपली समजूत मानवी अंतःकरण किती निर्दयी आहे हे उघड करते आणि आपल्या स्वर्गातील पित्याचे प्रेमळ चरित्र आपण किती कमी जाणतो हे उघड करते. कोणाचाही नाश व्हावा अशी देवाची इच्छा नाही, परंतु सर्वांनी पश्चात्ताप करावा

आणि त्याच्या शब्बाथ, आज्ञा आणि नियमांद्वारे त्याचे संरक्षण स्वीकारावे अशी त्याची ईच्छा आहे.

चला आपण आपल्या सर्व पापांपासून दूर जाऊ या आणि ख्रिस्ताकडे येऊ या जेणेकरून आपण आपल्या पापी कृतींद्वारे त्याला पुन्हा वधस्तंभावर खिळवू नये, तर त्याऐवजी आपण त्याच्यामध्ये दररोज वधस्तंभावर खिळले जाऊ आणि त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने जीवनाच्या नवीनतेसाठी उठविले जाऊ. ह्या पीडा ख्रिस्ताच्या वधस्तंभाचा संदेश प्रकट करतात काय आणि सैतान लोकांना नष्ट करण्यासाठी मिसरी लोकांच्या निवडींचा गैरफायदा घेईल हे जाणून त्याचे खोल दु:ख प्रकट करते काय? आपल्याला देवाचे एक कोमळ चित्र दिसते का ज्या पित्याने त्या लोकांना वाचवण्यासाठी सर्व काही केले?

“पित्याचे आपल्यावर किती अगाध प्रेम आहे. सर्व मापांच्या पलीकडे किती विशाल. की तो आपला एकुलता एक पुत्र देऊन त्याचा स्वतःचा खजिना वाईट बनवेल.”

> कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. यशया 55:8-9

---

[3]स्टुअर्ट टाउनेंडचे गीत, आपल्यावर स्वर्गीय पित्याचे किती खोल प्रेम आहे. 1990.

## 21. सार्वकालिक करार आणि मृत्युची सेवा

जुना करार अत्यंत हिंसाचाराच्या कथांनी भरलेला आहे, ज्या देवाच्या अनुयायांनी केल्या तसेच प्रत्यक्षपणे देवानेच अंमलात आणल्या आहेत. यातील अनेक कथा आपण आपल्या लेकरांना घाबरवण्याच्या भीतीने वाचून दाखवत नाही. येशूच्या कथेद्वारे देवाच्या प्रेमाचा आणि दयेचा उपदेश करू पाहणाऱ्या ख्रिस्ती धर्मासाठी जुना करार खूपच लाजिरवाणा वाटतो.

जुन्या करारातील देवाकडून आलेल्या हिंसेला ख्रिस्ती लोकांनी संबोधित करण्याचा प्रयत्न केलेला एक मार्ग म्हणजे जुन्या आणि नवीन कराराच्या भेदभावाद्वारे. बरेच ख्रिस्ती लोक हे शिकवतात की जुना करार केवळ जुन्या पिढीशी किंवा ख्रिस्त या पृथ्वीवर येण्यापूर्वी आणि वधस्तंभावर मरण पावण्याच्या कालावधीशी संबंधित आहे. ते नियमशास्त्राचे युग होते जेथे "आज्ञा पाळणे आणि जगणे" किंवा अवज्ञा करणे आणि मरणे अशी स्तिथी होती. असाही एक अर्थ आहे की जुन्या करारातील लोक त्यांच्या मानसिकतेमध्ये खरोखरच खूप प्रचिन होते आणि संकटाच्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी केवळ हिंसाचाराची भाषा समजू शकत होते.

याउलट नवीन करार हा कृपेचा काळ मानला जातो. देवाचे प्रेम आता ख्रिस्तामध्ये प्रकट झाले आहे आणि त्या वेळी आलेली पवित्र आत्म्याची देणगी माणसांना सुवार्तेचा अनुभव घेण्यास अनुमती देते. जुन्या करारातील लोक त्यांच्या आवाक्याबाहेरच्या सुवार्तेच्या भविष्यातील वास्तवाचे केवळ स्वप्न पाहू शकतात. पवित्र शास्त्राच्या काही वाचकांना असे समजले आहे की देव एक प्रकारे गोष्टी करण्याचा प्रयत्न करत आहे फक्त ते अयशस्वी पाहण्यासाठी आणि नंतर अधिक प्रेमळ दृष्टिकोन वापरून ती गोष्ट करून पाहतो. इतर लोक मशीहा येईपर्यंत देव त्याच्या परिस्थितीनुसार शक्य तितके सर्वोत्तम करत आहे अशी परिस्थिती मांडतात. यावरून एवढाच प्रश्न पडतो की ख्रिस्ताला जगात येण्यास इतका वेळ का लागला? काही कारणास्तव त्याच्या प्रेमळ दृष्टिकोनाची ओळख करून देण्यासाठी त्याला लवकर पाठवणे योग्य ठरले असते.

➡️ (जुना करार) ➡️ ✝️ ➡️ (नवीन करार) ➡️

जुन्या आणि नवीन कराराचा हा दृष्टिकोन तारणाच्या योजनेसाठी दोन विरोधी तत्त्वे सादर करतो. जुना करार कायद्याच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करतो तर नवीन करार दयेवर लक्ष केंद्रित करतो. जागतिक इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात दोन तत्त्वे ठेवल्याने हे करार एकमेकांचे विरोधक समजले जातात. जेव्हा ही दोन तत्त्वे एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक अनुभवामध्ये एका क्रमाने एकत्र ठेवली जातात तेव्हा ते पुन:स्थापना करण्याची एक सुंदर दैवी प्रक्रिया प्रकट करतात.

हा विषय देवाच्या चरित्राच्या विषयाशी थोडासा कंटाळवाणा आणि मुद्द्याविरुद्ध वाटत असला तरी, समजल्यावर हे लक्षात येईल की हा मुद्दा देवाला त्याच्या कृतींमध्ये हिंसक आणि क्रूर असल्याचे दर्शविणारे अनेक परिच्छेद उघडण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

आपण एखाद्या व्यक्तीच्या स्थितीचे उदाहरण घेऊ या ज्याच्या हाडांची काही थोडक्याच प्रमाणात वाढ झाली आहे. डॉक्टरांकडे गेल्यावर रुग्णाला सूचित केले जाते की डॉक्टरांनी हाड तोडले पाहिजे आणि ते योग्य प्रकारे वाढण्यासाठी पुन्हा योग्य स्तिर केले पाहिजे. जर डॉक्टरांनी उपचार प्रक्रियेचा फक्त पहिला भाग केला असेल तर? त्याने फक्त त्या रुग्णाचे हाड मोडले आणि नंतरची प्रक्रिया तशीच सोडली तर? हा डॉक्टर एक भयंकर उपचाराक मानला जाईल. दुसरीकडे आपल्या तोंडात वेदना वाढत असल्यामुळे दंतवैद्याला भेट देणाऱ्या एका दुसऱ्या व्यक्तीचा आपण विचार करूया. दंतवैद्याला दात किडण्याचे गंभीर प्रकरण आढळले. रुग्णाच्या संमतीने तो दात पूर्ववत करण्यासाठी तो त्याच्या दातांमध्ये ड्रिल करू लागतो. कधीकधी रुग्णाला या प्रक्रियेत लक्षणीय वेदना होऊ शकतात. दंतवैद्याने फक्त त्याच्या प्रक्रियेचा पहिला भाग केला तर काय होईल? जर त्याने फक्त रुग्णाच्या दातात ड्रिल केले आणि रुग्णाला घरी जाऊ दिले, तर त्या रुग्णाचा असुरक्षित दात त्याला फक्त वेदना देत राहिल. अशाप्रकारे त्या दंतवैद्याला निष्काळजी उपचाराक मानले जाईल कारण त्याने उपचार प्रक्रियेचा फक्त पहिला भाग केला.

पवित्र शास्त्रात काय लिहिले आहे ते आपण पाहूया. “आणि” किंवा “व” ह्या अधोरेखित शब्दांच्या वापराकडे काळजीपूर्वक लक्ष द्या. हे क्रिया सूचित करतात, की ह्या दोन्ही क्रिया एकाच वेळी केल्या जातात, स्वतंत्रपणे नाही.

> ‘आता पाहा, मी, मीच तो आहे, माझ्याशिवाय कोणी देव नाही; प्राणहरण व प्राणदान करणारा मीच आहे. मी घायाळ करतो आणि मीच बरे करतो; माझ्या हातून सोडवणारा कोणी नाही. अनुवाद 32:39
>
> परमेश्वर प्राण हरण करतो आणि प्राणदानही करतो; तो खाली अधोलोकी नेतो आणि तो वरही आणतो. परमेश्वर निर्धन करतो व धनवानही करतो; तो अवनत करतो व उन्नतही करतो. 1 शमुवेल 2:6-7
>
> वधण्याचा समय व बरे करण्याचा समय; मोडून टाकण्याचा समय व बांधून काढण्याचा समय असतो; रडण्याचा समय व हसण्याचा समय; शोक करण्याचा समय व नृत्य करण्याचा समय असतो; धोंडे फेकून देण्याचा समय व धोंडे गोळा करण्याचा समय; आलिंगन देण्याचा समय व आलिंगन देण्याचे आवरून धरण्याचा समय असतो; उपदेशक 3:3-5
>
> त्यानेच आम्हांला नव्या कराराचे सेवक होण्यासाठी समर्थ केले; तो करार लेखी नव्हे, तर आध्यात्मिक आहे; कारण लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जिवंत करतो. 2 करिंथ 3:6

या प्रत्येक वचनात पवित्र शास्त्र दोन-पाउलांची प्रक्रिया प्रकट करते. प्रथम समस्या किती प्रमाणात आहे याचे निदान आहे आणि ते किती वेदनादायक आहे याचे प्रकटीकरण आहे. दुसरे म्हणजे तेथे उपाय आणि सुधारणा हि प्रदान केली आहेत. ह्याच प्रकारे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात करार व वाचा कार्य करतात. 2 करिंथकर 3:6 मधील वचन मरणास कारणीभूत असलेल्या अक्षराच्या कल्पनेला आत्म्याने जीवन देणाऱ्या "de" [G1161] ह्या ग्रीक शब्दाचा वापर करून जोडतो, ज्याचा अर्थ "आणि" असाही होऊ शकतो. द स्ट्राँग्स कॉन्कॉर्डन्स हे स्पष्ट करते की हा एक प्राथमिक क्रम आहे जो "प्रतिकूल किंवा सतत" असू शकतो. दोन करारांचे प्रकरण प्रतिकूल आणि निरंतर आहे. पहिल्या कराराची कृती दुस-या करारास प्रतिकूल आहे कारण ती उघड करते आणि खंडित करते, तर दुसरा करार पुनर्रबांधणी करतो आणि जोडतो. दुसरा करार पहिल्यापासून पुढे चालतो किंवा पुढे चालू ठेवतो या वस्तुस्थितीत हे निरंतर आहे. अब्राहमच्या जीवनात पौलाने स्पष्ट केल्याप्रमाणे आपण ही प्रक्रिया पाहू.

> कारण शास्त्रात असे लिहिले आहे की, अब्राहामाला दोन मुलगे होते, एक दासीपासून झालेला व एक स्वतंत्र स्त्रीपासून झालेला. तरी दासीपासून झालेला देहस्वभावानुसार जन्मला आणि स्वतंत्र स्त्रीपासून झालेला वचनामुळे जन्मला. ह्या गोष्टी दृष्टान्तरूप आहेत. त्या स्त्रिया म्हणजे दोन

> करार होत; एक तर सीनाय पर्वतावरून केलेला; तो गुलामगिरीसाठी मुलांना जन्म देणारा करार, म्हणजे हागार आहे. हागार ही अरबस्तानातील सीनाय पर्वत होय, आणि ती हल्लीच्या यरुशलेमेच्या जोडीची आहे; ती आपल्या मुलाबाळांसह गुलामगिरीत आहे. वर असलेली यरुशलेम स्वतंत्र असून ती आपली माता आहे. गलतीकरांस 4:22-26

देवाने अब्राहामला पुत्र देण्याचे वचन दिले. समस्या अशी होती की अब्राहामाचा देवावर विश्वास नव्हता. त्याला आणि त्याच्या बायकोला मूल होत नाही हे जाणल्यावर त्यांना खूप त्रास झाला होता. हा अनुभव निदान समस्येचा भाग होता. अब्राहम आणि सारा यांच्यावरील विश्वासाची कमतरता प्रकट होण्यासाठी प्रभूने त्यांच्या मुलाच्या जन्मास विलंब करण्याची परवानगी दिली. पुनःस्थापना करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण बरे होण्यासाठी समस्येची संपूर्ण व्याप्ती उघड करणे आवश्यक आहे. प्रभूची वाट पाहण्याऐवजी, अब्राहामने आपल्या पत्नीच्या सांगण्यावरून तिच्या दासीच्या हातून एक मूल जन्माला घातले. उत्पत्ति 16:1-2.

सुरुवातीला हागारला इश्माएल झाला तेव्हा हा एक परिपूर्ण उपाय वाटला, पण गोष्टी लवकरच गुंतागुंतीच्या झाल्या. अब्राहामाचा देवावर विश्वास नसल्यामुळे त्याच्या घरात संघर्षाची बीजे निर्माण झाली. यहुदी आणि मुस्लिम यांच्यातील वैमनस्यपूर्ण भावनांमध्ये हा संघर्ष आजपर्यंत सुरू आहे. विश्वासाच्या कमतरतेचे असे भयंकर परिणाम किती प्रमाणात होऊ शकतात हे या कथेतून स्पष्ट होते. विश्वासाचा अभाव प्रकट करण्यासाठी प्रभुला हे होऊ द्यावे लागले. दुःखाची गोष्ट अशी आहे की या प्रक्रियेत सारा आणि अब्राहम यांनी असे सूचित केले की त्यांना मूल देण्याचे वचन पूर्ण करण्यात विलंब होण्यामागे परमेश्वर दोषी होता.

> साराय अब्रामाला म्हणाली, “पाहा, परमेश्वराने माझी कूस बंद ठेवली आहे; तर माझ्या दासीपाशी जा; कदाचित तिच्याकडून माझे घर नांदते होईल,” तेव्हा अब्रामाने साराय हिचा शब्द मान्य केला. उत्पत्ती 16:2

> मग देवाने अब्राहामाला सांगितले, “तुझी बायको साराय हिला ह्यापुढे साराय म्हणायचे नाही; तर तिचे नाव सारा (राणी) होईल. मी तिला आशीर्वादित करीन, एवढेच नव्हे तर तिच्या पोटी तुला एक मुलगा देईन; मी तिला आशीर्वादित करीन, तिच्यापासून राष्ट्रे उद्भवतील; तिच्यापासून राष्ट्रांचे राजे निपजतील.” अब्राहामाने उपडे पडून व हसून मनातल्या मनात म्हटले, “शंभर वर्षांच्या माणसाला मूल होईल काय? नव्वद वर्षांच्या सारेला मूल होईल काय?” उत्पत्ती 17:15-18

या सर्व घटनांवरून अब्राहम आणि सारा यांच्यामध्ये असलेल्या समस्या उघड होतात. त्यांच्यातील विश्वासाची कमतरता हळूहळू प्रकट होत होती. पौल आपल्याला प्रकट करतो की सारा आणि हागार या दोन स्त्रियांशी अब्राहामाचा संबंध, हे दोन करार कसे कार्य करतात याचे सत्य प्रदर्शित करते. अब्राहमने दोन्ही स्त्रियांशी लग्न केले होते. हागारने प्रथम एक मूल जन्माला घातले परंतु यामुळे अब्राहामला इतका त्रास झाला की त्याला हागार आणि त्याच्या मुलाला पाठवण्यास भाग पाडले गेले. या प्रक्रियेच्या वेदनांनी अब्राहामला त्याच्या विश्वासाच्या अभावामुळे होणारे दुःख दाखवले. मग अब्राहाम नवीन कराराच्या अनुभवात पूर्णपणे प्रवेश करू शकला. ही एक दोन टप्प्यांवर आधारित प्रक्रिया होती ज्यामध्ये दोन करारांमध्ये आच्छादन होते कारण दोन्ही मुलगे एकाच घरात राहत होते. आपला मुलगा इसहाकाला अर्पण करण्याच्या परीक्षेद्वारे शेवटी अब्राहाम नवीन करारात प्रवेश करू शकला. त्याचा परमेश्वरावरील विश्वास डगमगला नाही. त्याच्या विश्वासाच्या परिपूर्णतेने त्याच्यामध्ये ती पुनर्स्थापना घडवून आणली ज्याची देवाला सुरुवातीपासून इच्छा होती.

पुनर्स्थापनेचे हे कार्य घडवून आणण्यासाठी, व अब्राहामाच्या अविश्वासाच्या अभाव उघड करण्यासाठी परमेश्वराला ह्या प्रक्रियेसाठी वेळ द्यावा लागला. प्रभूने अशा घटना घडू दिल्या ज्याने अब्राहमच्या जुन्या विचारसरणीचा नाश केला आणि विश्वासाने त्याला धार्मिकतेच्या निश्चिततेमध्ये वाढवले.

मागील दोन धड्यांमध्ये आपण दैवी आरशाच्या तत्त्वावर चर्चा केली होती. आरसा हे दंतवैद्यांनी वापरलेले एक साधन आहे जे आपल्या तोंडात असलेल्या समस्या दर्शविण्यासाठी वापरतात. आपण उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही अशा समस्या दर्शविण्यासाठी डॉक्टर क्ष-किरण साधन वापरतात. देवाचा नियम आपल्या पापी रोगाची व्याप्ती प्रकट करण्यासाठी एक साधन, आरसा म्हणून कार्य करतो. जर आपण आपले रोग स्वीकारले तर हा दैवी आरसा आपल्याला ख्रिस्ताकडे नेणारे एक साधन आहे.

> ह्यावरून आपण विश्वासाने नीतिमान ठरवले जावे म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचवणारे बालरक्षक होते. गलतीकरांस 3:24

पाप ही एक समस्या आहे जी दैहिक अंतकरणात सुरू होते. या समस्येची सुधारणा करण्यासाठी आपल्या स्वर्गातील पित्याने आपल्या खोट्या विचारसरणीला प्रकट केले पाहिजे. हे काम नियमशात्राच्या माध्यमातून केले जाते. समस्या अशी आहे की बहुतेक लोकांसाठी आपण किती वाईट ह्याचे प्रकटीकरण त्यांना देवावर ते परत प्रतिबिंबित करण्यास प्रवृत्त करते.

> वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही स्वतःची फसवणूक करता. कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व

त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; तो स्वत:ला पाहून तेथून निघून जातो आणि आपण कसे होतो हे तेव्हाच विसरून जातो. परंतु जो स्वातंत्र्याच्या परिपूर्ण नियमांचे निरीक्षण करून ते तसेच करत राहतो, तो ऐकून विसरणारा न होता, कृती करणारा होतो व त्याला आपल्या कार्यात धन्यता मिळेल. याकोब 1:22-25

वचन ऐकणारा परंतु कार्य न करणारा म्हणजे काय? याचे उत्तम उदाहरण इस्त्रायली लोकांच्या कथेत आढळते जेव्हा ते सिनाई पर्वताजवळ आले. देवाने त्यांच्यासाठी पुष्कळ गोष्टी करण्याचे वचन दिले होते पण प्रत्यक्षात त्यांनी ते लक्षपूर्वक ऐकले नाही. देवाची अभिवचने स्वीकारण्याऐवजी, इस्राएली लोकांनी देवाला सांगितले की त्याने वचन दिलेल्या सर्व गोष्टी ते स्वतः करतील.

मी मिसऱ्यांचे काय केले ते व तुम्हांला गरुडाच्या पंखांवर बसवून मी आपणाकडे कसे आणले आहे हे तुम्ही पाहिले आहे; म्हणून आता तुम्ही खरोखर माझी वाणी ऐकाल आणि माझा करार पाळाल तर सर्व लोकांपेक्षा माझा खास निधी व्हाल, कारण सर्व पृथ्वी माझी आहे; पण तुम्ही मला याजकराज्य, पवित्र राष्ट्र व्हाल. हेच शब्द तू इस्राएल लोकांना सांग." मग मोशेने येऊन लोकांच्या वडिलांना बोलावले आणि परमेश्वराने त्याला आज्ञापिलेले हे सर्व शब्द त्यांच्यापुढे मांडले. तेव्हा सर्व लोकांनी एकमुखाने उत्तर दिले, "परमेश्वराने सांगितले आहे ते सर्व आम्ही करू." मोशेने लोकांचे हे शब्द परमेश्वराला कळवले. निर्गम 19:4-8

देवाने त्यांना सांगितले होते की तो सर्वांना आत्म्याने आणि सत्याने त्याच्या वचनांचे पालन करण्यासाठी कृपा देईल. आज्ञापालनाचा साधारण अर्थ असा आहे की देव त्यांना स्वतःसाठी राजे आणि याजकजन बनवेल यावर विश्वास ठेवणे. आज्ञापालन म्हणजे देवासाठी कार्य न करता देव त्यांच्यासाठी उत्तम कार्य करत आहे यावर विश्वास ठेवणे. दुःखाची गोष्ट म्हणजे इस्त्रायलने देवाच्या वचनाला त्यांच्या जीवनात योग्य असे स्थान दिले नाही.

या प्रक्रियेला पवित्र शास्त्र जुना करार म्हंणून दर्शवते. या घटनेवरून हे दिसून आले की मनुष्य देवाचे शब्द ऐकू शकत नाही आणि त्यावर विश्वास देखील ठेऊ शकत नाही.

कारण तो पहिला करार निर्दोष असता, तर दुसरा शोधण्याचा प्रसंग आला नसता. लोकांना दोष लावून तो म्हणतो, "परमेश्वर म्हणतो, पाहा, असे दिवस येत आहेत की, त्यांत इस्राएलाचे घराणे व यहूदाचे घराणे ह्यांच्याबरोबर मी नवा करार करीन; मी त्यांच्या पूर्वजांचा हात धरून त्यांना मिसर देशातून बाहेर आणले, त्या दिवशी मी त्यांच्याशी केलेल्या करारासारखा हा करार असणार नाही; कारण माझ्या कराराप्रमाणे ते वागले नाहीत, आणि मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले, असे प्रभू म्हणतो. कारण

परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर इस्राएलाच्या घराण्याशी जो करार मी करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन, आणि मी त्यांना देव असा होईन, आणि ते मला माझे लोक असे होतील. इब्री 8:7-10

परमेश्वराला माहीत होते की इस्राएली लोक त्याचे लक्षपूर्वक ऐकणार नाहीत, याउलट इस्राएलाने त्यांच्यासाठी जे वचन दिले होते ते स्वतःच करण्याचा प्रयत्न केला. एखाद्याला ख्रिस्ताकडे नेणाऱ्या प्रक्रियेचा हा भाग आहे.

ह्यावरून आपण विश्वासाने नीतिमान ठरवले जावे म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचवणारे बालरक्षक होते. परंतु आता विश्वासाचे आगमन झाले आहे म्हणून आपण ह्यापुढे बालरक्षकाच्या अधीन नाही. गलतीकरांस 3:24-25

देवाला माहीत होते की इस्राएल त्यांची वचने पाळू शकत नाही, परंतु त्याने त्यांना तरीही प्रयत्न करू दिले. जेव्हा ते स्वतः च्या प्रयत्नांवर अवलंबून राहून अयशस्वी होतील, तेव्हा ते देवाच्या वचनावर विश्वास ठेवण्याचे निवडू शकतील.

आपण आधी अब्राहम आणि साराच्या कथेत सूचित केल्याप्रमाणे, मानव म्हणून आपली समस्या ही आहे की जेव्हा परमेश्वर आपल्याला आपला पापीपणा प्रकट करतो तेव्हा आपले नैसर्गिक अंतःकरण हि समस्या परत त्याच्याकडे प्रतिबिंबित करते. साराने सांगितले की परमेश्वराने तिला मूल होण्यापासून रोखले होते. तिने सुचवले की तिला मूल होत नाही तर ह्यात परमेश्वराचा दोष आहे. जेव्हा परमेश्वराने आदामाला विचारले की त्याने झाडाचे फळ खाल्ले काय, तेव्हा आदामाने दोष परत देवावर ढकलला.

देवाने म्हटले, "तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?" आदाम म्हणाला, "जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले." उत्पत्ती 3:11-12

आपल्यातील दोष देवावर प्रतिबिंबित करण्याच्या या समस्येमुळे आपण पवित्र शास्त्र कसे वाचतो आणि त्याचा कसा अर्थ लावतो यावर तीव्र परिणाम होतो. पवित्र शास्त्र आपल्याला आपल्या शारीरिक स्थितीबद्दल चेतावणी देते आणि आपल्या अंतःकरणातील विचार आणि हेतू प्रकट करते की आपण स्वार्थी, कपटी, विनाशकारी आणि खूनी आहोत.

शास्त्रात असे लिहिलेले आहे की, "नीतिमान कोणी नाही, एकदेखील नाही; समंजस कोणी नाही, देवाचा शोध झटून करणारा कोणी नाही; सर्व बहकले आहेत,

ते सारे निरुपयोगी झाले आहेत; सत्कर्म करणारा असा कोणी नाही, एकही नाही." "त्यांचा घसा म्हणजे उघडे थडगे; त्यांनी आपल्या जिभांनी कपट केले आहे; त्यांच्या ओठांच्या आत जोगी सर्पाचे विष आहे." "त्यांचे तोंड शापाने व कडूपणाने भरलेले आहे." "त्यांचे पाय रक्तपात करण्यास जाण्याकरता उतावळे झाले आहेत; त्यांच्या मार्गात विध्वंस व विपत्ती आहेत; त्यांनी शांतीचा मार्ग ओळखून घेतला नाही." "त्यांच्या डोळ्यांपुढे देवाचे भय नाही." रोमकरांस

3:10-18

येशूच्या जीवनात आपल्या स्वभावाची वास्तविकता वैभवशालीपणे भिन्न आहे. त्याने त्याच्या शत्रूंना दाखवलेले प्रेम आणि दया आणि त्याची धीर धरणारी सेवा आपल्या स्वार्थाचा पूर्णपणे निषेध करते. पश्चात्ताप करण्याऐवजी, मानवी हृदय स्वतःच्या पापीपणाचे समर्थन करण्यासाठी या शारीरिक गुणधर्मांना परत देवावर प्रतिबिंबित करतो. आम्ही याकोबाच्या पुस्तकामधील वचन अधोरेखित केल्याप्रमाणे, स्वाभविक मनुष्य देवाचे वचन वाचतो आणि त्याचा स्वतःचा स्वाभविक चेहरा पाहतो.

कारण जर कोणी वचन नुसते ऐकून घेतो व त्याप्रमाणे आचरण करत नाही, तर तो आरशात आपले शारीरिक मुख पाहणाऱ्या माणसासारखा आहे; याकोब 1:23

परमेश्वर हा आपल्या समस्येचे गांभीर्य दाखवणाऱ्या एका वैद्यासारखा आहे, परंतु तो सांगत असलेला आजार अतिशय गंभीर आहे यावर आपला विश्वास बसत नाही. जरी आपण त्यावर विश्वास ठेवला, तरी त्या आजाराच्या पूर्ण उपायाऐवजी आपण तात्पुरते औषधोपचार अधिक पसंत करतो. तरीही पाप कधीच शांती देत नाही , कारण परमेश्वर म्हणतो "दुष्टांना, शांती नाही", देहासाठीहि नाही व भूतग्रस्तांसाठीहि नाही आणि म्हणूनच आपल्या पापी कृत्यांचा परिणामकारक दंड आपल्याला समजण्यासाठी देवाने आपल्याला "जे काही विश्वासाचे नाही ते पाप आहे" हे अनुभवण्याची परवानगी दिली पाहिजे. यशया 48:22, रोमकरांस 14:23.

आपल्याला त्रास असूनही, आपण आपल्या स्वतःच्या पद्धतींद्वारे स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करतो तेव्हा परमेश्वर पाहत असतो, आणि ख्रिस्ताला आपल्या अंतःकरणात कार्य करू देण्याची विनंती आपल्याला करतो. आपले दुःख हे आपल्या स्वतःच्या सदोष स्वभावाचा परिणाम आहे, हे आपल्या भल्यासाठी असलेल्या देवाच्या प्रेमळ मार्गदर्शनामुळे हलके झाले आहे हे आपण अनेकदा पाहण्यात अपयशी ठरतो. त्याऐवजी, आपण कठोर असण्याचा आणि आपल्या वेदनांचा अन्यायकारक चुकीचा अर्थ लावल्याबद्दल त्याला दोष देऊ शकतो. पवित्र शास्त्रात चेतावणी दिल्याप्रमाणे लोक स्वतःचे दोष देवावर प्रक्षेपित करतात.

> हृदय सर्वांत कपटी आहे; ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो? यिर्मया 17:9

> असे तू केलेस तरी मी उगा राहिलो; मी तुझ्यासारखाच आहे असे तुला वाटले; तथापि मी तुझा निषेध करीन. मी तुझी कृत्ये तुझ्यापुढे मांडीन. स्तोत्रसंहिता 50:21

दुर्दैवाने, मानवतेच्या पतनापासून, आपली अंतःकरणे स्वभावाने कपटी आणि खुनी आहेत. जेव्हा स्वाभाविक मनुष्य पवित्र शास्त्र वाचतो तेव्हा तो या वाईट गुणधर्मांना देवावर प्रतिबिंबित करतो. जेव्हा वाचकाद्वारे देवाला हिंसक आणि अत्याचारी समजले जाते तेव्हा हे वाचकाच्या हृदयात आधीपासूनच अस्तित्वात असलेले बीज पूर्णपणे प्रकट आणि विस्तृत होते. पौलाचे स्पष्टीकरण असेच दर्शविते:

> पापाने संधी साधून ह्या आज्ञेच्या योगे माझ्यामध्ये सर्व प्रकारचा लोभ निर्माण केला होता; कारण नियमशास्त्रावाचून पाप निर्जीव आहे. मी नियमशास्त्राविरहित होतो तेव्हा जगत होतो, पण आज्ञा आल्यावर पाप संजीवित झाले आणि मी मरण पावलो. ह्याप्रमाणे ज्या आज्ञेचा परिणाम जीवन व्हायचा तिचाच परिणाम मरण आहे असे माझ्या अनुभवास आले. कारण पापाने आज्ञेच्या योगे संधी साधून मला फसवले व तिच्या योगे मला ठार केले. तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे. तर मग जे उत्तम ते मला मरण असे झाले काय? कधीच नाही! पाप ते पापच दिसावे, म्हणून जे उत्तम त्याच्या योगे ते माझ्या ठायी मरण घडवणारे असे झाले, आणि आज्ञेच्या योगे पाप पराकाष्ठेचे पापिष्ट व्हावे म्हणून असे झाले. रोमकरांस 7:8-13

मनुष्य जुन्या करारात असलेल्या कथांचा वापर करतात ज्यात असे दिसते की देव त्यांच्या स्वत: च्या खुनी स्वभावाची पुष्टी करण्यासाठी लोकांना नष्ट करतो आणि मारतो. पवित्र शास्त्र मनुष्यांना त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते पूर्णपणे प्रकट करू देण्यासाठी काळजीपूर्वक लिहिलेले आहे. पृथ्वीवरील येशूचे जीवन आपल्याला दाखवते की देव कसा आहे. येशूने कधीही कोणालाही मारले नाही, परंतु देवाच्या प्रेमाच्या या परिपूर्ण आरशात पाहण्याऐवजी, लोक वचन ऐकणारे म्हणून जुना करार वाचणे निवडतात आणि त्यांना देवाचा चेहरा कसा आढळतो याद्वारे ते स्वतःचाच चेहरा पाहतात.

> परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. 2 करिंथ 3:18

पृथ्वीवरील येशूच्या जीवनात प्रकट केल्याप्रमाणे प्रभूचा गौरव हे पित्याचे पूर्ण चरित्र आहे.

> जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. योहान 17:4

देवाचे वैभव हे त्याचे चरित्र आहे जसे तो आपल्याला सांगतो:

> तो म्हणाला, “कृपा करून मला तुझे तेज दाखव.” तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने ‘परमेश्वर’ ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर निर्गम 33:18; 34:5-6

जेव्हा आपण येशूच्या गौरवाच्या किंवा चारित्र्याच्या आरशातून पवित्र शास्त्र वाचतो तेव्हा आपल्याला जुन्या करारात असलेले वचन पूर्णपणे वेगळे दिसते. पण ख्रिस्ताचा गौरव आरशात पाहणे कसे शक्य आहे? आपण स्वतःला आरशात बघायला हवं ना? मग आपण ख्रिस्ताला कसे पाहतो?

> ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळवणे देवाला बरे वाटले; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. कलस्सै 1:27

जेव्हा आपण नवीन करारात येतो, तेव्हा आपला पुनर्जन्म होतो आणि ख्रिस्त आपल्या अंतःकरणात प्रकट होऊ लागतो. यामुळे आपण आरशात जे प्रतिबिंबित करतो ते बदलू लागते. जेव्हा आपण ख्रिस्ताला आरशात पाहतो तेव्हा पवित्र शास्त्र वाचण्याची आपली संपूर्ण पद्धत बदलू लागते. आम्ही धडा 18 मध्ये साध्या विधानांबद्दल नमूद केल्याप्रमाणे, आम्हाला ताबडतोब अनेक स्पष्ट विरोधाभास दिसू लागतात जे सहजपणे सोडवले जात नाहीत. जुन्या पासून नवीन कराराच्या अनुभवाकडे बदलण्याच्या प्रक्रियेचा हा पुरावा आहे. पवित्र शास्त्र वाचताना आपली नजर बदलू लागते.

> तेव्हा त्याने त्या आंधळ्याचा हात धरून त्याला गावाबाहेर नेले व त्याच्या डोळ्यांत थुंकून व त्याच्यावर हात ठेवून त्याला विचारले, “तुला काही दिसते काय?” तो वर पाहून म्हणाला, “मला माणसे दिसत आहेत असे वाटते, कारण ती मला झाडांसारखी दिसत आहेत, तरीपण ती चालत आहेत.” नंतर त्याने त्याच्या डोळ्यांवर पुन्हा हात ठेवले; तेव्हा त्याने निरखून पाहिले, आणि तो बरा झाला व सर्वकाही त्याला स्पष्ट दिसू लागले. मार्क 8:23-25

सुरुवातीला आपण माणसांना झाडाप्रमाणे चालताना पाहतो, पण परमेश्वर आपल्या डोळ्यांवर हात ठेवतो तेव्हा आपण त्या गोष्टी स्पष्ट पाहू लागतो आणि किती सुंदर चित्र आपल्या समोर येते!

या सर्वांची गुरुकिल्ली अशी आहे की ख्रिस्तामध्ये खरा उपाय शोधण्यात आपल्याला मदत करण्यासाठी जुन्या कराराचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. नियमशास्त्राद्वारे जुना करार आपल्याला दाखवतो की आपण किती वाईट आहोत जेणेकरून आपण ख्रिस्ताकडे धाव घेऊ आणि नवीन करारात बरे होऊ. या दोन्ही प्रक्रिया नेहमी एकत्र असतात आणि परमेश्वराकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात घडतात. आदाम, नोहा, अब्राहम आणि मोशे यांच्यासाठी आजही तीच प्रक्रिया आहे.

या दुहीस्तरीय प्रक्रियेला वेगळे करण्याचा प्रयत्न जुन्या करारात देवाला फक्त हाडे तोडणे आणि दात खोदणे असे कोणत्याही उपायाशिवाय सादर करतो. यामुळे देव कठोर आणि क्रूर दिसतो. त्याहूनही वाईट गोष्ट म्हणजे आज लोक जे सुवार्ता शिकवतात ते सहसा फक्त येशूवर विश्वास ठेवा आणि आपल्या विकृत हाडे आणि कुजलेल्या दातांबद्दल काळजी करू नका असे शिकवतात. या सुवार्तेमुळे येशू फक्त वरवर आपले जखमा भरतो त्या पूर्णपणे बऱ्या करत नाही असे भासते. एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील ह्या दोन पायऱ्यांचे हे विभक्तीकरण देवाला जुन्या करारात कठोर आणि नवीन करारात तडजोड करणारा व प्रेमळ दिसतो.

या प्रक्रियेच्या गैरसमजात सर्वात मोठी समस्या ही आहे की जेव्हा देव आपल्याला वाचवण्यासाठी आपले पाप प्रकट करतो, तेव्हा आपण चुकून त्यालाच ह्यासाठी कारणीभूत ठरवतो.

> शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली. रोमकरांस 5:20

जेव्हा नियमशास्त्र आपल्या अंतःकरणात आणि मनात प्रवेश करतो तेव्हा तो मनुष्यानंमधील पाप अधिकाधिक दृश्यमान होण्यास प्रवृत्त करतो. ह्यानंतर मनुष्याला ख्रिस्ताकडे वळण्यासाठी आणि उपाय प्राप्त करण्यासाठी आमंत्रित केले जाते.

> तो येऊन पापाविषयी, नीतिमत्त्वाविषयी व न्याय-निवाड्याविषयी जगाची खातरी करील : योहान 16:8

पापासाठी दोषी ठरलेल्या पाप्याला विश्वासाद्वारे त्याचे नीतिमत्त्व - ख्रिस्ताचे धार्मिकता प्राप्त करण्यास सक्षम केले जाते जे पाप्याला चिरंतन न्यायासाठी तयार करते.

ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेण्यासाठी आपण आता एका महत्त्वाच्या मुद्द्यावर आलो आहोत. जेव्हा एखादी व्यक्ती त्यांच्या नैसर्गिक स्थितीत असते, तेव्हा ते देवाच्या कृतींना कसे पाहतात त्यावरून त्यांच्या स्वतःच्या हृदयात काय आहे हे दिसून येते. देवाला हळुवारपणे एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणामध्ये ज्या समस्यांची त्यांला कल्पना नाही ते प्रकट करायचे असते.

तर आता तुझ्या हातून तुझ्या भावाचे पडलेले रक्त प्राशन करण्यास ज्या भूमीने तोंड उघडले आहे, तिचा तुला शाप आहे; तू जमिनीची मशागत करशील तेव्हा ती ह्यापुढे तुला आपले सत्त्व देणार नाही, तू पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होशील." उत्पत्ती 4:11-12

या वचनांमध्ये देव काईनला त्याच्यामध्ये काय आहे ते प्रकट करतो. काईनाने आपल्या पापाद्वारे पृथ्वीवर शाप आणला आहे. त्याने केलेल्या हत्येने त्याच्या प्रतिष्ठेची भावना नष्ट केली गेली आहे आणि तो एक खंडित मनुष्य बनला आहे. हे शब्द काईनचा नाश करण्यासाठी नव्हे तर देवाकडे वळण्याची आणि क्षमा मिळविण्याची विनंती करण्यासाठी काईनला त्याची स्थिती कळावी म्हणून बोलले गेले होते. परंतु काईन कसा प्रतिसाद देतो?

काहीवेळा देव त्या व्यक्तीच्या मनाला प्रतिबिंबित करणाऱ्या आज्ञा देईल जेणेकरून ते विचार त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते प्रकट करतील.

तेव्हा काइन परमेश्वराला म्हणाला, "हा माझा दंड मला सोसवणार नाही इतका भारी आहे. पाहा, ह्या जमिनीवरून तू मला आज हाकून दिले आहे; मी तुझ्या दृष्टीपुढून लपलेला असेन, मी पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होणार; आणि ज्या कोणाला मी सापडेन तो मला ठार करील, असे होईल." उत्पत्ती 4:13-14

जुन्या करारात किंवा स्वाभाविक अवस्थेत, त्याने ज्या आज्ञा लागू केल्या आहेत त्या पृथ्वीवरील येशूच्या जीवनाशी विरोधाभासी आहेत त्या दैवी आरशाच्या कार्याचा पुरावा देतात.

त्याच्या स्थितीचे सत्य म्हणून आपला आजार स्वीकारण्याऐवजी, काइनाने दोष परत देवावर टाकला. काईन आपल्या भावाला मारल्याबद्दल पश्चात्ताप करण्यास नकार देतो आणि म्हणून त्याला शांती मिळू शकत नाही. आपल्या भावाच्या हत्येचा अपराध दिवसरात्र त्याच्यावर असतो ज्यामुळे तो सतत फरार म्हणून स्वतःच्या अंतकरणात धावत असतो. काहीवेळा देव त्या व्यक्तीच्या मनाला प्रतिबिंबित करणाऱ्या आज्ञा लागू करेल जेणेकरून त्यांचे विचार त्यांच्या निर्णयातून प्रकट होतील, आणि अशा प्रकारे त्यांच्या अंतःकरणात काय आहे ते प्रकट होईल. जेव्हा इस्राएलला दुसऱ्या देशाची हेरगिरी

करायची होती, तेव्हा देवाने त्यांना पुढे जाण्याची आज्ञा दिली. याचा परिणाम असा झाला की 12 पैकी 10 हेर विश्वास नसलेला अहवाल घेऊन परत आले.

> तेव्हा तुम्ही सगळे माझ्याकडे येऊन म्हणालात, 'आम्ही माणसे पुढे पाठवतो म्हणजे ती त्या देशाची माहिती मिळवून कोणत्या मार्गाने आम्हांला जावे लागेल व कोणकोणती नगरे लागतील ह्याची आम्हांला खबर आणतील.' ही गोष्ट मला पसंत पडली म्हणून प्रत्येक वंशामागे एक अशी तुमच्यातली बारा माणसे मी निवडून काढली; अनुवाद 1:22-23

> परमेश्वर मोशेला म्हणाला, "मी इस्राएल लोकांना कनान देश देत आहे, तो हेरण्यासाठी माणसे पाठव; त्यांच्या वाडवडिलांच्या प्रत्येक वंशातला एकेक पुरुष पाठव; प्रत्येक जण त्यांच्यातला सरदार असावा. गणना 13:1-2

पुरुषांना देशाची हेरगिरी करण्यास सांगितले कारण त्यांचा देवाच्या वचनावर विश्वास नव्हता. प्रभूला त्यांना त्यांच्यातील विश्वासाची कमतरता दाखवण्यास मदत करायची होती म्हणून त्याने त्यांचे विचार त्यांच्याकडे परत आणले आणि त्यांच्या मनात आधीपासूनच काय आहे याची त्याने त्यांना खात्री पटवून दिली: त्यांना स्वतःच्या बळावर दुसऱ्या देशाची जमीन घायची होती.

जेव्हा देवाने जुन्या करारामध्ये आज्ञा दिल्या ज्या येशूच्या जीवनाशी विरोधाभासी वाटत होत्या, तेव्हा ते देवाच्या खऱ्या इच्छा प्रतिबिंबित न करता मानवी पापीपणा दाखवण्यासाठी होते. या आज्ञा लोक विश्वासामध्ये कसे कमी पडत आहेत हे अधोरेखित करण्यासाठी होते, देवाच्या वास्तविक इच्छा प्रकट करण्यासाठी नाही. हा गैरसमज अनेकदा पवित्र शास्त्राच्या वाचकांना गोंधळात टाकतो आणि त्यांची दिशाभूल करतो.

बलामचेच उदाहरण घ्या. देव बलामला सांगतो की जाऊन इस्राएलला शाप देऊ नको. सुरुवातीला बलाम देवाची आज्ञा पाळतो पण जेव्हा बालाकचे लोक त्याला मोठ्या सन्मानाचे वचन देऊन परततात तेव्हा तो डगमगू लागतो आणि लोकांना थांबायला सांगतो.

> रात्री देव बलामाकडे येऊन त्याला म्हणाला, "हे पुरुष तुला बोलवायला आलेले असतील तर त्यांच्याबरोबर जा; मात्र जे मी तुला सांगेन तेवढेच कर." बलाम सकाळी उठला आणि आपल्या गाढवीवर खोगीर घालून मवाबी सरदारांबरोबर गेला. गणना 22:20-21

ही आज्ञा बलामच्या त्याठिकाणी जाण्याच्या इच्छेचे प्रतिबिंब होते. त्याने स्वत:ला पाहावे म्हणून परमेश्वराने त्याला त्याची इच्छा परत सांगितली. जर आपल्याला ही करार प्रक्रिया समजली नाही तर पुढील वचनांचा काहीच अर्थ नाही.

पण तो गेल्यामुळे देवाचा कोप भडकला आणि त्याला अडवण्यासाठी परमेश्वराचा दूत वाटेत त्याला आडवा आला. बलाम गाढवीवर बसलेला होता आणि बरोबर त्याचे दोन सेवक होते. गणना 22:22

आपल्याला आठवते कि हिब्रू शब्द "क्रोध" ह्याला "दुःखी" म्हणून देखील अनुवादित केले जाऊ शकते. बलामने त्या माणसांसोबत जाण्याचे निवडले हे पाहून परमेश्वर दुःखी झाला आणि त्याला सावध करण्यासाठी देवाने त्याचा देवदूत पाठवला. बलामला समजले आहे की त्याने घरी परतले पाहिजे परंतु एक छोटासा शब्द त्याच्या हृदयात होता तो शब्द म्हणजे - जर.

> तेव्हा बलाम परमेश्वराच्या दूताला म्हणाला, मी पाप केले आहे. तू रस्त्यात उभा आहेस हे मला माहीत नव्हते. मी जर चूक करीत असेन तर मी घरी परत जाईन. गणना 22:34

ही परमेश्वराची इच्छा नाही हे बलामला माहीत होते. गाढव आणि परमेश्वराच्या दूताच्या संपूर्ण प्रकरणाने स्पष्टपणे दर्शविले की तो जे करत होता ते चुकीचे होते. त्याने आपले पाप कबूल केले, परंतु तो म्हणाला, "जर मी परत जावे असे तुम्हाला वाटत असेल तर मी परत जाईन." आता परमेश्वराने त्याच्याशी पुन्हा आरशात बोलले पाहिजे.

> तेव्हा परमेश्वराचा दूत बलामास म्हणाला, नाही! तू या लोकांबरोबर जाऊ शकतोस. पण सावध रहा. मी जे सांगेन तेच शब्द बोल. म्हणून बलाम बालाकाने पाठवलेल्या पुढाऱ्यांबरोबर गेला. गणना 22:35

बलामाला जाउदेण्याची दैवी आज्ञा हि त्याच्या स्वतःच्याच विचारसरणीचे प्रतिबिंब आहे कारण बलाम जुन्या करारात आहे. जेव्हा देव पाहतो की लोक एका विशिष्ट मार्गाचे अनुसरण करण्याचा निर्धार करतात, तेव्हा तो त्यांना त्यांच्या स्वतःच्या इच्छेविरूद्ध प्रतिबंधित करू इच्छित नाही.

> पण त्यांनी ऐकले नाही, त्यांनी आपला कान दिला नाही; ऐकू नये व शिक्षण घेऊ नये म्हणून त्यांनी आपली मान ताठ केली. यिर्मया 17:23

तो त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य देतो. ह्यामुळे पापाच्या बीजाला वाढ मिळते व पाप भरपूर प्रमाणात वाढू लागते. जेव्हा पाप भरपूर होते तेव्हा पश्चात्ताप करण्याची आणि योग्य मार्ग निवडण्याची संधी पुन्हा येते ज्यामुळे कृपा खूप जास्त होऊ शकते.

जेव्हा इस्राएल राष्ट्राने राजा मागितला होता त्या उदाहरणावर आपण पुन्हा एकदा विचार करूयात. देवाने त्यांना या मागणीविरुद्ध चेतावणी दिली पण ते लोक जिद्दी होते. त्यामुळे देवाने त्यांना त्यांच्या इच्छेनुसार राजा दिला. हे करण्याची देवाची इच्छा नव्हती परंतु त्यांच्या स्वतःच्या इच्छेच्या आरशात देवाने लोकांना त्यांचा पृथ्वीवरील राजा दिला.

मोशेच्या काळात, देवाने इस्राएलला सांगितले होते की कनानी लोकांना मधमाश्यांच्या सहाय्याने हाकलून दिले जाईल. येथे त्यांना मारून नष्ट करण्याचा

उल्लेख नव्हता. तरीही इस्त्राएलाच्या लोकांनी त्यांच्या खुनी इच्छा गणना 21 मध्ये प्रकट केल्या.

> अथारीमच्या वाटेने इस्राएल लोक येत आहेत असे नेगेब प्रदेशात राहणाऱ्या अरादाच्या कनानी राजाने ऐकले, तेव्हा त्याने इस्राएलांशी युद्‌ध करून कित्येकांना कैद केले. तेव्हा इस्राएलाने परमेश्वराला असा नवस केला की, “जर तू खरोखर ह्या लोकांना माझ्या हाती देशील तर मी त्यांच्या नगरांचा समूळ नाश करीन.” इस्राएलाचे हे म्हणणे ऐकून परमेश्वराने कनानी लोकांना त्याच्या हाती दिले आणि त्याने त्यांचा व त्यांच्या नगरांचा समूळ नाश केला; म्हणून त्या ठिकाणाचे नाव हर्मा (म्हणजे विनाश) असे पडले. गणना 21:1-3

देवाने त्यांची इतर राष्ट्रांना मारण्याची इच्छा ऐकली, म्हणून भविष्यात, त्याने त्यांना त्यांच्या शत्रूंचा नाश करण्यासाठी अशाच आज्ञा दिल्या, ज्या त्यांना समाधानकारक वाटल्या.

> कारण ते सुशिक्षण ऐकून घेणार नाहीत, तर आपल्या कानांची खाज जिरावी म्हणून ते स्वेच्छाचाराने आपणांसाठी शिक्षकांची गर्दी जमवतील, 2 तीमथ्य 4:3

जर आपणास करारांची दुहिस्तरीय प्रक्रिया समजत नसेल तर आपण मनुष्याच्या पापीपणाचे दोष स्वतः देवाच्या चरित्राला देऊ!

जर आपणास करारांची दुहिस्तरीय प्रक्रिया समजत नसेल तर आपण मनुष्याच्या पापीपणाचे दोष स्वतः देवाच्या चरित्राला देऊ! शतकानुशतके पवित्र शास्त्र वाचण्यात लोकांनी केलेली सर्वात मोठी चूक म्हणजे प्रेमळ देवाच्या प्रतिमेवर सूड घेण्याची त्यांची इच्छा प्रक्षेपित करणे.

जो कोणी ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारतो त्याने हे देखील स्वीकारले पाहिजे की ते स्वतः देवाच्या पुत्राच्या मृत्यूसाठी दोषी आहेत. हे सत्य वस्तुस्थिती उघड करते की मनुष्य स्वभावाने देव आणि त्याच्या पुत्राचा द्‌वेष करतात. द्‌वेषाच्या या भावनेला न्याय देण्याच्या प्रयत्नात, माणसे आपले हिंसक गुणधर्म देवावर प्रतिबिंबित करतात, आणि त्याला सर्व मानवतेचा नाश करणारा म्हणून घोषित करतात, अशा प्रकारे मनुष्य ज्यांचा तिरस्कार करतात त्यांच्याविरुद्‌ध हत्येच्या आत्म्याचे समर्थन करतात आणि गुप्तपणे ते राखून ठेवतात किंवा उघडपणे कबूल करतात. त्यांना त्यांच्या शत्रूंला नरकाच्या अग्नीमध्ये जळत असताना व मारले जाताना पाहण्याची इच्छा असते.

सध्याची वेळ देवाची भीती बाळगण्याची आणि त्याचा गौरव करण्याची आहे. देवाचे खरे चरित्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेताना, आपण एका भीतीदायक सूडबुद्धीच्या देवापासून दूर झालो आहोत आणि, देवावर चुकीचे आरोप केल्याबद्दल अंतःकरणापासून पश्चात्ताप करण्यास, व येशूमध्ये उच्च प्रेम शोधण्यास प्रवृत्त झालो आहोत.

> प्रीतीच्या ठायी भीती नसते; इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते; भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही. 1 योहान 4:18

एक प्रकाश निर्माण होऊ लागला आहे आणि परमेश्वराचा महिमा आता प्रकट होत आहे. जेव्हा आपण तारणाच्या योजनेतील करारांची प्रक्रिया खरोखर समजून घेण्यास सुरुवात करू, तेव्हा देवाच्या चारित्र्याबद्दल आपल्या अंतकरणात असलेले शंका त्याच्या प्रकटीकरणाच्या तेजस्वी प्रकाशाने दूर होतील.

पविता शास्त्रामधील काही अत्यंत हिंसक कथांचे परीक्षण करण्यासाठी आणि त्यामध्ये संयम, शहाणपण, न्याय, दया आणि देवाचे प्रेम पाहण्यासाठी या तत्त्वांच्या अभ्यासासाठी आता आपल्याकडे उत्तम साधने आहेत.

## 22. सर्वात नम्र मनुष्य मोशे

> मोशे हा पुरुष तर भूतलावरील सर्व मनुष्यांपेक्षा नम्र होता. गणना 12:3

विकृती, गुलामगिरी, मानवी बलिदान आणि युद्धाच्या युगात लिहिलेले हे वचन अंधकारमय जगात प्रकाशाचे एक किरण म्हणून उभे राहते. मोशे एक अतिशय नम्र, सौम्य मनुष्य होता. त्याने ख्रिस्ताचे निस्वार्थ प्रेम अशा प्रकारे प्रकट केले जे त्याच्या आधी व नंतर थोडक्याच लोकांनी केले होते.

ज्या लोकांना मोशेच्या नेत्तृत्वामध्ये मिसर देशातून सुटका मिळाली त्या लोकांचे घृणास्पद अपराध जेव्हा त्याने पहिले आणि त्याच लोकांनी मोशेवर अनेक आरोप केले व त्याला ठार मारण्याचा देखील प्रयत्न केला, तरीही मोशेने त्यांच्या सर्वांसाठी प्रार्थना केली. बऱ्याच वाचकांना असे वाटते की त्या लोकांचा नाश व्हायला हवा होता - परंतु मोशेने प्रार्थना केली, "त्यांच्याऐवजी माझे नाव जीवनाच्या पुस्तकातून काढून टाक."

> मोशे परमेश्वराकडे परत जाऊन म्हणाला, “हाय! हाय! ह्या लोकांनी घोर पातक केले आहे; ह्यांनी आपल्यासाठी सोन्याचे देव बनवले. तरी आता तू त्यांच्या पातकांची क्षमा करशील तर म आणि न करशील तर तू लिहिलेल्या पुस्तकातून मला काढून टाक.” निर्गम 32:31-32

हे वचन वाचून त्वरीत पुढे जाणे सोपे आहे - परंतु ज्यांना आपली काळजी नाही, किंवा जे आपला द्वेष करतात आणि जे लोक आपल्याला ठार मारण्याचा प्रयत्न करतात अश्या लोकांसाठी आपले अनंतकाळचे जीवन गमावणे? देवाच्या गौरवाने ज्यांचा चेहरा चमकतो असे नोंदवलेली दुसरी दैवी रचना म्हणजे देवदूत. ह्या मनुष्याने चाळीस वर्षे वाळवंटात मेंढरांची काळजी घेण्यात, कोकऱ्यांना सांभाळण्यात, त्यांना योग्य मार्गाने नेण्यात आणि धोक्यापासून त्यांचे संरक्षण

करण्यात घालवली. सिनाई पर्वतावर, त्याने देवाच्या उपस्थितीत चाळीस दिवस घालवले आणि मनुष्यांच्या सर्वात दयाळू, व प्रेमळ तारणकर्त्याशी त्याने संवाद साधला. मोशेला तारणाची योजना समजली; त्याने देवाची महिमा पाहण्याची कळकळीची विनंती केली होती आणि देवाने मोशेला आपले चरित्र प्रकट केले जे दयाळू, सहनशील, अनुग्रह करणारा आणि सत्यात भरपूर असे आहे. मोशेला लोकांद्वारे लावण्यात आलेल्या दोषांचा आणि अपमानाचा खूप त्रास झाला. तरीही त्याने अश्या मनुष्यांच्या जीवनासाठी देवासमोर याचना केली. देवाला मोशेला पुन्हा जिवंत करायचे होते आणि त्याच्यासोबत संगती करायला त्याला स्वर्गात घेऊन जायचे होते यात आश्चर्य नाही. त्याला त्यांच्यामधील गोड सहवास चालू ठेवायचा होता आणि लोकांना वाचवण्याच्या कार्यात मोशेला पृथ्वीवर असताना येशूची मदत करायची होती.

या पार्श्वभूमीवर, मागील अध्यायातील तत्त्वांसह, आम्ही मोशेच्या जीवनाशी संबंधित काही अत्यंत हिंसक कथांचा शोध घेणार आहोत.

> तेव्हा मोशे छावणीच्या प्रवेशद्वारात उभा राहून म्हणाला, “परमेश्वराच्या पक्षाचा जो कोणी असेल त्याने माझ्याकडे यावे.” तेव्हा लेवी वंशातले सर्व लोक त्याच्याजवळ जमा झाले. तो त्यांना म्हणाला, “इस्राएलाचा देव परमेश्वर म्हणतो की, ‘तुम्ही प्रत्येकाने आपल्या कंबरेस तलवार लटकवावी आणि छावणीच्या ह्या प्रवेशद्वारापासून त्या प्रवेशद्वारापर्यंत चहूकडे फिरून आपले बंधू, सोबती व शेजारी ह्यांचा वध करावा.”’ मोशेच्या सांगण्याप्रमाणे लेवी वंशाच्या लोकांनी केले आणि त्या दिवशी सुमारे तीन हजार लोक पडले. निर्गम 32:26-28

जेव्हा इस्त्रायलच्या पापाची क्षमा करणे शक्य नसेल तर मोशेने आपले अनंतकाळचे जीवन अर्पण करण्याची इच्छा दर्शवली हे त्या अगोदरचे चार वचने आहेत. मोशेला देवाचे महान प्रेम आणि त्याची दया माहीत होती, आणि तरीही त्याच्या मनात हे होते की त्यांनी केलेले गंभीर पाप देवासमोर पूर्णपणे अयोग्य आणि दुष्टपणाचे होते. हा कोणता दुष्टपणा होता? मिसर देशाच्या देवतांपैकी एक "सोन्याचे वासरू" ह्याची मूर्तिपूजा ते करत होते.

> तेव्हा परमेश्वर मोशेला म्हणाला, “चल, खाली उतर, कारण ज्या तुझ्या लोकांना तू मिसर देशातून आणले ते बिघडले आहेत; ज्या मार्गाने त्यांनी जावे म्हणून मी त्यांना आज्ञा केली होती तो मार्ग लवकरच सोडून ते बहकून गेले आहेत; त्यांनी एक ओतीव वासरू करून त्याची पूजाअर्चा केली. त्याला बली अर्पण केले. ‘हे इस्राएला, ज्यांनी तुला मिसर देशातून आणले आहे तेच हे तुझे देव,’ असे ते म्हणू लागले आहेत.” निर्गम 32:7-8

केवळ चाळीस दिवसांपूर्वीच सर्व इस्राएलांनी खऱ्या देवाची उपासना करण्याचे वचन दिले होते आणि त्याला एकनिष्ठ राहण्याचे वचन दिले होते. पण सहा आठवड्यांपेक्षा कमी कालावधीत ते अन्यदेवतांसाठी नाचत होते, मद्यपान करत होते आणि इजिप्तच्या निरुपयोगी देवतांना बळी अर्पण करत होते.

संपूर्ण समस्या समजून घेण्यासाठी आम्हाला परिस्थितीचे अधिक व्यापकपणे तपासणी करणे आवश्यक आहे. पीडांच्या घटनांपूर्वी परमेश्वराने अब्राहाम, इसहाक आणि याकोब यांच्याशी केलेल्या कराराच्या पूर्ततेसाठी इस्राएल लोकांना सात गोष्टींचे वचन दिले होते. ही वचने निर्गम 6:6-8 मध्ये नोंदवली आहेत:

1. मी तुम्हाला मिसरी लोकांच्या ओझ्यातून बाहेर काढीन..
2. मी तुला त्यांच्या बंधनातून मुक्त करीन...
3. मी तुला त्यांच्या दास्यातून मुक्त करीन आणि हात पुढे केलेल्या बाहूने व मोठ्या शिक्षा करून तुमचा उद्धार करीन...
4. मी तुम्हांला आपली प्रजा करून घेईन...
5. मी तुमचा देव होईन; म्हणजे तुम्हांला मिसरी लोकांच्या ओझ्याखालून काढणारा मी तुमचा देव परमेश्वर आहे हे तुम्हांला कळेल...
6. जो देश अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांना देण्याची शपथ हात उभारून मी वाहिली होती त्यात मी तुम्हांला नेईन......
7. तो तुम्हांला वतन करून देईन; मी परमेश्वर आहे....

हे सार्वकालिक करारात येण्याचे आमंत्रण होते. त्यांना फक्त ही वचने स्वीकारायची होती आणि त्यावर विश्वास ठेवायचा होता. परंतु इस्रायलने कसा प्रतिसाद दिला?

> मोशेने हे सारे इस्राएल लोकांना सांगितले; पण ते आपल्या मनाच्या संतापामुळे आणि बिकट दास्यामुळे मोशेचे ऐकेनात. निर्गम 6:9

त्यांनी ह्या संधीबद्दल ऐकण्यास किंवा स्वीकारण्यास नकार दिला. एवढ्या अप्रतिम संधीला तुम्ही का नकार द्याल! ह्याचे उत्तर “मनाच्या संतापामुळे आणि बिकट दास्यामुळे" या शब्दांमध्ये आहे. त्यांनी त्यांच्या कठोर परिस्थितीसाठी परमेश्वराला दोष दिला आणि अशा प्रकारे त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवण्यास नकार दिला. त्यांची गुलामगिरी केवळ त्याच्या स्वतःच्याच कृत्याचे प्रतिबिंब होते. त्यांच्यापैकी पुष्कळांनी खऱ्या देवाची उपासना करणे सोडून दिले होते, हे त्यांच्या सोन्याच्या वासराच्या उपासनेवरून दिसून येते. त्यांनी शब्बाथ आणि देवाच्या आज्ञांशी संबंधित असलेल्या सर्व नियमांचा त्याग केला होता. ही पूर्णपणे त्यांची स्वतःची चूक होती. तरीही आपल्या पापाची कबुली देण्याऐवजी आणि कृतज्ञतेने देवाने दिलेली संधी स्वीकारण्याऐवजी, त्यांनी स्वतःचे अपराध देवावर प्रक्षेपित करण्याचे निवडले. मानवी हृदय किती दुष्ट आहे! एवढ्या वर्षांच्या गुलामगिरीतून चमत्कारिकरीत्या सुटका मिळाल्यानंतर त्यांनी पश्चात्ताप करण्यास आणि त्यांच्या

अपराधांची जबाबदारी स्वीकारण्यास पूर्णपणे नकार देऊन, गर्विष्ठपणे उभे राहिले.

बहुसंख्य लोकांनी ऐकण्यास नकार दिला तरीही देवाने त्याच्या महान दया आणि प्रेमाने त्यांना सोडवण्याचे निवडले. जोपर्यंत ते तांबडा समुद्र ओलांडल्यानंतर त्यांच्या शत्रूंना किनाऱ्यावर मरण पावलेले पाहतील तेव्हाच त्यांना ते खरोखरच मोकळे झाल्याचे समजले. शारिरीक गुलामगिरीतुन ते मुक्त झाले होते परंतु त्यांच्या, मनाच्या बेड्या अजून घट्ट धरून होत्या. त्यांच्या अंतकरणात कुरकुर आणि तक्रारी सुरू होत्या.

> त्या रानात इस्राएल लोकांच्या सर्व मंडळीने मोशे व अहरोन ह्यांच्या संबंधाने कुरकुर केली. इस्राएल लोक त्यांना म्हणू लागले की, "आम्ही मिसर देशात मांसाच्या भांड्याभोवती बसून भरपूर जेवत होतो तेव्हा आम्हांला परमेश्वराच्या हातून मरण आले असते तर पुरवले असते; पण ह्या सर्व समुदायाला उपासाने मारावे म्हणून तुम्ही आम्हांला ह्या रानात आणले आहे." निर्गम16:2-3

येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की संपूर्ण मंडळीने मोशे आणि अहरोन यांच्याविरुद्ध कुरकुर केली. पहिल्यापासून शेवटपर्यंत या सर्वांनी मोशे आणि अहरोनाने घेतलेल्या निर्णयांबद्दल तक्रार केली, जरी त्यांना दिवसा ढग आणि रात्री अग्नीचा स्तंभ दैवी मार्गदर्शनाचा पुरावा म्हणून दिसत होता तरीही.

कुरकुर करणारा व आरोप करणारा आत्मा हा सैतानाचा आत्मा आहे. तो आपल्या बांधवांवर आरोप करणारा आहे आणि ह्याच आत्म्याने वाळवंटाच्या प्रवासात संपूर्ण इस्राएलाच्या मंडळीवर राज्य केले. आम्हाला आठवते की इस्रायलच्या मुलांपैकी कोणीही देवाची हि सात वचने स्वीकारली नव्हती परंतु त्यांच्या परिस्थितीसाठी त्यांनी देवाला दोष देणे निवडले होते. देवाच्या ह्या लहानशा चाचण्यांचा उपयोग त्यांचा विश्वास बळकट करण्यासाठी वापरल्या होत्या, परंतु ह्या चाचण्यांनी लोकांच्या कृतज्ञतेची खरी कमतरता प्रकट केली. इस्राएलाच्या राष्ट्रात कोणीही सार्वकालिक करारात नव्हता आणि त्यापैकी कोणीही ख्रिस्ताच्या आत्म्याने भरलेला नव्हता. हे पुढील अध्यायात अधिक स्पष्ट होईल.

> मग इस्राएल लोकांच्या सर्व समुदायाने सीन रानातून कूच केले, आणि परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे मजल करून रफीदीम येथे तळ दिला; तेथे त्यांना प्यायला पाणी नव्हते. म्हणून ते मोशेशी भांडू लागले व म्हणाले, "आम्हांला प्यायला पाणी दे." तेव्हा मोशे त्यांना म्हणाला, "तुम्ही माझ्याशी का भांडता? परमेश्वराची परीक्षा का पाहता?" पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले, "आम्हांला, आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस?" मोशेने परमेश्वराचा धावा करून म्हटले, "ह्या लोकांना मी काय करू? हे तर मला जवळजवळ दगडमार करायला तयार

झाले आहेत.” निर्गम 17:1-4

देवाने मोशेचा उपयोग करून त्यांना मिसर देशामधून बाहेर आणल्याबद्दल त्याचे आभार मानण्याऐवजी, लोकांनी मोशेवर आरोप केला आणि त्याला जीवे मारण्यासाठी त्यांच्यापैकी काहींनी त्याला दगडमार करण्याचाही विचार केला.

मिसर देशामध्ये केलेल्या ह्या खोट्या आरोपांसाठी किंवा त्यांच्या मूर्तिपूजेसाठी इस्रायलच्या मुलांनी त्यांच्या अपराधांबद्दल पश्चात्ताप केला आहे असे सूचित करणारा कोणताही पुरावा नाही. ते देवाच्या आत्म्याने भरलेले नव्हते, तर ते आरोप करणाऱ्या, सुख शोधणाऱ्या आत्म्याने भरलेले होते. अश्या मनःस्थितीतच इस्रायलच्या मुलांनी देवाची आज्ञा पाळण्याचे वचन दिले. ते सर्व चमत्कार मोशेने स्वतःच्या सामर्थ्याने केले नव्हते हे त्यांना माहीत होते. मोशेवरील त्यांचे आरोप निर्गम 6:9 मध्ये आढळलेल्या देवावरील त्यांच्या मूळ आरोपांचे प्रतिबिंब होते - त्यांनी त्यांच्या गुलामगिरीवर नाराजी व्यक्त केली आणि त्यासाठी देवाला दोष दिला. हा संताप त्यांच्या अंतःकरणात तसाच होता जेव्हा त्यांनी देवाने सांगितलेल्या सर्व गोष्टी पाळण्याचे वचन दिले होते.

परमेश्वराला माहित होते की ते येशूच्या आत्म्याने भरलेले नाहीत आणि म्हणून ते त्यांचे वचन पाळू शकत नाहीत. संतापाची ती बीजे प्रकट व्हावीत म्हणून त्याने मोशेला चाळीस दिवस डोंगरावर नेले. मोशे डोंगरावर किती काळ राहणार हे इस्राएली लोकांना माहीत नव्हते. त्यांना वाटले की तो तेथेच मेला असावा आणि अशाप्रकारे मिसर देशाच्या देवतांच्या उपासनेत त्यांचा संताप प्रगट झाला.

लेवी, जे मोशेच्या वंशाचे होते, त्यांनी सोन्याच्या वासराच्या उपासनेत भाग घेतला नाही. त्यांच्या अंतःकरणात देवाच्या आत्म्याच्या प्रभावाशिवाय लेवी वंश केवळ स्वतःला त्यांच्या भावांडापेक्षा श्रेष्ठ समजू शकत होते. देवाने लेवींना अभिषेक करण्याच्या कोणताही पुरावा आम्हाला आढळत नाही. निर्गम 16 मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे त्यांनी मोशेविरुद्ध कुरकुर केली होती. त्यांनी इतर सर्वांसोबत देवाची आज्ञा पाळण्याचे वचन दिले होते आणि म्हणून ते जुन्या कराराच्या मानसिकतेत होते. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे कारण, मागील अध्यायात दर्शविल्याप्रमाणे - जेव्हा लोक जुन्या करारात असतात, तेव्हा देव त्यांच्याशी त्यांच्या स्वतःच्या मनातील विचारांच्या भाषेत बोलतो जेणेकरून पाप अधिक पूर्णपणे उघड व्हावे.

देवाचा न्याय कसा होतो हे आपण काळजीपूर्वक वाचले आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आपण ह्या मुद्द्यावर थांबणे आणि चिंतन करणे आवश्यक आहे. हे थेट देवाच्या नियमशास्त्रामध्ये लिहिलेले आहे. ही एकमेव पद्धत आहे ज्याद्वारे देव लोकांवर न्याय आणतो.

> आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नकोस; वर आकाशातील, खाली पृथ्वीवरील व पृथ्वीखालच्या जलातील कशाचीही प्रतिमा करू नकोस. त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो; आणि जे माझ्यावर प्रेम करतात व माझ्या आज्ञा पाळतात अशांच्या हजारो पिढ्यांवर मी दया करतो. निर्गम 20:4-6

जेव्हा मोशेने देवाला त्याचे गौरव प्रकट करण्यास सांगितले तेव्हा परमेश्वर त्याच गोष्टी सांगतो परंतु थोड्या वेगळ्या पद्धतीने.

> तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने 'परमेश्वर' ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो." निर्गम 34:5-7

माझा द्वेष केल्याबद्दल त्यांच्या पुत्रपौत्रांचा पीढीपर्यंत समाचार घेण्याचा अर्थ काय? प्रथम, आपण हे स्पष्ट करूया की हे अशा पिढ्यांवर येते जी पिढी सतत देवाचा द्वेष करते. देवाचा द्वेष करणे म्हणजे त्याच्या संरक्षणाचा प्रतिकार करणे होय. म्हणून दुष्टाईबद्दल समाचार घेणे म्हणजे पापाचे परिणाम पापी व्यक्तीवर पडतात. पवित्र शास्त्र आपल्याला हे अनेक वेळा सांगते.

> परमेश्वराने न्यायनिवाडा करून स्वतःला प्रकट केले आहे; दुर्जनास त्याच्याच हातच्या पाशात त्याने गुंतवले आहे. स्तोत्रसंहिता 9:16

> मी तर कृपादृष्टी करणार नाही, गय करणार नाही, त्यांच्या आचाराचे प्रतिफळ त्यांच्या शिरी लादीन." यहेज्केल 9:10

आम्हाला माहीत आहे की, इस्राएल लोक परिस्थितीचे निराकरण करण्यासाठी तलवारीचा वापर करण्यास तयार होते. इस्त्राएली लोक सिनाई पर्वताजवळ येण्यापूर्वी त्यांनी अमालेकियांशी त्यांच्या मानसिकतेनुसार व्यवहार केला होता.

> तेव्हा मोशेने यहोशवाला सांगितले, “आपल्यांतले काही पुरुष निवडून काढ आणि जाऊन अमालेकाशी युद्ध कर; उद्या मी देवाची काठी हाती घेऊन टेकडीच्या माथ्यावर उभा राहीन.” मोशेच्या सांगण्याप्रमाणे यहोशवाने केले व तो अमालेकाशी लढू लागला; मोशे, अहरोन आणि हूर हे टेकडीच्या माथ्यावर चढून गेले. त्या वेळी असे झाले की, मोशे आपले हात वर करी तेव्हा इस्राएलाची सरशी होई व तो आपले हात खाली करी तेव्हा अमालेकाची सरशी होई. मोशेचे हात भरून आले; तेव्हा त्यांनी एक धोंडा घेऊन मोशेच्या खाली ठेवला व तो त्यावर बसला, आणि अहरोन आणि हूर ह्यांनी दोन्ही बाजूंनी त्याचे हात वर उचलून धरले म्हणून सूर्य मावळेपर्यंत त्याचे हात स्थिर राहिले. मग यहोशवाने आपल्या तलवारीच्या धारेने4 अमालेकाचा व त्याच्या लोकांचा पाडाव केला. निर्गम 17:9-13

मोशेने अमालेकी लोकांशी लढण्याचे स्वतः निवडले किव्हा मोशेला देवाने इस्राएली लोकांच्या स्वतःच्या विचारांचे प्रतिबिंबि करण्याची परवानगी दिली हे आम्हाला सांगितलेले नाही. पण आम्हांला हे माहीत आहे की कनानचा देश घेताना इस्राएलच्या मुलांनी कोणालाही ठार मारावे हा देवाचा हेतू नव्हता.

> ज्या ज्या लोकांच्या विरुद्ध तू जाशील त्यांना मी आधीच दहशत घालून त्यांची फसगत करीन. तुझ्या सर्व शत्रूंना पाठ दाखवायला लावीन. मी तुझ्यापुढे गांधीलमाशा पाठवीन; त्या हिव्वी, कनानी आणि हित्ती ह्यांना तुझ्यापुढून पळायला लावतील. निर्गम 23:27-28

जर इस्राएल लोकांनी करारातील देवाची सात वचने स्वीकारली असती तर ते त्याच्या आत्म्याने भरले असते. जेव्हा देवाचा आत्मा खरोखरच एखाद्या व्यक्तीला भरतो, तेव्हा असे घडते.

> मी डोळे वर करून पाहिले तर तागाची वस्त्रे परिधान केलेला आणि कंबरेस उफाज देशाच्या शुद्ध सोन्याचा पट्टा घातलेला असा एक पुरुष माझ्या दृष्टीस पडला. त्याचे शरीर वैडूर्यमण्यासारखे असून त्याचे मुख विद्युल्लतेसारखे होते. त्याचे नेत्र पेटलेल्या दीपांसमान होते, त्याचे हातपाय उज्ज्वल पितळेसारखे होते आणि त्याच्या शब्दाचा ध्वनी एखाद्या समुदायाच्या गजबजाटासारखा होता. मी दानिएलाने एकट्याने तो दृष्टान्त पाहिला; माझ्याबरोबर असलेल्या मनुष्यांनी तो दृष्टान्त पाहिला नाही; तरी त्यांना मोठा कंप सुटला आणि कोठेतरी लपावे म्हणून ते पळून गेले. दानिएल 10:5-7

हे आत्म्याच्या दैवी सहाय्याचे स्वरूप आहे ज्यामुळे त्यांना मदत झाली असती. त्यांना काहीही करण्याची गरज भासली नसती. त्यांच्या शत्रूंनी एकतर त्यांच्या पापांची कबुली दिली असती आणि पश्चात्ताप केला असता, त्यांनी हेच करायला हवे होते, नाहीतर ते पळून गेले असते.

दुर्दैवाने इस्राएलमध्ये हा आत्मा नव्हता. ते कुरकुर आणि तक्रारींनी भरलेले होते आणि म्हणूनच त्यांच्या शत्रूंना त्यांच्यापासून पळवून लावण्याची शक्ती त्यांच्यात नव्हती. त्यांच्यासमोर कोणते पर्याय उरले होते? त्यांना जे चांगले माहीत होते ते त्यांनी केले, त्यांनी तलवारी उचलल्या आणि लोकांना मारायला सुरुवात केली. दुसऱ्या व्यक्तीशी जवळच्या लढाईत काहीही योग्य नाही. त्यांना त्रास देताना आणि मरताना पाहणे, त्यांना ओरडताना किंवा शांतपणे शेवटचा स्वास घेताना पाहणे, ही एक अशी प्रतिमा आहे जी आपण कधीही विसरू शकत नाही. दुसऱ्या माणसाला मारणाऱ्या प्रत्येक माणसाला ख्रिस्ताचा शांतीपूर्ण आत्मा मिळत नाही; त्याला भटकंती-फरारीचा आत्मा प्राप्त होतो. अशा माणसाच्या मनात एक अपवित्र प्रतिमा छापलेली असते; अशी भयानक प्रतिमा जी स्वतःच्या हाताने मृत्यू निर्माण करून, नरसंहार आणि रक्तपात घडवून आणते आणि ह्याचा परिणाम वडील, माता, भाऊ, बहिणी, पती, पत्नी, मुलगे, मुली, नातेवाईक, कुटुंबे आणि समुदाय ह्या सर्वांवर होतो.

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की ख्रिस्त पवित्र आणि निष्कपट आणि निष्कलंक आहे. निरुपद्रवी म्हणजे कोणतीही हानी न करणे.

> म्हणून अगदी असाच महायाजक आपल्याला असणे योग्य होते. तो पवित्र, निष्कपट आणि निष्कलंक आहे; दोषविरहित आणि शुद्ध आहे, तो पाप्यांपासून वेगळा केलेला आहे. त्यास आकाशाहूनही उंच केलेले आहे इब्रिलोकांस 7:26

ख्रिस्ताच्या आत्म्याने मनुष्यामध्ये वस्ती करून दुसऱ्या मनुष्याचा जीव घेणे शक्य नाही. ख्रिस्त पुनरुत्थान आणि जीवन आहे. त्याच्या उपस्थितीत मृत्यू अस्तित्वात असू शकत नाही. तो मेलेल्यांतून उठवतो, तो मरण देत नाही. मनुष्य फक्त तेव्हाच खून करू शकतात जेव्हा ते जुन्या कराराच्या मानसिकतेत आणि देहात असतात.

जुन्या कराराच्या अंतर्गत लोकांच्या अंतःकरणात काय आहे हे प्रकट करण्यासाठी, देव त्यांच्या इच्छांना परत त्यांच्यावर प्रतिबिंबित करतो, आणि त्यांची विचारसरणी पापाकडे कशी जाते हे त्यांना दर्शवितो.

दुसरीकडे, जेव्हा माणूस नवीन करारात असतो तेव्हा त्याला काहीतरी वेगळे दिसते. प्रभूने जेव्हा मोशेची परीक्षा घेतली तेव्हा ह्याच अध्यायात मोशेने हेच केले होते.

> मग परमेश्वराने मोशेला म्हटले, "मी ह्या लोकांना पाहिले आहे. हे ताठ मानेचे लोक आहेत. तर आता मला आड येऊ नकोस; मी आपला कोप त्यांच्यावर भडकवून त्यांना भस्म करतो; आणि तुझेच एक मोठे राष्ट्र करतो." तेव्हा मोशे आपला देव परमेश्वर ह्याची काकळूत करून म्हणाला, "हे परमेश्वरा, तू आपल्या लोकांना महान सामर्थ्याने व भुजबलाने मिसर देशातून बाहेर आणलेस, त्यांच्यावर तुझा कोप का भडकावा? निर्गम. 32:9-11

मोशेला इस्राएली लोकांचा त्याग करण्याचा मोह झाला. सैतानाने निश्चितपणे त्यांना विस्मृतीत जाऊ देण्याचा मोह केला आणि म्हणून प्रभुने मोशेची परीक्षा घेतली आणि आज्ञा म्हणून त्याच्या विचारांना प्रतिबिंबित केले.

मोशेमध्ये, प्रभुत्वासाठी दोन बिया होत्या, जसे एसाव आणि याकोब यांनी रेबेकाच्या गर्भात कुस्ती केली. मोशेने डोंगरावर देवाचा गोड आत्मा पाहिला होता आणि त्याचा चेहरा त्या प्रकाशाने उजळला होता, त्याने हे सुंदर पात्र प्रकट केले आणि त्याच्याशी वाईट वागणूक देणाऱ्या इस्रायली लोकांना वाचवण्याची देवाकडे विनंती केली. त्याने देहाच्या बीजावर मात केली आणि विजयी झाला. हीच परीक्षा आता लेवींवर आली. ते देहात होते आणि आत्म्यात नव्हते. ज्यांनी सोन्याच्या वासराची उपासना केली आणि पश्चात्ताप करण्यास नकार दिला त्यांच्याबद्दल लेवींचे विचार असे होते की त्यांनी मरावे. म्हणून मोशेद्वारे परमेश्वर त्यांना त्यांच्या स्वतःचे विचार प्रतिबिंबित करतो. परमेश्वराने लेवी लोकांमधून त्यांच्या खुनी भावना बाहेर काढल्या पाहिजेत. या भावना लपवून ठेवल्या असत्या तर आणखी नुकसान झाले असते. त्या रात्री लेवी त्यांच्या तंबूत झोपले असता , त्यांनी मारलेल्या लोकांच्या भयानक चित्रांनी त्यांचे मन भरून आले. ही त्यांच्या हृदयाची इच्छा होती ज्याची देवाने त्यांना परवानगी दिली. त्यांच्या पाप करण्याचा इच्छेने पश्चात्ताप करण्यास नकार दिला आणि त्यांच्या संपूर्ण बंडखोरीने सैतानाला त्यांच्या छावणीत प्रवेश करण्याची परवानगी दिली अशाप्रकारे देवाने न्यायदंड आणला.

आपला स्वर्गातील पिता सर्वज्ञानी आहे. कराराच्या दुस्तरीय प्रक्रियेद्वारे तो मनुष्याशी व्यवहार करतो: प्रथम तो मनुष्याच्या दुष्ट अंतःकरणाला त्याच्यासमोर उघड करतो जेणेकरून तो ख्रिस्ताकडे वळेल आणि ख्रिस्ताच्या धार्मिकतेने त्यांचे तारण व्हावे, आणि तसेच, लोकांच्या स्वतःच्या अपराधीपणामुळे तो न्यायाने त्यांचा नाश होऊ देतो.

जेव्हा मोशेला परमेश्वराने मागे हटण्यास आणि इस्त्राएलाचा नाश करण्याच्या संदर्भात परीक्षा घेतली तेव्हा ह्या परिस्थितींना प्रतिसाद देण्याचा नवीन कराराचा मार्ग आपण पाहतो. लेवींना जेव्हा अपराध्यांना मारण्याची सूचना मिळाली तेव्हा त्यांनी मोशेप्रमाणेच केले असते. पहिली गोष्ट म्हणजे, ते मोशेविरुद्ध कुरकुर करत असल्याची आणि देवाने त्यांना दिलेली वचने पूर्ण न करण्याचा त्यांचा मूर्खपणाबद्दल पश्चाताप करू शकले असते. ते मिसर देशामधील त्यांची नाराजी कबूल करू शकले असते आणि नवीन करार स्वीकारू शकले असते. मग, ते देवाच्या आत्म्याने भरलेले असते, ज्यामुळे दुष्टांना व त्यांच्या शत्रूंना पळून जावे लागले असते किंवा ते पळून जाण्याच्या प्रयत्नात आपापसात भांडले असते. अशा परिस्थितींना कसे हाताळायचे हे मोशेने दाखवले होते आणि लेवी लोकांनी ते त्याच्याकडून शिकले असावे. त्यांच्या तक्रारींबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजी, त्यांनी सोन्याच्या वासराची उपासना न करण्याच्या त्यांच्या चांगल्या कृत्यांवर विसंबून राहिले आणि स्वतःच्या पापांची कबुली देण्याऐवजी इतरांना मारणे पसंत केले.

जुन्या कराराच्या भाषेत, प्रभूने संपूर्ण छावणीला संदेश पाठवला की मूर्तिपूजा पूर्णपणे अस्वीकार्णिय आहे. परमेश्वराने त्यांना समजेल तसा संदेश दिला. तीन हजार पुरुषांच्या मृत्यूने दुष्ट अंतःकरणावर संयम ठेवला, पण शेवटी त्या लेवींपैकी एकालाही त्याचा फायदा झाला नाही; त्यांच्यापैकी कोणीही वचन दिलेल्या देशात प्रवेश केला नाही. ते सर्व रानात पडले आणि मरण पावले. मिसर देश सोडलेल्या सर्वांपैकी फक्त कालेब आणि यहोशवा यांनीच वचन दिलेल्या देशात प्रवेश केला. परमेश्वर म्हणतो त्याप्रमाणे - ज्यांनी त्याचा द्वेष केला त्यांच्या मुलांवर त्याने वडिलांच्या पापांची शिक्षा दिली. लेवी लोकांमध्ये अजूनही परमेश्वराविषयी संतापाची बीजे होती, परंतु त्यांना याची जाणीव नव्हती. कनान देशात प्रवेश करण्यात त्यांना अपयश आल्याने हे सिद्ध होते.

मोशेच्या चेहऱ्यावरून चमकणारा प्रकाश आणि त्याचा तिरस्कार करणाऱ्यांसाठी मरण्याची त्याची इच्छा, पवित्र शास्त्रातून, मला खात्री देते की मोशेला दैवी आरशाच्या तत्त्वाची थोडीशी समज होती, आणि जसे निर्गम 32 मध्ये जसे प्रभुने मोशेशी व्यवहार केला होता, त्याचप्रमाणे नंतर अध्यायात लेवींना हाताळण्याची आज्ञा त्याने मोशेला दिली. ज्यांनी सोन्याच्या वासराची पूजा केली नाही अशा प्रत्येकाची अशीच परीक्षा झाली.

हे दैवी आरशाचे तत्त्व मोशेच्या जीवनातील इतर अनेक कथांना त्याच प्रकारे लागू होते.

> आणि परमेश्वर मोशेला म्हणाला, “लोकांच्या सर्व प्रमुखांना पकडून परमेश्वराकरता त्यांना भरदिवसा फाशी दे म्हणजे परमेश्वराचा इस्राएलांवर भडकलेला राग जाईल.” तेव्हा मोशे इस्राएलांच्या न्यायाधीशांना म्हणाला, “तुम्ही प्रत्येकाने आपापल्या ताब्यातले जे पुरुष बआल-पौराच्या भजनी लागलेले आहेत त्यांचा वध करावा.” गणना 25:4-5

ही दैवी आरशाची भाषा आहे. या कृतीत ख्रिस्ताचे चरित्र नाही आणि म्हणून प्रभूचे वचन लोकांच्या विचारांना पश्चात्ताप करण्यासाठी प्रतिबिंबित करते. या कथा वाचण्याची सोपी गुरुकिल्ली म्हणजे त्यांची पृथ्वीवरील ख्रिस्ताच्या जीवनाशी तुलना करणे. येशूने त्याच्या शत्रूंवर प्रेम केले आणि त्याने कधीही कोणालाही मारले नाही. तो त्याच्या पित्याच्या आज्ञा पाळतो ज्यात म्हटले आहे की, “खून करू नकोस.” या आज्ञा परिस्थिती हाताळण्यासाठी लोकांचे स्वतःचे विचार प्रतिबिंबित करतात. मोशेला हे पूर्णपणे समजले किंवा समजले नसेल, पण हे सत्य बदलत नाही की जुन्या करारातील देवाचे मार्गदर्शन सहसा लोकांच्या स्वतःच्या विचारांना प्रतिबिंबित करते.

मोशेच्या जीवनात आणखी एक गोष्ट आहे जी थोडी वेगळी आहे, ती म्हणजे कोरह, दाथान आणि अबीरामची कथा. हे महत्त्वाचे आहे कारण कोरह लेवी वंशातील होता; ज्यांनी सोन्याच्या वासरापुढे गुडघे टेकले नव्हते. सोन्याच्या वासरुची मूर्तिपूजा होणाऱ्या घटनेच्या वेळी नीतिमान समजल्या जाणाऱ्या लोकांच्या हृदयात काय होते हि कथा आपल्याला सांगते.

> कोरह बिन इसहार बिन कहाथ बिन लेवी आणि रऊबेन वंशातील अलीयाबाचे मुलगे दाथान व अबीराम आणि ओन बिन पेलेथ 2हे इस्राएलातील अडीचशे लोकांना बरोबर घेऊन मोशेविरुद्ध उठले; हे लोक सरदार असून मंडळीचे प्रतिनिधी व नामांकित पुरुष होते. ते मोशे व अहरोन ह्यांच्याविरुद्ध जमा होऊन त्यांना म्हणाले, “तुमचे आता फारच झाले! सबंध मंडळी पवित्र आहे, तसेच प्रत्येक मनुष्य पवित्र आहे आणि परमेश्वर त्यांच्याठायी आहे; तर मग तुम्ही परमेश्वराच्या मंडळीवर वर्चस्व का गाजवता?” हे ऐकून मोशे पालथा पडला; मग तो कोरह व त्याचे साथीदार ह्यांना म्हणाला, “परमेश्वराचे कोण व पवित्र कोण हे परमेश्वर उद्या सकाळी दाखवील व त्यांना आपल्याजवळ येऊ देईल; ज्याला तो निवडील त्याला तो आपल्याजवळ येऊ देईल. आता असे करा. कोरहा, तू आणि तुझे सर्व सोबती धुपाटणी आणा; आणि उद्या त्यांत अग्नी ठेवून परमेश्वरासमोर धूप जाळा; मग परमेश्वर ज्या मनुष्याला निवडून घेईल तोच पवित्र ठरेल; लेवीच्या वंशजांनो, तुमचे आता फार झाले.” तेव्हा मोशे कोरहाला म्हणाला, “लेवीच्या वंशजांनो ऐका; तुम्ही परमेश्वराच्या निवासमंडपाची सेवा करावी आणि मंडळीची सेवा करण्यासाठी तिच्यासमोर उभे राहावे म्हणून परमेश्वराने तुम्हांला आपल्याजवळ येऊ दिले; ह्या कार्यासाठी इस्राएलाच्या देवाने तुम्हांला इस्राएल लोकांच्या मंडळीतून वेगळे

> केले आहे हे काय थोडे झाले? तुला व तुझ्या सर्व लेवीय भाऊबंदांना परमेश्वराने आपल्याजवळ घेतले असले तरी याजकपदही तुम्ही मिळवू पाहता काय? ह्यावरून तू व तुझे सर्व साथीदार परमेश्वराच्या विरुद्ध जमलेले आहात, हे स्पष्ट होते. अहरोन तो काय की तुम्ही त्याच्याविरुद्ध कुरकुर करावी?" गणना 16:1-11

कोराहने मोशेवर नियंत्रित करण्याऱ्या आत्म्याद्वारे आरोप केला आणि लोकांवर त्याच्या अधिकाराची मागणी केली, परंतु या आरोपामुळे कोरहाच्या स्वतःच्या इच्छा आणि भावना प्रकट झाल्या. संपूर्ण मंडळी पवित्र आहे आणि परमेश्वर त्यांच्यामध्ये आहे असा दावा करून, कोरह मोशेच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होता आणि सर्वांना समान स्थान असावे असे सुचवत होता.

याआधीच्या घटनांकडे लक्ष दिले पाहिजे. बारा हेर कनान देशातून परत आले होते आणि त्यांच्यापैकी दहा जणांनी एक वाईट बातमी दिली होती ज्यावर इस्राएल लोकांनी विश्वास ठेवला होता. केवळ यहोशवा आणि कालेब यांनी विश्वास व्यक्त केला की देव त्यांना वचन दिलेल्या देशात घेऊन जाऊ शकतो. लोकांचा प्रतिसाद म्हणजे कालेब आणि यहोशवा यांना दगडमार करून ठार मारण्याचा होता. कोलाहलात, मोशेची पूर्वीप्रमाणेच चाचणी घेतली गेली - परमेश्वर मोशेची त्यांच्याद्वारे नवीन राष्ट्र बनविण्याच्या संधींद्वारे परीक्षा घेतो. लोक इतके दुष्ट होते की त्यांच्यापासून मुक्त होण्याच्या इच्छेला बळी पडणे हा मोठा मोह ठरला असता.

> मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "कोठवर हे लोक मला तुच्छ लेखणार आणि ह्यांच्यामध्ये मी केलेली सगळी चिन्हे पाहूनही हे कोठवर माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत? मी त्यांचा मरीने संहार करून त्यांचा वारसा नष्ट करीन आणि तुझेच त्यांच्याहून मोठे व प्रबळ राष्ट्र करीन." गणना 14:11-12

पुन्हा एकदा मोशे लोकांसाठी मध्यस्थी करतो जे प्रभूच्या इच्छेप्रमाणे ख्रिस्ताच्या आत्म्याचे प्रतिबिंबि आहे.

> मोशे परमेश्वराला म्हणाला, "तू आपल्या सामर्थ्याने ह्या लोकांना मिसरी लोकांमधून आणले आहेस. आता जर तू त्यांचा संहार केलास तर मिसरी लोक ते ऐकतील आणि ह्या देशातील रहिवाशांनाही ते सांगतील. ह्यांनी ऐकले आहे की, तू परमेश्वर ह्या लोकांमध्ये वस्ती करतोस आणि तू परमेश्वर त्यांना प्रत्यक्ष दर्शन देतोस; तुझा मेघ त्यांच्यावर असतो आणि तू दिवसा मेघस्तंभातून व रात्री अग्निस्तंभातून त्यांच्यापुढे चालत असतोस. आता तू ह्या लोकांचा समूळ नाश केलास तर ज्या ज्या राष्ट्रांनी तुझी कीर्ती ऐकली आहे ती म्हणतील, 'जो देश परमेश्वराने ह्या लोकांना शपथपूर्वक देऊ केला होता तेथे त्यांना न्यायला तो असमर्थ ठरल्याने त्यांना रानातच

त्याने मारून टाकले.’ म्हणून मी विनवतो की तुझ्या म्हणण्याप्रमाणे प्रभूच्या सामर्थ्याची महती दिसू दे; तू म्हटलेच आहेस की, ‘परमेश्वर मंदक्रोध, दयेचा सागर, अन्याय व अपराध ह्यांची क्षमा करणारा, पण अपराधी जनांची मुळीच गय न करणारा असा आहे; तो वडिलांच्या अन्यायाबद्दल पुत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.’ तुझ्या थोर दयेनुसार मिसर देशापासून येथपर्यंत जशी तू ह्या लोकांना क्षमा केलीस तशी ह्या वेळीही त्यांच्या अन्यायाची क्षमा कर असे मी तुला विनवतो.” गणना 14:13-19

परमेश्वराने इस्राएली लोकांना त्यांच्या बंडखोरीबद्दल तात्काळ शिक्षेपासून वाचवून क्षमा केली. त्याऐवजी, त्याने त्यांना दाखवून दिले की वाळवंटात देवाने त्यांना मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करणारे त्यांचे स्वतःचे शब्द त्यांच्याकडे परत प्रतिबिंबित होत आहेत.

म्हणून तू त्यांना सांग, परमेश्वर म्हणतो : ‘माझी शपथ, तुमचे म्हणणे माझ्या कानी आले आहे त्याप्रमाणेच मी तुमचे खरोखर करीन; तुमची प्रेते ह्या रानात पडतील, आणि तुमच्यापैकी ज्यांची गणना झाली त्यांच्या पूर्ण संख्येतील वीस वर्षे व त्यांहून अधिक वयाच्या ज्या लोकांनी माझ्याविरुद्ध कुरकुर केली आहे त्यांपैकी कोणीही ज्या देशात तुम्हांला घेऊन जाण्याची मी शपथ वाहिली आहे त्यात जाणारच नाही; पण यफुन्नेचा मुलगा कालेब व नूनाचा मुलगा यहोशवा हे मात्र जातील. गणना 14:28-30

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की ही फाशीची शिक्षा केवळ लोकांचा नाश करण्याच्या उद्देशाने नव्हती, ती त्यांना पश्चात्ताप करण्यासाठी तयार करण्यात आलेली मृत्यूची सेवा होती. जर त्यांनी शिक्षा स्वीकारली असती आणि त्यांच्या दुष्टपणाची कबुली दिली असती तर त्यांना मोशेप्रमाणेच अनंतकाळचे जीवन मिळाले असते. मोशेने कनान देशात प्रवेश केला नाही आणि तरीही त्याला अनंतकाळचे जीवन मिळाले. इस्राएलच्या सर्व मुलांनी पश्चात्ताप केला असता तर त्यांचेही असेच झाले असते.

इस्राएलांला त्यांच्याच दुष्टाईचा सामना करावा लागला तेव्हा सैतानाने कोरह, दाथान आणि अबीराम यांना भडकवले. त्यांनी मोशेच्या नेतृत्वावर टीका केली आणि मिसर देश सोडल्यापासून जे घडले त्याचा सर्व दोष त्याच्यावर टाकला. मोशेद्वारे, देवाने लोकांना सांगितले की ते वाईट आहेत आणि नक्कीच मृत्यू पाहतील. हे त्यांना पश्चात्ताप घडवून आणण्याच्या उद्देशाने होते परंतु त्यांनी घडलेल्या गोष्टींबद्दल मोशेला दोष देण्याचे निवडले. व हे आरोप अगदी वैयक्तिक झाले.

दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशातून काढून तू आम्हांला ह्या रानात मारून टाकण्यासाठी आणलेस हे काय थोडे झाले म्हणून तू आमच्यावर

> अधिकारही गाजवतोस? शिवाय, दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या देशात तू आम्हांला मुळीच आणलेले नाहीस अथवा शेते व द्राक्षमळे ह्यांचे वतन आम्हांला दिलेले नाहीस. ह्या लोकांच्या डोळ्यांत तू धूळ फेकतोस काय? आम्ही येत नाही." तेव्हा मोशेचा कोप भडकला. तो परमेश्वराला म्हणाला, "त्यांच्या अर्पणाची दखल घेऊ नकोस; मी त्यांचे एक गाढवही घेतलेले नाही." गणना 16:13-15

मोशेवर स्वतःला त्यांच्यावर राजकुमार बनवण्याचा, लोकांना ठार मारण्याचा आणि त्यांची मालमत्ता घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होता. हिब्रू शब्द क्रोधाचे भाषांतर दुःखी केले जाऊ शकते. मोशेने या लोकांसाठी खूप काही केले होते; त्याने ह्या लोकांसाठी आपले अनंतकाळचे जीवन अर्पण केले होते. तरीसुद्धा, कोरह, दाथान आणि अबीराम यांच्या दुष्टपणाबद्दल पश्चात्ताप करण्याऐवजी जवळजवळ संपूर्ण मंडळीने खोटेपणा आणि आरोप स्वीकारले. यामुळे मोशेला खरोखर दुखापत झाली. या चाचणीने तो अगदी मर्यादेपर्यंत ढकलला गेला. कोरहने सर्व मंडळींना मोशेच्या विरोधात एकत्र केले आणि मग परमेश्वर आत आला.

> कोरहाने त्यांच्याविरुद्ध सगळी मंडळी दर्शनमंडपाच्या दाराजवळ जमवली, तोच परमेश्वराचे तेज सर्व मंडळीला दिसले. गणना 16:19

सर्व लोकांचा नाश होऊ द्यायचा की त्यांची बाजू मांडायची यावर पुन्हा एकदा मोशेची परीक्षा झाली.

> परमेश्वर मोशे व अहरोन ह्यांना म्हणाला, "तुम्ही ह्या मंडळीतून वेगळे व्हा, म्हणजे एका क्षणात मी त्यांना भस्म करतो." तेव्हा ते पालथे पडून म्हणाले, "हे देवा, सर्व देहधारी आत्म्यांच्या देवा, एका मनुष्याने पाप केले म्हणून सर्व मंडळीवर कोपायमान होतोस काय?" गणना 16:20-22

पुन्हा एकदा, मोशे विश्वासू राहतो आणि लोकांसाठी विनवणी करतो, त्याची गंभीर वचनबद्धता आणि करुणा दाखवतो. आता, लक्ष एका माणसाकडे वळले, कोरह. परीक्षा अधिक तीव्र होती आणि परमेश्वर मोशेला सूचना देतो:

> मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "मंडळीला सांग की, तुम्ही कोरह, दाथान व अबीराम ह्यांच्या निवासस्थानापासून निघून जा." तेव्हा मोशे उठून दाथान व अबीराम ह्यांच्याकडे गेला आणि इस्राएल लोकांचे वडील त्याच्या पाठोपाठ गेले. तो मंडळीला म्हणाला, "तुम्ही ह्या दुष्ट मनुष्यांच्या तंबूंपासून निघून जा. त्यांच्या कोणत्याही वस्तूला शिवू नका; नाहीतर त्यांच्या सर्व पापांचे भागीदार होऊन तुम्ही नाश पावाल." गणना 16:23-26

ही माणसे देवाच्या संरक्षणाच्या बाहेर पूर्णपणे पाऊल टाकणार होते. जेव्हा त्यांच्या तंबूपासून दूर जाण्याची आज्ञा देण्यात आली होती, तेव्हा त्यांनी कदाचित पश्चात्ताप केला असेल पण ते सैतानाच्या आत्म्याने शासित राहिल्याशिवाय शेवटपर्यंत

विरोधक राहिले. सैतानाचे या लोकांवर नियंत्रण होते आणि आता त्याने त्यांच्या नाशाचे कारण देवावर ठेवण्याचा मार्ग शोधला पाहिजे.

> मग ते कोरह, दाथान व अबीराम ह्यांच्या डेऱ्याजवळून निघून गेले; आणि दाथान व अबीराम बाहेर निघाले व आपली बायकामुले व तान्ही बाळे ह्यांच्यासह आपल्या तंबूच्या दाराजवळ उभे राहिले. तेव्हा मोशे म्हणाला, "मी ही सर्व कामे आपल्याच मनाने केलेली नाहीत, तर ती करायला परमेश्वराने मला पाठवले आहे हे तुम्हांला दिसून येईल. इतर मनुष्यांच्या मृत्यूप्रमाणे ह्यांना मृत्यू आला किंवा इतर सर्व लोकांप्रमाणे ह्यांचे पारिपत्य झाले तर परमेश्वराने मला पाठवले नाही असे समजा. पण परमेश्वराने काही अद्भुत गोष्ट घडवली म्हणजे पृथ्वीने आपले तोंड उघडून ह्यांना व ह्यांच्या सर्वस्वाला गिळून टाकले आणि हे अधोलोकात जिवंत उतरले, तर असे समजा की, ह्या लोकांनी परमेश्वराला तुच्छ मानले आहे." हे त्याचे सगळे शब्द बोलून संपतात न संपतात तोच त्यांच्या पायांखालची भूमी दुभंगली. आणि पृथ्वीने आपले तोड उघडून ते, त्यांची कुटुंबे, कोरहाची सगळी माणसे व त्यांची सर्व मालमत्ता गिळून टाकली. ह्याप्रमाणे ते व त्यांचे सर्वस्व अधोलोकात जिवंत उतरले. पृथ्वीने त्यांना गडप केले आणि मंडळीतून ते नष्ट झाले. गणना 16:27-33

ह्या विरोधकांनी त्यांच्यावर नेतृत्व करण्याच्या मोशेच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यांनी मोशेवर आरोप लावला की तो स्वतःला त्यांच्यावर राजकुमार बनवू पाहत आहे. कोरह आणि त्याच्या साथीदारांच्या कार्यामुळे संपूर्ण मंडळी मोशेच्या विरोधात गेली होती. मोशे काय म्हणतो ते आपण पुन्हा काळजीपूर्वक पाहू:

> तेव्हा मोशे म्हणाला, “मी ही सर्व कामे आपल्याच मनाने केलेली नाहीत, तर ती करायला परमेश्वराने मला पाठवले आहे हे तुम्हांला दिसून येईल. इतर मनुष्यांच्या मृत्यूप्रमाणे ह्यांना मृत्यू आला किंवा इतर सर्व लोकांप्रमाणे ह्यांचे पारिपत्य झाले तर परमेश्वराने मला पाठवले नाही असे समजा. पण परमेश्वराने काही अद्भुत गोष्ट घडवली म्हणजे पृथ्वीने आपले तोंड उघडून ह्यांना व ह्यांच्या सर्वस्वाला गिळून टाकले आणि हे अधोलोकात जिवंत उतरले, तर असे समजा की, ह्या लोकांनी परमेश्वराला तुच्छ मानले आहे.” गणना 16:28-30

मिसर देश, तांबडा समुद्र आणि सिनाई पर्वतातील घटनांमधून परमेश्वराने मोशेला मार्गदर्शन केल्याचे भरपूर पुरावे लोकांनी पाहिले होते, मोशेला देवाने पाठवले होते हे सिद्ध होते. मोशेने वर्णन केलेल्या संदर्भात परमेश्वराने केलेला चमत्कार संशय दूर करण्यासाठी होता. त्याचप्रमाणे, जेव्हा सैतानाने येशूला देवाचा पुत्र म्हणून त्याच्या ओळखीबद्दल प्रश्न विचारला तेव्हा येशूने स्वतःला सिद्ध करण्यासाठी चमत्कार करण्यास नकार दिला.

> तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, “तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर.” परंतु त्याने उत्तर दिले की, “‘मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या वचनाने जगेल,’ असा शास्त्रलेख आहे.” मत्तय 4:3-4

येशूप्रमाणे, मोशेने त्यांच्यासाठी सर्वकाही केल्यानंतरहि, ते सर्व त्याला सोडून पळून गेले. मार्क 14:50. मोशेला त्याच्या शरीरात त्रास होत असताना, सैतानाने त्याला ह्या वधस्तंभावरून खाली येण्यास बोलावले. आपल्या पदावर टिकून राहण्यासाठी त्याला चमत्कार घडवण्याचा मोह झाला. ख्रिस्ताने एकदाही "जर" ह्या प्रश्नाला उत्तर दिले नाही. स्वतःची ओळख सिद्ध करण्यासाठी त्याने एकदाही चमत्काराचे आवाहन केले नाही. त्याच्या पित्याने त्याला सांगितलेल्या गोष्टींवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

बाप्तिस्मा करणारा योहान, जो संदेष्ट्यांपैकी महान होता, तुरुंगात असताना त्यालाही अशाच परीक्षेला सामोरे जावे लागले. योहानाने त्याच्या शिष्यांना येशूची चौकशी करण्यास सांगितले आणि हेच तत्त्व या प्रश्नात आपल्याला दिसते.

> योहान बंदिशाळेत असताना त्याने ख्रिस्ताच्या कृत्यांविषयी ऐकून आपल्या शिष्यांना पाठवून त्याला विचारले, “जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?” मत्तय 11:2-3

योहानाला मोशेसारखा चमत्कार मिळाला नाही. त्याऐवजी, ख्रिस्त हा मशीहा आहे यावर पूर्ण भरवसा ठेवून तो त्याच्या मृत्यूला सामोरे गेला. त्याचे शिष्य येशूकडून परत आले आणि त्यांनी योहानला काय अपेक्षा केली होती याची पुष्टी केली.

मोशेने लोकांना कोरह, दाथान आणि अबीराम यांच्यापासून दूर राहण्याची ताकीद दिली तेव्हा त्याने त्याच्या अधिकाराची मर्यादा ओलांडली काय? देवाला या दुष्ट लोकांपासून त्याच्या देवदूतांचे संरक्षण काढून घेण्यास भाग पाडले जात असताना, सैतानाने मोशेला या धर्मत्यागी लोकांचा नाश करण्याची योजना कशी आखली होती हे उघड प्रश्न विचारून मोहात पाडले. सैतानाने या माणसांवर पूर्ण ताबा मिळवला होता हे लक्षात ठेवा. पश्चात्ताप करण्यासाठी येशूच्या आत्म्याचा प्रतिकार करण्यासाठी त्याने त्यांच्यावर जोरदार दबाव आणला. येशू हा पुनर्बांधणी करणारा आहे तर सैतान हा विनाशक आहे आणि मोशेच्या मनात असलेल्या शंकांद्वारे, सैतान त्याच्या विनाशाच्या कार्याला देवाचा थेट न्याय म्हणून प्रकट करण्यास सक्षम होता. ज्यांना देवाने खरोखरच निवडले आहे ते देखील त्यांच्यामध्ये जर ख्रिस्त राहत निवास करत नसेल तर एक अतिशय खात्रीलायक लबाडीने फसवले जाऊ शकते.

मोशेसाठी ही अतिशय दुःखद परीक्षा होती आणि आमच्यासाठी हा एक धडा आहे. मोशेने स्वतःविरुद्धच्या खोट्या गोष्टीं इतक्या वेळ सहन केल्या आणि ह्या पापी लोकांच्या बचावासाठी वारंवार विनंती करत राहिला. जेव्हा मुद्दा ह्या एका दुष्ट मनुष्याबद्दल आणि त्याच्या साथीदारांबद्दल आला ज्यांनी सर्व लोकांना मोशेविरुद्ध भडकावले होते, तेव्हा मोशेची परीक्षा अतिशय बिकट झाली. ही एक अशी परीक्षा आहे ज्याचा सामना फार कमी पुरुषांनी केला असेल. तर तो सैतानच होता ज्याने पृथ्वीचे तोंड उघडून ह्या लोकांना गिळून घेतले जेणेकरून ते केल्याबद्दल देवाला दोष दिला जाईल. या वचनात काय घडले याचा पौल आपल्याला एक मजबूत संकेत देतो.

> त्यांच्यापैकी कित्येकांनी कुरकुर केली आणि ते संहारकर्त्याकडून नाश पावले, तेव्हा तुम्ही कुरकुर करू नका. 1 करिंथ 10:10

विनाशक हा शब्द आपण आधी उल्लेख केल्याप्रमाणे विषारी सर्प आहे. कोरह आणि त्याच्या माणसांनी मोशेविरुद्ध कुरकुर केली आणि पौल म्हणतो की विषारी सर्पाने त्यांचा नाश केला. 250 राजपुत्रांच्या चेहऱ्यासमोर कोरह आणि त्याच्या साथीदारांना पृथ्वीने गिळून घेतले. यामुळे त्यांना हे समजण्यास वेळ मिळाला की ते अतिशय मोठ्या धोक्यात आहेत आणि त्यांनी विनाशकापासून पळून जाण्यासाठी त्यांच्या तारणकर्त्याकडे धाव घेतली पाहिजे. दुःखाची गोष्ट म्हणजे त्यांनी पश्चात्ताप केला नाही आणि ह्यामुळे त्यांना पूर्णपणे सैतानाच्या स्वाधीन करण्यात आले.

> मग परमेश्वरापासून अग्नी निघाला व त्याने त्या धूप जाळणाऱ्या दोनशे पन्नास पुरुषांना भस्म केले. गणना 16:35

पुष्कळजण म्हणतील "पण येथे तर परमेश्वराचा अग्नी म्हंटले आहे," आणि ते सर्व पवित्र शास्त्राची तुलना करण्याच्या निर्देशाकडे दुर्लक्ष करतील आणि हे दाखवून देतील कि, येशू ख्रिस्त काल, आज आणि अनंतकाळ सारखाच आहे!

लूक 9:54-56 मध्ये येशूने शिष्यांना सांगितले की एलीयाच्या प्रतिसादात स्वर्गातून आलेली अग्नी हा तो आत्मा नव्हता ज्याद्वारे एलीया चालवला गेला होता. आपल्याला ईयोबच्या कथेवरून माहित आहे की "दैवी अग्नी" खाली आली आणि त्या अग्नीने मेंढरे आणि ईयोबच्या सेवकांना जाळून टाकले.

> तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, “दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे.” ईयोब 1:16

सैतानाने ही भौतिक अग्नीचा वर्षाव करून त्यांना भस्म केले हे आपल्याला माहीत आहे. म्हणून जर वचनात भौतिक अग्नीचा उल्लेख असेल तर ते योग्य असेल असे नाही, तरीही, वध करणारे देवदूत या अध्यायात स्पष्ट केल्याप्रमाणे, ही अग्नी कदाचित देवाच्या आत्म्याची खात्री असावी ज्याने या माणसांच्या हृदयात दहशत निर्माण केली. देवाच्या आत्म्याने दयाळूपणे ह्या माणसांना त्यांची पापे प्रकट केली, व त्यांना पश्चात्ताप करण्याची संधी दिली. परंतु त्यांनी देवाच्या दयेवर विश्वास ठेवला नाही म्हणून ते त्यांच्या स्वतःच्या अपराधाने नष्ट झाले. पवित्र शास्त्रामधील अनेक परिच्छेदांमध्ये स्वर्गातून आलेली अग्नी ह्याबद्दलचे तत्त्व आपण अगोदरच पाहिलेले आहेत.

जेव्हा ह्या 250 राजपुत्रांनी देवाने त्यांचे संरक्षण करणे थांबवल्यानंतर त्यांचे मार्ग बदलण्यास नकार दिला तेव्हा ते सैतानाने पाठवलेल्या वास्तविक अग्नीने मारले गेले होते की त्यांच्या पापांच्या तीव्र अपराधामुळे त्यांचा नाश झाला होता? जेव्हा हे राजपुत्र भस्मसात झाले तेव्हा ते राख झाले असे मानणे साहजिक आहे पण आपण नादाब आणि अबिहूच्या कथेत शिकतो त्याप्रमाणे, ज्या आगीने त्यांना भस्मसात केले त्या आगीने त्यांचे अंगरखेही जळले नाहीत.

> तेव्हा परमेश्वरासमोरून अग्नी निघाला व त्याने त्यांना भस्म केले; आणि ते परमेश्वरासमोर मरण पावले. ह्या बाबतीत मोशे अहरोनाला म्हणाला, “परमेश्वराने सांगितले ते हे : जे माझ्याजवळ येतील त्यांना मी पवित्र असल्याचे दिसून येईल आणि सर्व लोकांसमक्ष माझा गौरव होईल.” तेव्हा अहरोन चूप राहिला. मग अहरोनाचा चुलता उज्जीयेल ह्याचे मुलगे मीशाएल व एलसाफान ह्यांना मोशेने बोलावून सांगितले की, “तुम्ही इकडे येऊन तुमच्या बांधवांना पवित्रस्थानासमोरून उचलून छावणीबाहेर घेऊन जा.” मोशेने सांगितल्याप्रमाणे त्यांनी येऊन त्यांच्या अंगरख्यांसहित त्यांना उचलून छावणीबाहेर नेले. लेवीय 10:2-5

आपण शिकलेल्या सर्व तत्त्वांवरून हे स्पष्ट होते की पवित्र शास्त्रात अनेक स्पष्टीकरणे आहेत जी देव विनाशक नाही तर सैतान आहे हे दाखवण्यासाठी दिले जाऊ शकते. देवाने दिलेली वचने समजून घेणे आणि पृथ्वीवरील येशूच्या परिपूर्ण जीवनाच्या संयोगाने हे समजते की या कथांमधील हिंसाचाराचा स्रोत सैतान आहे, ज्याच्याकडे मृत्यू घडवून आणण्याची शक्ती आहे. इब्री लोकांस 2:14.

मोशे हा ख्रिस्ताच्या काळापर्यंत जगणारा सर्वात नम्र आणि सौम्य मनुष्य होता. करारांच्या चुकीच्या समजामधून अनेक चुकीच्या गोष्टी त्याला कारणीभूत ठरल्या आहेत. त्याला सर्वात कठीण परीक्षेत, व त्याला मोहात पाडले गेले आणि यामुळे सैतानाला त्याच्या नाशाचे कार्य झाकून ठेवता आले. या चाचणीने आपल्यापैकी कोणावरही मात केली असती, म्हणून जे घडले त्याबद्दल आपण मोशेचा न्याय करू शकत नाही. परंतु आपण हे देखील पाहतो की सैतानाच्या प्रलोभनांना बळी पडल्यास त्याचे मोठे परिणाम कसे होऊ शकतात, विशेषतः जर तो एक नेता असेल ज्याने ख्रिस्ताची दृष्टी गमावली असेल. संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये सुसंगत वर्ण शोधून आपण देवाचे चरित्र समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. फक्त ख्रिस्त आपल्याला ते परिपूर्ण चित्र देतो. ह्या दैवी उदाहरणाचे आपण किती आभारी असले पाहिजे जेणेकरून आपण त्याच्या शुद्ध प्रकाशात जुना करार वाचू शकतो, व आपल्या पित्याच्या नम्रतेचे सत्य ओळखू शकतो ज्याचा मोशे एक उत्तम उदाहरण होता.

## 23. एलीया आणि अंतिम सीमा

> मग स्वर्गात युद्ध सुरू झाले; 'मीखाएल' व त्याचे दूत अजगराबरोबर 'युद्ध करण्यास' निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले; प्रकटीकरण 12:7

सैतानाच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत आपल्या स्वर्गीय पित्याविरुद्ध प्रचाराचा वापर करणे आवश्यक होते. आणि त्याच्या लबाडीद्वारे एक तृतीयांश देवदूतांसह तो यशस्वी झाला. प्रकटीकरण 12:4,7. सैतानाने त्याची कठोर विचारधारा देवावर प्रक्षेपित केली आणि अशा प्रकारे देवदूतांना स्वतःकडे खेचले. सैतानाचे अनुसरण करणाऱ्या देवदूतांचा सैतानाच्या क्रूर शासनाखाली अंत झाला. "जो कोणी पाप करतो तो पापाचा गुलाम आहे." योहान 8:34.

सैतानाने त्याची खरी प्रेरणा लपवून ठेवली आणि तो स्वतः जे बनला होता त्याच्या अगदी विरुद्ध स्वभाव त्याने देवावर प्रक्षेपित केले. लोकांद्वारे स्वतःची उपासना व्हावी म्हणून देवाने दिलेल्या बुद्धीचा आणि क्षमतेचा वापर करून सैतानाने एक फसवी योजना तयार केली.

सैतानाने सांगितलेल्या गोष्टींद्वारे मनुष्य अजगराच्या पाशात पडला. त्याने सैतानाचा देवाविरुद्ध असलेला प्रचार स्वीकारला आणि सर्पाला मिठी मारली. सैतान मृत्यूचा लेखक बनला आणि त्याच्याकडे मृत्यूचे सामर्थ्य आहे जसे आपण अध्याय 3 मध्ये पहिले. त्याचे मुख्य खोटे हे होते की देव क्षमा करत नाही. आदाम, हव्वा आणि काईन यांनी कधीच त्यांच्या पापांची क्षमा मागितली नाही हे या वस्तुस्थितीतून उघड झाले. आदामाने आपल्या कृत्याबद्दल स्वतःला खेद वाटू नये म्हणून इतरांना दोष दिला. त्याने पामेश्वरासमोर आपले गुडघे टेकून माफी मागण्यास नकार दिला.

या मनःस्थितीत देवाने मनुष्याला वाचवण्यासाठी केलेली प्रत्येक कृती जी त्याची स्वतःची समस्या पाहण्यास त्याला प्रवर्त्त करते, त्याचा अर्थ देवाने आपल्याला हानी पोहोचवण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे असा मानला जातो. म्हणूनच वधस्तंभावरील मृत्यू नैसर्गिक मनुष्याला देवाचा क्रोध वाटतो ज्या क्रोधामुळे त्याने आपल्या पुत्राचा जीव घेतला. हे आपण अध्याय 20 मध्ये शिकलेलो आहोत.

> ही वधस्तंभाची जटिलता आहे. हे सैतानाचे हिंसक चरित्र आणि पापी जीवनाचा नैसर्गिक परिणाम प्रकट करते परंतु असे वाटते की जणू देव, भयंकर क्रोधाने, पापी माणसाला यातना देत आहे. आगपे, धडा *20.*

> काईनला स्वतःचीच निंदा वाटते जी त्याच्या पापाचा नैसर्गिक परिणाम आहे. त्याला असे वाटते की त्याचे पाप इतके मोठे आहे की त्याची क्षमा होऊ शकत नाही. तरीही एकाच वेळी, या परिणामांसाठी ही जबाबदारी परत देवाकडे हलवण्याचा एक अर्थ आहे. या न्यायाच्या दोन बाजू आहेत आणि म्हणून वधस्तंभाचे दोन पैलू आहेत. आगपे, धडा *20.*

पवित्र शास्त्राचे वाचन करताना लोक सहसा देवाच्या चारित्र्यामध्ये स्वतःचे दोष पाहतात. हे गैरसमज आपण येशूच्या बलिदानात दाखवलेल्या दैवी प्रेमाच्या आणि न्यायाच्या विरोधाभासी कल्पनांकडे पाहून अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो.

## जर तुम्हाला कराराची द्विचरणीय प्रक्रिया समजत नसेल तर तुम्ही मनुष्याच्या पापीपणाचे श्रेय देवाला पापी असल्यासारखे द्याल. देवाचे मानवासारखे चित्रण अकल्पनीय आहे!

प्रत्यक्षात याचा अर्थ असा होतो की पवित्र शास्त्रातील कथा ज्या देवासाठी सर्वात मोठा विजय दर्शवितात त्या प्रत्यक्षात त्याच्या चारित्र्याचा सर्वात मोठा पराभव ठरतात कारण त्या पापी मानवी गुणधर्मांच्या दृष्टीकोनातून वाचल्या जातात.

या प्रकरणात सारख्या वाटणाऱ्या अशा दोन कथा म्हणजे कर्मेल पर्वतावर एलीयाचा विजय आणि मोरिया पर्वतावर इसहाकाचे अर्पण. आपण या अध्यायात एलीयाची कथा आणि पुढील अध्यायात अब्राहमची कथा पाहू. एलीयाची कथा सैतानाने आपल्या स्वर्गीय पित्याच्या चारित्र्याविरूद्ध प्रचार करण्यासाठी एका शस्त्रांप्रमाणे वापरली.

सैतान देवाच्या निवडलेल्या लोकांचीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांना विश्वास देतो की एलीयाच्या बलिदानाच्या वेळी स्वर्गातून आलेली अग्नी देवाच्या सामर्थ्याव्यतिरिक्त कशाचा तरी पुरावा होती. देव अग्नी, वारा आणि भूकंपात आहे असा चुकीचा विश्वास आहे, तर देवाच्या आत्म्याचा अजूनही लहानसा कोमल आवाज सर्पाच्या कठोर प्रचारामुळे कमी झाला आहे, ज्याचे देवाविषयीचे वैर माणसांच्या आत्म्यांमध्ये मोठे आहे.

जर आपण 2600 वर्षाअगोदर कर्मेल पर्वतावर जाऊ शकलो ज्यावेळी परमेश्वराच्या वेदीवर अग्नी उतरला आणि त्या अग्नीने ते यज्ञ भस्म केले तर आपण ह्या दैवी दृश्याचे साक्षी होऊ. 850 पुरुष पकडले गेले आहेत, ज्यांनी संपूर्ण राष्ट्राला अतिशय घृणास्पद प्रथांसह मूर्तिपूजेकडे नेले होते. या लोकांनी खऱ्या देवाची उपासना धुडकावून लावली होती आणि यहोवाला विश्वासू असलेल्यांना ठार मारण्यातही आपली भूमिका बजावली होती. मग एलीया, देवाचा माणूस, ही घृणास्पद गोष्ट साफ करण्याचे काम सुरू करण्यासाठी आपली तलवार घेतो. एकामागून एक तो तलवारीने त्यांचा वध करतो, 850 पुरुष त्यांचा शेवटचा श्वास घेत जमिनीवर पडतात.

> एलीया त्यांना म्हणाला, "बआलाच्या संदेष्ट्यांना पकडा; त्यांच्यातल्या एकालाही निसटून जाऊ देऊ नका." तेव्हा त्यांनी त्यांना पकडले; एलीयाने त्यांना खाली किशोन ओहळानजीक आणून वधले. 1 राजे 18:40

टेकडीवर मूर्तिपूजकांच्या मृतदेहांचा खच पडलेला आहे. त्यांच्या रक्ताने नापीक माती भिजवली गेली आणि संध्याकाळपर्यंत जेव्हा आकाश उघडले व पाऊस पडला. तेव्हा पाऊस हा त्या दिवशी झालेल्या संहाराला स्वर्गीय मान्यता असल्याचे दिसून येते.

कथेचा हा भाग पुढे चालू ठेवण्यापूर्वी, एलीयाला अग्निमय रथात स्वर्गरोहण करण्याआधीच्या वाचननाकडे लक्ष देऊया.

> ह्यावर राजाने पन्नासांच्या एका नायकाला पन्नास शिपाई देऊन एलीयाकडे पाठवले. एलीया होता तेथे जाऊन त्याने पाहिले तेव्हा तो पर्वतशिखरावर बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो त्याला म्हणाला, "हे देवाच्या माणसा, राजाज्ञा आहे की, 'तू खाली उतरून ये.'" एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, "मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो." तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. राजे 1:9-10

एलीयाने असे काय केले ज्यामुळे 51 सैनिकांची तुकडी त्याला धरण्यासाठी त्याच्यामागे आली? त्यावेळी राजा आजारी पडला होता आणि त्याने एक्रोनच्या देव

बालजेबूबची चौकशी करण्यासाठी दूत पाठवले. एलीयाने ह्या दूतांना अडवले आणि राजा मरणार असल्याचे सांगितले. साहजिकच, राजाला याबद्दल आनंद झाला नाही आणि त्याने एलीयाला पकडण्यासाठी आपली माणसे पाठवली.

जेव्हा हे लोक एलीयाला धरून नेण्यासाठी आले तेव्हा त्याने स्वर्गातून अग्नी खाली बोलावून त्यांचा नाश करण्याची आज्ञा केली. आम्हाला असे वाटू शकते की दुसऱ्यावेळी आलेले सैनिक जे घडले त्यातून शिकतील आणि एलीयाशी वाटाघाटी करण्यासाठी पर्यायी मार्ग वापरतील. दुःखाची गोष्ट म्हणजे, ते देखील स्वर्गातून आलेल्या अग्नीला सामोरे गेले आणि मरण पावले. त्या अग्नीत 102 माणसे नष्ट झाली. हा एक सुपरहिरो संदेष्टा आहे जो स्वर्गातून आग बोलवू शकतो आणि देवाच्या शत्रूंचा नाश करू शकतो. या कथेनंतर लगेच आम्ही वाचतो:

> ते बोलत चालले असता पाहा, एकाएकी एक अग्निरथ व एक अग्निवारू दृष्टीस पडले व त्यांनी त्या दोघांना अलग केले; आणि एलीया वावटळीतून स्वर्गास गेला. 2 राजे 2:11

बहुतेक लोकांसाठी हा खात्रीशीर पुरावा आहे की देवाने स्वर्गातून अग्नी पाठवला आणि या सैनिकांना जाळून टाकले आणि नंतर त्याच्या सुपरहिरो संदेष्ट्याला स्वर्गात नेले. ही आश्चर्यकारक घटना, कर्मेल पर्वत येथे एलीयाच्या बाल देवाच्या संदेष्ट्यांवर विजयासह, सत्याच्या कारणासाठी एक अद्भुत विजय असल्याचे दिसते.

जर आपण ख्रिस्तातील पित्याच्या परिपूर्ण प्रतिबिंबाकडे पहिले तर आपल्याला या कथांवर दैवी टीकासंग्रह आढळते.

> तेव्हा त्याचे शिष्य याकोब व योहान हे पाहून म्हणाले, “हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीने पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय?” परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, “तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहात हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.” मग ते दुसऱ्या गावाला गेले. लूक 9:54-56
>
> तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील. मत्तय 26:52
>
> येशूने उत्तर दिले, “माझे राज्य ह्या जगाचे नाही, माझे राज्य ह्या जगाचे असते तर मी यहूद्यांच्या स्वाधीन केला जाऊ नये म्हणून माझ्या सेवकांनी लढाई केली असती; परंतु आता माझे राज्य येथले नाही.” योहान 18:36

जेव्हा आपण प्रभू येशूचे वैभव व  चारित्र्य पाहतो तेव्हा आपल्याला एलीयाबद्दलच्या कथांमध्ये काहीतरी वेगळे दिसते. शिष्यांना एलीयाचे अनुकरण करायचे होते परंतु येशूने त्यांना दटावले आणि त्यांना सांगितले की हा त्याचा आत्मा किंवा त्याच्या कामाची पद्धत नाही. येशू विनाशकर्ता नाही तर तारणारा आहे. एलीयाच्या कथेबद्दल बोलताना येशूने दिलेला नकार म्हणजे हा त्याचा आत्मा नाही,  म्हणून आपण या कथेचा खरा अर्थ समजून घेण्यासाठी अधिक बारकाईने परीक्षण केले पाहिजे.

गंभीर गोष्ट अशी आहे की अनेक आधुनिक भाषांतरामध्ये येशूने जे काही बोलले त्याचा एक गंभीर भाग काढून टाकला जातो:

> हे पाहून त्याचे शिष्य याकोब व योहान म्हणाले, "प्रभूजी, 'आकाशातून अग्नी पडून' त्यांचा 'नाश व्हावा' म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी आपली इच्छा आहे काय?" त्याने वळून त्यांना धमकावले. मग ते दुसऱ्या गावास गेले. लूक 9:54-55 (MARVBSI)

ह्या भाषांतरामध्ये "मी मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला आलो नाही" या वचनाला काढून टाकल्याने वाचकाला प्रश्न पडतो की शिष्यांना का धमकावले गेले. तो कदाचित वेळेचा किंवा देवाच्या सामर्थ्याचा गैरवापराचा मुद्दा असू शकतो. देवाच्या पुत्राचा मनुष्यांच्या जीवाचा नाश न करण्याच्या कार्यावरील वाक्यांशाचा समावेश, केवळ शिष्यांच्या इच्छेबद्दलच नाही तर एलीयाच्या कृतींबद्दल देखील बोलतो.

कर्मेल पर्वतावरील महान विजयानंतर दुसऱ्या दिवशीचा दृश्य आपण पाहतो. जे घडले त्याबद्दल राणी ईजबेल खूप अस्वस्थ झाली आणि ती एलीयाला संदेश पाठवते.

> एलीयाने काय काय केले, तसेच त्याने सर्व संदेष्टे तलवारीने कसे वधले हे सगळे अहाबाने ईजबेलीला कळवले. तेव्हा ईजबेलीने जासूद पाठवून एलीयाला बजावले की, "संदेष्ट्यांच्या जिवाच्या गतीसारखी तुझ्या जिवाची गती उद्या ह्याच वेळी केली नाही तर देव माझे तसेच व त्याहूनही अधिक करोत." 1 राजे 19:1-2

एलीया राजा अहाबला येणाऱ्या दुष्काळाची घोषणा करण्यात निर्भय होता आणि अहाबने त्या साडेतीन वर्षांमध्ये त्याला शोधून मारण्याचा प्रयत्न केला. त्याची काळजी घेण्यासाठी आणि त्याच्या गरजा पुरवण्यासाठी एलीयाचा परमेश्वरावर विश्वास होता. एलीयाने बालच्या संदेष्ट्यांना मारल्यानंतर काहीतरी बदलते आणि तो त्याच्या जीवाच्या रक्षणासाठी धावतो.

> हे ऐकून एलीया जीव घेऊन पळाला; तो यहूदातील बैर-शेबा येथे आला व

> तेथे त्याने आपल्या चाकराला ठेवले. तो स्वतः रानात एक दिवसाची मजल चालून जाऊन एका रतामाच्या झुडपाखाली जाऊन बसला; आपला प्राण जाईल तर बरे असे वाटून तो म्हणाला, “हे परमेश्वरा, आता पुरे झाले, माझा अंत कर; मी आपल्या वाडवडिलांहून काही चांगला नाही.” 1 राजे 19:3-4

एलीया या स्त्रीपासून का पळेल? कर्मेल पर्वतावर तो एकटाच उभा होता जेव्हा बआलचा राजा आणि पुजारी त्याला पकडून कोणत्याही क्षणी ठार करू शकत होते. एलीयाने आपल्या देवाच्या संरक्षणावर भरवसा ठेवला. पण एलीयाला ज्या सुधारणांची अपेक्षा होती ती पूर्ण झाली नाही. बआलच्या उपासनेत सहभागी झाल्याबद्दल लोकांनी पश्चात्ताप केला नाही. त्याचे मन भीतीने भरून आले आणि त्याला आपले कर्तव्य सोडावे लागले. एलियामध्ये असा अचानक बदल का झाला? लोकांचा जीव घेतल्यानंतर, एलीयालाही काईनाप्रमाणे अनुभव येतो.

> पाहा, ह्या जमिनीवरून तू मला आज हाकून दिले आहे; मी तुझ्या दृष्टीपुढून लपलेला असेन, मी पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होणार; आणि ज्या कोणाला मी सापडेन तो मला ठार करील, असे होईल.” उत्पत्ती 4:14

देवाचे चरित्र प्रतिबिंबित करणाऱ्या दहा आज्ञा स्पष्टपणे सांगतात - तु खून करू नकोस. जेव्हा मनुष्य इतर मनुष्याला मारतो तेव्हा आत्म्यामध्ये मृत्यूची भीती वाढते. तुम्ही इतरांसोबत जे करता ते तुमच्यासोबतही होईल अशी भीती वाटते. ही भीती वाढते कारण सैतानाला मोह आणि त्रास देण्यास अधिक प्रवेश दिला जातो. ह्या भीतीचा सामना करण्यासाठी, संरक्षणाची तीव्र इच्छा जाणवते व अनेकदा सैन्य किंवा तटबंदीच्या शहरांच्या निर्मितीची गरज भासते.

एलीयाने शोकपूर्ण शब्द उच्चारले, “हे परमेश्वरा, आता पुरे झाले, माझा अंत कर; मी आपल्या वाडवडिलांहून काही चांगला नाही.” एलीया स्वतःमध्ये कुठल्या गोष्टींशी संघर्ष करत होता? मृत्यूच्या निर्णयापर्यंत तो निराश का झाला? त्याच्यामध्ये सुधारणेची अपेक्षा निर्माण झाली नाही हे खरे आहे, पण मरण्याच्या इच्छेने त्याला आपल्या वडिलांशी तुलना करण्यास कशामुळे प्रवृत्त केले?

> एलीया आपल्यासारख्या स्वभावाचा माणूस होता; त्याने पाऊस पडू नये अशी आग्रहाने प्रार्थना केली, आणि साडेतीन वर्षे पृथ्वीवर पाऊस पडला नाही. याकोब 5:17

त्याचे पळून जाण्याचे कारण विचारले असता एलीयाने प्रभूला काय सांगितले ते पहा.

> तो तेथे जाऊन एका गुहेत राहिला; तेव्हा पाहा, परमेश्वराचे वचन त्याला प्राप्त झाले. तो त्याला म्हणाला, “एलीया, तू येथे काय करीत आहेस?” तो म्हणाला, “सेनाधीश देव परमेश्वर ह्याच्याविषयी मी फार ईर्ष्यायुक्त झालो आहे; कारण इस्राएल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडले, तुझ्या वेद्या

> मोडून टाकल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधले; मीच काय तो एकटा उरलो आहे; आणि आता ते माझाही जीव घेऊ पाहत आहेत.” 1 राजे 19:9-10

एलीयाला विश्वासघात आणि एकटेपणा वाटतो कारण देवासाठी लढणारा तो एकटाच उरला आहे, आणि इतर संदेष्टे मारले गेले आहेत. जर एलीयाचा आपल्यासारखाच स्वभाव होता, तर देवाच्या लोकांचा आणि कदाचित त्याचे चांगले मित्र असलेल्या लोकांच्या हत्येचा बदला घेण्याचा त्याला मोह झाला असता काय? जर तुमच्या जवळच्या मित्राची हत्या झाली तर तुम्हाला बदला घेण्याचा मोह होईल काय? आपले खरे हेतू आपल्या स्वतःपासून लपवले जाऊ शकतात काय?

एलीयाने जेव्हा बआलच्या संदेष्ट्यांच्या नाशाचे दृश्य पहिले, तेव्हा त्याच्या आत्म्यात खोलवर वसलेले मृत्यूचे बीज त्याला दिसून आले काय? तो आपल्या वडिलांपेक्षा श्रेष्ठ नाही याची त्याला जाणीव झाली काय? जेव्हा ईजबेलने त्याच्या जीवाला धोका निर्माण केला तेव्हा देवासोबतच्या त्याच्या नातेसंबंधाबद्दल त्याला अनिश्चितता आली काय? “तुम्ही इथे काय करत आहात?” या प्रश्नाच्या उत्तरात एलीयाने आदामाप्रमाणे बहाणे केले काय? हे सर्व घडण्यामागे खरोखरच देवाची चूक होती असा त्याला विचार आला काय? एलीयाचे उत्तर बचावात्मक आहेत; "मी हे केले आहे आणि मी ते केले आहे." "ही परिस्थिती भयानक आहे आणि मी एकटाच आहे." असे तो म्हणतो.

काही लोकांसाठी सुपरहिरो संदेष्ट्याचा शोध घेण्याचा हा प्रकार निंदनीय आहे. ज्यांना सर्व पापांवर मात करण्याची इच्छा आहे, ते एलीयाच्या अनुभवात त्यांच्या स्वतःच्या स्वभावाचे प्रदर्शन पाहतात जेणेकरून त्यांना पृथ्वीवरील अंतिम संकटाचा सामना करण्याची सूचना मिळावी. या कथा आपल्याला खरोखर काहीतरी शिकवतील अशा रीतीने वाचणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे, जेणेकरून जेव्हा आपल्या जीवनात संकट येते आणि आपण ख्रिस्तासारखे नसलेले चारित्र्य वैशिष्ट्य प्रकट करतो तेव्हा आपण टिकून राहू शकू आणि निराशेने मरण्याची विनंती करणार नाही. आपण ही कथा सखोलपणे वाचली पाहिजे आणि शेवटच्या काळात आपल्यासाठी त्याचे धडे समजून घेतले पाहिजेत. एलीयाचा आत्मा देवाच्या लोकांकडे केवळ जगाला सावध करण्यासाठीच नव्हे तर त्यांना त्यांच्या स्वतःच्या खुनी स्वभावाचे प्रकटीकरण पाहण्याच्या स्थितीत ठेवण्यासाठी येईल. जर आपण हा धडा शिकला नाही, तर आपण निराशाजनक दुःखात मरू, किंवा त्याहूनही वाईटः आपण खुनी वर्तनाला दैवी क्रोध म्हणून पाहू.

आपण खात्री बाळगू शकतो की यावेळी एलीया नवीन कराराच्या अनुभवात नव्हता. नवीन कराराचा अनुभव म्हणजे देवाच्या चरित्राला हृदयात लिहिणे. देवाच्या नियमात देवाचे चरित्र प्रकट होते.

> तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे. रोमकरांस 7:12

> कारण परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर इस्राएलाच्या घराण्याशी जो करार मी करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन, आणि मी त्यांना देव असा होईन, आणि ते मला माझे लोक असे होतील. इब्रीलोकांस 8:10

एलिया सीनाय पर्वतावर पळून जातो मग देव त्याला विचारतो कि, "तू इथे का आहेस?" एलिया तर स्वतःच्या बचावासाठी पळाला होता. तो म्हणतो की तो देवाशी विश्वासू होता तरी पण सर्व काही विस्कळीत होत आहे, देशाचे अधिकारी त्याला मारण्याचा प्रयत्न करत होते. मग परमेश्वर एलीयाला दाखवतो कि समस्या त्याच्या विचारांमध्ये आहे.

> त्याने त्याला म्हटले, “तू येथून बाहेर निघून जा; पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा.” तेव्हा पाहा, परमेश्वर जवळून जात असताना त्याच्यासमोरून मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारत व खडक फोडत होता; पण त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला; पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता; त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली. 1 राजे 19:11-12

निसर्गाच्या भीतीदायक प्रदर्शनामध्ये देवाचे चरित्र प्रकट झाले नाही. स्पष्टपणे, तो या गोष्टींमध्ये नव्हता. स्वर्गातून आलेला अग्नी आणि बलिदानाला भस्मसात करण्याचा अर्थ असा केला गेला की एलीयाला बालाच्या संदेष्ट्यांना तलवारीने ठार मारण्यास कायदेशीर मान्यता दिली. मग त्याला सांगण्यात आले की देव अग्नीत नाही. याचा अर्थ काय होतो? देवाने अग्नी पाठवला पण तो अग्नीत नव्हता? देवाची खरी सेवा कोणी केली हे उघड करण्यासाठी केलेल्या विनंतीला देवाने असा प्रतिसाद दिला आहे. आणि देवाचा प्रतिसाद सर्व मंडळीला कळेल समजेल अशा पद्धतीने त्याला मिळाला.

सर्व इस्राएल जुन्या कराराच्या अनुभवात होते. त्यांनी जे पाहिले ते त्यांच्या समजानुसार देवाच्या शक्तीचे प्रदर्शन होते. देव ह्या अग्नीत आहे असे सर्व लोकांनी पाहिले आणि त्यावरून असा अर्थ लावला. देवाने एलीयाला सांगितले की तो अग्नीत नाही. देवाने लोकांशी त्यांच्या अंतःकरणात जे होते ते दैवी आरशाद्वारे सांगितले. देवाने खरोखरच अग्नीचा चमत्कार केला परंतु त्याद्वारे तो स्वतःच्या चरित्राचे प्रतिबिंब करत नव्हता.

शक्तीच्या प्रदर्शनाने एलीयामध्ये सूडाची बीजे सोडली. जुन्या करारातील नियामशास्त्राचे हे कार्य आहे. देव पापाची वाढ होऊ देणार आहे. ज्या प्रकारे ख्रिस्ताने स्त्रीला सांगितले की मुलांची भाकरी घेऊन ती कुत्र्यांना टाकणे योग्य नाही, त्याच प्रकारे आपल्या स्वर्गातील पित्याने लोकांच्या हृदयाची परीक्षा घेण्यासाठी आपल्या

शक्तीचे प्रदर्शन केले. या प्रदर्शनामुळे एलीयाच्या अंतःकरणामध्ये काय आहे हे दिसून आले. दैवी आरशात एलिया त्याच्या मनात असलेल्या इच्छेअनुसार आज्ञा ऐकतो - म्हणजे बालच्या संदेष्ट्यांना मारण्याची आज्ञा. एलीया हा त्याच्या वडिलांपेक्षा अधिक चांगला खुनी होता हे उघड झाले. बालच्या संदेष्ट्यांना या प्रक्रियेत शिक्षा दिली जाते. मूर्तिपूजा वाईट आहे असा संदेश इस्रायलला पाठवण्यासाठी परमेश्वर जुन्या करारादवारे कार्य करतो, परंतु त्याचे चरित्र या प्रक्रियेत प्रतिबिंबित होत नाही.

वारा, भूकंप आणि अग्नीचा चमत्कार आपल्याला दाखवतो की एलीयाला देवाचे चरित्र समजले नव्हते. तथापि, एलीयाला त्याच्या स्वतःच्या स्वभावाशी फरक दिसावा आणि सूडाच्या या भावनेचा पश्चात्ताप व्हावा यासाठी देव त्याचे स्वतःचे चरित्र त्याच्यासमोर प्रकट करण्याचा प्रयत्न करीत होता. एलीयाकडून कबुली मिळविण्यासाठी देवाने एलीयाला पुन्हा प्रश्न विचारला.

> एलीयाने ती ऐकताच आपल्या झग्याने तोंड झाकून घेतले व बाहेर जाऊन गुहेच्या तोंडाशी तो उभा राहिला. तेव्हा त्याला वाणी ऐकू आली ती अशी, "एलीया, तू येथे काय करीत आहेस?" तो म्हणाला, "सेनाधीश देव परमेश्वर ह्याच्याविषयी मी फार ईर्ष्यायुक्त झालो आहे, कारण इस्राएल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडले, तुझ्या वेद्या मोडून टाकल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधले, मीच काय तो एकटा उरलो आहे; आणि आता ते माझाही जीव घेऊ पाहत आहेत." 1 राजे 19:13-14

एलिया त्याच्या मूळ बचावाची वाक्ये पुन्हा देवाला कळवतो. हे असे सूचित करते की नुकत्याच दाखवलेल्या चमत्कारांचा अर्थ त्याला समजला नाही. एलियाला शेवटच्या मर्यादेपर्यंत आणले जाते. येशूने शिष्यांना म्हटल्याप्रमाणे, तो एलीयाला म्हणतो, "आत्मा उत्सुक आहे खरा, पण देह अशक्त आहे" एलियाला सांगितले जाते की त्याचे कार्य आता लवकरच संपेल.

> परमेश्वर त्याला म्हणाला, "तू परत दिमिष्काच्या रानाकडे जा, तेथे जाऊन पोहचलास म्हणजे हजाएलाला अभिषेक करून अरामावर राजा नेम. निमशीचा पुत्र येहू ह्याला अभिषेक करून इस्राएलावर राजा नेम; तसेच आबेल-महोला येथील शाफाटाचा पुत्र अलीशा ह्याला अभिषेक करून तुझ्या जागी संदेष्टा नेम. 1 राजे 19:15-16

बआलच्या संदेष्ट्यांना मारण्याच्या भीतीचे बीज एलीयामध्ये राहिले. एलीयाचे स्वर्गरोहण होण्याआधीदेखील त्याची खून करण्याची इच्छा पुन्हा प्रकट झाली, जेव्हा एलीयाने त्याला पकडण्यासाठी आलेल्यांवर स्वर्गातून अग्नी बोलावली. जेव्हा हे लोक त्याला पकडण्यासाठी आले तेव्हा एलीयाला भीती वाटली होती हे आपल्याला माहीत आहे काय?

> परमेश्वराचा देवदूत एलीयाला म्हणाला, "खाली उतरून त्याच्याबरोबर जा;

भिऊ नकोस.” तेव्हा एलीया उठून खाली उतरून त्याच्याबरोबर राजाकडे गेला. 2 राजे 1:15

एलीया अजूनही घाबरत होता. पन्नास माणसांच्या नायकाने पहिल्यांदा एलीयाला हाक मारली तेव्हा त्याने त्याला “देवाचा माणूस” म्हटले. त्या नायकाला शंका नव्हती की तो देवाचा माणूस आहे.

> एलीयाने त्या पन्नासांच्या नायकाला म्हटले, “मी देवाचा माणूस असलो तर आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन तो तुला व तुझ्या पन्नास शिपायांना भस्म करो.” तेव्हा आकाशातून अग्नीचा वर्षाव होऊन त्याने त्याला व त्याच्या पन्नास शिपायांना भस्म केले. 2 राजे 1:10

परमेश्वराने एलीयाला दाखवले की तो अग्नीत नाही. मग एलीयाने अग्नी का बोलावली? कारण तो घाबरला होता. स्वर्गातून अग्नी येऊन या माणसांना भस्म करेल हे कसे शक्य आहे? एक्रोनचा देव बाल याच्या सेवेसाठी स्वतःला समर्पित केलेल्या राजाच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या ह्या सैनिकांवरून संरक्षणाचे कुंपण काढून टाकण्यात आले होते. मग ह्या माणसांवर अग्नी कोणी आणली?

> परमेश्वर सैतानाला म्हणाला, “पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस.” मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला. तो हे सांगत आहे इतक्यात दुसऱ्या एकाने येऊन सांगितले, “दैवी अग्नीचा आकाशातून वर्षाव झाला; त्याने मेंढरे व गडी जाळून भस्म केले; हे तुला सांगायला मी एकटा निभावून आलो आहे.” ईयोब 1:12,16

देवाच्या संदेष्ट्याला पकडण्यासाठी पाठवलेल्या माणसांना सैतान का जाळून टाकेल?

> शत्रूचा विश्वास जिंकण्यासाठी स्वतःला दुखापत करणे. स्ट्रॅटेजम 36 पैकी 34.
> द आर्ट ऑफ वॉर

जेव्हा एलीयाने घाबरून आपण खरोखरच देवाचा माणूस असल्याची खात्री देण्यासाठी चमत्काराच्या आधाराची विनंती केली तेव्हा त्याने सैतानाला प्रहार करण्यासाठी दार उघडले. सैतानाने त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या माणसांवर प्रहार करून जगाला खात्री दिली की देवाने या लोकांना मारले आणि त्यांना ठार केले.

येशूच्या शिष्यांनी शोमरोनी लोकांना मारण्यासाठी एलीयाच्या उदाहरणाचे अनुकरण करण्यास उत्सुकता दाखवली. या युक्तीद्वारे सैतानाने त्याच्या पृथ्वीवरील शत्रूंचा विश्वास जिंकला. या मोहक युक्तीद्वारे ते त्याच्या आत्म्यासोबत जुडले गेले. देवाबद्दल सैतानाचे लबाड पसरवण्यासाठी, त्याला फक्त 102 लोकांचा जीव गमवावा लागला, ह्याद्वारे आज बहुतेक ख्रिस्ती लोकांना देवाची खरे चरित्र माहित नाही तर त्यांनी देवाचे चुकीचे चरित्र स्वीकारले आहे. देवाचे खोटे चरित्र निर्माण करण्यासाठी सैतानाने पापी मानवांसोबत भागीदारी केली. लोकांना सूड घेणाऱ्या देवाची ही कल्पना आवडते कारण ती एकतर त्यांच्या स्वतःच्या रागाला माफ करते किंवा तो स्वतःला नैतिकदृष्ट्या देवापेक्षा श्रेष्ठ

समजतो. एलीयाची कथा आपल्याला सैतानाच्या खोटेपणापासून मुक्त होण्यास मदत करू शकते.

जेव्हा मनुष्य स्वरक्षणासाठी दैवी शक्तीचा वापर करतो, तेव्हा तो शत्रूसाठी कार्य करण्यास संक्रमित झाला आहे. आपण जे केले आहे याची कल्पना न करता मनुष्य या अध्यात्मिक युद्धात आपली बाजू बदलू शकतो. स्वर्गातून आलेल्या ह्या अग्नीबद्दल येशूने त्याच्या शिष्यांना सांगितलेल्या शब्दांशिवाय आपल्याला सत्य कधीच कळले नसते की देव मनुष्याचा नाश करण्यासाठी स्वर्गातून अग्नी पाठवत नाही. देवाबद्दलचा असा खोटा विश्वास हे सुनिश्चित करेल की आपण प्रेमाने नव्हे तर भीतीने त्याची सेवा करण्याचा प्रयत्न करतो.

वाळवंटातील 40 दिवसांच्या परीक्षानंतर येशूला खूप भूक लागली होती. सैतानाने येशूला स्वतःला वाचवण्यासाठी चमत्कार करण्यास प्रवृत्त केले. तो म्हणाला, “जर तू देवाचा पुत्र आहेस तर या दगडांचे भाकरीमध्ये रूपांतर कर.” उत्तरात येशू म्हणाला की, “मनुष्य केवळ भाकरीने जगणार नाही तर पित्याकडून आलेल्या प्रत्येक वचनाने जगेल.” त्याने शत्रूच्या "जर" प्रश्नाला नकार दिला आणि त्याच्या पित्याच्या शब्दाला धरून राहिला. सन तुझं ह्यानंच्या 'द आर्ट ऑफ वॉर' मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सैतानाच्या रणनीतीचा पराभव करू इच्छिणाऱ्यां सर्वांनी सैतान कसा कार्य करतो हे समजून घेतले पाहिजे; सैतानादवारे प्रेरित जादूच्या पुस्तकांचा अभ्यास करून नाही, तर आपल्याला देवाकडून मिळालेल्या ज्ञानाद्वारे ते समजून घ्यावे म्हणजे येशूला आपले हट्टी, व सदोष चारित्र्य दाखविण्याची परवानगी देऊन, आणि त्याला आपल्यामध्ये बदल घडवून आणण्याची परवानगी देऊन. देवाची मुले या नात्याने, आम्हाला ख्रिस्ताच्या आत्मत्यागी प्रेमाचे अनुकरण करण्यासाठी बोलावण्यात आले आहे, ज्याचे मूळ आपल्या स्वर्गीय पित्यावर अतूट विश्वास ठेवणे आहे:

> त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले; आणि त्यांच्यावर मरायची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीती केली नाही. प्रकटीकरण 12:11

देवाचे लोक त्यांच्या हाताच्या तलवारीने व त्यांच्या लोकांना मारण्याच्या सामर्थ्याने संकटांवर मात करत नाहीत. ते त्यांच्या जीवनावर मरेपर्यंत प्रेम करत नाहीत.

> ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ती, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तलवार ही विभक्त करतील काय? शास्त्रात लिहिल्याप्रमाणे, “तुझ्यामुळे आमचा वध दिवसभर होत आहे; कापायच्या मेंढरासारखे आम्हांला गणले आहे.” उलटपक्षी, ज्याने आपल्यावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो. रोमकरांस 8:35-37

मग एलीयाचे स्वर्गरोहण कसे होऊ शकते? एलीया हा शेवटल्या दिवसातील त्या लोकांचा एक प्रकार आहे ज्यांना मृत्यू न पाहता स्वर्गात घेतले जाईल.

> पाहा, परमेश्वराचा मोठा व भयंकर दिवस येण्यापूर्वी मी एलीया संदेष्ट्याला तुमच्याकडे पाठवीन. तो वडिलांचे हृदय त्यांच्या पुत्रांकडे व पुत्रांचे हृदय त्यांच्या वडिलांकडे वळवील; नाहीतर कदाचित मी येईन आणि भूमीला शापाने ताडन करीन.” मलाखी 4:5-6

शेवटल्या दिवसात देवाचा अवशेष एलीयाच्या आत्म्यामध्ये त्या भयानक श्वापद आणि त्याच्या प्रतिमेला सामोरे जाईल. रोमकरांस 11:2-5; प्रकटीकरण 12:17. या लोकांना त्यांच्या धार्मिकतेबद्दल जागतिक नेत्यांना तोंड देताना एलियासारख्याच आव्हानांना सामोरे जावे लागेल. हे आव्हान याकोबाच्या कथेतूनही व्यक्त होतात.

> हायहाय! तो महादिन आहे; त्याच्यासमान दुसरा कोणता नाही; तो याकोबाचा क्लेशसमय आहे तरी त्यातून त्याचा निभाव होईल. सेनाधीश परमेश्वर म्हणतो, त्या दिवशी असे होईल की मी तुझ्या मानेवरील त्यांचे जू मोडीन, तुझी बंधने तोडीन, ह्यापुढे परके तुझ्या लोकांकडून दास्य करवून घेणार नाहीत; यिर्मया 30:7-8

एलीयाचे स्वर्गरोहण करण्याआधी, पापाचे जोखड पूर्णपणे तोडले गेले पाहिजे. स्वर्गात जाण्यापूर्वी एलीयाच्या उत्कंटतेवर मात करणे आवश्यक आहे. एलीयाची कथा पृथ्वीच्या इतिहासाच्या अंतिम घटनांशी जोडलेली आहे.

> ते मोठी चिन्हे करते; माणसांसमक्ष आकाशातून पृथ्वीवर अग्नी पडावा असेदेखील करते. जी चिन्हे त्या श्वापदासमक्ष करण्याचे त्याच्याकडे सोपवले होते, त्यावरून ते पृथ्वीवर राहणाऱ्यांना ठकवते; म्हणजे तलवारीचा घाव लागला असताही, जिवंत राहिलेल्या श्वापदासाठी मूर्ती करण्यास पृथ्वीवर राहणाऱ्यांना ते सांगते. त्या श्वापदाच्या मूर्तीत प्राण घालण्याची त्याला मुभा देण्यात आली; ह्यासाठी की, श्वापदाच्या मूर्तीने बोलावे आणि ‘जे कोणी’ त्या श्वापदाच्या ‘मूर्तीला नमन करणार नाहीत’ ते जिवे मारले जावेत असे तिने घडवून आणावे. लहानथोर, धनवान, दरिद्री, स्वतंत्र व दास, ह्या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा आपल्या कपाळावर खूण करून घ्यावी; प्रकटीकरण 13:13-16

मलाखी 4:5-6 आणि प्रकटीकरण 13:13-16 च्या भविष्यवाणीच्या संदर्भात एलीयाची स्वर्गातून अग्नी बोलावण्याची गोष्ट मांडणे शेवटच्या दिवसातील घटनांना त्याच्या अनुभवाशी जोडते. एलीयाच्या अंतःकरणातील भीतीवर विजय मिळवावा लागेल, आणि आत्म्याचा शोध घेण्याच्या प्रक्रियेतूनच एलीयाने आपल्या खांद्यावरून जोखड तोडले. एलीया हा प्रार्थना करणारा माणूस होता. त्याने कार्मेल पर्वतावर पावसासाठी मनापासून प्रार्थना केली, विश्वासाने तो, माणसाच्या हाताच्या आकाराच्या लहान ढगाची वाट पाहत राहिला. 1 राजे 18:41-45. शेवटच्या दिवसांत, प्रभूचे लोक देखील याकोबाच्या संकटाच्या वेळी श्वापदावर आणि त्याच्या प्रतिबिंबावर विजय मिळविण्यासाठी मनापासून प्रार्थना करतील.

> त्या समयी तुझ्या लोकांचा कैवार घेणारा मोठा अधिपती जो मीखाएल तो उठेल; कोणतेही राष्ट्र निर्माण झाल्यापासून कधीही आले नाही असे संकट त्या समयी येईल; तुझ्या लोकांपैकी ज्यांची नावे वहीत लिहिलेली आढळतील ते सर्व त्या वेळी मुक्त होतील. दानिएल 12:1

एलीयाचा अनुभव बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या जीवनातही दिसून येतो. मृत्यू होण्यापूर्वी त्याच्यावर विश्वासाचे मोठे संकट होते.

> योहान बंदिशाळेत असताना त्याने ख्रिस्ताच्या कृत्यांविषयी ऐकून आपल्या शिष्यांना पाठवून त्याला विचारले, "जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?" मत्तय 11:2-3

येशूने बाप्तिस्मा देणाऱ्या योहानाचा दुसरा एलीया म्हणून उल्लेख केला.

> आणि हे पत्करण्याची तुमची इच्छा असेल तर जो एलीया येणार तो हाच आहे. मत्तय 11:14

ख्रिस्तावर मशीहा म्हणून विश्वास ठेवताना योहानाने अनुभवलेल्या विश्वासाच्या संकटाद्वारे त्याच्या चारित्र्यातील अयोग्य घटक समोर आले ज्यावर त्याला मात करणे आवश्यक होते. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणे, एलीयाला या गोष्टींवर मात करावी लागली. परीक्षा मानवी पापीपणा उघड करतात, परंतु देवाच्या धार्मिकतेला अधिक तेजस्वीपणे चमकण्याची संधी देखील देतात.

> शिवाय अपराध वाढावा म्हणून नियमशास्त्राचा प्रवेश झाला; तरी जेथे पाप वाढले तेथे कृपा त्यापेक्षा विपुल झाली. अशासाठी की, जसे पापाने मरणाच्या योगे राज्य केले तसे कृपेने नीतिमत्त्वाच्या योगे सार्वकालिक जीवनासाठी येशू ख्रिस्त आपला प्रभू ह्याच्या द्वारे राज्य करावे. रोमकरांस 5:20-21

एकट्या मसीहाच्या धार्मिकतेवर अवलंबून एलीया स्वर्गात गेला. तो आपल्या शत्रूंना अग्नीने जाळून सुपरहिरो संदेष्टा म्हणून गेला नाही. तो कोकऱ्याच्या वचनात देवाच्या कृपेवर एकट्याने भरवसा ठेवून असहाय्य पापी म्हणून गेला.

शेवटच्या दिवसांत देवाच्या लोकांमध्ये प्रकट होण्यासाठी याकोब, एलीया, बाप्तिस्मा करणारा योहान आणि एलीयाचा आत्मा यांच्या कथा एकत्र केल्यावर, आपण पाहतो की जीवनाचा मुकुट प्राप्त करण्यासाठी त्या सर्वांना पश्चात्ताप करण्यासाठी आणले गेले. त्या सर्वांना एका कठीण स्थितीत आणले जाते जेथे त्यांच्या कमजोर मानवी व अपराधी स्थितीचे मुळ उघड होते.

एलीयाच्या जीवनात पश्चातापाचे हे कार्य पवित्र शास्त्राच्या वाचकांना दिसत नाही, तरीही येशूचे शब्द सूचित करतात की एलीयातील प्रारंभिक आत्मा ख्रिस्ताचा आत्मा नव्हता. स्वर्गारोहण होण्यापूर्वी ह्याबद्दल पश्चात्ताप झाला असावा. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचा मशीहावर विश्वास नसल्याचा अर्थ असा होतो की सार्वकालिक जीवन मिळविण्यासाठी त्याला पश्चात्ताप करणे आवश्यक होते. या दोन माणसांचे अनुभव शेवटच्या काळातील लोकांद्वारे पुन्हा अनुभवले जातील. काहींना मृत्यू न पाहता स्वर्गात घेतले जाईल (1 थेस्सलनीकाकर 4:15-17) परंतु त्यांच्या आत्म्यातील घाण शुद्ध करण्यासाठी त्यांना संकटाच्या काळातून जावे लागेल. काहींना बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणे फाशी देण्यात येईल. शेवटी, सर्वांना कायमस्वरूपी पश्चात्तापाकडे वळवले जाईल.

> कारण ईश्वरप्रेरित दुःख तारणदायी पश्चात्तापास कारणीभूत होते, त्याबद्दल वाईट वाटत नाही; पण ऐहिक दुःख मरणास कारणीभूत होते. 2 करिंथ 7:10

याकोबासाठी, त्याच्या आत्म-विश्वासू, आत्म-संरक्षणात्मक, आणि फसव्या चारित्र्याने देवाच्या पुत्राबरोबर रात्रभर संघर्ष केल्यानंतर शेवटी आत्मसमर्पण केले, त्याला दैवी आशीर्वादाचे आश्वासन मिळेपर्यंत सोडण्यास नकार दिला आणि ज्या देवाने त्याला आयुष्यभर अन्न पुरवले त्या देवावर त्याने पूर्ण विश्वास ठेवला. उत्पत्ति 48:15.

एलीयासाठी, दोन घटनांमध्ये मारल्या गेलेल्या 952 माणसांच्या मृतदेहांनी एलियामधील सूड आणि भीतीबद्दलची पूर्वीची अपरिचित प्रवृत्ती प्रकट केली.

योहान बाप्तिस्म्यासाठी, त्याने मसीहाच्या कार्यावर शंका घेण्याचा धोका पत्करला ज्यामुळे हजारो लोकांवर परिणाम झाला असेल. तरीही त्या दोघांनी पश्चात्ताप करून आणि केवळ आपल्या तारणाऱ्याच्या गुणवत्तेवर विश्वास ठेवून त्यांच्या स्थितीवर मात केली. शेवटल्या दिवसातील देवाच्या लोकांचाही असाच अनुभव असेल. ती अंतिम सीमा आहे.

जगात कुठेही सुपरहिरो संदेष्टे नाहीत; तेथे फक्त ख्रिस्त आहे ज्याला वधस्तंभावर खिळलेले आहे. तारणासाठी फक्त ख्रिस्ताची धार्मिकता पाहिजे. देवाने या दोन संदेष्ट्यांमध्ये महान गोष्टी केल्या, तरीही सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यांच्या स्वतःच्या तारणाची गरज इतर कोणापेक्षा वेगळी नाही हे त्यांना देवाने समजावले.

जेव्हा आपण हे सत्य खऱ्या अर्थाने समजून घेऊ की - कोणीही नीतिमान नाही, कोणीच नाही - तेव्हा सैतानाची फसवणूक आपल्यावरील शक्ती गमावेल.

पवित्र शास्त्रामध्ये दर्शविलेल्या संदेष्ट्यांची हिंसक कृत्ये देवाच्या चारित्र्याचे अचूक प्रतिनिधित्व करतात अश्या विश्वासामध्ये लोकांना फसवण्याचा सैतानाचा हेतू आहे. जेव्हा देव मनुष्याला जुन्या करारादवारे स्वतःला पाहण्यासाठी आणतो, तेव्हा सैतान मनुष्यांना देवाच्या चरित्राचे प्रतिबिंब म्हणून उघड झालेल्या दुर्बल मानवी कृतींना प्रक्षेपित करतो. मानवी कृतींना दैवी ठरवून ती पवित्र करणे ही सूड, हिंसाचार आणि शत्रूंचा नायनाट करण्यासाठी वापरली जाणारी सैतानाची युक्ती आहे.

पित्याचे परिपूर्ण उदाहरण म्हणून आपण ख्रिस्ताकडे पाहू या. केवळ त्याच्या चारित्र्याचा अभ्यास केल्यावरच आपण खात्री बाळगू शकतो की आपल्याला वारा, भूकंप आणि अग्नी यांच्याशी न मिसळणारा देवाचा लहान सौम्य आवाज ऐकू येत आहे. आपण देवाचा गैरसमज करून त्याला दुखवू नये, कारण अशा प्रकारे सत्य नाकारले जाते आणि मनुष्याला तुच्छ लेखले जाते. "त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते." यशया 53:9.

## 24. आब्राहाम आणि विध्वंसकारी घृणास्पद गोष्टी

> ह्या गोष्टी घडल्यावर असे झाले की देवाने अब्राहामाला कसोटीस लावले; त्याने 'अब्राहामा', अशी हाक मारली, तेव्हा अब्राहाम म्हणाला, "काय आज्ञा?" देव म्हणाला, "तुझा पुत्र, तुझा एकुलता एक प्रिय इसहाक ह्याला घेऊन मोरिया देशात जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर." उत्पत्ती 22:1-2

आपण आतापर्यंत शिकलेल्या गोष्टींद्वारे हे स्पष्ट झाले पाहिजे की हा उतारा किमान दोन वेगवेगळ्या प्रकारे वाचला जाऊ शकतो. एक म्हणजे अशा आश्चर्यकारक रीतीने देवाचे प्रेम प्रकट होते; अब्राहामाने आपला मुलगा इसहाक ह्याला अर्पण करणे हे देवाच्या प्रेमाचे प्रतीक आहे जो देव आपल्यासाठी त्याच्या पुत्राचा त्याग करण्यास तयार आहे जेणेकरून आपण देवाच्या पुत्राचे नाव (चरित्र) पाहू आणि त्यावर विश्वास ठेवू आणि अनंतकाळाचे जीवन मिळवू शकू. याउलट, जुन्या कराराच्या दैवी आरशातुन पाहताना देव अब्राहामाच्या निष्ठेची अत्यंत क्रूरतेने चाचणी घेत असल्याची विरोधाभासी प्रतिमा सादर होते, स्वतः च्या मुलाची बळी देण्याची आज्ञा देखील देवाची विरोधाभासी प्रतिमा सादर करते.

देव अब्राहामाला त्याच्या वचन दिलेल्या पुत्राला होमार्पणासाठी अर्पण करण्यास का सांगेल? मृत्यूद्वारे समाधानाची मागणी करणाऱ्या क्रोधित देवाच्या संकल्पनेत ही विनंती पूर्णपणे योग्य दिसते. सर्व मूर्तिपूजक धर्म अशा प्रकारे चालतात; त्यागाद्वारे आपल्या देवाला संतुष्ट करणे हे मूर्तिपूजकतेचे हृदय आहे. पवित्र शास्त्र खरे पाहता या प्रकाशात देवाचे चित्रण का करते?

प्रथम, आपण मागे जाऊन पवित्र शास्त्रातील यज्ञबलीची सुरवात कोठे झाली हे पाहू.

> परमेश्वराने आदाम व त्याची स्त्री ह्यांच्यासाठी चर्मवस्त्रे करून त्यांना घातली. उत्पत्ती 3:21

ती कातडाची वस्त्रे कसे अस्तित्वात आली हे आम्हाला सांगितलेले नाही. कातडे मिळवण्यासाठी प्राण्यांना मरावे लागण्याची दाट शक्यता आहे. देवाने हे कातडे एखाद्या प्राण्याच्या मृत्यूशिवाय देखील तयार केले असावे परंतु हे केवळ अनुमान आहे कारण ह्या वचनावरून आपल्याला माहित नाही. बलिदानाबद्दल बोलणारा पहिला उतारा उत्पत्तिच्या पुढील अध्यायात आपल्याला आढळतो.

> काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणले. हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण आणले. परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला; उत्पत्ती 4:3-4

या कथेवरून असे सूचित होते की अर्पण आवश्यक होते आणि कोकऱ्याशिवाय उपासना स्वीकारणीय मानली जाऊ शकत नाही.

> पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने आदर केला नाही; म्हणून काइन संतापला व त्याचे तोंड उतरले. तेव्हा परमेश्वर काइनाला म्हणाला, "तू का संतापलास? आणि तुझे तोंड का उतरले? तू बरे केलेस तर तुझी मुद्रा प्रसन्न होणार नाही काय? पण तू बरे केले नाहीस तर दाराशी पाप टपूनच आहे; त्याचा रोख तुझ्यावर आहे. ह्याकरता तू त्याला दाबात ठेव." उत्पत्ती 4:5-7

म्हणून असे दिसते की देवाने त्यांच्या उपासनेचा भाग म्हणून प्राण्यांचा बळी घेणे आवश्यक होते. काईनने पशुबळी आणण्यास नकार दिल्यामूळे पहिल्या हत्येच्या सुरवातीला प्रोत्साहन मिळाले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे काईन कोकऱ्याचे बलिदान ओळखू शकला नाही तरी, त्याने स्वतःचा क्रोध शांत करण्यासाठी त्याच्या भावाच्या हत्येचा पर्याय शोधला.

इसहाकच्या होमार्पणाची कथा प्रायश्चितासाठी मानवी बलिदानाच्या संकल्पनेशी समांतर आहे. बलिदानांबाबतीत परमेश्वराच्या मनोवृत्तीबद्दल आम्ही खालील गोष्टी मोठ्या आवडीने लक्षात घेतो.

> हे परमेश्वरा, माझ्या देवा, तू आमच्यासाठी केलेली अद्भुत कृत्ये व आमच्याविषयीचे तुझे विचार पुष्कळ आहेत; तुझ्यासमोर त्यांची क्रमवार मांडणी करता येणार नाही; मी ते सांगू लागलो तर ते माझ्या गणनेपलीकडे आहेत. यज्ञपशू व अन्नार्पण ह्यांत तुला संतोष नाही; तू माझे कान उघडले आहेस; होम व पापाबद्दल अर्पण ही तू मागत नाहीस. स्तोत्रसंहिता 40:5-6

आत्म्याद्वारे प्रेरित स्तोत्रकर्ता घोषित करतो की देवाला अर्पणाची इच्छा नव्हती. त्यानंतर तो अविश्वसनीय विधान करतो की देवाने कधीही होमार्पण आणि पापार्पण मागितले नाही किंवा मागत नाही. सुरुवातीला हा विचार बाकीच्या जुन्या करारात लिहिलेल्या गोष्टींशी पूर्णपणे विसंगत वाटतो. बलिदान कसे सादर करायचे याविषयी देवाने मोशेला स्पष्ट तपशिलांसह दिलेल्या सूचनांवरून असे दिसून येते की देवाला नेमके हेच हवे होते. तरीही आम्ही पुन्हा वाचतो:

> तुमच्या पूर्वजांना मी मिसर देशातून बाहेर आणले त्या दिवशी होमबलींविषयी किंवा यज्ञबलींविषयी मी त्यांना काही सांगितले नाही व आज्ञा दिली नाही. तर मी त्यांना एवढीच आज्ञा केली की, 'माझे वचन ऐका, म्हणजे मी तुमचा देव होईन व तुम्ही माझे लोक व्हाल; तुमचे बरे व्हावे म्हणून जो सरळ मार्ग मी तुम्हांला सांगतो त्याने चाला.' तरीपण त्यांनी ऐकले नाही, आपला कान दिला नाही, ते आपल्या संकल्पाप्रमाणे, आपल्या दुष्ट मनाच्या हट्टाप्रमाणे चालले, ते मागे गेले, पुढे आले नाहीत. यिर्मया 7:22-24

हे पूर्णपणे विरोधाभासी दिसते. यिर्मया संदेष्टा दैवी प्रेरणेने लिहितो की देवाने इस्रायलला होमार्पण आणि यज्ञ करण्याविषयी सूचना दिली नाही. पण मोशेच्या लिखाणात याविषयी अनेक आज्ञा आहेत.

> मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "इस्राएल लोकांना असे सांग : परमेश्वराने निषिद्ध ठरवलेल्या कृत्यांपैकी एखादे कृत्य चुकून केल्याने कोणाकडून पाप घडले, म्हणजे लोकांवर दोष येईल अशा प्रकारचे पाप जर अभिषिक्त याजकाने केले तर त्याने आपल्या पातकाबद्दल पापबली म्हणून एक दोषहीन गोऱ्हा परमेश्वराला अर्पावा. तो गोऱ्हा परमेश्वरासमोर दर्शनमंडपाच्या दाराजवळ त्याने आणावा व त्याच्या डोक्यावर आपला हात ठेवावा आणि परमेश्वरासमोर त्याचा वध करावा. लेवीय 4:1-4

> परमेश्वर मोशेला म्हणाला, "इस्राएल लोकांना आज्ञा कर की, माझे अर्पण म्हणजे माझे सुवासिक हव्यान्न तुम्ही माझ्याप्रीत्यर्थ नियमित समयी अर्पण करण्यास जपा. आणखी तू त्यांना सांग, परमेश्वराप्रीत्यर्थ जे हव्य तुम्ही अर्पायचे ते हे : नित्य होमार्पणासाठी रोज एकेक वर्षाची दोन दोषहीन नरजातीची कोकरे. एक कोकरू सकाळी अर्पावे आणि दुसरे कोकरू संध्याकाळी अर्पावे. गणना28:1-4

या पुस्तकाच्या 21 व्या अध्यायातील मुख्य मुद्द्यांपैकी एकाची आम्ही स्वतःला आठवण करून देतो.

## ...जुन्या करारात किंवा नैसर्गिक अवस्थेत, त्याने ज्या आज्ञा जारी केल्या आहेत त्या पृथ्वीवरील येशूच्या जीवनाशी विरोधाभासी आहेत त्या दैवी आरशाच्या कार्याचा पुरावा देतात.

एदेन बागेत जेव्हा देव आदामाच्या जवळ आला त्या घटकेस आपण परत जाऊयात. देवाने आदामाला विचारले की त्याने चांगल्या आणि वाईटाच्या ज्ञानाच्या झाडाचे फळ खाल्ले आहे काय? आदाम आपल्या कृत्यांबद्दल पश्चात्ताप करत नाही, उलट समस्या निर्माण केल्याबद्दल देवावरच आरोप लावतो. आदामाला हे कळाले नाही की त्याच्या हृदयात हत्येची बीजे आहेत. सर्पाचा सल्ला घेताना, आदामाने सर्पाचा आत्मा स्वीकारला आहे जो सुरुवातीपासून मनुष्यघातकी होता. योहान 8:44. आदामाला त्याच्या पापाबद्दल पश्चात्ताप करण्यासाठी, त्याने फळ खाण्याच्या प्रक्रियेत नेमके काय केले हे समजून घेणे आवश्यक आहे.

आम्ही या वास्तविकतेची चर्चा धडा 19 - आपल्या पापांमुळे घायाळ झालेला. ह्यामध्ये केली आहे. आपण हा मुद्दा पुन्हा पाहुयात:

> जेव्हा आदाम आणि हव्वा पापात पडले तेव्हा ते स्वभावाने सैतानासारखे झाले. ख्रिस्ताचा आत्मा जो त्यांच्यामध्ये होता तो दातात पीसणाऱ्या दाण्यासारखा छेदला आणि चिरडला गेला. मनुष्यामध्ये असलेला ख्रिस्ताचा आत्मा त्यांना जीवन देतो. तो प्रकाश आहे जो जगात येणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रकाश देतो, योहान 1:9. जर ख्रिस्ताने आदामला पूर्णपणे सोडले तर तो मरेल. आदामामधील ख्रिस्ताचा आत्मा चिरडला गेला होता तरीही ख्रिस्ताने स्वतः माघार घेतली नाही, जरी यामुळे त्याला वेदना होत राहिल्या. ख्रिस्ताच्या म्हणजेच त्या खडकच्या सततच्या दुःखातून, आदामला जिवंत ठेवण्यासाठी आध्यात्मिक पाणी बाहेर आले. आगपे, धडा 19.

त्याच्या अंतकरणात हिंसाचाराची बीजे आहेत हे आदामाला माहीत नव्हते. 4000 वर्षांनंतर प्रकट होणाऱ्या ख्रिस्ताच्या वधस्तंभावर खिळलेल्या घटनांचा स्रोत त्याच्यापासून झाला हे त्याला समजले नाही. आदामाला त्याची निराशाजनक परिस्थिती समजून घेण्यासाठी, ख्रिस्ताच्या आत्म्याला प्रतिसाद देण्यासाठी आणि पश्चात्ताप करण्यासाठी ख्रिस्ताने आदामाला समस्या काय आहे हे दाखवायचे होते.

बलिदानपद्धती ही ख्रिस्ताप्रती मनुष्यांना स्वाभाविकपणे काय वाटते याचा दैवी आरसा होता. बलिदान प्रणाली हे मनुष्याला ख्रिस्ताकडे आणण्यासाठी एका शालेय शिक्षणासारखे होते, तरीही आपण आगोदर सांगितल्याप्रमाणे, मनुष्य हा दैवी आरसा पुन्हा देवावर प्रक्षेपित करतात आणि त्यांच्या स्वतःचे चरित्र देवावर ठेवतात. अशा प्रकारे हे जवळजवळ सर्वत्र मानले जाते की देवाने यज्ञांची मागणी केली होती आणि परिणामी लोक जाणूनबुजून किंवा नकळत असा विश्वास करतात

की देवाने स्वतःच्या पुत्राला मारले.

आब्राहामाचे पालनपोषण बाबेल राज्यामध्ये झाले - जो चाल्डीजचा देश होता. उत्पत्ति 11:31. तो मानवी बलिदानाच्या संस्कृतीत वाढला होता. काईनाने आपल्या भावाचा वध केल्यावर जी तत्त्वे प्रकट झाली होती ती प्रत्येक मूर्तिपूजक धर्माची ओळख बनली. लाखो प्राण्यांची आणि हजारो लोकांची कत्तल हे सर्व मनुष्याच्या फसव्या अंतःकरणातून उद्‌भवते जे त्यांच्या स्वतःच्या क्रोधयुक्त स्वभावाला देवावर प्रतिबिंबित करतात. बलिदान हे स्वतःचे आणि त्याच्या बिघडलेल्या अवस्थेचे प्रतिबिंब आहे हे मान्य करण्याऐवजी, मनुष्य देवाला संतुष्ट करण्यासाठी त्याला आवश्यक असलेले काहीतरी अर्पण करतात.

> तेव्हा शमुवेल म्हणाला, "परमेश्वराचा शब्द पाळल्याने जसा त्याला संतोष होतो तसा होमांनी व यज्ञांनी होतो काय? पाहा, यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरे; एडक्यांच्या चरबीपेक्षा वचन ऐकणे बरे. 1 शमुवेल 15:22

अब्राहामाने परमेश्वरावर विश्वास ठेवला नाही की तो त्याला वचन दिलेला मुलगा देईल ज्याची अब्राहामाला खूप इच्छा होती. त्याने परमेश्वराला आपला विश्वासू सेवक एलिएजराला स्वीकारण्यास सांगितले. उत्पत्ति 15:2. त्यानंतर अब्राहामाने इश्माएलला जन्म देणारी त्याची सेविका हागार हिच्याद्‌वारे मुलगा होण्यासाठी आपल्या पत्नीची सूचना ऐकली.

त्यांच्या विश्वासाच्या कमतरतेमुळे नकारात्मक कौटुंबिक वातावरण निर्माण झाले आणि आब्राहामाला हागार आणि इश्माएलाला त्याच्या घरातून दूर पाठवण्यास भाग पडले. निराशेत आब्राहामाला त्याच्या अपयशाची जाणीव होते. देवाला संतुष्ट करण्यासाठी काहीतरी त्याग करण्याचा त्याचा मोह वाढतो. आब्राहामाच्या सुरुवातीच्या जीवनातील अनुभवांनी, जन्मजात मानवी दुर्बलतेसह, त्याला संतुष्टीकरणाद्‌वारे प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडले.

याच संदर्भात देव आब्राहामाची समस्या दैवी आरशात ठेवतो. परमेश्वराचा आदेश संतुष्टीकरणाच्या दृष्टीने त्याच्या स्वतःच्या विचारसरणीचे प्रतिबिंब म्हणून त्याच्यापुढे येतो.

त्याच वेळी आम्ही काळजीपूर्वक लक्षात घेतो की देवाने अब्राहमला त्याचा मुलगा इसहाक ह्याला मारण्यास सांगितले नाही. देवाने त्याला इसहाकाचे होमार्पण करण्यास सांगितले. ह्या आज्ञाने आपल्याला दोन वेगवेगळ्या प्रकारे वाचण्याची क्षमता प्रदान केली.

आपली मुलगी बरी व्हावी अशी विनंती करणाऱ्या स्त्रीशी येशू बोलला तेव्हा येशू म्हणाला, "मुलांचे अन्न घेऊन ते कुत्र्यांना टाकणे योग्य नाही." त्याने येशूने तिला कुत्रा म्हटले नाही. त्याने शिष्यांच्या मनात असलेला विचार आणि यहूदी लोक

तिच्याबद्दल जे विचार करत होते ते शब्द बोलला. येशूच्या विधानाने स्त्रीला अपमानित आणि अपमानास्पद वाटले, परंतु ती सहजपणे तिच्या योग्यतेचे आणि प्रतिष्ठेचे रक्षण करू शकली असती.

आब्राहामाच्या कथेतही असेच घडते. देवाने फक्त अब्राहामला त्याच्या मुलाला होमार्पण म्हणून अर्पण करण्यास सांगितले. आपल्या मुलाला मारण्यासाठी त्याने त्याला स्पष्टपणे सांगितले नाही. आब्राहामाचा हेतू त्याच्या मुलासाठीच्या त्याच्या सर्व इच्छा देवाच्या इच्छेला पूर्णपणे समर्पण करण्याचा असावा. आब्राहामाला ज्या पद्धतीने वाढवले गेले आणि त्याच्या संतुष्टीकरणाच्या मानसिकतेमुळे, आब्राहामाला समजले की त्याने मुलाला मारावे अशी देवाची इच्छा आहे. असे काही घडणार हे देवाला माहीत होते. देवाला संतुष्ट करण्यासाठी आब्राहामाची सद्विवेकबुध्दी परमेश्वरावरील पूर्ण विश्वासाने बदलली पाहिजे होती. जुन्या कराराच्या गौरवातुन आब्राहामाला आत्मा आणि सत्याद्वारे विश्वासाच्या नवीन करारात आणण्याची ही एक आश्चर्यकारक प्रक्रिया आहे. . 2 करिंथकर 3:7-9.

> तेव्हा परमेश्वराच्या दूताने त्याला आकाशातून हाक मारून म्हटले, “अब्राहामा! अब्राहामा!” तो म्हणाला, “काय आज्ञा?” मग तो बोलला, “तू मुलावर आपला हात चालवू नकोस, त्याला काही करू नकोस; कारण तू आपल्या मुलाला, आपल्या एकुलत्या एका मुलालाही माझ्यापासून राखून ठेवले नाहीस, ह्यावरून तू देवाला भिऊन चालणारा आहेस हे मला कळले.” तेव्हा अब्राहामाने दृष्टी वर करून पाहिले तेव्हा आपल्यामागे झुडपात शिंगे गुंतलेला एक एडका त्याला दिसला. मग अब्राहामाने तो एडका घेऊन आपल्या पुत्राच्या ऐवजी अर्पण केला. उत्पत्ती 22:11-13

जर आपण या कथेतून असा अर्थ काढला की देवाला आपल्या मुलांच्या हत्येद्वारे संतुष्टीकरण हवे नाही तर त्याच्या स्वत: च्या पुत्राच्या हत्येद्वारे हवे आहे, तर मध्य अमेरिकेतील अझ्टेकच्या उदाहरणावरून आपण अजूनही मूर्तिपूजेमध्ये खोलवर अडकलेले आहोत. फरक एवढाच आहे की जेव्हा देव कोणाच्या पुत्राला मारण्याची मागणी करतो; तेव्हा मूर्तिपूजकांच्या बलिदानाच्या तुलनेत देवाचा पुत्र अधिक योग्य आणि मौल्यवान बलिदान भासतो.

यज्ञ अर्पण करून देवाला संतुष्ट करण्याची इच्छा शतकानुशतके देवाला सतत दुःख देत आहे. प्राण्यांच्या कत्तलीने मनुष्याने त्याला संतुष्ट करावे अशी त्याची कधीही इच्छा नव्हती.

> नंतर नोहाने परमेश्वरासाठी वेदी बांधली; आणि त्याने सर्व शुद्ध पशू व सर्व शुद्ध पक्षी ह्यांतले काही घेऊन त्या वेदीवर त्यांचे होमार्पण केले. परमेश्वर त्याचा सुवास घेऊन आपल्या मनात म्हणाला, “मानवामुळे मी इत:पर भूमीला कधीही शाप देणार नाही; कारण मानवाच्या मनातल्या कल्पना बाळपणापासून दुष्ट असतात; तर मी आताच्याप्रमाणे पुन्हा अखिल

जिवांचा कधीही संहार करणार नाही. उत्पत्ती8:20-21

या वचनाच्या प्रथम वाचनाने मनुष्यांना असे वाटते की देव बलिदानाने प्रसन्न होतो. परमेश्वराने घेतलेला सुवासामुळे तो ह्यापुढे जमिनीला शाप देणार नाही असे वचन देतो. खरे म्हणजे सुवास हा शब्द प्रत्यक्षात रुच हा शब्द आहे. हा मूळ शब्द आहे ज्यावरून आपल्याला आत्मा किंवा देवाचा आत्मा हा शब्द मिळतो. या शब्दाचा पुढीलप्रमाणे अर्थ आहे:

> एक मूळ शब्द; योग्यरित्या फुंकणे, म्हणजे, श्वास घेणे; फक्त (शब्दशः) करण्यासाठी वास किंवा (अर्थात समजणे (लाक्षणिक अर्थाने अंदाज लावणे, आनंद घेणे): - स्वीकारणे, वास घ्या, X टच करा, लवकर समजून घेणे.

हा श्वास आत किंवा बाहेर असू शकतो. श्वास बाहेर टाकणे काहीतरी देण्यास सूचित करते. श्वास आत घेणे काहीतरी प्राप्त करण्यास सूचित करते. दुसऱ्या भाषांतरात वचन 21 मध्ये "आणि" हा शब्द आहे . हा शब्द हिब्रू भाषांतरात अस्तित्वात नाही. प्राण्यांच्या बलिदानाने देव प्रसन्न झाला नव्हता. त्याने नोहाचा पश्चात्ताप स्वीकारला ज्याला ह्या कृत्याद्वारे असे म्हणायचे होते कि, "मला माहित आहे की मी स्वतःमध्ये निरुपयोगी आहे आणि मी तुझ्या मुलाच्या हत्येसाठी दोषी आहे." परमेश्वर त्याच्या महान दयेने पृथ्वीवर त्याचा आत्मा फुंकतो आणि त्याच्या कृपेने तो पृथ्वीला भरून काढण्यासाठी जीवन पाठवतो. जेव्हा आपण ख्रिस्ताच्या चरित्राच्या प्रकाशात पवित्र शास्त्र वाचतो, तेव्हा हे सर्व परिच्छेद येशू ख्रिस्ताच्या चेहऱ्यासारखे चमकू लागतात. 2 करिंथकर 4:6.

काइनाने संतुष्टीकरणाच्या उपासनेची तत्त्वे एक पाऊल पुढे निसर्ग उपासनेकडे नेली. त्याने आपल्या खुनी हृदयाचे प्रतीक असलेला कोकरू काढून टाकला आणि फक्त फळे आणि भाज्या अर्पण केल्या. देवाला प्रसन्न करण्याच्या या कृतीत पृथ्वीवरील वस्तू त्याचे तारण करणारे बनल्या. काईनने या उपासनेत आपल्या भावाच्या हत्येद्वारे भर घातली आणि त्यामुळे मूर्तिपूजक उपासनेची सुरुवात झाली. मूर्तिपूजक पंथांमध्ये मानवी बलिदानासह एकत्रित वृक्षांच्या उपासनेद्वारे हे प्रकट होते. या प्रकारची उपासना ही देवासाठी नित्य किंवा दैनंदिन दुःख होते. सैतानाने बलिदानात शिकवण्यासाठी ठेवलेल्या अत्यावश्यक सत्यांला विकृत केले, ज्यामुळे लोक देवाला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करण्यास प्रवृत्त झाले.

> जी राष्ट्रे तुम्ही ताब्यात घ्याल, त्यांतले लोक ज्या ज्या ठिकाणी, उंच डोंगरांवर, टेकड्यांवर आणि हरतऱ्हेच्या हिरव्या वृक्षांखाली आपापल्या देवांची सेवा करीत असतील त्या सर्व ठिकाणांचा अवश्य विध्वंस करा; त्यांच्या सर्व वेद्या पाडून टाका, त्यांचे स्तंभ फोडून टाका, त्यांच्या अशेरा मूर्ती अग्नीत जाळून टाका; त्यांच्या देवांच्या कोरीव मूर्ती फोडून तोडून टाका, त्या ठिकाणातून त्यांची नावनिशाणी नाहीशी करा. तुमचा देव

परमेश्वर ह्याच्या बाबतीत तसे करू नका. अनुवाद 12:2-4

इस्राएलाने मूर्तिपूजक उच्च स्थानांचा नाश करायला हवा होता तो म्हणजे उपासनेची संतुष्टीकरणाची मानसिकता थांबवणे आणि देवाला स्वतःचा आत्मा त्यांच्यावर फुंकण्याची परवानगी देणे होय. (म्हणजेच त्यांच्या बलिदानातून धुराचा सुवास घेऊ नये).

त्यांना वाटले की देव एकंदरीत त्यांच्यासारखाच आहे; त्यांना वाटले की ते देवाला त्याने मागितलेल्या गोष्टी देत आहेत: ते म्हणजे रक्त, दैवी तहान भागवण्यासाठी बलिदान दिलेल्या जीवनाचा पुरावा. पण देवाने सांगितले होते की तो स्वतः रक्त देईल.

> शरीराचे जीवन तर रक्तात असते, आणि तुमच्या जिवांबद्दल वेदीवर प्रायश्चित्त करण्यासाठी ते मी तुम्हांला दिले आहे; कारण रक्तात जीवन असल्याकारणाने रक्तानेच प्रायश्चित्त होते. लेवीय 17:11

जर त्यांनी देवाचा आवाज ऐकला असता, तर त्यांनी स्वतःच्या मनात असलेल्या या वेद्या उध्वस्त केल्या असत्या.

> कारण आम्ही देहात चालणारे असूनही आम्ही देहस्वभावाप्रमाणे युद्ध करत नसतो. कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टीने समर्थ आहेत. तर्कवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्वकाही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करून तिला ख्रिस्तापुढे मान वाकवण्यास लावतो; 2 करिंथ 10:3-5

इस्राएल कधीही उपासनेच्या संतुष्टीकरण तत्त्वापासून पूर्णपणे सुटले नाही याचा पुरावा या वस्तुस्थितीवरून दिसून येतो की उच्च स्थाने जवळजवळ संपूर्ण काळ इस्रायलमध्येच राहिली, अगदी परमेश्वराच्या दृष्टीने नीतिमान राजांच्या काळामध्येही.

> शलमोन राजाचे परमेश्वरावर प्रेम होते; आपला बाप दावीद ह्याने अनुसरलेल्या नियमांप्रमाणे तो चालत असे; पण तो उच्च स्थानी यज्ञयाग करी व धूप जाळीत असे. 1 राजे 3:3
>
> त्याने उच्च स्थाने मोडून टाकली नाहीत; तथापि आसाचे मन साऱ्या हयातीत परमेश्वराकडे पूर्णपणे लागलेले होते. 1 राजे 15:14
>
> तसेच इस्राएल लोकांनी आपला देव परमेश्वर ह्याच्याविरुद्ध अनुचित गोष्टी गुप्तपणे केल्या; पहारेकऱ्यांचे बुरूज असोत की तटबंदीची नगरे असोत, अशा आपल्या सर्व नगरांत त्यांनी उच्च स्थाने स्थापन केली. त्यांनी

> सर्व उंच पहाडांवर व प्रत्येक हिरव्या झाडाखाली मूर्तिस्तंभ व अशेरामूर्ती स्थापन केल्या; आणि परमेश्वराने जी राष्ट्रे त्यांच्यापुढून घालवली होती त्यांच्याप्रमाणे त्यांनी सगळ्या उच्च स्थानी धूप जाळला आणि परमेश्वराला संताप येईल अशा प्रकारची वाईट कर्मे केली. परमेश्वराने त्यांना "मूर्तीची उपासना करू नका" असे सांगितले असूनही त्यांनी त्यांची उपासना केली. 2 राजे 17:9-12

दोन राजांनी ही उच्च स्थाने काढून टाकली: हिज्कीया आणि योशीया.

> त्याने उच्च स्थाने काढून टाकली, मूर्तिस्तंभ फोडले, अशेरा मूर्तींचा उच्छेद केला व मोशेने केलेल्या पितळी सर्पाचे चूर्ण केले; कारण, हा काळपावेतो इस्राएल लोक त्यापुढे धूप जाळत असत; त्याला नहुश्तान (पितळेचा तुकडा) हे नाव दिले होते. 2 राजे 18:4

> जेवढी उच्च स्थाने शोमरोनातील नगरांत बांधून इस्राएलाच्या राजांनी परमेश्वरास संताप आणला होता ती सर्व योशीयाने काढून टाकली; त्याने बेथेल येथे केले होते त्याप्रमाणेच त्यांचे केले. तेथल्या उच्च स्थानांचे याजक होते तितक्यांना त्याने त्या वेद्यांवर बली दिले व त्यांच्यावर माणसांची हाडे जाळली. मग तो यरुशलेमेस परत गेला. 2 राजे 23:19-20

योशियाच्या कारकिर्दीतही नियमशास्त्राचे पुस्तक सापडले आणि ते पुन्हा नियम पाळू लागले आणि परमेश्वराचे सण पाळू लागले. 2 इतिहास 35:1. दुःखाची गोष्ट म्हणजे मिसर देशाच्या राजाविरुद्धच्या लढाईत योशीयाचा मृत्यू झाला आणि इस्राएल पुन्हा त्यांच्या उपासनेत मूर्तिपूजकतेकडे वळले. यानंतर काही काळानंतर त्यांना बाबेल राज्यात नेण्यात आले. यहेज्केलच्या च्या दृष्टान्तात इस्त्रायलची त्यांच्या सभोवतालच्या संतुष्टीकरण देवतांची पूजा करण्याची इच्छा सर्वात स्पष्टपणे चित्रित केली आहे.

> तेव्हा त्याने मला परमेश्वराच्या मंदिराच्या आतल्या अंगणात नेले, तो पाहा, परमेश्वराच्या मंदिराच्या द्वारी देवडीच्या व वेदीच्या दरम्यान सुमारे पंचवीस इसम परमेश्वराच्या मंदिराकडे पाठ करून व पूर्वेकडे तोंड करून उभे होते; ते पूर्व दिशेस सूर्याची उपासना करीत होते. यहेज्केल 8:16

इस्राएल राष्ट्र आणि विशेषतः त्यांच्या नेत्यांना मूर्तिपूजक राष्ट्रांप्रमाणे सूर्याची उपासना करण्याचे गुलाम बनवले गेले होते आणि शेवटी ते मूर्तिपूजक राष्ट्रांचे शारीरिक गुलाम होतील यात काही आश्चर्य नाही. बाबेल राज्याच्या बंदिवासात असताना, दानिएलाने देवाच्या लोकांचे काय होणार आहे हे समजून घेण्याची विनंती केली. दानिएलाच्या सातव्या अध्यायाच्या दृष्टान्तात त्याला एकापाठोपाठ एक अशुद्ध पशू जगावर राज्य करण्यासाठी समुद्रातून बाहेर येताना दिसतात. या सत्ताधीशांकडून देवाच्या लोकांवर अत्याचार व छळ केला जातो. देवाचे लोक या

छळाखाली विखुरले गेले आहेत, तरीही हे सर्व घडते कारण इस्त्रायलने उच्च स्थानांवर आधारित उपासनेची ठिकाणे काढून टाकण्यास नकार दिल्याने आणि त्यांच्या पापांसाठी पश्चात्ताप आणि मसीहामध्ये देवाचे नीतिमत्व स्वीकारण्यास नकार दिला.

> एवढे सर्व करूनही माझे तुम्ही ऐकले नाही व माझ्याविरुद्ध वागलात, तर मी संतापून तुमच्याविरुद्ध चालेन आणि तुमच्या पापांबद्दल तुम्हांला सातपट शिक्षा करीन. आपल्या मुलांचे व मुलींचे मांस खाण्याची पाळी तुमच्यावर येईल. तुमच्या पूजेची उच्च स्थाने मी उद्ध्वस्त करीन, तुमच्या सूर्यमूर्ती1 फोडून टाकीन आणि तुमच्या मूर्तींच्या मढ्यांवर तुमची मढी फेकून देईन; माझ्या जिवाला तुमची किळस येईल. मी तुमची नगरे उजाड करीन, तुमची पवित्रस्थळे ओसाड करीन आणि तुमच्या सुगंधी द्रव्यांचा वास मी घेणार नाही. मी देशाची नासाडी करीन व हे पाहून देशात वसणारे तुमचे शत्रू चकित होतील. परराष्ट्रांमध्ये मी तुमची पांगापांग करीन; मी तलवार उपसून तुमच्या पाठीस लागेन; तुमचा देश उद्ध्वस्त होईल आणि तुमची नगरे ओसाड पडतील. लेवीय.26:27-33

हे पुस्तक उल्लेख केलेल्या सात उदाहरणांच्या विशिष्ट तपशीलांचा अभ्यास करत नसले तरी, ते देवाच्या लोकांमध्ये खरी सुवार्ता पुनर्संस्थापित करण्याच्या संबंधात त्यांचे भविष्यसूचक महत्त्व अधोरेखित करते.

इस्राएलाला इतर राष्ट्रांचा नेता बनण्याची आणि त्यांच्या आजूबाजूची राष्ट्रे खरा देव आणि त्याच्या मार्गांबद्दल जाणून घेण्यासाठी इस्राएलमध्ये येतील अशी परमेश्वराची योजना होती. जर त्यांनी त्याचा आवाज ऐकला असता तर त्यांनी सार्वकालिक करार ओळखला असता आणि त्यांच्या संतुष्टीकरणाच्या धर्मशास्त्रापासून वळले असते. या महान मूर्तिपूजक राज्यांची जी उत्पत्ती झाली ती होण्याची गरज नव्हती. ही राज्ये मनुष्याच्या पापी अंतःकरणाचे प्रकटीकरण होते जेणेकरून माणसाने मनुष्याच्या मार्गांची जुलूम आणि निरर्थकता ओळखावी.

> यहूदाचा राजा आमोनाचा पुत्र योशीया ह्याच्या कारकिर्दीच्या तेराव्या वर्षापासून आजवर तेवीस वर्षे परमेश्वराचे वचन मला प्राप्त होत असून ते मी तुम्हांला सांगत आलो, मोठ्या निकडीने सांगत आलो; तरी तुम्ही ते ऐकले नाही. परमेश्वर आपले सर्व सेवक जे संदेष्टे त्यांना तुमच्याकडे पाठवत आला, मोठ्या निकडीने पाठवत आला, तरी तुम्ही ऐकले नाही, आपला कान लावला नाही. ते म्हणाले, 'तुम्ही सगळे आपल्या कुमार्गांपासून, आपल्या कर्मांच्या दुष्टतेपासून फिरा, म्हणजे परमेश्वराने तुम्हांला व तुमच्या पूर्वजांना जो देश युगानुयुग दिला आहे त्यात तुम्ही राहाल; अन्य देवांची सेवा करण्यास व त्यांचे भजनपूजन करण्यास त्यांच्यामागे जाऊ नका, म्हणजे तुम्ही आपल्या हातच्या कृतीने मला संताप आणणार नाही व मी तुमचे वाईट करणार नाही.' तरी आपल्या हातच्या

> कृतीने मला संताप आणून आपले नुकसान करून घ्यावे म्हणून तुम्ही माझे ऐकत नाही, असे परमेश्वर म्हणतो. ह्यास्तव सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तुम्ही माझी वचने ऐकली नाहीत. म्हणून पाहा, मी उत्तरेकडील सर्व राष्ट्रांना व माझा सेवक बाबेलचा राजा नबुखद्रेस्सर ह्याला बोलावून आणतो, असे परमेश्वर म्हणतो; त्यांना या देशावर, त्यातील रहिवाशांवर आणि आसपासच्या सर्व राष्ट्रांवर आणतो; मी त्यांचा अगदी नाश करून ती विस्मयास व उपहासास पात्र आणि कायमची उजाड करीन. यिर्मया 25:3-9

दानीएलाच्या दृष्टान्तात जी चार राज्ये उभी झाली ती म्हणजे बाबेल, पर्शिया, ग्रीस आणि रोम. या सर्व राज्यांमध्ये उपासनेची मंदिरे होती ज्यात त्यांच्या देवतांसमोर यज्ञ केले जात होते. देवाविरुद्ध सैतानाच्या युद्धाचा केंद्रबिंदू म्हणजे त्यागाद्वारे संतुष्टीकरणाचा सततचा प्रचार. त्यांचा यज्ञ रोज केला जात असे. सायरस (538-529BC) च्या सिलेंडरवर लिहिलेला एक शिलालेख आहे जो त्यांच्या दैवतांना त्यांच्या दैनंदिन बलिदानाबद्दल बोलतो.

> त्याने दररोज योजना आखली आणि शत्रुत्वात, नियमित होणारे अर्पण थांबवले; त्याने नेमणूक केली -व शहरात त्याची स्थापना केली. एफएल शार्प, अँटिओकस किंवा रोम, पान क्रमांक 40.

या ओळींमध्ये अशा वेळेचा उल्लेख आहे जेव्हा होमार्पणात अडथळा आणला होता. हे आम्हाला सांगते की त्यांच्या सेवेचा भाग म्हणून त्यांच्याकडे सहसा दररोज यज्ञ होते. दानीएल येणाऱ्या भविष्याबद्दल आणि त्यांच्या लोकांच्या छळाबद्दल सतत आश्चर्य करत असताना, त्याने दृष्टान्तात दोन स्वर्गीय लोकांना संभाषण करताना ऐकले आणि तेव्हा तो निराश झाला:

> त्यांतल्या एका शिंगातून एक लहान शिंग निघाले; त्याची दृष्टी दक्षिणेस, पूर्वेस व त्या वैभवी देशाकडे पराकाष्ठेची झाली. त्याची वृद्धी आकाशगणांपर्यंत होऊन त्या गणांपैकी व त्या ताऱ्यांपैकी काहींना त्याने जमिनीवर पाडून तुडवले. एवढेच नव्हे तर त्या गणांच्या अधिपतीबरोबर तो स्पर्धा करू लागला; त्याला नित्य होत असलेले यज्ञयाग त्याने बंद केले आणि त्याचे पवित्रस्थान पाडून टाकले. लोकांच्या पातकास्तव ते सैन्य नित्याच्या यज्ञयागांसहित त्याच्या स्वाधीन करण्यात आले; त्याने सत्य मातीस मिळवले; त्याने आपला मनोरथ सिद्धीस नेला. तेव्हा मी एका पवित्र पुरुषाला बोलताना ऐकले; दुसरा एक पवित्र पुरुष त्या बोलणाऱ्यास म्हणाला, "हा नित्याचा यज्ञयाग, विध्वंसमूलक पातक, पवित्रस्थान व सैन्य ही पायांखाली तुडवणे, ह्या दृष्टान्तात पाहिलेल्या गोष्टी कोठवर चालणार?" तो मला म्हणाला, "दोन हजार तीनशे दिवस; त्यानंतर पवित्रस्थानाची शुद्धी होईल." दानीएल 8:9-14

आपण ह्या उताऱ्याच्या सर्व तपशीलांमध्ये अडकू इच्छित नाही. आम्ही येथे एक

महत्त्वाचा मुद्दा सांगू इच्छितो की मूर्तिपूजकांद्वारे प्रचलित असलेली दैनंदिन उपासना पद्धत तिच्या मूर्तिपूजक स्वरूपात काढून घेतली जाईल आणि ख्रिस्ती पद्धतीमध्ये बदलली जाईल. रोमन साम्राज्याच्या पतनानंतर, एक नवीन शक्ती उदयास आली ज्याने प्रतिशोधाची मागणी करणाऱ्या संतप्त देवतेला शांत करण्यासाठी दंडात्मक पर्याय म्हणून ख्रिस्ताच्या बलिदानाची पुनर्व्याख्या केली. हा असा भाग आहे जो समजणे कठीण नाही. बऱ्याच ख्रिस्ती मंडळीमध्ये प्रचार केला जाणारा सुवार्तेचा संदेश प्रत्यक्षात उपासनेच्या मूर्तिपूजक संकल्पनांपासून प्रेरणा घेत आहे.

दानीएल या घटनेच्या भीषणतेचा विचार करत असताना तो भारावून गेला.

> हा जो अहोरात्रीचा दृष्टान्त सांगितला तो खरा आहे; हा दृष्टान्त गुप्त ठेव, कारण तो दीर्घकाळास लागू आहे." मग मी दानीएल मूर्च्छित झालो व काही दिवस आजारी पडलो; त्यानंतर मी उठून राजाचे कामकाज करू लागलो. हा दृष्टान्त पाहून मी विस्मित झालो; पण तो कोणास कळला नाही. दानीएल 8:26-27

हे कसे घडेल हे समजून घेण्याचा प्रयत्न करत असताना, मागील दृष्टान्ताबद्दल अधिक स्पष्ट करण्यासाठी गॅब्रिएल देवदूताला दानीएलाकडे पाठवण्यात आले. मसीहा राजपुत्र घेऊन येणाऱ्या सत्तर आठवड्यांच्या कालावधीबद्दलच्या भविष्यवाणीचा प्रारंभ गॅब्रिएल देवदूत दानीएलाला देतो. मग गॅब्रिएल देवदूत खूप महत्त्वाची गोष्ट सांगतो.

> तो पुष्कळ लोकांबरोबर एक सप्तकाचा पक्का करार करील; अर्ध सप्तकापर्यंत तो यज्ञ व अन्नबली बंद करील; उद्ध्वस्त करणारा अमंगलांच्या पंखांवर आरूढ होऊन येईल व ठरलेल्या समाप्तीपर्यंत उद्ध्वस्त करणाऱ्यावर कोपाचा वर्षाव होईल." दानीएल 9:27

हे वचन पृथ्वीवरील ख्रिस्ताच्या कार्याबद्दल बोलते. येशूच्या मृत्यूनंतर, प्राण्यांचे बलिदान यापुढे देवाच्या उपासनेचा भाग होणार नाही. जेव्हा ख्रिस्त मरण पावला, तेव्हा मंदिरातील पडदा अर्धा फाटला गेला आणि त्यामुळे भौतिक यज्ञपद्धतीचा अंत झाला.

तथापि, या वचनाचा एक सखोल अर्थ आहे जो बहुतेकांना पूर्णपणे समजलेला नाही. आपल्याला माहीत आहे की, येशू वधस्तंभावर मरण पावल्यानंतर, प्राण्यांचे कोणतेही महत्त्व नसतानाही पशुबलिदान दिले जात होते. ख्रिस्ताच्या कार्याचे खरे सार म्हणजे केवळ भौतिक यज्ञ बंद करण्यापलीकडे आहे. जेव्हा लोकांना वधस्तंभाचे सत्य अचूकपणे समजेल तेव्हा मुर्तीपुजकांच्या हृदयातून संतुष्टीकरणाच्या धर्मशास्त्राचा सिद्धांत नाहीसा होईल. जेव्हा आपल्याला खरा सार्वकालिक करार समजतो, तेव्हा आपण संतुष्टीकरणाच्या बलिदानाच्या

प्रक्रियेद्वारे देवाकडे जाणे थांबवतो. या वचनाचा सखोल वास्तवीक अर्थ असा आहे की तो सर्व यज्ञ आणि अर्पण थांबवेल. “साठी” ह्या लहान शब्दाचे भाषांतर “विरुद्ध” असे केले जाऊ शकते. सार्वकालिक कराराचे सखोल अर्थ आपल्यामधील संतुष्टीकरणाचे धर्मशास्त्र कमी करेल, आणि देवाच्या प्रेमाच्या खऱ्या सुवार्तेला व त्यांच्या चारित्र्याला अस्पष्ट करणाऱ्या गोष्टींचा सामना करण्यास आपल्याला अनुमती देईल. या विषयावर एक पुस्तक लिहिता येईल पण हे संबंध स्पष्ट आहेत. वधस्तंभाची खरी समजूत आपल्यातील घृणास्पद गोष्टी उघड करेल आणि त्यांना पराभूत करेल.

आज बहुतेक लोक जेव्हा ख्रिस्ताच्या वधस्तंभाबद्दल बोलतात तेव्हा ते देवाच्या क्रोधाच्या संदर्भात बोलतात. असे विचार आपल्याला केवळ विनाशाकडे नेतात जे आपले हृदय उजाड करते. एखाद्या व्यक्तीच्या मनातील देवाबद्दलच्या कोणत्याही भावना गुप्तपणे उद्ध्वस्त होतात जेव्हा तो स्वतःच्या रागाचे समाधान करण्यासाठी देव स्वतःच्या पुत्राला मारून टाकतो अशी कल्पना करतो. केवळ त्याच्या पुत्राच्या हत्येनेच देवाचे समाधान होईल असे मृत्यूचे फर्मान देवाला लागू करावे लागले. कॅथोलिक शिकवण ह्या संतुष्टीकरण प्रथांचे एक पूर्ण व्यक्त झालेले चित्र आहे. किमान प्रत्येक रविवारी मासमध्ये उपस्थित राहून, पृथ्वीवरील पाळकासमोर आपल्या पापांची कबुली देऊन, त्रैक्य देवावर विश्वास ठेवून आणि कॅथोलिक संतांच्या गुणवत्तेवर विसंबून राहून, आपण नरकाच्या सार्वकालिक अग्नीचा म्हणजे देवाचा क्रोध टाळू शकतो असे ते समजतात.

सत्य फक्त हे आहे कि:

# ज्यांच्याशी मशीहा कराराची पुष्टी करतो त्यांच्यासाठीच त्याग आणि अर्पण खरोखर थांबते.

पशूंचे बलिदान काढून टाकल्याने या अर्पणांमधून देवाला संतुष्ट करण्याची इच्छा दूर होत नाही. आब्राहामाप्रमाणेच, आज आपण हा आवाज ऐकू शकतो की आपण आपल्या सर्वात प्रिय नातेसंबंधांमध्ये चाकू मारून देवाला संतुष्ट करू इच्छितो.

सुवार्था सांगण्यासाठी जे प्रचारक आपल्या कुटुंबाचा त्याग करतात त्यांच्यासाठी हा संदेश आहे , आवाज ऐका - "मला शांत होण्याची गरज नाही! सुवार्था सांगण्यासाठी तुमची कामे तुमच्या पापांसाठी प्रायश्चित करत नाहीत. सिद्धांताच्या आवृत्तीचा तुमचा व्यवसाय ज्यामुळे इतरांना विधर्मी म्हणून वेगळे करणे आणि त्यांची निंदा करणे आवश्यक आहे ते थांबू शकते.

आपण आपल्या मूर्तिपूजक विचारसरणीपासून मुक्त व्हावे अशी आपल्या स्वर्गातील पित्याची इच्छा आहे. तो आपल्यावर प्रेम करतो - अगापे परमेश्वर आपल्यावर प्रेम करतो यावर आपण खरोखर विश्वास ठेवावा अशी त्याची इच्छा आहे. तो आपल्यावर अगोदरपासून प्रेम करतो, त्याने आपल्यावर अधिक प्रेम करण्यासाठी आपण काहीही करू शकत नाही किंवा काहीही म्हणू शकत नाही. ह्या ख्रिस्ती लेखकाचे हे मनभेदक विचार वाचा:

> प्रायश्चित्त किंवा त्यागाची कल्पना अशी आहे की ते राग शांत करण्यासाठी आहे. परंतु लक्ष द्या की आपल्यालाच बलिदानाची आवश्यकता आहे, देवाला नाही. तो तर आपल्याला बलिदान पुरवतो. आपल्याला क्षमा मिळावी म्हणून देवाच्या क्रोधाचे प्रायश्चित्त केले पाहिजे या कल्पनेचे पवित्र शास्त्रामध्ये कोणतेही पुरावे आढळत नाही. देव माणसांवर इतका क्रोधित आहे की त्याचा क्रोध शांत करण्यासाठी काही प्रदान केल्याशिवाय तो त्यांना क्षमा करणार नाही, आणि म्हणूनच तो स्वतःच मनुष्यांना अर्पण पुरवतो, ज्याद्वारे तो शांत होतो, असे म्हणणे मूर्खपणाची गोष्ट आहे....
>
> स्वतःला ख्रिस्ती म्हणवणाऱ्या लोकांद्वारे धारण केलेली विदेशी कल्पना ही आहे की पुरुषांनी त्यांच्या देवाचा क्रोध शांत करण्यासाठी यज्ञ करणे आवश्यक आहे. ही सर्व विधर्मी उपासना केवळ त्यांच्या देवतांनि त्यांच्यावर अनुकूल व्हावे ह्यासाठी त्या दैवताला दिलेली लाच आहे.....
>
> भूतकाळात तथाकथित ख्रिस्ती देशांमध्ये जो छळ केला जात होता आणि काही प्रमाणात आजही आहे, तो केवळ प्रायश्चित्ताच्या या विधर्मी कल्पनेद्वारे बाहेर आलेला आहे. धर्मगुरू व  नेत्यांची कल्पना आहे की तारण कृतींद्वारे मिळते आणि मनुष्य कृतीद्वारे पापाचे प्रायश्चित्त मिळवू शकतो आणि म्हणून ते ज्याला बंडखोर समजतात त्याला त्यांच्या देवाला बलिदान म्हणून अर्पण करतात, परंतु खऱ्या देवाला नाही कारण तो अशा यज्ञांवर प्रसन्न होत नाही.  इ. जे. वागणोर, प्रेसेंट ट्रुथ, ऑगस्ट 30,1894.

जर आपण प्रामाणिक राहिलो आणि आपल्या पित्याच्या प्रेमाची वास्तविकता पाहिली तर ते आपल्यामध्ये पश्चात्तापाची खोल भावना जागृत करू लागेल.

> मी यज्ञाचा नाही तर दयेचा भुकेला आहे; होमार्पणांपेक्षा देवाचे ज्ञान मला आवडते. होशेय 6:6

बलिदान प्रणाली ही एक प्राथमिक संरक्षण यंत्रणा आहे जी मानवांना ख्रिस्ताच्या हत्येतील त्यांची भागीदारी मान्य करण्यापासून प्रतिबंधित करते. या अंतिम अडथळ्यावर मात केल्याने एक गहन परिवर्तन सुरू होईल.

> आणि मी दाविदाच्या घराण्यावर व यरुशलेमेच्या रहिवाशांवर कृपा व विनवणी ह्यांच्या आत्म्याचा वर्षाव करीन आणि ज्या मला त्यांनी विंधले त्या माझ्याकडे ते पाहतील; एकुलत्या एका पुत्रासाठी शोक करावा तसे ते त्याच्यासाठी शोक करतील; ज्येष्ठ पुत्राबद्दल जसा कोणी अत्यंत खेद करतो तसा ते त्याबद्दल खेद करतील. जखऱ्या 12:10

देवाच्या खऱ्या, प्रेमळ स्वभावाच्या प्रकाशात, आदामाला त्याच्या पापाबद्दल किती तीव्र दु:ख वाटायला हवे होते ते आपण आता अनुभवू शकतो. देवाला संतुष्ट करण्यासाठी त्यागाची आणि अर्पणाची आवश्यकता नाही. त्याला आवश्यक असलेला त्याग हा आहे:

> देवाचे यज्ञ म्हणजे भग्न आत्मा; हे देवा, भग्न व अनुतप्त हृदय तू तुच्छ मानणार नाहीस. स्तोत्रसंहिता 51:17

> कारण जो उच्च, परमथोर आहे, जो अक्षय स्थितीत वास करतो, ज्याचे नाम पवित्र प्रभू आहे, तो असे म्हणतो : "मी उच्च व पवित्रस्थानी वसतो, तसाच ज्याचे चित्त अनुतापयुक्त व नम्र आहे त्याच्या ठायीही मी वसतो; येणेकरून नम्र जनांच्या आत्म्याचे मी संजीवन करतो व अनुतापी जनांचे हृदय उत्तेजित करतो. यशया 57:15

जर तुम्ही या पुस्तकाच्या तत्त्वांच्या प्रकाशात पवित्र शास्त्र काळजीपूर्वक शोधण्यास तयार असाल, तर तुम्हाला येशूने फिलिपला सांगितलेल्या शब्दांची सत्यता सापडेल:

> येशूने त्याला म्हटले : "फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर 'आम्हांला पिता दाखवा' असे तू कसे म्हणतोस? योहान 14:9

वैयक्तिकरित्या, माझ्या स्वर्गातील पित्याच्या प्रेमळ स्वभावाच्या विचाराने दररोज सकाळी उठणे हे माझ्यासाठी एक आनंद आहे. तो खरोखर कसा आहे हे

दाखवण्यासाठी तो आपल्या पुत्राला पाठवण्यास खूप इच्छुक आहे हे जाणून मला खूप आनंद झाला. मानवतेने सर्व गोष्टींना विस्कळून टाकण्याची जोखीम असतानाही, येशू स्वेच्छेने आपल्याला पित्याचे स्वरूप दाखवण्यासाठी आणि तो आपला शत्रू नाही हे आपल्याला कळावे ह्यासाठी तो आला; तो आपला पिता आहे, आपला दयाळू पिता जो त्याच्या मुलांवर प्रेम करतो. कोणतेही शब्द खरोखरच त्याच्या परिपूर्ण व निःस्वार्थ-अगापे प्रेमाची खोली व्यक्त करू शकत नाहीत.

मला मनापासून आशा आहे की आपण एकत्रितपणे परिपूर्ण शांततेच्या स्थितीत प्रवेश करू आणि येशूचे हे शब्द पूर्णपणे समजू शकू.

> आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, “हा माझा ‘पुत्र’, मला ‘परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.” मत्तय 3:17

> त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे. इफिसकरांस 1:6

2000 वर्षांपूर्वी पृथ्वीवर आलेल्या ख्रिस्ताचे जीवन आपल्यासाठी निःस्वार्थ प्रेमाचे एक उदाहरण आहे ज्याने लाखो लोकांना शांती मिळाली आहे. ज्यांना देवाच्या वचनात रस आहे त्यांच्यासाठी, पवित्र शास्त्रामधील देवाचे वर्णन आणि ख्रिस्ताचे जीवन यांच्यातील असमानतेमुळे ख्रिस्ताचे काही दावे सोडवणे फार कठीण झाले आहे. तरीही एका मार्मिक क्षणी त्याच्या अनुयायांशी बोलताना येशू म्हणाला, “जर तुम्ही मला पाहिले असेल तर तुम्ही पित्याला पाहिले आहे.”

हे कसे शक्य होईल? येशूच्या जीवनात प्रकट केल्याप्रमाणे पिता खरोखरच दयाळू, आणि कनवाळू आहे हे खरे असू शकते काय? पवित्र शास्त्रातील शब्दांवर विश्वास ठेऊन हे विरोधाभास आपल्याला खरोखरच सोडवता येईल काय? हे विरोधाभास सोडवण्याची गुरुकिल्ली तुम्ही तुमच्या हातात धरली आहे.